म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३४११

३४११

श्री-मानस

श्रीपाद जोशी

REFBK-0026308

सेवा
केवं ह्य
३८११
२६३०८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

0 MAR 1991
0 MAR 1991
2 C MAR 1991
27 APR 1991
15 JUN 1991
22 JUN 1991
3 - JUL 1991
30 JUL 1994

17 AUG 1991
14 SEP 1991
27 FEB 1993
27 FEB 1993
13 MAR 1993
13 MAR 1993

(क्र. मा. पहा)
१००००-११-८९

श्रीमानस

(निवडक लेख)

श्रीपाद जोशी

REFBK-0026308

शब्दांगण प्रकाशन

प्रकाशिका
सौ. शकुंतला पंडित
शब्दांगण प्रकाशन
'सेवाधाम', डॉ. मूस रोड
ठाणे–४००६०२

मुद्रक
दिनेश शंकर चंदेल
चंदेल प्रिंटिंग प्रेस
१४८२ शुक्रवार पेठ
पुणे–४११ ००२

© श्रीपाद जोशी

मुखपृष्ठ
सतीश भावसार

प्रथमावृत्ती
२१ डिसेंबर १९९०
चौसष्टावे साहित्य संमेलन (रत्नागिरी)

मूल्य : रु. ११०/–

प्रस्तावना

मराठीतील एक बहुप्रसव आणि बहुश्रुत लेखक श्री श्रीपाद जोशी यांनी अलीकडच्या काळात वेगवेगळ्या नियतकालिकांतून लिहिलेल्या लेखांपैकी काही निवडक लेखांचा हा संग्रह आहे. वृत्तपत्रीय लिखाणाचे स्वरूप प्रायः प्रासंगिक असणे हे स्वाभाविकच असते. त्यामुळे तशा स्वरूपाच्या लेखनाला काहीशी तात्कालिकताही प्राप्त होते. पण लेखक जर चिंतनशील प्रवृत्तीचा आणि बहुश्रुत असेल तर त्या साहित्याचे तात्कालिक स्वरूप बदलून जाते. श्रीपाद जोशी हे अशा लेखकांपैकी एक आहेत. या संग्रहातील दलित साहित्यासंबंधीच्या लेखात त्यांनी स्वतःच आपल्या बहुप्रसव लेखणीची (१७०० लेख व १८० पुस्तके) माहिती दिली आहे. लेखन-संभार एवढा मोठा असला व बहुसंख्य लेख घडच्याळाशी स्पर्धा करणाऱ्या वृत्तपत्रां-साठीच लिहिलेले असले तरी, श्रीपाद जोशींच्या मूलभूत चिंतनशीलतेची आणि प्रांजल परखडपणाची व आग्रही आणि लालित्यपूर्ण शैलीची जोड मिळालेली असल्याने कालांतरानेही वाचकांना खिळवून ठेवण्याची ताकद जोशींच्या लेखनाला प्राप्त होते, याचा अनुभव या संग्रहातील लेख वाचतानाही येईल.

गेल्या सात-आठ वर्षांत श्री जोशी यांनी लिहिलेल्या विपुल अशा लेखांतून ३०–३२ लेखांची निवड करून हा संग्रह तयार करण्यात आला आहे. पंजाब, काश्मीर, आसाम, नागभूमी, मिझोलँड, गोरखालँड अशा वेगवेगळ्या रूपाने फुटीरतावादाच्या राक्षसाचा भयावह नाच सुरू आहे. पंजाब आणि काश्मिरात तर, राष्ट्राच्या सार्वभौमत्वालाच आव्हान देण्यात आलेले आहे; आणि काश्मिरातील पाकिस्तानवाद्यांनी देशाच्या दुसऱ्या फाळणीचे संकट उभे केले आहे. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर तरी द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचा पुरस्कार करणाऱ्या प्रवृत्ती नाहीशा होऊन विशुद्ध राष्ट्रवादाच्या भावनेचा हिंदुस्थानात परिपोष होईल, अशी आशा वाटत होती. पण ती आशा फोल ठरल्याचा अनुभव गेल्या पाच-सहा वर्षांत विदारकपणे येऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर हा संग्रह प्रकाशित होत असल्याने लेखांची निवड काही निश्चित दृष्टिकोन ठेवून केल्याचे जाणवते. त्यामुळेच एक

सूत्रबद्धताही या संग्रहास आपोआप प्राप्त झाली आहे. हिंदू-मुस्लीम समस्या आणि प्रांजळ सर्वधर्मसमभाव (जेन्युइन सेक्युलॅरिझम्) यांसंबंधी मुळापासून चर्चा आज सुरू झाली आहे. त्या चर्चेला काही दृष्टिकोन आणि लोकांच्या विचारांना काही दिशा देण्याची कामगिरी हा संग्रह साधू शकेल. त्यामुळेच आजच्या काळात या स्वरूपाचा संग्रह प्रसिद्ध करण्यात एक प्रकारचे औचित्य साधले गेले आहे.

राष्ट्रवाद, जमातवाद, जातीयवाद, सर्वधर्मसमभाव, द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व संघ परिवारातील इतर संस्था, गांधीविचार वगैरे अनेक प्रश्नांसंबंधी श्री. श्रीपाद जोशी यांचे चिंतन या लेखसंग्रहातून व्यक्त होते. रा. स्व. संघासंबंधी एक तर आंधळा विरोध किंवा भाबडी भक्ती असे दोनच दृष्टिकोन सामान्यतः आढळतात. श्री जोशी यांनी प्रांजळ तटस्थतेने रा. स्व. संघाचे मूल्यमापन केले आहे. त्यांचा संघाशी व इतर विचारप्रणालींशी घनिष्ठ संबंध आला असल्यामुळे भक्ती आणि विरोध यांतील आंधळेपणा टाळून डोळसपणे संघाचे व इतरांचे मूल्यमापन श्री जोशी करू शकले आहेत, असे मला वाटते. राष्ट्रनिष्ठा हीच संघाची मूलभूत प्रेरणा आहे. संघ ज्याला हिंदू राष्ट्रवाद म्हणतो त्याचा मूलाधारही राष्ट्रनिष्ठाच आहे; पण स्वातंत्र्यलढ्याच्या कालखंडात आणि स्वातंत्र्यानंतरही मुस्लिम समाजाला चुकीच्या वाटेने नेण्याचा प्रयत्न त्या समाजाच्या पुढाऱ्यांनी व अन्य राजकीय नेत्यांनी केला. त्यामुळे सारा अनर्थ घडून आला. वास्तविक पाकिस्तानची निर्मिती धर्माच्या आधारे होऊन एक इस्लामी राष्ट्र निर्माण झाल्यावर मागे उरले ते 'हिंदुस्थान'च, ही भूमिका त्याचवेळी स्वीकारली असती व अल्पसंख्यकांच्या मनातील भीती आणि अविश्वास दूर करून त्यांना भारतीय (हिंदू) संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात एकरूप करण्याचा प्रयत्न झाला असता, तर आज उग्र बनलेल्या पंजाब-काश्मीर आणि रामजन्मभूमी या समस्या निर्माणच झाल्या नसत्या व खराखुरा सर्वधर्मभाव आपोआपच निर्माण झाला असता. दुर्दैव असे की, हा विचार संकुचित जातीयवादी ठरविण्यात आला आणि संकुचित

राजकीय स्वार्थापोटी अल्पसंख्यांकांच्या अलगतेच्या भावनेला खतपाणी घालण्याच्या प्रयत्नांना उदारमतवादी आणि राष्ट्रवादी ठरविण्यात आले. अल्पसंख्यांकांची अलग अस्मिता पुष्ट करण्याच्या प्रयत्नातूनच द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत बळावतो, हे आजच्या सर्व अनर्थांचे मूळ आहे. धर्मनिरपेक्षतेच्या आणि कौमी एकतेच्या घोषणा वर्षामागून वर्षे सातत्याने देऊनही इथल्या मुसलमान समाजात ही सर्वधर्मसमभावाची व असांप्रदायिक स्वभावाची भावना जोपासली गेली नाही, ही वस्तुस्थिती मान्य केली, तरच आजच्या परिस्थितीतून मार्ग काढता येऊ शकेल.

वास्तविक 'हिंदू' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्राचीनतम देशातील समाजाचा विकास कोणत्याही संकुचित सांप्रदायिक आधारावर झालेला नाही, तर 'विविधतेत एकता' या अत्यंत उदार धारणेवर आधारित या समाजाचा विकास झालेला आहे, पण मतांचे सत्ताकरण करणाऱ्या काँग्रेस, समाजवादी आणि मार्क्सवादी अशा राजकीय पुढाऱ्यांनी 'हिंदू' शब्दाला सांप्रदायिक स्वरूप देऊन हिंदू विरुद्ध मुस्लिम, हिंदू विरुद्ध ख्रिश्चन अशा कृत्रिम भेदभावाच्या भिती समाजात निर्माण केल्या. ही 'फोडा आणि सत्ता भोगा'ची कूट नीती ब्रिटिशांनी अवलंबिली, ते समजण्यासारखे होते; पण स्वातंत्र्योत्तर काळातही देशी राज्यकर्त्यांनी स्वार्थापायी मुस्लिम समाजाला सतत अलग ठेवण्याचाच प्रयत्न केला.

वास्तविक ज्यांच्यामुळे ह्या देशाची प्राचीन संस्कृती ओळखली जाते व ज्यांच्याशी या देशाचे अस्तित्वच निगडीत आहे असे महापुरुष या देशातील यच्चयावत् सर्वांचा सांस्कृतिक वारसा; पण राम, कृष्ण, शिवाजी, राणाप्रताप, बुद्ध इत्यादी महापुरुषांचा अभिमान बाळगणे हे जातीयवादाचे लक्षण असे शिकवले गेल्यामुळे या भूमीशी मुस्लिम समाजाची नाळ कधी जोडली जाऊच शकली नाही. दुसऱ्या बाजूने बाबर आणि गझनीचा महमूद यांच्यासारखे विदेशी, धर्मांध आक्रमक हेच तुमचे सांस्कृतिक महापुरुष ही भावना मुसलमान समाजात पद्धतशीरपणे बिंबवली गेली. 'भारतीय म्हणजे हिंदू संस्कृती ही माझ्या पूर्वजांची संस्कृती म्हणूनच

माझीही संस्कृती' असे अभिमानाने सांगणाऱ्या न्या. महमदअली छागलांसारखे सच्चे राष्ट्रवादी मुसलमान संख्येने कमी असल्यामुळे व मुळातच धर्मनिरपेक्षता हा इस्लामचा स्थायीभाव नसल्याने छागला प्रभृतींच्या विचारांचा प्रभाव मुस्लिम समाजावर पडू शकला नाही. भ्रांत धर्मनिरपेक्षतेच्या मोहजाळात जाणूनबुजून अडकल्यामुळे देशावर अनर्थांचे आघातामागून आघात झाले. मुसलमानांच्या ज्या अलगतावादी प्रवृत्तींमुळे देशाची फाळणी झाली आणि अपरिमित नरसंहार झाला, त्या अलगतावादी प्रवृत्तीशी स्वातंत्र्यानंतर तरी कायमची फारकत घेतली जायला हवी होती. पण तेवढे धैर्य आमच्या राजकीय नेतृत्वाला झाले नाही. मुस्लिम समाजाला त्याच्या हिताचे सत्य कितीही कटू असले तरी, ते सांगायला हवे होते. त्याऐवजी लहान लहान बाबतीतही आम्ही लांगूल चालनाची भूमिका पत्करली. मातृभक्तीचे महन्मंगल स्तोत्र असलेले वंदे मातरम्सारखे राष्ट्रगीत म्हणण्यास मुस्लिमांचा विरोध म्हणून भारतीय आकाशवाणीवर उर्दू कार्यक्रमांच्या प्रारंभी व शेवटी ते गीत म्हणण्यास मनाई करण्यात आली. शिवछत्रपतींसारख्या राष्ट्र-पुरुषाच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुकांना मुस्लिमांचा विरोध म्हणून त्या मिरवणुकांवर बंदी घालण्यात आली. मुस्लिम समाजाला आणि विशेषतः मुस्लिम महिलांना पुन्हा मध्ययुगीन अंधाऱ्या गर्तेत लोटणाऱ्या शरियतऐवजी समान नागरी कायदा लागू करण्याची मागणी फेटाळण्यात आली. या सर्वांतून काही निष्पन्न झाले असेल तर, ते म्हणजे मुस्लिम समाजाविषयी बहुसंख्य हिंदूंच्या मनातील अविश्वास अधिक गडद झाला. 'इस्लाम खतरेमें'च्या घोषणा देण्यात बेगडी धर्मनिरपेक्षता-वादीच आघाडीवर आहेत. त्यामुळे मुस्लिमांच्या मनातील काल्पनिक असुरक्षिततेची भावना अधिक वाढली. भारतीय समाजाची धर्माच्या आधारावर आडवी आणि उभी फाळणी झाली.

'एकं सत् विप्रा, बहुधा वदन्ति'चा उद्घोष करणाऱ्या भारतीय संस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या या देशात कुणाचाही खऱ्याखुऱ्या धर्मनिरपेक्षतेला विरोध

असण्याचे कारण नाही; आणि हिंदूंचा तर विरोध नाहीच नाही. सर्वधर्मसमभाव हा हिंदू समाजाच्या युगानुयुगे चालत आलेल्या सैद्धान्तिक निष्ठेचा स्वाभाविक आविष्कार आहे. हिंदू राष्ट्रवादाचा पाया हा अति व्यापक सांस्कृतिक पाया आहे व या पायावरच राष्ट्रनिष्ठेचा इमला सुरक्षित राहू शकतो. पण अलगतावादाचा परिपोष केला गेल्यामुळे बहुसंख्य हिंदू समाजाव्यतिरिक्त अन्य अल्पसंख्यांकांच्या ठायी सच्ची राष्ट्रनिष्ठा निर्माण होण्याऐवजी देशबाह्य निष्ठा निर्माणच झाल्या. या देशबाह्य निष्ठांचा विकृत आविष्कार आम्ही वेळोवेळी पाहिला आहे. आज अयोध्येतील रामजन्मस्थानावरील मंदिर आणि बाबरी मशीद यांच्यांतील वादाला जे रक्तलांछन लागले, त्याचे मूळ आमच्या धर्मनिरपेक्षतेच्या भ्रांत धारणेत आहे. राम मंदिराचा प्रश्न माझ्या मते निमित्तमात्र आहे. या संघर्षामुळे राष्ट्रवाद, सांप्रदायिकता आणि धर्मनिरपेक्षता या संबंधांत पूर्वग्रहरहित चर्चा खुल्या दिलाने सुरू झाली व समाजाच्या डोळ्यांवरील भ्रांत भावनेचे पटल दूर होण्याची प्रक्रिया सुरू झाली, हे महत्त्वाचे आहे. या प्रक्रियेला श्रीपाद जोशींच्या या लेखसंग्रहातील लेखांचा हातभार लागेल, असा विश्वास वाटतो. श्रीपाद जोशी यांनी या संग्रहातील 'वंदे मातरम्' संबंधीच्या लेखामध्ये म्हटले आहे की, "देशावर प्रेम करणे हे कुणी शिकवावे लागत नाही. ती उपजत भावना असते. तशी ती मुसलमानांतही असली पाहिजे; पण मतांचे सौदे करणाऱ्या राजकारण्यांनी व मुस्लिम पुढाऱ्यांनी मातृभूमीवर प्रेम करणे हे इस्लामविरोधी आहे, असे पढवून त्यांच्या मातृभक्तीला पायबंद घातला आहे." श्री जोशी यांनी केलेले हे विश्लेषण या प्रश्नाच्या मुद्याला हात घालणारे आहे. नव्या युगाला अनुकूल अशी समाजरचना करू इच्छिणाऱ्या सर्वांनाच या मूलगामी विचारांची कास धरूनच पुढे जावे लागेल.

मार्गशीर्ष वद्य ४ शके १९१२
दि. ५ डिसेंबर १९९०

चंद्रशेखर वाघ



मनोगत

'शब्दांगण' मासिकाचे संपादक व शब्दांगण प्रकाशनाचे संचालक, ठाण्याचे प्रख्यात शल्यचिकित्सक डॉक्टर वामनराव पंडित आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शकुंतलाबाई पंडित यांनी माझ्या निवडक लेखांचा संग्रह प्रकाशित करण्याची इच्छा प्रदर्शित केली, तेव्हा मला जेवढा आनंद झाला, त्याहून अधिक आश्चर्य वाटले. आपल्या लेखनगुणाची कदर करणारे कोणी भेटले की, सर्वच लेखकांना जसा आनंद होतो तशाच प्रकारचा आनंद मला होणे स्वभाविकच होते. आश्चर्य अशासाठी की, आजपर्यंत हा विचार कोणाही प्रकाशक मित्राला सुचला नसताना पंडित मंडळींनाच तो कसा काय सुचला असेल ? कारण, रूढ अर्थाने मी काही लोकप्रिय म्हणजे खपाऊ लेखक नव्हे. माझा असा एक खास वाचक वर्ग गेल्या पन्नास वर्षांत तयार झाला आहे, हे खरे; परंतु तो फार मर्यादित आहे. अशा लेखकाचे पुस्तक प्रथम क्रमांकाने काढण्याची इच्छा होणे ही जरा अनपेक्षित गोष्टच म्हटली पाहिजे. अर्थात वामनरावांची कल्पना तशी अगदीच धक्का देणारी नव्हती. कारण, ते माझ्या लिखाणाचे फार पूर्वीपासून चाहते आहेत; आणि त्यांनी 'शब्दांगण'साठी माझ्याकडून बरेच लिखाण आग्रहपूर्वक करवून घेतले आहे. त्यांचा हा स्नेहभाव मला नेहमीच फार मोलाचा वाटत आला आहे. या संदर्भात एका मजेदार योगायोगाचे स्मरण होते. माझे एक जुने स्नेही, श्रीविद्या प्रकाशनाचे यशस्वी व कर्तबगार मालक श्री मधूकाका कुलकर्णी यांनी १९७७ साली ललित पुस्तकांचे प्रकाशन करण्याचे ठरविले तेव्हा त्यांनी 'वाळवंटातील चंद्रकोर' हे माझे पुस्तक प्रकाशित करून आपल्या या योजनेचा प्रारंभ केला होता. (२१ एप्रिल, अक्षय तृतीया). त्यांना माझ्याविषयी वाटणाऱ्या स्नेहाचे व विश्वासाचेच ते एक प्रतीक होते, असे मी समजतो. प्रस्तुत 'श्रीमानस' या लेखसंग्रहाचे नाव पंडितमंडळींनीच निवडले असून मला ते पसंत आहे. तसे पाहिल्यास या संग्रहापूर्वी त्यांनी 'टिपू' हा टिपू सुलतानासंबंधीच्या माझ्या लेखांचा छोटासा संग्रह गतवर्षी प्रकाशित केला आहे. पण तो प्रत्यक्ष प्रकल्प

नसून पथप्रदर्शक प्रकल्प (पायलट प्रॉजेक्ट) होता, असे समजता येईल. श्री मधूकाका कुलकर्णी यांनीही 'महात्मा गांधी : जीवन आणि शिकवण' हे माझे पुस्तक १९६९ साली प्रकाशित केले होते. पण ते वेगळ्या योजनेच्या अंतर्गत प्रकाशित करण्यात आले होते. या योगायोगातील हेही एक मजेदार साम्य !

तसा माझ्या वृत्तपत्रीय लिखाणाचा प्रारंभ १९३९ सालापासून झाला असला तरी, पहिली काही वर्षे मी हौशी लेखक म्हणून लेखन केले. पुढे १९४६ साली लेखनावर उपजीविका करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मात्र मी वृत्तपत्रीय लिखाणावर लक्ष केंद्रित केले. गेल्या ५० वर्षांत मी नियतकालिकांतून लिहिलेल्या लेखांची संख्या सुमारे १८०० आहे. त्यांपैकी कथा, प्रवासवर्णने वगैरे प्रकारांत मोडणारे लेख संग्रहरूपाने प्रसिद्ध झाले असले तरी, त्यांची संख्या फार मोठी नाही. प्रचलित विषयासंबंधी लिहिलेल्या लेखांची संख्यांच अधिक होती. अशा सुमारे १५०० लेखांतून एका संग्रहासाठी २५–३० लेख निवडणे ही एक तारेवरची कसरतच होती. तरीपण मी सुमारे २०० लेख निवडले. त्यातून सौ. शकुंतलाताई व त्यांचे चिरंजीव श्री अभिजित पंडित यांनी प्रथम ६० लेख निवडून काढले. त्या सर्वांचा समावेश एका पुस्तकात करणे शक्य न वाटल्यामुळे त्यांनी अधिक बारीक चाळण लावून हे ३२ लेख निवडले. त्यांची पसंती मलाही योग्य वाटली. त्यांनी एकाच विषयावर भर न देता वेगवेगळ्या विषयांशी संबंधित लेखांची निवड केली आहे, हे पाहून मला खूप बरे वाटले.

मी मुख्यतः गांधी विचारांशी बांधिलकी मानणारा असलो तरी, गांधीजींचे विचार मी जसेच्या तसे स्वीकारलेले नाहीत. किंबहुना कोणत्याच पक्षाची, संघटनेची किंवा मतप्रणालीची विचारचौकट मला बांधून ठेवू शकलेली नाही. जो विचार घ्यावासा वाटला, तेथून तो मी घेतला आहे; आणि त्याने माझ्या अनुभवानुसार भरही घातली आहे. त्यामुळे कोणत्याच पक्षाला अथवा पंथाला मी कधीच 'आपला' वाटलो नाही. त्याबद्दल मला कधी खंतही वाटली नाही. एखाद्या पक्षाला धरून राहण्यात काय फायदे असतात, ते मला कळत होते; परंतु ते फायदे मिळविण्यासाठी आपल्या मतांना मुरड घालण्याचा मोह मला कधी झाला नाही, ही परमेश्वराची कृपाच म्हटली पाहिजे – असा एखादा परमेश्वर नक्कीच आहे अशी माझी खात्री नसली तरी !

गांधीजी हे कृतिशील नेते होते. 'आधी केले मग सांगितले' अशा महापुरुषांच्या कोटीतील ते होते. 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले,' असे आपल्या साधुसंतांनी सांगून ठेवले आहे. उक्ती आणि कृती यांच्यांतील अभेद हे जे थोर पुरुषांचे लक्षण ते गांधीजींना पूर्णपणे लागू पडते. त्यांना जगन्मान्यता मिळण्याचे तेच महत्त्वाचे कारण होय, असे मी मानतो. नुसती तोंडपाटिलकी किंवा पांडित्यपूर्ण तत्त्वचर्चा करण्यात इतिकर्तव्यता न मानता ज्या लोकांकडून आपल्याला देशकार्य व समाजकार्य करवून घ्यावयाचे आहे. त्यांच्याशी एकरूप होण्याची, त्यांच्या अंतःकरणात प्रवेश मिळविण्याची आणि विधायक कार्याच्या द्वारे त्यांची शिस्तबद्ध संघटना बांधून त्यांना कार्यप्रवृत्त करण्याची अलौकिक हातोटी त्यांना साधलेली होती. शिवाय त्यात त्यांचा स्वतःचा काहीच स्वार्थ नव्हता. आम जनतेच्या कल्याणासाठीच त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते, याविषयी कुणाच्याच मनात शंका नव्हती. तसे पाहिल्यास रोज विद्वत्तापूर्ण उपदेशांचे व तत्त्वचर्चेचे डोस पाजणारे पोटभरू संपादक-लेखक आणि बोलघेवडे पुढारी त्यांच्या काळात काय कमी होते? पण त्यांचा भारतीय लोकमानसावर काहीच प्रभाव पडला नाही. आजही पडत नाही. गांधींच्या नावाने बोटे मोडणाऱ्यांनी ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर, आपल्या पुढाऱ्यांच्या अपयशाची कारणमीमांसा त्यांच्या लक्षात येईल. स्वातंत्र्यानंतर मी स्वतःही कृतिशील राजकारण–समाजकारणातून बाहेर पडून वाचाशूरांच्या गोटात सामील झालो; परंतु माझ्या मर्यादांची मला कल्पना असल्यामुळे स्वतःच्या मोठेपणाविषयी भलत्या कल्पना माझ्या डोक्यात कधी शिरल्या नाहीत; आणि म्हणून स्वतःला गांधीवादी विचारवंत म्हणवून घेण्यास मला नेहमीच संकोच वाटला.

माझा पिंड मुख्यतः राष्ट्रभक्ताचा आहे. या देशावर, इथल्या मातीवर, इथल्या लोकांवर मी मनापासून प्रेम केले आहे. या राष्ट्रवादाच्या दृष्टिकोणातूनच मी सर्व गोष्टींकडे सदैव पाहिले आहे; आणि त्याच दृष्टिकोणातून समोर आलेल्या समस्यांचे विश्लेषण केले आहे. या राष्ट्रवादाला मानवतावादाची एक झालरही आहे. तो गांधीविचाराचा प्रभाव समजता येईल. या राष्ट्रवादाचा मूळ गाभा तोच कायम राहिला असला तरी त्याच्या बाह्य स्वरूपात परिस्थित्यनुसार फरक पडत गेला आहे. त्यामुळे अनेक गोष्टींच्या मूल्यमापनातही कालानुसार फरक पडला

आहे. कदाचित तत्त्व आणि व्यवहार यांच्यांत जे अंतर पडत गेले त्यामुळे हा फरक पडला असेल.

माझे चुलते 'लोकशक्ति' दैनिकाचे संपादक कै. ह. मो. जोशी यांच्या प्रभावामुळे प्रारंभी मी काँग्रेसभक्त होतो. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात येऊन मी संघाचा दीक्षित स्वयंसेवक बनलो. मुसलमानांच्या गुंडगिरीला जशास तसे उत्तर देण्यासाठी हिंदूंनी संघटित झाले पाहिजे, आणि सशस्त्र क्रांतीची तयारी केली पाहिजे; कारण, गांधींच्या अहिंसक मार्गाने काही निष्पन्न होणार नाही, असे त्यावेळी मला वाटत होते. त्या कामी संघाचा उपयोग होईल, असे मी समजून चाललो होतो. मला कृती हवी होती. परंतु संघ फक्त तयारीच्याच गोष्टी करीत होता. ही १९३६ सालची गोष्ट आहे. अखेर त्याच्या बाबतीत माझा भ्रमनिरास झाला; आणि माझे जीवनगुरु कै. न. ल. ऊर्फ नाना आठवले यांच्या प्रेरणेने मी वर्ध्याला गांधीजींकडे गेलो. ही १९३८ सालची गोष्ट आहे. गांधीजींना मी जवळून पाहिले, त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला, त्यांच्यांशी हुज्जतही घातली; आणि या निष्कर्षावर पोहोचलो की, गांधीजींचे विधायक कार्य व अहिंसात्मक प्रतिकार म्हणजे सत्याग्रह हाच स्वराज्यप्राप्तीचा एकमेव मार्ग आहे. माझा तो निष्कर्ष बरोबर असल्याचे कालांतराने सिद्ध झाले. सत्याग्रहाच्या मार्गावरून मी थोडीफार वाटचाल केली; परंतु त्यांचे राष्ट्रभाषा प्रचाराचे विधायक कार्य मात्र अनेक वर्षे निष्ठेने करीत राहिलो. १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनात २ वर्षे तुरुंगात मला समाजवादी मित्रांचा सहवास लाभला; आणि मी नकळत त्यांचा सहयात्री बनलो. अर्थात प्रत्यक्ष सत्तेच्या राजकारणात सहभागी होण्याची इच्छा मला कधी झाली नाही. लेखन व भाषणे यांच्या द्वारे जेवढे सहकार्य त्यांना देता आले तेवढे मी दिले; परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हळूहळू त्यांच्याही बाबतीत माझा भ्रमनिरास झाला. तेही सत्तेच्या मागे लागले. मी मात्र जेथे होतो तेथेच – म्हणजे जनसागरातला एक बिंदू बनून राहिलो. मी जीवनाचा सर्व अंगांनी विचार करू लागलो; आणि त्या-त्या वेळी मनात येणारे विचार व्यक्त करीत राहिलो. ग्रंथप्रामाण्य व व्यक्तिप्रामाण्य स्वीकारण्याची इच्छा मला कधी झाली नाही. त्यामुळे माझे विचार स्वतंत्र असत. ते माझे असत. सत्तासंपादनाच्या रस्सीखेचीत गुंतलेल्या कोणत्याच गटाला किंवा पक्षाला त्यांचा फारसा उपयोग नव्हता.

त्यामुळे मला कोणीच जवळ केले नाही. पण त्याची आधीच कल्पना असल्यामुळे आपल्या त्या भूमिकेचा मला कधी पश्चात्ताप झाला नाही. ते विचार आवडणारे लोकही मला भेटले. ते मूठभरच असत; परंतु मला तेवढेच पुरेसे होते. आपल्या विचारांची कदर करणारे कोणीतरी आहे, ही अनुभूतीच मोठी आश्वासक होती. पुढे आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी, त्यांची काँग्रेस आणि त्यांना पाठिंबा देणारे आचार्य विनोबा भावे व डावे पक्ष यांच्यावर टीका करणारे लिखाण मी केल्याने अनेक लोकांचे लक्ष मी वेधून घेतले; आणि पुष्कळांचा रागही ओढवून घेतला. त्यावेळी रा. स्व. संघही इंदिरा सरकारच्या विरोधात उभा राहिला होता. त्यामुळे त्या मंडळींशी माझी काहीशी जवळीक निर्माण झाली. मी त्यांच्या तरुण-भारत', 'विवेक', 'सोबत' वगैरे नियतकालिकांतून लिहू लागलो. मात्र गांधींची काही मते मला मान्य नसली तरी, मी गांधीभक्तच होतो; आणि गांधींएवढा थोर पुरुष जगाच्या इतिहासात झाला नाही, या माझ्या मतात मुळीच बदल झालेला नव्हता. त्यामुळे हिंदुत्ववाद्यांनी माझे सहकार्य घेतले तरी मला दोन हात दूरच ठेवले. त्यांची अडचण मला कळत होती. म्हणून त्याबद्दल कसलीही तक्रार न करिता मी यथाशक्ती त्यांच्याशी सहकार्य करीत राहिलो. यातील बारकावा लोकांना न समजल्यामुळे मी संघ–जनसंघाच्या कळपात सामील झालो आहे, अशी त्यांनी समजूत करून घेतली. आजही ती चालू आहे. त्यामुळे काही नियतकालिकांनी माझे लिखाण छापणे बंद केले. वस्तुत: 'सकाळ', 'केसरी', 'साधना', 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स', 'पुढारी', 'समाज प्रबोधन पत्रिका', 'मौज', 'सत्यकथा' वगैरे वेगवेगळ्या विचारसरणींच्या नियतकालिकांतून त्यापूर्वी मी लिखाण केले होते; आणि विभिन्न थरांतील वाचकांचा चांगला प्रतिसादही मला वेळोवेळी मिळाला होता; परंतु हिंदुत्ववादी नियतकालिकांतून लिखण करण्यास सुरुवात केल्यानंतर माझ्या वाचकांचा वर्ग मर्यादित झाला. त्यामुळे हळूहळू मी वृत्तपत्रीय लिखाण कमी करून ग्रंथलेखनावर लक्ष केंद्रित केले.

या ठिकाणी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे योग्य होईल. लेखनाच्या बाबतीत मी कुणाचाच आदर्श समोर ठेवलेला नव्हता. भाषा, शैली, मांडणी ही सर्व अंगे स्वाभाविकरीत्या व कालानुसार विकसित होत गेली. किंबहुना असेही म्हणता येईल की, प्रारंभीच्या काळात जी भाषा व शैली आकारास आली तिच्यात

नंतर फारसा फरक पडला नाही. याचा अर्थ असा की, त्यांचा डोळ्यांत भरण्या-सारखा विकास झालाच नाही. अनेक वर्षांच्या सरावाने थोडीफार सफाई व सहजता आली, असे फारतर म्हणता येईल.

याचे एक कारण असे असू शकते की, आपली भाषा व शैली ही विशिष्ट पद्धतीने विकसित झाली पाहिजे, त्यासाठी आपण खास प्रयत्न केले पाहिजेत, अशी निकड मला जाणवली नाही; अथवा इतर कोणी तशी अपेक्षा व्यक्त केली नाही. अशी निकड किंवा जाणीव निर्माण होण्यासाठी जे व्यापक वाचन हवे असते ते मला कधी जमले नाही. प्रारंभीच्या काळात विष्णुशास्त्री चिपळूणकर (निबंधमाला), आचार्य विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, काका कालेलकर, स. ज. भागवत, शं. द. जावडेकर आणि खुद्द गांधीजी यांचे खूप साहित्य मी वाचले. त्याचा माझ्या विचारांवर परिणाम झाला असल्याची शक्यता आहे. पण भाषा व शैली यांच्यावर फारसा परिणाम झाला नसावा. इंग्रजी ग्रंथांचे वाचन मी जवळ–जवळ केलेच नाही. त्यामुळे माझ्या लिखाणावर इंग्रजी भाषा व साहित्य यांचा बरा-वाईट असा काहीच प्रभाव पडला नाही. त्यामुळे माझ्या लिखाणाचे देशीपण टिकून राहिले असावे, असे मला वाटते. वैचारिक बैठक भक्कम असल्यामुळे इतरांच्या विचारांचे अनुगमन करावे लागले नाही. त्याचाही हा परिणाम असण्याची शक्यता आहे. व्यवसाय म्हणून लेखन सुरू केल्यानंतर लिखाणातच सारी शक्ती खर्च होत राहिल्याने वाचन हे नाममात्रच उरले. स्वतः कथा, कादंबऱ्या, ललित निबंध लिहीत असूनही या प्रकारांचे साहित्य वाचावे, अशी ओढ मला कधी वाटली नाही. इतर भाषा शिकण्यासाठी व त्यातून अनुवाद करण्यासाठी (तोही लेखन व्यवसायाचाच भाग होता !) हिंदी, उर्दू, गुजराती व बंगाली या चार भाषांतील थोडेफार साहित्य वाचावे लागले; परंतु आवडलेल्या लेखकांचे अनुकरण करावे अशी इच्छा कधी झाली नाही. त्यामुळे या अन्य भाषांतील साहित्यांचा प्रभाव माझ्या साहित्यावर पडला नाही.

अलंकारिक, कृत्रिम, नाट्यपूर्ण, राणा भीमदेवी थाटाच्या, नाटकी, नटव्या, छछोर, भावुक, शब्दबंबाळ भाषेचे व शैलीचे आकर्षण मला कधी वाटले नाही. किंबहुना तसले साहित्य वाचण्याचे मी कटाक्षाने टाळले. त्याचबरोबर अत्यंत भारदस्त, विद्वत्तापूर्ण, क्लिष्ट भाषाही मला कधी आवडली नाही. तिच्यापासून

मी चार हात दूरच राहिलो. भाषा व शैली ही साधी, सुस्पष्ट, सरळ, सुबोध असूनही आकर्षक व चटकदार असावी, असे मला वाटते; आणि त्यासाठी विशेष प्रयत्नही करण्याची जरुर नसते, असा माझा समज व अनुभव आहे.

या संग्रहातील लेख सन १९६९ पासूनचे आहेत; त्यामुळे प्रारंभी वर्णन केलेल्या माझ्या वैचारिक परिवर्तनाचे संपूर्ण चित्र त्यातून समोर येत नाही. म्हणून त्या बाबतीत थोडा खुलासा करणे उचित होईल.

राष्ट्रवाद, जातीयवाद, इस्लाम व मुसलमान आणि संप्रदायवाद हे माझ्या खास अभ्यासाचे विषय राहिले आहेत. जोपर्यंत काँग्रेस ही राष्ट्रवादी व जनताभिमुख संस्था होती तोपर्यंत मी तिच्या तत्त्वांचा हिरीरीने पुरस्कार केला; परंतु कालांतराने ती सत्तावादी बनून जनतेपासून दूर गेली, तेव्हा मी तिच्यादर टीका करू लागलो. 'कै. काँग्रेसला श्रद्धांजली', 'काँग्रेसची शताब्दी ? नव्हे दशाब्दी !' 'सच्चे गांधी, लुच्चे गांधी' यांसारख्या लेखांतून माझी ही भूमिका प्रकर्षाने व्यक्त होते. सामाजिक समतेचा पुरस्कार मी नेहमीच स्वतःच्या आचारातून व विचारातून केला आहे; परंतु ही समता प्रस्थापित करण्यासाठी आक्रोश, विद्रोह, आक्रस्ताळेपणा, सूडभावना यांचा वापर करणे मला योग्य वाटत नाही. कारण त्यायोगे समता प्रस्थापित होण्याऐवजी समाजाच्या विभिन्न घटकांत द्वेषभावना वाढीस लागून त्यांच्यातील दरी जास्तच रुंद होईल असे मला वाटते. माझी ही भूमिका 'तो लेकाचा दुष्ट ब्राह्मण आहे तरी कुठे ?' 'तर मग ब्राह्मणांनी करावे तरी काय ?' 'धर्मांतरासंबंधी कर्नाटकातील दलितांशी चर्चा' 'अत्याचार करणाऱ्यांना मनुस्मृतीचा आधार लागतो काय ?' 'मूर्तिपूजेच्या चक्रातून आमची सुटका होणारच नाही काय ?' 'दलित साहित्य : एक चिंतन', 'सुसंस्कृती ही नेहमीच साडेतीन टक्क्यांची असते आणि ती तशीच राहणार', या लेखांमधून व्यक्त झाली आहे.

इस्लाम व मुसलमान यांच्यासंबंधी गेली ५० वर्षे मी चिंतन, मनन, वाचन व लेखन करीत आलो आहे. माझ्या लेखांपैकी अधिकांश लेख या विषयाशी संबंधित आहेत. शिवाय त्यासंबंधी 'भारतीय मुसलमान' हे माझे स्वतंत्र पुस्तकही प्रसिद्ध झाले असून मराठीतील ते पहिलेच पुस्तक होते. इस्लाम व मुसलमान यांच्या बाबतीतील माझ्या भूमिकेत हळूहळू फरकही पडत गेलेला आहे. या विषयावरील

'राष्ट्रीय एकात्मतेची जबाबदारी एकट्या हिंदंवरच का म्हणून ?' 'खतरेमें कोण ? इस्लाम की मुसलमान ?' 'साऱ्या अनर्थाचे मूळ कारण : द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत', यांसारखे जे लेख या संग्रहात समाविष्ट करण्यात आले आहेत, ते अगदी अलीकडील म्हणजे गेल्या दहा वर्षांतील आहेत. त्यामुळे माझ्या भूमिकेत कसा व का फरक पडत गेला याची नीटशी कल्पना वाचकांना येणार नाही. म्हणून त्याची पार्श्वभूमी विशद करणे उचित होईल.

स्वातंत्र्यपूर्वकाळात इस्लाम व मुसलमान यांच्याविषयी गांधीजी व काँग्रेस यांची जी सामोपचाराची, किंबहुना अनुनयाची भूमिका होती, ती योग्यच असल्यामुळे मला पूर्णपणे मान्य होती. स्वातंत्र्याच्या आंदोलनात सर्व जाती-जमातींच्या व धर्मांच्या लोकांची एक संयुक्त आघाडी निर्माण करण्याची अत्यंत जरूर होती. तशी आघाडी उभारली जाऊ नये यासाठी ब्रिटिश साम्राज्यशाहीने मुसलमानांना हिंदूंपासून वेगळे करण्याकरिता सर्व प्रकारचे डावपेच लढविले. त्यांच्या आमिषाला भूलून सर सैयद अहमद यांच्यापासून मुहम्मद अली जिनांपर्यंत अनेक मुस्लिम पुढारी त्यांच्या गळाला लागले; व ते स्वातंत्र्यलढ्याला विरोध करू लागले. ब्रिटिश सत्ता व मुस्लिम जातीयवादी पुढारी यांचे डावपेच निष्फळ करण्यासाठी मुसलमानांचा अनुनय करणे आवश्यकच होते. गांधीजींनी तेच केले. त्याबद्दल त्याना दोष देता येणार नाही. त्या प्रयत्नात ते अयशस्वी झाले; परंतु त्यांचा मार्ग चुकीचा होता असे म्हणता येत नाही. बहुसंख्य मुसलमान त्यांच्या जातीयवादी पुढाऱ्यांच्या कह्यात असल्याने फारच थोड्या भारतीय मुसलमानांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. (अर्थात जेथे मुस्लिम लोक बहुसंख्येने होते, तेथील म्हणजे आजच्या पाकिस्तानातील मुसलमानांनी, विशेषत: पठाण, बलुची, सिंधी यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता, हे विसरता येत नाही.) त्यामुळे मुसलमानांची पर्वा न करिता केवळ हिंदूंच्या पाठिंब्यावर स्वातंत्र्याचा लढा चालविणे मुळीच अशक्य नव्हते. परंतु त्यायोगे हिंदू-मुसलमानांमधील दुफळी स्पष्ट झाली असती व तिचा इंग्रजांनी स्वातंत्र्यआंदोलन दडपून टाकण्यासाठी उपयोग करून घेतला असता. म्हणून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा देखावा निर्माण करणे व्यूह-तंत्राच्या दृष्टीनेही आवश्यक होते.

गांधीजींनी तेच केले. परंतु त्यांना इतिहासाचे ज्ञान फारसे नसल्याने त्यांच्या-

कडून काही चुकाही झाल्या. इस्लामचा इतिहास त्यांनी अधिक बारकाईने वाचला असता तर, इस्लाम हा स्वत:ला शांततेचा मार्ग म्हणवून घेत असला तरी, मुसलमानांनी कधीच शांततेचा मार्ग स्वीकारला नसल्याचे त्यांना आढळून आले असते. कुराणात काहीही सांगितले असले – त्यात शांततेचा पुरस्कारही आहे आणि हिंसेचा; क्रौर्याचा उपदेशही आहे– तरी जेथे-जेथे इस्लाम गेला तेथे-तेथे त्याने जुलूम–अत्याचार व विध्वंस यांचाच नंगानाच घातला; आणि स्थानिक लोकांना बळजबरीने अथवा प्रलोभने दाखवून, वाटवून आपली संख्या वाढविण्याचे व आपली सत्ता स्थापन करण्याचे धोरण अवलंबिले. स्त्री आणि प्रार्थनास्थळ ही कोणत्याही समाजाची मर्मस्थळे किंवा मानबिन्दू असतात. त्यांचा विध्वंस केला की, तो समाज उद्ध्वस्त होतो, ही गोष्ट मुसलमानांनी ओळखली आणि शत्रूंच्या स्त्रिया पळविणे, त्यांच्यावर बलात्कार करणे, आणि त्यांची प्रार्थनास्थळे उद्ध्वस्त करून त्यावर मशिदी उभारणे, या मार्गांचा अवलंब त्यांनी फार मोठ्या प्रमाणावर केला. भारतामध्ये हिंदूंची अस्मिता खच्ची करून त्यांना सदैव भयभीत स्थितीत ठेवण्यास त्यांना या मार्गाचा खूपच उपयोग झाला. इतका की, बहुसंख्य हिन्दू त्यांच्या अत्याचारांविरुद्ध ब्रही काढण्यास कचरू लागले. आजचे बहुसंख्य सेक्युलरवादी हिंदू या प्रकारात मोडतात. इस्लाम हाच एकमेव जगाचा उद्धारकर्ता आहे, तो देवाचा शेवटचा शब्द आहे. म्हणून त्याच्या स्थापनेच्या वेळी जे नियम घालून देण्यात आले होते, त्यांचे पूर्णपणे पालन केले पाहिजे, अशी कडवी श्रद्धा जगातील मुसलमान बाळगतात. त्यांच्या मते जगातील इतर सारे धर्म निरर्थक असून त्यांचा नाश करणे हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे, असे ते प्रामाणिकपणे मानतात. यालाच फंडामेंटॅलिझम म्हणजे मूलतत्त्ववाद असे म्हणतात. या वादाशी बांधिलकी स्वीकारल्याने आपण आपल्या आचारविचारांत काळानुसार परिवर्तन करण्याची काहीही जरूर नाही, असे त्यांना वाटते. या भूमिकेवरून ते समान नागरी कायद्याला विरोध करतात. इंग्लंड-अमेरिकेसारख्या देशांत स्वार्थासाठी राहावे लागल्याने ते तेथील समान नागरी कायदे निमूटपणे पाळतात; परंतु तेथे संधी मिळताच इस्लामी कायदा (शरीयत) लागू करण्याची मागणी ते करीत असतात. आपल्याशी ज्यांना जमवून घ्यायचे असेल त्यांनी स्वत:मध्ये बदल करावेत, आपण मुळीच बदलणार नाही, असा त्यांचा हट्ट असतो. तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी

त्यांची ही भूमिका मान्य करतात; आणि म्हणून त्यांच्याशी जमवून घेण्याचा उपदेश ते हिंदूंना करतात. मुसलमानांना काही सांगण्याचे नैतिक धैर्य त्यांच्यांत नसते. त्यांच्या या दबेलपणाने मुसलमान जास्तच शेफारले आहेत. आजकाल शाही इमाम, शहाबुद्दीन वगैरे मुस्लिम पुढारी जी मग्रुरीची भाषा बोलतात, ती ऐकली की मुसलमान हेच या देशाचे खरे मालक असून हिंदूंनी त्यांच्या दयेवरच जगले पाहिजे, ही त्यांची भूमिका असावी असे दिसते. त्यांची ही मग्रुरी अर्थातच सत्तालोलुप हिंदू पुढाऱ्यांच्या लाचारीमुळेच वाढत चाललेली दिसते. त्यामुळे पुन्हा एकदा हा देश फाळणीपूर्व स्थितीवर येऊन ठेपला असल्याचे दृश्य पाहायला मिळते. अशा लोकांची मनधरणी करून त्यांचे हृदयपरिवर्तन करणे अशक्य असते. त्यांना दंडुक्याचीच भाषा समजते, ही गोष्ट गांधीजींना कळली नाही. त्यांच्या एकांगी चांगुलपणाच्या भूमिकेचाच तो दोष होता. इतर धर्मीयांशी सख्य करून, समानतेच्या भूमिकेवरून गुण्यागोविन्दाने नांदण्याची शिकवण इस्लामने मुसलमानांना दिलेलीच नाही. त्यामुळे जेथे-जेथे ते गेले तेथे-तेथे राजसत्ता हाती असेपर्यंत त्यांनी देशाच्या ऐक्याचा विचार केला; पण ती सत्ता जाताच आपले वेगळे राज्य बनविण्याचेच प्रयत्न त्यांनी केले. आजही लेबॅनॉन, फिलिपाइन्स, रशिया वगैरे देशांत त्यांच्या फुटीरतेच्या चळवळी चालू आहेत. त्यांची ही मूलभूत प्रवृत्ती लक्षात न घेतल्याने अथवा तिकडे दुर्लक्ष केल्याने तथाकथित धर्मनिरपेक्षतावाद्यांच्या एकांगी प्रचारामुळे त्यांना फूसच मिळाली आहे; आणि देशाच्या राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याऐवजी ते आपला सवता सुभा टिकवू पाहत आहेत. याचा अर्थ असा की, खोट्या धर्मनिरपेक्षतावाद्यांच्या लाचार भूमिकेमुळे अल्पसंख्यकांच्या फुटीरपणाला उत्तेजनच मिळाले आहे. त्यांच्या फुटीरपणाला आळा घालणारा खराखुरा धर्मनिरपेक्षतावाद अमलात आणण्याचे राष्ट्रवादी शक्तींचे प्रयत्न सफल होणे, हाच या संकटावरील रामबाण उपाय होय.

इस्लाम व मुसलमान यांची ही मूलभूत प्रवृत्ती गांधीजींना नीट समजली असती तर, मुसलमानांशी कसे वागले पाहिजे याची त्यांना स्पष्ट कल्पना आली असती. आजही भारतीय मुसलमान येथील जनतेबरोबर एकोप्याने राहण्याऐवजी या देशाचे आणखी तुकडे पाडण्याचे व हिंदूंच्या सहिष्णुतेचा आणि सत्ताकांक्षी लोकांच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन आपल्या एकगठ्ठा मतांच्या जोरावर बहुसंख्य

समाजाला कैचीत पकडण्याचे मनसुबे रचीत असल्याचे दिसून येते. आज ते तोंडाने गांधीजींचे गुण गातात आणि धर्मनिरपेक्षतेवर आपली श्रद्धा असल्याचा आव आणतात. पण ते निव्वळ नाटक आहे. कारण गांधीजींच्या हयातीत त्यांनी कधीच त्यांचे नेतृत्व मान्य केले नव्हते. एवढेच नव्हे तर गांधीजी हे इस्लामचे शत्रू आहेत अशीच त्यांची धारणा होती. गांधीजींचा सर्वधर्मसमभाव, राष्ट्रभाषा हिंदुस्तानीची त्यांची संकल्पना, त्यांची अहिंसा वगैरे गोष्टींची त्यांनी उद्धटपणे टिंगलटवाळीच केली होती. कारण, इस्लाम हाच सर्व श्रेष्ठ धर्म आहे याविषयी त्यांच्या मनात मुळीच शंका नव्हती; आणि उर्दू ही मुसलमानांची भाषा असून तीच या देशाची राष्ट्रभाषा बनली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. आजही त्यांच्या या भूमिकेत विशेष फरक पडला आहे असे दिसत नाही. इस्लाम आणि धर्मनिरपेक्षता हे जणू परस्परविरोधी शब्द आहेत. शरीयतचा आग्रह बाळगणाऱ्यांनी धर्मनिरपेक्षतेचा आव आणणे याहून मोठे ढोंग दुसरे असू शकत नाही. भारतीय मुसलमानांना खरोखरी धर्मनिरपेक्षता व राष्ट्रीय एकात्मता यांविषयी थोडी जरी आस्था असती तर त्यांनी समान नागरी कायद्याला आनंदाने संमती दिली असती. परंतु गेली ४२ वर्षे स्वतंत्र भारतात सुखासमाधानाने राहिल्यानंतरही ते समान नागरी कायद्याला तयार नाहीत. कारण हा देश व इथले लोक यांच्याविषयी त्यांना मुळीच आत्मीयता वाटत नाही. उलट त्यांच्या दुराग्रहामुळे हिंदू–मुसलमानांमधील परकेपणाची दरी दिवसेंदिवस वाढत असल्याचेच दिसते. दुर्दैवाची गोष्ट अशी की, मुसलमानांमधील या फुटीर वृत्तीला खतपाणी घालण्याचे काम स्वतःला पुरोगामी, लोकशाहीवादी व धर्मनिरपेक्ष समजणारे स्वार्थी पुढारीच करीत आले आहेत. त्यांनी आपल्या स्वार्थाला व सत्ताकांक्षेला थोडा आळा घालून, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लागलीच समान नागरी कायद्यासारखे आवश्यक कायदे केले असते, तर फाळणीच्या फटक्याने भांबावलेले मुसलमान निमूटपणे त्याला तयार झाले असते; आणि ते खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष बनून भारतीय जनजीवनाशी समरस व एकरूप झाले असते. मग त्यांनी वंदेमातरम्‌ला किंवा कुसुमाग्रजांच्या कवितेला विरोध केला नसता; आणि उर्दूच्या वेगळचा शाळा मिळाव्यात म्हणून अकांडतांडव केले नसते. मुसलमानांची ही देशविघातक फुटीर वृत्ती जसजशी स्पष्ट होत गेली, तसतसा माझा त्यांच्या विषयीचा सामोपचाराचा दृष्टिकोण बदलत गेला.

आपल्या या देशात एक चमत्कारिक व घृणास्पद दृश्य पाहायला मिळते. कोणत्याही स्वाभिमानी देशात असे दृश्य पाहायला मिळणार नाही. येथे देशद्रोह्यांना देशभक्तीची प्रमाणपत्रे देण्याची अहमहमिका लागली आहे. या देशाच्या फाळणीस प्रामुख्याने कारणीभूत झालेल्या मुसलमानांना धर्मनिरपेक्ष ठरवून त्यांना नैतिक पाठिंबा व सर्वोच्च स्थाने देण्यास हिन्दूच पुढे सरसावले आहेत या देशाच्या स्वातंत्र्यासाठी रक्त सांडलेल्या व सर्वस्व अर्पण केलेल्या देशभक्त मुसलमानांच्या माना शरमेने खाली झुकल्या आहेत. या देशभक्त मुसलमानांचा एकगठ्ठा मते मिळविण्यास काही उपयोग नसल्यामुळे त्यांची स्वतंत्र भारतात उपेक्षाच झाली. (देशभक्त हिंदू व ख्रिस्ती यांच्या बाबतीतही काहीसे असेच घडले. स्वातंत्र्यानंतर त्यांचीही उपेक्षाच झाली! पण तो वेगळा विषय आहे.) त्याच्या उलट फाळणीस जबाबदार असणाऱ्या मूलतत्त्ववादी मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांना काँग्रेसमध्ये सामील करून घेऊन मोठमोठी पदे बहाल करण्यात आली. हा रोग इतका वाढला आहे की, आपल्या कालबाह्य मूलतत्त्ववादाचे उघडपणे समर्थन करण्याची गरजही धर्मांध मुसलमानांना वाटत नाही. कारण ती जबाबदारी तथाकथित पुरोगामी हिंदूंनीच स्वतःवर घेतली आहे. रामजन्मभूमी, काश्मीर वगैरे प्रश्नांच्या बाबतीत देशप्रेमी राष्ट्रवाद्यांना विरोध करण्यास धर्मांध मुसलमानांचे वकीलपत्र घेऊन तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी हिंदूच पुढे सरसावले आहेत. राष्ट्रभक्त व राष्ट्रद्रोही हिंदूंमधील हा संघर्ष ज्यांच्यावरून सुरू झाला ते मलतत्त्ववादी मुसलमान दूर राहून तो मजेत पाहत आहेत. या बाबतीत त्यांना करण्यासाठी असे काहीच त्यांच्या या हिंदू मित्रांनी बाकी ठेवलेले नाही. आपली एकगठ्ठा मते देण्याचे नुसते आश्वासन त्यांनी दिले की पुरे. ते पाळलेच पाहिजे असे त्यांच्यावर मुळीच बंधन नाही. एका सुंदरीच्या प्रणयाराधनाच्या प्रश्नावरून तिच्या प्रेमिकांनी आपसात लठ्ठालठ्ठी करावी, असे हे एक मजेदार दृश्य येथे पाहावयास मिळते.

खोटे धर्मनिरपेक्षतावादी व धर्मांध मुसलमान आपल्या सोयीनुसार गांधीजी, विवेकानंद वगैरे आधुनिक महापुरुष आणि कबीर, गुरुनानक यांच्यासारखे जुने साधुसंत यांची वचने उद्धृत करून हिंदूंना अधिक सहिष्णू बनण्याचा उपदेश करतात. तो करणारे लोक हे विसरतात की, त्या महात्म्यांच्या काळात फुटीरतावादी मुसल-

करणारे ' शिखांमधील खुनाखुनी हा कशाचा परिणाम आहे ?' व ' शस्त्राचाराच्या मोहाची फळे ' यांसारखे लेख या संग्रहात समाविष्ट आहेत. (या लेखांमध्ये विश्वकवी रवीन्द्रनाथांच्या लेखातील जी उदाहरणे घेतली आहेत, त्यांमध्ये थोडी पुनरुक्ती झाली आहे. पण ती अटळ होती.)

' राजकारणग्रस्त मराठी मन ', ' नैतिकतेचा आधार ', ' चोर पावलांनी येत असलेली क्रांती ', ' महाराष्ट्र आणि बंगाल ' यांसारख्या वेगळ्या प्रकारच्या लेखाचाही समावेश या संग्रहामध्ये करण्यात आला आहे. रुचिपालट म्हणून वाचकांना ते लेख आवडतील अशी आशा आहे. अनेक वर्षांपूर्वी लिहिलेल्या या लेखांत काही भर घालावी अथवा काट-छाट करावी, असे हे लेख पुन्हा वाचताना मला जाणवले नाही. किंबहुना त्या विषयांवर आजही आपण तसेच लिहू असे मला वाटले. कदाचित ते माझी वैचारिक वाढ खुंटल्याचेही लक्षण असेल ! त्याचा निर्णय वाचकांनीच करावयाचा आहे.

असा हा वेगवेगळ्या विषयांशी संबंधित लेखांचा संग्रह वाचकांच्या हाती देताना मला खूप आनंद होत आहे. साहित्य आणि साहित्यिक यांच्याविषयीचे लेख व ललित निबंध यांचा समावेश या संग्रहात केलेला नाही. हा संग्रह वाचकांना आवडला आणि त्यांच्याकडून त्याचे चांगले स्वागत झाले तर, कदाचित उर्वरित विषयांवरील लेखांचा संग्रह काढण्याची उमेद प्रकाशकांना येईल. तशी ती येवो एवढीच इच्छा.

' लोकसत्ता ' दैनिकाचे प्रतिभाशाली तरुण उपसंपादक श्री चंद्रशेखर वाघ यांनी या संग्रहाला रसग्रहणात्मक प्रस्तावना लिहिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या पुस्तकाची छपाई अत्यंत थोडचा अवधीत उत्कृष्टपणे करून दिल्याबद्दल ' चंदेल प्रिंटिंग प्रेस ' चे मालक श्री दिनेश चंदेल व त्यांचे सहकारी यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे कमीच होतील.

हा संग्रह काढण्याचे धाडस प्रकाशकांनी केले, त्याबद्दल मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे.

' श्री रघुवंश ',
डॉ. केतकर मार्ग,
पुणे – ४

– श्रीपाद जोशी
१·१२·९०

~~एकोणतीस~~ एकतीस

अनुक्रम

१.	तो लेकाचा दुष्ट ब्राह्मण आहे तरी कुठे ?	१
२.	तर मग ब्राह्मणांनी करावे तरी काय ?	१५
३.	धर्मराज्य, रामराज्य आणि हिंदूराष्ट्र	२८
४.	बुलबुलों को है ये हसरत कि वे उल्लू न हुअे !	३६
५.	भारतात वर्गयुद्ध असंभव	४१
६.	धर्मांतरासंबंधी कर्नाटकातील दलितांशी चर्चा	४८
७.	भारताच्या एकात्मतेला धर्माचा आधार	६५
८.	अत्याचार करणाऱ्यांना मनुस्मृतीचा आधार लागतो काय ?	७०
९.	अन्यायाचे परिमार्जन झालेच पाहिजे	७७
१०.	राष्ट्रीय एकात्मतेची जबाबदारी एकटया हिंदूंवरच का म्हणून ?	८३
११.	मूर्तिपूजेच्या चक्रातून आमची सुटका होणारच नाही काय ?	९०
१२.	या शिव्याशापाच्या चक्रातून आम्ही बाहेर पडणार की नाही ?	९५
१३.	दलित साहित्य : एक चिन्तन	१०३
१४.	भारताला ' राष्ट्रभाषा 'च नाही !	११९
१५.	राष्ट्रगीताच्या निमित्ताने	१२७
१६.	स्वातंत्र्यदिन : एक प्रकट चिन्तन	१३४
१७.	खतरे में कोण ? इस्लाम की मुसलमान ?	१४०
१८.	साऱ्या अनर्थाचे मूळ कारण : द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत	१४६
१९.	शस्त्राचाराच्या मोहाची फळे	१६१
२०.	राष्ट्रवादी : नवे अस्पृश्य	१७२
२१.	हे सॅडिस्ट समाजवादी सत्यशोधक !	१८३
२२.	सुसंस्कृती ही नेहमीच साडेतीन टक्क्यांची असते आणि ती तशीच राहणार	१८८
२३.	राजकारणग्रस्त मराठी मन	१९३
२४.	चारित्र्यहीनांचा जय हा मानवतेचा पराजय !	२००
२५.	नैतिकतेचा आधार	२१०
२६.	चोरपावलांनी येत असलेली क्रांती !	२१५
२७.	इस्लाम आणि जिझिया	२२०
२८.	राष्ट्रीय एकात्मता : आजच्या संदर्भात	२३२
२९.	शिखांमधील खुनाखुनी हा कशाचा परिणाम आहे ?	२४६
३०.	कै. काँग्रेसला श्रद्धांजली !	२५४
३१.	काँग्रेसची शताब्दी ? नव्हे दशाब्दी !	२६१
३२.	सच्चे गांधी, लुच्चे गांधी	२६७
३३.	सत्याचा शोध, सत्याचे प्रयोग आणि सत्याचा आग्रह !	२८२



१. तो लेकाचा दुष्ट ब्राह्मण आहे तरी कुठे ?

महाराष्ट्रामध्ये ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद हा एक गमतीचा, बौद्धिक करमणुकीचा विषय होऊन बसला आहे. गमतीचा अशासाठी, की त्यात आता मूळचा तिखटपणा, कडवटपणा किंवा हिरीरी फारशी उरलेली नाही. लिहिणाऱ्या–बोलणाऱ्यांना व वाचणाऱ्या-ऐकणाऱ्यांना पूर्णपणे कळून चुकले आहे की, या विषयावरील चर्चा म्हणजे मेलेल्या गुराला आसुडाने झोडपण्यासारखे आहे. एकूण परिस्थिती इतकी बदलली आहे की, या विषयात आता तसा फारसा दम उरलेला नाही. तरीपण मधूनच एखाद्याला सुरसुरी येते आणि तो डॉन क्विक्झोटच्या आवेशात हवेमध्ये तलवारीचे सपासप वार करू लागतो. कोणी समर्थ रामदासांना, केवळ ते ब्राह्मण होते या अपराधास्तव, मोगलांचे हस्तक ठरवून एकूण सर्वच ब्राह्मणवर्गावर कडाडून हल्ला चढवितो; तर कोणी स्वराज्य बुडविण्याच्या पापाचे खापर पेशव्यांच्या माथी फोडून आपल्या मनातील ब्राह्मणांविषयीची तळमळ ओकून टाकतो–जसे हिटलरने जर्मनीच्या पराभवाचे खापर ज्यू लोकांवर फोडून त्यांची ससे होलपट केली होती तसे ! याच्या उलट एखादा मराठा लेखक ब्राह्मण पेशव्यांचे गुणगान करण्यास पुढे सरसावतो आणि दुसरा एखादा ब्राह्मण लेखक त्रिंबकजी डेंगळे किंवा यशवंतराव होळकर यांसारख्या अब्राह्मण वीरांना युगपुरुषांच्या पंक्तीला नेऊन बसविण्याची केविलवाणी धडपड करतो. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादातील हा एक उलटा अंतःप्रवाह म्हणावयाचा. महाराष्ट्रातील तथाकथित समाजसुधारणेचे श्रेय महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांना आहे की, लोकहितवादी व आगरकर त्या श्रेयाचे हक्कदार आहेत याविषयी एखादे वेळी जाहीर

खडाजंगी होते आणि पुन्हा एकदा ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या शिळ्या कढीला ऊत येतो अथवा आणला जातो. ही सारी धुळवड पाहिली की मनात विचार येतो, ज्या दुष्ट ब्राह्मणाविरुद्ध एवढी भयंकर आगपाखड केली जात आहे तो लेकाचा आहे तरी कोठे ? आसपास नजर फिरवावी तर तसा ब्राह्मण कुठेच दिसत नाही. किंबहुना खरे बोलावयाचे तर, ब्राह्मणच आढळत नाही !

खरे ब्राह्मण कोठे आहेत ?

हे विधान कानांना थोडे चमत्कारिक वाटेल. परंतु ते शंभर टक्के खरे आहे जे आज स्वतःला ब्राह्मण म्हणवितात ते खऱ्या अर्थाने ब्राह्मण आहेत तरी काय ? ब्राह्मणाचे मुख्य लक्षण म्हणजे त्याचे जीवन शुचिर्भूत हवे. स्वतःला ब्राह्मण म्हणविणाऱ्यांपैकी किती लोक छातीवर हात ठेवून असा दावा करू शकतील की, आम्ही सर्वतोपरी शुचिर्भूत आहोत ! कदाचित असे शुचिर्भूत जीवन जगणाऱ्या व्यक्ती ब्राह्मणेतरांमध्येच, किंबहुना अहिंदूंमध्येच अधिक सापडतील ! ब्राह्मणाचे दुसरे लक्षण म्हणजे मोबदल्याची अपेक्षा न बाळगता ज्ञानदान करणे. मला वाटते, या कसोटीवर खरा उतरणारा एकही ब्राह्मण आज जगात विद्यमान नसेल. परंपरागत वेदविद्येचे अध्ययन-अध्यापन करणारे किंवा करू इच्छिणारे दशग्रंथी ब्राह्मणही अनुदानासाठी आता सरकारकडे अर्ज करू लागले आहेत. अर्थात् याबद्दल कोणाला दोषही देता येणार नाही. कारण, आज साऱ्या जीवनाचेच वाणिज्यीकरण (कमर्शिलायझेशन) झालेले आहे. प्रत्येक गोष्टीची पैशांत किंमत केल्याखेरीज आज भागतच नाही. त्यामुळे ज्ञानदान हे 'दान' राहिलेले नसून तोही सौदा, व्यवसाय, पेशा, धंदा झालेला आहे. फी घेऊन शिकवणी करणारा किंवा पगार घेऊन विद्यार्थ्यांना शिकविणारा अध्यापक अथवा प्राध्यापक जातीने ब्राह्मण असला तरी पैशाने तो वैश्य किंवा शूद्रच असतो. पूर्वीच्या जमान्यातील परिस्थिती काय असेल ती असो, परंतु इंग्रजी राजवटीनंतर या देशात सरकारची किंवा खाजगी नोकरी करणारे सारे ब्राह्मण हे तत्त्वतः वैश्य किंवा शूद्रच बनले; आणि आजही त्या परिस्थितीत मुळीच फरक पडलेला नाही. पैसे घेऊन सेवा करणे हा शूद्र धर्म होय. त्याच धर्माचे पालन आज सगळे नोकरदार तथाकथित ब्राह्मण करीत आहेत. अशा स्थितीत त्यांना ब्राह्मण म्हणणे म्हणजे त्या शब्दाचा अपमान करण्यासारखेच नाही काय ?

क्षत्रिय-ब्राह्मण

मराठेशाहीत, मोगलाईत किंवा पुढे पेशवाईत जेव्हा ब्राह्मणांनी पळीपंचपात्र टाकून तलवार हाती घेतली त्याचवेळी त्यांचे ब्राह्मण्य लोप पावून ते क्षत्रिय बनले.

आजही सैन्यामधले वेगवेगळचा अधिकारावर असणारे ब्राह्मण हे स्वस्तुतः ब्राह्मण नसून क्षत्रियच आहेत, असे म्हटले पाहिजे. राजकारणात हिरीरीने भाग घेणारे ब्राह्मणही याच अर्थाने क्षत्रियधर्माचे पालन करीत होते व आहेत, असे म्हणावे लागेल.

वैश्य-ब्राह्मण

लोकशाहीचा जमाना येताच काळाची पावले ओळखून निदान महाराष्ट्रात आणि दक्षिण भारतात तरी, जुनी धेंडे-खोकडे वगळता, सर्वसामान्य ब्राह्मणांनी निवडणुकीच्या रिंगणातून पळ काढला; आणि आमदारक्या, खासदारक्या, मंत्रिपदे, बहुजनसमाजालाच लखलाभ होवोत असे ठरवून व्यापार व उद्योगधंदे यांमध्ये प्रवेश केला. ते स्वाभाविकच होते. प्रवाही राहणे हा पाण्याचा स्वभावधर्म. त्याच्या प्रवाहाची एका बाजूने कोंडी करण्यात आली तर तो दुसऱ्या बाजूने वाट काढल्याशिवाय कसा राहील ? परिणामतः किर्लोस्कर, वैद्य, ओगले, गरवारे, आपटे यांसारखे उद्योगपती पुढे आले. या उद्योगपतींना ब्राह्मण म्हणणे किंवा समजणे कितपत योग्य होईल ? वस्तुतः ते ब्राह्मण नसून वैश्यच आहेत. त्यांना ब्राह्मण समजून जे लोक त्यांच्यावर हल्ला चढवितात ते चुकीच्या लक्ष्यावर मारा करतात, असेच म्हणावे लागेल.

मांसाहारी-ब्राह्मण

परंपरागत बाह्य आचारविचारांच्या दृष्टीने पाहिल्यास आजच्या बहुसंख्य ब्राह्मणांजवळ त्यांपैकी काहीही शिल्लक उरलेले दिसत नाही. स्नानसंध्या, सोवळेओवळे, शेंडी-जानवे, पुराणोक्त आहार यांपैकी कशाचाच पत्ता नाही. गेल्या काही वर्षांत ब्राह्मणांमध्ये मांसाहाराचा प्रचार ज्या झपाट्याने चालू आहे तो पाहिला की, या परिवर्तनाची स्पष्ट कल्पना येते. बुद्धिनिष्ठेचे वरदान लाभल्यामुळे गोमांसभक्षणही आता ब्राह्मणांना निषिद्ध वाटेनासे झाले आहे; किंबहुना त्याचा उघडउघड पुरस्कारही ब्राह्मण करू लागले आहेत. या दृष्टीने परंपरागत मांसाहारी समाजांपेक्षा त्यांनी फार पुढचा पल्ला गाठला आहे असे दिसते. अशा लोकांना केवळ ते ब्राह्मण जातीत जन्माला आले म्हणूनच ब्राह्मण म्हणावयाचे म्हणजे एक प्रकारे जन्म-जात वंशश्रेष्ठत्वाला किंवा जातिश्रेष्ठत्वाला मान्यता देण्यासारखेच होते, ही गोष्ट ब्राह्मणांचा द्वेष करणाऱ्या अब्राह्मण नेत्यांच्या लक्षात कशी येत नाही. याचे मला आश्चर्य वाटते.

आता ब्राह्मणांवर हल्ला करणाऱ्या लोकांची भूमिकाही थोडी तपासून पाहू. ब्राह्मणांवरील त्यांचा मुख्य आक्षेप असा की, ते इतरांना तुच्छ समजतात, त्यांच्या बाबतीत शिवाशीव पाळतात आणि त्यांचे शोषण करतात. या आक्षेपकांमध्ये

प्रामुख्याने मराठा जातीच्या मंडळींचा पुढाकार असतो. त्यांचे आक्षेप बरोबर आहेत असे गृहीत धरले तरी एक प्रश्न उरतोच. आज ही मंडळी ब्राह्मणांवर जे आरोप करतात तेच आरोप अस्पृश्य व इतर खालच्या वर्गांचे समजले जाणारे लोक या मंडळींवरही करू शकतात, नव्हे करतात. ब्राह्मणांप्रमाणेच खुद्द मराठ्यांतही आपसातील उच्चनीचभाव आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही कटाक्षाने पाळला जातो. लग्नासारख्या निर्णायक बाबतीत ही गोष्ट प्रकर्षाने दिसून येते. कोणताही तथाकथित उच्चकुलीन मराठा आपल्यापेक्षा खालच्या पातळीवरील मराठा घराण्याशी सोयरीक करण्यास तयार होत नाही. (अत्यंत धनाढ्य लोकांमध्ये होणारे अपवादात्मक आंतरजातीय विवाह या संदर्भात विचारात घेण्याचे कारण नाही. असे विवाह सर्वच जाती-जमातींत तुरळकपणे होत आहेत. तेथे श्रीमंतांचा वर्ग ही एक वेगळीच जात बनलेली असते.) अस्पृश्यांचा विटाळ तर सर्वच मराठे पाळतात. खेड्यापाड्यांची गोष्ट तर जाऊ द्याच, बारामतीसारख्या सुधारलेल्या तालुक्याच्या गावांमध्येही हरिजनांना सार्वजनिक विहिरींवर पाणी भरू दिले जात नाही. इतकेच काय पण काही ठिकाणी त्यांना स्वाभिमानाने समाजात हिंडता-फिरताही येत नाही. बहुजन मराठा समाजाकडून आजच्या सुधारलेल्या काळात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जमातींवर जेवढे अनुचित व अमानुष अत्याचार केले जात आहेत, तेवढे ब्राह्मणांनी गेल्या पाच हजार वर्षांतही बहुधा केले नसतील. याचे कारण उघड आहे. ब्राह्मण जमात नेहमीच अत्यंत अल्पसंख्य राहिली आहे. तिने मनात आणले असते तरी तिला असे भयंकर अत्याचार करता आले नसते. सारांश, अस्पृश्यांना समानतेची वागणूक देण्याचा विचारही ज्यांना सहन होत नाही अशा मराठा, रेड्डी, कम्मा, भूमिहार, नाडर, नायर, वक्कळिग, रजपूत, जाट वगैरे बहुजन समाजांनी ब्राह्मणांना उच्चनीचतेच्या भेदभावाबद्दल दोष द्यावा, हे अगदीच हास्यास्पद व ढोंगीपणाचे आहे.

सामाजिक समतेच्या आड कोण येत आहे ?

या संदर्भात एका अब्राह्मण पुरोगामी तरुणाचे विचार नमूद करण्यासारखे आहेत. अलीकडेच सामाजिक विषमतेच्या उच्चाटनाच्या दिशेने एक पाऊल या-दृष्टीने संयुक्त-समाजवादी पक्षाने गांधी जन्मशताब्दीच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून कोल्हापूर ते मुंबई व औरंगाबाद ते मुंबई असे दोन समता-मोर्चे काढले होते. या मोर्चातील अनुभवांचे कथन करताना श्री बापूसाहेब पाटील (महाराष्ट्र टाइम्स–२६·१०·६९ च्या अंकात) लिहितात :–

" हिंदुधर्माच्या वर्णव्यवस्थेत ब्राह्मणवर्गाला सर्वश्रेष्ठ स्थान देण्यात आले आहे; आणि स्मृतिकारांनीही ब्राह्मणांना अनेक खास, पण असमर्थनीय अधिकार

बहाल केले आहेत. साहजिकच आपले हे परंपरागत स्थान व अधिकार टिकविण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याने त्याच्याच प्रक्रियेतून महाराष्ट्रात एक वेळ ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ होऊन गेली. तत्कालीन परिस्थितीत ती अपरिहार्य होती; पण आज हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, सामाजिक समतेच्या आड ग्रामीण भागात ब्राह्मण येत नाही. किंबहुना आज तो खेडेगावात फारसा दिसून येत नाही. असला तरी त्याचा समाज-जीवनावर प्रभाव नाही. खेडेगावात व शहरात शेकडो चांगले सुशिक्षित अस्पृश्य आपल्याला हे सांगतील की, इतर कोणत्याही समाजापेक्षा ब्राह्मणसमाज हा सर्वसाधारणपणे तुलनेने अस्पृश्यांशी अधिक समतेने व समजूतदारपणे वागतो.

"ग्रामीण भागात सोसायटीच्या रूपाने आर्थिक सत्तेचे व पंचायत समित्या व जिल्हा-परिषदेच्या रूपाने राजकीय सत्तेचे काही प्रमाणात विकेंद्रीकरण झाले. या सत्तेचा फायदा व गैरफायदा घेऊन ग्रामीण भागात जे नवश्रीमंत व नवसत्ताधीश निर्माण झाले आहेत, ते सामाजिक समतेची वरून येणारी गंगा पुढे सोडण्यास तयार नाहीत. महार हा त्यांच्या मते महारडा असतो, न्हावी न्हावगंड असतो, धनगर धनगरडी असतात. अस्पृश्य व श्रमजीवी बलुतेदारांचा असा पदोपदी तुच्छतापूर्वक उल्लेख चाललेला असतो. या कुलवंत अशा पाटील, देसाई, देशमुख मंडळींना गावचा सरपंच एखादा न्हावी, परीट, माळी, धनगर झालेला खपत नाही. मग अस्पृश्य तर नाहीच नाही. आमदार व मंत्री बहुधा याच 'बहुधन' मंडळींवर मतासाठी पुष्कळता अवलंबून असतात. ही वस्तुस्थिती सांगण्यास व त्यावर आपले मत मांडण्यास, काही थोडे अपवाद वगळता, विचारवंतही या ना त्या, कारणास्तव नाखुष असतात; पण सामाजिक समतेच्या प्रक्रियेला चालना द्यायची असेल, तर ग्रामीण भागातील नवश्रीमंत व नवसत्ताधीशांच्या सोटेशाहीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ग्रामीण भागातील सामाजिक समतेच्या विचाराच्या व विशेषतः आचाराच्या आड येणारी ही फार मोठी धोंड आहे, हे साफ साफ समजून चालले पाहिजे."

यावर अधिक भाष्य करण्याची गरज आहे काय ?

नवे फुले, नवे शिंदे, नवे भाऊराव हवेत

सामाजिक विषमतेच्या या पूतनामावशीचा नाश करण्याची ऐतिहासिक जबाबदारी बहुजन समाजावर आणि त्यातही प्रामुख्याने मराठा समाजावर येऊन पडली आहे, हे मराठा समाजाचे पुढारी ओळखतील तर त्या समाजाचेच नव्हे तर संपूर्ण मराठी समाजाचे कोटकल्याण होईल. राजकीय व आर्थिक प्रलोभनांचा मोह बाजूला सारून, सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी कष्टाचे व हालअपेष्टांचे जीवन स्वेच्छेने स्वीकारणारा एकही मराठासमाजसुधारक आधुनिक काळात का निर्माण होत नाही, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. जुन्या काळीदेखील कर्मवीर

विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारखे त्यागी मराठा समाजसेवक हातांच्या बोटांवर मोजण्याइतकेच होते, याचे कारण काय ? (फुले व भाऊराव हे जातीय अर्थाने मराठा नव्हते तर माळी व जैन होते.) मला वाटते, आधुनिक काळाच्या गरजा भागविणारे फुले–शिंदे–पाटील कसे निर्माण होतील याचाच विचार मराठा पुढाऱ्यांनी केला पाहिजे. केवळ ब्राह्मणांना शिव्याशाप देऊन हे घडून येणार नाही, हे त्यांनी ओळखले पाहिजे.

काही लोक असे म्हणतील की, ब्राह्मणवर्गाच्या हाती ज्ञान व विद्या होती; आणि तो समाजाचे नेतृत्व करीत होता; म्हणून चुकीच्या नेतृत्वाबद्दल तरी त्याला दोषी धरता येईल. या विधानातील पहिला भाग बरोबर आहे. ब्राह्मणाच्या हाती विद्या होती आणि त्याने ती समाजाच्या सर्व थरांपर्यंत नेऊन पोहोचविली नाही, हा त्याचा दोष म्हणता येईल, परंतु या प्रश्नाकडे आजच्या दृष्टिकोणातून न पाहता जुन्या काळाच्या संदर्भात पाहिल्यास आपल्याला असे दिसून येईल की, त्याकाळी त्याच्याकडून तशी अपेक्षाही बाळगली जात नव्हती. त्याने विद्येचे रक्षण करावे एवढीच इतर जमातींची त्याच्याकडून अपेक्षा असे. ती त्याने पूर्ण केली नाही, असे म्हणता येणार नाही. किंबहुना त्याने ती पूर्ण केली नसती तर, त्याचे समाजातील स्थानच टिकून राहिले नसते. समाजाच्या सर्व थरांत विद्येचे लोण नेऊन पोहोचविण्याची कल्पना अगदी आधुनिक असून, आपण ती पाश्चात्त्य लोकांकडून घेतलेली आहे. तेव्हा ते कार्य न केल्याबद्दल पूर्वीच्या ब्राह्मणांना जबाबदार धरता येईल असे वाटत नाही. या संदर्भात शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य आज ज्यांच्यावर अवलंबून आहे, ते लोक अगदी खालच्या थरापर्यंत शिक्षण नेऊन पोहोचविण्याचे आपले कर्तव्य कितपत इमानाने पार पाडीत आहेत, याचा अंदाज घेणे कदाचित उद्‌बोधक ठरेल. ज्यांच्या हाती राज्यसत्ता आहे, ते लोक शिक्षणाचे लोणी आपल्या कुटुंबियांत व जास्तीत जास्त आपल्या जमातीत वाटले जावे, असा तर प्रयत्न करीत नाहीत ना, हा एक संशोधनाचा विषय होण्यासारखा आहे.

एक चुकीचा समज

जुन्या काळी समाजाचे नेतृत्व ब्राह्मणांकडे होते असे जे समजतात, त्यांची ती धारणाही चुकीची आहे. ब्राह्मण हा समाजाचा वास्तविक नेता कधीच नव्हता. समाजाचे खरे व प्रत्यक्ष नेतृत्व क्षत्रियांनीच केले. गावच्या पाटलापासून देशाच्या राजापर्यंत नेतृत्वांच्या सिंहासनावर सदैव क्षत्रियच राहिला. अर्थात हे नेतृत्व तो एकटा करीत नसे. त्याकामी तो ब्राह्मणाचे सहकार्य घेत असे. या देशात दलित–पीडित व अस्पृश्य समाजांवर हजारो वर्षांपासून पद्धतशीरपणे जो जुलूम होत आला आहे, तो या दोन वर्गांनी–क्षत्रियांनी व ब्राह्मणांनी मिळून, एकमेकांच्या

संगनमताने व सहकार्याने केला आहे. (आजही राजकारण करणारे बहुतेक अब्राह्मण पुढारी साधन म्हणून ब्राह्मणांचा वापर करून घेतच असतात; आणि ब्राह्मणही त्यांना तसा वापर करू देतात, हे आपण पाहतोच !) तेव्हा आता 'ते' पाप आपले नव्हते, असा विश्वामित्री पवित्रा क्षत्रियांना म्हणजेच मराठ्यांना घेता येणार नाही.

सामाजिक समता : आधुनिक कल्पना

खरी गोष्ट अशी आहे की, सामाजिक समतेची आज रूढ होत असलेली कल्पना, या मातीला तशी अगदीच नवीन आहे. भगवान बुद्धांनी किंवा एकनाथ–तुकाराम–नानक–कबीर वगैरे संतांनी आपापल्या कुवतीप्रमाणे सामाजिक समतेचे बीजारोपण करण्याचा थोडाफार प्रयत्न अवश्य केला; परंतु तो येथील खडकाळ जमिनीत रूजून फारसा सफळ कधीच झाला नाही. सामाजिक विषमतेच्या दानवी शक्ती या भूमीत इतक्या प्रबळ होत्या की, त्यांच्या टाचांखाली चिरडलेल्या बिचाऱ्या सामाजिक समतेला कधी तोंड वर काढताच आले नाही. या दानवी शक्ती ब्राह्मण-वर्गाच्या कह्यात होत्या, असे समजण्यास काहीच पुरावा नाही. खरे म्हणजे सर्वांनी मिळून या शक्तींचे पोषण केले, त्यांना पाठिंबा दिला. प्रत्येक जमात स्वतःला इतर जाती-जमातीहून श्रेष्ठ समजत राहिली. त्यायोगे सर्वच जमातींचा अहंभाव सुखावला; आणि सामाजिक विषमतेची जाणीवही कोणाला झाली नाही. म्हणून या पापामध्ये समाजातील सर्वच जातीजमाती भागीदार होत्या, हे मान्य करणे न्यायोचित ठरेल.

अस्पृश्य–ब्राह्मण

या संदर्भात आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. लोकशाहीचा जमाना सुरू झाल्यापासून आपल्या प्रांतात तरी मराठ्यांच्याच हाती राज्यसूत्रे राहिली आहेत. आज येथे ब्राह्मण व्यक्ती मुख्यमंत्री होऊ शकत नाही. आमदार किंवा मंत्री होऊ शकणारा ब्राह्मणही अगदीच विरळा (बहुधा मुंबईसारख्या विश्वकुटुंबी महानगरीतूनच निवडून येणाची शक्यता त्याला असते !) तोही बहुजन समाजाच्या कलाने वागणारा व त्याच्या कह्यात राहणाराच होऊ शकतो. त्याचे स्थान बहुजन समाजाच्या मर्जीवरच अवलंबून असते. अशा स्थितीत त्याला ब्राह्मण समजण्या-ऐवजी सेवाधर्माचे पालन करणारा जुन्या अर्थाचा शूद्रच समजणे अधिक उचित होईल. राजसत्तेची सूत्रे अशा प्रकारे बहुजन समाजाच्या हाती गेल्यापासून आपण सामाजिक समतेच्या दिशेने किती वाटचाल केली आहे याचा निर्णय आमच्या अस्पृश्य बंधूंनीच द्यावयाचा आहे.

आर्थिक शोषण कोणी केले ?

ब्राह्मणांनी बहुजन समाजाचे शोषण केले, असे म्हटले जाते. ते काही अंशी

खरेही आहे. खेड्यापाड्यांतून सावकारी करणारे, कायदेबाजीच्या लटपटी करून अशिक्षितांना नाडणारे (कुलकर्णी, देशपांडे वगैरे) आणि सरकारी व बिनसरकारी नोकऱ्यांवर कबजा मिळवून बसणारे अधिकांशत: ब्राह्मणच होते. परंतु याही कामात मराठ्यांनी त्यांचेच अनुकरण केले असल्याचे दिसून येते. सावकार, पाटील व सरकारी नोकर यामध्ये मराठ्यांची संख्या कमी नव्हती. किंबहुना कोल्हापूर, बडोदे इंदूर, ग्वाल्हेर, देवास, धार वगैरे अब्राह्मण अधिपतींच्या संस्थानांत त्यांची संख्या खूपच अधिक होती. त्यांनी सामान्य जनतेचे शोषण करण्यात मुळीच मागेपुढे पाहिले नाही. जनतेच्या पैशाची उधळपट्टी स्वत:ची चैन भागविण्याच्या बाबतीत मराठा-संस्थानिक ब्राह्मण-संस्थानिकांच्या मागे होते असा पुरावा (श्री सयाजीराव महाराजांसारखा एखादा सन्माननीय अपवाद वगळता) मिळत नाही. या राजे-महाराजांच्या कुत्र्यांना व घोड्यांना जे खर्चिक अन्न दिले जात होते, ते त्यांच्या रयतेला स्वप्नातही पाहायला मिळत नव्हते. आजही स्वत:ला प्रगतशील म्हणविणारे शेतकरी, ऊसमळे किंवा द्राक्षमळे पिकविणारे मराठा, माळी, वंजारी बागाईतदार अथवा साखर-कारखानदार गरीब जनतेची, शेतमजुरांची नाडणूक व पिळवणूक करीत नाहीत, असे छातीठोकपणे कोणी सांगू शकेल काय ? फार कशाला, जनतेचे शोषणापासून रक्षण करण्याच्या हेतूने काढण्यात आलेले सहकारी साखर कारखाने, सहकारी पतपेढ्या, सहकारी खरेदी-विक्री संघ या सर्वांमध्ये दुर्बळ वर्गाची पिळवणूक होत असून ती करण्याचे कार्य प्रामुख्याने अब्राह्मण लोकच करीत आहेत, हे उघडे गुपित आहे. १९४८ साली महाराष्ट्रामध्ये झालेल्या सार्वत्रिक व सामुदायिक जाळ-पोळीनंतर बहुतेक खेड्यांतील ब्राह्मण आपापली गाबे सोडून शहरांत स्थायिक झाले आहेत. जवळ जवळ ८० टक्के ग्रामीण जनता त्यांच्या संपर्कापासून व तथाकथित शोषणापासून मुक्त झाली आहे. अशा स्थितीत बहुजन समाजाच्या आजच्या दुर-वस्थेबद्दल ब्राह्मणांना जबाबदार धरणे म्हणजे, 'तू नसशील, तुझ्या बापानं हे पाणी गढूळ केलं असेल' असा युक्तिवाद करून निरपराध कोकराला धमकावणाऱ्या लांडग्याचा वारसा सांगण्यासारखेच नाही काय ? इतिहास व अर्थशास्त्र न समजणाऱ्या सामान्य जनतेला असल्या युक्तिवादाने भडकविणे सोपे असते; पण ते इष्टही असते काय ?

विषमतेवर आधारलेला धर्म

खरी गोष्ट अशी आहे की, आपला धर्मच सामाजिक व आर्थिक विषमतेवर उभारलेला आहे. या विषमतेला सर्वच जाती-जमातींनी आपापल्या परीने हातभार लावलेला आहे. कोणी सामर्थ्यशाली बनून, तर कोणी दुबळे बनून ! त्या सर्वांच्या संमतीने व सहकार्यानेच ती विषमता टिकून राहिली आणि यापुढे तिचा जो नाश

व्हावयाचा आहे तोही सर्वांच्या संमतीने व सहकार्यानेच होणार आहे. अशा स्थितीत एखाद्या विशिष्ट वर्गाला वेगळे काढून त्याच्यावर सगळ्या दोषांचे खापर फोडण्याने काहीच साध्य होणार नाही.

बिनसरकारी नोकऱ्यांमध्ये सामान्यतः माणसाची योग्यता पाहून त्याला स्थान दिले जाते. अर्थात तेथेही जाती-जमातीचा किंबहुना नात्या-गोत्याचा विचार थोडचा-फार प्रमाणात अवश्य होतो. काही अंशी ते स्वाभाविकही समजले पाहिजे. तळे राखणारा पाणी चाखल्याशिवाय कसा राहील? त्याने सारे पाणी स्वतःच गट्ट करून टाकले नाही म्हणजे झाले. उद्योग-व्यवसायात पडणारे लोक म्हणजे कुणी सामाजिक कार्यकर्ते नव्हेत किंवा ती देवमाणसेही नसतात. इतर बहुजनसमाजात असणारे सद्‌गुण–दुर्गुण त्याच्यांतही असतात; परंतु ज्याला आपला उद्योग किंवा व्यवसाय यशस्वी करून दाखवावयचा असेल, त्याला अपरिहार्यपणेच माणसाच्या जातीपेक्षा त्याच्या योग्यतेकडे अधिक लक्ष द्यावे लागते. हा जमातवादाच्या पुढचा टप्पा आहे. सुदैवाने महाराष्ट्रात आता हा टप्पा येऊ लागल्याची प्रसादचिन्हे दिसू लागली आहेत. राजकारणी मंडळी बहुजनसमाजाच्या भावनेला आवाहन करून मतांचे माप आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी जातीयवादाची धुळवड खेळण्यात अजूनही दंग झालेली असली तरी बहुजनसमाजाच्या हिताची खरी कळकळ असणारे काही लोक फारसा गाजावाजा न करता त्या दिशेने पावले टाकू लागले आहेत, असे दिसते. यंदाच्याच वर्षी घडलेल्या दोन घटना या संदर्भात नमूद करण्यासारख्या आहेत.

एक उद्‌बोधक अनुभव

उत्तर महाराष्ट्रातील एका सहकारी साखर कारखान्यात माझ्या एका ब्राह्मण-मित्राची विद्यालयप्रमुख म्हणून यंदाच नियुक्ती झाली. मला आश्चर्य वाटले. कारण, त्या कारखान्याचे कारभारी लोक कट्टर ब्राह्मणद्वेष्टे असल्याचे मी ऐकले होते. माझ्या मित्रांना जेव्हा मी याबाबतीत विचारले तेव्हा त्यांनी केलेला खुलासा ऐकून तर मी थक्कच झालो. ते म्हणाले, "त्या कारखान्याच्या संचालक मंडळाने असा ठराव केलाय की, कारखान्याच्या विद्याविभागाचं संचालन करण्यासाठी पुण्याहून एक अस्सल चित्पावन ब्राह्मण मागवून घ्यावा आणि त्याच्याकडे हे काम सोपवावं. असा ठराव करणारा बहुधा महाराष्ट्रातला पहिलाच साखरकारखाना असावा. अशी हिम्मत खऱ्या मर्दाशिवाय दुसऱ्याला व्हायची नाही."

"म्हणजे आता उलटी गंगा वाहू लागलीय की काय?" मी आश्चर्याने विचारले.

"असं दिसतंय खरं. मी भीतभीतच तिथं जाऊन कामावर रुजू झालो. त्या

मंडळींबद्दल मीही तुमच्यासारखंच ऐकलं होतं. म्हणून मी त्यांच्याकडून त्यासंबंधी खुलासा करून घ्यायचं ठरवलं. कारखान्याचे संचालक मला म्हणाले, " तुमची शंका बरोबर आहे. आमच्या कारखान्यात शक्यतर ब्राह्मणाला नोकरी द्यायची नाही, असंच आमचं धोरण आहे. आमच्या जातीच्या पदवीधरांना बेकार ठेवून ब्राह्मणांची वर्णी आम्ही लावू लागलो तर, आमचंच आसन डळमळीत होईल; परंतु शिक्षणाच्या, विद्येच्या बाबतीत मात्र आम्ही प्रयोग करण्याचं ठरवलंय. आमच्या मुलांना शुद्ध लिहिता-बोलता आलं पाहिजे, पुस्तकी शिक्षणात ती आघाडीवर आली पाहिजेत. नव्या संस्कृतीचे संस्कार त्यांच्यावर करावयाचे, अशी आमची जिद्द आहे. ते काम मराठा मास्तराला जमायचं नाही. म्हणून आम्ही मुद्दाम तसा ठराव करून घेतला. शिवाय मराठा मास्तर आला की, तो आमच्या राजकारणात ढवळाढवळ करायचा प्रयत्न करणार, कोणता तरी पक्ष घेणार आणि मग आपोआपच त्याचं शिक्षणाकडे दुर्लक्ष होणार. हे सारं आम्हाला नको आहे. तुम्ही फक्त तुमचं काम पाहायचं. त्या-बाबतीत तुम्हाला पूर्ण स्वातंत्र्य. आपली शाळा जिल्ह्यात आदर्श बनली पाहिजे. शाळा व्यवस्थित चालू लागली की, कॉलेज काढायचंय. त्याची जबाबदारी तुम्हीच घ्यायची आहे. अध्यापकांच्या नि प्राध्यापकांच्या नेमणुका तुम्हीच करायच्या. त्यात आम्ही कुणी हस्तक्षेप करणार नाही." त्याप्रमाणे त्यांनी मला माझ्या कामाच्या बाबतीत संपूर्ण स्वातंत्र्य दिलंय. माझं छान चाललंय."

याचा स्पष्ट अर्थ असा की, बहुजनसमाजातील काही मंडळींना गुणवत्तेचे महत्त्व आता पटू लागले आहे. आपल्या मुलांना-नातवंडांना जीवनसंघर्षात यशस्वी व्हावयाचे असेल तर, यापुढे केवळ जाती-जमातींचा फारसा उपयोग होणार नाही, त्याच्यांत कार्यक्षमता व गुणवत्ता वाढली पाहिजे आणि त्याकरिता कोणाचीही मदत घेण्यात कमीपणा नाही, हे त्यांनी ओळखले आहे. एकूण महाराष्ट्राच्या दृष्टीने ही शुभ गोष्ट आहे.

एक बाणेदार संचालक

अशाच प्रकारची एक घटना दक्षिण महाराष्ट्रातील एका साखर कारखान्यात घटल्याचे ऐकिवात आहे. सदर कारखान्याचे महाविद्यालय त्या भागात आदर्श समजले जाते. त्या महाविद्यालयातील बहुसंख्य प्राध्यापक ब्राह्मण आहेत. कारखान्याचे संचालक अब्राह्मण आहेत; परंतु त्यांची जात मराठा नाही. त्यांना तेथून हुसकून लावून त्यांच्या जागी मराठा संचालक आणण्याची जंगी खटपट काही जातीयवाद्यांनी केली; परंतु सदर गृहस्थांची लोकहिताविषयीची तळमळ पाहून बहुसंख्य मराठा मतदारांनी त्यांनाच पुन्हा प्रचंड बहुमताने निवडून दिले. त्या महाविद्यालयात प्राध्यापकांची भरती करण्यासाठी पुण्या-मुंबईच्या ब्राह्मण-

अब्राह्मण विद्वानांची एक समिती नेमण्यात आली आहे. ही समिती फक्त गुणांवर प्राध्यापकांची निवड करते. कारखान्याचे संचालक मंडळ त्यात मुळीच हस्तक्षेप करीत नाही. एकदा एका विद्यापीठातील एका स्वाभिमानी ब्राह्मण प्राध्यापकांचे त्या विद्यापीठाच्या अब्राह्मण कुलगुरूंशी भांडण झाले आणि त्यांनी त्या विद्यापीठाला रामराम ठोकला. सदर प्राध्यापक वरील कारखान्याच्या महाविद्यालयात जाणार अशी कुणकुण कुलगुरूंना लागली. त्यांनी सदर कारखान्याच्या संचालकांना तंबी दिली, " खबरदार, तुम्ही त्या प्राध्यापकांना नोकरीवर ठेवाल तर. विद्यापीठाशी आपल्या महाविद्यालयाचे संबंध नीट राहवेत असे तुम्हाला वाटत असेल, तर त्या प्राध्यापकांना तुम्ही तुमच्या महाविद्यालयात थारा देता कामा नये." यावर कारखान्याचे संचालक बाणेदारपणे उत्तरले, " महाराज, आपण म्हणता ते प्राध्यापक फार मोठे आहेत. त्यांच्या विद्वत्तेबद्दल सर्वांनाच आदर आहे. ते आमच्या छोट्याशा महाविद्यालयात येतील असं आम्हाला वाटत नाही; पण जर त्यांनी आमच्याकडे यायचं ठरवलं तर आम्ही त्यांचं आनंदानं स्वागत करू. तुम्हाला जे काही करायचं असेल ते खुशाल करा. आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांचं हित हे सर्वोपरी श्रेष्ठ वाटतं."

आणखी एक मजेदार दृश्य अलीकडे पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरांत, जेथे ब्राह्मणांच्या व अब्राह्मणांच्या शिक्षणसंस्था जोडीने कार्य करीत आहेत, तेथे पाहवयास मिळते. अब्राह्मणांच्या शिक्षणसंस्थांत ब्राह्मण प्राध्यापकांना प्रवेश मिळण्यात अडचण येत नाही आणि ब्राह्मणांच्या शिक्षणसंस्था अब्राह्मणांना घेण्यास उत्सुक असतात. काही अब्राह्मण प्राध्यापक, विशेषत: साहित्यप्रिय-प्राध्यापक, लेखक, कवी वगैरे, ब्राह्मणांच्या महाविद्यालयांत प्रवेश मिळविण्याची धडपड करीत असतात. कारण तेथे आपल्याला अनुरूप व अनुकूल वातावरण अधिक प्रमाणात मिळेल असे त्यांना वाटते. एका दृष्टीने ही स्वागतार्ह परिस्थिती आहे.

या सर्व विवेचनावरून नवीन विचाराचे वारे कोणत्या दिशेने वाहू लागले आहेत याची कल्पना यावी. नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीच्या दृष्टीने या घटना निश्चितच शुभ आहेत. जाती-जमातींच्या वेडगळ व प्रतिगामी कल्पनांच्या जाळ्यातून आम्ही आमची सुटका करून घेऊ इच्छितो याचीच ही पूर्वचिन्हे आहेत.

हे स्वाभाविकच नाही काय ?

आणि यात आश्चर्य वाटण्यासारखे तरी काय आहे ? असे घडणे स्वाभाविकच नाही काय ? धर्म व जात यांचे आधुनिक जीवनातील स्थान हळूहळू लोप पावत आहे. ज्या वाळूच्या पायावर जातीजमातींचे किल्ले उभारलेले होते, ती वाळू हळूहळू निसटू लागली आहे. हे किल्ले लवकरच जमीनदोस्त होणार आहेत, हे देवच बोलून

चुकला आहे. आज अर्थकारण हे साऱ्या जीवनाचे सूत्र बनू पाहत आहे. कालगतीचा विचार करता तसे ते बनणे क्रमप्राप्त व निसर्गसिद्ध आहे. त्यामुळे आपले अर्थकारण अधिक मजबूत कसे बनेल याचाच प्रत्येकजण विचार करतो, यामुळे ब्राह्मण मराठे, जैन, मुसलमान वगैरे सर्वच जातीजमातींचे भांडवलदार एकमेकांच्या सहकार्याने व संगनमताने काम करीत आहेत; आणि सर्वच जातीजमातींचे श्रमिक व कामकरी एकजूट करीत आहेत.

सरकारी नोकऱ्या, न्यायखाते, शिक्षणखाते वगैरे विभागांत आजही वरच्या जागांवर ब्राह्मण अधिकारी मोठ्या प्रमाणावर दिसतात. काही अंशी तो ब्रिटिश अमदानीचा वारसा आहे. परकीय राजकर्त्यांनी आपल्या राज्यकारभाराच्या सोयीसाठी पुढारलेल्या समाजातून नोकरभरती केली. त्यांनी आपल्या समाजातील लोकानाच नोकऱ्या दिल्या. गुणवत्तेचा आग्रह असल्यामुळे त्यांना तसे करणे भागही होते; परंतु आता ती परिस्थिती उरलेली नाही. खालून येणारे अब्राह्मण अधिकारी त्यांची जागा हळूहळू घेत आहेत. काही काळानंतर ब्राह्मणांना सरकारी नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळणे कदाचित् बंदही होऊन जाईल. अर्थात् यात अनपेक्षित असे काही नसल्यामुळे ब्राह्मणांनी डगमगून जाण्याचे काही कारण नाही अथवा अब्राह्मणांविषयी त्यांच्या मनात कटुतेची भावनाही निर्माण होण्याचे कारण नाही. त्यांनी हे ओळखले असावे असे दिसते. कारण आत्ताच ते सरकारी नोकऱ्यांचा नाद सोडून वेगवेगळी अन्य क्षेत्रे धुंडाळू लागले आहेत. देशातील ज्या राज्यांमध्ये ब्राह्मणांविषयी द्वेष नाही, अशा गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश यांसारख्या राज्यांत जाण्याची तयारीही ते आता करू लागले असावेत असे दिसते. काही बुद्धिवंत तर इंग्लंड, अमेरिका, कॅनडा यांसारख्या संपन्न देशांत कायम निवासाच्या हेतूने जाऊ लागले आहेत. बुद्धिवंताची ही निर्यात कशी थांबवावयाची हा एक नवाच प्रश्न देशासमोर उभा राहिला आहे.

खाजगी उद्योगांचे आकर्षण

सरकारी नोकऱ्यांच्या बाबतीत आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. पाश्चात्त्य देशांप्रमाणे आपल्या देशातही आज खाजगी उद्योगधंद्यांचे क्षेत्र हे अर्थप्राप्तीच्या दृष्टीने सरकारी क्षेत्रापेक्षा अधिक आकर्षक बनलेले आहे. समाजातील जणू मलईच असा बुद्धिवंतांचा वर्ग सरकारी नोकऱ्यांकडे पाठ फिरवून या खाजगी क्षेत्राकडे वळत आहे. राजकर्त्यांच्या जमातीतील व नात्यागोत्यातील लोकांना आपल्या उद्योगांत नोकरी देणे आपल्या फायद्याचे असते, हे उद्योगपतींनी ओळखले असल्यामुळे गुणवत्तेची फिकीर न करताही अशा लोकांना ते भराभर नोकऱ्या देत आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांनी नाकारलेल्या नोकऱ्या ब्राह्मणांना मिळतात.

हीच गोष्ट राजकारणाची. सरकारी संस्था, साखर कारखाने किंवा मंत्रिपदे यांच्यापासून मिळणारा लाभ इतका मोठा असतो की, त्याचा मोह सोडून नोकरीच्या चाकोरीत पडणारा बहुजनसमाजवादी विरळाच. न्यायखात्यातील सर्वोच्च जागांवर अब्राह्मण न्यायाधीश दिसत नाहीत, याचे कारण त्या स्थानांपेक्षा अधिक लाभदायक जागा इतरत्र मिळत असल्यामुळे अब्राह्मण मंडळी त्यांच्याकडे ढंकूनही पाहत नाहीत. ब्राह्मणब्राह्मणेतर वादाच्या शिळ्या कढीला ऊत आणणाऱ्या पुढाऱ्यांना, हे कळत नसेल असे नाही. त्यांचे युक्तिवाद ऐकून सरकारी नोकऱ्यांकडे जाणूनबुजून पाठ फिरविणारे अब्राह्मण 'करियरिस्ट' मात्र निश्चित मनातल्या मनात हसत असतील.

हे भांडवल फार काळ पुरणार नाही

केवळ ब्राह्मणद्वेषाचे भांडवल आपल्याला यापुढे फार काळ पुरणार नाही, याची जाणीव ब्राह्मणेतरांनाही आता होऊ लागली आहे, असे दिसते. अब्राह्मणांतील अल्पसंख्य अमराठा जमातींना आजच परिस्थितीचे चटके बसू लागले आहेत. शिंपी कोष्टी, माळी, तेली वगैरे जमातींच्या लोकांना नोकऱ्या मिळविण्यास अडचण पडू लागली आहे. ज्यावेळी मराठा समाज मोठ्या संख्येने विद्याविभूषित होईल, त्यावेळी त्या समाजातील तरुणांनाही नोकरीसाठी आपसात स्पर्धा करणे भाग पडेल; आणि 'बळी तो कानपिळी' या न्यायाने ज्यांचा वशिला जबरदस्त असेल त्यांनाच नोकऱ्या मिळतील. मग बेकार मराठा तरुण, बेकार अमराठा तरुणांच्या खाद्याला खांदा भिडवून परिस्थितीशी दोन हात करायला तयार होतील. या संदर्भात ओघाने येणारी मुसलमान व अस्पृश्य यांच्या प्रश्नासंबंधीची चर्चा मी विस्तारभयास्तव जाणूनबुजून टाळली आहे; परंतु आर्थिक अडचणीच्या रेटचापुढे जातीजमातींची घरकुले नक्की ढासळून पडतील, हे सांगण्यासाठी फार मोठ्या ज्योतिष्याची गरज नाही.

हा काळ फार लांबही नाही. त्याची झलक आत्ताच दिसू लागली आहे. परिस्थितीने गांजलेले ब्राह्मण व ब्राह्मणेतर विद्यार्थी, कामगार, सरकारी व बिन-सरकारी नोकर, छोटे व्यापारी हे एकमेकांच्या सहकार्याने, एकजुटीने आपले प्रश्न सोडवू पाहत आहेत. जातीजमातींच्या आचार-विचारांतील अंतर झपाट्याने कमी होत आहे. शिवाशिवीतून निर्माण होणारी उच्चनीचताही वितळून चालली आहे. ब्राह्मणांतील मांसाहाराच्या प्रसारामुळे आहारविषयक अडसरही जवळजवळ दूर झाल्यासारखाच आहे. या देशात, या प्रदेशात राहणाऱ्या आपणा सर्वांची सुखदुःखे सारखीच आहेत व अडचणी एकाच स्वरूपाच्या आहेत आणि त्यांना एकजुटीनेच तोंड दिले पाहिजे, याची स्पष्ट जाणीव उगवत्या पिढीला होऊ लागली आहे. अशा

वेळी एखादा जातीयवादी मराठा पुढारी, केवळ मते किंवा टाळ्या मिळविण्यासाठी कसलेतरी क्षुद्र निमित्त काढून सबंध ब्राह्मणवर्गाला धारेवर धरतो, ब्राह्मण जमातीला बदनाम करू पाहतो, तेव्हा साहजिकच नव्या पिढीतील तरुणाच्या तोंडून– मग तो ब्राह्मण असो वा मराठा असो, महार असो की मुसलमान असो–स्वाभाविक पणेच हा प्रश्न बाहेर पडतो की, " महाशय, ज्याला तुम्ही इतक्या तळमळून शिव्या देत आहात तो लेकाचा दुष्ट ब्राह्मण आहे तरी कुठे ?"

स्वार्थ व विद्वेष यांचे शिसे कानात भरून घेतले आहे

परंतु त्यांचा हा सवाल जात्यंध पुढाऱ्यांच्या कानांपर्यंत जाऊन पोहोचण्याची शक्यता नाही. माझे हे सारे विवेचनही त्यांच्या कानांत शिरू शकणार नाही. कारण, त्यांनी वस्तुस्थितीचे सूर आपल्या कानांत प्रविष्ट होऊ नयेत म्हणून, स्वार्थाचे व द्वेषाचे शिसे आपल्या कानांत भरून घेतले आहे. त्यांच्यासाठी हे विवेचन नाही. ज्यांना प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे, त्यांना त्यांच्या दुःखाचे मूळ कारण समजून घेण्यास या विवेचनाची मदत व्हावी. अशी अपेक्षा आहे. आज ज्ञानाच्या व विद्येच्या क्षेत्रात आपली मक्तेदारी निर्माण करून इतरांना त्या क्षेत्रांपासून वंचित ठेवू पाहणारा आणि आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतील नेतृत्व स्ततःच्या हातात ठेवण्यासाठी अनंत लटपटी–खटपटी करणारा एक नवा 'ब्राह्मणवर्ग' आपल्या प्रांतात व देशात निर्माण होत आहे. तो जातीने अब्राह्मण असला तरी, जुन्या जमान्यातील तथाकथित शोषक ब्राह्मणवर्गाचेच डावपेच तोही अजमावून पाहत आहे. अर्थात आता बहुजनसमाज अडाणी राहिलेला नाही, आणि अर्थव्यवस्थेची जुनी शोषणाधारित चौकटही खिळखिळी झालेली आहे, त्यामुळे या नव्या शोषकवर्गाचे पितळ उघडे पडण्यास फारसा अवधी लागणार नाही; आणि दुष्ट ब्राह्मणाविरुद्ध जो अधूनमधून डरकाळ्या फोडीत असतो, तो ब्राह्मण त्याच्या स्वतःच्याच मनात व जीवनात दबा धरून बसलेला आहे, हे इतरांच्या लक्षात येण्यास फारशी अडचण पडणार नाही. हे सारे घडू देण्याऐवजी या शोषकवर्गाने सत्यस्थितीकडे डोळेझाक न करता, वैयक्तिक स्वार्थाची झापड डोळ्यांवरून काढून टाकून संपूर्ण देशाच्या व एकूण भारतीय समाजाच्या हिताचा विचार करण्यास सुरुवात करणे अंती त्याच्याच हिताचे ठरेल, यात काय संशय ?

+ +

('लोकसत्ता' : ७·१२·६९)

२. तर मग ब्राह्मणांनी करावे तरी काय ?

'शक्यतोवर ब्राह्मण नको'

"पण तुम्ही ज्याची शिफारस करताहात तो तरुण ब्राह्मण आहे काय ? तसं असेल तर आम्हाला त्याचा फारसा उपयोग नाही." एका मोठ्या शिक्षणसंस्थेचे संचालक दुसऱ्या एका महत्त्वाच्या हुद्यावरील गृहस्थांना सांगत होते.

मी त्यांचे बोलणे जरा कान टवकारून ऐकू लागलो. कारण, तो विषय माझ्या आवडीचा होता आणि त्यातील विनोद म्हणजे ते बोलणारे दोघेही जातीने ब्राह्मणच होते.

"म्हणजे तुमच्याही डोक्यात हे नव्या जातीयवादाचं वेड शिरलंय वाटतं ?" त्या गृहस्थांनी विचारले.

"ते वेड आहे, की शहाणपण हे काळच ठरवील; पण सध्यातरी ती आमची गरज, किंबहुना अपरीहार्य गोष्ट आहे. आम्हाला ज्या जनतेत काम करायचं आहे, तिच्या डोक्यात गेली कित्येक वर्षं ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचं भूत भरविण्याचा पद्धतशीर प्रयत्न चाललेला आहे. त्यामुळं तिची इच्छा असो वा नसो, तिच्या डोक्यात हा विचार येतोच; आणि आमच्या संस्थेत काम करणारे सगळेच लोक किंवा अधिकारी लोक ब्राह्मण आहेत असं दिसलं, तर तिच्या मनाची चलबिचल होते, आमच्या हेतूविषयी तिला शंका वाटू लागते. अशा स्थितीत तुमच्यासारख्यांकडून जातीयवादाचा आरोप पत्करूनही आम्हाला ब्राह्मणेतरांना व विशेषतः महाराष्ट्रात बहुसंख्य असलेल्या मराठ्यांना आमच्या संस्थेत प्राधान्य देणंच भाग

आहे. कारण आजकाल त्यांचं राज्य आहे !" संस्थाचालकांनी खुलासा केला.

ते गृहस्थ थोडा वेळ गप्प राहिले आणि लगेच उसळून म्हणाले, "म्हणजे आक्रमक जातीयवादापुढं तुम्ही नमतं घ्यायचं ठरवलंय अन् विद्येच्या क्षेत्रातही जातीयवादानं धुडगूस घालावा, हे तुम्हाला मान्य आहे, असंच की नाही ? ही काही ज्ञाननिष्ठा तर खास नव्हे !"

"इथं आपल्याशी माझा थोडा मतभेद आहे." ते संस्थाचालक नम्रपणे, परंतु दृढ स्वरात म्हणाले, "केवळ ज्ञाननिष्ठेनं हा प्रश्न सुटणार नाही. त्यात अनेक भाव-भावना गुंतलेल्या आहेत. त्या हलक्या हातांनी सोडविल्या पाहिजेत. धसमुसळेपणानं त्या तोडून टाकण्याचा प्रयत्न झाला तर, ज्ञानप्रसार होणार नाहीच, उलट जातिद्वेष आणि कटुता ही मात्र अधिक वाढतील. दक्षिण भारतात काय चाललंय ते आपण पाहतच आहोत, तीच स्थिती आपल्या महाराष्ट्रात उत्पन्न व्हावी अशी आपली इच्छा आहे काय ?"

"पण तुमच्या या धोरणानं तर उलट ब्राह्मणेतर भलतेच शेफारून जातील; आणि ब्राह्मणांचं समूळ उच्चाटन केल्याशिवाय त्यांना चैन पडणार नाही." त्या शिक्षणशास्त्रज्ञांनी आपली वेदना व्यक्त केली.

"मला मात्र तसं वाटत नाही. आमच्या या धोरणामुळं बहुजनसमाजाचा 'अहम्' (ego) संतुष्ट होईल; आणि मग जेव्हा संस्था चालविण्याची जबाबदारी ते स्वतः उचलतील, तेव्हा आपल्या जातीत लायक माणसं मिळणं अवघड आहे असं दिसून आल्यानंतर नोकर म्हणून ते ब्राह्मणांना अवश्य जवळ करतील."

"किंवा आपल्याच जातीच्या नालायक माणसांच्या हाती शिक्षणाची सूत्रं सोपवून, शिक्षणाचा पुरा खेळखंडोबा करून टाकतील. महाराष्ट्रातल्या प्राथमिक शिक्षणाचा कसा बट्ट्याबोळ या धोरणामुळं झाला आहे ते आपण पाहतोच आहोत."

"पण मला वाटतं, असं घडणं अपरिहार्यच आहे. महाराष्ट्रात जी जमात बहुसंख्य आहे, तीच या प्रदेशावर राज्य करणार. तिच्या इच्छेनं नि कलानंच या प्रदेशाचं भलं करू इच्छिणाऱ्यांना वागावं लागेल. तिचा अहंकार दुखवून, तिला तुच्छ लेखून तुम्ही तिचं हित साधू शकणार नाही. इतिहासात प्रथमच तिला स्वातंत्र्य मिळालं आहे. स्वतःचं भाग्य स्वतः ठरविण्याचा अधिकार हजारो वर्षांनंतर आताच तिला मिळाला आहे; तेव्हा तो वापरताना तिच्या हातून थोड्याफार चुका झाल्या तरी त्या क्षम्यच समजल्या पाहिजेत. जेव्हा तिला जबाबदारीची जाणीव होईल तेव्हा आपोआपच तिच्या लक्षात येईल की, संस्था काय किंवा राज्य काय चालवायला लायक माणसं आवश्यक असतात आणि अशी लायक माणसं कोणत्याही जमातीतून मिळाली तरी ती मिळवली पाहिजेत."

"तोपर्यंत ब्राह्मणांनी काय करावं ? असाच वनवास भोगावा ? की

देशोधडीला लागावं ?" त्या गृहस्थांनी चिडून विचारले.

"याचं उत्तर खुद्द ब्राह्मणांनीच द्यायचं आहे !" संस्थाचालक विषण्णपणे हसून उद्‌गारले.

आणि ते संभाषण तेथेच थांबले.

माझ्या डोक्यात मात्र त्या संभाषणाने एक वेगळेच चक्र सुरू केले. एकच प्रश्न पुनःपुन्हा राक्षसासारखा माझ्या डोळ्यांसमोर येऊन उभा राहू लागला.

तर मग ब्राह्मणांनी करावे तरी काय ?

महाराष्ट्रीय ब्राह्मणांची ससेहोलपट

महाराष्ट्रीय ब्राह्मणांची स्थिती आज मोठी चमत्कारिक झाली आहे यात शंका नाही. सरकारी नोकऱ्यांची दारे त्यांना जवळ-जवळ बंदच झाली आहेत; व्यापार–उदीम करावा तर हातात भांडवल नाही; राजकारणातून तर तो जवळ-जवळ बहिष्कृतच झालेला आहे. शिक्षणाचे क्षेत्र इतके दिवस सोज्वळ समजले जात होते, परंतु आता तिथेही खऱ्या योग्यतेऐवजी बहुजनसमाजवाद घुसू लागल्याचे स्पष्ट दिसत आहे. खेड्यापाड्यांत तर त्याचे जीवन जवळजवळ अशक्य बनले आहे. अशा स्थितीत त्याने करावे तरी काय ? आजवरच्या जीवनाचा प्रवाह बदलावा कसा ? आपल्या जीवनात कालानुरूप परिवर्तन घडवून आणल्यास ती त्याची सांस्कृतिक अधोगती तर ठरणार नाही ना ? असे एक–ना–दोन शेकडो प्रश्न या समाजासमोर उभे आहेत; अनेक अडचणी उभ्या आहेत. त्यातून कसा मार्ग काढावा याचा प्रत्येकजण आपापल्या परीने विचार करीत आहे. या विषयासंबंधी अनेक लोकांशी माझी चर्चा नेहमी होत असते. त्या चर्चेतील काही मुद्दे या लेखाच्या रूपाने मराठी वाचकांसमोर मांडण्याचा येथे प्रयत्न करण्यात आलेला आहे.

साऱ्या दक्षिण भारताचा प्रश्न

कन्नड भाषेतील एक थोर साहित्यकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या व अखिल भारतीय साहित्य अकादमीने दोनदा पुरस्कार देऊन गौरविलेल्या एका प्राध्यापकांशी महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादासंबंधी चर्चा चालली असता ते मला म्हणाले, "खरं म्हणजे हा काही केवळ महाराष्ट्रापुढील प्रश्न नसून केरळाखेरीज साऱ्या दक्षिण भारताचाच हा प्रश्न आहे. केरळमध्ये ब्राह्मणेतरसमाज शिक्षणात पुढारलेला नि आर्थिक दृष्ट्या सुस्थितीत असल्यामुळं तिथं ब्राह्मण हा हेवा वाटण्यासारखा समाज नसून कीव करण्यासारखीच त्याची परिस्थिती आहे. इतरत्र मात्र ब्राह्मण हा ब्राह्मणेतरांच्या द्वेषाचं नि हेव्याचं केन्द्र बनला आहे. तिथल्या परिस्थितीशी तुलना करता महाराष्ट्रातला ब्राह्मणद्वेष पुष्कळच सौम्य आहे असं म्हणावं लागेल.

मी तुम्हाला कर्नाटकातली एक घटना सांगतो. तिथल्या शिक्षणक्षेत्रातही जातीयवादानं कसा धुमाकूळ घातलाय हे त्यावरून तुमच्या लक्षात येईल. तुम्हाला माहीतच असेल की, म्हैसूर विद्यापीठ हे तिथल्या वक्कळिग (शेतकरी) समाजाच्या ताब्यात आहे. तिथं वक्कळिगेतरांना जवळजवळ स्थानच नाही; तर कर्नाटक विद्यापीठ हा लिंगायतांचा अड्डा आहे. काही दिवसांपूर्वी या कर्नाटक विद्यापीठात कन्नड प्राध्यापकाची (Head of the department) जागा रिकामी झाली होती. त्या जागेसाठी कॉलेजात अनेक वर्षे शिकवण्याचा अनुभव असलेल्या व कन्नड साहित्यात मानाचं स्थान असलेल्या एका एम.ए. पी.एच.डी. ब्राह्मण गृहस्थांनी अर्ज केला. परंतु तुम्हाला आश्चर्य वाटेल, त्या गृहस्थांना ती जागा न मिळता नुकत्याच एम.ए. झालेल्या एका थर्ड क्लास तरुण लिंगायतला ती जागा देण्यात आली. आता बोला ! इतका धडधडीत पक्षपात तुमच्या महाराष्ट्रात, शिक्षणक्षेत्रात केला जातो काय ?"

"मी कधी नोकरीच्या भानगडीत पडलोच नाही; त्यामुळं मला त्यातली काही माहिती नाही. परंतु महाराष्ट्रातही शिक्षणक्षेत्रात हा जातीयवाद फार जोरात घुसू लागलाय असं मी ऐकतो. प्राथमिक शिक्षकांमध्ये आता ब्राह्मण जवळजवळ उरलेलाच नाही. इतरत्रही आपापल्या जातीच्या लोकांची वर्णी लावण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्षाकडून केला जात असल्याच्या तक्रारी मी ऐकल्या आहेत. परंतु त्यात किती तथ्य आहे, याची मला निश्चित कल्पना नाही. पण काय हो प्राध्यापकसाहेब, ब्राह्मणांची ही जी दैन्यावस्था झालीय, तिच्यातून त्यांनी बाहेर पडायसाठी काय केलं पाहिजे असं तुम्हाला वाटतं ?" मी विचारले.

सत्तेच्या व स्पर्धेच्या क्षेत्रांतून बाहेर पडावे

"माझं मत तुम्हाला सांगण्यापूर्वी या बाबतीत तुमचं मत काय आहे, ते कळलं तर बरं होईल. कदाचित् माझं नि तुमचं मत एकच असेल." प्राध्यापकमहाशय म्हणाले.

"तशी फारशी शक्यता नाही. या बाबतीतली माझी मतं इतकी मुलुखावेगळी आहेत की, ती कोणाही ब्राह्मणाला पटणार नाहीत नि पटली तरी आवडणार नाहीत." मी म्हणालो.

"तर मग ती अवश्य सांगा !"

"तुमची इच्छाच असेल तर सांगतो; पण तुम्हाला ती आवडली नाहीत तर रागाऊ नका. माझं असं प्रामाणिक मत आहे की, या कटुतेला प्रामुख्यानं ब्राह्मण समाजाची वागणूकच जबाबदार आहे. तो आजपर्यंत इतरांना तुच्छ नि अस्पृश्य समजत आला, त्याची फळं त्यानं भोगलीच पाहिजेत. ही फळं धैर्यानं भोगत राहून बहुजनसमाजाची सेवा करायचं त्यानं ठरवलं अन् त्याप्रमाणं आपल्या आचरणात

बदल केला, तर ही कटुता लवकरच ओसरेल, असं मला वाटतं. महाराष्ट्रातल्या एका थोर अर्थशास्त्रज्ञ विचारवंतांनी मागे अशी एक सूचना केली होती की, मराठी ब्राह्मणांनी सत्तेच्या नि स्पर्धेच्या क्षेत्रांतून बाहेर पडून काही दिवस अज्ञातवास पत्करावा नि बहुजनांची होईल तेवढी सेवा करावी. मला वाटतं, आजच्या परिस्थितीवर हाच सर्वोत्कृष्ट तोडगा आहे. या मार्गानं ब्राह्मण जाऊ लागले तर, फार लवकर परिस्थिती निवळेल. मात्र त्यात प्रांजळपणा नि प्रामाणिकपणा हवा; स्टंटबाजी नसावी !"

'सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरील उपाय'

"पण हा मार्ग सामान्य माणसाला स्वीकारता येईल असं तुम्हाला वाटतं काय ? त्यागाच्या नि साधेपणाच्या गोष्टी मध्यमवर्गाच्या गळी कितपत उतरतील ? आज त्याला नोकरीशिवाय तरणोपाय नाही; पण ब्राह्मण ही जात त्याला चिकटलेली असल्यामुळं त्याला कोणी नोकरी देत नाही. त्याला पोटाची विवंचना सतावीत असता त्यागाच्या नि सेवेच्या गोष्टी त्याला सुनावणं म्हणजे त्याची थट्टा करण्यासारखंच आहे." प्राध्यापक म्हणाले.

'सर्व अल्पसंख्यांकांसाठी एकच मार्ग'

"पण मग यातून सुटायचा मार्ग काय ?" मी विचारले.

"आतापर्यंत अनेक अल्पसंख्य जमातींनी जो मार्ग अवलंबिला आहे, तोच ब्राह्मणांना आचरावा लागेल असं मला वाटतं. तो म्हणजे आपल्या जातीची आपणच काळजी वाहणं. पारशी लोक काय करतात ? ते एकाही पारशाला उपाशी किंवा बेकार राहू देतात काय ? जैनही तेच करतात. शीखही त्याच मार्गानं जातात. एवढंच कशाला पण सारस्वत लोक देखील याच मार्गाचा अवलंब करतात. एखाद्या बँकेत किंवा एखाद्या सरकारी खात्यात एखाद्या सारस्वताला प्रवेश मिळाला, की तो भराभर आपल्या जातभाईना तेथे चिकटवून देतो. तुमच्या मामा वरेरकरांचा आकाशवाणीशी संबंध येताच त्यांनी किती सारस्वतांना आकाशवाणीत घुसवलं याची तुम्हाला कल्पनाही नसेल. हीच गोष्ट इतर क्षेत्रांतल्या सारस्वतांची. त्यांचा हा गुण कऱ्हाडे ब्राह्मणांनीही पुष्कळ अंशी उचलला आहे. किर्लोस्कर–टिकेकरांचे कारखाने म्हणजे त्यांच्या नातेवाईकांना नि जातवाल्यांना नोकरी मिळण्याची हमखास ठिकाणं आहेत असं समजलं जातं. त्यात कितपत तथ्य आहे ते मला माहीत नाही. पण जर ते खरं असेल, तर त्यात मला काही गैरही वाटत नाही. ब्राह्मणांची काळजी ब्राह्मणांनी घेतली नाहीतर इतर कोणीच घेणार नाही. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या संस्था, उद्योगधंदे, कारखाने वगैरे काढून त्यात ब्राह्मणांना सामावून

घेतलं पाहिजे. म्हणजे मग सरकारी नोकऱ्या त्यांना नाही मिळाल्या तरी हरकत नाही. अमेरिकेतले कर्तबगार तरुण सरकारी नोकरी ऐवजी खाजगी नोकरी नि उद्योगधंदे पसंत करतात असं म्हणतात. इथले पारशीही तेच करतात. त्यांचंच अनुकरण दाक्षिणात्य ब्राह्मणांनी करावं असं मला वाटतं." त्यांनी आपले मत नि:संकोचपणे व्यक्त केले.

'कटुता वाढत नसून कमी होत आहे'

गेली तीस-पस्तीस वर्षे मराठा समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी नि:स्वार्थ-पणाने झटणाऱ्या एका त्यागी ब्राह्मणेतर शिक्षणतज्ज्ञांना जेव्हा मी हा प्रश्न विचारला, तेव्हा ते म्हणाले, "ब्राह्मण–ब्राह्मणेतरांतील कटुता वाढत नसून उलट कमी होत आहे असा माझा स्वत:चा अनुभव आहे. ज्या ब्राह्मणांनी बहुजनसमाजा-साठी त्याग केला, त्याची सेवा केली, त्यांच्याबद्दल त्या समाजातल्या समंजस माणसांच्या मनात नितांत आदराचीच भावना आहे. आता ब्राह्मणेतर समाजातून वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्य करण्यासाठी लायक माणसं पुढं येऊ लागल्यामुळं त्यांना डावलून ब्राह्मणांना पूर्वीच्या प्रमाणात नोकऱ्या देणं लोकशाही सरकारला कसं शक्य आहे? तेव्हा आपल्याला आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळतात की नाही याचाच ब्राह्मणांनी विचार करावा. मला वाटतं, आजही ब्राह्मणांचं नोकऱ्यांतील प्रमाण त्यांच्या लोकसंख्येच्या मानानं कितीतरी अधिक आहे. आता त्यांनी नोकऱ्यांखेरीज इतर क्षेत्रंही हाताळण्याचा प्रयत्न केला पाहिजे; आणि मुख्य म्हणजे आपला जातीय अहंकार टाकून देऊन बहुजनसमाजाशी एकरूप होण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. ब्राह्मणांच्या गुणांचा बहुजनसमाजाला उपयोग झाला पाहिजे, असं मानणारे अनेक ब्राह्मणेतर मला माहीत आहेत. त्यामुळं इथल्या ब्राह्मणांनी आपल्या जातीपुरताच विचार न करता साऱ्या मराठी समाजाचा विचार करायचं ठरवलं तर, मराठी बहुजनसमाज त्याना अंतर देणार नाही, अशी माझी खात्री आहे. ब्राह्मणांना ब्राह्मणेतरांशी स्पर्धा करायचीच असेल तर त्यांनी ती नोकरीच्या क्षेत्रात न करता सेवेच्या क्षेत्रांत करावी. या महाराष्ट्रात खेडोपाडी इतकी कामं कार्यकर्त्यांची वाट पाहत आहे की, कितीही ब्राह्मण ती करायला तयार झाले तरी ते त्यांना पुरे पडणार नाहीत."

ब्राह्मणांनी प्रान्तीयतेच्या वर उठावे

महाराष्ट्रातील काँग्रेसचे एक पाठीराखे व द्वैभाषिक मुंबई राज्याचे पुरस्कर्ते एकदा मला म्हणाले, "मुंबई द्वैभाषिक राज्य हे महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या दृष्टीनं खरोखरी एक वरदान म्हणून आलं; पण त्या करंटयांनी त्या वरदानाचाही शाप

करून घेतला !"

माझ्या ध्यानात काहीच आले नाही. मी त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहत राहिलो. त्याबरोबर माझी कीव केल्यासारखे करीत ते म्हणाले, "महाराष्ट्रीय ब्राह्मण हा किती विशाल अन्तःकरणाचा आहे, तो प्रान्तीयतेच्या किती वर उठला आहे, हे साऱ्या देशाला दाखविण्याची ती एक सुवर्णसंधी होती. महाराष्ट्रातल्या एकजात साऱ्या ब्राह्मणांनी या द्वैभाषिकाचं स्वागत केलं असतं तर या प्रश्नावर इतकी कटुता वाढली नसती, इतकी रणं माजली नसती. आज मराठी ब्राह्मण संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कर्ता असल्यामुळं राज्यकर्त्या पक्षाला द्वैभाषिक-निष्ठेच्या आवरणाखाली त्याला झोडपण्याची नामी संधी मिळाली. जातीच्या नावावर जे करणं कदाचित् थोडं अवघड झालं असतं, सुसंस्कृत समाजात ज्याबद्दल कदाचित् अब्राह्मणांना लज्जित व्हावं लागलं असतं, ते आज विशाल राष्ट्रीयत्वाच्या नि पक्षनिष्ठेच्या नावावर राजरोसपणानं करणं राज्यकर्त्या बहुजनसमाजाला सहज शक्य झालं आहे."

"पण प्रान्तरचनेतला धडधडीत अन्याय डोळ्यांना प्रत्यक्ष दिसत असताना..."

"तुमचं चुकतं ते इथंच ! जगातल्या अन्यायाविरुद्ध झगडायची जबाबदारी देवानं आपल्यावरच टाकलीय, असा भलताच गैरसमज तुम्ही का करून घेता ? असाच गैरसमज त्या एका माथेफिरूनं करून घेतला आणि महात्माजींचा खून करून साऱ्या मराठी ब्राह्मणांना कायमचं बदनाम केलं. गांधीजींच्या धोरणामुळं हिंदु-समाजावर अन्याय होतोय असं त्याला प्रामाणिकपणानं वाटलं असणं शक्य आहे; पण त्या अन्यायाचा प्रतिकार आपणच केला पाहिजे आणि तो गांधींच्या रक्तानंच होऊ शकेल हा अहंकार नि ही निर्बुद्धता शेवटी नाशालाच कारणीभूत झाली ना ? गत इतिहासापासून काही धडा घेण्याची अक्कल ज्या समाजाला नाही त्याला मी तरी बुद्धिमान् म्हणायला तयार नाही."

अन्याय, प्रतिकारासारख्या उदात्त तत्त्वांचा त्यांनी केलेला हा उपहास मला मुळीच आवडला नाही. परंतु त्यांच्यासारखे मत असणारे कितीतरी ब्राह्मण आज महाराष्ट्रात आहेत आणि ते चांगले विद्वान्, बुद्धिमान्, तर्कशास्त्रज्ञ आहेत, हे मला माहीत असल्यामुळे त्यांचे बोलणे मी निमूटपणे ऐकून घेतले.

ब्राह्मणांनी नवबौद्ध व्हावे का ?

मुंबईच्या एका कॉलेजात समाजशास्त्राचे अनेक वर्षे अध्यापन करणारे एक प्राध्यापक या विषयासंबंधी बोलताना म्हणाले, "मला वाटतं, महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यास त्यांच्या पुष्कळ अडचणी कमी होतील.

तसं झाल्यास त्यांना ब्राह्मण म्हणून सरकारी नोकऱ्यांतून वगळणं कोणत्याही सरकारला शक्य होणार नाही. उलट हरिजनांच्या पंक्तीला जाऊन बसल्यामुळे हरिजनांचाही त्यांना पाठिंबा मिळेल. महाराष्ट्रातला अस्पृश्य हाही बाह्मणांप्रमाणंच बहुजन समाजाच्या जुलमाला बळी पडलेला समाज आहे. त्याला डोकं वर काढण्याच्या कामी बाह्मणांनी मदत केली तर, ब्राह्मणांविषयी त्या समाजाच्या मनात स्नेहाची, कृतज्ञतेची भावना उत्पन्न होईल. अर्थात धर्मपरिवर्तन न करताही हे काम ब्राह्मणांना करता येईल हे खरं, पण त्यामुळे जो परिणाम घडून यावा असं आपल्याला वाटतं तो मात्र घडून येईलच असं सांगता येत नाही. म्हणून त्यांच्या बरोबरीनं ब्राह्मणांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करणं हा एक परिणामकारक उपाय आहे असं माझं मत बनलं आहे."

"म्हणजे काही दिवसांपूर्वी पुण्याच्या काही विद्वान ब्राह्मणांनी जी घोषणा केली होती, की 'आमच्यावर असे अत्याचार होत राहिले तर आम्ही पाकिस्तानात निघून जाऊ!'– त्यातलाच तुमचा हा उपाय आहे म्हणायचा! रोगापेक्षा इलाज जालीम! बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांना आपला वेगळेपणा टाकून देऊन अस्पृश्य समाजाशी एकरूप व्हावंच लागेल की नाही? तर मग तीच गोष्ट त्यांनी इथल्या बहुजनसमाजाच्या बाबतीत का करू नये? या समाजाशी एकरूप होण्याचा आजवर ब्राह्मणांनी कधी प्रयत्न तरी केलाय काय? तर मग या समाजाला त्यांच्याबद्दल प्रेम नि आपलेपणा कसा वाटणार? तरीपण 'जब जागे तबसे सबेरा' (जागे झालो तेव्हापासून सकाळ) असं समजून आपण इथल्या बहुजनसमाजात मिसळून गेलो तर, आपला प्रश्न सुटेल असं नाही तुम्हाला वाटत?" मी विचारले.

"पण तो समाज आम्हाला सुखासुखी आपल्यात मिसळू देईल असं वाटतं तुम्हाला? आता तो राज्यकर्ता बनलाय. त्याला तुमची मुळीच गरज नाही. त्यामुळं तुमची कितीही इच्छा असली तरी, तोच तुम्हाला जवळ येऊ देणार नाही." त्यांनी खात्री देत म्हटले.

'ब्राह्मणांनी कम्युनिस्ट व्हावे!'

माझे एक प्राध्यापक-मित्र मला नेहमी म्हणत असतात, "मला वाटतं, ब्राह्मण जर कम्युनिस्ट होतील तर त्यांचा जातिगत प्रश्न फार लवकर सुटेल. कारण कम्युनिस्टांच्या तत्त्वज्ञानात जातींना स्थान नाही. किंबहुना धर्माचीही बंधनं त्यांना एकमेकांपासून विभक्त करू शकत नाहीत. यामुळं काही विचारवंतांना असं वाटतं की, भारतातल्या अल्पसंख्य जमाती कम्युनिस्ट होतील तर त्यांचे प्रश्न सुटण्यास चांगली मदत होईल. जी भीती आज दक्षिण भारतात ब्राह्मणांना ग्रासून राहिली आहे, तीच सबंध भारतातल्या मुसलमानांनाही सतावीत आहे. बहुसंख्य

हिन्दू जमातीपुढं आपला निभाव कसा लागणार ? जे लुच्चे अन् हुशार होते, ते पाकिस्तान व्हायच्या सुमारास आधीच पाकिस्तानात निघून गेले, त्यांचं बस्तान तिथं चांगलं बसलं. पण नंतर गेले त्यांचे फार हाल झाले; आणि कित्येकजण तर तिथल्या हालांना कंटाळून भारतात परत आले. त्यांना या देशातही आता मानाचं स्थान उरलेलं नाही. मुसलमानांवर या देशातल्या बहुसंख्य जमातीचा नि काही ठिकाणी राज्यकर्त्यांचाही विश्वास नाही. प्रत्येक मुसलमान अंतःकरणातून पाकिस्तानवादीच आहे, असं सर्वजण गृहीतच धरून चालले आहेत. अशा स्थितीत ते जर कम्युनिस्ट होतील तर त्यांच्यावरला हा कलंक काहीसा पुसला जाईल; आणि जेव्हा कम्युनिस्टांच्या हाती राज्य येईल तेव्हा त्यांना सुखाचे आणि मानाचे दिवस येतील."

"म्हणजे या देशात केव्हातरी कम्युनिस्ट राजवट येणार आहे, असं तुम्ही गृहीतच धरलेलं दिसतंय !" मी हसत म्हटले.

"हा गृहीत धरण्याचा प्रश्न नाही. जे प्रत्यक्ष दृष्टीला दिसतंय नि अनुभवाला येतंय त्यावरून निघणारा हा निष्कर्ष आहे. जोपर्यंत या देशातलं दारिद्र्य नाहीसं होत नाही, तोपर्यंत कम्युनिझमचं स्वागत करायला इथली जनता तयारच राहणार. आज ज्या पद्धतीनं देशाचं अर्थकारण चाललंय, तिच्या योगानं इथलं दारिद्र्य नाहीसं होण्याऐवजी वाढतच चाललंय. श्रीमंतांची श्रीमंती आणि गरीबांची गरिबी एकसमयावच्छेदेकरून वाढविण्याचा कार्यक्रम सध्या चालू आहे. त्यातून कम्युनिझम्खेरीज दुसरं काही बाहेर निघेल असं मला तरी वाटत नाही. तेव्हा जो कम्युनिझम् येणारच आहे त्याच्या स्वागतासाठी इथल्या अल्पसंख्यकांनी तयार राहणं त्यांच्याच हिताचं ठरणार आहे."

"जसं मुस्लिम आक्रमकांच्या नि इंग्रज विजेत्यांच्या वेळी घडलं, तसंच म्हणाना !"

"जवळ जवळ तसंच. फरक इतकाच की, या खेपेला त्यांना नाइलाजानं तसं करावं लागेल. कारण, लोकशाही म्हणजे बहुमताचं राज्य, हा सिद्धान्त आपल्या देशात मान्य केला गेल्यामुळं त्यांना त्यातून स्वतःची सुटका करून घ्यायला दुसरा मार्गच नाही. या दिवसांत दक्षिण भारतामध्ये एकाही राज्यात ब्राह्मण जातीचा माणूस मुख्यमंत्री होऊ शकेल, अशी कल्पना तुम्ही स्वप्नात तरी करू शकला असता काय ? आंध्रात रेड्डी, तामिळनाडात नाडर, म्हैसूरमध्ये वक्कलिग किंवा लिंगायत, केरळात मेनन, नायर वगैरे आणि महाराष्ट्रात मराठा यांनीच मुख्यमंत्री झालं पाहिजे असं धर्मनिरपेक्ष राज्याचा डांगोरा पिटणाऱ्या काँग्रेसनंही गृहीत धरलेलं आहे. अशा वेळी केरळात कम्युनिस्टांचं मंत्रिमंडळ अस्तित्वात आलं आणि एक गरीब ब्राह्मणकार्यकर्ता मुख्यमंत्री झाला. त्याच्या मंत्रिमंडळातही अनेक ब्राह्मण होते. कारण मंत्रिपदासाठी माणूस निवडताना तो कोणत्या जातीचा आहे हे न

पाहता त्याची लायकी काय आहे हे पाहायचं, असं कम्युनिस्टांचं धोरण आहे. त्याच्या उलट महाराष्ट्रात आणि इतर दाक्षिणात्य राज्यांत अमुक माणूस किती मतदारांना नि आमदारांना आपल्याकडे ओढू शकतो, यावर त्याचं मंत्रिमंडळातलं स्थान ठरत असतं !"

"पण मग हाच न्याय इतर पक्षांतल्या लोकांनाही लावता येईल की !" मी म्हणालो.

"त्यात थोडा फरक आहे. आजच्या राज्यकर्त्यांजवळ स्वतःचं असं काही भरीव तत्त्वज्ञान नाही. हाती असलेली सत्ता जास्तीत जास्त काळपर्यंत टिकवून धरणं एवढंच त्यांचं ध्येय अन् तेच त्यांचं तत्त्वज्ञान. म्हणून बहुसंख्य जनतेच्या नाजुक भावनांना, जातीय वृत्तीला आवाहन करण्याचं धोरण त्यांनी अवलंबिलेले आहे. 'मी तुमच्या जातीचा आहे म्हणून मला मत द्या.' 'शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री व्हावा असं वाटत असेल, तर आमच्या पक्षाला मतं द्या.' असा उघड-उघड प्रचार इथं चालतो. मग तो 'शेकऱ्याचा मुलगा' शेकडो एकर जमिनीचा मालक असला किंवा लाखो रुपयांची पुंजी जवळ बाळगणारा साखर कारखानदार असला, आपल्या शेतातल्या नि कारखान्यातल्या मजुरांना क्रूरपणानं पिळणारा निष्ठुर सावकार असला तरी, लोकांनी तिकडे डोळेझाक करावी अशी पक्षाच्या लोकांची अपेक्षा असते. कम्युनिस्टांच्या बाबतीत मात्र तुम्ही असं म्हणू शकणार नाही. जे लोक देशाचीही बंधनं पाळायला तयार नाहीत, सारं जग साम्यवादाच्या लाल झेंड्याखाली एकत्र आणणं हेच ज्यांचं ध्येय ते जाती-जमातीच्या भावना ओलांडून पुढं गेले नाहीत तर त्यांच्या भवितव्याबद्दल फारशी आशा बाळगायला नको."

"पण तुम्ही एक गोष्ट विसरता. साम्यवाद्यांच्या तत्त्वज्ञानात व्यक्ति-स्वातंत्र्याला मुळीच स्थान नाही. त्यामुळं बहुसंख्यवादाच्या जुलुमातून मुक्त होण्यासाठी ब्राह्मणांनी साम्यवादाचा आधार घेतला तर त्यांना त्या पक्षाचे गुलाम म्हणूनच राहवं लागेल. प्रज्ञेचा, त्यांच्या प्रतिभेचा त्यांना नि देशाला काहीही उपयोग होणार नाही."

"पण निदान पोटभर खायला तरी मिळेल. आज मुळी त्यांना पोटाची नि जिवाचीच भ्रांत पडलीय. खेड्यात राहावं तर जीव धोक्यात, शहरात जावं तर उपासमार वाढून ठेवलेली ! ही कायमची टांगती तलवार टाळण्यासाठी कम्युनिझमची गुलामगिरी– जर ती अन्न–वस्त्र–निवाऱ्याची खात्री देत असेल तर अधिक बरी, असंच म्हणावं लागेल !" ते मित्र उत्तरले.

ब्राह्मणांनी कलेच्या क्षेत्रांत शिरावे

"आमचं कलेचं क्षेत्र हे एकच असं क्षेत्र आहे की ज्यात जात, धर्म, प्रांत,

भाषा एवढंच नव्हे तर देश अन् रंग यांनाही महत्त्व दिलं जात नाही. हे निर्भेळ मानवी क्षेत्र आहे." एक वयस्क व अनुभवी गवयी सांगत होते. "आम्हा गायक-वादकाचंच उदाहरण घ्या. या क्षेत्रात प्रामुख्यानं मराठी ब्राह्मण आणि मुसलमान यांचाच भरणा आहे, पण म्हणून त्यांचा कुणी द्वेष करीत नाही किंवा त्यांना तुच्छ लेखीत नाही. किंबहुना पाकिस्तानचा बडे गुलामअलीसारखा गवई भारतात आला तर हिंदुस्तान– पाकिस्तानात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली असताही त्याचं गाणं ऐकायला सारे हिंदू-मुस्लिम रसिक गोळा होतात. त्यात पक्के मुस्लिमद्वेष्टे, हिन्दुत्ववादीही असतात ! हीच गोष्ट चित्रकला, शिल्पकला, नृत्यकला, साहित्य वगैरे कलांच्या क्षेत्रालाही पूर्णपणे लागू पडते. एखाद्या उत्कृष्ट कादंबरीचा लेखक परक्या जातीचा आहे म्हणून ती कादंबरी न वाचणारा करंटा वाचक अजून तरी मला आढळलेला नाही. सिनेमाच्या धंद्यातही ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. माडगूळकरांसारखा अष्टपैलू लेखक मराठीतच नव्हे तर, हिंदीतही प्रेक्षकांचा लाडका बनतो, ही गोष्ट काय दर्शविते ? इतर क्षेत्रांसंबंधी मी छातीठोकपणे सांगू शकणार नाही, परंतु संगीताच्या बाबतीत मात्र माझा असा अनुभव आहे की, महाराष्ट्रीय ब्राह्मण गवयाला महाराष्ट्राबाहेर फार मोठी मागणी आहे. त्यासाठी त्यानं आपल्या प्रांताचा मोह सोडण्यास मात्र तयार झाले पाहिजे.

"तुमचा मुद्दा मलाही पटतो. परंतु सारी जमातच्या जमात कलेच्या क्षेत्रात प्रवेश मिळवू शकेल असं मला वाटत नाही. अर्थात जो उठतो तो नोकरीची याचना करतो, ही परिस्थिती बदलण्यासाठी तुमचा हा मुद्दा ब्राह्मण विद्यार्थ्यांनी अवश्य ध्यानात घ्यावा. कलावंतांप्रमाणंच ब्राह्मण तंत्रज्ञांनाही आज खूप मागणी आहे यात शंका नाही." मी म्हणालो.

ब्राह्मणांनी 'हिजरत' करावी !

मी सौराष्ट्रात फिरत होतो त्यावेळी पिढ्यान्‌पिढ्या त्या भागात राहिलेल्या एका महाराष्ट्रीय गृहस्थांशी या विषयासंबंधी बोलत असता ते मला म्हणाले, "मला तर यातून सुटायचा एकच मार्ग दिसतोय. तो म्हणजे 'हिजरत'चा ! देशत्यागाचा ! महात्माजींनी गोव्याच्या लोकांना या मार्गाचा अवलंब करायला सांगितलं होतं; पण त्यांना तो झेपला नाही. महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी हा मार्ग चोखाळून पाहायला काहीच हरकत नाही. ज्याला ज्याला जसं जसं शक्य होत जाईल, त्यानं त्यानं महाराष्ट्राबाहेर पडून इतर प्रांतांत स्थायिक व्हावं आणि मागून येणाऱ्या आपल्या लोकांसाठी भूमिका तयार ठेवावी. शक्य होईल तेव्हा सामुदायिक स्थलांतरही करावं. त्याचा थोडाफार नैतिक परिणाम होऊ शकेल. आपल्या जुलुमामुळं आपल्या प्रांतबांधवांना आपली जन्मभूमी सोडून बाहेर जावं लागतं हे पाहून

बहुजन समाजातल्या काही सज्जन लोकांना तरी लाज वाटेल आणि ते या घटनेच्या मुळाशी जाऊन अन्याय दूर करण्याची खटपट करतील."

"पण मद्राशांप्रमाणे आम्हा मराठ्यांना परप्रांतातले लोक सामावून घेतील काय ? मला याविषयीच शंका वाटते."

"तशी शंका वाटण्यास थोडीफार कारणं आहेतही. उदाहरणार्थ, गांधीजींच्या खूनापासून या देशातल्या लोकांच्या मनात महाराष्ट्रीय ब्राह्मणांविषयी एकप्रकारची सूक्ष्म अढी पडलेली आहे; आणि देशभर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करणारे लोक महाराष्ट्रीय ब्राह्मणच असल्यामुळं त्यांच्याविषयी काही वेगळ्याच कल्पना परप्रान्तीयांमध्ये पसरलेल्या आहेत हे खरं; परंतु तरीही मराठी ब्राह्मणाला परप्रान्तांत भरपूर मागणी आहे, असा माझा अनुभव आहे. मराठी माणूस अंग मोडून मेहनत करतो, त्याला थोडा पगार पुरतो, तो पैसे वगैरे फारसे खात नाही, स्त्रियांच्या बाबतीत तो इतरांपेक्षा जरा अधिक विश्वासार्ह आहे, एखाद्या कंपनीत किंवा कारखान्यात कारकून किंवा मॅनेजर म्हणूनच राहण्यात तो समाधान मानील, त्या कंपनीचा किंवा कारखान्याचा मालक बनण्याची अभिलाषा बाळगणार नाही अथवा त्यातून बाहेर पडून स्वतंत्र कंपनी किंवा कारखाना काढण्याचा प्रयत्न करणार नाही, अशी खात्री असल्यामुळे त्याचं स्वागत करायला अनेक परप्रान्तीय लोक तयार असतात. निदान गुजरात–सौराष्ट्रात तरी त्यांना भरपूर वाव आहे.

"पण त्याकरिता त्यांनी महाराष्ट्र सोडून बाहेर पडायला तयार असलं पाहिजे. आणि तीच तर मुख्य अडचण आहे. मराठी माणूस मग तो ब्राह्मण असो, की मराठा असो–महाराष्ट्र सोडून बाहेर जायला सहसा तयार होत नाही. गुजराती, मारवाडी, मद्रासी, सिन्धी, पंजाबी, बिहारी वगैरे लोक किती सहजासहजी अन् आनंदानं परप्रान्तातच नव्हे तर, परदेशातही जायला तयार होतात, पण आपले मराठी लोक मात्र मुंबई-नागपूर-बेळगावच्यापलीकडे जायला तयार होत नाहीत."

"मला मात्र हा मार्ग पसंत नाही. यात भ्याडपणा तर आहेच; शिवाय आपल्या मराठी बांधवांबद्दल अविश्वासही आहे. आज काही लुच्चे नि संधिसाधू पुढारी बहुजनसमाजाला चुकीच्या दिशेनं नेत असले तरी, त्याला कायम अज्ञानात ठेवणं त्यांना शक्य होईल, असं मला वाटत नाही. पण मराठी माणसाला मी चांगला ओळखतो. तो अन्यायापुढं कधीच नमणार नाही. मग तो अन्याय स्वजनांकडून होणारा असो, की परक्यांकडून होणारा असो. आणि जो माणूस इतरांकडून होणारा अन्याय सहन करीत नाही, तो स्वतःही इतरांवर फार काळ अन्याय करू शकत नाही, असा जगाचा अनुभव आहे. तो मराठी जनतेच्या बाबतीतच कसा खोटा ठरेल ? म्हणून मला असं वाटतं की, महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी दडपल्या नि तुडवल्या जाणाऱ्या ब्राह्मणेतरांच्या नि हरिजनांच्या खांद्याला खांदा लावून निहित-

स्वार्थ वर्गाच्या अन्यायाविरुद्ध झगडायचं ठरवलं तर, बहुजनसमाज त्यांना मुळीच अंतर देणार नाही. किंबहुना आपलं नेतृत्व त्यांनी करावं म्हणून तो त्यांची आर्जवंही करील. अर्थात् त्यासाठी मराठी ब्राह्मणाला दोन गोष्टी कराव्या लागतील. पहिली नि महत्त्वाची गोष्ट अशी की, त्याला जातीय अहंकार सोडावा लागेल; आपण सामाजिक दृष्टचा बहुजनसमाजाहून उच्च आहोत, या भावनेचा त्याग करावा लागेल. रोटीबेटी व्यवहारावर बंधनं घालून स्वतःच्या रक्ताची शुद्धता टिकविण्याचा मध्ययुगीन प्रयत्न त्याला सोडून द्यावा लागेल. किंबहुना बहुजन-समाजाशी रक्ताचं नातं निर्माण करून त्या समाजाशी एकरूप व्हावं लागेल. ब्राह्मण मुलींनी अब्राह्मण किंवा अस्पृश्य समाजातल्या तरुणांशी विवाह केले तर त्यामुळं धर्म बुडाला, असं मानण्याची वृत्ती त्यानं सोडून दिली पाहिजे; समाजातल्या दलित – पीडित जनतेच्याच बाजूला मराठी ब्राह्मण नेहमी राहील अशी खात्री साऱ्या जनतेत त्यानं निर्माण केली पाहिजे. आणि दुसरी गोष्ट अशी की, आपलं जीवनमान बदलण्यास त्यानं तयार झालं पाहिजे. सुखाच्या नि प्रतिष्ठेच्या कल्पना त्यानं पुन्हा तपासून घेतल्या पाहिजेत. बहुजनसमाजाला दोन वेळ पोटभर जेवायला मिळत नसताना मला मात्र भरपूर दूध-तूप मिळालं पाहिजे आणि सारा समाज काबाडकष्ट करत असताना मी मात्र काहीही शरीरश्रम करणार नाही हा हट्ट त्यानं सोडला पाहिजे. अशाप्रकारे समाजाच्या सुखदुःखात तो सहभागी झाला तर, समाज त्याचा अव्हेर करील असं मला मुळीच वाटत नाही. अर्थात् या मार्गानं गेल्यास आपली सांस्कृतिक, आध्यात्मिक नि आधिभौतिक अवनती होईल, असं ज्याला प्रामाणिकपणानं वाटत असेल त्याला इतर मार्ग मोकळेच आहेत !" मी म्हणालो.

+ +

'निषाद' : जानेवारी ६९

३. धर्मराज्य, रामराज्य आणि हिंदूराष्ट्र

विश्वकवी रवीन्द्रनाथ ठाकुर, महाकवी मुहम्मद इकबाल आणि मानवतेचा उद्‌गाता खलील जिब्रान ही तीन माझी साहित्यिक दैवते. यांपैकी रवीन्द्रनाथ हे हिंदू धर्माचे, इकबाल हे इस्लामचे व जिब्रान हे ख्रिस्ती धर्माचे प्रतिनिधी समजता येतील. धर्मनिरपेक्षतेविषयी मला वाटणाऱ्या आकर्षणातून ही निवड करण्यात आली असेल असा कोणाचा समज होण्याची शक्यता आहे; परंतु वस्तुस्थिती तशी नाही. विविध साहित्याच्या अभ्यासातून आपोआप स्वाभाविकपणे ती निवड झाली आहे. या तिन्ही महाकवींनी आपापल्या धर्मांची चांगली वैशिष्ट्ये आपल्या साहित्यातून व्यक्त केली असल्यामुळे त्या धर्मांविषयीचे अनेक गैरसमज हळूहळू दूर होत गेले आणि सारेच धर्म विश्वमानवतेच्या एका सूक्ष्म धाग्याने एकमेकांशी जोडले गेले असल्याचा आनंददायक अनुभव येत गेला.

रवीन्द्रनाथांचे धर्मराज्य

रवींद्रनाथांनी छत्रपती शिवाजीमहाराजांचे गुणवर्णन किंवा मूल्यमापन करणारी एक अप्रतिम दीर्घ कविता लिहिली आहे–'शिवाजी उत्सव!' १९०४ साली जेव्हा त्यांनी ही कविता लिहिली त्यावेळी त्यांच्या वयाची चाळिशी उलटून गेली होती आणि त्यांच्या बुद्धीला व प्रतिभेला चांगलीच परिपक्वता आलेली होती. त्यामुळे त्यांनी वापरलेले शब्द अत्यंत विचारपूर्वकच वापरले असले पाहिजेत, हे सहज लक्षात येते. या कवितेच्या पहिल्याच कडव्यात ते म्हणतात–

"हे राजा शिवाजी! कोण जाणे कोणत्या दूरच्या शतकाच्या कोणत्या एका

अप्रसिद्ध दिवशी महाराष्ट्राच्या कोणत्या शैलावर, अरण्याच्या अंधकारात बसून, छिन्नविच्छिन्न झालेल्या, विस्कटलेल्या भारताला मी एक–धर्मराज्याच्या बंधनात बांधून टाकीन, ही भावना तुझे भाल प्रकाशित करून विद्युत्प्रभेप्रमाणे अवतरली होती."

आणि नंतर ते असे सांगतात की, "त्या दिवशी हा बंगदेश चमकून निद्रेतून जागा झाला नाही. त्याला तो संदेश मिळाला नाही. तो धावून बाहेर आला नाही." याबद्दल ते खेदही व्यक्त करतात; आणि आपल्या कवितेच्या उपांत्य कडव्यात ते म्हणतात,

"त्या दिवशी आम्ही तुझे सांगणे ऐकले नाही. आता आम्ही तुझा आदेश शिरोधार्य मानू. तुझ्या ध्यानमंत्राने भारतातील सारे प्रदेश एकमेकांना स्नेहालिंगन देतील. बैराग्याच्या उत्तरीयाची ध्वजा बनवून आम्ही ती फडकवू – तेच आम्हा दरिद्र्यांचे सामर्थ्य ! 'या भारतात एक धर्मराज्य होईल' या महावचनाला आम्ही आमचे धन बनवू." आणि शेवटच्या कडव्यात आपल्या बंगबांधवांना ते आवाहन करतात, "हे बंगालवासियांनो, आज मराठ्यांच्या बरोबर एक स्वराने म्हणा, 'शिवाजीचा जय असो.'..."

यातील बैराग्याच्या उत्तरीयाची ध्वजा म्हणजे भगवा झेंडा, हे वाचकांच्या सहज लक्षात आले असेल. आता आजकालच्या एखाद्या 'सेक्युलरवादी' व्यक्तीने रवींद्रनाथांची ही कविता वाचली तर, भगवा झेंडा फडकावीत एकधर्मराज्याची स्थापना करावयास कटिबद्ध झालेल्या या विश्वकवीला अत्यंत कट्टर जातीयवादी ठरवून तो मोकळा होईल. प्रारंभी जेव्हा मी ही कविता वाचली तेव्हा काही काळ माझीही मनःस्थिती काहीशी अशीच झाली होती. परंतु आचार्य स. ज. भागवतांच्या मार्गदर्शनाने अधिक सखोल चिंतन केल्यावर त्यातील व्यापक अर्थ मला हळुहळू कळू लागला. टागोर जेव्हा 'धर्मराज्य' हा शब्द वापरतात, तेव्हा त्यांना 'धार्मिक' (रिलीजियस) राज्य अभिप्रेत नसते, तर धर्माने, न्यायाने चालणारे राज्य अभिप्रेत असते. याचे कारण असे की, जरी आपण आजकाल 'रिलीजन' या अर्थाने धर्म हा शब्द वापरीत असलो तरी, मूलतः धर्म हा शब्द कर्तव्य, न्याय, पावित्र्य या अर्थानेच आजवर वापरला गेला आहे. त्यामुळे रवींद्रनाथांना अभिप्रेत असलेले धर्मराज्य हे धर्माधिष्ठित नव्हे तर न्यायाधिष्ठित राज्य होते, हे उघड आहे.

गांधीजींचे रामराज्य

त्यानंतर आले गांधीजींचे रामराज्य ! या शब्दाने भल्याभल्यांना चक्रावून सोडले. रामाच्या राज्यात अस्पृश्यांवर ब्राह्मणांकडून अन्याय झाल्याच्या, खुद्द सीतेवर रामाकडून अन्याय झाल्याच्या घटनांची नोंद रामायणात आहे. त्यामुळे

रामराज्यात सामाजिक उच्चनीचता, गरिबांची पिळवणूक, स्त्रियांना दुय्यम दर्जाचे नागरिकत्व होते असा समज आहे. त्यामुळे गांधीजी जेव्हा रामराज्याच्या गोष्टी बोलू लागले, तेव्हा त्यांना दलितांची पिळवणूक व स्त्रियांचे दास्यत्व हवे आहे असा अर्थ काही मंडळींनी काढला, त्यामुळे गांधीजींसंबंधी निष्कारण व निराधार गैर-समज पसरला. इतका की, त्यांच्यानंतर 'रामराज्य' हा शब्द वापरण्याचे धाडस राजकारणी लोक करू धजेनात. वस्तुतः गांधीजींनी रामराज्य हा शब्द रवीन्द्र-नाथांच्या धर्मराज्य या शब्दाच्या अर्थानेच वापरला होता.

'यंग इंडिया'च्या २९-९-१९२९ च्या अंकात ते या संबंधी खुलासा करताना लिहितात, "मी जेव्हा रामराज्य असे म्हणतो, तेव्हा मला हिंदूराज्य अभिप्रेत नसते. माझे रामराज्य हे 'ईश्वरी राज्य' किंवा 'देवांचे राज्य' असते. माझ्या दृष्टीने राम आणि रहीम ही एकाच देवाची दोन नावे आहेत. मला फक्त सत्यरूपी, सदाचरणरूपी परमेश्वरच माहीत आहे. दुसरा कोणताही देव मी ओळखत नाही."

"माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीतलावर कधी अस्तित्वात असेल किंवा नसेलही; परंतु रामराज्याचा प्राचीन आदर्श खऱ्या लोकशाहीचा आदर्श आहे, यात मुळीच शंका नाही. त्या राज्यात अगदी तळागाळातील नागरिकाला ताबडतोब न्याय मिळत असे. त्यासाठी त्याला गुंतागुंतीच्या व महागड्या प्रक्रियेचा आश्रय घ्यावा लागत नसे. रामराज्यामध्ये कुत्र्यालाही न्याय मिळाल्याचे वर्णन कवीने केले आहे."

'अमृत बाजार पत्रिके'च्या ता. २-८-१९३४ च्या अंकात ते म्हणतात, "माझ्या स्वप्नातील रामराज्यामध्ये श्रीमंत व गरीब यांना समान हक्क असतील."

'हरिजन'च्या ता. २-१-१९३७ च्या अंकात ते म्हणतात, "रामराज्य म्हणजे शुद्ध नैतिक अधिकारावर आधारलेले जनतेचे सार्वभौम राज्य होय."

तसेच, "आजच्या दुष्टतापूर्ण विषमतांनी भरलेल्या समाजव्यवस्थेत रामराज्य अस्तित्वातच येऊ शकणार नाही. आज मूठभर लोक श्रीमंतीत लोळत आहेत; आणि इतर असंख्य लोकांना पोटभर खायलाही मिळत नाही. अशा स्थितीत कसले रामराज्य येणार?" (हरिजन १-६-४७)

आणि "माझा हिंदूधर्म मला सर्व धर्मांचा आदर करायला शिकवितो, यातच रामराज्याचे रहस्य दडलेले आहे." (हरिजन ता. १९-१०-१९४७)

यावरून गांधीजींची रामराज्याची कल्पना केवढी उदात्त, केवढी व्यापक होती हे दिसून येते. परंतु सामान्यतः आपण शब्दांच्या रूढ, प्रचलित अर्थालाच चिकटून राहतो. यामुळे ज्यावेळी एखादी व्यक्ती किंवा संस्था एखादा विशिष्ट शब्द वापरते, तेव्हा तो वापरण्यामध्ये तिला कोणता अर्थ अभिप्रेत आहे हे लक्षात

न घेता आपल्या मनातला किंबहुना आपण त्यावर लादलेला अर्थच आपण त्या शब्दाला चिकटवितो; आणि मग त्या शब्दाला व तो शब्द वापरणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला आपण बदनाम करीत राहतो.

हिंदूराष्ट्र म्हणजे काय ?

अगदी हीच गोष्ट हिंदूराष्ट्र या शब्दाच्या बाबतीत घडली व घडत असल्याचे आपल्याला दिसून येते. या विषयाची चर्चा पुढे चालू करण्यापूर्वी एका गोष्टीचा खुलासा करणे इष्ट होईल. मला स्वतःला हिंदुस्थान, हिंदू, हिंदूराष्ट्र या शब्दांऐवजी भारत, भारतीय, भारतीय राष्ट्र हे शब्द अधिक प्रिय आहेत. ते अधिक व्यापक व सर्वसमावेशक आहेत, असे मी समजतो. त्यामुळे भारतीय जनसंघाने हिंदू शब्द सोडून देऊन या शब्दांचा वापर केला तेव्हा त्याने योग्य दिशेने पुढील पाऊल टाकले, असे मी समजतो. परंतु जे लोक हिंदू व हिंदूराष्ट्र हे शब्द तितक्याच व्यापक अर्थाने वापरतात त्यांच्याशी माझे भुळीच भांडण नाही. रवींद्रनाथांच्या धर्मराज्याला अथवा गांधींच्या रामराज्याला ज्यांचा विरोध नव्हता व नाही त्यांनी संघवाल्यांच्या खुलाशानंतर त्यांच्या हिंदूराष्ट्राला का विरोध करावा, तेच मला कळत नाही. संघवाले 'हिंदी' किंवा 'भारतीय' या अर्थानेच 'हिंदू' शब्दाचा वापर करतात. भारतात किंवा हिंदुस्थानात राहणाऱ्या सर्व जाती–धर्म–पंथांच्या लोकांचा समावेश ते आपल्या 'हिंदू' शब्दात करतात. त्यामुळे त्यांच्या हिंदूराष्ट्राला तात्त्विक दृष्ट्या विरोध करण्यास मला कसलाही आधार दिसत नाही.

आपल्या संकल्पित हिंदूराष्ट्रात इतर धर्मियांना दुय्यम किंवा गुलामांचे स्थान असेल, त्यांना धार्मिक स्वातंत्र्य असणार नाही, सरकारी नोकऱ्यांत त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळणार नाही, त्यांची सर्व बाजूंनी कोंडी केली जाईल, असे हे हिंदूराष्ट्रवादी म्हणत नाहीत. उलट हिंदूराष्ट्र हे धर्मसमन्वयावरच आधारलेले असेल, असे ते सांगतात. तरीपण काही व्यवहारवादी, राजकारणी लोक असा आक्षेप घेतात की, "तुम्ही जरी लाख सांगितलेत तरी हिंद्वेतरांना हे कसे पटणार? त्यांच्या मनात हिंदू शब्दाविषयी जी अढी आहे ती कशी दूर होणार? हिंदूराष्ट्र हे आपल्या नाशालाच कारणीभूत होईल, हा त्यांचा समज कसा दूर होणार?" आणि हे सारे तत्त्वज्ञान कशासाठी? तर "हिंदूराष्ट्राचा पुरस्कार करणाऱ्यांना हरिजन, गिरिजन, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे मतदार कशी मते देतील?" साऱ्या प्रश्नाची मख्खी ही अशी आहे. गांधीजींच्या रामराज्य या कल्पनेचा विपर्यास करून जिनांनी व मुस्लिम लीगने साऱ्या हिंदूंविरुद्ध मुसलमानांना भडकविले आणि देशाची फाळणी घडवून आणली. तरीही गांधीजींनी शेवटपर्यंत रामराज्य हा शब्द वापरण्याचे सोडले नाही. याचे कारण उघड आहे. त्यांना हिंद्वेतरांना खुष करून

त्यांच्या मतांच्या जोरावर सत्ता हस्तगत करावयाची नव्हती. ज्यांना सत्ता हवी होती, त्यांनी रामराज्य हा शब्दच नव्हे तर त्याच्या मुळाशी असलेली उदात्त कल्पनाही वाऱ्यावर सोडून दिली. ज्यांना सत्तेचे राजकारण करावयाचे होते त्या जनसंघाने याच मार्गाचे अनुकरण करून हिंदू शब्दाऐवजी भारतीय हा शब्द घेतला. परंतु ज्यांना सत्तेचा लोभ नाही किंबहुना सत्ताप्राप्ती हे ज्यांचे उद्दिष्ट नाही त्या लोकांनी केवळ कुणाला तरी खुष करण्यासाठी हिंदू या शब्दाचा त्याग करण्याची काहीच जरूर नाही. उलट अधिकाधिक जनसंपर्क साधून आपण वापरीत असलेला हिंदू हा शब्द, खरोखरी कसा व्यापक व सर्वसमावेशक आहे, हे बिगर हिंदूंना पटवून देण्याची जिद्दच त्यांनी बाळगली पाहिजे; आणि तशी ते बाळगून आहेत, असे मला वाटते. ज्यांना राजकारण करावयाचे आहे त्यांनी 'हिंदू' शब्द टाळून 'भारतीय' हा शब्द वापरला पाहिजे या माझ्या भूमिकेला या मताने बाध येतो असे मला वाटत नाही. हिंदूराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांना राजकारण करावयाचे नाही, म्हणून त्यांनी तो शब्द सांस्कृतिक अर्थाने वापरला तर त्याला कोणी हरकत घेऊ नये, एवढेच मला म्हणावयाचे आहे. राजकीय व सांस्कृतिक या भिन्न भूमिका नीट समजून घेतल्या पाहिजेत.

धर्मराज्य की धार्मिक राज्य

संघवाले 'हिंदूराज्य' असा शब्दप्रयोग न करिता 'हिंदूराष्ट्र' असे म्हणतात, यालाही काही विशेष प्रयोजन असले पाहिजे. राष्ट्र (नेशन) ही संकल्पना राज्य (स्टेट) या संकल्पनेपेक्षा अधिक व्यापक व समावेशक आहे, असे मला वाटते. त्या दृष्टीने हिंदूराष्ट्र हा शब्द मला अधिक पुरोगामी वाटतो. राज्यामध्ये केवळ राजकीय जीवनाचाच अंतर्भाव होतो, तर राष्ट्रामध्ये संपूर्ण जीवन व्याप्त होते. भारतात राहणाऱ्या सर्वच लोकांना हिंदूराष्ट्रात समान व सम्मानपूर्ण स्थान असणार हे उघड आहे. हिंदू राज्य हा शब्द उच्चारला की, आपल्या डोळ्यांसमोर ख्रिस्तीराज्य व इस्लामी राज्य यांचे अनुभव उभे राहतात आणि ते अत्यंत क्लेशदायक होते, यात शंकाच नाही. ख्रिस्ती राज्यात ख्रिस्तेतरांना, किंबहुना आपल्याच धर्मातील दुसऱ्या पंथाच्या लोकांना – उदाहरणार्थ, कॅथॉलिकांच्या राज्यात प्रॉटेस्टंटांना जिवंत जाळले जाई. खुद्द आपल्या देशात गोव्यामध्ये किरिस्ताँव राज्यकर्त्यांनी आपल्या हिंदू प्रजेचा कसा अमानुष छळ केला आणि किती प्रचंड प्रमाणावर बाटवाबाटवी केली ते सर्वांना माहीत आहेच. ख्रिस्ती धर्माप्रमाणे इस्लामही जिथे-जिथे गेला तिथेतिथे त्याने असाच धुमाकूळ घातला. फरक एवढाच की, विरोधकांना किंबहुना आपल्या धर्मात येऊ न इच्छिणाऱ्यांना जाळण्याऐवजी त्यांची मुंडकी छाटणे हे मुजाहिदीन (धर्मयोद्धे) अधिक पसंत

करीत. मंदिरांच्या किंवा गिरिजाघरांच्या मशिदी बनविणे आणि मशिदींची किंवा देवळांची गिरिजाघरे बनविणे यात दोन्ही धर्माचे अनुयायी जणू एकमेकांशी चढाओढ करीत अगदी. परवा-परवापर्यंत अशा गोष्टी घडत आलेल्या दिसतात. अलीकडेच अल्जीरियाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा एका रात्रीत तिथल्या प्रमुख चर्चचे मशिदीत रूपांतर झाल्याचे दृश्य आधुनिक जगाला पाहायला मिळाले व हात चोळीत स्वस्थ बसावे लागले.

याच्या उलट हिंदूंचे राज्य स्थापन झाल्यानंतर त्यांनी इतर धर्मीयांना सक्तीने बाटविल्याचे अथवा त्यांच्या धर्मस्थानांचे देवळात रूपांतर केल्याचे उदाहरण क्वचितच आढळते. किंबहुना ज्या मंदिरांचे रूपांतर मुसलमानांनी मशिदीत केले होते, त्या मशिदींना पूर्ववत् मंदिर बनविण्याचे एका अर्थाने न्याय्य समजता येईल असे कामही त्यांनी कधी केले नाही. काशीविश्वेश्वराच्या देवळाची मशीद व पुण्यातील अगदी शनिवारवाड्यासमोरील महादेवाच्या देवळाचा बनलेला शेख सल्ल्याचा दर्गा ऐन पेशवाईतही सुखाने नांदत राहिला. त्यांना त्यांचे मूळ रूप मिळवून देण्याचा विचारही कोणाच्या मनाला शिवला नाही.

याचे कारण उघड आहे. ख्रिस्ती व मुस्लिम धर्मानुयायी धार्मिक राज्याचा पुरस्कार करीत आले. तर हिंदूलोक धर्मराज्याच्या उच्च कल्पनेलाच सतत चिकटून राहिले. कदाचित इतरांचे जबरदस्तीने धर्मांतर करण्याची किंवा त्यांच्या चर्चमशिदींचे मंदिरांत रूपांतर करण्याची सोयच हिंदू धर्मात नसल्यामूळे हिंदूंची अशी सहिष्णुतेची वृत्ती बनली असावी.

हिंदू राष्ट्राची भीती कशाला

या साऱ्या पार्श्वभूमीवरून या प्रश्नाकडे पाहिले की, हिंदूराष्ट्राची भीती लोकांना का वाटावी तेच मला कळत नाही. पारंपरिक अर्थाने हिंदूराष्ट्र या देशात स्थापन होण्याची शक्यताच मला दिसत नाही. ज्या राष्ट्रात हिंदूंना स्वाभिमानाने जगता येईल, असे राष्ट्र म्हणजे हिंदूराष्ट्र, एवढा मर्यादित अर्थच या संकल्पनेच्या मुळाशी असू शकतो. त्यामुळे हिंद्वेतरांना या संकल्पनेला घाबरण्याचे काहीच कारण नाही. किंबहुना मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी, यहुदी वगैरे अन्य धर्मीयांना हिंदूराष्ट्राची खरोखरीच भीती वाटत नसून हिंदूंमधीलच काही लोक त्यांच्या मनात अशी भीती जाणीवपूर्वक, पद्धतशीरपणे निर्माण करीत आहेत, असा माझा समज आहे. संघ-जनसंघामध्ये मुस्लिम व ख्रिस्ती लोकांचा प्रवेश ज्याप्रमाणात वाढत आहे, ते लक्षात घेतल्यास माझा हा समज दृढ होतो. याचे कारणही उघड आहे. हिंदू धर्म हा तसा मुळचाच व्यापक व सर्वसमावेशक आहे; आणि आधुनिक शिक्षणाच्या प्रभावाने तो अधिकाधिक उदार किंबहुना उदासीन बनत चाललेला आहे. ब्राह्मण, महाराष्ट्रीय

किंवा भारतीय या उपाधी मला जन्माने लाभल्या आहेत. त्यामुळे त्यासंबंधी मला गर्व किंवा अभिमान वाटावा असे काही नाही; परंतु त्यात वाईट, अपमानास्पद असेही काही नाही. याच्या उलट काही लोकांना आपण हिंदू आहोत हे सांगण्यास लाज वाटते, असे दिसते. तोही एक हीन मनोगंडच आहे. या दोन्ही गंडांतून बाहेर पडून माणुसकीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी कबीर, नानक, तुकाराम, एकनाथ स्वामी रामकृष्ण परहंस, विवेकानंद, अरविंद, रमण महर्षी, फुले, आगरकर, गांधी, टिळक, आंबेडकर वगैरे संतांचे व नेत्यांचे संस्कार हिंदू समाजावर सातत्याने होत आले आहेत. या सर्वांना ज्यांनी आपले आदर्श मानले आहे, ती मंडळी हिंदूराष्ट्राचा पुरस्कार करीत असली तरी अंतिमतः ते हिंदी राष्ट्र किंवा भारतीय राष्ट्रच बनणार यात शंका नाही. ज्यांनी भारताला आपली मातृभूमी मानले आहे, ज्यांच्या निष्ठा भारताच्या बाहेर अडकलेल्या नाहीत, त्यांना हे पूर्णपणे कळून चुकले आहे की, हिंदूराष्ट्राच्या संकल्पनेला भिण्याचे आपल्याला काहीच कारण नाही. परंतु सत्तापिपासू व सत्तालंपट पुढारी अल्पसंख्य समाजाच्या मनात खोटी भीती निर्माण करून आपणच त्यांचे रक्षणकर्ते असल्याचा आभास निर्माण करीत आहेत. या विचित्र परिस्थितीचा गैरफायदा घेण्यास अल्पसंख्यांकांचे स्वार्थी पुढारी नेहमीच टपून बसलेले असतात. इंदिरा काँग्रेसला पाठिंबा देण्यापूर्वी शाही इमाम बुखारी यांनी जो मागण्यांचा खलिता सादर केला (व बहुधा त्या मागण्या त्यांनी मान्यही करून घेतल्या असाव्यात !) त्यांचे स्वरूप फाळणीपूर्वी जिनांनी केलेल्या मागण्यांपेक्षाही अधिक भयंकर आहे. बहुसंख्य समाजातील फाटाफुटीचा फायदा घेऊन या देशावर अल्पसंख्यांकांची राजवट लादायचाच जणू इथल्या अल्पसंख्यांकांच्या पुढाऱ्यांनं चंग बांधला असावा असे दिसते. आज कोणतेही धोरण ठरविताना या देशातल्या बहुसंख्यकांना काय वाटेल, त्याचा लाभ होईल की तोटा याचा विचार न करता अल्पसंख्य समाजांना व जगभर पसरलेल्या त्यांच्या धर्मबांधवांना काय वाटेल याचीच आमचे राज्यकर्ते जास्त काळजी करतात. तसे नसते तर नेपाळच्या नरेशांना विश्व-हिंदू-परिषदेच्या उद्घाटनाला येण्यास भारत-सरकारने अडकाठी केली नसती आणि रबात (मारोक्को) च्या जागतिक इस्लामी परिषदेत भारतीय मुसलमानांचे प्रतिनिधी म्हणून फखरुद्दीन अली अहमद यांना पाठवून आपली शोभा करून घेतली नसती. अलीगढ मुस्लिम विश्वविद्यालयात जातीयवादी गुंडांचा धुमाकूळ चालू असता त्या विद्यापीठाला त्याचे मूळचे जातीयवादी स्वरूप मिळवून देण्यात भारतीय राजकीय पक्षांमध्ये जी अहमहमिका लागली ती पाहता येथील बहुजन समाजाला न्यूनमनोगंडाने व अपराधभावनेने किती ग्रासले आहे, याची कल्पना येते. अल्पसंख्य समाज आपल्या संघटित गुंडगिरीच्या बळावर केवढा अनर्थ माजवू शकतो याची प्रचीती देशाच्या फाळणीने आणून दिली आहे. हा समाज

पुन्हा एकदा आपल्या झोंडगिरीच्या जोरावर या देशात तसाच अनर्थ माजवील अशी भीती बहुजनसमाजातील काही सच्छील विचारवंतांना वाटत असेल आणि तिच्या प्रतिकारासाठी हिंदूराष्ट्राची कल्पना ते उचलून धरीत असतील तर त्याबद्दल त्यांना दोष देता येईल काय ?

अल्पसंख्य समाजांना बहुजनसमाजाविषयी भरोसा वाटणे, असुरक्षितता न वाटणे ही गोष्ट लोकशाही राजवटीच्या दृष्टीने आधारभूत असते. त्यांच्यामध्ये ही सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी त्यांच्या गैरवाजवी, समाजविरोधक मागण्यांनाही मान्यता देऊन त्यांची मनधरणी केली पाहिजे, असे काही लोकांना वाटते. ते चूक आहे. अल्पसंख्यकांना वस्तुस्थितीची जाणीव करून देण्यानेच त्यांचे खरे हित साधते, असे हिंदूराष्ट्रवाले समजत असतील तर ते बरोबरच आहे, असे म्हणावे लागेल.

हिंदूराष्ट्र–धर्मराज्य–रामराज्य

अशा स्थितीत बहुजनसमाजाला मानाने जगण्याची संधी मिळवून देऊ इच्छिणाऱ्या हिंदूराष्ट्राला विरोध करणे म्हणजे आपल्याच हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेणे आहे. वर सांगितल्याप्रमाणे या देशात हिंदूंचे राज्य प्रस्थापित होण्याची मुळीच शक्यता नाही. कारण, इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्म यांच्याप्रमाणे हिंदू धर्म ही साचेबंद समाजयंत्रणा नाही. संकुचित बनण्याऐवजी व्यापक, उदार बनण्याकडेच त्याची प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीला अधिक पुष्टी मिळवायची असेल तरदे शातील पुरोगामी, बुद्धिवादी, सेवाभावी मंडळींनी या हिंदूराष्ट्रवाद्यांशी वैराची, विरोधाची भावना न ठेवता, त्यांना समजून घेण्याचीच भूमिका ठेवली पाहिजे. तसे झाल्यास या देशात सर्वधर्मसमभावावर आधारलेला व्यापक भारतीय समाज निर्माण होण्यास चांगला हातभार लागेल. याच्या उलट त्या लोकांना अस्पृश्य किंवा सांसर्गिक रोगाने त्रस्त असलेले लोक समजून, त्यांना दूर ठेवण्याचा अथवा कोंडीत गाठण्याचा प्रयत्न चालू राहिला तर ते अधिक कट्टर बनतील; आणि धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली जसजसा बहुजनसमाजावरील अन्याय वाढत जाईल तसतशी साऱ्या समाजाची कट्टरता वाढत जाईल आणि रवींद्रनाथांना व गांधीजींना जे धर्मराज्य व रामराज्य अभिप्रेत होते ते या देशात कधीच प्रस्थापित होऊ शकणार नाही. नकली धर्मनिरपेक्षतावाद्यांचे बेंड आज ना उद्या फुटणारच आणि अल्पसंख्य समाजांना त्याचा चटका बसणारच. तसे घडावयास नको असल्यास सर्वांनीच हिंदूराष्ट्राची कल्पना नीट समजावून घेऊन भावी सर्वसमावेशक भारतीय समाजाच्या निर्मितीस हातभार लावला पाहिजे, असे मला वाटते.

\+ \+

'तरुण भारत' : ६·४·८०

४. बुलबुलों को है ये हसरत कि वे उल्लू न हुअे

आपला भारत देश खरोखरीच 'थोर' आहे ! जगात सहसा न आढळणाऱ्या गोष्टी येथे प्राचुर्याने पाहायला व अनुभवायला मिळतात. अशीच एक अद्‌भूत आणि जगाच्या कुतूहलाला कारणीभूत झालेली गोष्ट म्हणजे या देशातील बहुजनसमाजाची कमालीची सहिष्णुता ही होय ! आजकाल या सहिष्णुतेने जे 'नेत्रदीपक' रूप धारण केले आहे, ते पाहून जगातील लोक अत्यंत थक्क होत आहेत.

असुनि खास मालक घरचा

तसा आपला भारतवर्ष म्हणजे एक धर्मशाळाच आहे. जगातल्या कोणत्याही धर्माने येथे यावे आणि निःसंकोचपणे येथे आपली पथारी पसरावी. त्याला येथे कोणी अडविणार नाही की "बाबा, तू कोण, कुठला, इथं कशाला आलास ?" म्हणून विचारणार नाही. उलट आपले घोंगडे दुमडून त्याला जागा करून देण्यास इथल्या लोकांमध्ये अहमहमिका लागणार ! इथे ख्रिस्ती आले, यहुदी आले, पारशी आले, मुसलमान आले, बौद्ध व शीख तर याच भूमीत उदय पावले. सर्वांनी गुण्या-गोविंदाने नांदावे, कुणी कुणावर आक्रमण करू नये, एवढीच अजगरासारख्या सुस्त असलेल्या येथील बहुजनसमाजाची अपेक्षा असते.

या हिंदू समाजाच्या अपेक्षा नेहमीच अगदी माफक राहिल्या आहेत. रडत-खडत, गुलाम म्हणून का होईना, आम्हाला जगू द्या, एवढीच या कणा नसलेल्या हिंदू समाजाची इतर धर्मीयांकडे मागणी किंवा प्रार्थना असते. ती प्रार्थना मान्य करून प्रथम मुसलमानांनी व नंतर ख्रिश्चनांनी त्यांना गुलामगिरीचे सुख पुरेपूर उपभोगू

दिले. त्यामुळे 'असुनि खास मालक घरचा, म्हणति चोर त्याला', अशी आपली स्थिती झाली तरी, हिंदू समाजाला त्याबद्दल कधी संकोच किंवा शरम वाटली नाही !

अल्पसंख्यकांची कुरघोडी

आध्यात्मिक दृष्टीनं पाहिल्यास ही निर्लज्जता म्हणजे त्या समाजाच्या थोरपणाचे प्रतीक किंवा आविष्कारच आहे असे म्हणता येईल. परंतु इंग्रजांनी या देशाला आधुनिक राष्ट्रवादाची जाणीव करून दिली; आणि येथील बहुजन समाज अस्वस्थ होऊ लागला. परंतु ही जागृती शेवटच्या थरापर्यंत जाऊन पोहोचण्यापूर्वीच या अल्पसंख्यक समाजांनी आपसात संगनमत करून या देशाची फाळणी घडवून आणली. तेवढ्याने तरी त्रस्त समंध शांत होईल या आशेने व अपेक्षेने येथील बहुजन समाजाने मातृभूमीच्या चिरफाडीच्या जखमा सहन केल्या; परंतु त्या जखमा पुरतेपणी भरून येण्याच्या आधीच आणखी चिरफाड करण्याच्या गर्जना भारतभाग्य विधात्याच्या कानावर येऊ लागल्या. भारताचे परराष्ट्रमंत्री श्री नरसिंहराव यांनीच लोकसभेत २० नोव्हेंबर १९८० रोजी आढेवेढे घेत का होईना, हे कबूल केले की, "पाकिस्तानातील 'नवाए वक्त' (काळाचा आवाज) या उर्दू दैनिकाने अशी धमकी दिली आहे की, भारतातील जातीय दंगलींमुळे हिंदी मुसलमानांना तिसरे पाकिस्तान मागणे भाग पडेल !" म्हणजे यापूर्वी निर्माण करून घेतलेल्या पूर्व व पश्चिम पाकिस्तानांनी येथील अल्पसंख्य समाजाचा आत्मा तृप्त झालेला नसून या देशाचे आणखी तुकडे करण्याची त्यांची इच्छा आहे; व त्यासाठी प्रेरणा, पैसा व प्रोत्साहन पुरविण्याची जबाबदारी पाकिस्तानच्या मार्फत श्रीमंत अरब राष्ट्रांनी स्वतःच्या शिरावर घेतली आहे, असे दिसते.

अल्पसंख्यकांचे कोडकौतुक

जगात कोठेही पाहावयास न मिळणारी अशी एक अद्‌भुत गोष्ट भारतात अनुभवावयास मिळते. ती अशी की, येथे राज्यकारभार कसा चालावा, कोणासाठी कसे कसे कायदे केले जावेत, याचे आदेश बहुसंख्य समाज देत नाही; तर ते अल्पसंख्य समाजाकडून घेतले जातात. वस्तुतः एकदा फाळणी होऊन अल्पसंख्य समाजाला त्याची 'पुण्यभूमी' (म्हणजे पाकिस्तान) मिळाल्यानंतर मागे उरलेल्या या अपवित्र भूमीचा (नापाकिस्तानाचा) कारभार कसा चालावा, येथे कोणते कायदे असावेत, येथील नोकऱ्यांत कोणाला किती टक्के जागा दिल्या जाव्यात वगैरे ठरविण्याचा अधिकार येथील बहुजन समाजाला मिळावयास हवा होता; परंतु तसे होण्याऐवजी अल्पसंख्य समाजाची कुरघोडी पूर्ववत् तशीच चालू असल्याचे विचित्र दृश्य येथे दिसत आहे. इंग्रज राज्यकर्त्यांनी आपल्या स्वार्थासाठी, आपली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी, एक उपाय म्हणून 'फोडा व राज्य करा' या धोरणाचा अवलंब करून येथील अल्पसंख्यकांना लाडावून ठेवले. आपल्या जुन्या धन्याच्या पावलावर पाऊल टाकून स्वतंत्र

भारताच्या नव्या राज्यकर्त्यांनीही आपल्या स्वार्थासाठी, आपल्या सत्ता टिकवून ठेवण्यासाठी, एक उपाय म्हणून 'फोडा व राज्य करा' धोरणाचा पाठपुरावा केला; आणि अल्पसंख्यकांना डोकीवर चढवून ठेवले. एवढे की, या देशात कोणते कायदे असावेत, कोणाला नागरिकत्वाचे अधिकार दिले जावेत, सरकारी व बिगर सरकारी नोकऱ्यांमध्ये दहा टक्के लोकसंख्या असलेल्या समाजाला किमान पंचवीस टक्के तरी नोकऱ्या राखून ठेवणे आणि पैसा वापरून वाटवावाटवी करण्याचा अधिकार अल्पसंख्य समाजाला असणे कसे आवश्यक आहे, वगैरे बाबतीत बहुजन समाजाला आदेश देण्याइतकी धृष्टता येथील अल्पसंख्य समाजाने दाखविण्यास सुरुवात केली; आणि त्यांच्या हातातील 'तुळशीपत्रा'प्रमाणे (Casting Vote) असणाऱ्या एकगठ्ठा मतांचे सामर्थ्य लक्षात घेऊन सत्ताकांक्षी, सत्ताधारी व सत्तापिपासू मंडळींनी त्यांचे भरपूर कोडकौतुक करण्यास सुरुवात केली. आपल्या देशातील अल्पसंख्य समाजांच्या इशाऱ्यावर नाचणारा, त्यांच्या मनाप्रमाणे, त्यांना हवे तसे वेगळे कायदे करू देणारा एवढा उदार बहुजनसमाज जगात अन्यत्र कोठे आहे काय ?

असममधील अल्पसंख्य समाजांची शिष्टमंडळे पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री यांना वारंवार भेटत असतात. त्यांनी अशा प्रकारे जाहीर भेटी घ्याव्यात अशी व्यवस्था खुद्द सरकारकडूनच केली जात असली पाहिजे, हे उघड आहे. या शिष्टमंडळांना माताजी व सरदारजी असे आश्वासन देतात की, "तुम्ही मुळीच काळजी करू नका. परकीय घुसखोरांच्या केसालाही धक्का लागणार नाही. असममध्ये परकीय घुसखोरांचे बहुमत होऊन तो प्रदेश बांगला देशात सामील झाला किंवा त्याचे एक तिसरे पाकिस्तान निर्माण झाले तरी आम्हाला त्याची पर्वा नाही. आम्ही त्या स्वाभिमानी, देशभक्त असमीया आंदोलकांना निश्चितच चिरडून टाकू." माताजी व सरदारजींच्या या अर्थाच्या जाहीर आश्वासनांमुळे अरबस्तानापासून इंडोनेशियापर्यंतच्या सर्व मुसलमानांना खुषीच्या उकळ्या फुटत आहेत; आणि बिचारे बहुसंख्य हिंदू अनाथ व निराधार विधवेसारखे मनातल्या मनात रडत आहेत.

काश्मीरमधील अल्पसंख्यकांचे काय ?

अल्पसंख्यकांचे कोडकौतुक ही जर खरोखरीच मोठी आदर्श व अनुकरणीय गोष्ट असेल तर मग काश्मीर, नागभूमी, मिझोराम, मेघालय, या राज्यांतील व केरळसारख्या राज्याच्या काही भागातील अल्पसंख्य समाजाच्या (जे दुर्दैवाने हिंदू आहेत !) बाबतीला हे कोडकौतुक का येत नाही ? बांगला देशातील लक्षावधी हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराची तर आपल्याला गंधवार्ताही नाही; मग त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काही खटपट करण्याची गोष्टच दूर राहिली. भारतामध्ये मुसलमानांवर होणाऱ्या तथाकथित अत्याचारांची सबब पुढे करून जे पाकिस्तानी

पुढारी व त्यांचे भारतीय मित्र तिसऱ्या पाकिस्तानची मागणी करतात ते बांगलां देशातील हिंदूंना व पाकिस्तानातील अहमदिया पंथीयांना वेगळे राज्य तोडून दिले जावे अशी मागणी करण्यास पुढे का येत नाहीत? न्याय हा सर्वांना सारखाच दिला गेला नाही तर तो अन्याय ठरतो, हे साधे तत्त्व या मंडळींना किंवा भारतीय अल्पसंख्यकांचे कोडकौतुक करणाऱ्या येथील मंडळींना माहीतच नाही काय? अल्पसंख्य फक्त मुसलमान असतात व त्यांचेच लाड केले जातात, असा गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. आजकाल गाजत असलेले कन्याकुमारी प्रकरण लक्षात घेतल्यास ख्रिस्ती लोकांचेही असेच लाड केले जात आहेत असे दिसून येईल. कन्याकुमारीजवळच्या समुद्रात उभारण्यात आलेल्या विवेकानंद स्मारकाकडे जाणाऱ्या यंत्रचलित नौकांचा रस्ताच जणू तेथील ख्रिस्ती कोळ्यांनी अडवून धरला आहे. लक्षावधी प्रवाशांची गैरसोय करणारी ही अडवणूक दूर करण्याची जबाबदारी तामिळनाडू सरकार व मध्यवर्ती सरकार या दोघांचीही आहे. परंतु ख्रिश्चनांना कसे दुखवायचे या भीतीने ग्रस्त झालेली ही सरकारे आपली जबाबदारी पार पाडण्यात टाळाटाळ करीत आहेत. मागील संसदेत खासदार ओमप्रकाश त्यागी यांनी बळजबरीने वाटवाबाटवी करणाऱ्या मिशनऱ्यांच्या अत्याचारांना पायबंद बसावा या हेतूने धर्मस्वातंत्र्य विधेयक आणले होते. त्याला ज्या लोकांनी विरोध केला तेच आता या कोळ्यांच्या अडवणुकीच्या धोरणाला पाठिंबा देत असावेत असे दिसते.

बहुसंख्य असणे हा गुन्हा आहे काय?

सत्ताधारी व सत्ताकांक्षी राजकीय पक्षांच्या या अल्पसंख्यक धार्जिण्या वृत्तीमुळे आपण बहुसंख्य आहोत हा जणू आपला गुन्हाच आहे, अशी भावना भारतातील बहुजनसमाजात निर्माण होत आहे, ही अत्यंत धोक्याची गोष्ट आहे. कोणत्याही राष्ट्राचा भक्कमपणा हा त्या राष्ट्रातील बहुजनसमाजाच्या भक्कमपणावरच अवलंबून असतो. अल्पसंख्यकांना आंजारून-गोंजारून व त्यांच्या दोषांवर पांघरूण घालून जेव्हा बहुजनसमाजाकडे संशयाने पाहिले जाते, तेव्हा राष्ट्राचा आधारच खिळखिळा होतो. या संदर्भात दलित व मागास जमातींचा पाठिंबा मिळविण्यासाठी बहुजनसमाजावर टीकेची झोड उठविणाऱ्या तथाकथित पुरोगामी लोकांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे. बहुजनसमाजाची मानखंडना केल्याने दलित समाजाला क्षणभर हर्ष झाला तरी, अस्पृश्यतेची समस्या सुटण्यास त्यायोगे अडथळाच निर्माण होतो. कारण, अस्पृश्यता ही मुख्यतः बहुजन समाजाच्या मनात असते. तेथून तिला काढून टाकल्याखेरीज तिचा नाश होऊ शकणार नाही. हे काम धसमुसळेपणाने अथवा आक्रस्ताळेपणा करून साधणार नाही. गांधीजींच्या मार्गाने हळुवारपणाने हृदयपरिवर्तन करूनच अस्पृश्यतेचा नाश होऊ शकेल. जातीय

ऐक्याच्या बाबतीतही हीच गोष्ट लागू पडते. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन वगैरे जमातींना एकमेकांच्या विरुद्ध भडकवून अथवा एका जमातीला जवळ करून दुसऱ्या जमातीवर कुरघोडी केल्याने जातीय विद्वेषाचा प्रश्न कधीच सुटणार नाही. आजकाल आपल्या देशात बहुजनसमाजाची मते आपल्या खिशातच आहेत, असे गृहीत धरून अल्पसंख्य जमातीची खुशामत करण्याचे जे प्रयत्न चालू आहेत व त्या प्रयत्नात राष्ट्रहिताकडे जे दुर्लक्ष केले जात आहे, ती अत्यंत धोक्याची व निंद्य गोष्ट आहे. पुढाऱ्यांच्या या संधिसाधू वर्तनामुळे बहुजनसमाजात जी अपराध-भावना निर्माण होते ती तर त्याहूनही अधिक धोक्याची व राष्ट्राची पाळेमुळेच खिळखिळी करून टाकणारी आहे. आज भारतात आपल्या जातीला, पोटजातीला मागासलेल्यांच्या यादीत घालावे यासाठी अनेक लोक जिवाचा आटापिटा करीत आहेत. त्याप्रमाणे आपण बहुसंख्य असलो तरी, आपल्याला अल्पसंख्य समजून त्यांना मिळणाऱ्या साऱ्या सवलती (मुख्यतः चार बायका करण्याची !) आपल्याला मिळाव्यात अशी मागणी भारतातील हिंदू लोक करू लागले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. बहुधा अशाच परिस्थितीला उद्देशून प्रख्यात उर्दू कवी अकबर इलाहाबादी यांनी म्हटले असावे की 'कद्रदानोंकी तबीयतका अजब रंग है आज। बुलबुलोंको है ये हसरत कि वे उल्लू न हुए। (गुणी लोकांची कदर करणाऱ्या गुणज्ञांची मनःस्थिती हल्ली मोठी विचित्र झाली आहे. त्यामुळे बुलबुलांना अशी हळहळ वाटते की, आपण निष्कारण बुलबुलाच्या जातीत जन्माला आलो. त्यापेक्षा घुबडे झालो असतो तर आपली जास्त कदर झाली असती !)

बहुजनसमाजाच्या रक्षणाचे काय ?

जातीय दंगलींमध्ये अल्पसंख्यकांना हल्ली पुरेसे संरक्षण पोलिस व सैन्य यांच्याकडून मिळत नाही, असा आरडाओरडा सुरू झाल्यामुळे सरकारने त्यासाठी अल्पसंख्य समाजातील जवानांचा समावेश असलेल्या खास पलटणी उभारण्यास सुरुवात केली आहे. जातीय दंगल जेथे होईल, तेथे या पलटणी पाठविण्यात येतील. कल्पना तशी छान आहे; परंतु तिच्यात एक लहानशी फट राहून गेली आहे. आपले काम अल्पसंख्यकांना संरक्षण देणे हे आहे, बहुसंख्यकांना संरक्षण देण्याची जबाबदारी आमच्यावर नाही, असे म्हणून या अहिंदू सैनिकांनी हिंदूवर अहिंदूंकडून होणारे हल्ले उघड्या डोळ्यांनी पाहावयाचे व शक्यतर त्याकामी अहिंदूंनाच मदत करायची अशी भूमिका घेतली–आणि त्यांनी तशी ती घ्यावी यासाठीच तर त्यांची निर्मिती करण्यात येत आहे !– तर त्याबद्दल त्यांना दोष देता येईल काय ? की हिंदूंच्या रक्षणासाठी दुसरी सेना उभारावयाची ?

\+ \+

'विवेक' : १४·१२·८०

५. भारतात वर्गयुद्ध असंभव

आज आपल्या देशात व एकूण जगात जी अस्वस्थता व अस्थिरता निर्माण झाली आहे, तिच्यामुळे अनेक विचारवंतांची झोप उडून गेली आहे. जगाची गोष्ट क्षणभर बाजूला ठेवून भारताचाच विचार करू. या देशाचे विघटन होणार काय ? विभिन्न भाषा, जाती, धर्म आज एकमेकांविरुद्ध संघर्ष करण्यास तयार असल्याचे दिसते. वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक एका राज्यात नांदूच शकणार नाहीत, असे वातावरण निर्माण होत आहे. मराठी-कानडी, पंजाबी-हिंदी, असमीया-बंगाली यांची भांडणे अधूनमधून निकरावर येत असलेली दिसतात. सवर्ण-अस्पृश्य आणि सवर्णांमधील जाती-उपजाती यांच्यांतील संघर्ष तसा जुनाच असला तरी तो पुन्हा एकदा जोराने उफाळून वर आला आहे. हिंदू-मुसलमानांचे जातीय दंगे तर दिसामासाने वाढतच आहेत. मालक आणि मजूर, सरकार आणि त्याचे नोकर, एवढेच नव्हे तर घरधनिणी आणि त्यांच्या मोलकरणी यांच्यातही भलतेच वितुष्ट माजले आहे. हे सारे पाहिल्यानंतर या देशात यादवी माजून त्याची शकले पडणार, असे अशुभ भविष्य कोणी वर्तविले, तर त्याला काही अगदीच मूर्खात काढता येणार नाही !

भारतीय समाजाला कणाच नाही !

परंतु भारतीय समाजाचे आणि भारतीय संस्कृतीचे जेवढे काही आकलन मला झाले आहे, त्यावरून देशाच्या विघटनाची अथवा या देशात वर्गयुद्ध भडकण्याची भीती अगदी निराधार आहे, असे मला वाटते. याचे सर्वात मोठे व

महत्त्वाचे कारण असे की, वर्गयुद्ध अथवा क्रांती करण्यासाठी समाजामध्ये जी दुर्दम्य प्राणशक्ती असावी लागते, तिचाच या देशात अभाव आहे. भारतीय समाज हा कणा नसलेला समाज आहे. कधी तो अगदीच लोळागोळा होऊन पडतो– जसा इंग्रजी सत्तेच्या आगमनानंतर तो झाला होता. गांधी किंवा जयप्रकाश यांच्यासारखा एखादा युगपुरुष अवतीर्ण झाला म्हणजे, काही काळपर्यंत या समाजात प्राणांचा संचार होतो, त्याच्यामध्ये एक नवचैतन्य निर्माण होते; परंतु ते दीर्घकाळ टिकून राहत नाही. त्या थोर विभूतींच्या निर्याणाबरोबर ते चैतन्यही लोप पावते. असे चैतन्य निर्माण करणारा कुणी युगपुरुष भावी काळात निर्माण झाला आणि त्याने वर्गसंघर्षाचा सिद्धांत प्रमाणभूत मानून एका विशिष्ट वर्गाला आपले समर्थन दिले आणि त्याला इतरांविरुद्ध संघर्ष करण्यास प्रोत्साहित केले, तरच या देशात वर्गयुद्ध सुरू होऊ शकेल. लेनिन किंवा माओसारखे क्रांतदर्शी नेते रशिया व चीनला मिळाले नसते, तर तेथेही साम्यवादी क्रांती होऊ शकली नसती, हे लक्षात घेतल्यास वर्गयुद्ध किंवा क्रांती होण्यासाठी केवढ्या प्रचंड ताकदीचे नेतृत्व आवश्यक असते, याची कल्पना येऊ शकेल. दलित-पीडित, श्रमिक-कामगार यांचे नेतृत्व आज ज्यांच्या हातात आहे, त्यांची एकूण पात्रता लक्षात घेतल्यास त्यांच्या प्रेरणेने क्रांती होण्याची सुतराम शक्यता नाही, हे स्पष्ट व्हावे. आजचे कामगारनेते, शेतकरी-शेतमजुरांचे नेते इतके भ्रष्ट, इतके सुखलोलुप, सत्ता संपत्तीच्या आमिषाला इतक्या सहजासहजी बळी पडणारे आहेत की, त्यांच्याविषयी जी माहिती त्यांच्या अनुयायांना मिळत राहते, तिच्यामुळे आज त्यांची आपल्या अनुयायांवर जेवढी पकड आहे तेवढीही त्यांना पुढील काळात टिकवून ठेवता येणार नाही, हे उघड दिसते. कामगारक्रांतीच्या मूलभूत सिद्धांतांशी कसलेही नाते नसणाऱ्या तत्त्वशून्य, गुंड-प्रवृत्तीच्या नेत्यांकडे कामगारवर्ग मेंढरासारखा धाव घेताना आज दिसतो. स्वाभिमान, जिद्द, तत्त्वनिष्ठा यांसारखा कणा असणारा कोणताही समाज अशा प्रकारे स्वार्थांध बनून विनाशाच्या दरीकडे धाव घेणार नाही. वर्गसंघर्ष किंवा क्रांती करणाऱ्या कामकरी-शेतकरी वर्गाजवळ स्वतःचे हित समजण्याएवढी तरी बुद्धी, शहाणपण आणि कर्तृत्वशक्ती असावी लागते. यापैकी काहीच आजच्या किसान-कामगारांमध्ये असल्याचे आढळत नाही. त्यामुळे त्यांना क्रांतीचा निर्णयच घेता येणार नाही; मग त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे दूरच राहिले. मूर्ख व आततायी पुढाऱ्याच्या नादी लागून आपण कारखाने बंद पाडतो म्हणजे वस्तुतः उत्पादन साधनेच मोडीत काढतो आणि पर्यायाने उत्पादनशक्तीचा व देशाचा नाश करून स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतो, ही साधी गोष्ट ज्या कामगारांना कळत नाही, ते क्रांती कसली कपाळाची करणार ?

चिरफाळलेला समाज

भारतीय समाज हा कणा नसलेला किंवा मुर्दाड समाज आहे. हा समाज असा का बनला असावा, याचा शोध आपण घेऊ लागलो की, काही परस्परविरोधी गोष्टी आपल्या लक्षात येतात. त्यातील काही मूलत: व तत्त्वत: चांगल्याही आहेत, ही ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. उदाहरणार्थ हा समाज व्यक्तिवादी आहे. त्याचा धर्म समष्टीचा विचार करण्याऐवजी प्रामुख्याने व्यक्तीच्या विकासावर लक्ष केंद्रित करतो. प्रत्येक व्यक्ती आपले पूर्वसंचित बरोबर घेऊन जन्माला येते आणि इहलोकी जी भलीबुरी कर्मे करते त्यांवर तिच्या परलोकातील स्थानाचा निर्णय अवलंबून असतो. त्यामुळे इहलोकी सुख व परलोकी समाधान लाभावे, म्हणून व्यक्ती आपले जीवन उन्नत बनविण्याचा प्रयत्न करते. साऱ्या समाजाला बरोबर घेऊन काही पुरुषार्थ करावा, अशी प्रेरणाच आमच्या धर्माने आम्हाला कधी दिली नाही. जोपर्यंत सामाजिक स्वास्थ्य आणि कर्तव्ये यांची स्थूल जाणीव ठेवून व्यक्ती आपल्या विकासाचा प्रयत्न करते तोपर्यंत समाजाचे गाडे सुरळीत चालते. परंतु हा समतोल बिघडला; आणि व्यक्ती समाजविन्मुख होऊन आत्मरत, स्वार्थरत झाली की, समाजाच्या विनाशाला प्रारंभ होतो; आणि व्यक्तीचाही अध:पात होतो. आजची परिस्थिती या अध:पाताचेच दर्शन घडविते. आज भारतीय माणूस इतका आत्मकेंद्रित व स्वार्थलोलूप बनला आहे की, त्याला समाजहिताची पर्वाच नव्हे, तर जाणीवही राहिलेली नाही. समाजाच्या मूर्धन्यस्थानी असणाऱ्या नेत्यांचे आचरण आपण या दृष्टीने पाहिले तर या विधानाची सत्यता पटेल. त्यांचाच आदर्शसमोर असल्यामुळे देशातील बहुसंख्य जनता तात्कालिक लाभांच्या मागे पिसाटासारखी धावत आहे. तसे करीत असता आपल्या देशाचे, भारतीय समाजाचे काय होईल याची फिकीरच कोणाला नसते. उलट व्यक्तिपूजा व व्यक्तिस्तोम हे फार महत्त्वाचे मूल्य आहे असा पद्धतशीर प्रसार केला जात आहे. या व्यक्तिवादी विचारसरणीचा एक परिणाम असा झाला आहे की, या देशात व्यक्तिस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य यांना विशिष्ट महत्त्व प्राप्त झाले आहे. या स्वातंत्र्याची गळचेपी झाली की भारतीय माणूस अस्वस्थ होतो. इंग्रजांनी भारतीय माणसाची ही नाडी बरोबर ओळखली होती. त्यामुळे आपल्या साम्राज्याला प्रत्यक्ष धोका व धक्का पोहोचणार नाही एवढ्या मर्यादेपर्यंत त्यांनी भारतीयांना आचार–उच्चार–विचार स्वातंत्र्य बहाल केले; म्हणूनच ते दीडशे-दोनशे वर्षेपर्यंत भारतावर मजेत राज्य करू शकले. वर्गसंघर्ष किंवा वर्गयुद्ध घडवून आणावयाचे असेल तर, या स्वातंत्र्यावर बंधने घालून वर्गवादाची झापडे जनतेच्या डोळ्यांवर लावावी लागतील. भारतीय जनता ही झापडे मुळीच सहन करणार नाही; आणि म्हणूनच या देशात वर्गयुद्धासाठी आवश्यक

असणारी, मुशीतून ओतून काढल्यासारखी साचेबंद मने तयारच होऊ शकणार नाहीत.

या व्यक्तिवादी भूमिकेमुळे या देशात एकसंध धर्माची बांधणीच होऊ शकली नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती, या न्यायाप्रमाणे व्यक्ती तितक्या जाती अशी स्थिती या देशात निर्माण झाली. जात हाच जणू धर्म बनला; आणि सारा समाज लहान-मोठ्या जाती-उपजातींमध्ये विभागला गेला. पाश्चात्त्यांच्या संपर्कानंतर जातिनिर्मूलन करून किंवा त्यांच्यांत सामंजस्याची सांधेजोड करून एक अखंड धर्मसमाज निर्माण करण्याचे प्रयत्न समाजसुधारकांनी सुरू केले. परंतु त्यांना फारसे यश आले नाही. अलीकडील काळात सामुदायिक धर्मांतराची जी लाट भारतात उसळली आहे, ते या अपयशाचेच द्योतक आहे. जातिधर्मावर आधारित चिरफळचा कमी होत्या म्हणूनच की काय पक्षोपपक्षांच्या चिरफळचा सुरू झाल्या. कोणताही एक राजकीय पक्ष येथे एकसंधपणे उभा राहूच शकत नाही. त्याला जरा बाळसे येऊ लागले की त्याच्यात फाटाफूट सुरू होते. काँग्रेस व कम्युनिस्ट या पक्षांचेच जिथे वारंवार तुकडे होतात, तेथे इतर पक्षांविषयी काय बोलावे ? असा चिरफाळलेला समाज कधीच क्रांती करू शकत नसतो.

वर्गचेतनेचा अभाव

वर्गसंघर्ष अथवा वर्गयुद्ध घडून यावयाचे असेल तर, आधी वर्गभावना किंवा वर्गचेतना निर्माण झाली पाहिजे. या देशात जातिभावना इतकी प्रबळ आहे की, वर्गभावनेला ती मूळच धरू देत नाही. त्यामुळे आपल्या वर्गाच्या हिताचा विचार करून संघटित होण्याऐवजी येथील कामगार तात्पुरता नफ्यातोट्याचा हिशेब मांडण्यातच गर्क झालेला दिसतो. जो कोणी पुढारी भल्याबुऱ्या मार्गाने आपली मजुरी वाढवून देईल त्याच्या मागे जाण्यास येथील कामगार एका पायावर तयार असतात. तसे करताना आपण आपल्या वर्गाचे किती अहित करतो याचा विचारही त्यांच्या मनाला स्पर्श करीत नाही. यामुळे या देशातील कामगारसंघटना नेहमीच दुबळ्या, भयभीत राहिल्या. आणीबाणीचा सर्वात मोठा फटका कामगारवर्गाला बसला; परंतु त्याने सारी मुस्कटदाबी हूं की चूं न करता निमूटपणे सहन केली. याचे कारण असे की, कामगारांमध्ये वर्गचेतना जागविण्याचा कोणी प्रयत्नच केला नाही. त्यामुळे राजकीय पक्षांप्रमाणे कामगारसंघटनांनीही आपले वेगवेगळे तंबू उभारले. त्यांची संख्या इतकी वाढली आहे की, त्या तंबू–राहुटचांचीच बजबजपुरी माजली आहे; आणि त्यांच्यात आपसामध्ये लठ्ठालठ्ठी चालू आहे. असा हा कामगारवर्ग एकदिलाने, एकमुखाने काही मागणी करील व ती पदरात पाडून घेण्यासाठी संघर्षास तयार होईल, अशी मुळीच शक्यता दिसत नाही. संपावर बंदी घालणारा वटहुकूम जारी होताच सरकारधार्जिण्या परंतु देशव्यापी अशा काही

प्रबळ कामगार संघटनांच्या नेत्यांनी त्या वटहुकूमाचे ज्या उत्साहाने स्वागत केले, ते पाहता या देशातील कामगार कधी काळी एक होऊन काही कृती करतील, असे वाटत नाही.

शेतकऱ्यांचीही तीच स्थिती

संघटित कामगारांची जर ही दुर्दशा, तर असंघटित कामगार, शेतमजूर व शेतकरी यांची काय स्थिती असेल, याची कल्पनाच केलेली बरी. ही सारी मंडळी इतकी विखुरलेली आहेत की, त्यांना एकत्र आणणे कुणालाही शक्य नाही. शिवाय या मंडळींचे हितसंबंध इतके परस्परविरोधी आहेत की, त्यांच्यांत दिलजमाई होण्याची कल्पना करणे म्हणजे दिवास्वप्न पाहण्यासारखे आहे. कामगाराला धान्य, कपडा, दूध या वस्तू जास्तीत जास्त स्वस्त हव्या असतात; तर शेतकऱ्याला त्या वस्तूंची जास्तीत जास्त किंमत हवी असते. हा तर ढोबळ स्वार्थ–संघर्ष झाला. याहून थोडा सूक्ष्म संघर्षही समाजात चालू आहे. शेतमजुराला आपली मजुरी अपुरी वाटते; परंतु तेवढीही मजुरी देणे शेतकऱ्याला–विशेषत: लहान शेतकऱ्याला परवडत नसल्यामुळे तो तिच्यात कशी कपात करावयाची, या विवंचनेत असतो. लहान शेतकऱ्याला गिळंकृत करून किंवा सर्व बाजूंनी त्याच्या नाड्या आवळून त्याला आपला गुलाम कसे बनविता येईल, याचे डावपेच आखण्यात बडा व बागाईतदार शेतकरी गढून गेलेला असतो. ज्यांचे स्वार्थ असे एकमेकांच्या विरोधी आहेत ते शेतकरी एक होणार कसे आणि वर्गयुद्ध छेडणार कसे ?

मध्यम वर्गाची त्रिशंकूची स्थिती

वर्गसंघर्षात किंवा वर्गयुद्धात नेतृत्व देण्याचे काम आजवर जगात सगळीकडेच सुशिक्षित, विचारवंत मध्यम वर्गाने केले आहे. परंतु भारतातील मध्यम वर्गात तेवढे त्राण उरलेले नाही. जातिभेदामुळे अन्य वर्गांचा मध्यम वर्गावर विश्वासही उरलेला नाही. शिवाय जीवघेणी महागाई आणि जीवनसंग्रामात टिकून राहण्यासाठी मध्यम वर्गाला करावी लागणारी आटापीट यांमुळे तो स्वत:च इतका हैराण झाला आहे की, जे–जे घडेल ते–ते पाहत राहावे, या व्यतिरिक्त आपल्याला काही करता येईल असा आत्मविश्वासच त्याच्या ठिकाणी उरलेला नाही. स्वार्थ आणि सुखलोलुपता यांनी या वर्गालाही पार पोखरून टाकले आहे. आमचे लेखक पत्रकार, बुद्धिवंत या सर्वांची पदोपदी दिसून येणारी लाचारी हे या वर्गाच्या पोकळपणाचे दृश्य प्रतीक आहे.

लष्करशाहीचा धोका

अशा या परिस्थितीत देशावर लष्करशाहीचे अधिराज्य होईल, अशी भीती

अनेकांना वाटते; आणि काही सुरक्षितताप्रिय विचारवंत असे प्रतिपादन करतात की, लष्करशाहीला शरण जाण्यापेक्षा हुकूमशाही हीच दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने अधिक स्वीकार्य समजावी. लष्करशाहीचा धोका वास्तवाला धरून असता तर विचाराची ही दिशा तर्कसंगत म्हणता आली असती; परंतु या देशातील लष्कराचे स्वरूप आणि देशाची भौगोलिक अवाढव्यता लक्षात घेतल्यास भारतीय लष्कराचे सर्वोच्च अधिकारी एक होऊन येथील सत्ता बळकावतील, असे समजण्यास काहीच आधार नाही. सर्वात प्रथम आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, आधुनिक भारतातील लष्कराची परंपरा ब्रिटिश सैन्याची, राजकारणातीत राहण्याची आहे. सुदैवाने अजूनही त्या परंपरेला धक्का लागलेला नाही. शिवाय वेगवेगळ्या भाषा बोलणारे, विभिन्न जातिधर्माचे, विविध पूर्वपीठिका असणारे आणि काही बाबतींत परस्पर विरोधी राजकीय विचार मनात बाळगणारे लष्करी अधिकारी एकत्र येऊन प्रचलित सरकार उलथून पाडतील, अशी मुळीच शक्यता नाही. म्हणून या देशात लष्करशाही प्रस्थापित होईल, अशी भीती बाळगण्याचे मुळीच कारण नाही.

भारतीय समाजाप्रमाणे भारतीय सैन्याचेही एक बलस्थान आहे, ते असे की, परचक्र आले असता येथील लोक आपसातील मतभेद विसरून एखाद्या भक्कम खडकाप्रमाणे एकजूट करतात. (हे परिवर्तनही अगदी अलीकडील, देशाच्या एकत्वाची कल्पना रुजल्यानंतर घडून आलेले आहे !) त्या प्रमाणेच देशावर हल्ला झाल्यास तीन्ही दलातील सैनिक व अधिकारी एकजुटीने व निर्धाराने त्याचा मुकाबला करतात, असे चीन-पाकिस्तानशी झालेल्या युद्धांच्या अनुभवांवरून म्हणता येते. त्यामुळे सैन्यात बेदिली माजविण्याचा किंवा देशातील अराजकाचा गैरफायदा घेण्याचा स्वकीय अथवा परकीय शक्तींनी घाट घातल्यास आमचे सैनिक तो निश्चितच हाणून पाडतील.

अराजक माजेल काय ?

राहता राहिला पर्याय अराजकाचा. या देशातील विचारवंतांना सर्वात अधिक भीती या पर्यायाची वाटते. या देशाचा इतिहास लक्षात घेतल्यास इंग्रजी सत्तेतील राजकीय स्थैर्याचा, सुमारे शंभर वर्षांचा मधला काळ वगळता या देशात नेहमीच अराजकाची किंवा अराजकसदृश स्थिती राहिली आहे, असे आढळून येईल. स्वातंत्र्योत्तर काळातही पहिली वीस-पंचवीस वर्षे काहीशी स्थैर्याची, प्रगतीच्या आभासाची गेली; परंतु नंतरच्या काळात ते स्थैर्य नष्ट झाले आणि अराजकाने प्रथम चोर पावलांनी व नंतर राजरोसपणे या देशात पुन्हा पदार्पण केले. आज या देशात कुणाचे राज्य चालू आहे ? काळाबाजारवाले, साठेबाज, सट्टेबाज, स्मगलर यांच्या हातची कळसूत्री बाहुली असल्याप्रमाणे कारभार करणारे मंत्री,

आणि त्यांच्या आश्रयाने धुमाकूळ घालणारे गुंडपुंड यांचेच तर आज राज्य चालले आहे. याला राज्य म्हणण्यापेक्षा अराजक म्हणणे सत्याला अधिक धरून होईल. आता प्रश्न असा निर्माण होतो की, भारतीय जनता हे अराजक का सहन करते ? याचे उत्तर अगदी साधे, सोपे आहे. भारतीय जनतेला अराजकाचीच सवय आहे. अंधारकोठडीत आजन्म राहिलेल्या व्यक्तीला बाहेर काढले तर मुक्त हवेत तिला गुदमरल्यासारखे होते; आणि सूर्यप्रकाशाने तिचे डोळेच दिपून जातात. अनेक वर्षांच्या काँग्रेस राजवटीनंतर जेव्हा भारतात जनता पक्षाची मुक्त राजवट सुरू झाली तेव्हा येथील जनता अशीच भांबावली; आणि पहिली संधी मिळताच तिने आपल्या सवयीची काँग्रेस राजवट पुन्हा आणली. या राजवटीतील भ्रष्टाचार, अत्याचार, स्वैराचार यातच जनतेला आनंद वाटतो. तेव्हा यापेक्षा वेगळे अराजक ते कोणते येणार ?

काहीही न घडणारा देश !

जगामध्ये इतिहासापासून काहीही धडा घेण्याचे नाकारणारा जर कोणता समाज असेल तर तो भारतीय समाज होय. त्यामुळे भारतीय माणूस विसाव्या शतकात जगत असला तरी, त्यांचे मन अजून सोळाव्या-अठराव्या शतकातच वावरत असते. त्याच्या मनाला येईल त्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची अद्‌भुत कला साधली आहे. म्हणूनच ते सध्याच्या जुलूमशाहीविरुद्ध पेटून उठत नाही. असे विझलेले मन कसला वर्गसंघर्ष करणार ? जेव्हा अन्याय–अत्याचार पराकोटीला पोहोचतो, असह्य होतो तेव्हा भारतीय मनात क्षणकाल धुगधुगी निर्माण होते; आणि जाग्या झालेल्या नागाप्रमाणे ते आपला फणा उभारते. तेवढ्याने काम भागते. अन्याय-अत्याचारांना काही काळ पायबंद बसतो. भारतीय मन पुन्हा झोपी जाते. अन्याय-अत्याचार पुन्हा डोके वर काढू लागतात. असे हे चक्र चालू असते. एकसंध भारतीय समाजाची उभारणी होईपर्यंत हे चक्र असेच चालत राहणार. त्यामध्ये फार मोठ्या उलाढालींना, संघर्षांना स्थान नाही. सामर्थ्यवान भारतीय समाजाच्या निर्मितीचे काम काही मंडळी धिमेपणाने, सातत्याने, जिद्दीने करीत आहेत. आज त्यांची टिंगल उडविली जाते किंवा त्यांच्यावर जातीयवादाचा शिक्का मारून त्यांना दडपून टाकण्याचा प्रयत्न केला जातो; परंतु ती एक शुभ शक्ती आहे. ती अशी दडपली जाणार नाही. अर्थात तिचा प्रभाव दिसू लागण्यास बराच काळ जाईल. तोपर्यंत आजची अराजकसदृश परिस्थिती कमीजास्त प्रमाणात अशीच चालत राहील. त्यामुळे भयभीत अथवा निराश होण्याचे काहीच कारण दिसत नाही.

✦ ✦

'इंद्रधनु' : दिवाळी ८१

६. धर्मांतरासंबंधी कर्नाटकातील दलितांशी चर्चा

विश्रांतीसाठी म्हैसूरला आमच्या कन्येकडे एक महिनाभर जाऊन राहयचं जेव्हा निश्चित झालं, तेव्हा तिथल्या मुक्कामात कन्नड दलित लेखकांशी व कार्यकर्त्यांशी धर्मांतरासंबंधी चर्चा करणं, हा एक कार्यक्रम मी मनाशी योजिला होता. सुदैवानं त्यात मला पुष्कळच सफलता मिळाली. दक्षिण भारतात धर्मांतराच्या प्रश्नानं उग्र स्वरूप धारण केल्याचं वृत्तपत्रांतून आपण वाचतो तेव्हा हे धर्मांतर फक्त तामिळनाडूतच थोडयाफार प्रमाणात घडून आलं असून केरळ, कर्नाटक व आंध्र या तीन राज्यांत त्याचा काहीच परिणाम झालेला नाही, हे बहुधा आपल्याला माहीत नसतं. असं का घडलं, याची कारणं प्रत्येक राज्यागणिक वेगवेगळी आहेत. उदाहरणार्थं केरळमध्ये नारायण गुरू या दलित-समाजसुधारकानं इळवा या मागस जमातीमध्ये समतेच्या व अध्यात्मिक विचारांबरोबरच शिक्षणप्रसारावरही इतका भर दिला की, एक-दोन पिढ्यांच्या कालावधीतच ती जमात पुढारलेल्या समाजाच्या बरोबरीला येऊन पोहोचली. दुसरी एक मजेदार गोष्ट नुकतीच समजली. शबरीमलै या केरळमधील एका उंच टेकडीवर अय्यप्पा या देवाचं स्थान आहे. हे फार जागृत देवस्थान समजलं जातं. त्याचं वैशिष्ट्य असं की, तिथं सामाजिक विषमता व जातीय भेदभाव मुळीच पाळला जात नाही. कोणत्याही धर्माची, जातीची, जमातीची व्यक्ती अय्यप्पाची भक्त बनू शकते; आणि तिनं एकदा त्या पंथाची दीक्षा घेतली की, ती त्या समुदायात मोकळेपणानं मिसळू शकते. अनेक हरिजन, विशेषत: भंगीलोक अय्यप्पाचे भक्त बनून शबरीमलैला जातात. त्यांना आपोआपच सामाजिक प्रतिष्ठा लाभते. त्यामुळं धर्मांतराचा विचार त्यांच्या मनात येत नाही.

लोकप्रिय गायक श्री येशुदास यांनी अय्यप्पाची भक्ती केली, त्याच्या स्तुतिपर गीतं गायिली, म्हणून ख्रिस्ती पाद्र्यांनी त्यांच्या मुलाला बाप्तिस्मा देण्याचं नाकारलं. परंतु तरीही येशुदासांनी अय्यप्पाची उपासना सोडली नाही. यावरून त्याचा प्रभाव किती जबरदस्त असेल, याची सहज कल्पना येते. तिसरंही एक कारण आहे. केरळमध्ये साम्यवादी सरकार अधिकारावर आल्यापासून त्यानं अस्पृश्यतेचा नायनाट करण्याचा जणू चंगच बांधला होता. त्यामुळं केरळच्या हरिजनांमध्ये इतका आत्मविश्वास निर्माण झाला आहे की, भारतातल्या सगळ्या हरिजनांनी धर्मांतर केलं तरी ते धर्मांतर करायला तयार होणार नाहीत, असं एका जाणकार मित्रानं मला सांगितलं. कर्नाटकात थोडी वेगळी परिस्थिती आहे. तिथल्या हरिजनांमध्ये एकूण जागृतीच कमी आहे. शिक्षणाचं प्रमाणही कमी आहे. त्यामुळं धर्मांतरानं आपल्या परिस्थितीत काही फरक पडेल असं त्यांना वाटत नाही. मीनाक्षीपुरम्च्या धर्मांतरप्रकरणाचा कर्नाटकात उलटाच परिणाम घडून आला. पेजावर (उडुपी) मठाचे स्वामी, धर्मस्थळ या देवस्थानचे प्रमुख श्री वीरेंद्र हेगडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू एकता वेदिके, नागरिक सेवा समिती, हिंदू भ्रातृत्व वेदिके, हिंदू रक्षा समिती, विश्व हिंदू परिषद या सर्वांनी मिळून हरिजन-ख्रिश्चनांना पुन्हा हिंदू करून घेण्याचा चंग बांधला; आणि १९८१ च्या गांधी जयंतीपासून आत्तापर्यंत एक हजाराहून अधिक किरिस्तावांना हिंदू करून घेतलं. हे नुसतं बेलतंगडी तालुक्यातलं (दक्षिण कन्नड जिल्हा) काम झालं. दक्षिण कन्नड जिल्ह्यात अशा दलित ख्रिश्चनांची फार मोठी संख्या आहे. ख्रिस्ती धर्मात वर्षानुवर्षं राहिल्यानंतरही आपली अस्पृश्यता जात नाही, आपली आर्थिक स्थिती सुधारत नाही, हे पाहून त्यांनी पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश करण्याचं ठरवलं. अर्थात् मीनाक्षीपुरम्च्या धर्मांतराचा धक्का (शॉक) हिंदू समाजाला बसला नसता तर या ख्रिस्ती हरिजनांना आपल्या मूळ धर्मात परत येण्याची व आणण्याची प्रेरणा कोणाला झाली असती की नाही याविषयी शंकाच आहे. ख्रिस्ती किंवा मुस्लिम धर्मातून हिंदू धर्मात परत येणाऱ्यांची जात कोणती समजायची ? या प्रश्नाचं मजेदार उत्तर या नव-धर्मांतरितांपैकी एकानं दिलं. इंबेत्तू या गावचा चोमा नावाचा हरिजन म्हणतो, " आमचे बापजादे हरिजन होते, तेव्हा आम्हीही हरिजनच राहू इच्छितो." आता बोला ! ज्या प्रदेशात पुनर्धर्मांतर करून हिंदू धर्मात येणारे लोक आपल्या मूळच्याच जातीत राहू इच्छितात तिथं धर्मांतराची हवा कशी पसरणार ?

सुशिक्षित हरिजनांतील विचारमंथन

अर्थात ही झाली अशिक्षित अस्पृश्यांची स्थिती. सुशिक्षित अस्पृश्य इतके भोळेभाबडे नाहीत. समाजव्यवस्थेतील आपली दयनीय स्थिती नाहीशी करून

इतरांच्या बरोबरीचं स्थान मिळवण्यासाठी धर्मांतराचा उपयोग होणार असेल तर ते करण्यास त्यांची मुळीच हरकत नाही; परंतु अजूनपर्यंत त्यांचा निर्णय झालेला नाही. कन्नड भाषेतील सर्वश्रेष्ठ दलित साहित्यिक श्री देवनूर महादेव यांनाच मी याबाबतीत विचारलं. मराठीत 'बलुतं' लिहिणारे श्री दया पवार यांना एक लाख रुपयांची फोर्ड फाउंडेशनची जी देणगी मिळाली आहे, तीच श्री देवनूर महादेव यांना देऊ करण्यात आली होती; परंतु त्यांना तिच्यात अमेरिकन गुप्तहेर संघटनेचा (सी. आय. ए.चा) वास आला आणि आपण हा पैसा घेतला तर दलित समाजापासून आपण दूर फेकले जाऊ या कल्पनेने त्यांनी ती देणगी नाकारली. मग ती देणगी 'उपरा'चे लेखक श्री लक्ष्मण माने यांना देण्यात आली. या पार्श्वभूमीवरून श्री महादेव हे केवढे बाणेदार लेखक आहेत याची कल्पना वाचकांना येऊ शकेल. त्यांनी धर्मांतराच्या प्रश्नाचा खूप गंभीरपणे विचार केला आहे. माझ्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, "धर्मांतरानं काही साध्य होईल, असं मला वाटत नाही. किंबहुना त्याबाबतीत माझाच काही निर्णय होत नाही. त्यामुळं इतरांनी धर्मांतर करावं असं मी कसं सांगणार? डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचाही फारसा परिणाम झालाय, असं मला दिसत नाही. कर्नाटकात तर फारसे कुणी बौद्ध झालेच नाहीत. तरीपण ज्या गावात प्राणरक्षणाचा दुसरा काही उपाय नसेल, आपल्यावर होणारे अत्याचार त्यांना अथवा सरकारला थांबविता येत नसतील तर, त्यांनी अवश्य मुसलमान व्हावं, असं मी सांगेन. अर्थात इस्लामचा स्वीकार केल्यावर अत्याचारांना आळा बसेल अशी खात्री असेल तरच धर्मांतर करण्यात काही अर्थ."

दलित-संघर्ष-समितीतील मतभेद

मी त्यांना विचारलं, "तुमच्यासारखे पुरोगामी विचारांचे सुधारक हरिजन मुसलमान झाले तर त्या धर्मात सामाजिक सुधारणा घडून येण्यास मदत होईल असं तुम्हाला वाटत नाही काय?"

श्री महादेव हसून म्हणाले, "मी जेव्हा धर्मांतराचा विचार करतो, तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर असंख्य खोमेनी उभे राहतात. इस्लामचा स्वीकार केल्यावर मी सामाजिक समतेच्या किंवा स्त्री-स्वातंत्र्याच्या, स्त्रियांना पडद्यातून बाहेर काढण्याच्या गोष्टी बोलू लागलो, तर तत्क्षणी ते माझा खिमा केल्याशिवाय राहणार नाहीत."

राजकारणापासून अलिप्त असणारी दलित संघर्ष समिती या नावाची एक प्रबळ व लढाऊ संघटना कर्नाटकात कार्य करते. त्या संघटनेशी सहकार्य करणारे एक ब्राह्मण दलित लेखक श्री किक्केरी नारायण या विषयासंबंधी बोलताना म्हणाले, "इथल्या हरिजनांचा लढा नुसता वर्णीय नसून तो वर्गीयही आहे. अस्पृ-

श्यांतील उच्चवर्गीय लोक निम्नवर्गीय हरिजनांचे जे शोषण करतात ते फार भयंकर आहे. दलित संघर्ष समिती अशा हरिजनांविरुद्धही संघर्ष करीत असते. त्यामुळं केवळ धर्मांतर केल्यानं इथल्या हरिजनांचे प्रश्न सुटणार नाहीत. इस्लामचा स्वीकार केल्यावरही ते भूमिहीन मजूरच राहणार असून आजचंच दैन्यवाणं जीवन त्यांना जगावं लागणार आहे, हे दिसत असल्यामुळं धर्मांतराविषयी कुणाला फारसा उत्साह वाटत नाही. अर्थात् दलित संघर्ष समितीतल्या काही लोकांना असं वाटतं की, मुसलमान झाल्यावर आजच्याप्रमाणं दलितांवर अत्याचार करण्यास सवर्ण लोक धजावणार नाहीत. एक प्रकारे तो तात्कालिक व तात्पुरता का असेना, फायदाच होईल. तरीपण याबाबतीत कोणताही निर्णय घाईनं घ्यायचा नाही, असं त्यांनी ठरवलंय."

'ब्राह्मण दलित लेखक' असा उल्लेख मी वर केला आहे. त्याचा थोडा खुलासा केला पाहिजे. आपल्याकडे ज्याला दलित साहित्य असं म्हणतात त्याला कर्नाटकात 'बंडाया' साहित्य असं नाव आहे. बंडाया म्हणजे बंडखोर, विद्रोही. 'बंडाया' साहित्यिकांत सर्व जाती-जमातींच्या लेखकांचा समावेश होतो. श्री किक्केरी नारायण हे पदवीधर लेखक असून 'बंडाया साहित्य संघटना समिती' या राज्यव्यापी संस्थेच्या मैसूर जिल्हा शाखेचे संयोजक आहेत. या बंडाया समितीत इतरही जातींचे लोक असल्यामुळे कन्नड दलित साहित्यिकांची भूमिका काहीशी व्यापक व सर्वसमावेशक बनली आहे. श्री नारायण यांनी एक मजेदार गोष्ट सांगितली. ते म्हणाले, " दलितांच्या बरोबरीनं काम करायला ब्राह्मण तरुण जेवढ्या मोठ्या संख्येनं पुढं येतात, तेवढ्या प्रमाणात अब्राह्मण–लिंगायत, गौडा (वक्कळिग) वगैरे बहुजनसमाजाचे तरुण येत नाहीत. त्यामुळं इथल्या दलितांचा मुख्य राग ब्राह्मणांवर नसून अब्राह्मणांवरच विशेष आहे. कारण, हे अब्राह्मण जमीनदार असून भूमिहीन शेतमजूर असणाऱ्या अस्पृश्यांची खरी पिळवणूक तेच करतात. हरिजनांवर अत्याचार करणाऱ्यांमध्येही त्यांचाच भरणा अधिक असतो. ब्राह्मण लोक तसल्या भानगडीत पडत नाहीत."

दलित संघर्ष समितीचे दोन हरिजन तरुण कार्यकर्ते मला भेटायला आले होते. त्यांच्यापैकी एकाचं नाव वरदैया असं असून तो एम. ए.च्या शेवटच्या वर्षाला आहे. दुसऱ्याचं नाव आर. एस. दोड्डण्णा असं असून तो सध्या बी.एड. व एल्.एल्. बी. करीत आहे. त्यांना जेव्हा मी धर्मांतरासंबंधी विचारलं तेव्हा ते म्हणाले, " आमचे प्रश्न धर्मांतरानं कसे सुटतील तेच आम्हाला कळत नाही. आम्हाला शेती हवी, नोकऱ्या हव्यात. धर्मांतरानं त्या आम्हाला कशा मिळतील ? उलट धर्मांतरानंतर आम्हाला राखीव जागांच्या आणि इतर सवलतींना मुकावं लागेल; आणि दलित, मागस, दरिद्री मुसलमान म्हणून जगावं लागेल. तसला खुळेपणा कुणी करील

3097

असं आम्हाला वाटत नाही.'

हरिजन विचारवंताचा परखड अभिप्राय

या संबंधात डॉ. लक्ष्मीनारायण या हरिजन विचारवंतांशी झालेली चर्चा सर्वांत अधिक बोधप्रद ठरली. डॉ. लक्ष्मीनारायण हे प्रखर बुद्धिवंत आणि डॉ. आंबेडकरांच्या जीवनाचा व विचारांचा बुद्धिनिष्ठ दृष्टिकोणातून अभ्यास केलेले भारतातील एक अग्रगण्य दलित युवक आहेत, याची मला माहिती होती. ते सरकारी नोकरीत असून खाजगी वैद्यकीय व्यवसायही करतात. (कर्नाटकात तशी परवानगी आहे.) आपला व्यवसाय सांभाळून अस्पृश्यांच्या उत्थानासाठी ते प्रयत्नशील असतात. मैसूरमधील सरस्वतीपुरम् या उपनगराजवळील कुकरहळ्ळी या खेडचात त्यांनी लोकजागृतीचं चांगलं काम चालविलं आहे. रस्त्यावर नाटक करणारा एक छोटा गट ही (ट्रुप) त्यांनी तयार केला आहे. त्या नाटकाच्या द्वारे लोकजागृतीचं काम ते करतात. हेच काम करणारी 'जनकलारंग' नावाची एक स्वतंत्र संस्थाही असून तिच्यात दलित व दलितेतर लेखक व कार्यकर्ते काम करतात. तिच्याशी व दलित संघर्ष समिती, बंडाया साहित्य संघटना समिती वगैरे संघटनांशी त्यांचा प्रत्यक्ष काही संबंध नाही. मात्र त्या सर्वांच्या कामात त्यांना रस असून त्यांच्याविषयी ते सहानुभूती बाळगतात व त्यांना वेळोवेळी मदत करतात; परंतु दलितोद्धाराच्या कार्याला त्यांची खरी देणगी, (कॉंट्रिब्यूशन) वैचारिक स्वरूपाची आहे. मैसूरला गेल्यापासून त्यांना भेटण्याचा मी प्रयत्न करीत होतो. परंतु ते खूप दूर राहत असल्यामुळे ते शक्य होत नव्हतं. अखेर तेथून निघण्याच्या दिवशी श्री. किक्केरी नारायण त्यांना घेऊन माझ्या मुलीच्या घरी आले. त्यामुळं त्यांच्याशी चांगली मनमोकळी चर्चा होऊ शकली. डॉ. आंबेडकरांच्या जीवनासंबंधी व विचारांसंबंधी संपूर्ण आदर बाळगूनही, इतक्या धीटपणानं बोलणारा, लिहिणारा दुसरा लेखक मला तरी आढळला नाही.

मार्क्स विरुद्ध आंबेडकर

डॉ. लक्ष्मीनारायण यांच्या विवेचनातून अशा अनेक पैलूंवर प्रकाश पडला की, ज्यांचा विचार माझ्याही मनात कधी आला नव्हता. उदाहरणार्थ ते म्हणाले, "जिथं मार्क्सवादी, डावी विचारसरणी प्रभावी ठरली आहे, तिथं आंबेडकरांना अथवा त्यांच्या विचारांना मुळीच शिरकाव करता आलेला नाही. पश्चिम बंगाल, केरळ आणि आंध्रचा तेलंगण प्रदेश यांमध्ये बाबासाहेबांचा जयजयकार करणारे दलित तुम्हाला मुळीच आढळणार नाहीत. कारण, तिथल्या मार्क्सवाद्यांनी त्यांचे प्रश्न हातात घेऊन सोडविण्याचा चंगच बांधला आहे. मार्क्सपुढं आंबेडकरांचा टिकाव

लागत नाही, परंतु जिथं मार्क्सवाद्यांचा प्रभाव क्षीण आहे, तिथं मात्र दलितांना आंबेडकर हेच आपले एकमेव त्राते वाटतात."

आंबेडकरांच्या नावाचा सोईस्कर वापर

डॉ. लक्ष्मीनारायण यांनी आणखी एक मार्मिक मुद्दा सांगितला. ते म्हणाले, " जिवंत आंबेडकरांपेक्षा दिवंगत आंबेडकर हे अधिक प्रभावी व व्यापक ठरले आहेत. जिवंतपणी ज्यांनी त्यांना विरोध केला, तेच त्यांच्या निधनानंतर त्यांचा जयजयकार करू लागले. काँग्रेसवाल्यांशी आंबेडकरांचं कधीच जमलं नाही. त्यांनी नेहमीच आंबेडकरांच्या नेतृत्वाला कसून विरोध केला; परंतु आता आंबेडकरांचा उदोउदो करण्यात काँग्रेसवालेच सर्वांत आघाडीवर आहेत. तीच गोष्ट सरकारची. केंद्रीय व राज्य सरकारं अस्पृश्यांसाठी फारसं काही करीत नाहीत; परंतु आंबेडकरांना आधुनिक मनू बनवून त्यांच्या जयंती-मयंतीच्या सुट्या ती देऊ लागली आहेत. सरकारी संतांप्रमाणेच हे सरकारी मनू ! इतर राजकारणी लोक व पक्षही हरिजनांची मतं मिळविण्यासाठी आंबेडकरांची वारेमाप स्तुती करीत असतात. दलित युवकांना कुणीतरी एक हीरो हवा असतो. तसा हीरो त्यांना आंबेडकरांच्या रूपानं मिळाला आहे. त्यामुळं ते स्वतः मार्क्सवादी असले तरी, आंबेडकरांच्या जयजयकारात हिरीरीनं सामील होतात. अशा प्रकारे आजकाल आंबेडकर ही सर्वांच्याच दृष्टीने स्वार्थ साधण्यात मदत करणारी कामधेनू बनली आहे."

आंबेडकरांच्या लोकप्रियतेचं रहस्य

" आंबेडकरांच्या लोकप्रियतेचं कारण काय आहे, असं तुम्हाला वाटतं ?" मी डॉ. लक्ष्मीनारायण यांना विचारलं.

ते म्हणाले, " आजच्या लोकप्रियतेचं कारण अगदी सोपं, उघड आहे. दलित जनतेच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोहोचायचं तेवढं एकमेव साधन सध्या उपलब्ध आहे. त्यामुळं सर्वच लोक त्याचा वापर करतात; परंतु मुळातच आंबेडकरांना लोकप्रियता का लाभली, हा खरा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. प्रथम आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की, आंबेडकर हे क्रांतिकारक नव्हते. ते उदारमतवादी, सनदशीर मार्गानं जाऊ इच्छिणारे समाजसुधारक होते. त्यांनी राजकारण केलं त्यातही त्यांची हीच भूमिका होती. चवदार तळ्याचा किंवा काळा राम मंदिरातला सत्याग्रह हा त्यांच्या प्रारंभिक जीवनातला एक प्रयोग होता. सामाजिक समता प्रस्थापित करण्यास त्याचा काही उपयोग होत नाही, असं दिसून आल्यावर त्यांनी त्या मार्गाला कायमची सोडचिठ्ठी दिली आणि आपल्याला जे काही मिळवायचं आहे ते ब्रिटिश सरकारला खुष ठेवून अर्ज–विनंत्या करूनच मिळवावं लागेल, हे

त्यांनी ओळखलं; म्हणून त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध कधीच विरोधाची भूमिका घेतली नाही. त्यामुळं सत्याग्रह, तुरुंगभरती वगैरे गोष्टी आपोआपच रद्द झाल्या. त्यांची अशी भूमिका बनण्याचं कारणही समजून घेतलं पाहिजे. खरोखरी आंबेडकर हे भक्तिमार्गी परंपरेचे वारसदार होते. चोखामेळा, कबीर, फुले यांच्याविषयी त्यांना वाटणारं आकर्षण हे त्या परंपरेमुळं होतं. ते कधीच नास्तिक नव्हते. या परंपरेचा वारसा जपणारा माणूस कधीच क्रांतिकारक बनू शकत नाही. ते इंग्लंड अमेरिकेत असताना त्यांनी गदर पार्टीत यावं, क्रांतिकारकांमध्ये सामिल व्हावं, म्हणून खूप प्रयत्न झाले; परंतु पाश्चात्त्य उदारमतवादानं ते इतके भारले गेले होते की, त्यांना क्रांतिकारक मार्गाचं आकर्षणच वाटलं नाही. उदारमतवाद, सनदशीर – घटनात्मक मार्ग हे सारं त्यांच्या भक्तिपंथी प्रवृत्तीला अनुकूल, मानवणारं होतं. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला, याचं कारणही त्यांची ही परंपराप्राप्त प्रवृत्तीच होती. बुद्धानं सामाजिक समता मान्य केली होती; पण तोही फार मोठा क्रांतिकारक होता असं म्हणता येत नाही. दलित, अस्पृश्य वर्गांना चुचकारण्याचा प्रयत्न या देशात नेहमीच अधूनमधून होत आला आहे. बौद्ध, लिंगायत, जैन, शीख या पंथांच्या इतिहासावरून ते दिसून येतं. किंबहुना वैदिक धर्माचे पुरस्कर्ते रामानुजम् वगैरे आचार्यांनीही तसा प्रयत्न केला होता, ही गोष्ट अनेक मंदिरांमध्ये हरिजनांना वर्षातून अमूक दिवशी प्रवेश दिला जावा, अशा ज्या प्रथा त्यांनी सुरू केल्या त्यांवरून दिसून येतं. इथून जवळच मेलकोटे या गावी असं एक मंदिर असून तिथं हरिजनांना वर्षातून दोनदा मुक्त प्रवेश दिला जातो. याचा अर्थ एवढाच की, पददलितांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न यापूर्वीही अनेक धर्माचार्यांकडून होत आला आहे."

महार पलटणीचा प्रभाव

सनदशीर राजकारणाकडे आंबेडकरांचा ओढा असण्यास त्यांची भक्तिमार्गी परंपरा हे जसं एक महत्त्वाचं कारण होतं, तसंच महार जातीत जन्म होणं हेही एक कारण होतं, असं जेव्हा डॉ. लक्ष्मीनारायण यांनी मला सांगितलं तेव्हा मला थोडं आश्चर्य वाटलं. मी त्यांना विचारलं, "हे विधान तुम्ही कोणत्या आधारावर करता?" त्यावर डॉ. लक्ष्मीनारायण म्हणाले, "तुम्हाला कदाचित माहीत नसेल की, भारतीयांच्या जातीय धार्मिक श्रद्धा व रूढी यामध्ये हस्तक्षेप करायचा नाही, असं जेव्हा ब्रिटिश सरकारनं १८५७ च्या बंडाच्या अनुभवानंतर ठरवलं, तेव्हा त्यांनी महार पलटण बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी महारांनी व्हिक्टोरिया राणीला अर्ज करून ती पलटण चालू ठेवण्याची विनंती केली होती. याचा अर्थ असा की, घटनात्मक, सनदशीर मार्गानं जाऊन लोकशाही पद्धतीनं

आपल्यावरील अन्यायाचं निवारण किंवा निराकरण करून घेण्याचं शिक्षण महार जमातीला मिळालं होतं. त्याचेच संस्कार आंबेडकरांवर झाले; आणि ब्रिटिशांच्या मदतीनं आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाचं निराकरण करून घेता येईल असा विश्वास त्यांच्या मनात उत्पन्न झाला. त्यामुळं ब्रिटिशांविरुद्ध बंड करण्याची कल्पना त्यांना कधी मानवली नाही."

क्रांतिकारक व नपुंसक उदारमतवाद

उदारमतवादाची जी फोड डॉ. लक्ष्मीनारायण यांनी केली ती मला खूपच नवीन वाटली. ते म्हणाले, " उदारमतवादातही अनेक छटा आहेत. उदारमतवाद हा क्रांतिकारकही असू शकतो. पाश्चात्त्य देशांत त्याचं हे रूप पाहायला मिळतं, त्याच्या या क्रांतिकारतेमुळं इंग्लंडसारख्या देशात तो प्रखर क्रांतिकारी मजूरपक्षाचाही पराभव करू शकला आहे. आंबेडकरांचा उदारमतवाद असा क्रांतिकारक नव्हता. तो काहीसा नपुंसक व क्षमाप्रार्थी (त्यांनी इंग्रजीत वापरलेले शब्द 'इंपोटंट' व 'अॅपॉलॉजेटिकल' असे होते !) होता. त्यामुळं त्यातून फार काही निष्पन्न झालं नाही."

" पण मग आता त्या मार्गानं जाण्यात काय फायदा ?" मी विचारलं.

"फायदा अवश्य आहे. आजचा आपला समाज अजून भांडवलशाही समाजही बनलेला नाही. अशा या 'प्रीकॅपिटॅलिस्ट' समाजात उदारमतवादी मूल्यांसाठी संघर्ष करणंही पुरोगामी असतं. आंबेडकराच्या नावानं दलित व दलितेतर एकत्र येतात. संघर्ष करीत राहण्याची प्रेरणा त्यांना मिळते. परिणामत: दलितांची चळवळ लोकशाही मार्गानं चालू लागेल. दलित केवळ आपल्याच सामर्थ्यावर फार काही करू शकतील, असं मला वाटत नाही. त्यांना इतर समविचारी सवर्णांचं सहकार्य घ्यावंच लागेल. मात्र जागृत दलित ही एक प्रबळ शक्ती (पॉवरफूल फोर्स) बनू शकेल. तसं झाल्यास त्याच्यावर अन्याय–अत्याचार करण्याची हिंमत कुणाला होणार नाही."

जातिविरोधी चळवळीत पोट जातींचा प्रभाव

डॉ. लक्ष्मीनारायण यांनी जातिविरोधी चळवळीची केलेली चिकित्सा मला काहीशी अभिनव वाटली. ते म्हणाले, " जातिविरोधी चळवळ सुरू करणारी व्यक्ती आपली पोटजात विसरू शकत नाही. (एनी कास्ट मुव्हमेंट कॅनॉट अव्हॉइड सबकास्ट कॉन्शसनेस) आंबेडकरांनी अस्पृश्यतेविरुद्ध आंदोलन सुरू केलं खरं; परंतु त्यांना आपल्या महार जातीचा विसर पाडता आला नाही. त्यामुळं त्यांच्या प्रमुख मागण्या महारवतनं नष्ट करणं वगैरे महारजातीशी संबंधितच राहिल्या. परिणामत: मांग,

चांभार, हे त्यांच्या आंदोलनापासून दूर राहिले. आपल्या उद्धाराचा मार्ग त्यांना त्यात दिसला नाही. म्हणून ते काँग्रेसमध्ये सामील झाले; आणि आंबेडकरांची चळवळ प्रामुख्यानं महारांपर्यंत मर्यादित राहिली. त्यामुळं आंबेडकर हे महारांचे पुढारी असं समीकरण तयार झालं. बाबासाहेबांच्या निधनानंतर इतर अस्पृश्य जमातींनी त्याच्या लिखाणाचं अध्ययन सुरू केलं. तेव्हा त्यातला पुष्कळसा भाग आपल्याही उपयोगी पडणार असल्याचं त्यांच्या लक्षात आलं; त्यामुळं दिवसेंदिवस आंबेडकरांची लोकप्रियता वाढत गेली; आणि ती यापुढंही वाढतच जाणार. कारण आंबेडकर हे अत्यंत कुशाग्र बुद्धीचे पुढारी होते. एखाद्या विषयाच्या गाभ्यापर्यंत जाऊन पोहोचण्याचं बौद्धिक सामर्थ्य आणि क्षमता त्यांच्यामध्ये होती, तिचं प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात पडलेलं आढळतं. त्यामुळं दलितांप्रमाणंच दलितेतर विचारवंतांच्या बुद्धीलाही चांगलं खाद्य आणि आव्हान आंबेडकरांच्या लिखाणामुळं मिळतं."

दलितांमधील बौद्धिक दारिद्र्य

या संदर्भात प्रचलित दलित साहित्य, दलित लेखक व दलित नेते यांच्याविषयी डॉ. लक्ष्मीनारायण यांनी एक विदारक सत्य निर्भयपणे सांगून टाकलं. ते म्हणाले, " माझी खरी व्यथा वेगळीच आहे. आजकालच्या दलितांमधलं बौद्धिक दारिद्र्य हीच त्यांच्या मार्गातली सर्वात मोठी धोंड आहे. आजकाल दलित साहित्याच्या नावाखाली जे काही लिहिलं जातं त्यातून बुद्धिमत्तेची चुणूक क्वचितच दिसून येते. दलितांची दयनीय स्थिती वर्णन करणारं कथा-कविता-कादंबरी-नाटकासारखं ललित साहित्य लिहिणं फार सोपं आहे. फक्त आपला अनुभव त्यात मांडायचा असतो. त्या साहित्यात बुद्धीपेक्षा भावनेलाच अधिक आवाहन असतं. परंतु दलितांच्या व एकूण समाजाच्या समस्यांसंबंधी बुद्धीला आवाहन करणारं, सखोल लिखाण कोण करतो ? आंबेडकरांचा जयजयकार करणं फार सोपं आहे; परंतु त्यांनी मांडलेल्या विचारांची चिरफाड करून ते बुद्धीच्या निकषावर कसून पाहणं, हे फार अवघड आहे. ते करायला कुणीच तयार होत नाही. यापुढं जे लोक दलितांच्या समस्या घेऊन त्या सोडवण्यासाठी जनतेत जातील त्यांना आंबेडकरांचं लिखाण वेदवाक्य मानून काहीच काम करता येणार नाही. नव्या परिस्थितीच्या संदर्भात त्यांना नवे मार्ग शोधावे लागतील. त्यासाठी आंबेडकरांचा विचार पायाभूत म्हणून त्यांच्या उपयोगी पडू शकेल; परंतु या विचारांचं निर्ममपणे विश्लेषण करून त्यातला कालबाह्य भाग काढून टाकावा लागेल. त्यांचे सगळेच विचार शिरसावंद्य मानणाऱ्याला पुढची वाट दिसणार नाही."

या संदर्भात श्री देवनूर महादेव यांच्या एका विधानाचं मला स्मरण झालं. ते म्हणाले होते, " आंबेडकरांचे सगळेच विचार आम्हाला ग्राह्य वाटत नाहीत.

विशेषतः धर्मासंबंधीचं त्यांचं चिंतन आजच्या परिस्थितीशी अगदीच विसंगत आणि कालबाह्य ठरलं आहे, असं आम्ही मानतो. परंतु जातींची उत्पत्ती कशी झाली, शूद्र कोण आहेत वगैरे विषयांसंबंधी त्यांनी मांडलेले विचार आजही आम्हाला चिंतनीय वाटतात."

धर्माची जोरदार पकड

हा प्रश्न निघाल्यावर मी डॉ. लक्ष्मीनारायण यांना विचारलं, " येत्या काही वर्षांत अस्पृश्यता नष्ट होऊन हिंदू समाज अधिक एकसंध बनेल, असं तुम्हाला वाटत नाही काय ? " त्यावर ते म्हणाले, " तसं मला वाटत नाही. धर्माचा पगडा माणसावर एवढा जबरदस्त असतो की, त्यातून मुक्त होणं जवळजवळ अशक्य असतं आणि आपल्या देशात तर प्रत्येक जात हाच स्वतंत्र धर्म झाला आहे. त्यामुळं जातीच्या विळख्यातूनही लोक बाहेर पडतील असं मला वाटत नाही. खरं म्हणजे लोकांची तक्रार जातिभेदाविरुद्ध मुळीच नाही. जातीमुळं त्यांना जो सामाजिक विषमतेचा काच सोसावा लागतो त्याविरुद्ध त्यांची तक्रार असते. हा काच नाहीसा झाला, किंबहुना सुसह्य झाला, तर लोक जातिभेदाविरुद्ध लढायचं बंदच करून टाकतील. केरळमध्ये नारायण गुरूंनी हा काच कमी करण्यास मदत केली. त्यामुळं तिथला जातीय संघर्ष मंद पडला. तीच गोष्ट अय्याप्पा चळवळीच्या बाबतीत घडली आहे; आणि आजही घडत आहे. अय्याप्पाचे सारे भक्त जातपात विसरून एकत्र येतात, जेवणखाणं करतात आणि सामाजिक एकतेचा अनुभव घेतात. त्या दिवसांत ते फार कडक व्रतनियम पाळतात. त्यामुळं आपण वरच्या वर्गात गेल्याचा अनुभव त्यांना येतो. आजकाल कर्नाटकातले हरिजनही फार मोठ्या संख्येनं अय्याप्पा पंथात सामील होत आहेत. त्यांना त्यातून एक प्रकारचं मानसिक समाधान मिळतं. या पंथात सामील होणारे सारेच अशिक्षित, अडाणी, दरिद्री असतात असं समजू नका. त्यांत सुशिक्षित, उच्चवर्गीय व उच्चवर्णीय लोकही फार मोठ्या प्रमाणावर असतात. त्या पंथात सामील झाल्यामुळं ज्या वर्णीय, वर्गीय समानतेची अनुभूती त्यांना लाभते ती फार मोलाची आहे. अशा अनुभूतीची गोडी एकदा लागली की, मग सामाजिक विषमतेचा ताप सुसह्य होऊ लागतो. नेहमीच्या बुवाबाजीपेक्षा हा प्रकार अगदी वेगळा आहे, हे तुम्ही लक्षात घेतलं पाहिजे. इथं कुणी कुणाला फसवीत नाही अथवा कुणी कुणाचं शोषण करीत नाही. प्रत्येकजण स्वेच्छेनं तपस्या करतो; आणि त्यातून आत्मिक संतोष मिळवतो."

डॉ. लक्ष्मीनारायण याचं हे विवेचन ऐकताना मला महाराष्ट्रातील वारकरी पंथाची आठवण झाली. या पंथानं ज्ञानेश्वर–तुकारामाच्या काळापासून दलित समाजाला एक प्रकारचं आश्वासन, समाधान मिळवून दिलं आहे. ते आश्वासन किंवा

समाधान खोटं होतं, दारूच्या नशेसारखं गुंगी आणणारं होतं, असं आमचे बुद्धिवादी आज सांगतात. त्यांचं म्हणणं खरंही असेल; पण ज्यावेळी हरिजनांना ते समाधान मिळालं त्यावेळी त्यांच्या दृष्टीनं ते खरंच होतं. आजही असंख्य अस्पृश्य लोक बुद्धिवाद्यांच्या आवाहनाकडे दुर्लक्ष करून पंढरपूरच्या वारीत सामील होताना दिसतात, याचा अर्थ तरी काय ? त्यांना हवं असलेलं समाधान बुद्धिवादातून किंवा धर्म नाकारण्यानं त्यांना मिळत नाही. ते त्यांना वारीत सामील झाल्यानंच मिळतं. अर्थात् यामुळं वर्गसंघर्षाची व वर्णसंघर्षाची धार बोथट होते, हे नाकारता येत नाही. परतु त्याला सध्या तरी काही इलाज दिसत नाही.

कर्नाटकात धर्मांतर होणार नाही

वस्तुतः धर्मांतरासंबंधीच मला प्रामुख्यानं डॉ. लक्ष्मीनारायण यांच्याशी बोलायचं होतं; परंतु चर्चेच्या ओघात तो विषय मागं पडला. म्हणून मग मी त्यांना विचारलं, " मीनाक्षीपुरम्च्या धर्मांतर प्रकरणाचे पडसाद कर्नाटकात कितपत पडले ? इथले हरिजन इस्लामचा स्वीकार करतील असं तुम्हाला वाटतं काय ?"

डॉ. लक्ष्मीनारायण उत्तरले, " कर्नाटकात, विशेषतः जुन्या मैसूर संस्थानात धर्मांतराला अनुकूल वातावरण मुळीच नाही. इथल्या हरिजनांची आर्थिक स्थिती अगदीच वाईट आहे, असं म्हणता येणार नाही. त्यांच्यापैकी अनेकांजवळ स्वतःच्या मालकीच्या जमिनी आहेत. त्यांना जुन्या संस्थानी राजवटीत काही हक्कही मिळालेले आहेत. विशेष सवलती, राखीव जागा वगैरेंचा उपयोग करून घेऊन बरेच हरिजन शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील झाले आहेत. त्यांना व त्यांच्यामुळं इतर हरिजनांनाही समाजात प्रतिष्ठेचं स्थान मिळालं आहे; त्यामुळं त्यांना धर्मांतराची गरज वाटत नाही. सरकारी नोकऱ्यांतही संस्थानी काळापासून हरिजनांना स्थान मिळत गेल्यानं त्यांची सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. अशा लोकांना धर्मांतराचं आकर्षण वाटत नाही.

" दुसरीही एक गोष्ट आहे. मैसूर संस्थानात स्वातंत्र्य आंदोलन नाव घेण्यासारखं झालंच नाही. संस्थानचे दिवाण पुरोगामी असल्यामुळं लोकांना त्या आंदोलनाची गरजच भासली नाही. इथला बहुजनसमाजही काहीसा सनातनी वृत्तीचा असल्यामुळं तामिळनाडूप्रमाणं इथं ब्राह्मणेतर-चळवळीनंही विशेष जोर पकडला नाही. या दोन महत्त्वाच्या चळवळींपासून हा भाग अलिप्त राहिल्यामुळं इथं कसल्याच पुरोगामी विचारानं मूळ धरलं नाही. मार्क्सवाद-समाजवादही इथं ब्रिटिश इलाख्याच्या मानानं फारच उशिरा पोहोचला. एकूण साराच समाज पुराणमतवादी, परंपरापूजक राहिला. कुणी कुणाला दडपण्याचा फारसा प्रयत्न केला नाही. त्यामुळं वर्णद्वेष, वर्गद्वेष असा इथं फारसा निर्माण झाला नाही.

तुमच्या महाराष्ट्रात हरिजनांवर जेवढे अत्याचार होतात, त्यामानानं इथं विशेष अत्याचार होत नाहीत. अशा स्थितीत त्यांना धर्मांतराची निकड न भासणं स्वाभाविकच आहे."

"या धर्मांतराच्या बाबतीत आणखी एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. ज्या भागात हरिजनांचे नेते धर्मांतराला अनुकूल असतात, तिथली अस्पृश्य जनता त्यांच्या आदेशाप्रमाणं धर्मांतर करते. ती स्वतः त्या बाबतीत फारसा विचार करीत नसते. महाराष्ट्रात आंबेडकेरांमुळं आणि नंतर त्यांच्या अनुयायांमुळं मुख्यतः महारांनी धर्मांतर केलं. तसं नेतृत्व कर्नाटकातल्या हरिजनांना कधी मिळालंच नाही. ज्याचा आदेश प्रमाण मानावा असा पुढारीच इथल्या हरिजनांना लाभलेला नाही. आता अस्पृश्य तरुणांनी वेगवेगळ्या संघटनांच्या द्वारे जनजागृती चालविली आहे. त्यांच्यापैकी बहुतेकांना धर्मांतराचा फोलपणा कळून चुकला आहे. त्यामुळं धर्मांतराऐवजी अधिक भरीव कार्यक्रम हाती घेऊन दलितांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न त्यांनी चालविले आहेत. त्यांत जसे काही विधायक प्रचारात्मक आहेत, तसे काही संघर्षाचेही आहेत. या कार्यक्रमांमुळं धर्मांतराचा विचार आपोआपच बाजूला पडला."

'मी आशावादी आहे'

"दलितांवरील अन्याय–अत्याचार, त्यांना विरोध करण्यातील त्यांचं दौर्बल्य, त्यांचं अज्ञान, देवभोळेपणा, गतानुगतिकत्व यामुळं तुम्हाला निराशा वाटत नाही का?" मी विचारलं.

"मुळीच नाही. माझ्या मते या देशाला खरा धोका धर्मांतराचा, सामाजिक-आर्थिक विषमतेचा किंवा वर्ग-वर्ण-संघर्षाचा नसून या देशातली लोकशाहीच नष्ट होईल की काय अशी भीती निर्माण झालीय. पंतप्रधानांपासून ग्रामपंचायतीच्या प्रमुखापर्यंत सर्वचजण भ्रष्टाचारात इतके लडबडले आहेत आणि आपल्या स्वार्थापायी लोकशाहीचीच नरडी दाबण्याच्या प्रयत्नात इतके गढून गेले आहेत, की त्या लोकशाहीला कसं जिवंत ठेवायचं हाच खरा प्रश्न आहे. सुदैवानं आज सबंध देशभर तरुणांच्या वेगवेगळ्या लोकशाहीवादी चळवळी चालल्या आहेत. त्या जनतेमध्ये लोकशाहीची निष्ठा निर्माण करतील; आणि सत्तापिपासू लोकांना लोकशाहीचा नाश करू देणार नाहीत, असा मला विश्वास वाटतो. अशा चळवळींना तुमच्या-आमच्या सारख्यांनी हातभार लावणं हे आपलं कर्तव्य समजलं पाहिजे. त्यातूनच दलितांच्या समस्या सुटण्याचा मार्ग निघू शकेल."

'गांधीवादाचा अभ्यास नाही'

"अस्पृश्यतानिवारण आणि दलितमुक्ती या बाबतीत गांधीजींच्या कार्यासंबंधी

तुमचं काय मत आहे?" मी विचारलं.

"खरं सांगायचं म्हणजे मी गांधीजींचं काहीच वाचलेलं नाही. त्यामुळं त्यासंबंधी मला काहीच माहिती नाही." डॉ. लक्ष्मीनारायण म्हणाले.

"तर मग माझं म्हणणं मी तुम्हाला सांगतो. दलितांच्या प्रश्नांसंबंधी विचार करायची प्रेरणा आमच्या पिढीतल्या तरुणांना, विशेषत: सवर्णांना, गांधीजींकडूनच मिळाली. फुले–आंबेडकरांची नावं आम्ही फार उशीरा ऐकली. अस्पृश्यतेची भावना ही मुख्यत: सवर्णांच्या मनात असते. तिथून तिचं उच्चाटन झाल्याखेरीज अस्पृश्यता नष्ट होणं शक्य नाही. स्वत: अस्पृश्यांनी कितीही पराक्रम केला तरी जोपर्यंत स्पृश्यांची मनं त्या अन्यायाचं स्वरूप समजून घेऊन त्याचं परिमार्जन करण्यास तयार होणार नाहीत, तोपर्यंत अस्पृश्यांची आर्थिक–राजकीय स्थिती कितीही सुधारली तरी, खरं भावनिक ऐक्य निर्माण होणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना जागं करून त्याच्यात स्वाभिमान उत्पन्न केला, हा एक भाग झाला. परंतु स्पृश्यांनी बाबासाहेबांना कधी आपला नेता मानलं नाही. त्यांनी गांधींचंच नेतृत्व मान्य केलं. किंबहुना जगातल्या असंख्य दलितांनीही–अमेरिकेतील निग्रो किंवा जपानमधील शांततावादी बौद्ध भिक्षू यांनीही–नेतृत्वासाठी गांधीविचारांकडेच धाव घेतल्याचं दिसतं. गांधी विचारातूनच आपल्याला आत्मोद्धाराचा मार्ग सापडेल असं वाटणारे लक्षावधी लोक जगभर पसरलेले आहेत. त्यांच्यापैकी कुणी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखाणातून मार्गदर्शन घेतल्याचं माझ्या ऐकिवात नाही. भारताच्या संदर्भात मला असं वाटतं की, आंबेडकर व गांधी यांचे मार्ग एकमेकांना पूरक आहेत. दलितांनी आंबेडकरांकडून व सवर्णांनी गांधींकडून मार्गदर्शन घेतल्यास त्यांच्या सहकार्यानं हा प्रश्न सुटू शकेल. तुम्ही यादृष्टीनं विचार करावा, असं मला वाटतं. कदाचित तुमच्या चिकित्सक बुद्धीला गांधींच्या विचारातून चांगलं खाद्य मिळेल; आणि गांधी विचारातल्या काही त्रुटीही तुम्ही दाखवून देऊ शकाल. आंबेडकरांच्या लिखाणाची आणि जीवनाची तुम्ही जितक्या धीटपणानं चिकित्सा करता तितक्याच धीटपणानं गांधींच्या जीवनाची आणि लिखाणाची चीरफाड करावी, अशी माझी इच्छा आहे. त्यातून निश्चितच काहीतरी उपयुक्त निष्पन्न होईल, अशी आशा मला वाटते." मी म्हणालो.

सवर्ण विचारवंतांचं मत

या संबंधात दलित लेखकांशी जिव्हाळ्याचे संबंध असलेल्या दोन सवर्ण विचारवंतांचीही मी मुलाखत घेतली. त्यांच्याविषयी दलितांना विश्वास व आपलेपणा वाटत असल्यामुळं त्यांच्या विचारांत दलितांच्या मनोवृत्तीचंही प्रतिबिंब पडलेलं दिसून येतं. यापैकी एक प्रख्यात कन्नड कादंबरीकार डॉ. उ. रा. अनंतमूर्ती हे

ब्राह्मण असले तरी, आजवर त्यांनी सतत ब्राह्मण्याचे वाभाडेच काढले आहेत. त्यांच्या 'संस्कार' व 'घटश्राद्ध' या कादंबऱ्या आणि त्यावर आधारलेले चित्रपट कर्नाटकात व भारतात खूपच गाजले होते. ते लोहियावादी समजले जातात; परंतु जनता राजवटीतील लोहियावाद्यांच्या वागणुकीनं ते फार निराश झाले आहेत. ते म्हणाले, " इथल्या समाजवाद्यांनी श्रीमंत शेतकऱ्यांच्या बाजूनं आंदोलन उभारलं; तर शिमोग्याला भाजपच्या कार्यकर्त्यांनी शेतमजुरांच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी चळवळ केली. अशावेळी समाजवाद्यांपेक्षा भाजपचे लोकच मला जवळचे वाटल्यास आश्चर्य नाही. त्यामुळं समाजवादी माझ्यावर रागावले आहेत. यापुढं देशात मार्क्सिस्ट आणि भाजप हे दोनच विरोधी पक्ष राहतील. त्यांपैकी मार्क्सिस्ट पक्षाला बाहेरून मार्गदर्शन घ्यावं लागतं. याच्या उलट भारतीय जनता पक्ष हा या देशाशी एकनिष्ठ, राष्ट्रवादी आहे. त्यामुळं मला तोच जवळचा वाटतो. रा. स्व. संघ भूतकाळाकडे पाहतो याबद्दल माझी तक्रार नाही. तो भूतकाळात पुरेसा खोलवर जात नाही, ही माझी तक्रार आहे. संघाचा भूतकाळ शिवाजी–राणाप्रतापापर्यंत जाऊनच थांबतो. त्याऐवजी त्यानं वेद–उपनिषदांपर्यंत धाव घेतली पाहिजे. याज्ञवल्क्य शंकराचार्य, रामानुज, मध्वाचार्य, बसवेश्वर, तुकाराम, कबीर या सर्वांची शिकवण आजही उपयुक्त ठरणारी आहे. तिच्याकडे आपण दुर्लक्ष केलं नसतं तर आज दिसणारी बुवाबाजी, महाराजबाजी वाढू शकली नसती." धर्मांतराविषयी बोलताना ते म्हणाले, " मीनाक्षीपुरम्च्या धर्मांतर प्रकरणानं हिंदू समाजाला जो 'शॉक' दिला तो खूप उपयुक्त ठरेल, असं मला वाटतं. पेजावर मठाचे स्वामी आणि धर्मस्थळाचे हेगडे यांनी या बाबतीत जे काम सुरू केलं आहे, ते फार चांगलं आहे. सनातनी वृत्तीच्या लोकांवर तुमच्या-आमच्या लिखाणाचा-भाषणांचा काही परिणाम होणार नाही; परंतु धर्मगुरूंचा उपदेश त्यांच्यामध्ये मानवतेची भावना जागृत करू शकेल, यात शंका नाही. दुसरी गोष्ट अशी की या देशात कोणत्याही प्रकारचं धर्मांतर फार मोठ्या प्रमाणावर घडून येईल, असं मला वाटत नाही. तरीपण या धर्मांतरामुळं राष्ट्रवादी विचारवंतांना खडबडून जागं होणं भाग पडलं, हा त्याचा एक फायदाच समजला पाहिजे."

दुसरे विचारवंत श्री लिंगदेवरु हळेमने हे लिंगायत असून, ते बंडाया या साहित्यिकांपैकी मार्क्सवादी शाखेचे प्रतिनिधी आहेत. ते मुख्यतः समीक्षक असले तरी त्यांच्या कविताही लोकप्रिय आहेत. सध्या त्यांचं 'चिकदेव भूप' हे मैसूरमधील सतराव्या शतकातील शेतकऱ्यांच्या उठावावरील ऐतिहासिक नाटक मैसूर भागात चांगलंच गाजत आहे. त्यांना जेव्हा मी धर्मांतरासंबंधी त्यांचं मत विचारलं तेव्हा ते म्हणाले, " इस्लाम हा बंदिस्त (closed) धर्म असल्यामुळं जे मुक्त होण्यासाठी धडपडताहेत अशा दलितांना त्याचा काहीच उपयोग नाही. इस्लामचा स्वीकार

करून ते एका खोड्यातून बाहेर पडून दुसऱ्या खोड्यात जाऊन अडकतील. त्यांची अस्पृश्यता कदाचित नाहीशी होईल. कदाचित अशासाठी की, आपल्या गावचे अस्पृश्य मुसलमान होताच सवर्णांची मनं लगेच बदलतील आणि ते त्यांना शिवू लागतील असं मला वाटत नाही. अर्थात एक-दोन पिढ्यांनंतर त्यांची अस्पृश्यता जाईलही; परंतु समाजात घडून येणाऱ्या परिवर्तनाचा विचार करता खुद्द हिंदू समाजातही एक-दोन पिढ्यांनंतर अस्पृश्यता राहील असं वाटत नाही. चार हजार वर्षांत जे घडलं नाही, ते पुढील चाळीस वर्षांत कसं घडेल, असं विचाणाऱ्यांना मी सांगेन की गेल्या शंभर वर्षांत जे घडू शकलं नव्हतं ते गेल्या दहा वर्षांत घडून आल्याचं आपण प्रत्यक्षच पाहत आहोत ना ? यापुढं तर परिवर्तनाचं चक्र आणखीच वेगानं फिरू लागेल. हे झालं सामाजिक स्थितीच्या बाबतीतल चित्र. आर्थिक बाबतीत अशीच क्रांती घडून येईल, असं समजण्यास जागा नाही. आजचे प्रस्थापित हितसंबंध – जमीनदार, भांडवलदार, सत्ताधारी–आर्थिकदृष्ट्या पददलित असणाऱ्यांना सहजा-सहजी वर येऊ देतील, असं दिसत नाही. त्यासाठी फार तीव्र संघर्ष करावा लागेल. हरिजन लोक हिंदू समाजात राहिले, तर या संघर्षात ते सहभागी होऊ शकतील. ते मुसलमान झाले तर त्या धर्माची दडपणं फार क्रूर असल्यामुळं वरच्या वर्गाविरुद्ध उठाव करण्याचा विचारही करणं त्यांना अशक्य होईल. काही लोकांना असं वाटतं की हरिजनांनी इस्लामचा स्वीकार केला तर त्यांची सामाजिक विषमतेपासून सुटका होईल, आणि एकप्रकारे त्यांचा भावनिक लढा संपेल. त्यामुळं आर्थिक विषमतेविरुद्ध लढायला ते तयार होतील. ते मार्क्सवादाच्या मार्गानं चालू लागतील, परंतु मला ते फारसं शक्य वाटत नाही. मुसलमानांतून अनेक मार्क्सवादी पुढारी निर्माण झाले. कवी, लेखक, विचारवंतही इस्लामनं भारताला दिले. परंतु ते सगळे उच्च-मध्यम वर्गातले होते. त्यांचा मुस्लिम दलितांवर मुळीच प्रभाव पडला नाही. कारण मुस्लिम दलित अशिक्षित व दरिद्री असून त्यांच्यावर मुल्ला-मौलवींचा जबरदस्त पगडा आहे. या सर्वांवर माझ्यामते एकच उपाय आहे. तो म्हणजे धर्ममुक्त समाजाची निर्मिती करणं ! हे काम फार अवघड आहे; परंतु ज्यांना धर्माचं वैयर्थ्य पटलं आहे असे अपृश्य लोक धर्ममुक्त समाजाच्या निर्मितीस फार मोठा हातभार लावू शकतील, असं मला वाटतं. म्हणून दलितांनी धर्माचा विचारच मनातून काढून टाकून आपल्या अडचणी दूर करून घेण्यासाठी प्रत्येक प्रश्नावर लढे दिले पाहिजेत. त्या कामी त्यांना सवर्णांतील पुरोगामी विचारांची मंडळी निश्चितच सहकार्य देतील. मात्र त्यात पुढाकार दलितांनीच घ्यायला हवा. दलित संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांची भूमिकाही अशीच आहे. मुक्ती आंदोलनाचं नेतृत्व दलितांकडे राहिल्यास सर्वंकष लढा चालविण्यासाठी इतरांच्या सहकार्याची किती आवश्यकता आहे, याचीही कल्पना त्यांना येईल; आणि त्यांच्यांतील एकांतिक

विचाराच्या कार्यकर्त्यांचा दृष्टिकोण अधिक व्यापक होईल."

इस्लामला पर्याय नाही?

तिसऱ्या एका सवर्ण विचारवंतांचं मत मात्र या दोघांहून पूर्णपणे भिन्न असल्याचं आढळून आलं. ते म्हणजे खुद्द माझे जावई डॉ. कीकणमाडा कार्यप्पा सुब्बय्या हे होते. ज्या जमातीत मूर्तिपूजा, धर्मग्रंथ, जातिभेद अथवा अस्पृश्यता मुळातच नाही अशा कोडव (कूर्गचे रहिवासी) समाजाचे ते आहेत. भारताचे माजी सरसेनापती जनरल कार्यप्पा (करियप्पा) व तिमय्या यांच्या जमातीतले आहेत. धर्मांतरासंबंधी वेगवेगळ्या लोकांशी झालेल्या माझ्या चर्चा ऐकून ते मला म्हणाले, "दादा, तुम्ही काहीही म्हटलं तरी निदान कर्नाटकात तरी हरिजनांना इस्लामचा स्वीकार केल्या-खेरीज गत्यंतर नाही केरळमधील एकही हरिजन धर्मांतर करणार नाही. त्याचप्रमाणं आमच्या कूर्ग जिल्ह्यातही धर्मांतराचा प्रश्न उपस्थित होणार नाही. कारण, तिथं आम्ही अस्पृश्यता पाळीतच नाही. परंतु इतरत्र सवर्ण लोक मनानं इतके मागासलेले आहेत की, हरिजनांनी पायात वहाणा घालून चाललेलंही त्यांना खपत नाही. हरिजनांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करून पाहिला. परंतु त्या धर्मात त्यांची स्थिती जास्तच हलाखीची झाली. त्यामुळं धर्मांतरावरची त्यांची श्रद्धाच उडून गेलीय; पण त्यांना सामाजिक समता हवी असेल तर, ती फक्त इस्लामच देऊ शकेल." मी त्यांना म्हणालो, "तुमचा मुद्दा क्षणभर मान्य केला तरी पुढचा फार महत्त्वाचा प्रश्न तुम्ही डावलू शकणार नाही. तो असा की, मुसलमानांची धर्मनिष्ठा इतकी कडवी एकांतिक असते की, त्यांच्यात राष्ट्रनिष्ठा निर्माण करणं फार कठीण जातं. जिथं राष्ट्रनिष्ठा आणि धर्मनिष्ठा यांच्यांत संघर्ष नसतो, अशा मुस्लिम देशांमध्ये हा प्रश्न निर्माण होत नाही; परंतु मुस्लिमेतरांच्या देशात राहणाऱ्या मुसलमानांची राष्ट्रनिष्ठा नेहमीच डळमळीत असते. शिक्षणानं, संस्कारांनी सततच्या दबावानं ती निर्माण करता येते. साम्यवादी देशांनी तसं करून दाखवलंय. त्यांना ते शक्य झालं, कारण त्यांनी मुसलमानांची धर्मनिष्ठाच खच्ची करून टाकली. भारतासारख्या लोकशाही देशात तसं करता येत नाही. शिवाय प्रत्येक राजकीय पक्ष मुसलमानांची मतं मिळविण्यासाठी त्यांच्या धर्मांधतेला खतपाणी घालीत असतो. अशा स्थितीत मुसलमानांमध्ये वेगळेपणाची भावना वाढीला लागली आणि त्यांनी स्वतःसाठी वेगळ्या धर्मभूमीची मागणी केली, तर त्यात आश्चर्य नाही. संपूर्ण भारताचंच रूपांतर इस्लामिस्तानात करण्याची उमेद अनेक मुसलमान बाळगून आहेत. त्यांचं ते स्वप्न साकार होण्याची शक्यता फारशी नाही; परंतु विशिष्ट प्रदेशात आपली संख्या वाढवून आणखी दोनचार पाकिस्तानं निर्माण करण्यास भारतीयांना भाग पाडणं त्यांना मुळीच अशक्य नाही. हा धोका

तुम्ही लक्षात घेतला आहे काय ?"

डॉ. सुब्बय्या म्हणाले, " हा धोका मला दिसतोय; आणि म्हणून हरिजनांना धर्मांतराची गरज भासू नये, अशी स्थिती आपण निर्माण केली पाहिजे, असं मला वाटतं. परंतु इथले सवर्ण इतके मूढ आहेत की, जातीय अहंकारापुढं त्यांना देशाचं हितही दिसत नाही. धर्मांतराच्या या 'शॉक ट्रीटमेंट'मुळं त्यांचे डोळे उघडले आणि त्यांनी आपलं आचरण बदललं तर मला आनंदच होईल."

सुदैवानं कर्नाटकातील उच्चवर्णीयांमध्ये तशी जागृती होत असल्याची लक्षणं दिसत आहेत. त्यामुळं धर्मांतराचा विचार हरिजनांच्या मनातून हळूहळू निघून जाईल आणि भारतीय समाजाचं अभिन्न अंग म्हणून राहणंच ते पसंत करतील अशी आशा मनात बाळगून मी परतलो.

+ +

'तरुण भारत' : ३·१·८२

७. भारताच्या एकात्मतेला धर्माचा आधार

धर्मातील कर्मकांडाचा म्हणजे आचार, पूजा, उत्सव वगैरे गोष्टींचा मला मुळातच तिटकारा. कदाचित् परंपरागत कर्मकांडाच्या कट्टर वातावरणात वाढल्यामुळे हा तिटकारा निर्माण झाला असावा. त्यामुळे कर्मकांडात्मक धर्म हा आता कालबाह्य झाला आहे, आधुनिक जगात त्याला काही स्थान नाही, असे मी प्रतिपादन करू लागलो. माझ्या स्वतःच्या जीवनात रूढ अर्थाने त्या धर्माला काही स्थान उरलेले नाही. स्नान-संध्या, पूजा-अर्चा, श्राद्ध-पक्ष व मुंजीसारखे संस्कार या सर्वांतून मी माझी स्वतःची सुटका करून घेतली आहे.

समाजावरील धर्माचा पगडा

देवधर्मापासून मी स्वतःची सुटका करून घेतली असली तरी, मी खऱ्या अर्थाने जीवन्मुक्त झालेलो नाही. त्यामुळे देश, समाज यांच्याविषयी आपण विचार केला पाहिजे, ज्या समाजात आपण जगतो त्या समाजाचे आपण काही देणे लागतो याचा विसर मला पडू शकत नाही. त्यातून एका नवीन प्रकारच्या कर्मकांडात मी गुरफटतो. लेखणी आणि वाणी–लेखन आणि भाषण–ही जी दोन साधने आपल्याजवळ आहेत त्यांचा वापर आपण समाजाच्या प्रबोधनासाठी, उत्कर्षासाठी केला पाहिजे, याची गरज मला भासू लागली; आणि मग एक नवाच देव माझ्यासमोर उभा राहिला. तो म्हणजे माणूस. धर्म, जाती, जमाती यांचे कोणतेही शिक्के नसलेला निखळ मानव !

या माणसाचे प्रबोधन करावयाचे, त्याच्या उपयोगी पडावयाचे तर त्याच्या

जवळ गेले पाहिजे. अशा प्रकारे त्याच्या जवळ पोहोचल्यानंतर एक वेगळीच वस्तु-स्थिती नजरेस पडली. ज्या कर्मकांडयुक्त धर्माची आपल्याला काही गरज राहिलेली नाही, असे मी समजतो तो धर्म सोडायला समाज तयार नसल्याचे मला आढळून आले. हा जनसमाज केवळ अडाण्यांचा, गावढळांचाच आहे असे नव्हे. चांगले सुशिक्षित, शहरी लोकही त्या कर्मकांडाचा त्याग करायला तयार नसल्याचे मला दिसले. त्यांमध्ये केवळ उथळ, भंपक लोकच असतात असेही नाही. चांगले शहाणे, सत्प्रवृत्त लोकही त्यात असतात.

या संदर्भात अगदी अलीकडील एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे पणजी (गोवा) ला असम बचाव परिषदेत व्याख्यान देण्यासाठी मी गेलो होतो. तसा गोवा हा प्रदेश चारशे वर्षे पोर्तुगीजांच्या अमलाखाली राहिलेला, पाश्चात्त्य समाजाचे सारे संस्कार त्यावर झालेले, नवी संस्कृती त्याने स्वीकारलेली, आणि कच्च्या लोखंडाच्या खाणींमुळे भरपूर समृद्धी आलेली. त्यामुळे चांगला भरगच्च श्रोतृवर्ग आपल्यासमोर असणार अशी माझी कल्पना होती. परंतु ब्रँगांझा इन्स्टिटचूटच्या हॉलमध्ये जेव्हा मी प्रवेश केला, तेव्हा तेथील अत्यल्प श्रोतृसमाज पाहून मी चक्रावून गेलो. स्थानिक कार्यकर्त्यांना जेव्हा या संबंधात विचारले तेव्हा ते म्हणाले, "अहो, उद्या गणेश चतुर्थी. आज संध्याकाळी गणपती आणायचे असतात. त्यासाठी सगळे लोक आपापल्या गावी रवाना झाले आहेत. आधीच पणजी ही उपऱ्यांनी गजबजलेली राजधानी. कचेऱ्या सुटल्या की दूरवरच्या उपनगरांत व जवळपासच्या खेड्यांत राहणारे लोक इथं थांबत नाहीत. दिवसाउजेडी घरी पोहोचायची प्रत्येकाला घाई असते. त्यात पुन्हा गणपतीचे आगमन म्हणजे तर अपूर्व पर्वणी. तुमच्या देशावर दसरा-दिवाळीला जे महत्त्व आहे, त्याहून अधिक महत्त्व इथं गोव्यात – किंबहुना संपूर्ण कोकणपट्टीत– गणपतीला आहे. या दीड दिवसाच्या उत्सवासाठी जगभर पसरलेला गोवेकर हटकून घरी येतो. शहरात राहणारे सारे लोक आपापल्या मूळ गावी जातात. एकमेकांच्या गाठीभेटी होण्याची हीच सुवर्णसंधी असते. अशा वेळी तुमच्या सभेसाठी कोण थांबणार ?"

वेगवेगळ्या सणांच्या बाबतीत देशाच्या वेगवेगळ्या भागात जवळजवळ हीच स्थिती असते. पूर्व भागात नवरात्राचे महत्त्व, उत्तर भारतात होळीचे, पश्चिम भारतात दिवाळीचे तर दक्षिण भारतात उगादी (पाडवा), ओणम, दसरा, पोंगल वगैरे सणांचे. हे महत्त्व पूर्वापार चालत आलेले असून भारतीय जनता कितीही सुशिक्षित, आधुनिक बनली तरी, हे महत्त्व कमी होत नाही. किंबहुना ते वाढतच चाललल्याचे दिसून येते. एका दृष्टीने समाजाच्या एकात्मतेचे ते प्रतीकच समजता येईल. त्यामुळे वस्तुस्थिती कळल्यावर आपल्या सभेला श्रोते कमी जमल्याचे दुःख

होण्याऐवजी गोमंतकातील तथाकथित पुढारलेल्या समाजावर गणेशोत्सवाचा केवढा जबरदस्त पगडा अजूनही टिकून आहे, याची कल्पना आल्यामुळे एक प्रकारे मन सुखावले. देशातील राजकारणाने गाठलेली कमालीची खालची पातळी आणि सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार यांमुळे भारतीय समाज विसकटणार, उद्ध्वस्त होणार अशी भीती ज्यावेळी आपल्या मनात उत्पन्न होते, त्यावेळी साऱ्या समाजाला बांधून ठेवणाऱ्या अशा सणांचे स्मरण आपण केले तर आपली भीती, निराशा दूर होऊन भविष्याविषयी आपले मन निश्चितच आशावादी बनेल यात शंका नाही.

समाजाला बांधून ठेवणाऱ्या गोष्टी

सण किंवा उत्सव ही समाजाला एकत्र बांधून ठेवणाऱ्या गोष्टींपैकी एक गोष्ट होय. याखेरीज वेद-उपनिषदांपासून संतवाणीपर्यंतचे धार्मिक साहित्य, देशाच्या कोऱ्याकोपऱ्यापर्यंत पसरलेली तीर्थक्षेत्रे, इतिहासाचे समान दुवे वगैरे अनेक गोष्टींचा त्यात समावेश आहे. या सर्वांची मिळून संस्कृती बनते. भारतीय संस्कृतीत या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो. एका अर्थाने पाहिल्यास ती केवळ हिंदू संस्कृती नाही. गुरुदेव रवींद्रनाथांनी 'भारततीर्थ' या प्रख्यात कवितेत म्हटले आहे :–

" हे माझ्या चित्ता, या भारतातील महामानवाच्या सागरतीरावर, या पुण्यतीर्थावर, शांतपणे जागृत रहा. येथे उभा राहून दोन्ही हात पसरून मी या नरदेवतेला नमस्कार करतो. उदार छंदाने, परम आनंदाने मी त्याला वंदन करतो. हे ध्यानगंभीर भुधर, नद्यांना जपमालांप्रमाणे धारण करणारी ही मैदाने, या भारतातील महामानवाच्या सागरतीरवरील ही पवित्र धरित्री, या सर्वांचे नित्य दर्शन घे.

" किती मानवांच्या धारा कोणाच्या आव्हानाने, कोठून, दुर्निवार प्रवाहांनी येथे आल्या हे कोणालाही ठाऊक नाही. या समुद्रात त्या सर्व विलीन झाल्या आहेत. या ठिकाणी आर्य आले. अनार्य आले. द्रविड, चिनीही आले. शक हूणांची दले, पठाण, मोगल हे सारे एका देहात लीन झाले आहेत. आज पश्चिमेने आपले द्वार उघडले आहे; आणि तेथून सर्व लोक आपले उपहार येथे आणीत आहेत...

" एके दिवशी येथे हृदय – तारेवर एकत्वाच्या मंत्रातून विरामहीन महा-ओंकारध्वनी रणत्कार करिता झाला. तपस्याबलाने एकत्वाच्या अनलात बहुत्वाला आहुती देऊन विभेद विसरण्यात आला; आणि एक विराट हृदय जागृत करण्यात आले...

" हे आर्यानो, या. अनार्यानो, हिंदूनो, मुसलमानांनो या. इंग्रजानो, आज तुम्ही-देखील या. ख्रिस्ती लोकानो या, ब्राह्मणानो या. आपले मन पवित्र करून सर्वांचे हात धरा. पतितहो, या. तुमचा अपमानभार टाकून द्या. भारतमातेच्या अभिषेकासाठी

त्वरेने या. भारतातील महामानवाच्या सागरतीरावर सर्वांच्या स्पर्शाने पवित्र झालेल्या तीर्थोदकाने अभिषेकाचा मंगल घट अजून भरण्यात आलेला नाही."

धार्मिक कर्मकांडापासून सर्वस्वी अलिप्त असणाऱ्या गुरुदेवांना भारतीय एकात्मतेसाठी तीर्थक्षेत्राची उपमा सुचावी, यातच सर्व काही येऊन जाते.

हिंदुत्वाचा त्याग करता येणार नाही

अशा प्रकारे भारतीय संस्कृती ही केवळ हिंदू संस्कृती नाही, तिच्यात अनेक संस्कृतींचे प्रवाह येऊन मिसळले आहेत; परंतु मूळ प्रवाह हिंदू संस्कृतीचाच आहे. भारतीय संस्कृतीचा परिचय करून घेण्यासाठी जेव्हा कोणी परकीय व्यक्ती भारतात येते तेव्हा तिला हिंदू संस्कृतीच अभिप्रेत असते. इस्लामी किंवा ख्रिस्ती संस्कृतीचे दर्शन घेण्यासाठी ती भारतात येत नसते. या अर्थाने पाहिल्यास भारतीय संस्कृती प्रामुख्याने हिंदू संस्कृतीच आहे. पुरातन काळापासून चालत आलेले हिंदू रीतिरिवाज, आचारविचार, कलाकृती या सर्वांचा समावेश या संस्कृतीत आहे. त्यांना आधार हिंदू धर्माचा आहे. हा आधार नाहीसा झाला तर, भारतीय संस्कृती टिकू शकणार नाही. निराधार होऊन खाली कोसळेल. म्हणून आपल्याला आवडो किंवा न आवडो, धर्माचा हा आधार नष्ट होणार नाही याची खबरदारी घ्यावीच लागेल. हिंदू संस्कृतीसाठी नव्हे, तर भारतीय संस्कृतीसाठी।

भारतीय संस्कृतीला आधारभूत असणाऱ्या हिंदू समाजाचे अस्तित्व नुसतेच टिकून राहून भागणार नाही. हा समाज प्रचंड बहुसंख्येने आणि भरपूर सामर्थ्यानिशी या देशात उरला पाहिजे. याचे कारण असे की, जगातल्या साऱ्या संस्कृतींना पचविण्याचे सामर्थ्य या समाजात आहे; आणि इतके असूनही प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विकास करण्याचे मुक्त स्वातंत्र्य तो देतो. इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांची संख्या या देशात प्रमाणाबाहेर वाढली तर भारतीय संस्कृती गुदमरून जाईल. किंबहुना माणुसकीच नष्ट होईल. इस्लामी देशांत माणुसकीचे जे धिंडवडे आज चालले आहेत ते पाहिले की, इस्लामचे प्राबल्य मानवतेलाच हानिकर ठरते, याविषयी शंका उरत नाही. इस्लामने भारतात येऊन सहिष्णुतेचे, करुणेचे, प्रेमाचे जे काही धडे गिरवले असतील, त्यांचा प्रभाव नाहीसा होऊ नये म्हणून मानवतावादी मुसलमानांनी या देशात इस्लामचा प्रभाव न वाढता, हिंदू धर्माचा प्रभाव वाढेल अशी खटपट केली पाहिजे. त्यांना ती गोष्ट कळून येईपर्यंत आपणच त्यांना ती समजावीत राहिले पाहिजे. गुरुदेवांना अभिप्रेत असलेल्या भारततीर्थाचे पावित्र्य टिकविणे, वाढविणे हे आपल्याच हाती आहे. त्यासाठी हिंदू धर्माचे शुद्ध, सात्त्विक स्वरूप अधिकाधिक प्रभावी बनले पाहिजे. तात्कालिक लाभाच्या लोभाने अमानवीय मार्गांचा, अशुचि साधनांचा वापर करण्याच्या मोहात आपण सापडलो तर, हिंदु-

धर्माचा आत्मा गमावून केवळ त्याचे निर्जीव कलेवर आपण जवळ बाळगले असे होईल. बाह्य कर्मकांडाच्या आत हिंदुधर्माचा आत्मा अद्याप शाबूत आहे. त्याची ओळख स्वत: करून घेणे आणि जगाला करून देणे हे भारतीय संस्कृतीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. त्यातून केवळ भारताची एकात्मता दृढतर होईल असे नव्हे तर, एकूण मानवतेच्या विकासालाच हातभार लागेल, यात शंका नाही.

✣ ✣

'विवेक' : ९·१०·८३

८. अत्याचार करणाऱ्यांना मनुस्मृतीचा आधार लागतो काय ?

द्वेषाची कावीळ झालेल्या रोग्यांना साध्या, सरळ, शुभ्र, निर्मळ गोष्टीही वाकड्या-तिकड्या, गुंतागुंतीच्या, रंगीत दिसू लागतात. स्वतःला समाजसेवक समजणाऱ्या काही लोकांची मानसिक अवस्था अशीच झालेली दिसते. त्यामुळे ज्या समस्या सोडविण्याची गरज निर्माण झालेली असते, त्या सुटण्याऐवजी जास्तच अवघड बनून जातात. अशा वेळी तटस्थ माणसाला अशी शंका येते की, या लोकांना समस्या सोडवावयाच्या आहेत, की त्यांचे भांडवल करण्यासाठी त्या कायम ठेवावयाच्या आहेत व अधिक गुंतागुंतीच्या बनवावयाच्या आहेत ?

हिंदुधर्मग्रंथांविरुद्ध विषारी प्रचार

हा प्रश्न सुचण्याचे कारण म्हणजे हिंदुधर्मग्रंथांविरुद्ध तथाकथित दलित व दलितेतर पुरोगाम्यांनी उघडलेली आघाडी हे होय. दलितांवरील अत्याचार ही काही फक्त भारतातच घडणारी अथवा अलीकडेच घडू लागलेली गोष्ट नव्हे. दुबळ्याला वाली नसतो, हा तर जगाचा न्याय आहे. मग तो दुबळा हरिजन असो की ब्राह्मण असो, आदिवासी असो, की यहुदी असो, अमेरिकेतला निग्रो असो की लॅटिन अमेरिकेतला रेड इंडियन असो, रशिया–चीन–पोलंडमधला मजूर असो की इंग्लंडमधला भारतीय असो, दक्षिण आफ्रिकेतला काळा असो की जपानमधला बुराकमिन असो. ज्याच्यावर अत्याचार केला जातो तो अमुक एका जातीचा, वंशाचा, धर्माचा आहे म्हणून नव्हे, तर तो दुबळा आहे म्हणून. इराणमध्ये खोमेनीच्या गुंडांनी लक्षावधी बहाई लोकांचीच नव्हे तर, आपल्याच रक्तामांसाच्या धर्माच्या– पंथाच्या लोकांची जी सर्रास कत्तल चालविली आहे, ती काय कुराणाच्या

आज्ञा पाळण्यासाठी ? आणि जरी खोमेनी तसा आव आणीत असला, तरी ज्यांच्यावर अत्याचार होतात त्यांना त्यातील फोलपणा समजतो. म्हणून आमच्यावर अत्याचार करण्याची शिकवण देणाऱ्या कुराणाचीच आम्ही होळी करतो, अशी धमकी त्या देशात कुणी देत नाही; अथवा ज्या सुधारलेल्या समाजाकडून आपल्यावर अत्याचार होतात ते ख्रिस्ती धर्माचे आहेत, म्हणून त्यांचा निषेध करण्यासाठी अत्याचारपीडित लोक बायबल जाळण्याचे प्रकारही जगात कुठे करताना दिसत नाहीत.

अशा स्थितीत वेद, पुराणे, रामायण, महाभारत, मनुस्मृती, गीता यांसारख्या हिंदू धर्मग्रंथांविरुद्ध या देशात जो गदारोळ उठविला जातो व तसे करण्यात आपण फार मोठी बहादुरी गाजविली असा जो आभास निर्माण केला जातो, त्याचे कारण एवढेच की ज्याच्याविरुद्ध हा सारा प्रचार केला जातो, तो समाज सहिष्णू, किंबहुना निगरगट्ट व भेकड आहे; आणि आपण काहीही बकवास केला तरी, आपल्याला जाब विचारण्यास कोणी पुढे येणार नाही, याची खात्री बकवास करणाऱ्यांना असते, हे होय.

ब्राह्मणांवर अत्याचार होतात तेव्हा ?

आजकालच्या अत्याचारांच्या बाबतीत एक मजेदार गोष्ट दिसून येते. जेव्हा अस्पृश्यांवर अत्याचार केले जातात, तेव्हा वृत्तपत्रांतून त्यांचा खूप गाजावाजा केला जातो. सर्वच पक्षांचे पुढारी तेथील अत्याचार पीडितांचे अश्रू पुसण्यासाठी अहमहमिकेने धावून जातात; परंतु जेव्हा सवर्णांवर, ब्राह्मणांवर किंवा वाण्यांवर अत्याचार केले जातात, तेव्हा त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज कोणालाच भासत नाही. याचे कारण उघड आहे. मुसलमानांप्रमाणे अस्पृश्य समाज हा एकगठ्ठा मते बाळगून राहणारा वर्ग आहे. त्याची मर्जी सांभाळणे सर्वच सत्ताकांक्षी मंडळींना फार आवश्यक वाटते. ती गोष्ट ब्राह्मणांच्या किंवा इतर पांढरपेशा लोकांच्या बाबतीत नसते. त्यांची मते हमखास कोणाला मिळतील, त्यासाठी कोणती क्लृप्ती योजली पाहिजे याविषयी कोणालाच काही निश्चित कल्पना नसते. शिवाय त्यांची मते इतकी नगण्य असतात की, त्यांची पर्वा केली नाही तरी फारसे बिघडत नाही.

जेव्हा मतांचा प्रश्न नव्हता तेव्हाही जवळ जवळ अशीच स्थिती होती. १९२० पासून १९३२ पर्यंत माझे बालपण कोल्हापूर संस्थानात गेले. त्यावेळी खेडोपाडी पसरलेला ब्राह्मणसमाज किती भयभीत झाला होता, ते मी प्रत्यक्ष पाहिले आहे. कुणीही यावे आणि टप्पल मारून जावे, अशी त्यांची स्थिती होती. त्याची जी ससेहोलपट झाली, त्याच्या अब्रूचे जे धिंडवडे त्यावेळी निघाले ते ज्यांनी पाहिले असतील, त्यांना हरिजनांवरील आज होणाऱ्या अत्याचारांविषयी नक्कीच

सहानुभूती वाटेल. परंतु त्यावेळी ज्यांनी ब्राह्मणांवर अत्याचार केले त्यांना त्यांची प्रेरणा मनुस्मृती किंवा गीता या ग्रंथांपासून मिळालेली नव्हती. ज्या ग्रंथांपासून त्यांना प्रेरणा मिळाली ते जाळून टाकावेत, असा विचार मात्र ब्राह्मणांनी केला नाही. कारण विचारांशी विचारांनीच लढा द्यावयाचा असतो, हे त्यांना ठाऊक होते. ब्राह्मणांवरील अत्याचारांची परिसीमा १९४८ साली गांधी हत्येनंतरच्या दंगलीत झाली. त्यावेळी ब्राह्मणांची घरेदारेच नव्हे तर, काही ठिकाणी खुद्द ब्राह्मणांनाही जाळण्यात आले. परंतु म्हणून आजच्या दलितांप्रमाणे चीन-पाकिस्तानची मदत घेऊन आपल्यावर अत्याचार करणाऱ्यांचा सूड उगवावा, असे त्यांना वाटले नाही. कारण या भूमीवर, इथल्या जनतेवर त्यांचे प्रेम होते. जेव्हा खेड्यापाड्यांतून त्यांना हुसकून लावण्यात आले, तेथे राहणे त्यांना अशक्य करून सोडण्यात आले, तेव्हा ते शहरात आले, परप्रांतात गेले; आणि ज्यांना शक्य झाले ते परदेशातही गेले. महाराष्ट्राप्रमाणेच, किंबहुना त्याहूनही अधिक वाईट स्थिती तामिळनाडूतील ब्राह्मणांची झाली. आज पुणे, मुंबई, दिल्ली वगैरे शहरांत जे दाक्षिणात्य मोठ्या संख्येने गोळा झालेले दिसतात ते हेच देशोधडीला लावण्यात आलेले तमिळ ब्राह्मण आहेत. त्यांच्याविषयी कोणाला सहानुभूती वाटली तर त्याला प्रतिगामी, जुनाट वृत्तीचा समजण्यात येते. एवढी आमच्यातील माणुसकीची पातळी खाली घसरली आहे.

माणुसकीचे मोल ओळखण्याची गरज

सारांश, प्रत्येकजण आपापल्या जातीपुरताच विचार करीत राहिला तर त्यातून द्वेषाखेरीज काहीच निष्पन्न होणार नाही. आपण सारे एका भारतीय समाजाचे घटक आहोत, ही जाणीव ठेवून या प्रश्नाकडे आपण पाहू लागलो तर यातून बाहेर पडण्याचा मार्ग आपल्याला दिसू लागेल. अखेर आपल्याला याच देशात राहवयाचे आहे; आणि आपण गुण्यागोविंदाने राहिलो तरच आपले जीवन सुखावह होणार आहे, याची खूणगाठ प्रथम आपण बांधली पाहिजे. जगातील कोणत्याही देशात बहुजनसमाजाच्या हातात सारी सत्ता एकवटलेली असते; आणि तो समाज त्या सत्तेचा वापर अल्पसंख्य समाजावर दादागिरी करण्यासाठी करीत असतो. त्याला अमेरिकेतील गोरा जसा अपवाद नाही, तसा आशियाई रशियनांवर हुकमत गाजविणारा रशियातील युक्रेनियन (गोरा रशियन) अथवा तिबेटी लोकांवर जुलूम करणारा चिनी हेही अपवाद नाहीत. आपल्याच इंदिरा काँग्रेस पक्षातील ब्राह्मणांना 'गोडसेची अवलाद' म्हणून हिणविणारे भाऊराव पाटील ही गोष्ट सोयिस्करपणे विसरतात की, इंदिरा गांधी, प्रणव मुखर्जी, कमलापती त्रिपाठी, गुंडूराव, जगन्नाथ मिश्र हे सारे ब्राह्मणच आहेत. सगळेच ब्राह्मण गोडशाची

अवलाद असते तर गांधींचा विचार जगाला समजाऊन सांगणारे विनोबा, दादा धर्माधिकारी, आचार्य भागवत, आचार्य जावडेकर, अप्पासाहेब पटवर्धन, अण्णासाहेब सहस्रबुद्धे निर्माणच झाले नसते. म्हणून जातिद्वेषाच्या विळख्यातून स्वतःची सुटका करून घेणे, ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. वेद, उपनिषदे, गीता, मनुस्मृती रामायण, महाभारत यांचे रचयिते ब्राह्मण नव्हते, हे आपण विसरतो आणि त्या ग्रंथांतील विचारांबद्दल ब्राह्मणांना झोडपतो. जातिद्वेषातून आपण स्वतःला मोकळे करून घेतले तर खराखुरा इतिहास आपल्याला कळेल आणि मग ग्रंथांची होळी करण्याचा वेडेपणा आपण करणार नाही. आपल्या धर्मग्रंथात जगातील सारे ज्ञान सामावलेले आहे, अशी समजूत करून घेणाऱ्या धर्मवेडचा मुसलमानांनी मोठमोठी ग्रंथालये जाळून टाकली; परंतु त्याने नुकसान त्यांचेच झाले. ते अज्ञानांधकारात बुडाले; आणि जग ज्ञानाच्या प्रकाशाने न्हाऊन निघाले. त्यांचेच अनुकरण आमचे दलित मित्र करू इच्छितात, असे दिसते. त्यांचीही गत मुसलमानांसारखीच होईल. ज्ञानाशी शत्रुत्व असणारे लोकच ग्रंथांची जाळपोळ करून आपला राग शमवितात. त्यांना सूडाचे समाधान अवश्य लाभत असेल; परंतु त्यांच्या प्रगतीला त्याने हातभार लागतो, असे काही आढळत नाही.

आजकाल अल्पसंख्य समाजांवर जे अत्याचार होतात. त्यांच्या मुळाशी मुख्यतः राजकारण व अर्थकारण असते; परंतु त्याला धर्मकारणाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रामीण भागातील जमीनदारांना कमी मजुरीत मजूर हवे असतात. तसे काम करण्याचे, स्वतःचे शोषण करून घेण्याचे दलित लोक जेव्हा नाकारतात, तेव्हा त्यांना दहशत बसविण्यासाठी त्यांच्यावर हल्ले केले जातात, त्यांची घरे जाळली जातात, त्यांच्या अब्रूचे धिंडवडे काढले जातात; परंतु अन्यायाविरुद्ध बंड करणारे हे सारे दलित केवळ अस्पृश्यच असतात असे समजण्याचे कारण नाही. मूठभर श्रीमंत सोडले तर बाकी कोट्यवधी जनता दलितच असते. त्या दलितांना संघटित करून अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे सामर्थ्य त्यांच्यांत निर्माण करावयाचे, तर महात्मा गांधींनी सांगितलेल्या शांततामय मार्गाचेच अनुसरण करावे लागेल. हिंसक प्रतिकार मोडून काढण्याचे सामर्थ्य या अत्याचार करणाऱ्या अल्पसंख्य शोषक समाजात भरपूर असते. राजसत्ताही त्यांच्याच बाजूला असते. ही वस्तुस्थिती न ओळखल्यामुळे काही दलित शौर्याचा आव आणून शस्त्रास्त्रांचा वापर करण्याचा विचार करतात. हिंसेला हिंसेनेच उत्तर देण्याचा प्रयत्न करतात. बहुजनसमाजाच्या धर्मभावनांचा अपमान करण्यात पुरुषार्थ मानतात; आणि निष्कारणच आपल्याविरुद्ध वातावरण तयार होण्यास मदत करतात. त्याऐवजी गांधींच्या मार्गाने गेल्यास समाजात कटुता निर्माण न होता, दलितांवरील अन्याय दूर होऊ शकतील. कारण त्या परिस्थितीत इतर जातींतील समंजस लोकही त्यांच्याबरोबर राहतील.

अखेर माणूसकीचे आवाहनच सर्वांपर्यंत जाऊन पोहोचणारे आवाहन आहे. संपूर्ण समाजाला शत्रू बनविण्याऐवजी सर्व दलितपीडित जनतेला बरोबर घेऊन जाणारे राष्ट्रवादी हेच अखेर या सामाजिक समतेच्या संघर्षात विजयी होणार आहेत, हे आपण ओळखले पाहिजे. आमच्या दलित मित्रांनी याचा शांतपणे विचार करावा एवढीच इच्छा. हे सारे विवेचन करण्याची जरूर आम्हाला आजच का भासली याचाही खुलासा करणे उचित होईल. ता. २७·१२·८२ रोजी पुण्यास अस्पृश्यता निवारणासंबंधीच्या एका परिसंवादात बोलताना प्रा. रावसाहेब कसबे यांनी डॉ. आंबेडकर प्रणीत जी त्रिसूत्री सांगितली तिच्यातील एक सूत्र 'जातीयवादाचा पुरस्कार करणारे पौराणिक ग्रंथ नष्ट करणे' हे होते. वस्तुतः प्रा. कसबे हे काही माथेफिरू दलित नव्हेत. सारासार विचार करणाऱ्यांमध्ये त्यांची गणना होते. तरी-देखील पुराण ग्रंथांच्या विध्वंसाच्या कचाट्यातून ते स्वतःला सोडवू शकले नाहीत. या सूत्रांची अंमलबजावणी करायचे ठरविले तर, बहुधा एकही प्राचीन ग्रंथ सुरक्षित राहणार नाही; कारण जुन्या काळी सर्वांनीच सामाजिक विषमता मान्य केली असल्यामुळे सारी संतवाणीही जाळून टाकावी लागेल. आपल्या विधानाचा अर्थ आमच्या विद्वानांना तरी कळावा, अशी अपेक्षा बाळगणे चूक ठरेल काय ? की आंबेडकरांनी तत्कालीन परिस्थितीत सांगितलेली एखादी गोष्ट ब्रह्मवाक्याप्रमाणे अटळ मानली पाहिजे ? यालाच बुद्धिप्रामाण्य म्हणतात काय ? मग अडाणी भक्तांत आणि विद्वानांत काय फरक राहिला ?

पावित्र्यविडंबनाची खुमखुमी

याच संदर्भात आणखी एका नीच मनोवृत्तीची दखल घेणे उचित होईल. ती म्हणजे पावित्र्यविडंबनाची खुमखुमी. मनुस्मृती किंवा भगवद्गीता जाळण्याच्या मुळाशी ज्याप्रमाणे सूड उगविण्याचे खोटे समाधान असते, त्याप्रमाणे ज्या समाजा-कडून आपल्यावर अन्याय होतो, त्याच्या श्रद्धास्थानांवर चिखलफेक करून त्या समाजावर आपण सूड उगविला, अशा प्रकारे मनाची समजूत करून घेण्याची क्षुद्र भावना असते. हा एक वेगळ्या प्रकारचा षंढपणाच म्हणता येईल. दुबळा माणूस आपल्या प्रतिस्पर्ध्याचे पारिपत्य करिता न आल्यामुळे त्याला आईमाईवरून शिव्या देतो आणि त्याला आपण चांगले शासन केले अशी स्वतःची समजूत करून घेतो. याचीच एक निरागस अथवा पोरकट बाजूही असते. आमच्या लहानपणी आम्ही निवडुंगाच्या बनात जाऊन तिथल्या निवडुंगावर हातातल्या काठीने सपासप वार करीत असू; आणि आपण इतके इंग्रज खलास केले, अशी स्वतःची समजूत करून घेत असू. आपल्या विरोधकांचे धर्मग्रंथ जाळणे, त्यांच्या देवदेतांची निंदानालस्ती करणे त्यांना आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तींच्या नावाने शिमगा करणे अथवा त्यांच्या

चित्रांच्या, पुतळ्यांच्या गळ्यांत खेटरांच्या माळा घालणे, त्यांच्या आयाबहिणींवर अत्याचार करणे यांसारख्या मार्गांनी स्वतःचा राग व्यक्त करण्याची प्रथा तशी फार जुनी आहे. परंतु तीच प्रथा आजच्या सुधारलेल्या जगात चालू ठेवणारे सुशिक्षित लोक मनाने तरी फारच जुन्या जमान्यात वावरत असले पाहिजेत यात शंका नाही. राम, कृष्ण, शंकर, गणपती, विठोबा, जोतीबा यांसारख्या देवांचे विडंबन करण्यास फार मोठी अक्कल लागते अशातला भाग नाही. संजय गांधीसारख्या भ्रष्टाचारी गुंडाला चारित्र्यवान महापुरुष ठरविणारे अंतुले, गुंडूराव, झैलसिंग आपल्या डोळ्यांसमोरच आहेत. एखाद्या थोर पुरुषासारखी त्यांची झोकदार समाधी बांधून मेनका गांधीला शह देण्यासाठी संजयची जयंती-मयंती थाटामाटाने साजरी करण्याची प्रथाही इंदिराजींनी रूढ केली आहे. पण म्हणून काय संजय हा थोर पुरुष ठरतो? याच्या उलट महात्मा गांधींचे अवमूलन करण्यासाठी जंगजंग पछाडले जात आहेत; परंतु त्यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. दुर्योधन-दुःशासन हे थोर, सदाचारी सम्राट होते आणि राम-कृष्ण हे जंगली पुरुष असून कंस व रावण हे महापुरुष होते असेही सिद्ध करता येणे सहज शक्य आहे. द्रौपदी ही बदफैली बाई होती आणि सीता रावणावर फिदा झाली होती, असेही दाखवून देता येईल. परंतु हे सारे कशासाठी करावयाचे? त्यातून काय निष्पन्न होणार? देवदेवतांची विटंबना करण्याचे प्रयोग तामिळनाडूमधील रामस्वामी नायकरांच्या नास्तिकवादी पंथाने भरपूर केले. आजही त्यांचे अनुयायी त्याच मार्गाचे अनुकरण करीत आहेत; परंतु त्याने सामाजिक विषमतेचा प्रश्न सुटला काय? सामाजिक समता आली काय? प्रत्यक्ष परिस्थिती उलटीच आहे. आज तामिळनाडूमध्ये दलितांवर जेवढे अत्याचार होतात त्याच्या शतांशानेही अत्याचार राम–कृष्ण–विठोबाची भक्ती करणाऱ्या महाराष्ट्रात होत नाहीत. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, तामिळनाडूत दलितांवर अत्याचार करणारे लोक ब्राह्मण नसून रामस्वामी नायकरांना गुरुस्थानी मानणारे नास्तिकच आहेत. मीनाक्षीपुरमचे तेवर हे त्यांच्यापैकीच आहेत. त्यांच्याच छळाला कंटाळून तेथील अस्पृश्यांनी इस्लामचा स्वीकार केला असे म्हणतात. याचा अर्थ असा की पावित्र्यविडंबनाचे हे हत्यार सामाजिक समता आणण्याच्या कामी उपयोगी पडत नाही. एवढेच नव्हे तर ते अत्याचारी लोकांमधील माणुसकी नष्ट करून त्यांना अमानुष बनविते. आस्तिकांना निदान परमेश्वराचे तरी भय असते. नास्तिकांना कुणाचेच भय नसल्यामुळे ते अत्याचार करताना कोणत्याही टोकाला जाऊ शकतात. रामस्वामी नायकरांचा पंथ फक्त तामिळनाडूतच फोफावला. केरळ, कर्नाटक व आंध्र या प्रदेशांतील जनता त्यापासून अलिप्त राहिली. त्यामुळे हरिजनांवरील अत्याचारांच्या बाबतीत ही तीन राज्ये तामिळनाडूच्या खूपच मागे राहिली, असे दिसून येते. नास्तिकतेचा व पावित्र्यविडंबनाचा पुरस्कार करणाऱ्यांनी

ही वस्तुस्थिती समजून घ्यावी.

स्वत:वर उलटणारे शस्त्र

ग्रंथांची जाळपोळ आणि पाविऱ्यविडंबन हे दुधारी शस्त्र आहे. ज्यांच्याविरुद्ध ते वापरले जाते त्यांनाही त्यांचा वापर करता येतो, हे ते शस्त्र वापरणाऱ्यांनी लक्षात ठेवावे. आज ज्या बहुजनसमाजाविरुद्ध ते बेगुमानपणे वापरले जात आहे तो खूपच सहिष्णू व असल्या पोरकट गोष्टींकडे दुर्लक्ष करणारा असल्यामुळे त्याची प्रतिक्रिया सध्या दिसून येत नाही; परंतु त्याच्याही सहनशीलतेला मर्यादा आहे. ती मर्यादा ओलांडली गेली तर, तो विध्वंसक राक्षसही बनू शकतो. नामांतराच्या प्रश्नावर मराठवाड्यातील जनतेला डिवचण्याचा जो प्रयोग करण्यात आला त्याचे परिणाम आपण पाहिलेच आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की, आगीशी खेळणारे लोक नामानिराळे राहतात; आणि निरपराध लोक त्या आगीत होरपळून जातात. अर्थात् आगीशी खेळण्याची फुशारकी मारणारे हे लोक राम-कृष्णाप्रमाणे मुहम्मद व येशू यांच्या वाटचाला जाण्याची हिंमत करीत नाहीत. कारण त्यांना याची पूर्ण कल्पना असते की, त्यांचे पाविऱ्यविडंबन केल्यास आपले नावनिशाणही शिल्लक उरणार नाही. म्हणून प्रत्येक पुरोगामी, समतावादी, समाजवादी, साम्यवादी आपल्या दांडपट्ट्यांचे प्रयोग हिंदू समाजावरच करीत असतो; परंतु आजवर झोपी गेलेला हा समाजपुरुष आता जागा होऊ लागला आहे. तो या गमज्या फार काळ चालवून घेणार नाही. त्याचे नेतृत्व भित्र्या पांढरपेशांकडून निधड्या छातीच्या 'जनते'ने स्वत:कडे घेतले आहे. ही जनता आपला हा अपमान सहजासहजी खपवून घेणार नाही. धार्मिक ग्रंथांची होळी करणाऱ्या आणि हिंदू देवदेवतांची निंदानालस्ती करणाऱ्या तथाकथित समतावाद्यांनी या बदललेल्या परिस्थितीची वेळीच दखल घेणे त्यांच्या हिताचे ठरेल. हिंदू देवदेवतांची निंदानालस्ती करण्याचा प्रयोग विधर्मियांनी व पोरकट स्वधर्मियांनी यापूर्वी अनेकदा करून पाहिला आहे; परंतु त्याचा काय परिणाम झाला? त्या दैवतांवरील सामान्य जनतेची श्रद्धा कमी होण्याऐवजी उलट जास्तच वाढली. एवढेच नव्हे तर अशा श्रद्धावानांमध्ये सुशिक्षित लोकांची कधी नव्हती इतकी भर पडली. अर्थात स्वत:च्या मनातील क्षुद्रता व द्वेषबुद्धी यांचे प्रदर्शन करण्यासाठीच हे पाविऱ्यविडंबन केले जात असल्याने खुद्द ते करणाऱ्यांचीही तशी अपेक्षा नसावी. म्हणून या साऱ्या प्रकरणाकडे पोरकटपणा म्हणून दुर्लक्ष करणेच शहाणपणाचे होईल.

\+ \+

'सोबत' : १·४·८४

९. अन्यायाचे परिमार्जन झालेच पाहिजे

विश्व हिंदू परिषदेच्या श्रीरामजन्मभूमी मुक्तियज्ञ समितीने ९ ते १६ डिसेंबर असा सप्ताह पाळण्याचे ठरविले. त्याला साऱ्या देशभक्त भारतीयांकडून मनःपूर्वक सहकार्य मिळाले.

विश्व हिंदू परिषदेच्या या कार्यक्रमाला मी पाठिंबा देत आहे, याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटेल. माझी एकूण पार्श्वभूमी माहीत असणाऱ्या जुन्या सहकाऱ्यांना कदाचित् वाईटही वाटेल. म्हणून माझी भूमिका स्पष्ट करणे उचित होईल.

माझे लिखाण वाचणाऱ्यांना हे माहीत आहे की, मला मूर्तिपूजा मान्य नाही. मी देवाच्या दर्शनासाठी कधी मंदिरात जात नाही. माझा परमेश्वर चराचरात भरून राहिलेला आहे. त्याला एका मूर्तीत बंदिस्त करून ती मूर्ती एखाद्या देवळात कोंडून ठेवणे माझ्या ईश्वरभक्तीत बसत नाही. अशा स्थितीत श्रीराम जन्मभूमी-मुक्तीला पाठिंबा देणे वरवर पाहता चमत्कारिक दिसेल याची मला कल्पना आहे.

आपल्या देशात मंदिरे, मशिदी व गिरजाघरे यांची संख्या असंख्य होण्या-इतकी भरमसाट वाढलेली आहे. म्हणून यापुढे भारतात, जेथे मंदिरे कधीच उभारली गेली नाहीत असा वनवासी विभाग वगळता, कोणालाही नवे मंदिर, मशीद अथवा गिरजाघर उभारू दिले जाऊ नये, असे माझे मत आहे. नवीन मंदिराच्या उभारणीसाठी केला जाणारा खर्च व शक्ती ही जुन्या मंदिरांना ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी, त्यांची उत्तम देखभाल ठेवण्यासाठी, तेथील वातावरण नास्तिकांनाही आस्तिक बनवील इतके प्रसन्न बनविण्यासाठी वापरण्यात यावीत; आणि या देवस्थानांच्या संपत्तीचा उपयोग दलित समाजाच्या उत्थानासाठी

केला जावा. मंदिरे ही सामाजिक विषमता नष्ट करून संपूर्ण भारतीय समाजाला एकत्र आणणारी, त्याला एकसंध बनविणारी केंद्रे बनावीत, असे मला वाटते. या बाबतीत ज्यांचा उत्साह अनावर होईल त्यांनी भारताबाहेर आशिया, आफ्रिका, अमेरिका वगैरे खंडांतील खंडोगणती देशांमध्ये मंदिरे उभारावीत व त्यांच्या द्वारे भारतीय संस्कृतीचा प्रचार-प्रसार करावा, असे माझे मत असल्यामुळे अयोध्या, मथुरा, काशी वगैरे ठिकाणी मंदिरांच्या जागी ज्या चर्चेस किंवा मशिदी बळजबरीने उभारण्यात आल्या आहेत, त्या मशिदींचे किंवा गिरजांचे पुन्हा पूर्ववत् मंदिरांमध्ये रूपांतर करण्यात आले पाहिजे, असे मी म्हणतो याचे अनेकांना आश्चर्य वाटेल.

जनतेच्या भावनांचा प्रश्न

माझ्या या भूमिकेचे सर्वांत महत्त्वाचे कारण असे की, मी स्वतः जरी मूर्ति-पूजेच्या विरुद्ध असलो तरी, निराकार–निर्गुण परमेश्वराची उपासना करणारे मूठभर लोक सोडल्यास ८५ टक्के हिंदूंमधील ९९ टक्के लोक या ना त्या स्वरूपात मूर्तिपूजा करणारे आहेत, हे मला माहीत आहे. खुद्द माझ्या कुटुंबातील लोकांनाही मी माझे मत पटवून देऊ शकलेलो नाही. अशा स्थितीत कोट्यवधी भारतीयांचे मतपरिवर्तन घडवून आणण्याची आकांक्षा मी बाळगणे ही शेखमंहमदीच ठरेल. आता हे सारे भारतीय माझे देशबांधव आहेत. माझ्या इतक्याच उत्कटतेने ते या भारतमातेवर प्रेम करतात आणि भारतीय परंपरा, संस्कृती, जीवनमूल्ये वगैरे गोष्टींबद्दल मला जो अत्यंत आदर व प्रेम वाटते त्यांचे जतन करण्याचे काम या जनतेलाच करावयाचे आहे. तिच्या भावनांचा अनादर करणे, तिच्या इच्छा पायदळी तुडविणे म्हणजे ज्या भारताचे उज्ज्वल भवितव्य घडवून आणण्यासाठी मी आपली अल्पस्वल्प शक्ती वेचू इच्छितो त्या भारताचा अपमान करण्यासारखे होईल. म्हणून या जनतेच्या पवित्र भावनांचा मान ठेवणे हे आपले कर्तव्य आहे असे मी समजतो.

जुनी मढी

ज्या मंदिरांच्या जागी मशिदी किंवा गिरजाघरे उभारली गेली आहेत, ती पुन्हा पूर्ववत् करण्याची गोष्ट काढताच काही सेक्युलरवाद्यांकडून असा सवाल केला जातो की, ती जुनी मढी कशाला उकरून काढता ? जे झाले ते होऊन गेले. त्या जुन्या आठवणी कशाला उगाळता ? ज्यांच्या दृष्टीने मंदिर, मशीद व गिरजाघर यांत काहीच फरक नाही व आज विद्यमान असलेल्या देवळांचे मशिदींत किंवा चर्चमध्ये रूपांतर झाल्यास ज्यांना तिळमात्रही दुःख होणार नाही, अशा महापुरुषांची संख्या हाताच्या बोटांवर मोजता येईल एवढी तरी असेल की नाही या विषयी मला शंका आहे. मानवी स्वभावाचा व विशेषतः हिंदू मनाचा जो काही अनुभव

गेल्या साठ पासष्ट वर्षांत मला आला आहे. त्यावरून माझे असे ठाम मत बनले आहे की, ज्यांची अस्मिता अजून मेलेली नाही, ज्यांना या देशाविषयी, इथली माती, इथली माणसे यांविषयी खरेखुरे प्रेम आहे, त्यांच्या मनाच्या कोणत्या तरी एका कोपऱ्यात, अंतःकरणात खोलवर कुठेतरी, त्या अत्याचाराची जखम अजूनही ताजी आहे. आपल्या पराभवाची ती खंत त्यांना अस्वस्थ करीत असते. त्यांच्या दृष्टीने मंदिराचे हे पुनरुज्जीवन म्हणजे त्यांच्या भग्न आशा – आकांक्षांचे पुनः-संजीवन असते. ज्यांनी आपले इमान रशिया-चीनकडे गहाण टाकले आहे असे साम्यवादी किंवा नास्तिकता हे एखादे महत्त्वाचे जीवनमूल्य आहे असा गोड गैर-समज ज्यांनी करून घेतला आहे असे समाजवादी, यांचा विचार या संदर्भात करणे अप्रस्तुत ठरेल. या भूमीशी, इथल्या संस्कृतीशी असलेले आपले नाते त्यांनी तोडून टाकले आहे. म्हणून त्यांच्या मताला काहीच किंमत देता येणार नाही.

जनतेचा अपमान

ज्याच्याजवळ असे कोणतेही उच्चतर जीवनमूल्य नाही, की ज्यांच्यापायी सर्वस्व झुगारून द्यावे, असे लोक या आंदोलनाला विरोध करण्यासाठी असा युक्तिवाद करतात की, " गोरगरीब जनता उपासमारीने तडफडत असता हे अस्मितेचे बनावटी बुजगावणे उभारण्यात काय अर्थ ?" देशाचा स्वातंत्र्यलढा चालू असता हेच लोक रशियाला वाचविण्यासाठी ब्रिटिश सत्तेचे ताबेदार बनले होते. त्यांनी आपले तन-मन–धन चीन-रशियांच्या चरणावर वाहिले आहे. त्यांना हे कसे कळणार की या अस्मितेच्या रक्षणासाठी गरीब जनताच या लढ्यात आघाडीवर आहे ? कारण, या जनतेला आपल्या परंपरेचा एवढा अभिमान आहे की, तो टिकविण्यासाठी वाटेल तेवढा त्याग करण्यास ती नेहमीच तयार असते. तिनेच तर या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. तेव्हा या आंदोलनाला विरोध करणे म्हणजे या गरीब जनतेचा अपमान करण्यासारखेच आहे.

घडले ते अन्याय्यच

परंतु या प्रश्नाचा मी केवळ भावनिक पातळीवरून विचार करीत नाही. या बाबतीतील माझा मूलभूत सवाल असा आहे की, " मंदिराच्या बाबतीत जे काही घडले ते अन्यायकारक, अपमानजनक होते की नाही ?" ज्या लोकांच्या अंतः-करणातून या प्रश्नाचे उत्तर असे येईल की, " त्यात काहीच अन्याय नव्हता, देवळांच्या मशिदी व गिरजाघरे बनविणे हे न्याय्य होते," त्यांची मने मेली आहेत असे समजून त्यांचा नाद सोडून दिलेला बरा; परंतु असे लोक मूठभरदेखील असणार नाहीत. उगीच खरे बोलून अल्पसंख्य समाजाला का दुखवा, त्यांची मते

का गमवा, असा स्वार्थी विचार करणारेच जास्त. त्यांनाही मनातून ती बोच अस्वस्थ करीत असते; पण त्यांचा राजकीय स्वार्थ त्यांना खरे बोलू देत नाही. अशा स्थितीत ज्यांची बांधिलकी सत्याशी आहे, त्यांनी आपल्या खऱ्या भावना व्यक्त करण्यास कचरता कामा नये. गांधीजींनी ज्या निर्भयतेची शिकवण आम्हाला दिली त्या निर्भयतेचा आविष्कार सत्यवक्तेपणातून झाला पाहिजे असे मला वाटते. या बाबतीत जेव्हा मी माझे मन खोलवर जाऊन तपासले, तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, या अन्यायाची चीड, खंत माझ्या अंतःकरणात खोलवर रुतून बसलेली आहे. १९४० साली वयाच्या विसाव्या वर्षी मी काशीला गेलो आणि तेथील विश्वनाथाच्या मंदिराच्या जागी मशीद असलेली जेव्हा मी पाहिली, तेव्हा माझ्या अंतःकरणाला अत्यंत यातना झाल्या. ती जखम सतत सलतच राहिली.

"आजवर तुम्ही काय झोपला होता?" असे जे लोक विचारतात त्यांना आपण सांगितले पाहिजे की, "होय आम्ही गाफीलपणाच्या झोपेत मग्न होतो. आता आम्ही जागे झालो आहोत!" "जब जागे तब सवेरा." (जेव्हा जागे झालो तेव्हा सकाळ झाली) या न्यायाने आमची पहाट आता झाली आहे. आमच्या झोपाळूपणावद्दल जग आमची छीः थू करील या भीतीने जागे होण्याचेच नाकारणे व झोपेचे सोंग घेऊन पडणे, यात मुळीच शहाणपण नाही. सत्याशी तर ती बेइमानी होईलच.

साडेचारशे वर्षांचा संघर्ष

अर्थात् रामजन्मभूमीच्या बाबतीत हिंदू लोक पूर्णपणे बेफिकीर राहिले असेही म्हणता येणार नाही. त्या भूमीच्या मुक्तीसाठी सतत साडेचारशे वर्षे संघर्ष चालत राहिला आहे. हा संघर्ष मुसलमानांविरुद्ध नसून तो अन्याय करणाऱ्या व चालू ठेवणाऱ्या राजसत्तेविरुद्ध होता; व आजही त्याचे स्वरूप हिंदू–मुस्लिम असे नसून मुस्लिम धार्जिणी राजसत्ता विरुद्ध न्यायप्रिय भारतीय जनता असेच आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या धामधुमीच्या काळात भारत सरकारने धर्मवेड्या लोकांच्या तावडीतून सारी पूजास्थाने मुक्त करण्याचा निर्णय घेतला असता तर त्याला फारसा विरोध झाला नसता. खरे तर सोमनाथच्या मुक्तीने त्या प्रक्रियेला चालनाही मिळाली होती. परंतु नेहरू सरकारने कच खाल्ली आणि ती प्रक्रिया खंडित झाली. १९४९ पासून रामजन्मभूमी सरकारच्याच कैदखान्यात बंदिस्त झाली आहे. त्या बंदिवासातून तिची सुटका करावयाची आहे.

अन्यायाचे परिमार्जन

अन्याय होऊ द्यायचा, त्यावर काही काळ लोटू द्यायचा आणि मग, "आता

त्याला फार दिवस झाले. विसरून जा ते." असे सांगून तो अन्याय तसाच चालू ठेवावयाचा ही क्लृप्ती काही नवीन नाही. आसाममध्ये घुसलेल्या परकीय नागरिकांच्या बाबतीत याच युक्तिवादाचा वापर अल्पसंख्यांकांच्या मतांवर डोळा ठेवून असणारे राजकीय पक्ष (इंदिरा काँग्रेस व कम्युनिस्ट) करीत असल्याचे आपण आज पाहतोच आहोत. " इतके मुसलमान आसामात घुसले आहेत. त्यांना कसे बाहेर काढावयाचे ? " असा प्रश्न ते करतात. त्यांना आपण विचारले पाहिजे की, " हे सारे घुसखोर तुमच्याच राजवटीत, तुमची फूस होती म्हणूनच घुसू शकले ना ? मग त्यांना बाहेर काढण्याची जबाबदारी तुमच्यावरच नाही काय ? " म्हणून असल्या लबाड युक्तिवादाने आपण फसता कामा नये. अन्याय झाला आहे हे लक्षात आल्यानंतर त्याच्या परिमार्जनासाठी संघर्ष सुरू करणे आणि तो अन्याय नाहीसा करून घेणे, हे माणसाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. हिंदू समाजातील अस्पृश्यांवर असाच अन्याय झाला होता. तो लक्षात येताच त्याच्या परिमार्जनाची प्रक्रिया या देशात चालू झाली. फुले, गांधी, आंबेडकर, सावरकर, शिंदे यांसारख्या थोर समाजसुधारकांनी अस्पृश्यतेच्या कलंकाची जाणीव आम्हाला करून दिली; आणि आम्ही तो कलंक धुऊन काढण्यास सज्ज झालो. आमच्या धर्मस्थानांवर झालेल्या अन्यायाची जाणीव आता आम्हास झाली आहे. तो अन्याय दूर झाल्याखेरीज हिंदू समाज स्वस्थ बसणार नाही. अल्पसंख्य समाजाच्या मतांवर सत्ता काबीज करणारे लबाड राजकारणी आणि फुकटचा मोठेपणा मिळवू पाहणारे समाजकारणी लोक या मुक्ति-संग्रामाला नाके मुरडतील, प्रतिगामी म्हणतील, किंबहुना फुटीरतेचा शिक्का मारून त्याला चिरडून टाकण्याचाही प्रयत्न करतील. परंतु जागृत झालेला हिंदू समाज या हातचलाख्यांना बळी पडणार नाही. उलट हा अन्याय दूर करण्यास कटिबद्ध असणाऱ्यांच्या पाठीशी उभा राहील; आणि आपली मते त्यांना देऊन लोकशाही मार्गाने आपल्याला मानबिंदू वाटणारी आपली पूजास्थाने मुक्त करून घेईल यात शंका नाही. मतदारांनी आपल्या मतशक्तीचा योग्य वापर करून भूतकाळातील आपल्या चुका दुरुस्त केल्या नाहीत तर, त्यांच्या दुर्दैवाला तेच जबाबदार ठरतील.

'अन्यायाचे परिमार्जन' याचा अर्थ केवळ हिंदूंवर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन असा नाही. जर कुठे मूळ मशिदीच्या किंवा चर्चच्या जागेवर बळजबरीने मंदिर उभारले गेले असेल तर, तोही अन्याय होय, आणि त्याचेही परिमार्जन झाले पाहिजे. (अर्थात् असे घडले असण्याची शक्यता हिंदू धर्माच्या सहिष्णुतेमुळे फारशी संभवत नाही.) तसेच मंदिराचे पुनरुज्जीवन केवळ काशी, मथुरा, अध्योध्या येथील मंदिरांपुरतेच मर्यादित राहता कामा नये. सबंध देशभर जेथेजेथे असे प्रकार घडले असतील, मग तो पुण्यातला शेख सल्ल्याचा दर्गा असो

की हाजीमलंग असो, तेथे हे आंदोलन पोहोचले पाहिजे. आपण लोकशाहीवर श्रद्धा बाळगणारे लोक आहोत. म्हणून हे परिवर्तन दंग्याधोप्याने नव्हे तर, लोकशाही मार्गाने सरकारवर नैतिक दडपण आणून घडवले पाहिजे. काही बाबतीत मशीद किंवा चर्च जमीनदोस्त न करता ते जसेच्या तसे ठेवून त्यात मूर्तींची प्रस्थापना करावी लागेल. उदाहरणार्थ, ताजमहाल हे शिवमंदिर होते असे सिद्ध झाल्यास त्यात शिवलिंगाची प्रतिष्ठापना करण्यावरच समाधान मानावे लागेल. देशाची फाळणी झाली नसती तर २५-३० टक्के मुसलमानांच्या दडपणामुळे हे अन्याय असेच खपवून घ्यावे लागले असते, हेही लक्षात ठेवले पाहिजे. कारण एवढी सुंदर इमारत मोडण्याचा माथेफिरूपणा हिंदूंकडून होणार नाही. सारांश, या बाटविल्या गेलेल्या मंदिरांचे शुद्धीकरण करताना या साऱ्या पैलूंचा विचार आपल्याला करावा लागेल. तरीपण अन्याय हा केव्हाही झालेला असला तरी, तो नाहीसा करणे हे अपरिहार्यच ठरते, ही गोष्ट नजरेआड करता कामा नये. विश्व हिंदू परिषदेच्या आंदोलनाने या विचाराला चालना दिली, हे फार मोठे कार्य झाले आहे यात शंका नाही.

+ +

'तरुण भारत' : १९·१२·८४

१०. राष्ट्रीय एकात्मतेची जबाबदारी एकट्या हिंदूंवरच का म्हणून ?

मुंबईच्या 'इलेस्ट्रेटेड वीकली' या लोकप्रिय इंग्रजी साप्ताहिकात अलीकडेच 'भारत हे हिंदू राज्य बनावे काय ?' या विषयावर हिंदू, मुसलमान व ख्रिस्ती लेखकांचे काही लेख प्रकाशित झाले आहेत.

हिंदू असणे गुन्हा आहे काय ?

हे लेख वाचल्यानंतर वाचकाच्या मनावर अशी छाप पडते की, हिंदू असणे हा जणू गुन्हा आहे; आणि या देशाने स्वीकारलेले धर्मनिरपेक्षतेचे उद्दिष्ट साध्य करण्याची जबाबदारी फक्त हिंदूंवरच आहे. मी स्वतः रूढ अर्थाने हिंदुत्ववादी नाही. आपण हिंदू आहोत, ही काही विशेष अभिमानाची गोष्ट आहे, असेही मला कधी वाटले नाही. कारण, माझ्या हिंदू असण्यात माझ्या स्वतःच्या कर्तृत्वाचा काही भाग आहे, असे मी मानीत नाही. किंवहुना कोणत्याच धर्माच्या अनुयायाने आपल्या धर्माबद्दल अभिमान बाळगण्यात काही अर्थ आहे, असे मला वाटत नाही. कारण, प्रचलित परिस्थितीत आपण आपला धर्म स्वतः निवडीत नाही. तो केवळ योगायोगानेच, नुसत्या जन्माने, आपल्याला चिकटलेला असतो. बहुतांश लोक आपल्या धर्माविषयी अज्ञानीच असतात; आणि धर्माच्या खऱ्या आज्ञांचे पालन करणारे तर फारच थोडे असतात. प्रत्येक धर्मानुयायी आपापल्या धर्माच्या आज्ञांचे पालन प्रामाणिकपणे करू लागला तर, धर्माधर्मातील वितुष्टे चटकन नाहीशी होतील. परंतु तसे घडत नाही; आणि धर्माच्या नावावर प्रचलित असलेल्या रूढींचेच पालन केल्याने आपण इतरांशी शत्रुत्व करू लागतो. अशा स्थितीत एखाद्या धर्माचा शिक्का आपल्यावर

असला काय किंवा नसला काय, त्याने फारसे काहीच विघडत नाही.

परंतु केवळ मी हिंदू आहे, म्हणून या देशातल्या साऱ्या धार्मिक वैमनस्याचे खापर कोणी माझ्यावर फोडू पाहील तर ते मला कधीच सहन अथवा मान्य होणार नाही. गुंडांनी वाटेल तशी गुंडगिरी करावी, आणि सज्जनांनी ती निमूटपणे सहन करावी, तिच्या विरुद्ध ब्रही काढू नये अशी अपेक्षा जेव्हा गुंड मंडळीच बाळगू लागतात, तेव्हा सज्जनांनाही परिस्थितीचा गांभीर्याने विचार करणे भाग पडते. या देशातील जातीय वैमनस्याची जबाबदारी बहुसंख्य असणाऱ्या हिंदूंवरच येऊन पडते, असा आभास जेव्हा हिंदू अथवा अहिंदू लोक निर्माण करतात, तेव्हा हिंदू असणे हा आपला गुन्हा आहे की काय, असा विचार हिंदूंच्या मनात सहजच येऊन जातो. बहुधा या आरोपाला भिऊनच अनेक हिंदूंना आपण हिंदू आहोत असे म्हणण्याची लाज वाटू लागते. ही एक प्रकारची विकृतीच आहे. ज्या प्रमाणे हिंदू असण्यात अभिमान बाळगण्यासारखे काही नाही, त्या प्रमाणे त्यात लाज वाटण्या-सारखेही काही नाही, हे आपण समजून घेतले पाहिजे. खरोखरी ज्या गोष्टी आपल्या हातात नाहीत, त्याबद्दल गर्व तरी कसला करायचा आणि शरम तरी कसली बाळगायची? मी स्वतः हिंदू-मुस्लिम ऐक्याचा कट्टर पुरस्कर्ता आहे. हिंदूं-मधील विषमतामूलक जातींचे निर्मूलन झालेच पाहिजे, यासाठी मी सतत झगडत आलो आहे आणि त्यापायी खूप सोसलेही आहे. आपण माणूस म्हणूनच जगावे, अशी माझी इच्छा आहे. माणुसकी हेच माझ्या जीवनाचे ध्येय आहे. पण म्हणून मला जो धर्म, जी जात जन्माने चिकटली आहे ती पुसून टाकण्याचा, ती लपविण्याचा प्रयत्न मी का करावा ते मला समजत नाही.

आजकाल ब्राह्मण असणे, हे फार तोट्याचे व गैरसोयीचे आहे. पण म्हणून मी माझी ब्राह्मण जात लपविण्याचा प्रयत्न केला तर, तो भ्याडपणाच ठरेल. जातीचे ते लेबल कायम राहिले तरीही मला माणुसकीने कसे जगता येईल, याचाच प्रयत्न मी केला पाहिजे. याच न्यायाने हिंदू म्हणून जगत असतानाही एक भारतीय म्हणून जगणेही मला सहज शक्य झाले पाहिजे. त्यासाठी हिंदुत्वाचा त्याग करण्याची काहीच गरज असता कामा नये. याच्या उलट असा अनुभव येतो की, स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणविणारे लोक जातपात, देव-धर्म यात इतके आकंठ बुडालेले असतात की, त्यांची ती धर्मनिरपेक्षता म्हणजे निव्वळ ढोंग, धूळफेक असल्याचे आढळून येते. हेच लोक हिंदू असणे हा जणू गुन्हा आहे, असे वातावरण निर्माण करतात.

इतरांची काही जबाबदारी नाही काय?

राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याच्या कामी बहुसंख्य या नात्याने हिंदूंची

जबाबदारी मोठी आहे, असे कोणी म्हटल्यास त्यात काही वावगे नाही. हिंदूंनीच नव्हे तर, प्रत्येक देशातील बहुसंख्य समाजांनी ती जबाबदारी स्वीकारली पाहिजे. अरब व बिगर अरब देशांतील मुसलमानांनी, पाश्चात्त्य व पौर्वात्य ख्रिश्चनबहुल ख्रिश्चनांनी व बौद्धबहुल बौद्धांनीही ती जबाबदारी नाकारता कामा नये. त्या-त्या देशातील अल्पसंख्यांकांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे; परंतु त्याचबरोबर तेथील अल्पसंख्यांकांनी आपल्या बहुसंख्य देशबांधवांशी जास्तीत जास्त एकरूप बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हेही तितकेच खरे आहे. यामुळे इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, वगैरे देशांत राहणाऱ्या भारतीयांनी तेथील स्थानिक जनतेच्या जीवनाशी एकरूप झाले पाहिजे, आणि आपली अस्मिता न सोडताही त्यांना तसे करता आले पाहिजे, असेच कोणीही म्हणेल. त्यांनी तसा प्रयत्न न केल्यामुळेच स्थानिक जनतेशी त्यांचे मनोमीलन घडून येऊ शकत नाही, हेही खरे आहे. परंतु या बाबतीत आपल्याला दुटप्पी भूमिका घेता येणार नाही. परक्या देशांत आम्ही आपली वेगळी चूल मांडून राहू, किंवा आपले घरकुल स्वतंत्र ठेवू, असा आग्रह धरावयाचा आणि आमच्या देशात मात्र अल्पसंख्यांकांनी राष्ट्रीय प्रवाहात सामील झाले पाहिजे, असे म्हणावयाचे, याला काही अर्थ नाही. ही भूमिका मान्य केल्यानंतरच भारतातील मुस्लिम व ख्रिस्ती अल्पसंख्यांकांनी भारतातील बहुसंख्य हिंदू समाजाशी एकरूप झाले पाहिजे, असे आपण म्हणू शकतो.

आधी देश की आधी धर्म ?

याच ठिकाणी एक मुद्याचा मार्मिक प्रश्न उपस्थित होतो. तो असा की, कोणत्याही देशातील नागरिकाने आपल्या जीवनात प्रथम स्थान कोणाला द्यावे ? देशाला की धर्माला ? लोकशाही व साम्यवादी देशांनी या प्रश्नाचे उत्तर देशाच्या बाजूने दिले आहे. तेथे धर्माला गौण स्थान देण्यात आले आहे. आधुनिक वातावरणाचा विचार करता ते योग्यच वाटते. कारण, त्यामुळे अनेक धर्माचे अनुयायी आपापल्या धर्माचे अनुकरण करूनही देशाशी एकनिष्ठ राहू शकतात. याच्या उलट बहुसंख्य इस्लामी देशांमध्ये धर्मालाच प्राधान्य दिले गेल्याने इतर धर्मीयांना तेथे स्थानच उरत नाही. आणि काही कारणांनी त्यांना तेथे राहावे लागले तर दुय्यम नागरिकत्व स्वीकारावे लागते.

भारतातील अल्पसंख्यांकानी ही गोष्ट नीट समजून घेतली तर, धर्माला प्राधान्य दिल्यास आपल्यावर दुय्यम नागरिकत्व स्वीकारण्याची पाळी येईल हे ओळखले पाहिजे; परंतु तसे करण्याची त्याची तयारी नाही. त्यांना देशाला दुय्यम स्थानही द्यावयाचे आहे आणि त्याच बरोबर दुय्यम नागरिकत्वही स्वीकारावयाचे नाही. त्यामुळे सारा प्रश्न निर्माण झाला आहे. ख्रिश्चनांच्या बाबतीत हा प्रश्न

तेवढासा महत्त्वाचा बनलेला नाही. कारण त्यांनी देशाला प्राधान्य देऊन धर्माला वैयक्तिक जीवनापुरते मर्यादित ठेवले आहे. परंतु मुसलमानांच्या बाबतीत तसे घडत नाही. त्यांचा आपल्या धर्मालाच प्राधान्य देण्याचा आग्रह आहे.

शाही इमामचे उद्‌गार

उदाहरणार्थ, दिल्लीचे शाही इमाम सय्यद अब्दुल्ला बुखारी यांनी अलीकडेच दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'वीकएंड रिव्हयू' या इंग्रजी साप्ताहिकासाठी श्री कुंकुम चड्ढा यांना दिलेल्या मुलाखतीत असे स्पष्ट म्हटले आहे की, "जगातील प्रत्येक मुसलमान हा सर्वप्रथम आपल्या धर्माशी एकनिष्ठ असतो, नंतर देशाशी... तुम्ही म्हणता, आम्ही अरबांकडे पाहू नये. का पाहू नये? आम्ही त्यांच्याशी अवश्य संबंध ठेवणार. कारण अरबस्तान हा आमच्या हजरत महंमदचा देश आहे." याचा अर्थ असा की, उद्या काही कारणाने भारत व अरबस्तान यांच्यांत वितुष्ट आले तर भारतीय मुसलमान भारताच्या बाजूने उभे राहण्याऐवजी अरबांच्या बाजूने उभे राहतील. पाकिस्तानशी झालेल्या भारताच्या तीन युद्धांच्या वेळी भारतीय मुसलमानांची स्थिती जी चमत्कारिक झाली होती, त्यांच्याकडे इतर लोक जे संशयाने पाहू लागले होते, त्याचे कारण मुसलमानांच्या या भूमिकेत सापडते.

इतिहासाची साक्ष

ही काही तात्कालिक बाब नव्हे. तिच्या मुळाशी मोठा इतिहास आहे. धर्माच्या आधारावर भारताची फाळणी करण्याची मागणी मुसलमानांनी केली होती आणि आपल्या गुंडगिरीच्या बळावर त्यांनी ती पदरातही पाडून घेतली होती. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर त्याचे जे धिंडवडे निघाले ते लक्षात घेऊन भारतीय मुसलमानांनी आपल्या भूमिकेत समंजसपणे बदल करावा, अशी अपेक्षा होती. परंतु तसे काही घडल्याचा प्रत्यय येत नाही. उलट, देशाला प्राधान्य देणाऱ्या हमीद दलवाई, न्यायमूर्ती छागला, बेग यांसारख्या देशभक्त मुसलमानांचा धिक्कार करून शाही इमामांसारख्या कट्टर जातीयवादी पुढाऱ्याच्या मागेच भारतीय मुसलमान आजही एकत्रितपणे उभे आहेत असे दिसते.

म्हणून तर श्रीमती इंदिरा गांधींसारखे धूर्त पुढारी शाही इमामांच्या साऱ्या देशद्रोही अटी मान्य करून त्यांना आपल्या बाजूला ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असल्याचे दृश्य आपल्याला दिसते. वस्तुतः इतिहासापासून धडा घेऊन येथील अल्पसंख्यांकांनी धर्मापेक्षा देशाला अधिक महत्त्व द्यावे, अशा प्रकारची शिकवण त्यांना देण्याचा प्रयत्न सर्व देशभक्तांनी करावयास हवा होता. परंतु राजकारणी मंडळींना देशापेक्षा सत्तेची खुर्ची अधिक मोलाची वाटत असल्याने तसा प्रयत्न

कोणीच करीत नाहीत, असे दिसते. मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याची एक पहिली पायरी म्हणून समान नागरिक कायदा करणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेने तसा आदेशही दिला आहे; परंतु त्या बाबतीत पुढाकार घेण्यास कोणताच राजकीय पक्ष तयार नाही.

मुस्लिमांच्या मागण्या

भारतातील राजकीय पक्ष आपली एक गठ्ठा मते मिळविण्यासाठी लाचार बनून आपल्या वाटेल त्या राष्ट्रद्रोही मागण्या मान्य करतात, हे अनुभवास आल्यावर येथील मुसलमानांनी आपल्यासाठी वेगळे कायदे असावेत, उर्दूला दुसरी राजभाषा म्हणून मान्यता द्यावी, सनदी नोकऱ्यांत, सैन्यात व पोलिसात भरमसाठ राखीव जागा मिळाव्यात यांसारख्या मागण्या पुढे मांडून फाळणीपूर्व परिस्थिती पुन्हा एकदा निर्माण केली आहे. याचाच अर्थ असा की, त्यांना एकात्मतेचे सोयरसुतक नसून आपला वेगळेपणा टिकवून ठेवावयाचा आहे. अशा स्थितीत ही राष्ट्रीय एकात्मतेची टाळी केवळ हिंदूंच्या एका हातानेच कशी काय वाजणार? हिंदूंची एकूण सहिष्णुतेची व सर्वसमावेशकतेची दीर्घ परंपरा लक्षात घेता याबाबतीत त्यांच्याकडून याबाबतीत नक्कीच सहकार्य मिळेल, हे ओळखून हटवादी अल्पसंख्यांकांची समजूत काढण्यावरच विचारवंतांनी भर दिला पाहिजे. त्यांना त्यांचे हित स्पष्ट शब्दांत सांगितले पाहिजे. परंतु तसे काहीच घडताना दिसत नाही. याच्या उलट मुसलमानांना भारतीय संस्कृतीपासून दूर ठेवणाऱ्या अलीगढ विद्यापीठाला मुस्लिमांचे प्रचार केंद्र बनविण्याच्या कामी राजकीय पक्षांमध्ये अहमहमिकाच लागलेली दिसते.

येथे हेही स्पष्ट केले पाहिजे की, अल्पसंख्यांकांप्रमाणे बहुसंख्य हिंदूही जर देशापेक्षा धर्माला अधिक प्राधान्य देत असतील, तर तेही चूकच आहे. सुदैवाने देशापेक्षा धर्माला अधिक महत्त्व देणाऱ्या हिंदूंची संख्या अगदीच नगण्य आहे; आणि जे थोडे हिंदू तसे आहेत ते अल्पसंख्यांकांच्या भूमिकेची प्रतिक्रिया म्हणून तशी भूमिका घेत आहेत. अल्पसंख्यांकांनी देशनिष्ठेला प्राधान्य दिले तर अशा हिंदूंच्या धर्मप्राधान्याचा आधारही नाहीसा होईल.

हिंदुत्वाचे सामर्थ्यही ओळखले पाहिजे

इतके सारे विवेचन केल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. ती अशी की, या देशाला एकत्वाच्या सूत्रात बांधून ठेवणाऱ्या ज्या अनेक शक्ती आहेत त्यांमध्ये हिंदुत्व हेही एक आहे. भारताची फाळणी होऊन त्याच्या पूर्वपश्चिम सरहद्दींवर पाकिस्तान व बांगला देश ही इस्लामी धार्मिक राज्ये झाली नसती तर

हिंदुत्वाला फारसे महत्त्व उरले नसते. कारण, मग या देशातील अल्पसंख्यांकांची भीती बहुसंख्यांकांना वाटली नसती. माझ्यासारख्या ज्या लोकांच्या विचारात या बाबतीत फरक घडून आला आहे, त्यांना तो फरक का करावा लागला हे समजून न घेतल्यामुळे त्यांच्यावर जातीयवादी बनल्याचा आरोप केला जातो. स्वातंत्र्यपूर्व काळात भारत हे सर्व जातीजमातींचे एकसंध राष्ट्र होते; आणि त्यांचे अखंडत्व कायम राहवे यासाठी अल्पसंख्यांकांचे काही हट्टही पुरविले पाहिजेत, असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटत होते. परंतु मुसलमानांनी ते अखंडत्वच नष्ट केल्यानंतर ज्या कारणासाठी त्यांचे हट्ट पुरवावयाचे ते कारणच नाहीसे झाले. उलट त्यांच्या हट्टातून शत्रुराष्ट्रांच्या रूपाने जो धोका निर्माण झाला आहे, त्याला तोंड देण्यासाठी उर्वरित भारताने एकजिनसी, एकसंध राहवे अशा दृष्टीने प्रयत्न करण्याची जरूर आता उत्पन्न झाली आहे. त्यासाठी मुसलमानांनी आपली जुनी फुटीरवादी वृत्ती सोडून भारतीयत्वाचा स्वीकार करावा, इथल्या भूमीशी, इथल्या मातीशी आपले नाते असून बाहेरच्या मुसलमानांपेक्षा इथले बिगर मुसलमान लोक आपल्याला अधिक जवळचे आहेत, हे ओळखावे असे मला वाटते. त्यासाठी येथील मुसलमानांमध्ये जे लोक फुटीरपणाची, वेगळेपणाची भावना वाढीला लावतात त्यांचा निषेध, धिक्कार झाला पाहिजे. राजकीय पुढारी हे काम करायला तयार नाहीत. म्हणून तुम्ही-आम्हीच आपापल्या कुवतीनुसार ते केले पाहिजे.

हिंदुत्वाची किमया

आणखी एक गोष्ट. असमसारख्या अन्यायपीडित राज्याला आपण भारतात राहावे, भारतातून फुटून बाहेर जाऊ नये, असे वाटण्याची जी अनेक कारणे आहेत त्यांपैकी हिंदुत्वाचे नाते हेही एक आहे, याचा विसर आपण पडू देता कामा नये. हे नाते नसल्यामुळे नागभूमी (नागालँड) किंवा मिझोराम यांसारख्या राज्यांत भारतापासून वेगळे होण्याची प्रवृत्ती प्रबळ असल्याचे दिसून येते. मणिपूरच्या फुटीरवाद्यांचा आधारही 'आम्ही हिंदू नसून मैतेयी आहोत', हाच आहे. पूर्वांचलातील राज्यांमध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांना पूर्ण मुभा देऊन तो प्रदेश ख्रिश्चन बनविण्याची संधी दिली गेली नसती, त्याऐवजी तेथील आदिवासींमध्ये हिंदू धर्माविषयी प्रेम निर्माण करण्यात आले असते, तर आज तो भाग भारतातून फुटून निघण्याचा जो धोका निर्माण झाला आहे, तो पुष्कळच टळला असता, यात शंका नाही. दक्षिणेतील तामिळनाडूमध्ये फुटिरतेच्या कारवाया कितीही केल्या गेल्या तरी हिंदू धर्म आणि भारतीय संस्कृती यांच्या स्वाभाविक ओढीमुळे ते राज्य भारतातून कधीच फुटून निघणार नाही, असे आपण विश्वासपूर्वक सांगू शकतो. फुटून निघण्याच्या धमक्या देऊन तेथील लोक सोयी सवलती मिळविण्याचा प्रयत्न अवश्य

करतील. परंतु भारताशी संबंधविच्छेद करणे त्यांना कधीच मान्य होणार नाही. ही सारी किमया हिंदू धर्म व भारतीय संस्कृती यांची आहे. यामुळे धर्म ही संकल्पनाच कालबाह्य झाली आहे, असे तत्वतः मानणाऱ्या माझ्यासारख्या माणसालाही हिंदू धर्माचे हे सामर्थ्य मान्य करावे लागते. माझ्या मतातील विरोधाभासाचे रहस्य हे असे आहे.

सारांश, धर्माच्या उपयुक्ततेविषयी आपल्या मनात तात्त्विक दृष्टचा काहीही शंका असल्या तरी, वास्तव जीवनातील त्याच्या स्थानाचे महत्त्व आपल्याला नाकारता येणार नाही. अशा स्थितीत या देशाची एकात्मता टिकवून ठेवण्याची जबाबदारी सर्वच धर्माच्या अनुयायांवर आहे. अल्पसंख्यांकांना त्या जबाबदारीतून निसटून आपली वेगळी चूल मांडता येणार नाही. त्यांनाही राष्ट्रीय एकात्मतेला हातभार लावावाच लागेल, ही गोष्ट त्यांच्या पुढाऱ्यांनी त्यांना समजाऊन सांगितली पाहिजे. ते तसे करणार नसतील तर इतरांनी ते काम केले पाहिजे. त्याशिवाय तरणोपाय नाही.

+ +

'विवेक' : २१·६·८९

११. मूर्तिपूजेच्या चक्रातून आमची सुटका होणारच नाही काय ?

मूर्तिपूजेविषयी माझ्या मनात एक प्रकारची नावड वयाबरोबर वाढत गेली. कदाचित् लहानपणी पोटासाठी नाइलाजाने, सक्तीने मूर्तिपूजा करावी लागल्यामुळे ती नावड निर्माण झाली असावी. अर्थात् माझ्या मनात मूर्तिपूजेविषयी नावड आहे, परंतु द्वेष, तिरस्कार किंवा विद्रोह नाही. मला ती निरर्थक वाटते. तिचा नाश किंवा समूळ उच्चाटन झाल्याखेरीज देशाला तरणोपाय नाही असे मला वाटत नाही. सगुण साकाराच्या भक्तीपेक्षा निर्गुण निराकाराची भक्ती अधिक बरी, अशी माझी भावना आहे. त्याबाबतीत मी कुणाशी वादविवाद करू इच्छित नाही. माझे म्हणणे पटवून देण्याची हिरीरीही माझ्यामध्ये नाही. माणूस आणि परमेश्वर यांच्यातील नाते अत्यंत खाजगी असावे, त्याचे प्रदर्शन कोणी करू नये, या विचारातून माझी ही भावना निर्माण झाली असावी. निर्गुण निराकारापेक्षा सगुण साकाराची भक्ती करणे अधिक सोपे जाते, म्हणून तिचा प्रसार जगभर झाला असावा. माणसाची ती एक गरज आहे, हे मला समजते. म्हणून तिच्याविषयी नावड असली तरी, तिच्याविरुद्ध धर्मयोद्धाच्या भूमिकेतून आपण संघर्ष केला पाहिजे, असे मला कधी वाटले नाही.

सर्वच धर्माना मूर्तिपूजेची गरज

मूर्तिपूजा हे मागसलेपणाचे लक्षण आहे असे ठरवून, ज्या हिंदू धर्मात मूर्तिपूजेचे प्रस्थ आहे तो धर्म व समाजही मागसलेला आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. तो प्रयत्न अत्यंत हास्यास्पद व केविलवाणा असतो. कारण जगात

मूर्तिपूजा नसलेला एकही धर्म अस्तित्वात नाही. त्या मूर्तिपूजेचे स्वरूप वेगवेगळे असते एवढेच. बौद्ध धर्म हा सर्वात जुना. जैन धर्मही त्याचाच समकालीन. हे दोन्ही धर्म मूलतः मूर्तिपूजा न मानणारे; परंतु कालांतराने तेच सर्वांत मोठे मूर्तिपूजक धर्म बनले. किंबहुना फारसी भाषेतील 'बुत' (मूर्ती) हा शब्दच 'बुद्ध' या शब्दापासून बनला आहे असे म्हणतात. आता आमचे बौद्ध मित्र एकीकडे हिंदू धर्मातील मूर्तिपूजेची निंदा करतात आणि दुसरीकडे बुद्धमूर्तीचे किंवा तसबिरीचे पूजन करतात. आपल्या आचरणातील ही विसंगती त्यांच्या लक्षात येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्धाचा अवतार कल्पून त्यांच्या मूर्तीची व चित्राची पूजा केली जात असेल तर, त्यातही कोणाला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

ख्रिस्ती धर्मात येशूच्या व मेरीच्या मूर्तीची पूजा सर्रास चालते. ती गंध-फुले अक्षता वाहून केली जात नसेल; पण मेणबत्त्या पेटवून, पुष्पगुच्छ सजवून, उदबत्त्या लावून अवश्य केली जाते.

इस्लाम हा मूर्तिपूजेचा कट्टर दुष्मन; परंतु त्यानेही मूर्तिपूजा सोडलेली नाही. फरक एवढाच की, त्याने प्रत्यक्ष मूर्तीऐवजी थडगी उभारली, आणि त्यांची पूजा चालविली. साधुसंतांच्या मजारावर फुलांच्या माळा, फुलांच्या चादरी वाहून, धूप दरवळवून त्यांची मूर्तिपूजा साजरी होते. मक्केतील काब्याच्या दगडाचे (संगे अस्वदचे) चुंबन घेणे हे त्यांच्या मूर्तिपूजेचे आणखी एक वेगळे रूप; परंतु मुसलमानांना इतरांनी केलेली मूर्तिपूजा मुळीच सहन होत नाही. किंबहुना मूर्तीचा विध्वंस करणे हे त्यांना पुण्यकर्म वाटते. मूर्तिपूजेचे प्रतीक असणारे मजार ते का नष्ट करीत नाहीत, हे समजणे कठीण आहे. याचा अर्थ एवढाच की, आम्ही करतो ती मूर्तिपूजा पवित्र पण तुम्ही करता ती मूर्तिपूजा निषिद्ध !

पुतळ्यांच्या रूपातील मूर्तिपूजा

आधुनिक काळात मूर्तिपूजेच्या एका वेगळ्याच स्वरूपाचे प्रस्थ माजले आहे. ते म्हणजे माणसांचे (व क्वचित प्रसंगी पशुपक्ष्यांचेही) पुतळे हे होय. पुतळे उभारण्याचे हे वेड इतके सार्वत्रिक बनले आहे की, त्यात काही दोष आहे, तत्त्वच्युती आहे, हे मूर्तिपूजेचा धिक्कार करणाऱ्यांच्याही लक्षात येत नाही. हे वेड इतक्या टोकाला गेलेले आहे की, आपण ज्या व्यक्तीचा पुतळा उभारतो तिची लायकी काय, तिने समाजासाठी काही त्याग केला आहे काय, समाजाची सेवा तिच्या हातून घडली आहे काय, वगैरे प्रश्नांचा विचारही आपण करीत नाही. जणू ते पुतळे उभारून आपण स्वतःलाच चिरंजीव बनवू पाहत असतो. काही पुतळे इतके ओबडधोबड, असुंदर व विद्रूप असतात की ते कुणाचे आहेत ते त्यांच्याखाली लिहिलेल्या नावावरूनच समजून घ्यावे लागते. एकदा पुतळा उभारला की, आपले कर्तव्य संपले

अशी आपली भावना असल्यामुळे, पुतळा उभारल्यानंतर लवकरच पशुपक्ष्यांकडून व माणसांकडून त्याची जी विटंबना चालू होते. ती अगदी पाहवत नाही. तसा मी स्वतः गांधींचा भक्त आहे. परंतु गावोगावी लोकांनी उभारलेल्या गांधींच्या पुतळ्यांची जी दैना पाहायला मिळते तिच्यामुळे या देशातले गांधींचे सारे पुतळे हलवून समुद्रात बुडवून टाकावेत, असा विचार माझ्या मनात अनेकदा येतो. अर्थात् माझी भूमिका व व्यथा कोणाला कळणार नाही, म्हणून मी ती स्वतःपुरतीच मर्यादित ठेवतो. तिचे प्रदर्शन करीत नाही; परंतु पुतळ्याच्या रूपाने जी विटंबना चालते ती खरोखरीच असह्य होते.

पुतळा उभारला जाणे हे मोठेपणाचे लक्षण असते असा समज प्रचलित झाल्यामुळे जे खरोखरी मोठे नाहीत, परंतु इतरांनी त्यांना मोठे मानण्यात ज्यांचा स्वार्थ दडलेला असतो ते अशा लोकांचे पुतळे उभारण्यात अहमहमिका करतात. या साऱ्या प्रकरणात अनेकदा अगदीच सामान्य, किंबहुना भ्रष्ट व नालायक लोकांचेही पुतळे उभारले जातात. या बाबतीतील अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे संजय गांधीचे होय. ज्या तरुणाने आपल्या आयुष्यात गुंडगिरीखेरीज काहीच केले नाही, त्याची संगमरवरी समाधी व पुतळे उभारले जावेत याचा अर्थ हाच की, आपण तारतम्याची जाणीव (सेन्स ऑफ प्रपोर्शन) किंवा औचित्यविचारच हरवून बसलो आहोत.

प्रेतपूजा हीही मूर्तिपूजाच

मूर्तिपूजेचा आणखी एक प्रकार मला मोठा क्लेशदायक व घृणास्पद वाटतो. तो म्हणजे प्रेतपूजेचा. ज्या शरीरातील प्राण अथवा आत्मा निघून गेलेला आहे, त्याला नमस्कार करणे आणि एखाद्या दगडाला-धोंड्याला किंवा मूर्तीला नमस्कार करणे यात तसा काही मूल्यात्मक फरक आहे काय? मला तरी तो तसा वाटत नाही. परंतु स्वतःला पुरोगामी, बुद्धिवादी, नास्तिक म्हणविणारे लोकही जेव्हा प्रेताला फुले वाहतात व नमस्कार करतात तेव्हा मला त्या त्यांच्या अडाणीपणाचे हसू येते. प्रेतावर वाहिली जाणारी फुले म्हणजे त्या फुलांचा अपव्ययच नव्हे तर, त्यांचा अपमानही आहे असे मला वाटते. परंतु मूर्तिपूजेच्या नावाने खडे फोडणारे, शहाणे-सुते लोकही प्रेतपूजेपासून अलिप्त नसतात. खरे म्हणजे निष्प्राण शरीराचे कसलेच कौतुक केले जाता कामा नये. या संदर्भात मला श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या जीवनातील एक घटना फार महत्त्वाची वाटते. शंकराचार्य परम मातृभक्त होते. त्यांची आई आजारी पडल्यावर ते तिला भेटायला गेले. संन्याशाने कोणत्याही कारणास्तव आपल्या घरी परत जायचे नसते. त्या नियमाचा भंग शंकराचार्यांनी केल्यामुळे गावचे ब्राह्मण नाराज झाले. त्यांनी शंकराचार्यांच्या घरावर बहिष्कार

टाकला. पुढे आर्याबेचे (शंकराचार्यांच्या मातेचे) देहावसान झाल्यावर तिच्या और्ध्वदेहिकाचा प्रश्न उपस्थित झाला. गावातील एकही ब्राह्मण त्या साध्वीचा देह उचलायला येईना. तेव्हा शरीराला केवळ माया समजणाऱ्या श्रीमत् शंकराचार्यांनी आपल्या मातेच्या देहाचे तीन तुकडे केले; आणि ते स्मशानात नेऊन त्यांचे और्ध्व-देहिक पार पाडले, असे सांगतात. याला म्हणतात तत्त्वनिष्ठा ! निष्प्राण कलेवर अखेर जाळून किंवा पुरून नष्ट करायचे असते. ते करण्यापूर्वी त्याला सजवून, शृंगारून त्याची मिरवणूक काढणे वगैरे कोडकौतुक निरर्थकच नव्हे काय ? अर्थात् मुसलमानांसारख्या ज्या समाजात अशी समजूत असते की, जगाच्या अंती सारे मृतात्मे पुन्हा जिवंत होणार आहेत आणि त्यांच्या पापपुण्याचा निवाडा परमेश्वर करणार आहे, म्हणून त्यांची शरीरे जशीच्या तशी पुरली पाहिजेत, त्यांच्या बाबतीत हे विवेचन लागू होत नाही. तरीपण त्या समजुतीला कसलाच वैज्ञानिक आधार नसतो आणि पुरलेल्या देहाची काही वर्षांतच माती होऊन जाते हा भाग वेगळा. परंतु मुसलमानांतही प्रेतपूजा आहेच. ती प्रत्यक्ष प्रेतपूजा नसते, थडग्याची पूजा असते, एवढेच.

या प्रेतपूजेचे कारण शोधायला फार दूर जाण्याची जरूर नाही. माणसाला आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी साकार मूर्ती हवी असते. जोपर्यंत शरीर उपलब्ध असते तोपर्यंत त्या शरीराचे कोडकौतुक करून त्या भावना व्यक्त केल्या जातात. जशी सद्भावना व्यक्त करण्यासाठी शरीराची मदत होते तशीच दुर्भावना व्यक्त करण्यासाठीही शरीरच उपयोगी पडते. आपल्या शत्रूविषयीचा तिटकारा व्यक्त करण्यासाठी त्याच्या प्रेताला लाथ मारण्याचे, त्यावर थुंकण्याचे. त्याचे धिंडवडे काढण्याचे प्रकार आजही असंस्कृत लोकांमध्ये केले जातात. पूर्वीच्या काळी ते फार मोठ्या प्रमाणावर केले जात.

यातून सुटका होणारच नाही काय ?

मूर्तिपूजेचे हे काही ठळक प्रकार. यांखेरीज इतरही अनेक लहान-मोठे प्रकार असतील. बुवामहाराजांना देवदेवता मानून त्यांची पूजा-अर्चा करणारे लोक सर्वच जाती धर्मांत आहेत. त्या भोळसटपणातून त्यांची मुक्तता व्हावी म्हणून आपण त्यांना त्यांच्या मार्गातील धोके दाखवून देऊ शकतो. परंतु त्याहून अधिक काही करणे शक्य नसते. कारण या असल्या बाबींमध्ये इतरांच्या उपदेशापेक्षा स्वतःचा अनुभव हाच शेवटी निर्णायक ठरतो. साईबाबा, सत्य साईबाबा किंवा विठोबा, बिरोबा, म्हसोबा यांच्या कृपेने आपली भरभराट झाली अथवा आपल्यावरील संकटे टळली अशी ज्या व्यक्तींची अनुभवाधिष्ठित भावना झाली असेल, तिला तुम्ही-आम्ही त्यातील फोलपणा कसा पटवून देणार ? आधुनिक काळातील विद्वान्,

वैज्ञानिक, तत्त्ववेत्ते अशा प्रकारच्या मूर्तिपूजेपासून प्रेरणा मिळवितात. त्यांना त्यापासून मनःशांती मिळते. ती प्रेरणा, मनःशांती ही काही काल्पनिक नसते; खरीच असते. अशा स्थितीत त्यांना त्या मूर्तिपूजेपासून आपण कसे परावृत्त करणार? 'बुडती हे जन पाहवेना डोळा' या संतोक्तीप्रमाणे आपण अस्वस्थ होऊन ते पाहत राहावयाचे किंवा आपले डोळे मिटून घ्यायचे, एवढेच आपल्या हातात उरते. पाश्चात्त्य देशांत हिंदू धर्माविषयीच्या आस्थेला जो नव्याने पूर आला आहे, तो पाहिल्यास मूर्तिपूजेच्या चक्रातून सध्या तरी आपली सुटका होईल अशी शक्यता दिसत नाही. 'जे जे होईल ते ते पाहावे !'

✣ ✣

'सोबत' : २४·४·८३

१२. या शिव्याशापाच्या चक्रातून आम्ही बाहेर पडणार की नाही ?

माझे बाळपण खेड्यात गेले. त्याकाळी शिवीगाळी हा आमच्या जीवनाचा एक अनिवार्य भाग होता. माझ्यासारख्या हूड मुलांचे तर ते एक अत्यंत प्रभावी शस्त्रच होते. भांडखोर स्वभावामुळे मी या विषयातला प्राज्ञ बनलो होतो. मराठी शिव्या पुरेशा वाटल्या नाहीत म्हणून मी माझ्या एका लिंगायत वर्गमित्राकडून कानडी भाषेतील इरसाल शिव्या शिकून घेतल्या होत्या. अर्थात् त्यावेळीही हे दुबळ्या व्यक्तीचे क्रोध-प्रदर्शनाचे एकमेव साधन असल्याचे मी ओळखले होते. कारण, शारीरिक सामर्थ्य अधिक असणारा मुलगा शिव्या देण्याच्या भानगडीत न पडता गुद्यांच्या द्वारे आपल्या भावनांची अभिव्यक्ती करीत असे; आणि प्रत्येक शिवीला प्रत्युत्तर म्हणून गुद्दा लगावताना म्हणत असे. "हा घे शिवीला कांदा !" कालांतराने मी अशा वातावरणात गेलो की, तेथे शिवीच काय पण अशिष्ट शब्दही उच्चारणे निषिद्ध होते. त्यामुळे माझ्या तोंडातली शिवी आपोआपच लुप्त झाली; आणि एके काळी आपण शिव्या देण्यात किती प्रवीण होतो याचा विसरच मला पडला.

समर्थ व सुसंस्कृत लोक शिव्या देत नाहीत

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे शिवी हे आपला दुबळेपणा लपविण्याचे एक साधन, संरक्षक ढाल आहे. त्यामुळे ज्यांना आपल्या सामर्थ्याविषयी पूर्ण आत्मविश्वास असतो ते लोक शिव्याशाप देत नाहीत. ते तोंडची वाफ दवडण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीनेच आपला राग व्यक्त करतात. अर्थात् ही झाली असंस्कृत व असभ्य लोकांची

गोष्ट ! सभ्य व सुसंस्कृत लोक आपला राग व्यक्त करण्यासाठी हाणामारीचा वापर न करता शिष्टसंमत शब्दांच्या द्वारे आपली नापसंती व्यक्त करतात. रानडे, गोखले, भांडारकर, गांधी ही या प्रकारची थोर मंडळी आपल्याला माहीत आहेत. आपले म्हणणे तर्कशुद्ध पद्धतीने व सौम्य शब्दांत मांडूनही केवढे प्रभावी होऊ शकते याचा पदार्थ-पाठच त्यांनी घालून दिला. याच्या उलट आज दलित पुढारी व लेखक जी भाषा वापरतात, शिव्याशापांचा जो सर्रास वापर करतात, तो पाहिला की त्यातून त्यांचा मानसिक दुबळेपणा व असभ्यतेविषयी त्यांना वाटणारे आकर्षण, हेच व्यक्त होते. अनेक वर्षे मनात दबून राहिलेला त्यांचा क्रोध, द्वेष, सूडभावना वगैरे किल्मिष त्या शिवीगाळीतून व्यक्त होत असल्यामुळे प्रारंभिक काळातील त्यांचे बोलणे-लिहिणे क्षम्य समजले गेले. त्यातून ते हळूहळू बाहेर पडतील अशी अपेक्षाही माझ्यासारख्यांनी बाळगली होती; परंतु ती अपेक्षा फोल ठरली. त्यांचा शिवराळपणा दिवसेंदिवस वाढतच गेला; आणि आता तर त्याचे कोणालाच काही वाटेनासे झाले आहे. किंबहुना सभ्य, सुसंस्कृत भाषेत बोलणे-लिहिणे म्हणजे आपले दालित्य गमावणे, म्हणजेच ज्याच्यामुळे आपल्याला महत्त्व प्राप्त झाले आहे, ते वेगळेपणच हरवून बसणे आहे, हे त्यांनी ओळखले आहे. कारण सोयी-सवलती मिळवण्यासाठी आपले दलितपण किती उपयुक्त ठरते याची त्यांना पुरेपूर कल्पना आता आली आहे. अर्थात् याची जबाबदारी पूर्णपणे दलितांवर नसून एस्. एम्., गोरे, सरदार, तर्कतीर्थ वगैरे जी बुजुर्ग मंडळी त्यांच्या त्या शिवराळपणाचे समर्थन करतात त्यांच्यावरही ती येते. कदाचित् आपण त्यांना सत्य सांगितले तर त्यांना ते आवडणार नाही, त्यांच्या मनातून आपण उतरू व ते आपल्याला जवळ करणार नाहीत आणि आपला मोठेपणा आपल्याजवळच राहून जाईल या भीतीने त्यांनी सत्य सांगण्याचे टाळले असावे. त्याचा परिणाम किती अनिष्ट झाला आहे ते आपण पाहतोच.

परिवर्तनाची, क्रांतीची वाटचालच थांबते

जी गोष्ट दलितांची, तीच हिंदू-मुस्लिम जातीयवाद्यांची व शेतकरी-कामकरी वर्गाचे नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांचीही आहे. अगदी खालच्या पातळीवर उतरून प्रतिपक्षाला शिवीगाळी करण्यात त्यांना मोठा पुरुषार्थ वाटतो; आणि त्यांच्याहून– ही त्यांचे अनुयायी अधिक असंस्कृत असल्यामुळे त्यांना तो शिवराळपणा मनापासून आवडतो. ते टाळ्या पिटून आपला आनंद व पाठिंबा व्यक्त करतात. त्यामुळे पुढाऱ्यांना जास्त स्फुरण चढते व ते जास्तच इरसाल शिव्या देऊ लागतात. एका दृष्टीने पाहिल्यास शिवीगाळी व माथेफिरूपणा करणे हा मानवाच्या विकासातला अगदी प्रारंभिक टप्पा असतो. माणूस जसजसा सुशिक्षित, सुसभ्य व सुसंस्कृत होत जातो

तसतसा तो टप्पा ओलांडून अधिक वरच्या पातळीवर जाण्याचा प्रयत्न करू लागतो. म्हणून शहाणे लोक या गोष्टीवद्दल न रागवता, शिवीगाळ करणारे लोक दुसऱ्या, तिसऱ्या टप्प्याकडे वाटचाल करू लागतील या आशेने व अपेक्षेने वाट पाहत राहतात. परंतु जेव्हा काही लोक तो पहिला टप्पा ओलांडण्याचेच नाकारतात आणि त्यातच शौर्य, पुरुषार्थ आहे असे समजू लागतात त्यालाच विद्रोह, क्रांती वगैरे नावांनी संबोधू लागतात तेव्हा खऱ्या क्रांतीची, परिवर्तनाची वाटचालच थांबते. असे का घडते याचा विचार करीत असता, मला भगवान बुद्धांच्या पूर्वजन्मातली एक जातक कथा आठवली. एका पूर्वजन्मात बोधिसत्त्व जेव्हा मरणोन्मुख झाले, तेव्हा त्यांनी आपल्या शिष्यांना जवळ बोलावून सांगितले, "या जन्मातल्या काही पापांमुळे मला पुढला जन्म डुकराचा घ्यावा लागणार आहे. त्यावेळी अमुक ठिकाणी, अमुक वेळी माझा जन्म होईल. त्या डबक्यातल्या डुकरीणीला जी पिले होतील त्यांतील एका पिलाच्या डोक्यावर अमुक खूण असेल. त्याला तुम्ही जन्मताक्षणीच मारून टाका; म्हणजे मला त्या योनीतील दुःखे भोगावी लागणार नाहीत." त्याप्रमाणे बुद्धांचे शिष्य त्या डबक्याच्या काठी जाऊन त्या पिलाला ठार मारणार इतक्यात ते पिलू काकुळतीला येऊन त्यांना म्हणाले, 'मला मारू नका. मला या डबक्यातच फार मजा वाटते आहे."

त्या कथेचा शेवट मला आता आठवत नाही. खूप वर्षांपूर्वी जेव्हा मी ही कथा वाचली, तेव्हा ती मला फार आवडली होती. कारण दुर्गुणांच्या, दुष्कृत्यांच्या नरकात पडलेल्या माणसाला त्यातच सुख वाटू लागते आणि त्यातून बाहेर पडण्यास तो तयार होत नाही. हा मानवी स्वभावच आहे. म्हणूनच अशिष्ट, अश्लील भाषा बोलणारे व तसले जीवन जगणारे लोक त्यातून बाहेर पडण्याचे नाकारतात हे आपण नेहमीच पाहत असतो.

सूडाचा प्रवास थांबणार की नाही ?

वर म्हटल्याप्रमाणे दलित बांधवांना समजावून सांगण्याचे काम, ज्यांच्यावर त्यांचा विश्वास आहे, त्या सवर्ण पुढाऱ्यांनी केले पाहिजे; परंतु तसे करण्याऐवजी मुलांच्या भांडणात सामील होऊन स्वतःच गालिप्रदान व मारामारी करणाऱ्या माथेफिरू प्रौढांप्रमाणे हे सवर्ण पुढारी सारा दोष सवर्णांच्या माथी मारतात; आणि आपण समतेच्या आंदोलनाला हातभार लावीत आहोत अशी स्वतःची समजूत करून घेतात. प्रत्यक्षात त्याचा परिणाम उलटाच होतो. कारण, या साऱ्या प्रकाराने सवर्ण लोक निष्कारण दुखावतात आणि ज्यांना मनापासून सामाजिक समता हवी आहे, असे लोकही उदासीन बनतात व आपल्याच कोषात गुरफटून गप्प बसतात. आपला काहीच दोष नसताना आपल्याला दलितांच्या दुरवस्थेबद्दल जबाबदार

धरले जात आहे, हे पाहून अशिक्षित व गरीब सवर्ण सूडाला सूडाने उत्तर देण्यास तयार होतात. यातून सूडाचा एक न संपणारा प्रवास सुरू होतो. म्हणून दलित व सवर्ण यांच्यातील समतोलवृत्तीच्या व शहाण्या लोकांनी ही शिवीगाळी स्वाभाविक आहे असे म्हणून तिचे कौतुक करण्याऐवजी ती लवकरात लवकर कशी थांबविता येईल याचा विचार केला पाहिजे; व आपली लोकप्रियता वाचविण्याला महत्त्व न देता ती जोखीम पत्करून त्या दिशेने प्रयत्न केले पाहिजेत. तसे ते न करतील तर त्यांना हवा असलेला समतेचा रथ पुढे चालू लागण्याऐवजी शिवराळपणाच्या चिखलातच रुतून बसेल.

'याद राखा'ची धमकी

वस्तुतः या क्षेत्रात जी धुळवड व रंगपंचमी चाललेली आहे, तिच्याशी माझा तसा काही प्रत्यक्ष संबंध नाही. मला जे वाटते ते मी माझ्या लेखांतून, पुस्तकांतून निर्भीडपणे गेली ५० वर्षे मांडीत आलो आहे; व त्याचे परिणामही न कुरकुरता भोगीत आलो आहे. परंतु माझा एखादा लेख वाचून कोणीतरी सवर्ण, दलित किंवा मुसलमान भरपूर शिव्याशाप देणारे पत्र मला पाठवतो तेव्हा या विषयासंबंधी माझे विचारचक्र चालू होते. अलीकडे असेच एक पत्र नागपूरहून श्री मनीष गोल्डी नावाच्या गृहस्थांनी मला पाठविले आहे. त्यात ते लिहितात, "जोशीबुवा, आंबेडकरांचं लिखाण खूपच आपल्याला झोंबलेलं दिसतं. आंबेडकरांची योग्यता तपासण्याच्या भानगडीत न पडता, आधी आपण आपली कुवत ओळखावी. एवढ्यातच आपले जातभाई क्रांतीबा फुल्यांवर 'सोबत'मध्ये भुंकले. तुमचा ब्राह्मणांचा खरा चेहरा जेव्हा लोकांसमोर आणला जातो तेव्हा पिसाळून उठता; पण हजारो वर्षं आपल्या टाचेखाली दुसऱ्यांना चिरडलंत तेव्हा त्यांना काहीच दुःख झालं नाही का हो ?"

"श्रीपाद जोशी, पु. ना. ओक, बाळ गांगल यांना उकरण्यासाठी 'सोबत'चा उकिरडा लई चांगला आहे. आपली विद्वत्ता 'सोबत'च्या भाडखाऊ संपादकासमोरच ओसंडून वाहते. भुंका जितकं भुंकायचं असेल तितकं, पण याद राखा तुम्हांला पुरून उरणारे, फुले–आंबेडकरांनी जन्माला घातले आहेत." (पत्रलेखकाचे शुद्धलेखन तसेच ठेवले आहे– लेखक)

श्री गोल्डी यांचा हा सारा राग गतवर्षी १३ मार्चच्या 'सोबत'मध्ये प्रसिद्ध झालेल्या माझ्या पत्रातील दोन वाक्यांवर आहे. १३–३–८९ रोजी म्हणजे तब्बल एक वर्षानंतर लिहिलेल्या पत्रातून त्यांनी तो व्यक्त केला आहे. ती दोन वाक्ये अशी होती:– "'रिडल्स'सारखे गचाळ लिखाण थोरामोठ्यांच्या नावावर प्रसिद्ध झाल्यास, त्या तथाकथित थोरामोठ्यांची खरी योग्यता लोकांना कळण्यास मदत

होते. उदाहरणार्थ 'रिडल्स' प्रकरण उद्‌भवले नसते तर, आंबेडकरांची सर्वकष विद्वत्तेची झाकली मूठ सव्वा लाखाची राहून गेली असती."

सौजन्याची उर्मट प्रतिक्रिया

मला येणारे कोणतेही पत्र मी सहसा अनुत्तरित ठेवीत नाही. शिवीगाळी करणाऱ्यांना तर मी आर्वजून उत्तर पाठवितो. ते सामान्यतः सौजन्यपूर्ण असते. या माझ्या शिरस्त्याप्रमाणे श्री गोल्डी यांनांही मी. उत्तर पाठविले, " मला शिव्या देऊन तुम्हाला समाधान मिळत असेल तर, ते समाधान तुमच्याकडून हिरावून घेण्याची माझी मुळीच इच्छा नाही. मात्र या शिवीगाळीतून तुम्ही कधी ना कधी स्वतःला मुक्त करून घ्यावे, अशी माझी इच्छा आहे", अशा अर्थाचे माझे उत्तर होते. (त्या पत्राची प्रतिलिपी मी ठेवली नाही; कारण त्या नंतर ते मला पुन्हा लिहिण्याची तसदी घेणार नाहीत, अशी माझी अपेक्षा होती. ती चुकीची ठरली !) माझ्या त्या पत्राला त्यांच्याकडून आलेले उत्तर असे होते :–

२९.३.८९

" आयु. श्रीपाद जोशी सस्नेह जयभीम.

सुसंस्कृत सभ्यतेने ओतप्रेम असे आपले उत्तर वाचून आनंद झाला. आम्ही अजूनही घाणीत आहोत, याविषयी आपण जी खंत व्यक्त केली त्याविषयी धन्यवाद.

आपण लोक कधी सरळ होणार नाही याची खात्री आम्हाला आहे. आपणास सरळ करावं असा आमचा अर्थातच हेतू नाही. जे लोक केवळ स्वतःसाठी जगत असतात, मानवी मूल्य म्हणजे पायदळी तुडविण्याची चीज आहे, असा ज्यांचा युगायुगांपासून समज आहे आणि जो आपल्या व्यतिरिक्त बाकी साऱ्यांना कःपदार्थ समजतो अशा वर्गाकडून सुधारण्याची अपेक्षा करणे योग्य नाही. एक गोष्ट मात्र सिद्ध झाली की ब्राह्मण आणि ब्राह्मणवाद या वेगवेगळ्या बाबी नाहीत.

भारताच्या सुंदर शरीरावर फुटलेले हे कोड एक दिवस हा देशच नष्ट करून टाकील. हा दोष आपला नाही. इथल्या 'आदिवासीं'चा आहे, ज्यांनी आपणाविषयी उदार दृष्टिकोण बाळगला.

तरी माणूस बनता आलं तरी पहा. कारण आमच्या, येणाऱ्या पिढ्या कदाचित उदार नसतील !

मनीष गोल्डी."

या पत्राला मात्र मी उत्तर पाठविले नाही. धमकीला धमकीने उत्तर देणे हा नेहमीचा मार्ग. आमच्या गुरूने त्या मार्गापासून दूर राहण्याची शिकवण आम्हाला दिली आहे.

सूडाचा अखंड प्रवास

द्वेष आणि सूडाची भावना हा मानवजातीला मिळालेला एक भयंकर अभिशाप आहे. त्याच्या आहारी गेलेला माणूस जणू वेडा बनतो, पिसाळतो. त्याच्यातील साऱ्या कोमल, श्रेष्ठ भावना जळून खाक होतात; आणि तो स्वतःच एक मोठे संकट बनून जातो. अनादि काळापासून सूडाचा हा प्रवास अखंडपणे चालत आलेला आहे. प्रत्येक युगात तो वेगवेगळी रूपे धारण करतो एवढेच! कधी तो आर्य व अनार्य, देव व दानव, सुर व असुर यांच्यांतील संघर्षाचे रूप धारण करतो, तर कधी राम-रावण, कौरव-पांडव, हिंदु-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, सवर्ण-हरिजन, मालक-मजूर, अधिकारी-नोकर यांच्यांतील संघर्षाच्या रूपाने प्रकट होतो. अर्थात् या सूडाच्या प्रवासालाच समांतर असा आणखी एक प्रवास चालू असतो; आणि त्याच्यामुळेच मानव जात टिकून राहते. प्रेम, औदार्य, सौजन्य, सहनशीलता वगैरे सत्त्वगुणांनी युक्त असा तो प्रवाह असतो. दुर्दैवाची गोष्ट अशी की, द्वेष आणि सूडाची भावना हे एक फार मोठे सामर्थ्य असून अन्यायनिवारणासाठी ते फार उपयुक्त असते, किंबहुना फक्त त्या साधनाचा वापर केला तरच अन्यायाचे निवारण होऊ शकते, अशी भावना सामान्य लोकांमध्येच नव्हे तर लहान मोठ्या समाजांचे नेतृत्व करणाऱ्या शहाण्यासुर्त्या पुढाऱ्यांमध्येही ठाण मांडून बसलेली आढळते. जगातील साधुसंतांनी, विचारवंतांनी, महात्म्यांनी हा गैरसमज दूर करण्याचा आपापल्या परीने नेहमीच प्रयत्न केला आहे. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन अधून-मधून हा सूडाचा प्रवास थांबतोही; परंतु ती स्थिती फार काळ टिकत नाही. माणसातील पशू पुन्हा जागा होतो आणि सूडाचा प्रवास पुन्हा चालू होतो. अगदी अलीकडील काळात आपल्या भारतवर्षात हे दोन्ही प्रकार घडल्याचे आपण पाहिले आहे. ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखालून देशाला मुक्त करण्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध द्वेष पसरवून व त्यांच्याविषयी सूडाची भावना निर्माण करून त्यांच्या साम्राज्य-सत्तेशी टक्कर देऊ पाहणारे दहशतवादी येथे उदयाला आले. त्यांना क्रांतिकारक असे संबोधून, आपण त्यांचा गौरवही केला. सुदैवाने त्यांचा मार्ग बहुजनसमाजाने नाकारला; आणि शांततेच्या मार्गाने जाणे पसंत केले. रानडे, गोखले, गांधी, जयप्रकाश यांच्यासारखे थोर नेते मिळाल्याने तो मार्ग काही अंशी सफलही झाला. आपला संघर्ष ब्रिटिश जनतेशी नसून तिच्या साम्राज्यवादी मनोवृत्तीशी आहे हे गांधीजींनी भारतीय जनतेला पटवून दिले. म्हणून ती त्यांच्या सत्याग्रहात प्रचंड संख्येने सामील झाली. त्याचवेळी सामाजिक क्षेत्रात जनजागृती करण्यासाठी पुढे आलेल्या फुले, रामस्वामी नायकर, आंबेडकर वगैरे पुढाऱ्यांनी जुनाच द्वेषाचा व सूडाचा मार्ग पसंत केला. ब्राह्मण व सवर्ण यांच्या द्वेषाने या पुढाऱ्यांना इतके



आंधळे करून टाकले होते की, परकीय सत्तेचा नंगा नाचही त्यांना दिसला नाही. त्यांच्या शिकवणुकीमुळे त्यांचे अनुयायी स्वातंत्र्य लढ्यापासून दूर राहिले आणि आपल्या काल्पनिक शत्रूशी शिवीगाळीच्या शस्त्रांनी लढण्यात मग्न झाले. स्वातंत्र्य-युद्ध चालू होते तोपर्यंत त्यांच्या या द्वेषाधारित सूड-संग्रामाच्या झळा फारशा पसरल्या नाहीत; परंतु एकदा स्वातंत्र्य मिळून सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर त्यांच्या या द्वेष–प्रसाराला पुन्हा एकदा ऊत आला. शिवीगाळी व शिवराळपणा हेच त्यांचे त्यांच्या गुरुंकडून मिळालेले ब्रह्मास्त्र होते. वस्तुतः त्यांना ते मनसोक्त वापरू देणेच शहाणपणाचे होते. वापरून वापरून ते लकरच बोथाट झाले असते. महात्मा गांधींना त्यांच्या विरोधकांनी काय कमी शिव्याशाप दिले ? पण त्यांच्या वाणीतून अथवा लेखणीतून चुकूनही कधी अनुदार शब्द बाहेर पडला नाही; मग असभ्य उद्‌गाराची तर गोष्टच सोडा. त्याचा एवढा परिणाम झाला की, सारे जग त्यांचे भक्त बनले. परंतु आमच्या काही हिंदुत्वनिष्ठांना गांधींच्या या श्रेष्ठ मार्गाचे महत्त्व कळले नाही; आणि त्यांनी फुले–आंबेडकरांवर व त्यांच्या अनुयायांवर धर्मयोद्‌ध्याच्या आवेशाने उलट चिखल फेक केली. परिणामी हे आधुनिक सत्यशोधक जास्तच चेकाळले व बेताल बडबड करू लागले. हा ताजा अनुभव लक्षात घता, समंजस लोकांसमोर असाच प्रश्न उभा राहिला की, "या शिव्याशापांच्या चक्रातून आमची सुटका कधी होणार आहे की नाही ?"

आम्ही तर दलितांहून दलित होतो !

मला मात्र असल्या 'प्रेमपत्रां'चा राग येण्याऐवजी ती लिहिणाऱ्यांची कीवच येते– जशी ब्राह्मण व सवर्ण लोकांविरुद्ध भडक भाषणे करणाऱ्या गावगन्ना पुढाऱ्यांची येते. मी स्वतः गांधींचा भक्त असलो, किंबहुना जगाच्या इतिहासात गांधींएवढा अष्टपैलू महापुरुष दुसरा कोणीही झाला नाही, याविषयी माझी खात्री असली, तरी गांधींच्या चुका, उणीवा, दुबळेपणा यांची सर्वांत अधिक तीव्र जाणीव मला होते. म्हणून वेळोवेळी गांधी आणि गांधीविचार यांवर मी टीकाही करीत आलो आहे. कारण मी व्यक्तिपूजक नाही आणि व्यक्तिपूजा ही मी मूर्तिपूजेइतकी निषिद्ध मानतो. याच्या उलट फुले, आंबेडकर, सावरकर, मार्क्स, हेडगेवार वगैरेंचे अंधभक्त इतके कट्टर व्यक्तिपूजक असल्याचे आढळून येते की, तेवढी कट्टरता खोमेनीच्या अनुयायांमध्येच असू शकेल. त्यांची दैवते त्यांच्या मते सर्वज्ञ असतात. त्याविषयी शंका घेतलेली त्यांना मुळीच खपत नाही. तशी शंका घेणाऱ्याला ते शिव्यांची लाखोली वाहतात. वस्तुतः यातून त्यांची मर्यादाच व्यक्त होते; आणि कोणत्या खोट्या इतिहास–कल्पनांवर (मिथ्सवर) त्यांचा मनःपिंड पोसलेला आहे याची कल्पना येते. उदाहरणार्थ, ब्राह्मणांनी इतरांना हजारो वर्षे आपल्या टाचेखाली

चिरडले, हा अनेकांनी जोपासलेला असाच एक भ्रम आहे. वेद, उपनिषदे, पुराणे, मनुस्मृती, रामायण, महाभारत इत्यादींचे रचनाकार बहुतेक अब्राह्मणच होते. व्यास, वाल्मिकी, राम, कृष्ण, कौरव, पांडव हे सगळेच अब्राह्मण होते. (उलट, सर्वांच्या शिव्या खाणारा रावण ब्राह्मण होता !) पाच-सहा हजार वर्षांच्या ज्ञात इतिहासात पेशवाईचा ५०-६० वर्षांचा अपवादात्मक कालखंड वगळता इतर सर्व काळी सर्वत्र अब्राह्मणांचीच राज्ये होती. त्यांमध्ये मराठे होते, धनगर होते, कोळी होते, आदिवासी होते. कदाचित हरिजनही असतील ! त्यांना प्रचलित समाज-व्यवस्था मान्य नसती तर, त्यांनी ती कधीच बदलून टाकली असती; आणि अत्याचारी ब्राह्मणांचा निःपात केला असता. एका गोडशाच्या गुन्ह्यावरुन महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतील ब्राह्मणांचे अब्राह्मणांनी वघता-बघता कसे तळपट करून टाकले ते आपण पाहिलेच आहे. तेव्हा जेमतेम एक-दोन किंवा साडेतीन टक्के असणाऱ्या तथाकथित अत्याचारी (परंतु निःशस्त्र व दुबळ्या) ब्राह्मणांचे पारिपत्य करणे शस्त्रधारी अब्राह्मणांना मुळीच अशक्य नव्हते. ब्राह्मणांनी सर्व समाजावर जादू केली, असे म्हणावे तर, जादू इतकी परिणामकारक असू शकते हे मानावे लागेल ! इंग्रजांच्या आगमनानंतर तर मायबाप सरकार स्वातंत्र्यप्रेमी ब्राह्मणांचे शत्रू बनून, अब्राह्मणांना पाठीशी घालीत होते ! शिवाय ब्राह्मणांतील दलितांचे काय ? खरे तर आम्ही भिक्षुक मंडळी दलितांहून दलित होतो. आमच्या वर्गाचे महार आमच्यापेक्षा तालेवार व रुबाबदार होते. खोत, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे वगैरे मंडळी आमच्याकडे तुच्छतेने पाहत व अपमानास्पद वागणूक देत. दारिद्र्यामुळे आम्ही मान वर करून त्यांच्या डोळ्याला डोळा भिडवू शकत नव्हतो. पण म्हणून काही आम्ही इंग्रजी सत्तेचे स्वागत केले नाही; अथवा जुलूम करणाऱ्यांना शिव्याशाप देत बसलो नाही. आम्ही ज्ञानसाधना केली, त्यासाठी अपार कष्ट झेलले आणि दारिद्र्यातून स्वतःची सुटका करून घेतली. दलितांनी सवलतींकडे डोळे लावून न बसता असे परिश्रम केले तर, त्यांनाही मुक्त होता येईल. वस्तुतः आज दलितांवर अत्याचार करणारे लोक ब्राह्मण नसून स्वतःला फुलेआंबेडकरांचे अनुयायी म्हणविणारे सत्यशोधक आहेत, हे ओळखून दलित बांधवांनी शिव्याशापाच्या चक्रातून बाहेर पडून ज्ञानसाधनेला वाहून घेतले तर त्यांच्या उन्नतीचा मार्ग कोणीही अडवू शकणार नाही.

अर्थात् शिवीगाळीचा मोह एकदा जडला की त्यातून सुटणे कठिणच असते !

\+ \+

'वाङ्मय-शोभा' : सप्टेंबर ८९

१३. दलित साहित्य : एक चिन्तन

पुस्तकांनी गच्च भरलेली माझी खोली पाहून एखाद्याला आश्चर्य वाटतं; आणि तो कुतूहलानं विचारतो, "एवढी सारी पुस्तकं तुम्ही वाचली आहेत ?"

"मुळीच नाही !" मी त्याला आश्चर्याचा धक्का देतो.

"मग एवढा मोठा संग्रह कशाला केलाय ?" तो विचारतो.

"तुमच्यासारख्या लोकांवर आपल्या बहुश्रुतपणाची छाप पाडायला !" मी मिस्किलपणानं उत्तरतो.

माझ्या उत्तरातला मिस्किलपणा त्याला कळतो. मग तो म्हणतो, "छे ! छे ! इतरांवर छाप पाडण्यासाठी जीव टाकणाऱ्यांपैकी तुम्ही नाही. तुम्ही मला बनवताय !"

"मी खरंच सांगतो तुम्हाला ! मी यातली फार थोडी पुस्तकं वाचली आहेत. पुस्तकं गोळा करण्याचा शौक असणाऱ्यांपैकी मी नाही. पण आपल्या विषयाचा संदर्भ पाहायला ग्रंथालयात जावं लागू नये म्हणून मी ही पुस्तकं जमवली आहेत. त्यामुळं त्यांच्यापैकी कोणत्या पुस्तकात माझ्या कामाचा मजकूर कुठं आहे, तेवढं मला माहीत असतं. त्यासाठी प्रत्येक पुस्तक संपूर्ण वाचावं लागत नाही. ते माझ्या धंद्याचं गुपित आहे. 'ट्रेड सीक्रेट !'" मी सांगतो.

परंतु माझ्या या खुलाशावर कुणाचाच विश्वास बसत नाही. १७०० लेख आणि १८० पुस्तकं लिहिलेल्या लेखकाचं वाचनही तसंच जबरदस्त असलं पाहिजे, अशी सगळ्यांची समजूत असते. त्यामुळं सर्वांत जास्त लिहिणारा आणि सर्वांत कमी वाचणारा असा मी एकमेव लेखक आहे, हे कुणाला खरंच वाटत नाही.

सामान्यतः इतरांचं बोलणं शांतपणे ऐकून घेण्याऐवजी माणसाला स्वतः बडबड करण्यात मजा वाटते, पण चार ओळीचं कार्ड लिहायचं म्हटलं की त्याच्या जिवावर येतं. मला मात्र स्वतः बोलण्यापेक्षा इतरांचं बोलणं ऐकण्यात गंमत वाटते. इतरांना मुळीच बोलू न देता आपलंच घोडं पुढं दामटणाऱ्या लोकांचा मला मुळीच राग येत नाही; उलट त्यांची ती धडपड पाहून मला हसू येत राहतं. कारण, बोलण्यापेक्षा लिहिण्यात मला जास्त आनंद मिळतो. त्यामुळं मी जन्मभर लिहीतच राहिलो.

मात्र असं का घडलं याचा खुलासा जेव्हा मी करतो, तेव्हा अनेकांना ते पटतं. तसं पाहिलं तर इतर सर्वसामान्य मुलांप्रमाणं मलाही वाचनाची आवड होती. त्यावेळी मी खूप कथा-कांदबऱ्या, नाटकं, चरित्रं वगैरे वाचून काढली होती. परंतु कालांतरानं मला लिहिण्याची गोडी लागली; आणि जेव्हा व्यवसाय म्हणून लेखन करायला सुरुवात केली तेव्हा अष्टौप्रहर लिखाण केल्याशिवाय गत्यंतर उरलं नाही. पोटापुरतं मिळवण्यासाठी प्रारंभिक काळात खूपच लिखाण करावं लागलं. पुढं त्याचीच सवय लागली; आणि वाचनाची आवड मावळत गेली. फक्त कामापुरतं वाचन करायचं, असं वळण मनाला पडलं. कथा-कादंबऱ्यांचं वाचन तर जवळजवळ बंदच झालं. मी स्वतः चार कादंबऱ्या आणि साठसत्तर कथा लिहिल्या असूनही हे घडलं याचं मलाही आश्चर्य वाटतं. (हिंदी, उर्दू, गुजराती व बंगालीतून तर मी अनेक कथा-कादंबऱ्या मराठीत आणल्या आहेत !)

दलित साहित्याचं माफक वाचन

ही सारी प्रस्तावना अशासाठी केली आहे की, दलित साहित्य हा माझ्या अभ्यासाचा विषय कधीच नव्हता. खरं तर मराठी साहित्याचा अभ्यासच मी केलेला नाही. मी मुख्यतः उर्दू साहित्याचा सखोल अभ्यास केला. कारण, वर्ध्याच्या अध्यापन मंदिरात मला तो विषय शिकवावयाचा होता. तो अभ्यास मी इतका केला की, त्यातून उर्दू साहित्याचा इतिहास तयार झाला. 'उर्दू के अदीब' या शीर्षकानं तो ग्रंथरूपात प्रकाशित झाला; आणि त्याच्या दोन आवृत्त्याही निघाल्या. त्याच सुमारास हिंदी साहित्याचाही मी बराच अभ्यास केला; परंतु मराठी साहित्याचा अभ्यास करण्याची कधी पाळीच आली नाही. त्यामुळं दलित साहित्याच्या बाबतीतही मला फारशी उत्सुकता कधी वाटली नाही. ते वाचण्याची संधी मला योगायोगानंच आली.

एकदा मी माझ्या मुलीकडे (डॉ. के. एस्. राज्यश्री) मैसूरला गेलो असता, तिथं अनेक दलित लेखकांची पुस्तकं दिसली. राज्यश्री ही युक्रांदमध्ये काम केलेली असल्यानं तिची दलित लेखकांशी चांगली मैत्री आहे. वस्तुतः तिचा अभ्यासविषय

साहित्य हा नमून भाषाशास्त्र हा आहे; परंतु दलित साहित्याविषयी तिला आत्मीयता असल्यामुळं तिच्याकडे बरंच दलित साहित्य होतं. त्याचा तिला उपयोगही झाला. भाषाशास्त्राच्या विशेष अध्ययनासाठी होनोलूलू (हवाई बेटे) च्या ईस्ट-वेस्ट सेंटरमध्ये दीड वर्ष राहण्याची संधी मिळाली असता तिथल्या मंडळींच्या आग्रहावरून तिथं तिनं मराठी दलित साहित्यावर एक निबंध वाचला होता; आणि त्याची खूप वाखाणणीही झाली होती.

सांगायचं तात्पर्य असं की, राज्यश्रीकडे मला बरंच दलित साहित्य वाचायला मिळालं; आणि लिखाणाचं काम बरोबर नेलेलं नसल्यामुळे मी ते साहित्य निवांत-पणानं वाचून काढलं. 'माझे विद्यापीठ' (नारायण सुर्वे), 'गोलपिठा' (नामदेव ढसाळ), 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' (मल्लिका अमरशेख–ढसाळ), 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' (माधव कोंडविलकर), 'तराळ अंतराळ', 'दौडी' व 'सांगावा' (शंकरराव खरात), 'बलुतं' व 'कोंडवाडा' (दया पवार), 'छावणी हलते आहे' (अर्जुन डांगळे), 'उपरा' (लक्ष्मण माने), 'गावकी' (रुस्तुम अचलखांब), 'गबाळ' (दादासाहेब मोरे), 'उत्पात' व 'अक्करमाशी' (शरण-कुमार लिंबाळे), 'उचल्या' (लक्ष्मण गायकवाड) वगैरे दलित साहित्याचं वाचन त्यावेळी व त्यानंतर झालं. कन्नड भाषेचे सर्वश्रेष्ठ (आणि बहुधा एकमेव) दलित लेखक देवनूरु महादेव हे राज्यश्रीचे सहकारी व स्नेही. त्यांच्याशी दलित साहित्या-विषयी भरपूर चर्चा त्यावेळी झाली आणि त्यानंतरच्या भेटींतही होत राहिली.

वस्तुतः हे नव्या प्रकारचं दलित साहित्य वाचनात येण्यापूर्वी अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे व शंकरराव खरात यांचं बरंच गद्य-पद्य साहित्य मी वाचलं होतं; पण त्याच्यावर नव्या 'दलित'त्वाचा शिक्का तोपर्यंत बसलेला नव्हता. साने गुरुजी व श्री. म. माटे यांनी अस्पृश्यांच्या (किंवा अस्पृष्टांच्या) जीवनाची जी शब्दचित्रं आपल्या कथांमधून रेखाटली होती. तशीच शब्दचित्रं कथा-कवितांच्या स्वरूपात अधिक ठळकपणे या हरिजन लेखकांच्या साहित्यात आढळली. ('दलित' हा भोंगळ शब्द त्यावेळी रूढ झालेला नव्हता!) त्यामुळं त्या साहित्याविषयी वेगळे-पणा किंवा परकेपणा असा वाटला नाही. शंकरराव खरात हे तर माझे स्नेहीच होते. 'विस्कटलेलं घरटं' ही ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादावरील माझी कादंबरी त्यांना खूपच आवडली होती. त्यांचं साहित्यही मला आवडत होतं. यामुळे ते आंबेडकर-भक्त व मी गांधीभक्त असूनही आमच्या मैत्रीत व्यत्यय आला नाही. कालांतरानं 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा' या त्यांनी संपादित केलेल्या ग्रंथाची मी सविस्तर समीक्षाही केली होती. नारायण सुर्वे व दया पवार यांच्याशी प्रत्यक्ष आणि शरणकुमार लिंबाळे यांच्यांशी पत्रानं परिचय झाला. ही सर्वच मंडळी मला आवडली. दलित म्हणून त्यांच्यात काही वेगळेपणा आहे असं जाणवलं नाही.

'दलित' शब्दाचा गैरवापर

'दलित' हा शब्द भोंगळपणानं वापरला जातो, असं मी वर म्हटलं आहे. त्याचा थोडासा खुलासा केला पाहिजे. 'दलित' हा संस्कृत भाषेतला शब्द असून त्याचा अर्थ असा आहे :– (१) दळलेले, भरडलेले. (२) फोडलेले, तुकडे केलेले, चुरडलेले, मोडलेले. (३) तुडविलेले, खाली ठेवलेले, चेपलेले, दाबलेले– हलकी जात, वर्ण; इंग्रजी 'डिप्रेस्ड क्लासेस' यास प्रतिशब्द ('महाराष्ट्र शब्दकोश') म्हणजे समाजातील तुडवल्या गेलेल्या, खाली ठेवल्या गेलेल्या वर्गांना उद्देशून हा शब्द वापरला गेला. येथपर्यंत ठीक होते; परंतु हळूहळू काही मंडळींनी त्या शब्दावर आपला एकाधिकार स्थापन केला. पूर्वास्पृश्यांपैकी महार (नवबौद्ध) म्हणजेच दलित, इतकं त्याचं स्वरूप संकुचित केलं गेलं. वस्तुतः त्या शब्दात तसा अर्थ करावा असं काही नाही. जी जी व्यक्ती सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्ट्या दडपली गेली असेल, ती दलितच समजली गेली पाहिजे. यादृष्टीनं पाहिल्यास स्त्री ही सर्व प्रकारचं गुलामीचं जिणंच जगत असते. दलित स्त्रीला तर दलित पुरुषांकडूनच नव्हे, तर आंबेडकरांचे अनुयायी म्हणविणाऱ्या दलित लेखकांकडूनही न्याय मिळत नाही. दलित पुरुषांची आत्मचरित्रं आत्मकेंद्रित व अहंकारग्रस्त असून त्यांमध्ये दलित स्त्रीवर अन्याय झाला असल्याची तक्रार मल्लिका अमरशेख ढसाळ, ज्योती लांजेवार, शोभा बागुल यांसारख्या दलित लेखिका जाहीरपणे करतात. यावरून हा प्रश्न किती जटिल आहे याची कल्पना येते. तसं पाहिलं तर सवर्णांमध्येही अशा अनेक व्यक्ती व जाती-जमाती आहेत की त्यांना दलितांचं जिणं जगावं लागतं. अगदी, गमतीचं उदाहरण घ्यायचं तर ब्राह्मणांमधील भिक्षुक ही जमात अत्यंत दलित असते. ब्राह्मणांपासून महारांपर्यंत सर्वच जाती भटाला क्षुद्र समजतात; आणि आर्थिक दृष्ट्या कित्येक भटांपेक्षा वतनदार महार अधिक सुखवस्तू असतात. अंत्यसंस्कार करणारा भटजी तर, दलितांहून दलित समजला जातो. त्याला 'कारटा' म्हणतात. त्याचा स्पर्शही इतर ब्राह्मण टाळतात. केवळ भंग्याशीच त्याची तुलना होऊ शकते. भंगी हा समाजातला अत्यंत आवश्यक असणारं, मैला वाहून नेण्याचं, सफाईचं काम करून समाजाच्या स्वास्थ्याचं रक्षण करतो; पण तोच जातींच्या उतरंडीत सर्वांत खालचा, तळचा समजला जातो. इतका की, इतर अस्पृश्य जमातीही त्याला जवळ करीत नाहीत. महारवाड्यात किंवा मांगवाड्यात त्याला राहायला जागा दिली जात नाही. हीच गोष्ट अमंगल समजलं जाणारं और्ध्वदेहिक करणाऱ्या कारट्याची आहे. हे दोघे खरे दलित ! परंतु हा शब्द पूर्वाश्रमीच्या महारांनी स्वतःसाठीच वापरायला सुरुवात केली. मग हळूहळू इतर अस्पृश्य जमाती त्या शब्दाच्या राहुटीत घुसल्या. त्यांच्या मागोमाग पारधी, लमाण, डोंबारी, कैकाडी, टकार, उचल्ये,

भटके, विमुक्त वगैरे त्या राहुटीत प्रविष्ट झाले. मग दरिद्री मुसलमानांचं लेंढार बरोबर घेऊन हाजी मस्तानानं त्या राहुटीत प्रवेश मिळवण्याची धडपड सुरू केली. अस्पृश्य नसलेल्या गोसावी, जोशी, नंदीवैलवाले, वासुदेव, मुरळचा, देवदासी, वेश्या वगैरे जाती-जमातींनीही त्या राहुटीत घुसण्यास सुरुवात केली. या सगळ्यांच्या गर्दीमुळे ती राहुटी इतकी मोठी झाली की, तिच्याबाहेर राहिलेल्या जाती-जमाती केविलवाण्या दिसू लागल्या. इतकं सारं झाल्यावरही स्वत:ला दलितत्वाचे ठेकेदार समजणारे लोक आपल्याच जातीच्या आणि फुले–आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या लोकांपुरताच दलित शब्दाचा वापर केला जावा, असा हट्ट धरून बसले. त्या राहुटीत ते सर्वांत आधी पोहोचले होते; आणि स्वत:च्या बौद्धिक सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी जुन्या काळच्या ब्राह्मणांप्रमाणं महत्त्वाच्या जागा अडवून ठेवल्यामुळं त्यांचाच शब्द प्रमाण मानला जाऊ लागला वस्तुत: आता ते 'दलित' राहिलेच नव्हते. आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टचा ते केव्हाच सवर्णांच्या बरोबरीला जाऊन पोहोचले होते. किंबहुना अनेकांनी सवर्णांना खाली ढकलून त्यांच्या वरचं स्थान पटकावलं होतं. तरीपण 'दलित' या शब्दाची जादू इतकी अद्‌भुत होती, तो इतका फायदेशीर होता की, त्याचा त्याग करण्यास ते तयार नव्हते. आजही तयार नाहीत. मग ज्यांना उतरंडीच्या वरच्या मजल्यावर जाणं शक्य होत नाही, असे खरेखुरे दलित या खोटचा दलितांना शिव्याशाप देऊ लागले. उत्तम कांबळे यांच्या 'श्राद्ध' या कादंबरीत या परिस्थितीचं सुंदर (की असुंदर) चित्र पाहायला मिळतं. म्हणूनच 'दलित' हा शब्द फसवा असून त्याचा जाणून-बुजून गैरवापर केला जात आहे, असं मी म्हटलं आहे.

समाजाचं व साहित्याचं अभिन्न अंग

या साऱ्या विवेचनाचा मतितार्थ असा की, तथाकथित दलित लोक व त्यांचं साहित्य हे समाजापासून वेगळे असे घटक नसून ते एकूण समाज व साहित्य यांचंच अभिन्न अंग आहे. हिंदी, उर्दू, बंगाली, तेलगू, असमीया, मल्याळम् वगैरे भाषांच्या बाबतीत अशीच स्थिती आहे. त्यांच्यांत दलित साहित्य असा वेगळा भाग किंवा सवतासुभा मुळीच नाही. गुजरातीत व कन्नडमध्येही तो नाममात्र आहे. महाराष्ट्रात फुले-आंबेडकरांमुळं जी जनजागृती झाली, तिच्यातून हा सवतासुभा निर्माण झाला आहे, हे उघड आहे. आंबेडकरांनी अस्पृश्यांमध्ये व विशेषत: महार-नवबौद्ध जातींमध्ये स्वाभिमानाची जी ज्योत प्रज्वलित केली तिच्यामुळे आपण कुणीतरी वेगळे, श्रेष्ठ आहोत अशी भावना त्यांच्यांत निर्माण झाली. आपण फक्त आपल्या जातीपुरतं पाहवं, इतरांचा, देशाचा विचार करण्याची जबाबदारी आपली नाही, अशी वृत्ती त्यातून वाढीस लागली. याचाच दुष्परिणाम असा झाला की, सरकारकडून

(म्हणजेच समाजाकडून) भरपूर सोयी-सवलती घेऊन साक्षर बनून मोठमोठ्या हुद्यांवर जाऊन पोहोचलेले हे तथाकथित दलित अत्यंत स्वार्थी बनले. वरिष्ठ ब्राह्मणांचं अनुकरण करण्यात ते भूषण मानू लागले. एवढंच नव्हे तर, त्याचं त्यांनी एक खास तत्त्वज्ञानही बनवलं. ते म्हणतात, " या गावात काय आहे ? तेच दारिद्र्य, तोच अडाणीपणा !– या गावात एक दिवस काढायचा म्हटलं की एक वर्ष काढल्या सारखं होतं... समाजावाचून माझं काही यापूर्वी अडलं नव्हतं आणि इथून पुढंही अडणार नाही. मला नोकरी देताना समाज आला नव्हता." परिणामतः महारावर संकट आलं की चांभार गप्प. चांभारावर संकट आलं की मांग गप्प. मांगावर संकट आलं की चांभार गप्प. असंच आजपर्यंत होत आलंय. म्हणून तर या (कुळ) वाड्याचं फावतं. मग 'श्राद्ध' कादंबरीतला चंदू असा सवाल करतो, " आरं आबा, चळवळ म्हंतूस– पर ती कुनासाठी करायची रं ? आमाला काय मिळालं, ते सांगशील का नाय ? आरं, या चावडीत आमाला काय मिळालं ते चांगशील का नाय ? आरं, या चावडीत पंच जातुया तो म्हारच; पंचायतीचा जो पै-पैका म्हार–मांग–चांभारा-साठी हाय त्यातली पै तरी कधी आली चांभारास्नी ? तुम्ही तक्क्या बांधला. झेंड्याचा कट्टा बांधला. बालवाडी आली. तुमच्या गल्लीत नळ आलं. तुमच्या म्हारास्नी तारांचं कूप आलं. हे सगळं कशातनं झालं ? तर पंचायतीच्या फंडातनं. आज माळरानावर एवढी घरं उभारलीत, कुनी टिचभर जागा दिला काय रं आमास्नी ? बघीन तवा तुमच्याच पोळीवर तूप वाढणार तुम्ही. मग काय म्हणून आमी तुमच्या मागं लागावं– रिकामचोटासारखं ? "

ज्या दलित लेखकांनी त्यांना मिळालेल्या रॉयल्टीतून व भरघोस बक्षिसांतून आलिशान बंगले बांधले, मोटारी ठेवल्या त्यांच्याबद्दल दलितेतर लेखकांना कौतुक वाटतं. परंतु खुद्द दलित लोक व इतर दलित लेखक त्यांच्याविषयी काय बोलतात, जाहीरपणे त्यांच्यावर कसे आरोप करतात ते ऐकलं– वाचलं की, त्यांचं दलितप्रेम किती वेगडी आहे त्याची कल्पना येते. त्या बेगडी प्रेमातून निर्माण झालेलं साहित्यही बेगडीच असलं तर काय नवल ? समतेच्या व बंधुत्वाच्या लंब्याचवड्या गप्पा मारणाऱ्यांनी ही नवी विषमता निर्माण केली आहे, हे विशेष !

आणि विद्रोहाच्या वल्गना ?

जी गोष्ट पूर्वास्पृश्यांची, तीच भटक्या विमुक्तांची ! त्यांच्यात तर पोट-जातींना सीमाच नाही. मसनजोगी, राईदर, वासुदेव, गोंधळी, वडार, पाथरवट, गोसावी, कैकाडी, वैदू, पारधी, मांग गारुडी, कातकरी, भिल्ल, लमाणी, शिकलकरी, घिसाडी अशा असंख्य जमाती त्यांच्यांत आहेत. त्यांच्यांत सामरस्य निर्माण करणं हे प्रमुख काम मानलं गेलं पाहिजे; परंतु त्याऐवजी विद्रोहाच्या नाऱ्याखाली सवर्णांना

धमक्या देण्याचंच कार्य दलित साहित्य करीत असतं. मोठमोठे पुढारी, मंत्री, अधिकारी हे लक्षावधी, कोट्यवधी रुपयांची अफरातफर करतात. लाच खातात. टोलेजंग इमारती व आलिशान बंगले–राजवाडे बांधतात. मग पोटासाठी गोर-गरिबांनी किडुकमिडुक चोरलं तर काय बिघडलं ? असा परखड सवाल साहित्य अकादमीचं पारितोषिक मिळालेले 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड विचारतात. एवढंच नव्हे तर अशी धमकीही देतात की, "पारधी, लमाण, कैकाडी, टकार, डोंबार वगैरे मंडळी जय्यत तयारीनं शहरात एकदा घुसली तर, शहरवासियांचं जीवन अशक्य करून सोडतील." अशाच वल्गना आणि धमक्या यांनी दलित साहित्य भरलेलं आहे; पण बहुजनसमाजाला धडा शिकवण्याचं सामर्थ्य अल्पसंख्य समाजात नसल्यामुळं त्या सगळ्या वल्गना व धमक्या वांझोट्या आहेत, हे त्यांना व इतरांनाही चांगलंच माहीत असल्यामुळं त्यांचा काहीच परिणाम होत नाही. दलितपीडित जनतेची सुख-दुःखं समाजातल्या इतर वर्गांना समजली पाहिजेत आणि सर्वांनी मिळून विषमतेच्या चिखलातून बाहेर पडलं पाहिजे, याविषयी दुमत असूच शकत नाही. बहुतेक दुःखं सगळ्या दलित जमातींमध्ये सारखीच असतात. दारिद्र्य हा त्यांचा केंद्रबिंदू. मग त्यामुळं मृत पशूचं मांस खाणं, भुताखेतांसाठी ओवाळून टाकलेला नैवेद्य खाणं, उपासमार सहन करणं, चोऱ्या करताना पकडलं जाऊन मार खाणं यांसारख्या गोष्टींची दलित साहित्यात पुनरावृत्ती होत राहते; व मौलिकता लोप पावते. सौम्य दारू पचनी पडली की, किक (झिंग) येण्यासाठी हातभट्टीची कडक दारू प्यावी लागते (असं म्हणतात) त्याप्रमाणं आपली दुःखं जास्तीत जास्त भडक स्वरूपात मांडण्याकडे लेखकाची प्रवृत्ती होते. (आत्तापर्यंत पांढरपेशा लेखकांनीही हीच क्लृप्ती वापरली होती ना !) मग अशा लेखकांना सरकारी व बिनसरकारी पारितोषिकं भराभर मिळू लागतात. (आणि मग ते एकमेकांचा द्वेष करू लागतात.) तशी ती मिळालीच पाहिजेत असं माझं मत आहे. आजपर्यंत गोखले, गाडगीळ, भावे, मोकाशी, मिरासदार, शंकर पाटील, आनंद यादव वगैरे पारितोषिकांच्या मक्तेदारांनी भरपूर लूट केली. यापुढं काही वर्षं ही लूट फक्त दलित लेखकांसाठी राखून ठेवली जावी, असं मला वाटतं. नाहीतरी साहित्यिक मूल्यांची पर्वा आहेच कुणाला ? जात-पात, प्रादेशिकता, वशिला यांचाच तर बोलबोला आहे. मग काही काळपर्यंत राखीव जागांप्रमाणं पारितोषिकंही राखीव करण्यात काय गैर आहे ? याच भूमिकेतून अनुसूचित जाती-जमातींना सर्व क्षेत्रांत राखीव जागा यापुढंही दिल्या गेल्या पाहिजेत. मात्र सुखवस्तू दलितांना त्यातून वगळावं, असं माझं मत आहे.

विधायक नेतृत्वाचा अभाव

दलित साहित्याचा पददलितांच्या उत्थानासाठी काही उपयोग होत असेल

काय ? हा प्रश्न खूपच गुंतागुंतीचा आहे. कारण, मुळात साहित्याचाच प्रभाव जन-जीवनावर कितपत पडतो, हा प्रश्न विवाद्य बनलेला आहे. दलित साहित्याच्या वाचकांमध्ये खुद्द दलितांची संख्या फारच कमी असते. (कारण त्यांच्यांत साक्षरतेचं प्रमाण अगदी अल्प आहे !) "हे सारं तर आम्हाला माहितच आहे. त्यात काय वाचायचं ?" असं म्हणणारे दलित मला भेटले आहेत. याचा अर्थ असा की, दलित साहित्याचे वाचक मुख्यत: दलितेतरच आहेत. आणि ते बहुधा एक 'चूष' म्हणूनच ते वाचतात. त्यांचे काही हृदयपरिवर्तन होत असेल असं वाटत नाही. किंवहुना ज्यांना दलितांविषयी सहानुभूती वाटते असेच लोक हे साहित्य वाचतात, म्हणून हा प्रश्न विवाद्य आहे असं मी म्हणतो. अर्थात तो सगळ्याच साहित्याला लागू आहे असं म्हणता येईल. म्हणून तो तसाच सोडून देणं बरं. खरा प्रश्न वेगळाच आहे. दलितांचं नेतृत्व असं क्षुद्र स्वार्थात का गुरफटून गेलं आहे ? याचं कारण असं की, दलितांना विधायक दृष्टिकोन त्यांच्या नेत्यांनी दिला नाही. जुन्याचा विध्वंस करण्यास प्रोत्साहन दिलं; पण नव्याच्या निर्मितीची प्रेरणा दिली नाही. आपल्या समाजासाठी वैयक्तिक स्वार्थ बाजूला सारून, आपणच पाय रोवून उभं राहिलं पाहिजे. वेगवेगळे प्रकल्प हाती घेऊन ते राववले पाहिजेत. नवनवीन प्रयोग केले पाहिजेत, याची जाणीवच त्यांना दिली गेली नाही. तळागाळाच्या जनतेत जाऊन व तिच्या-सारखं साधं त्यागी व सेवामय जीवन जगूनच तिला वर काढता येईल. सुटा-बुटात वावरून, व्याख्यानं देऊन, मोर्चे काढून, गटबाजी करून पुढारीपण कसं मिळवायचं ते दलितांच्या पुढाऱ्यांनी शिकवलं. त्यांच्या विशिष्ट काळात ते जमून गेलं. "मी नुसत्या टाईपरायटरच्या साह्यानं पाकिस्तान मिळवलं." असं जिना म्हणत. त्यांचे समकालीन सावकर व आंबेडकर यांनीही त्यांचाच कित्ता गिरवला. त्यामुळं त्यांना पुढारीपण मिळालं; पण त्यांच्या अनुयायांना चुकीचं मार्गदर्शन त्यातून मिळालं. वस्तुत: पाणी पंचायतीचे विलासराव साळुंखे, ग्रामोद्धाराचे प्रवर्तक अण्णा हजारे, हरिजनांना सहकारी जीवनाची दीक्षा देणारे मधुकरराव देवल, हे दलितांचे खरे उद्धार-कर्ते म्हटले पाहिजेत. त्यांच्यासारखं विधायक काम करण्याची प्रेरणा व स्फूर्ती एकाही दलित लेखकाला किंवा पुढाऱ्याला होऊ नये, यातच दलित चळवळीचं अपयश निहित आहे. आपला हा पराभव झाकण्यासाठी साहित्याचा साधन म्हणून वापर केला जातो आहे. त्यासाठी जिला कसलेच नियम नाहीत, अशी बेफाट भाषा वापरली जात आहे. ग्राम्य व अश्लील शब्दांचा मुक्त हस्तानं वापर केला जात आहे; आणि त्याला विद्रोह समजलं जातं आहे. कोणतीही बोलीभाषा वापरण्यास कोणाचीच हरकत असणार नाही. पण त्या भाषेचेही काही नियम असतात आणि त्यांचं पालन करायचं असतं. त्याची पर्वा न करता मनाला येईल तसं लिहिणं म्हणजे काही विद्रोह नव्हे अथवा बहादुरीही नव्हे. या लेखकांना शुद्ध भाषा येत नाही असं नाही.

वैचारिक लिखाण करताना ते प्रमाणित भाषाच वापरतात. कारण त्याशिवाय गत्यंतर नसतं. पण आत्मकथनासाठी मात्र प्रत्येकजण आपापल्या जमातीची बोली-भाषा चूष म्हणून वापरतो. अखेर आपण ज्या वाचकांसाठी लिहितो, त्यांना आपलं म्हणणं कळावं, अशी इच्छा दलित लेखकांच्या मनात असते की नाही ? सामान्य वाचक हा काही भाषाशास्त्राचा अभ्यासक नसतो. ज्या पुस्तकाची भाषा त्याला सहजासहजी समजत नाही, ते वाचायच्या भानगडीत तो पडत नाही. शिवाय प्रत्येक दलित जमातीची बोलीभाषा वेगळी असते. याचा अर्थ असा की, ज्या जमातीच्या लेखकाचं पुस्तक असेल, त्या जमातीखेरीज इतरांना ते कळणारच नाही. अशानं सामूहिक जनजागरण काय होणार ? आपण काहीतरी बंडखोरपणा केला आणि सवर्णांना शिव्याशाप देऊन सूडाचं सुख अनभवलं एवढंच समाधान !

या संदर्भात एका वेगळ्या दृष्टिकोनाचा उल्लेख करणं उचित होईल. दलित साहित्य हे खरं साहित्य नसून ती समाजशास्त्रीय प्रमेयं आहेत व ती अवघडपणे मांडलेली आहेत असं मानणारे लोकही आहेत. (पहा : 'ए सोशियॉलॉजिकल वर्क डीव्हॅल्यूड ॲज लिटरेचर' : म. ल. वराडपांडे. 'टाइम्स ऑफ इंडिया', २६–७–८९) याच दृष्टीनं असं म्हणता येईल की, ती दुःख, क्रोध वगैरे वेशीवर टांगण्यासाठी वापरलेली शाब्दिक साधनं किंवा सूडाचे जाहीरनामे आहेत. तरी पण कथा-कादंबरी, नाटक, कविता वगैरे साहित्याचे परंपरागत आकृतीबंध त्यात वापरले गेले असल्यामुळं त्या लिखाणाला साहित्य म्हणणंच उचित होईल. एखादं आत्मकथन लिहिल्यानंतर या लेखकांजवळ सांगण्यासारखं काहीच उरत नाही, हे खरे आहे. परंतु लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे, बहिणाबाई यांना आपण श्रेष्ठ साहित्यिक मानतोच ना ? त्यांच्याच वर्गात या दलित साहित्यिकांना समाविष्ट करण्यास काय हरकत आहे ?

निग्रो समाज व साहित्य : तुलना अप्रस्तुत

आफ्रिकेतील व अमेरिकेतील निग्रो समाजाची स्थिती भारतातील दलितांसारखीच आहे, म्हणून त्यांच्या साहित्यापासून दलित लेखकांनी प्रेरणा घ्यावी असं काही लोकांना वाटतं. काही विद्वानांची मजल तर इथवर जाते की, अस्पृश्यतेपेक्षा गुलामी अधिक सुसह्य होती असं ते छातीठोकपणे सांगतात. त्यांच्या अज्ञानाची कीव करावी तेवढी थोडीच ! गुलामगिरीचं स्वरूपच त्यांना आकलन झालेलं नसतं; यामुळे ते असा गैरसमज करून घेतात (आणि भोळ्या जनतेत तो ते पसरवतात). गुलामगिरी आणि अस्पृश्यता यांमध्ये मुख्य फरक असा की, गुलामांना स्वतंत्र व्यक्तित्व नव्हतं. गुरा-ढोरांप्रमाणं त्यांची खरेदी-विक्री होत असे. त्यात कुणालाच काही वाटत नसे. निग्रो लोकांना गोऱ्यांच्या समाजव्यवस्थेत काहीच स्थान नव्हतं. याच्या उलट अस्पृश्य (किंवा शूद्र व अतिशूद्र) हे हिंदू समाजाचं अभिन्न अंग होते.

सामाजिक उतरंडीत त्यांना सर्वांत खालचं स्थान होतं; आणि त्यांच्यापैकी अनेकांना गावकुसाबाहेर राहण्यास भाग पाडलं जात होतं (चांभारासारखे काही अस्पृश्य गावात सवर्णांशेजारी राहात असतं.) हे खर असलं तरी सामाजिक चौकटीत त्याचं स्थान कमी महत्त्वाचं नव्हतं. त्यांचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व सर्वांनी मान्य होतं. गावाच्या रखवालीचं, सफाईचं काम त्यांच्यावर सोपविलेलं होतं; आणि त्यांच्यातल्या शहाण्या लोकांचा सल्लाही घेतला जाई व त्यांना मानही दिला जाई, हे मी स्वत: पाहिलं, अनुभवलं आहे. इतर बलुत्यांप्रमाणं त्यांनाही वतनं दिलेली असतं आणि अनेक गावी महारांच्या जमिनी इतरांच्या जमिनीपेक्षा जास्त चांगल्या असत. त्यांच्यातील पैलवानांना इतर पैलवानांइतकीच प्रतिष्ठा मिळत असे. मराठ्यांच्या व पेशव्यांच्या सैन्यात महारांना फार महत्त्वाचं स्थान होतं. त्यांच्यावर अन्याय–अत्याचार करण्याची हिमंत कोणाला होत नसे आणि अन्याय झाल्यास दाद मागण्याची सोयही होती. किंबहुना ब्राह्मणांचं स्थान जितकं असुरक्षित होतं, तितकं हरिजनांचं कधीच नव्हतं. (गांधीहत्येनंतरचा खेड्यापाड्यांतील ब्राह्मण समाज अपमानित व अत्याचारपीडित होऊन पाला-पाचोळ्यासारखा कसा उडून गेला हे तर आपण आपल्या डोळ्यांनीच पाहिलंय !) भंगी याला अपवाद होते. संस्कृतमध्ये भंग्याला पर्यायी शब्द नाही. त्याचा कुठं उल्लेखही जुन्या साहित्यात मिळत नाही. यावरून मुसलमानांच्या आगमानापूर्वी भंगी ही संस्थाच या देशात नव्हती आणि मुस्लिम शासकांनी युद्धात गुलाम बनविलेल्या लोकांकडून मैलासफाईचं काम करवून घेण्यास सुरुवात केली, हे अनुमान बरोबर असावं असं वाटतं. त्यामुळंच बारा बलुत्यांत भंग्यांचा समावेश नाही. आजचे दलितही भंग्यांना जवळ करीत नाहीत. सर्वांत प्रथम गांधींचं लक्ष भंग्यांच्या दुर्दशेकडे गेलं; आणि अप्पासाहेब पटवर्धनांसारख्या त्यांच्या अनुयायांनी भंगीमुक्तीचं काम केलं. आजकाल हरिजनांवर बहुजनसमाजाकडून जे अत्याचार होतात, ती नव्या युगाची देणगी असून तिच्या मुळाशी मुख्यत: अहंकाराचं राजकारण आहे, हे आपण ओळखलं तर निग्रो लोकांशी त्यांची तुलना करण्याचा हास्यास्पद प्रयत्न आपण करणार नाही. एक साधी गोष्ट आहे. हरिजनांवर आजच्यासारखे अत्याचार जुन्याकाळी होत असते, त्यांना समाजात मानाचं स्थान नसतं तर त्यातून सुटका करून घेण्याचा फार सोपा उपाय त्यांच्याजवळ होता – धर्मांतराचा ! मुसलमान रियासतीत इस्लामचा आणि ब्रिटिश राजवटीत ख्रिस्ती धर्माचा स्वीकार त्यांनी केला असता तर, त्यांची सारी दु:खं क्षणार्धात नाहीशी झाली असती. त्यांची अस्पृश्यता तर नष्ट झालीच असती, पण त्यांना मोठमोठ्या अधिकारांच्या जागा आणि मानमरातब मिळाले असते. (बंगालमधील अस्पृश्यांनी इस्लामचा स्वीकार केल्यामुळं तिथं अस्पृश्यच उरले नाहीत; आणि म्हणून तिथं दलित साहित्यही निर्माण झालं नाही !) परंतु सत्ता व संपत्ती याचा मोह टाळून

ते हिंदू धर्मातच राहिले, हे त्यांचे हिंदू धर्मावर फार मोठे उपकार म्हटले पाहिजेत. हिंदू समाजाविषयी त्यांना आत्मीयता नसती तर त्यांनी कधीच धर्मांतर करून अस्पृश्यतेच्या कलंकातून सुटका करून घेतली असती. निग्रोंना धर्मांतराचा हा मार्ग मोकळा नव्हता. म्हणजे त्याचा त्यांना काही उपयोग नव्हता. कारण त्यांच्या कपाळी रंगाची गुलामगिरी होती. तो रंग ते बदलू शकत नव्हते. (अलीकडे काही अमेरिकन निग्रोंनी इस्लामचा स्वीकार करून पाहिला; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.) ज्या जाती-पातींमुळं आपल्याला अन्याय सहन करावा लागतो असं अस्पृश्यांना वाटतं, त्या जातींचा अभिशाप निग्रोंना भोगावा लागत नाही, तरीही त्यांना माणुसकीची वागणूक गोऱ्यांकडून दिली जात नाही. याच्या उलट खुद्द दलितांमध्येच इतक्या जाती-उपजाती आहेत आणि त्यांच्यातही उच्च-नीचतेची एवढी प्रचंड विषमता आहे की, सवर्णांना शिव्याशाप देण्याआधी आपल्यातल्या जाती कशा नष्ट होतील याचा विचार त्यांनी केला पाहिजे. या जातींमुळंच एका जातीला जो आपला सर्वश्रेष्ठ नेता वाटतो, तो इतर जातींना आपला वाटतच नाही. याचा अर्थ असा की, आपल्या पायाखाली काय जळतयं हे न पाहता, सवर्णांना शिव्याशाप व धमक्या देण्यात या दलितांना पुरुषार्थ वाटतो. या अडचणी निग्रोंमध्ये नाहीत. त्यांच्या समस्या वेगळ्या आहेत. त्यामुळं त्यांच्या साहित्याशी दलित साहित्यानं आपलं नातं जोडणं हास्यास्पद ठरतं.

सवर्णांमधील अपराधाची जाणीव

निग्रो आणि अस्पृश्य यांच्यामध्ये आणखी एक महत्त्वाचा फरक आहे. दक्षिण आफ्रिकेतील सरकारनं वर्णभेदाला कायद्यानं मान्यता दिलेली आहे. काळ्यांना पशुतुल्य जिणं जगायला भाग पाडण्यात काही पाप आहे असं बहुसंख्य गोऱ्यांना वाटत नाही. याच्या उलट अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे असं गांधीजींनी जाहीर केल्यापासून बहुसंख्य हिंदूंमध्ये अस्पृश्यता पाळणं हे पाप आहे, याची तीव्रतेनं जाणीव झाली आहे. भारतीय राज्यघटनेनं तर अस्पृश्यता पाळणं हा गुन्हा ठरवला आहे. स्वतंत्र भारतानं आपली राज्यघटना तयार करण्यासाठी एका अस्पृश्य विद्वानाची मदत घेतली, यातच सर्व काही येऊन जातं. जुन्या काळी चोखामेळा, कर्ममेळा, रविदास यांसारखे थोर साधुसंत अस्पृश्यांमध्ये निर्माण झाले; आणि त्यांच्या पायांवर डोकं ठेवण्यात सवर्णांना कधी संकोच वाटला नाही. निग्रोंच्या बाबतीत असं घडणं आज तरी शक्य आहे काय? पंढरीच्या वारीत महार, मांग, चांभार वगैरेंच्या दिंड्या बरोबरीच्या नात्यानं, खांद्याला खांदा लावून नेहमीच सामील होत आल्या आहेत. परंतु आजही अमेरिकेत निग्रो मुलांना गोऱ्या मुलांच्या शाळेत शिकता येत नाही; अथवा गोरे लोक काळ्यांबरोबर एका बसमधून

प्रवास करू इच्छित नाहीत. निग्रो व दलित यांच्यात आणखी एक फरक आहे. निग्रो लोक जीवनाच्या विविध क्षेत्रांत आघाडीवर राहण्यासाठी धडपडत आहेत. ते उद्योग-व्यापारात पाय रोवून भक्कमपणे उभे आहेत. त्यांच्या स्वतःच्या प्रकाशन-संस्था व नियतकालिकं आहेत. त्यासाठी त्यांना गोऱ्यांच्या दयेवर अवलंबून राहावं लागत नाही. खेळ, संगीत व नृत्य यांत तर त्यांचा हात धरणं गोऱ्यांनाही शक्य होत नाही. मुष्टियुद्ध, क्रिकेट, फुटबॉल, पळणं वगैरे क्षेत्रांत त्यांनी जागतिक विक्रम केले आहेत. जगात प्रतिष्ठा मिळवण्यासाठी कोणत्या तरी क्षेत्रात श्रेष्ठत्व प्रस्थापित करावं लागतं, ही गोष्ट निग्रो लोकांनी चांगली ओळखली आहे. त्यांना शरीर-श्रमाची लाज वाटत नाही. त्याच्या उलट आमचे दलित 'बाबू' बनण्याची स्वप्नं पाहत असतात. पांढरपेशा 'साहेब' बनणं हेच त्यांचं एकमेव उद्दिष्ट असतं. इतर क्षेत्रांकडे त्यांचं लक्षच नसतं. त्यामुळं त्यांच्यात आताच लाथाळ्या सुरू झाल्या आहेत. राजकारणात शिरून भ्रष्टाचारात सहभागी होण्याचीही त्यांची धडपड चालू असते. त्यामुळं आपले हस्तक म्हणून त्यांचा वापर राजकीय पक्ष करीत असतात. असलं काही निग्रोंच्या बाबतीत फारसं घडत नाही. त्यामुळं त्यांचं साहित्य दलित साहित्यापेक्षा मुळातच वेगळं आहे. 'बाबू' किंवा 'साहेब' बनण्यासाठी नुसतं पुस्तकी शिक्षण पुरेसं असतं, असा गोड गैरसमज दलितांत पसरलेला दिसतो. त्यामुळं पांढरपेशा मुलांचं अनुकरण करून दलित मुलं डॉक्टर, इंजिनियर, वकील, बँक कर्मचारी वगैरे होण्याच्या मागं लागतात; परंतु हीच पांढरपेशा मुलं इतर अनेक प्रकारचं, सामान्यतः दुर्लक्षित असं तांत्रिक शिक्षणही घेत असतात. इकडे दलितांचं दुर्लक्ष होतं. त्यामुळं त्या क्षेत्रांत त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा रिकाम्या राहतात. मग त्या इतरांना द्याव्या लागतात. यावर इतरांच्या नावानं ओरड करण्यास पुन्हा दलित मोकळेच !

आदळ आपट खूप झाली; जरा अंतर्मुख व्हा !

माणसाला आपल्या दोषांचं, दुःखांचं खापर इतरांवर फोडून मोकळं झाल्याशिवाय बरं वाटत नाही. कारण, त्यामुळं आपल्या डोकीवरचं ओझं कमी झाल्याचं सुख त्याला मिळतं. वस्तुतः हे दुबळेपणाचं लक्षण असतं. हिंदूंनी आपल्या पराभवाचं खापर क्रूर मुसलमानांवर फोडलं; आणि हिंदू-मुसलमानांनी आपल्यातल्या यादवी-बद्दल इंग्रजांना जबाबदार धरलं. तीच परंपरा दलितांनी आता पुढं चालवली आहे. आपल्या साऱ्या दुःखाला, अवनतीला हिंदू धर्म व समाज जबाबदार असून त्यांचा नाश झाल्याखेरीज आपली उन्नती होणार नाही, अशी त्यांनी स्वतःची समजूत करून घेतली आहे. हे गृहीतकृत्य एकदा मान्य केलं की, स्वतः काही करण्याचा प्रश्नच उतरच नाही ! कारण हिंदू धर्म व समाज यांचा विध्वंस करण्याचा

आटोकाट प्रयत्न मुसलमानांनी व ख्रिश्चनांनी शेकडो वर्षं केला. त्यात त्यांना फारच थोडं यश आलं. अपराधी भावनेनं व न्यूनगंडानं पछाडले गेलेले काही सत्प्रवृत्त सवर्ण आणि उगवत्या सूर्याचं स्वागत करण्यास सदैव तयार असणारे लबाड साहित्यिक व राजकारणी यांच्याकडून दलित लेखकांना भरघोस पाठिंबा मिळत आहे हे खरं; परंतु या मंडळींचा हिंदू समाजावर इतका अल्प प्रभाव आहे की, त्यांच्याकडून दलितांना फारसं साह्य मिळण्याची शक्यता नाही. या साऱ्या मनोवृत्तीचं प्रतिबिंब दलित साहित्यात पडलेलं दिसतं. सामाजिक विषमता आणि सवर्णांचे अत्याचार यांविरुद्ध आक्रोश करणारे दलित लेखक आपण आपल्या स्वतःच्या जीवनात समतेचा व सहिष्णुतेचा अवलंब कितपत करतो, याचा कधी विचार करतात काय ? उत्तम कांबळे यांच्या 'श्राद्ध' कादंबरीतले शरणगुप्पी गावचे दलित लोक सवर्णांच्या जुलमाला जिद्दीनं व एकजुटीनं तोंड देऊन सवर्णांनी घातलेला बहिष्कार उधळून लावतात; पण तेच दलित त्यांच्याचपैकी थळोबाच्या पुजाऱ्याच्या बायकोनं (हौसानं) म्हसोबाच्या जत्रेला वर्गणी न दिल्याबद्दल तिचा नवरा मेल्यावर त्याच्या मातीला न जाण्याचा निर्णय घेतात; आणि आपल्याच बांधवाच्या प्रेतावर बहिष्कार टाकतात. सवर्णांच्या अमानुष व पशुतुल्य वर्तनाबद्दल त्यांच्याविरुद्ध संघर्ष करणारा दलित समाज आपल्याच बांधवांशी त्याहून अधिक निर्दय व अमानुष व्यवहार करतो. तसंच 'वाटा पळवाटा' नाटकातला बंडखोर तरुण, दलित विधवेची भांडी-कुंडी रस्त्यावर फेकून तिला खोलीतून बाहेर काढतो. अर्थात् यात नवीन असं काहीच नाही. ब्राह्मणांविरुद्ध बंड करणारे अब्राह्मण लोक ब्राह्मणांनी आपल्याला समानतेनं वागवावं असा हट्ट धरीत; परंतु आपण आपल्याहून खालच्या जातींना बरोबरीच्या नात्यानं वागवलं पाहिजे, असं त्यांना कधीच वाटलं नाही. फुले–आंबेडकरांचा जयघोष करणारी मंडळी याच अब्राह्मणांचं अनुकरण आज करीत आहेत, एवढंच !

दलितांनी जरा अंतर्मुख होऊन विचार केला तर, आपल्या आचार-विचारातली ही विसंगती त्यांच्या लक्षात येईल आणि तिच्यातून सुटण्याचा मार्गही त्यांना सापडेल.

हरिजनांच्या हाती सत्ता आली पाहिजे

दलितांच्या भूमिकांमधील अंतर्विरोध त्यांच्या साहित्यातही प्रतिबिंबित होतो. आंबेडकरांनी १४–८–१९३१ रोजी गांधीजींशी झालेल्या पहिल्याच मुलाखतीत 'मला स्वदेशच नाही' (आय हॅव नो होमलँड) असे उद्‌गार काढले होते. ('डॉक्टर बाबासाहेब यांची आत्मकथा', पृ. १३६) तीच भूमिका घट्ट पकडून काही दलित असं म्हणतात की, "या देशानं आम्हाला सदैव अस्पृश्य ठेवलं. म्हणून या देशाशी आम्हाला काही कर्तव्य नाही. पाकिस्तानप्रमाणं आम्हाला दलितस्तान मिळालं

पाहिजे." परंतु त्याच वेळी, "आम्हीच या देशाचे मूळ निवासी व म्हणून खरे मालक आहोत." असं ठणकावून सांगणारे अस्पृश्यही भेटतात. या देशाला आंबेडकरांनी दिलेली राज्यघटना सर्वांनी शिरसावंद्य मानली पाहिजे असाही आग्रह ते धरतात. घटना तर मान्य करायची, पण घटनेनं ठरविलेल्या ध्वजाला x x x पुसण्याचं फडकं म्हणून त्याचा व राष्ट्रगीताचा अपमानही करायचा. हा आणखी एक विरोधाभास ! या साऱ्या अंतर्विरोधांतून व विरोधाभासांतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग दिसतो. तो म्हणजे हरिजनांच्या हाती सत्ता येणं हा होय. २०–११–१९३० रोजी गोलमेज परिषदेत भाषण करताना बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "जोपर्यंत दलितांच्या स्वतःच्या हातात सत्ता येत नाही, तोपर्यंत दलितांचा प्रश्न सुटणे मुळीच शक्य नाही." (कित्ता : पृ. ११०) त्यांचं हे म्हणणं आजही खरं आहे. गांधीजी असं म्हणत असत की, "या देशाच्या राष्ट्रपतीपदावर भंग्याची मुलगी बसलेली पाहावी, हे माझं स्वप्न आहे." त्याचा अर्थही हाच होता. या देशात आदिवासी, कोळी, शीख, धनगर, जाट, मराठे, ब्राह्मण वगैरे अनेक जातींचे स्त्री–पुरुष राज्यकर्ते झाले. परंतु अस्पृश्य किंवा हरिजन मात्र राजे झाले नाहीत; म्हणून त्यांना या भूमीविषयी आत्मीयता वाटत नाही, असं काही लोकांचं म्हणणं आहे. त्यातही तथ्य आहे. डॉ. आंबेडकर किंवा जगजीवनराम यांना राष्ट्रपती बनविलं गेलं असतं तर अस्पृश्यांतील परात्मभाव पुष्कळच कमी झाला असता. जनता राजवटीत मोरारजीभाईऐवजी जगजीवनराम पंतप्रधान झाले असते, तर दलितांमध्ये एक आत्मसन्मानाचा भाव निर्माण झाला असता; आणि जनता पक्षातली फाटाफूटही टळली असती. कारण सर्वांना सांभाळून घेण्याचा अद्‌भुत गुण जगजीवनराम यांच्यामध्ये होता. या संदर्भात जेव्हा दलित मुस्लिमांविषयी आपण विचार करतो, तेव्हा आपल्या असं लक्षात येतं की, एकेकाळी या देशाचे राज्यकर्ते असूनही केवळ आपल्या दुर्गुणांमुळंच ते दलित बनले आहेत. म्हणून त्यांना कोणतीही सवलत देण्याची गरज नाही. याच्या उलट अस्पृश्यांचा काही अपराध नसताना त्यांना दलित बनविलं गेलं. म्हणून त्यांना सर्व प्रकारच्या सोयी-सवलती, राखीव जागा, विशेष प्रशिक्षण वगैरे देऊन सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबतींत इतर जातींच्या बरोबर येण्याची योग्यता त्यांच्यात निर्माण करणं, हे प्रत्येक देशभक्ताचं कर्तव्य आहे. शिखांप्रमाणं काही दलित (विशेषतः नवबौद्ध) आपला हिंदू धर्माशी काही संबंध नाही असं म्हणत असले तरी ते एका व्यापक हिंदू समाजाचे व भारतीय संस्कृतीचे महत्त्वाचे घटक आहेत, असंच आपण मानलं पाहिजे; व त्यांचं दलितत्व नष्ट करण्याचा आपल्या परीनं प्रयत्न केला पाहिजे. ते नष्ट होईल, तेव्हा दलित साहित्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची गरजच उरणार नाही. याचाच अर्थ असा की, दलित साहित्य हे तात्कालिक गरज म्हणून निर्माण झालेलं असून ती गरज सरली

की त्या साहित्याचं महत्त्वही संपुष्टात येणार आहे.

गांधींचा मार्ग उपयुक्त ठरेल

सारांश, अद्वितीयत्वाचा व क्रांतिकारकत्वाचा दलित साहित्याचा दावा फोल आहे. आजवर मराठी साहित्याला अज्ञात व अपरिचित असलेल्या दलितपीडित समाजाचं चित्रण दलित साहित्यात आल्यानं आपलंच अभिन्न अंग असलेल्या समाजाचं दर्शन मराठी वाचकांना घडलं; आणि सामाजिक–आर्थिक विषमता, शोषण, अत्याचार नष्ट करण्यासाठी आपण काय केलं पाहिजे, ते आव्हान केवढं प्रचंड आहे, याची कल्पना इतरेजनांना आली. हे दलित साहित्याचं खरं योगदान होय. मात्र त्यामुळं ते साहित्य मूळ साहित्याच्या धारेपासून वेगळं आहे, असं समजण्याचं कारण नाही. उद्या समाजाच्या शीर्षस्थानी असलेल्या अतिश्रीमंत वर्गांनी आपापली सुख-दुःखं चित्रित करणारं साहित्य निर्माण केलं तर तेही मराठी साहित्याचंच अंग असेल. आज या अतिश्रीमंत वर्गाविषयी आपल्याला काहीच कल्पना नाही. स्त्रीमुक्ती-विषयक साहित्यही याच प्रकारात मोडतं. स्त्रियांच्या विशिष्ट समस्या त्यातून आपल्याला समजतात. मग काय ते दलित साहित्यासारखं वेगळं साहित्य मानायचं ? अर्थात् आपल्या समाजाचं चित्रण करताना जेव्हा अतिशयोक्ती केली जाते, तेव्हा ते साहित्यही फसवं बनतं. कडकलक्ष्मीवाला आपल्या अंगावर आसुडाचे फटके मारून किंवा अघोरी लोक आपल्या शरीरावर शस्त्रांनी घाव करून रक्तबंबाळ होतात आणि लोकांची सहानुभूती मिळवितात. तसं तर या दलित साहित्यात होत नाही ना, ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. कारण अस्पृश्य, भटक्या, विमुक्त, अक्करमाशी वगैरे मंडळींच्या दुःखांचं मूळ कारण त्यांचं दारिद्र्य हेच असतं; आणि दारिद्र्याला तर जात नसते. ब्राह्मणांपासून मुसलमान व आदिवासी लोकांपर्यंत सर्व जाती-जमातींत असलेल्या या दारिद्र्याचं निर्मूलन करणं हाच त्यावर एकमेव उपाय असतो. या निर्मूलनाचे दोन मार्ग आपल्यासमोर आहेत. मार्क्सचा व गांधींचा. मार्क्सच्या मार्गानं जाऊन दारिद्र्याचं थोडंफार निर्मूलन होत असलं तरी, त्यात व्यक्तीचं स्वातंत्र्य मर्यादित होतं; आणि ते स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी व्यक्ती तडफडू लागते, असं रशिया, चीन वगैरे देशांच्या अनुभवांवरून दिसून येतं. गांधींचा मार्ग झटपट यश देणारा नाही. त्यामार्गानं जाणाऱ्यांना संथपणे व सातत्यानं धडपडत राहावं लागतं. त्यातही अन्यायाविरुद्ध संघर्ष करावाच लागतो; पण तो शांततापूर्ण असतो. त्यात आक्रोश, शिव्याशाप व आक्रस्ताळेपणा यांना स्थान नसतं. निग्रोंचे पुढारी मार्टिन ल्यूथर किंग, पोलिश कामगारांचे नेते लेक वालेसा, फिलिपिनी जनतेचे नेते ॲक्विनो आणि रशियाचे नेते गोर्बाचोव यांसारखे विचारवंत लोक गांधींच्या मार्गाचा पुरस्कार यासाठीच करतात. भारतीय दलित-पीडितांनाही आज

ना उद्या गांधीच्या मार्गाचाच अवलंब करावा लागणार आहे. तो केल्यानंतर दलित साहित्याचं स्वरूप खूपच संयत, विवेकशील, विधायक, रचनात्मक बनेल. तोपर्यंत आक्रोश, शिव्याशाप, आक्रस्ताळेपणा वगैरे गोष्टी चालतच राहतील. अर्थात् हे घडून यायचं असेल तर, दलितांना आपल्या संकुचित, विद्वेषी, सूडावर भिस्त असलेल्या नेतृत्वाच्या कचाटाचातून स्वतःची सुटका करून घ्यावी लागेल. आपल्या एकट्याच्या बळावर आपण क्रांती घडवून आणू शकणार नाही, त्यासाठी संपूर्ण समाजाचं सहकार्य मिळवावं लागेल, याची जाणीव जेव्हा दलितांना होईल, तेव्हाच ते जुन्या नेतृत्वाच्या विळख्यातून बाहेर पडतील व त्यांचं साहित्य चिरंजीवी बनेल. परंतु तसं काही करण्याची त्यांची इच्छा आहे काय ? खरा प्रश्न हाच आहे.

✣ ✣

'वाङ्मय-शोभा' : दिवाळी–८९

१४. भारताला 'राष्ट्रभाषा'च नाही !

कधी-कधी आपण काही गोष्टी गृहीत धरून चालतो, आणि अकस्मात् एखाद्या घटनेने आपली ती समजूत पूर्णपणे चुकीची असल्याचे आपल्या लक्षात येते. टिळक-गांधींच्या काळापासून हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा असल्याचा समज मनाशी बाळगून आम्ही तिचा भरपूर प्रचार-प्रसार केला. त्यावेळी राष्ट्रभाषा प्रचार हे एक महत्त्वाचे विधायक कार्य आणि स्वातंत्र्यप्राप्तीचे एक साधन समजण्यात आले होते. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदी किंवा हिंदुस्तानी ही नक्कीच भारताची राष्ट्रभाषा (लिंग्वाफ्रँका) होणार या विषयी आम्हा स्वातंत्र्यसैनिकांच्या मनात तर कसलीच शंका नव्हती; परंतु प्रत्यक्ष जेव्हा भारताची राज्यघटना तयार झाली तेव्हा 'राष्ट्रभाषा' हा शब्दच तिच्यातून गाळण्यात आला. 'राष्ट्रीय भाषा' हा शब्द बहुधा असावा, मात्र तो केवळ हिंदीसाठी नसून भारतातील घटनेने मान्य केलेल्या सर्वच चौदा भाषा या राष्ट्रीय भाषा असल्याचे सांगण्यात आले. याचा अर्थ भारताला आपली राष्ट्रभाषाच नाही. राजभाषा, कारभाराची भाषा, सहभाषा या स्वरूपात इंग्रजीबरोबर हिंदीला कागदोपत्री स्थान अवश्य मिळाले; परंतु प्रत्यक्षात ती इतर प्रादेशिक भाषांप्रमाणे इंग्रजीची दासीभाषा म्हणूनच ओळखली जाऊ लागली. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात वगैरे प्रादेशिक भाषांना राजभाषेचा दर्जा दिला खरा, पण तो केवळ कागदावरच राहिला. इंग्रजी हीच राजभाषा म्हणून चालत राहिली आहे. खाष्ट सासूच्या हाताखाली नांदणाऱ्या सूनेला जेवढे मर्यादित स्वातंत्र्य असते, तेवढे देखील इंग्रजीच्या धाकाखाली वावरणाऱ्या मराठी, कन्नड, गुजराती वगैरे भाषांना प्राप्त झालेले नाही. हिंदीची अवस्था काही वेगळी नाही. तिला राष्ट्र-

भाषेचा दर्जा तर मिळाला नाहीच; पण खऱ्याखुऱ्या राजभाषेचा दर्जाही मिळू शकलेला नाही; आणि आता तर उत्तर प्रदेश, बिहार वगैरे राज्यांत उर्दूला दुय्यम राजभाषेचा दर्जा देण्यात आल्यामुळे हिंदीचे मूळचेच डळमळीत स्थान जास्तच अस्थिर बनले आहे. दक्षिण भारतात तामिळनाडू आणि पूर्व भारतात बंगाल हे हिंदीचे कट्टर विरोधक. यांपैकी तामिळनाडूत इंग्रजीचे महात्म्य, तर बंगालमध्ये बंगालीचे. तामिळनाडूत ब्राह्मणद्वेषातून संस्कृतद्वेष आणि आर्यद्वेषातून हिंदीद्वेष यांना पद्धतशीरपणे खतपाणी घालण्यात आले. त्यामुळे 'आकाशवाणी' हा संस्कृतचा शब्दही तो हिंदीचा आहे असे समजून त्याऐवजी पुन्हा पूर्ववत् ऑल इंडिया रेडिओ हा इंग्रजी शब्द वापरण्यात न आल्यास सारे राज्ययंत्रच बंद पाडण्याची धमकी तेथील सर्व राजकीय पक्षांनी दिली; आणि एरव्ही शूरपणाचा आव आणणाऱ्या इंदिरा गांधींनाही त्या बाबतीत सपशेल शरणागती पत्करून ज्यांनी तो बदल घडवून आणलेला होता ते माहिती व नभोवाणी मंत्री परदेशात असतानाच त्यांनी 'आकाशवाणी'च्या ऐवजी पूर्ववत् 'ऑल इंडिया रेडिओ' हा शब्द चालू करून दिला. बंगालमध्ये हिंदी विरोधाने इतके वेडपट किंवा माथेफिरू स्वरूप धारण केलेले नाही. कारण, बंगाली भाषाच अत्यंत संस्कृतप्रचूर असल्याने, आणि हिंदी प्रदेशाच्या व लोकांच्या सानिध्यामुळे (कलकत्त्यातील हमाल, मजूर, कामगार, व्यापारी मुख्यतः हिंदीभाषीच आहेत) त्यांना हिंदी, विशेषतः संस्कृतप्रचुर हिंदी समजणे मुळीच अवघड जात नाही. तरीपण भारताची राष्ट्रभाषाच काय, पण राजभाषाही हिंदी असता कामा नये, या बाबीत तामिळ व बंगाली यांचे सामान्यतः एकमत आहे; आणि बौद्धिक क्षेत्रात हे दोन्ही प्रदेश अग्रेसर असल्यामुळे त्यांचा विरोध डावलणे आजवर कुणालाच शक्य झालेले नाही. इंदिराजी इतर सर्व बाबतीत शक्तिमान असतील; परंतु या एका बाबतीत मात्र त्यांची मात्रा चालत नाही.

राष्ट्रभाषा व राजभाषा

या संदर्भात राष्ट्रभाषा व राजभाषा यांतील फरक समजून घेणे उचित होईल. राष्ट्रभाषा ही जनतेनेच ठरवावयाची असते. तर राजभाषेचा निर्णय राज्यघटनेने, सरकारने करावयाचा असतो. भारतातील जनतेने शेकडो वर्षांपूर्वी हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून अनौपचारिकपणे मान्यता दिली असून आंतरप्रांतीय व्यवहारासाठी तिचा वापर येथे पूर्वीपासून चालत आलेला आहे. आपल्या राज्यघटनेने त्यावर शिक्का मोर्तब केले असते, तर हिंदी ही देशाची रीतसर राष्ट्रभाषा बनली असती. अर्थात् तसे शिक्कामोर्तब झाले नाही तरी, आंतरप्रादेशिक बिनसरकारी व्यवहारासाठी ती वापरली जातच आहे. सरकारी व्यवहारासाठीही ती वापरली

जाईल तेव्हा ती राजभाषा बनेल व राष्ट्रभाषा बनेल.

मलेशियातील एक न्यायनिर्णय

वस्तुतः हा विषय आता कालबाह्य झाला आहे. आपल्या देशाला एक राष्ट्र-भाषा असावी. निदान एक राजभाषा तरी असावी असे वाटणाऱ्या जुन्या पिढीतील आमच्यासारख्या मंडळींनी ती आशा सोडून दिली आहे. नव्या पिढीने इंग्रजी हीच राष्ट्रभाषा, राजभाषा, संपर्कभाषा म्हणून स्वीकारली असल्याने त्यांच्यासमोर काही प्रश्नच नाही. कर्नाटक राज्यातील गोकाक अहवालामुळे जनता आणि सरकार यांना भाषाविषयक भूमिकेला नव्याने विचार करावा लागला खरा; परंतु त्यात राष्ट्रभाषेपेक्षा प्रादेशिक भाषेलाच विशेष महत्त्व असल्यामुळे हिंदीचा प्रश्न पूर्णपणे दुर्लक्षिला गेला.

अशा स्थितीत अचानक ता. ९–७–८२ च्या 'टाईम्स ऑफ इंडिया' दैनिकातील क्वालालंपूरहून श्री दिलीप मुखर्जी यांनी धाडलेल्या एका बातमीने ध्यान आकर्षित करून घेतले. मलेशियातील सर्वोच्च न्यायालयाने (फेडरल कोर्टाने) सरकारचा एक निर्णय योग्य असल्याचा निर्णय दिल्याची ती बातमी होती. तो निर्णय असा की, देशातील चिनी लोकांना चिनीभाषेचे माध्यम असणारे स्वतःचे एक खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास सरकारने परवानगी नाकारली, ही गोष्ट घटनेला धरूनच आहे, मलेशियाच्या राज्यघटनेने मलय अथवा 'बहासा' (भाषा) ही एकमेव राष्ट्रभाषा व राजभाषा म्हणून स्वीकृत केली असल्यामुळे दुसऱ्या कोणत्याही भाषेला प्रमुख अथवा एकमेव माध्यम म्हणून स्थान देणाऱ्या विद्यापीठाला मान्यता देणे सरकारला शक्य नाही, हा मुद्दा न्यायालयाने मान्य केला, असा या निर्णयाचा अर्थ होतो. सरकारने आपल्याला विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी नाकारणे म्हणजे घटनेने अल्पसंख्य जमातीला दिलेल्या भाषिक स्वातंत्र्यावर गदा आणण्यासारखे आहे, या मुद्यावर हा प्रश्न उपस्थित केला गेला होता; परंतु न्यायालयाने तो मुद्दा फेटाळून लावला. अल्पसंख्य समाजांना त्यांच्या स्वतःच्या शिक्षणसंस्था चालविण्याचा अधिकार असावा, ही गोष्ट लोकशाहीच्या दृष्टीने योग्यच म्हटली पाहिजे. परंतु आपल्या या अधिकाराचा ते दुरुपयोग तर करीत नाहीत ना, हे पाहण्याचे कर्तव्यही सरकारने पार पाडले पाहिजे. तिकडे दुर्लक्ष झाल्यामुळे येथील अल्पसंख्यकांनी आपल्या शिक्षणसंस्थाचा वापर धर्म-प्रसारासाठी व देशद्रोही विचारांचा प्रचार करण्यासाठी केला. त्यामुळे सारा पूर्वांचल भारतातून फुटून निघेल अशी परिस्थिती निर्माण झाली; आणि मुसल-मानांच्या वेगळ्या उर्दू शाळांमुळे भारताविषयी कसलीही आत्मीयता नसणारे विद्यार्थी तयार झाले. या धोक्याकडे अजूनही आपल्या राजकर्त्यांचे लक्ष जात नाही, ही

दुर्दैवाची गोष्ट आहे.

भारतीय राज्य घटनेचा हवाला

मलेशिया हे भारताप्रमाणेच संघराज्य आहे. तेथेही भारताप्रमाणेच विभिन्न धर्मांचे, जमातींचे व वेगवेगळचा भाषा बोलणारे लोक आहेत. मलय, चिनी व भारतीय या तीन प्रमुख जमाती किंवा राष्ट्रके तेथे आहेत. त्या सर्वांनी एकजीव, एकरूप होऊन राहावे असे वाटल्यामुळे मलेशियात 'बहासा' या भाषेला राष्ट्र-भाषेचा व राज्यभाषेचा दर्जा घटनेनेच बहाल केला आहे. या घटनेपासून भारताला पुष्कळ काही शिकता येईल. परंतु ती चर्चा तूर्त बाजूला ठेवू. आपला हा चार विरुद्ध एक असा बहुमताचा निर्णय जाहीर करताना मलेशियाचे सर्वोच्च न्यायमूर्ती तन मुहम्मद सफियान यांनी मलेशियन व भारतीय राज्य घटनांमधील या संबंधा-तील जो फरक दाखवून दिला आहे, तो अधिक महत्त्वाचा आहे. त्यांनी असे दाखवून दिले आहे की, "मलेशियाची राज्यघटना ही भारताच्या राज्यघटनेवर आधारलेली, तिला आदर्श समजून बनविलेली आहे; परंतु भाषिक हक्कांच्या बाबतीत त्या दोन राज्यघटनांमध्ये महत्त्वाचे फरक आहेत. भारतीय राज्यघटनेच्या १७ व्या भागात कोणत्याही भाषेला राष्ट्रभाषेचे स्थान देण्यात आलेले नसून हिंदीचा वापर सरकारी कामकाजाची भाषा किंवा 'राजभाषा' (ऑफिशियल लँग्वेज) म्हणून करावा, एवढेच सांगितले आहे. भारतीय घटनेच्या मूलभूत अधिकारांची चर्चा करणाऱ्या प्रकरणातील कलम ३० अन्वये कोणत्याही अल्पसंख्य गटाला स्वतःच्या मर्जीप्रमाणे शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व चालविण्याचा अधिकार बहाल करण्यात आला आहे. तसा अधिकार आमच्या राज्यघटनेने अल्पसंख्य समाजांना दिलेला नाही. १९५६–५७ साली ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी राज्यघटना तयार करण्या-साठी जे रॉयल कमिशन नेमले होते, त्याने हा भाग आमच्या घटनेत घेतलेला नाही. या कमिशनचे एक सभासद अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री मलिक हे होते." श्री तन सफियान यांनी एक मार्मिक टोलाही मारला आहे. ते म्हणतात, "बहासाचा वापर केवळ राष्ट्रभाषा म्हणूनच न करता ती सरकारी काम-काजाचीही भाषा असली पाहिजे; आणि या देशात राहणाऱ्या विविध वंशांच्या बहुभाषिक जमातींना एकसंध व एकात्म बनविण्याचे कामही तिने केले पाहिजे, असा आमच्या घटनाकाराचा उद्देश होता. अर्थात् सरकारी कामकाजाव्यतिरिक्त इतर कामांसाठी प्रत्येक जमातीला आपली भाषा जतन करण्याचा, तिचा वापर व अभ्यास करण्याचा पूर्ण अधिकार आमच्या घटनेने बहाल केला आहे." विभिन्न वंशांचे, धर्मांचे व भाषा बोलणारे लोक ज्या देशात असतात, तेथे त्यांना एकात्म बनविण्या-साठी इतर राष्ट्रे कसा पद्धतशीर प्रयत्न करतात आणि आपण मात्र भाषेच्या

नावावर फुटीर वृत्तींना कसे उत्तेजन देतो याची कल्पना या निर्णयावरून येते.

भारताने संधी गमावली

धर्म, संस्कृती, भाषा, अर्थव्यवस्था वगैरे अनेक गोष्टी देशातील बहुभाषी, बहुधर्मी, बहुपंथीय समाजांना एकात्म बनविण्यास मदत करतात. त्यांचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हे मात्र राज्यकर्त्यांना व समाजधुरीणांना समजले पाहिजे. ते समजले नाही किंवा समजल्यावरही त्याकडे दुर्लक्ष केले तर, याच गोष्टी समाजात फूट पाडण्यास कारणीभूत होतात. दुर्दैवाने भारतात हेच घडले. याचे कारणही उघड आहे. स्वातंत्र्यानंतर ज्यांच्या हाती सत्ता आली, त्यांनी केवळ सत्तेचाच विचार केला. ती सत्ता आपल्या हाती कशी राहील, एवढेच नव्हे तर, आपल्या वारसांच्या हाती ती कशी पडेल यावरच त्यांचे लक्ष केंद्रित झाले. त्यामुळे भारतीय समाजाच्या एकात्मीकरणाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले आणि फुटीरपणा वाढत गेला. आपल्या स्वार्थाच्या आहारी जाऊन नेहरू आणि इंदिरा गांधी यांनी या फुटीरपणाला उत्तेजन दिले. गांधीजींनी अस्पृश्यांना सवर्ण समाजात एकरूप होता यावे म्हणून जिवाचे रान केले. पण स्वातंत्र्यानंतर अस्पृश्यांचे वाली आपणच आहोत, असा आभास निर्माण करून त्यांना सवर्णांपासून दूरच ठेवले गेले. गांधीजींच्या अनुयायांना अस्पृश्यता पाळणे हे पाप आहे, तो सामाजिक गुन्हा आहे, असे वाटत होते. नेहरू आणि इंदिराजींच्या अनुयायांमध्ये ती भावना उरली नाही; आणि त्यांनी अस्पृश्यांवर अत्याचार करण्यास सुरुवात केली. हे अनुयायी उच्च वर्णीय, धनिक, शेतमालक होते. त्यांच्या आधारावर काँग्रेसला निवडणुका जिंकता येत होत्या. त्यांना नाराज करणे नेहरूंना किंवा इंदिराजींना परवडण्यासारखे नव्हते; आणि या धनिकांना, श्रीमंत शेतकऱ्यांना, बागाईतदारांना स्वस्त मजूर म्हणून हरिजनांचा गुलामासारखा वापर करावयाचा होता. त्यांनी गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवण्याचा अवकाश, त्यांची कत्तलच केली जाऊ लागली. त्यामुळे हिंदूसमाज अधिकच दुबळा बनला. याऐवजी गांधी, विवेकानंद वगैरे महापुरुषांच्या कल्पनेतील हिंदूधर्माचे स्वरूप लक्षात घेऊन हरिजनांना योग्य ते संरक्षण व सोयी-सवलती देऊन त्यांना आश्वस्त करण्यात आले असते तर, हिंदूसमाज हा एक सामर्थ्यशाली, एकसंध समाज बनला असता. त्याचा इतर धर्मांच्या अनुयायांवर एवढा परिणाम झाला असता, की त्यांना फुटीरतेचे देशद्रोही विचार शिवलेच नसते. हीच गोष्ट मुस्लिम व ख्रिश्चन धर्मांच्या अनुयायांच्या बाबतीतही घडली. त्यांनी भारतीय समाजधारेशी, संस्कृतीशी एकरूप व्हावे असा प्रयत्न करण्याऐवजी त्यांच्यातील फुटीरतेलाच उत्तेजन दिले गेले. स्वातंत्र्यानंतर येथील मुस्लिम व ख्रिस्ती समाज भारतीय जीवनाशी एकरूप होण्याच्या मनःस्थितीत होते. त्याचवेळी सर्व धर्मांना लागू असणारा समान नागरी

कायदा करण्यात आला असता तर त्याला विरोध करण्यास फारसे कोणी पुढे आले नसते. परंतु सत्तेच्या नशेत चूर झालेल्या आमच्या पुढाऱ्यांना ते सुचले नाही. कदाचित् काल्पनिक विरोधाला घाबरून त्यांनी तो विचार मनातून काढून टाकला असेल; परंतु त्यामुळे या देशाला एकसंध समाज बनविण्याची फार चांगली संधी भारताने गमावली, अशीच नोंद इतिहासाला करावी लागेल. सत्ताधाऱ्यांकडूनच फुटीरतेला उत्तेजन मिळाल्यामुळे या देशाचे तुकडे पाडण्याचे मनसुबे बांधणाऱ्यांना शिरजोर बनण्यास वाव मिळाला. धर्मांतराच्या माध्यमातून आपली संख्या वाढवावी, तिच्या जोरावर जागजागी छोटी पाकिस्ताने निर्माण करावीत आणि कालांतराने सारा भारत इस्लाममय बनवावा, अशी स्वप्ने येथील मुसलमान पाहू लागले. ती स्वप्ने साकार करण्यासाठी कोट्यवधी पेट्रोडॉलर अरब देशातून येथे राजरोस येऊ लागले; आणि मुस्लिम मतदारांच्या मतांवरच आपली सत्ता अवलंबून असल्याचे लक्षात आल्यामुळे येथील सत्ताधारी त्या साऱ्या प्रकाराकडे कानाडोळा करू लागले. एवढेच नव्हे तर, जे कोणी या संभाव्य धोक्याकडे जनतेचे व सरकारचे लक्ष वेधू लागले त्यांनाच जातीयवादी व देशद्रोही ठरवून झोडपण्यास सुरुवात झाली. याचा एक सुपरिणामही झाला. आपले सरकार आपले रक्षण करणार नाही याची कल्पना जनतेला आली; आणि तिने स्वतःच संघटित होऊन आपले रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त केला. हिंदू समाजात जागृती निर्माण करण्याचे काम आजवर मूठभर उच्च-वर्णीय करीत होते. आता समाजातील तळागाळाचे तरुण स्वेच्छेने या कामाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर उचलण्यास पुढे येत आहेत. हा तो सुपरिणाम होय.

भाषिक ऐक्यातून सामाजिक एकात्मता

धर्माच्या बाबतीत काँग्रेसवाल्यांनी जसा गाफीलपणा केला, तसाच भाषेच्या बाबतीतही केला. स्वातंत्र्यानंतर पहिल्या पाच-दहा वर्षांत राष्ट्रीयत्वाची भावना एवढी ज्वलंत होती की, राष्ट्रभाषेच्या किंवा राजभाषेच्या द्वारे संपूर्ण समाजाला एकात्म बनविणे सहज शक्य होते. फटक्यासरशी केंद्रीय सरकारचे कामकाज हिंदी-तून आणि राज्यसरकारचे कारभार प्रादेशिक भाषांतून सुरू केले असते तर देश-भक्तीच्या भावनेने भारावलेल्या जनतेने त्याला विरोध करण्याऐवजी त्याचे स्वागत केले असते; पण नेहरूंनाच इंग्रजीचा एवढा मोह होता की, बहुधा त्यांचा स्वतःचाच राजभाषा म्हणून हिंदी भाषा कारभाराचे ओझे पेलू शकेल, यावर विश्वास नसावा. परकीय सरकारचे इंग्रजी धार्जिणेपणाचे धोरण तसेच चालत राहिले. किंबहुना त्याला भरतीच येत गेली. त्यामुळे खेड्यापाड्यांतील लोकांचीही अशी ठाम समजूत झाली की, आपल्या मुलाबाळांच्या उज्ज्वल भविष्यासाठी इंग्रजीचा आसरा

अनिवार्य आहे. जिकडे-तिकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा बोलबाला सुरू झाला. ऐपतदार लोकांनीच नव्हे तर, ज्यांना जमाखर्चाची तोंड-मिळवणी करणेही अवघड जात होते, अशांनी देखील कर्ज काढून आपल्या मुलांना महागड्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांत घालण्यास सुरुवात केली. मंत्री, आमदार, खासदार, अधिकारी, 'इंग्रजी हटाव'वाले पुढारी, सगळ्यांनीच इंग्रजीची भक्ती सुरू केली. अशा स्थितीत मातृभाषाच तोंड लपवून कोपऱ्यात बसली. मग राष्ट्रभाषेला किंवा राजभाषेला कोण पुसतो ? मलेशियाप्रमाणे भारतानेही राष्ट्रभाषेला महत्त्वाचे स्थान दिले असते, तर उर्दूच्या बुरख्याखाली आपला सवतासुभा निर्माण करण्याची, उर्दूला दुसरी राजभाषा म्हणून मान्यता मिळविण्याची हिंमत मुसलमानांना झाली नसती. हिंदीच्या अवहेलनेमुळे एकीकडे प्रादेशिक भाषांची हेळसांड सुरू झाली, तर दुसरीकडे उर्दूच्या फुटीरपणाला उत्तेजन मिळाले. या सगळ्या गोंधळात इंग्रजी मात्र पट्टराणीच्या पदावर भक्कमपणे पाय रोवून आरुढ झाली. इंग्रजीची जागा हिंदीला देण्याच्या कार्यक्रमात प्रस्थापितांना थोडी घस अवश्य सोसावी लागली असती, परंतु थोड्याच दिवसात ते लोकही हिंदीच्या वापरात तरबेज झाले असते. अर्थात् सुखासीनतेकडे झुकलेल्या सत्ताधाऱ्यांना व प्रशासकांना तेवढीही तसदी नको होती. म्हणूनच इंग्रजीचे प्रस्थ दिवसेंदिवस वाढत गेले.

राष्ट्रभाषेचे स्वरूप

या संदर्भात आणखी एक मुद्दा जाता जाता मांडता येईल. हिंदीला राजभाषेचा दर्जा देण्यास तामिळी, बंगाली वगैरे ज्या लोकांचा विरोध होता व आहे, त्यांचे म्हणणे असे की, असा दर्जा दिला गेल्यास ज्यांची मातृभाषा हिंदी आहे, त्यांना आपोआपच वरचष्मा गाजविण्याची संधी मिळेल. त्यांच्या या आक्षेपात मुळीच तथ्य नाही, असे म्हणता येत नाही. गांधीजींनी शेवटच्या दिवसांत हिंदी ऐवजी हिंदुस्तानीचा पुरस्कार सुरू केला होता. उर्दूसह सर्व भारतीय भाषांचे सहकार्य घेऊन ही हिंदुस्तानी आपोआप बनावी, अशी त्यांची अपेक्षा होती. तसे झाले असते, तर हिंदीभाषी लोकांनाही हिंदुस्तानी शिकावी लागली असती. शिवाय या राष्ट्रभाषेची लिपी नागरी किंवा उर्दू न ठेवता ती रोमन ठेवावी, असे मत मांडणारे प्रख्यात गांधीवादी विचारवंत श्री किशोरीलाल मश्रूवाला आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्यांची भूमिका अगदीच चूक नव्हती, असे नंतरच्या घटनांवरून वाटते. राष्ट्रभाषेची लिपी नागरीपमाणेच रोमनही राहील अशी योजना केली गेली असती, तर कदाचित तामिळ, बंगाली लोकांचा विरोध पुष्कळच मावळला असता. अजूनही अशा प्रकारचा एखादा मार्ग काढण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. असाहाय्यपणे इंग्रजीचे वाढते वर्चस्व सहन करण्यापेक्षा अशा एखाद्या

तडजोडीतून बहुसंख्य भारतीयांना परिचित असलेल्या हिंदी-हिंदुस्तानीला मोठ्या प्रमाणावर मान्यता मिळू शकली, तर भारताची एकात्मता सुदृढ होण्यास पुष्कळच हातभार लागेल असे वाटते. विचारवंतांनी राष्ट्रभाषेची 'केस' अगदीच हाताबाहेर गेली आहे असे न मानता यादृष्टीने पुन्हा विचारमंथन सुरू केल्यास, कुणी सांगावे, सर्वसंमत मार्ग मिळूनही जाईल !

✣ ✣

'तरुण भारत' : १५·८·८२

१५. राष्ट्रगीताच्या निमित्ताने

सर्वोच्च न्यायलयाचे न्यायमूर्ती ओ. चिन्नप्पा रेड्डी आणि न्यायमूर्ती एम्. एम्. दत्त यांनी राष्ट्रगीतासंबंधी जो निर्णय दिला, त्याबद्दल प्रत्येक देशभक्त भारतीयाने त्यांचे आभार मानले पाहिजेत. कारण, त्या निर्णयातून अनेक प्रश्न निर्माण झाले, आणि त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न जो-तो आपापल्या वृत्तीनुसार व कुवतीनुसार करू लागला. एकूण भारतीयसमाज, आणि विशेषत: हिंदू समाज इतका मुर्दाड बनला आहे की, कुणीतरी त्याच्या पेकाटात लाथ हाणल्याशिवाय त्याला जागच येत नाही. परमकृपाळू परमेश्वराची या देशावर कृपादृष्टी असल्यामुळे तो भारतीय समाजाला जागे ठेवण्यासाठी अधून-मधून अशी सणसणीत लाथ हाणणाऱ्याला पाठवून देत असतो. हे लाथ हाणणारे कधी परकीय असतात, तर कधी स्वकीयही असतात. मोगल, पठाण, अफगाण, इंग्रज हे लत्ताप्रहारक इतिहासकाळात होऊन गेले. स्वातंत्र्योत्तर काळात चीन, पाकिस्तान वगैरे आमच्या हितचिंतकांनी आम्हाला जागे करण्याचे आपले पवित्र कर्तव्य बजावले. द्रविडस्तान, खालिस्तान, मोपलास्तान वगैरेची स्वप्ने पाहणारे आमचे देशबांधव तेच कार्य निष्ठापूर्वक करीत आहेत. त्यामुळे जे झटके बसतात त्यांनी आपण काही काळ खडबडून जागे होतो आणि त्या संकटांचा कसा मुकाबला करायचा याचा विचार करू लागतो. अर्थात त्या लाथेमुळे उठलेली कळ थोडी कमी झाली की, आपण पुन्हा निवांतपणे डोक्यावरून पांघरूण घेऊन झोपतो, ही गोष्ट वेगळी. परंतु त्या जागृतीच्या अल्प काळात का होईना, आपण थोडीफार हालचाल करतो. आणि आपल्या विचारमंथनाला चालना मिळते. इंदिराजींनी देशावर आणीबाणी लादून असेच आपल्याला खडबडून जागे

केले होते. त्या उपकाराची फेड आपण त्यांना पुन्हा सन्मानाने सिंहासनावर बसवून केली होती, ही तर अगदी अलीकडचीच घटना आहे.

आपल्याला राष्ट्रगीत आहे तर !

आपल्या परम आदरणीय न्यायमूर्तींनी आपल्या निकालात असे म्हटले आहे की, " घटनेतील कलम १९ प्रमाणे भारताच्या नागरिकास प्राप्त असलेलं भाषण व अभिव्यक्ति-स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क आणि कलम २५ प्रमाणे मिळालेले धर्म-स्वातंत्र्याचे हक्क लक्षात घेता आणि घटनेमध्ये राष्ट्रगीत म्हणणे हे कायद्याने बंधनकारक ठरविण्यात आलेले नसल्याने कुणावरही राष्ट्रगीत म्हणण्याची सक्ती करता येणार नाही." त्यांच्या या निर्णयाने आमच्या पेकाटात एक सणसणीत लाथ बसली; आणि आपण झोपेतून उठून डोळे चोळीत आजूबाजूला पाहू लागलो. अरेच्चा ! आपल्याला तर हे माहीतच नव्हते ! आपण असे समजून चाललो होतो की, राष्ट्रगीत म्हणणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे व त्यात चुकारपणा करणाऱ्यावर कायदेशीर इलाज केला जातो. परंतु तसे आपण राज्यघटनेत नमूद करायला विसरलो होतो; आणि नंतर तशा अर्थाचा कायदा केला पाहिजे, याची गरजही कुणाला भासली नाही. एका दृष्टीने हे क्षम्य समजता येईल. आपल्या आईवर, बापावर, मुलावर प्रेम केले पाहिजे, हे काय कुणाला शिकवावे लागते ? त्यासाठी जगात कुठेतरी कायदा केला गेला असेल काय ?

या देशातले सर्वच लोक भारतमातेला आपली माता मानतात. तेव्हा तिचा आदर करण्याची सक्ती कोणावरही करावी लागणार नाही, प्रत्येक भारतवासी स्वभावतःच भारतमातेचा आदर करील असे आपण गृहीत धरले होते. राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज यांचा मान राखणे म्हणजेच भारतमातेवर आपले प्रेम आहे असे सिद्ध करणे आहे. ही तर साधी, सरळ गोष्ट असल्यामुळे आपण त्या बाबतीत साफ गाफील राहिलो. इतके की, आपल्याला राष्ट्रगीत आहे, याचाच विसर आपल्याला पडला. सर्वोच्च न्यायालयाच्या विद्वान् न्यायमूर्तींनी या देशाला राष्ट्रगीत आहे, परंतु ते म्हणण्याची कुणावरही सक्ती करता येणार नाही, असा परखड निकाल देऊन, आपल्याला राष्ट्रगीत आहे, याची जाणीव देशाला करून दिली. त्याबद्दल खरोखरीच आपण त्यांचे ऋणी राहिले पाहिजे. शिवाय ज्यांनी राष्ट्रगीत म्हणण्यास साफ नकार दिला त्यांचेही आपल्यावर पर्वताएवढे उपकार झाले आहेत. वस्तुतः या देशाला आपली मातृभूमी न मानणारे, राष्ट्रगीत व राष्ट्रध्वज यांचा अपमान करणारे लक्षावधी लोक या देशात काश्मीरपासून केरळपर्यंत पसरलेले आहेत. ते पाकिस्तानचे निशाण आपल्या घरांवर लावतात आणि ' पाकिस्तान झिंदाबाद 'च्या घोषणा देतात. त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई केली जात नाही. याचे कारणही

बहुधा हेच असावे की तशा कारवाईची काही तरतूद आमच्या राज्यघटनेत अथवा कायद्यात नाही–नसावी. आता या न्यायालयीन निवाड्यानंतर कदाचित याही वस्तुस्थितीकडे देशातल्या पुढाऱ्यांचे, कायदेपंडितांचे, राज्यकर्त्यांचे लक्ष वेधले जाईल अशी आशा करूया.

राष्ट्रगीते : एक की दोन ?

या निमित्ताने आणखी एका गोष्टीचे स्मरण लोकांना झाले. ती अशी की, या देशाला एकच राष्ट्रगीत नसून दोन राष्ट्रगीते आहेत; आणि जुन्या लोक-कथांतल्या प्रमाणे त्यांपैकी एक आवडते असून दुसरे नावडते आहे. ज्या गीताचा राष्ट्रगीताच्या सिंहासनावर बसण्याचा खराखुरा हक्क होता, ज्याने अग्निपरीक्षेतून तावून सुलाखून बाहेर पडून आपला तो हक्क प्रस्थापित केला होता त्या 'वंदेमातरम्' गीताला राजकरण्यांच्या भ्याड कारवायांमुळे दुय्यम स्थान मिळाले; आणि आयत्या वेळी पुढे आलेले 'जनगणमन' हे प्रथम क्रमांकाचे राष्ट्रगीत बनले. खरे तर हा राष्ट्रीय अस्मितेचा अवमान होता; परंतु अपमान पचविण्याचे अद्‌भूत सामर्थ्य अंगी असणाऱ्या भारतीय जनतेने तो अवमान निमूटपणे सहन केला. याठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. मी स्वत: रवीन्द्रनाथांचा परमभक्त आहे; आणि 'जनगणमन' हे गीत त्यांनी इंग्लंडच्या बादशहाच्या स्वागतासाठी लिहिले होते, यावरही माझा विश्वास नाही. माझा आक्षेप वेगळ्याच कारणांसाठी आहे. तो असा की, त्या गीताला स्वातंत्र्यलढ्याची स्फूर्तिदायक पार्श्वभूमी लाभलेली नाही; आणि त्यात मातृभूमीचे चित्र साकार करण्याचे सामर्थ्य नाही. ते गीत कोणाला उद्देशून लिहिले आहे, तो 'भारत भाग्य विधाता' कोण, याचाच नीट उलगडा होत नाही. तो परमेश्वर असेल, तर ते भक्तिगीत होईल; राष्ट्रगीत होणार नाही. शिवाय साऱ्या जगाचा प्रतिपाळ करणारा परमेश्वर फक्त भारताच्याच भाग्याचा विधाता कसा असेल, हीही एक शंका डोकावून जातेच. याच्या उलट 'वंदेमातरम्' म्हणताना संपूर्ण देशाचे, मातृभूमीचे सजीव साकार चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहाते म्हणून 'वंदेमातरम्' हेच भारताचे एकमेव राष्ट्रगीत झाले पाहिजे, आणि कालांतराने ते तसे व्हावे, असे मला वाटते. परंतु आपल्या राज्यघटनेने 'जनगणमन'ला स्वीकृती दिली असल्यामुळे त्याचा आदर करणे हे–ही सर्वच भारतीयांचे कर्तव्यच आहे.

'वंदेमातरम्'ची अवहेलना

परंतु आमच्या राज्यकर्त्यांचा विचार मात्र वेगळाच दिसतो. 'जनगणमन'चा प्रसार वाढवून 'वंदेमातरम्' आपोआप विस्मरणात जावे, असा त्यांचा प्रयत्न

असावा अशी मला शंका येते. सरकारी समारंभांतून 'वंदे मातरम्' जवळजवळ बहिष्कृतच झाल्यासारखे दिसते. सुदैवाने बिनसरकारी कार्यक्रमांतून त्याला अजूनही महत्त्वाचे स्थान दिले जाते. म्हणजे 'जनगणमन' हे सरकारी राष्ट्रगीत तर 'वंदेमातरम्' हे जनतेचे राष्ट्रगीत, अशी आपोआपच विभागणी झाली आहे. त्यामुळे जेव्हा जनतेची इच्छाशक्ती पुरेशी प्रबळ होईल तेव्हा 'वंदेमातरम्' हेच भारताचे राष्ट्रगीत होईल, अशी आशा करता येते.

या अवहेलनेचे एक उदाहरण अलीकडेच माझ्या लक्षात आले. आकाशवाणीची विविध भारतीसारखी ऑल इंडिया रेडियोची एक उर्दू सर्व्हिस आहे. ४२७ व २८० या मीटरवरून ती चालते. मुंबई 'अ' व पुणे यांच्या जवळपास ती केंद्रे मिळतात. या केंद्रांचे कार्यक्रम सकाळी ५-४५ ला सुरू होतात. आकाशवाणीची इतर केंद्रे पहाटे सुरू होताना 'वंदेमातरम्' असे म्हणून श्रोत्यांचे स्वागत करतात; आणि लगेच 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत श्रोत्यांना ऐकविले जाते. त्यानंतर सनईचे मंजुळ स्वर आणि संस्कृतचे श्लोक श्रोत्यांच्या कानांवर पडतात. याच्या उलट या उर्दू सर्व्हिसचा प्रारंभ मात्र 'आदाव अर्ज' या स्वागतशब्दांनी होतो; आणि त्यानंतर लागलीच कुराणाचे पठण, नात, कव्वाली यांसारखी इस्लामी गीते ऐकविली जातात. त्यामुळे ही उर्दू सर्व्हिस नसून इस्लामी सर्व्हिस आहे, हे लगेच लक्षात येते.

या केंद्रांकडून 'वंदेमातरम्'चा पद्धतशीर बहिष्कार केला जातो असे दिसते. 'वंदेमातरम्'ला मुसलमानांचा आक्षेप आहे; म्हणून त्यांचा तो आक्षेप मान्य करून भारत सरकारने या केंद्राला तशी सूट दिली असावी. या संदर्भात दोन तीन प्रश्न उपस्थित होतात. पहिला असा की, मुसलमानांचा 'वंदेमातरम्' या गीताला विरोध आहे, म्हणून भारत सरकारनेही त्या गीताला विरोध करावा काय? तसे असेल तर इतर केंद्रांवरूनही ते गीत बंद करण्यात आले पाहिजे. तसे करण्याची हिंमत सरकारला बहुधा होत नसावी. वस्तुतः मुसलमानांचा विरोध या गीतातील पुढच्या भागाला आहे. सध्या जेवढा भाग म्हटला जातो त्यात मुसलमानांना आक्षेपार्ह वाटण्यासारखे काहीच नाही. ते फक्त भारतभूमीचे मनोहारी वर्णन आहे. अर्थात् भूमीला वंदन करणे हेच 'काही' मुसलमानांना पाप वाटत असण्याची शक्यता आहे. हे 'काही' मुसलमानच देशाच्या फाळणीला जबाबदार होते. इतर मुसलमान लोक स्वातंत्र्याच्या चळवळीत आनंदाने हे गीत गात होते. (आमच्या बरोबर येरवड्याच्या तुरुंगात असलेला अब्दुल 'वंदेमातरम्' गीत इतरांना म्हणावयास सांगत असे!)

हे संपूर्ण गीत सर्व मुसलमानांना आक्षेपार्ह वाटते, असे जरी गृहीत धरले तरी इतर केंद्रांप्रमाणे उर्दू सर्व्हिस केंद्राचा प्रारंभ 'वंदेमातरम्' या स्वागतशब्दांनी करण्यास काहीच हरकत असता कामा नये. की हे दोन शब्द कानावर पडताच

आपले कान विटाळतील असे मुसलमानांना वाटते ? इतके हळवे होऊन हे भारतात राहणार असतील तर ते इथल्या बहुसंख्य समाजाला नेहमीच परके वाटतील; आणि कळत-नकळत त्यांना दुय्यम नागरीकत्व प्राप्त होईल. त्यांच्याविषयी इतरांना विश्वास वाटणार नाही. नकोशा वाटणाऱ्या व्यक्तींच्या नशिबी ज्या प्रकारचे जिणे येते त्या प्रकारचे जिणे, आपल्याला का जगावे लागत आहे, याचा विचार अंतर्मुख होऊन आमचे मुस्लिम बांधव करतील तर त्यांना त्यांचे अनेक दोष दिसून येतील. त्यांपैकीच एक 'वंदेमातरम्'ला विरोध हाही एक असल्याचे त्यांना आढळून येईल.

दोष राज्यकर्त्यांचा

कधीकधी मला वाटते की, या सगळ्या प्रकारात सर्वसामान्य मुस्लिम लोकांचा काही दोष नसून मूठभर महत्त्वाकांक्षी मुस्लिम पुढाऱ्यांचा व त्या प्रतिगामी पुढाऱ्यांना मुसलमानांचे खरेखुरे प्रतिनिधी समजून त्यांचे म्हणणे मान्य करणाऱ्या सत्ताधाऱ्यांचाच खरा दोष आहे. आपण ज्या देशात राहतो, त्या देशावर आपण प्रेम केले पाहिजे, ही गोष्ट काही कुणी सांगावी, शिकवावी लागत नाही. ती तर उपजतच असते. तशी ती बहुसंख्य मुसलमानांमध्येही असलीच पाहिजे. परंतु मतांचे सौदे करण्यास चटावलेल्या पुढाऱ्यांनी भूमीवर प्रेम करणे हे इस्लामविरोधी आहे असे लोकांना पढवून त्यांच्यातील स्वाभाविक मातृभूमीच्या भक्तीला जणू पायबंद घातला आहे; आणि हे पुढारी मतांचे दलाल असल्यामुळे त्यांना खुष करण्यासाठी ज्याप्रमाणे राजीव गांधींनी मुस्लिम घटस्फोटित महिला विधेयक घाईघाईने पारित करवून घेतले, त्याप्रमाणे वंदेमातरम्‌वरही काँग्रेस सरकारने एकप्रकारे बंदी घालून टाकली.

आणखी एक गोष्ट या संदर्भात लक्षात येते. उर्दू भाषा ही केवळ मुसलमानांची भाषा नसून सर्व जातीजमातींची ती समान भाषा आहे असे भारत-सरकार व मुसलमान लोक तारस्वराने वेळोवेळी सांगत असतात. ही गोष्ट खरी असती तर उर्दू सर्व्हिस ही मुस्लिम किंवा इस्लामी सर्व्हिस बनली नसती. वास्तवामध्ये उर्दू बोलणारे मुख्यतः मुसलमान असतात. त्यांच्या शाळा, कॉलेजे, वृत्तपत्रे ही प्रामुख्याने उर्दूतच चालतात. अशा स्थितीत उर्दू ही फक्त मुसलमानांची भाषा नव्हे, हे म्हणण्यात काय अर्थ आहे ?

उर्दू ही मुसलमानांची भाषा असण्यास आमचा विरोध नाही. त्या भाषेला संस्कृत शब्द चालत नाहीत म्हणून 'ऑल इंडिया रेडिओ' हे इंग्रजी शब्द वापरावयाचे व त्यांना 'वंदेमातरम्' आवडत नाही, चालत नाही म्हणून ते गीतच नव्हे तर, ते शब्दच टाळावयाचे हा भ्याडपणा निश्चितच निषेधार्ह आहे. भारतमातेवर प्रेम असणाऱ्या सर्वांनीच या गोष्टीचा विचार करावा.

ही कसली धर्मातीतता ?

या सर्व प्रकरणातून आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. आमच्या राज्यकर्त्यांच्या प्रामाणिकपणाशी त्याचा संबंध आहे. एका बाजूने राज्यकर्तेच नव्हे तर, सारे राजकीय पक्ष भारत हे सेक्युलर म्हणजेच धर्मातीत, धर्मनिरपेक्ष किंवा निधार्मिक राज्य आहे असे सांगतात. त्यांची खरोखरीच धर्मनिरपेक्षतेवर निष्ठा असती तर, त्यांनी भाषेच्या बुरख्याखाली इस्लामचा प्रचार किंवा उदोउदो करण्याची मुभा आकाशवाणीला देऊन जनतेचा पैसा असा उधळला असता काय ? शासनकर्त्या पक्षाला मुसलमानांची मते मिळविण्यासाठी हे सारे नाटक करण्याची गरज भासत असणे स्वाभाविकच आहे; पण विरोधी पक्षांनीही या राजाश्रयावर चाललेल्या धर्मप्रचाराकडे कधीच लक्ष दिले नाही, याचे कारण काय ? की तेही इतर सर्वसामान्य लोकांप्रमाणे अंधारात राहिले आहेत ?

'सेक्युलर' या शब्दाचा अर्थ धर्मनिरपेक्षता किंवा निधार्मिकता असा केला गेला तर, कोणत्याही धर्माला अशा प्रकारे एक स्वतंत्र केंद्र बहाल करणे हे घटनाबाह्य व बेकायदेशीर ठरते. परंतु 'सेक्युलॅरिझम' म्हणजे 'सर्व धर्म समभाव' असा अर्थ घेतला तर सर्वच धर्मांना अशी स्वतंत्र केंद्रे सरकारी खर्चाने पुरविली पाहिजेत; आणि त्या धर्माचे अनुयायी जी जी भाषा बोलत असतील, त्या त्या भाषेत एकेक केंद्र चालविले पाहिजे. उदाहरणार्थ हिंदू धर्माचे अनुयायी भारतातल्या सर्वच भाषा बोलणाऱ्यांमध्ये आहेत. म्हणून त्यांच्यासाठी सर्वच भाषांमध्ये हिंदुधर्माशी संबंधित कार्यक्रम चालविले गेले पाहिजेत; परंतु इस्लाम खेरीज इतर कोणत्याच धर्मासाठी अशी सोय असल्याचे आम्हाला आढळत नाही. यावर कोणी असा प्रतिवाद करील की, उर्दू सर्व्हिस व विविध भारतीची केंद्रे वगळता इतर सर्व केंद्रांवरून हिंदू, जैन शीख, बौद्ध वगैरे धर्मांच्या व पंथांच्या प्रार्थना आणि उपदेश प्रचारित केले जातात. म्हणून त्यांच्यासाठी वेगळी केंद्रे चालविण्याची गरज उरत नाही. हा युक्तिवाद मान्य करण्यास हरकत नाही. पण मग इस्लामसाठी तरी वेगळे केंद्र कशाला हवे ?

ज्या प्रमाणे अन्य पंथांच्या व धर्मांच्या प्रार्थना इतर केंद्रांवरून सादर केल्या जातात त्याप्रमाणे इस्लामच्या प्रार्थनांचाही त्यात समावेश करण्यास कोणती अडचण आहे ? चार भजने परमेश्वराची असतात. त्यांत एक भजन अल्लाचे व खुदाचे आले तर काही कुणी तक्रार करणार नाही. नाहीतरी ईद, मोहरम, नाताळ यासारख्या सणांच्या वेळी इतर केंद्रांवरून आणि दूरदर्शनवरून इस्लामचा व ख्रिस्ती धर्माचा परिचय घडविणारे कार्यक्रम पेश केले जातात. त्याकरता वेगळे केंद्र चालविण्याची मुळीच गरज नाही. ज्यांना अधिक काटेकोर न्याय हवा असेल त्यांच्यासाठी त्यांच्या लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेऊन त्यांच्या धर्माच्या प्रार्थना व

अन्य कार्यक्रम सादर केले गेले तर इतरांची हरकत असण्याचे कारण नाही.

वंदेमातरम्‌ची सक्ती हवी

सरकारला ही सुधारणा अमलात आणावयाची नसल्यास त्याबद्दल आमची तक्रार नाही. आमचे म्हणणे एवढेच की, एकटचा इस्लामसाठी असे केंद्र चालविले जाता कामा नये. इतर सर्व धर्मांसाठीही अशी केंद्रे उपलब्ध असली पाहिजेत; परंतु या बाबतीत कोणताही निर्णय घेतला गेला तरी या देशातल्या प्रत्येक नभोवाणी केंद्राच्या कार्यक्रमांचा प्रारंभ व शेवट 'वंदेमातरम्‌' या राष्ट्रगीतानेच झाला पाहिजे. त्याबाबतीत कोणालाही सूट वा सवलत दिली जाता कामा नये, असा आग्रह मात्र आपण धरलाच पाहिजे. आमचे जे कोणी आमदार व खासदार विधिमंडळांत व संसदेत आमचे प्रतिनिधी म्हणून वसतात त्यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा केला पाहिजे. हा कोणत्याही एका पक्षाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न नसून, साऱ्या देशाच्या इज्जतीचा सवाल आहे. 'वंदेमातरम्‌' न म्हणण्याची मुभा देऊन आपण एका संपूर्ण जमातीला फुटीरवादी बनण्यास प्रोत्साहन देत आहोत, मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्यापासून दूर ठेवीत आहोत आणि देशभक्त बनण्यापासून वंचित करीत आहोत, ही गोष्ट सरकाराप्रमाणेच आमच्या लोकप्रतिनिधींनी व तमाम जनतेनेही ओळखली पाहिजे.

+ +

'तरुण भारत' : २·११·८६

१६. स्वातंत्र्यदिन : एक प्रकट चिन्तन

भारताला स्तातंत्र्य मिळाले त्या गोष्टीला आज ४१ वर्षे पूर्ण झाली. या ४१ वर्षात आपण काय मिळविले आणि काय घालविले याचा विचार आपल्यापैकी अनेकांच्या मनात निश्चितच घोळत असणार. अशा लोकांचा, विशेषत: देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील सैनिकांचा एक सामान्य प्रतिनिधी या नात्याने मी हे प्रकट चिन्तन वाचकांसमोर ठेवीत आहे.

स्वराज्याचे सुराज्य का झाले नाही ?

आपणा सर्वांच्या मनात एक प्रश्न निश्चितच वारंवार येत असणार. तो असा की, ज्या हेतूने आपण हे स्वराज्य मिळविले तो हेतू का साध्य झाला नाही ? ज्या सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान केले, अनंत हालअपेष्टा सहन केल्या, ती जनता आज ४१ वर्षांनंतरही दारिद्र्यात, दु:खात, सामाजिक विषमतेत का खितपत पडली आहे ? " यापेक्षा तर ब्रिटिशांची राजवट जास्त बरी होती ", असे उद्‌गार लोकांच्या तोडून का ऐकू येतात ? याची दोन कारणे मला दिसतात. पहिले हे की, स्वातंत्र्यानंतर ज्यांच्या हाती राजसत्ता आली त्यांनी जनतेला सुराज्याची जी आश्वासने दिली होती, त्यांचा त्यांना पूर्ण विसर पडला. आणि प्रचंड दुष्काळानंतर समोर आलेल्या अन्नावर अधाशीपणाने तुटून पडावे तसे ते सत्तेच्या फळांवर बुभुक्षितांसारखे तुटून पडले; आणि ऐष-आरामात मशगुल झाले. गोऱ्या साहेबाची जागा काळ्या साहेबाने घेतली. किंबहुना त्याच्याही पलीकडे जाऊन ते विलासी मोगल बादशहा व चैनबाज नबाब बनले.

लोकशाहीचा मार्ग हा ब्रिटिशांकडून मिळालेला वारसा असल्यामुळे दर पाच वर्षांनी निवडणुकांच्या वेळीच त्यांना जनतेची आठवण होते; आणि मतदारांना खोट्या आश्वासनांनी भुलविण्याची हातोटी त्यांना साधली असल्यामुळे व प्रारंभी देशी भांडवलदारांकडून आणि नंतर बोफोर्ससारख्या परदेशी कंपन्यांकडून वाममार्गाने मिळविलेला अमाप पैसा हातात असल्यामुळे त्याच्या जोरावर निवडणुका जिंकणे त्यांना सहज शक्य होते. अशा स्थितीत जनतेची पर्वा कोण करणार? दुसरे कारण असे की, ज्यांच्या हाती सत्ता आली नाही त्यांनी आपसात भांडण्यात आपली शक्ती खर्च केली. वस्तुतः ते जनतेकडे गेले असते व तिच्या हालअपेष्टा कमी करण्यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले असते, तर जनतेने त्यांना सत्ताधीश बनविले असते. पण त्यांना तशी सद्‌बुद्धी झाली नाही. काही विरोधी पक्ष फाळणीचे गुन्हेगार कोण याचा पंचनामा करण्यात गुंग झाले. त्यांचा राग मुख्यतः गांधीजींवर होता. म्हणून त्यांनी गांधीजींना शिव्याशाप देण्यातच धन्यता मानली; पण जनतेच्या मनात अजूनही गांधींविषयी आदर–आपलेपणा असल्यामुळे हे गांधी द्वेष्टे पक्ष जनतेपासून जास्तच दूर गेले.

या परिस्थितीला केवळ सत्ताधारी काँग्रेस पक्षच जबाबदार आहे असे म्हणता येणार नाही. सत्तेत व संपत्तीत आपल्यालाही वाटा मिळावा म्हणून काँग्रेसला निवडून देणारी आणि तिच्या भ्रष्टाचारात सहभागी होणारी जनताही तितकीच जबाबदार आहे. ज्या राज्यांत बिगरकाँग्रेसीपक्ष अधिकारावर आले, तेथेही तसाच भ्रष्टाचाराचा बुजबुजाट झालेला दिसतो. याचे कारण हेच की, खुद्द जनतेलाच आता भ्रष्टाचाराचे काही सोयरसुतक उरलेले नाही. अर्थात् स्वतःला स्वातंत्र्यसैनिक म्हणविणारे लोकच सरकारकडून निवृत्तीवेतन व इतर सोयी सवलती मिळविण्यासाठी किती लाचार बनतात, तिकडमबाजी करतात, हे पाहिले की, सामान्य जनतेला दोष देण्याची हिंमत होत नाही. मिठानेच खारटपणा सोडला तर दाद कुणाकडे मागायची? अर्थात या पापाचे धनीही वरिष्ठ नेतेच होते. नेहरू घराण्याने जी काय चिमूटभर देशसेवा केली असेल तिचा मोबदला म्हणून त्या घराण्याकडेच देशाचे पंतप्रधानपद कायम राहिले पाहिजे असा आग्रह बाळगणारे लोक स्वातंत्र्यलढ्यात थोडीफार खरी-खोटी कामगिरी बजावणाऱ्या तथाकथित स्वातंत्र्यसैनिकांना ते मागतील त्या सोयीसवलती कशा नाकारणार? जुन्या त्यागाची भरपाई लाखपटींनी, मुक्तहस्ताने केली जात आहे असे दिसताच, त्या त्यागाची जाहीर विक्रीच लोकांनी मांडली तर त्याबद्दल आपण त्यांना कोणत्या तोंडाने दोष देणार? तरीपण आपल्या दुर्दशेचे खापर पुढाऱ्यांवर फोडून मोकळ्या होणाऱ्या लोकांनी या गोष्टीचाही विचार केला पाहिजे की, या परिस्थितीला आपलाही हातभार काही कमी लागलेला नाही. ऐहिकतेच्या नावाखाली भोगलोलुपतेचा पुरस्कार करणाऱ्या

विचारांना व साहित्याला जनतेने उचलून धरले नाही काय ? जीवनातील चिरंतन सत्ये व उच्च मूल्ये यांची टिंगलटवाळी करणारी नाटके व चित्रपट आम्हीच मिटक्या मारीत पाहत नाही काय ? मला या संदर्भात एक प्रसंग आठवतो. 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचा खूप बोलबाला झाला होता. त्या सुमारास गुजरातीचे श्रेष्ठ नाटककार कै. शिवकुमार जोशी पुण्यास आले होते. त्यांना ते नाटक पाहायचे होते म्हणून मी त्यांना ते नाटक दाखवायला घेऊन गेलो. ते नाटक पाहिल्यावर त्यांनी मला एक मार्मिक प्रश्न विचारला, "गांधीमार्गाचं विकृत दर्शन घडविणारं हे नाटक मराठी प्रेक्षकांना एवढी मोहिनी घालतं याचा अर्थ काय ? मराठी माणसाची उच्च जीवनमूल्यांवरील श्रद्धाच उडून गेली आहे काय ?" मी त्यांना सांगितले, "मराठी माणूस आजही तुकोबा–ज्ञानोबाचा भक्त आहे; पण आमचे साहित्यिक पाश्चात्त्य विचारांच्या स्वभावाखाली इतके आले आहेत की, त्यांना स्वतःचाच विसर पडला आहे. त्यामुळे असे दृश्य पाहायला मिळते." स्वातंत्र्याच्या लढ्यात टिळक–गांधींनी आम्हाला स्वदेशावरोवरच साधेपणाची शिकवण दिली. आज आम्हाला तिचा पूर्ण विसर पडला असून, उपभोगाची नवनवीन उपकरणे आणि साधने मिळविण्यासाठी आम्ही आमचे शील व चारित्र्यही गहाण टाकण्यास मागेपुढे पाहत नाही. परदेशी वस्तू, इंपोर्टेड व स्मगल्ड गुडस् जवळ बाळगण्यात आम्हाला मोठेपणा वाटतो. दारूच्या व्यसनाचे उच्चाटन व्हावे म्हणून ज्यांनी गुत्त्यांसमोर निराधने केली होती व पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या होत्या तेच स्वातंत्र्यसैनिक, दारूच्या दुकानाचा परवाना मिळविण्यासाठी सचिवालयात धरणे धरतात. कधी काळी मद्यपान हे अत्यंत वाईट व्यसन समजले जात होते. आज त्याच मद्यपानाला एवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे की, मद्यपान न करणारी व्यक्ती प्रतिग्रामी व बुरसटलेली समजली जाते. मंत्र्यांपासून संत्र्यांपर्यंत सर्वांनीच रम, रमा व रमी यांना एवढी मान्यता मिळवून दिली आहे की, त्या मोहातून सुटणे सामान्य नागरिकाला फार अवघड वाटते, हे खरे आहे. पण आपले हित आपणच पाहिले पाहिजे, ही साधी गोष्टही तुम्हा–आम्हाला कळत नसेल तर, इतरांच्या नावाने खडे फोडण्यात काय अर्थ ?

लोकांचा सहभाग नसलेली लोकशाही ?

जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून भारताचा गौरव केला जातो; पण खरोखरी त्या गौरवाला आम्ही पात्र आहोत काय ? ज्या लोकशाहीत पैशाच्या जोरावर मते विकत घेतली जातात, गुंडगिरीच्या बळावर मतपेट्या पळवून किंवा मतदारांना मतदानापासून दूर ठेवून उमेदवार निवडून येतात ती कसली लोकशाही ? खरे म्हणजे आम्ही गेल्या चाळीस वर्षांत लोकशाहीकडून धराणेशाहीकडे, एकपक्षीय

हुकुमशाहीकडे फारच झपाट्याने वाटचाल केली आहे. आमचे पंतप्रधान हे कुणाही अरब सुलतानाहून कमी निरंकुश सत्ता उपभोगणारे व कमी विलासी नाहीत. हिलाच आम्ही व जगही लोकशाही समजते ! पक्षांतर्गत लोकशाहीचेही असेच धिंडवडे निघाले आहेत. गांधीजींच्या पुण्यप्रभावाने नेहरू असेपर्यंत ही लोकशाही कशीबशी तग धरून राहिली. त्यांच्या नंतर इंदिरा गांधीनी तिचा निकाल लावून टाकला; आणि राजीव गांधींनी तर तिच्यावर कबर बांधली. आता नेहरू घराण्याची सत्ताच यावच्चंद्र दिवाकरौ या देशावर चालणार असे काँग्रेसवाल्यांनी गृहीत धरल्यामुळे पक्षांतर्गत निवडणुकांऐवजी दिल्लीश्वरांकडून होणाऱ्या नेमणुकाच शिरोधार्य बनल्या. भारतीय जनता पक्ष वगळल्यास इतर राजकीय पक्षांनी या बाबतीत काँग्रेसचेच अंधानुकरण चालविल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे सत्तेचे दलाल, भ्रष्टाचारी ठेकेदार व खुषमस्कऱ्ये कार्यकर्ते यांचीच चलती सध्या आहे. आमच्या लोकशाहीत लोकांचाच सहभाग नाही; त्यामुळे राज्यकर्ते, नेते व कार्यकर्ते यांना जाब विचारण्याची हिंमतच कोणाला होत नाही. आमचे पंतप्रधान उंडगेपणाने सहकुटुंब जगभर मजा मारीत फिरतात. नबाबांप्रमाणे जनतेचे कोट्यवधी रुपये उडवून आपल्या बगलबच्चांसह सुटी साजरी करतात. पण जनतेचा पैसा असा उधळण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे, असे त्यांना कोणी विचारीत नाही. याच्या उलट हे उधळे पंतप्रधान जेव्हा साधेपणा व काटकसर यांची मूर्ती अललेल्या गांधींचे नाव घेऊन त्यांचे अनुकरण लोकांनी करावे, असा उपदेश करतात तेव्हा, श्रोतेमंडळी उत्साहाने टाळ्या पिटून त्यांचे कौतुक करतात. आमचे पंतप्रधान शरीराने भारतीय असले तरी, मनाने परदेशीच आहेत. परदेशातील उत्तमोत्तम वस्तू त्यांच्यासाठी मागवाव्या लागतात. आमचे नेते, बुद्धिवंत, उद्योजक या सर्वांनाच परदेशाचे इतके भयंकर आकर्षण वाटते की, देश सोडून जाण्यास प्रत्येकजण एका पायावर तयार असतो. ज्यांना परदेशात जाणे शक्य होत नाही, ते निदान परदेशी जावई तरी मिळावा म्हणून जीव टाकतात. आमच्या उपवर तरुणींनाही होतकरू देशी तरुणापेक्षा कोणत्याही वयाचा परदेशस्थ पुरुष अधिक पसंत पडतो. ज्यांना देशाबाहेर जाता येत नाही, ते जणू नाईलाजाने या देशात राहतात ! स्वदेशाविषयीचा एवढा तिटकारा जगातल्या कोणत्याही स्वाभिमानी राष्ट्रात पाहायला मिळणार नाही. मातृभूमीविषयीचे सारे प्रेम आटवून टाकायची किमया या ४१ वर्षांत सत्ताधारी काँग्रेसपक्षाने करून दाखविली, याची नोंद भावी इतिहासकारांना नक्कीच घ्यावी लागेल. जी गोष्ट स्वदेशीची तीच स्वभाषेची. स्वातंत्र्यापूर्वी आम्हाला देशी भाषांचा केवढा अभिमान वाटत असे; पण आता तो अभिमान इतिहासजमा झाला असून आम्ही इंग्रजीचे गुलाम बनलो आहोत. इंग्रजी येणे हे प्रतिष्ठेचे लक्षण बनले आहे. आमच्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश

मिळविण्यासाठी आम्ही ऐपतीबाहेर देणग्या देण्यास आनंदाने तयार होतो. राष्ट्र-भाषेचा तर जणू आम्हाला विसरच पडला आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, याच लोकांकडून जनतेला राष्ट्रभक्तीचा उपदेश अहोरात्र ऐकावा लागतो. अर्थात् त्याचा लोकांवर उलटाच परिणाम होतो; आणि नागडा स्वार्थ, संधिसाधूपणा व सर्व प्रकारचा भ्रष्टाचार यांचा जो संदेश पुढाऱ्यांच्या जीवनातून मिळतो त्याचेच पालन लोक करतात; आणि पंतप्रधानांप्रमाणे आपापल्या क्षेत्रात आपली घराणेशाही प्रस्थापित करण्यासाठी धडपडतात.

नवा माणूस घडवायचा आहे

अशा प्रकारे आज एकूण चित्र अत्यंत निराशाजनक दिसत आहे; परंतु त्यामुळे आपण खचून जाता कामा नये. राखेतून पुनर्जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे या उद्ध्वस्त समाजातून नवा समर्थ, स्वाभिमानी माणूस आपल्याला निर्माण करावयाचा आहे, या जिद्दीने आपण कामाला लागलो तर त्यात आपल्याला निश्चितच यश मिळेल. सुदैवाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वनवासी कल्याण आश्रम, राष्ट्रसेवा दल, अभाविप, ज्ञानप्रबोधिनी यांसारख्या अनेक लहानमोठ्या संस्था व संघटना हेच माणूस घडविण्याचे काम धीमेपणाने व सातत्याने करीत आहेत. त्यांच्या या कामात मनःपूर्वक सहकार्य करून तुम्हा-आम्हाला कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळविता येईल. मात्र त्यासाठी लबाड पुढाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या फसव्या घोषणांपासून सावध राहवे लागेल. आज जो उठतो तो लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता यांच्या कानठळ्या बसविणाऱ्या घोषणा करतो; पण त्या किती फुसक्या असतात हे आपण रोजच पाहतो. समाजवादाच्या नावाखाली श्रीमंतांची घरभरणी आणि गरिबांची उपासमारच होत आहे. तर धर्मनिरपेक्षतेचा उद्घोष करणारे प्रत्येक बाबतीत जातीचा विचार प्रथम करतात. अगदी कम्युनिस्टसुद्धा निवडणुकीत उमेदवार उभा करतात तेव्हा त्याची व मतदारांची जात एकच असेल याची खात्री करून घेतात. म्हणून साऱ्या फसव्या घोषणांकडे दुर्लक्ष करून पुन्हा एकदा स्वातंत्र्यपूर्व काळातील निखळ राष्ट्रवादाची कास आपण धरली पाहिजे. समाजवाद व साम्यवाद यांचे एक प्रकारचे दडपण आपल्या मनावर आजपर्यंत होते. परंतु रशिया व चीन या साम्यवाद्यांच्या पितृदेशांतील लोकांची जी स्थिती आता उघडकीस आलेली आहे, (खून, दरोडे, चोऱ्या, व्यसनाधीनता, मुलींची राजरोस विक्री, सर्रास चालणारे बलात्कार वगैरे) त्यावरून केवळ भाकरीचा प्रश्न सुटल्याने माणूस सदाचारी बनत नाही ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. तीच गोष्ट स्वतःला कट्टर व आक्रमक हिंदुत्ववादी म्हणविणाऱ्या शिवसेनेसारख्या संघटनांचीही आहे. सेनेचे लोक हिंदुत्वाच्या नावाखाली गुंडगिरी करतात व लोकांकडून हप्ते गोळा

करतात, असे आरोप उघडपणे केले जातात. त्यांचा पाठपुरावा करणारे काही हिंदुत्वनिष्ठ असे समजतात की सज्जन, सदाचारी माणूस घडविण्यापेक्षा ठोशास ठोसा देणारा, गुंडगिरीचा प्रतिकार सवाई गुंडगिरीने करणारा, सूडाची भाषा बोलणारा, खऱ्याखोट्याची तमा न बाळगणारा, थोडक्यात म्हणजे धर्माने हिंदू पण कर्माने मुसलमान असणारा माणूस घडविण्याचीच आज जास्त गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची हीच शिकवण होती असे ते छातीठोकपणे सांगतात. आणि सेवेची, त्यागाची, माणूसकीची शिकवण देणाऱ्या संघाची ते टिंगल करतात. याचा अर्थ असा की, भारतीय संस्कृतीचा आत्माच त्यांना समजलेला नाही. अशा लोकांपासून खऱ्या राष्ट्रवाद्यांना फार मोठा धोका आहे. एकाबाजूला सत्तेच्या प्राप्तीसाठी अल्पसंख्यकांचे फाजील लाड करणारे राजकीय पक्ष आणि दुसऱ्या बाजूला माथेफिरू हिंदुत्ववादी यांच्यामधून वाट काढीत राष्ट्रवाद्यांना आगेकूच करावयाची आहे. परिस्थितीचे हे आव्हान सच्चे देशभक्त स्वीकारतील आणि आजच्या निराशापूर्ण अवस्थेतून देशाला बाहेर काढून ऊर्जितावस्था मिळवून देतील याविषयी मला तिळमात्र शंका नाही. म्हणून मी आशावादी आहे.

+ +

'तरुण भारत' : १५.८.८८

१७. खतरे में कोण ? इस्लाम की मुसलमान ?

मुहम्मद बिन कासिमच्या उदयापासून औरंगजेबाच्या अस्तापर्यंत या देशावर इस्लामचा 'खतरा' टांगत्या तलवारीसारखा लटकत होता. कोणत्याही क्षणी हा देश इस्लामच्या भक्ष्यस्थानी पडू शकला असता; परंतु परमेश्वराची तशी इच्छा नव्हती आणि अल्लालाही फारशी घाई नव्हती. त्यामुळे राणा प्रताप, शिवाजी महाराज, समर्थ रामदास, विजयानगरचे विद्यारण्य स्वामी आणि त्या साम्राज्याचे पराक्रमी सम्राट, गुरू गोविंदसिगांसारखे शीख धर्मगुरू या देशात निर्माण होत गेले आणि त्यांनी इस्लामची लाट थोपवून धरली. 'हिंदुत्व खतरेमें' असा 'नारा' त्यावेळी कुणी दिला होता की नाही याची आम्हाला कल्पना नाही; परंतु इस्लामचे संकट अनेक विचारवंतांना समजले असावे, असे त्या काळच्या काही घटनांवरून दिसते.

इंग्रजांच्या आगमनानंतर स्थिती पालटली

इंग्रजांच्या आगमनानंतर मात्र ही स्थिती पालटली. अत्याधुनिक ज्ञानविज्ञानाने सुसज्जित असलेली ब्रिटिश सत्ता आणि तिच्या सक्रिय सहकार्याने चंचुप्रवेश करणारा ख्रिस्ती धर्म यांच्यापुढे आपला टिकाव लागणार नाही, हे भारतातील मुसलमानांनी ओळखले; आणि सुमारे हजार वर्षे ज्यांच्यावर आपण धार्मिक, सामाजिक व राजकीय वर्चस्व गाजविले त्या हिंदूंच्या मदतीने त्यांनी नवागत फिरंगी सत्तेविरुद्ध बंड पुकारले. परंतु ते इतके अव्यवस्थित व विस्कळित होते की, त्यात यश येण्याची शक्यताच नव्हती. ब्रिटिश सत्तेविरुद्ध केलेला तो उठाव विफल झाल्यामुळे सगळेच

संवेदनशील भारतीय वैफल्यग्रस्त झाले. मात्र हिंदू यातून लवकर सावरले आणि आधुनिक युगाशी सुसंगत असणाऱ्या साधनांचा वापर करून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झगडू लागले. या देशातील मुसलमानांना इथल्या भूमीविषयी आत्मीयता, कळकळ असती तर तेही हिंदूंच्या बरोबरीने स्वातंत्र्याच्या आंदोलनात सामील झाले असते. परंतु काही सन्माननीय अपवाद वगळता तसे काही घडले नाही. बहुसंख्य मुस्लिम, ईसाई व अस्पृश्य या आंदोलनापासून दूरच राहिले. त्यांना 'गुमराह' करण्यात ब्रिटिशांचाही फार मोठा हातभार लागला होता हे खरे; परंतु मुसलमानांचे विद्वान् पुढारीही ब्रिटिशांच्या जाळ्यात अडकले आणि या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यास बहुसंख्य हिंदूंचे राज्य होईल व मुसलमानांना त्यांच्या गुलामीत राहावे लागेल अशी त्यांनी स्वत:ची समजूत करून घेतली. त्यातूनच 'इस्लाम खतरे में' हा नारा बुलंद झाला. ही घोषणा इतकी प्रभावी ठरली की तिने मुसलमानांचा सारासार विवेक नष्ट केला आणि देशाची फाळणी करून स्वत:साठी वेगळे पवित्र स्थान मिळविल्यावरच त्यांचे ताबूत थंडे पडले.

स्वातंत्र्योत्तर काळातील परिस्थिती

वस्तुत: एवढ्यावर हे प्रकरण संपावयास हवे होते. ज्या पाकिस्तानच्या प्राप्तीसाठी आपण एवढे आकाशपाताळ एक केले त्याची निर्मिती झाल्यानंतर एकतर भारतातील साऱ्या भाविक मुसलमानांनी त्या पवित्र भूमीकडे 'हिजरत' करावयास हवी होती; किंवा 'झाले गेले गंगेला मिळाले' असे म्हणून भारतीय समाजजीवनात एकरूप व्हावयास हवे होते. परंतु यापैकी काहीच न करता त्यांनी पुन्हा 'येरे माझ्या मागल्या' या न्यायाने 'इस्लाम खतरेमें'चा नारा तसाच चालू ठेवला. ज्याला संधी मिळेल तो पाकिस्तानला पळून जाऊ लागला. हिंदू–मुस्लिम ऐक्याचे व शेतकरी–कामकरी क्रांतीचे पोवाडे गाणारे जोश मलीहाबादी यांच्यासारखे आधुनिक काळातील सर्वश्रेष्ठ समजले गेलेले कवी व साहित्यिकही पाकिस्तानात निघून गेले. त्यामुळे देशभक्तीच्या आणाभाका घेणारा कोणता मुसलमान केव्हा पाकिस्तानला निघून जाईल आणि भारताविरुद्ध गरळ ओकायला सुरुवात करील हे सांगणे कठीण होऊन बसले. एवढ्यावरच ही घसरगुंडी थांबली नाही. अरब देशातून मिळणाऱ्या पैशाचा वापर करून येथील दलित लोकांना इस्लामची दीक्षा द्यावी आणि भारतातील मुसलमानांची संख्या वाढवावी, असे पद्धतशीर प्रयत्नही सुरू झाले. आपली संख्या कमी असली तरी, आपल्या निर्णायक मताला (कास्टिंगव्होटला) फार मोठे महत्त्व प्राप्त झाल्याचे येथील मुलसमानांनी ओळखले; आणि त्या मताच्या जोरावर राजकीय पक्षांना खेळविण्याचे आणि त्यांच्या मदतीने आपली छोटी-छोटी पाकिस्ताने जागजागी निर्माण करण्याचे

डावपेच त्यांनी सुरू केले. त्यासाठी पुन्हा एकदा 'इस्लाम खतरे में' हा नारा त्यांनी बुलंद केला.

खोमेनीच्या उदयानंतर

इराणमध्ये आयतुल्ला खोमेनीची धर्मसत्ता प्रस्थापित झाल्यानंतर परिस्थिती जास्तच गुंतागुंतीची व धोकादायक बनली. खोमेनीचा पुनरुज्जीवनवाद (फंडामेंटॅलिझम्) भारतासमोरच नव्हे तर, जगातील इतर मुस्लिम राष्ट्रांसमोरही एका भयंकर राक्षसाच्या रूपात उभा राहिला. स्वतःला इस्लामचे रक्षणकर्ते समजणारे अरब देशही रूढिवादाच्या या नव्या राक्षसापुढे थरथरा कापू लागले. इराक-इराण युद्धात इराणकडून इराकचा दणदणीत पराभव झाल्याने अरब राष्ट्रांच्या भीतीत भरच पडली. वस्तुतः खोमेनी हे शिया पंथाचे धर्मगुरू. त्यांच्या आक्रमणाची भीती प्रचंड बहुसंख्येने असलेल्या सुन्नी मुसलमानांना वाटण्याची काही जरूर नव्हती. परंतु चौदाशे वर्षांपूर्वी हजरत मुहम्मद पैगंबरानी ज्या इस्लामची स्थापना केली तो धर्म त्याच्या मूळ स्वरूपात पुन्हा प्रस्थापित करण्याचा विडा खोमेनीने उचलल्यामुळे सर्वच मुसलमानांना त्याविषयी विलक्षण आकर्षण वाटू लागले; आणि विसाव्या शतकातही सहाव्या शतकातील आदर्श जीवन जगता येणे शक्य आहे, असा भ्रम त्यांच्यात निर्माण झाला. भारतीय मुसलमानांच्या दृष्टीने याचा परिणाम असा झाला की, चौदाशे वर्षांपूर्वीच्या इस्लामचे अनुसरण आपण केले तर पुन्हा एकदा जगज्जेते बनणे आपल्याला शक्य होईल अशी भाबडी आशा किंवा भ्रामक कल्पना त्यांच्यात निर्माण झाली. अशा स्थितीत सर्व भारतीयांना समान लेखणारा समान नागरी कायदा त्यांना शत्रुवत् वाटू लागल्यास नवल नाही. या समान नागरी कायद्याला मुसलमानांचा असणारा विरोध पाहून आमचे परम-पूज्य समाजवादी नेते श्री. एस. एम. जोशी यांनीही इंदिरा गांधींप्रमाणे असे सांगण्यास सुरुवात केली की, मुसलमानांची इच्छा नसेल तर त्यांच्यासाठी समान नागरी कायदा करण्याचा आग्रह आपण धरता कामा नये. आता राजस्थानमधील काही जमातींनी सतीची प्रथा बंद करणारा कायदा रद्द करून आम्हाला सती जाण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे अशी मागणी केली, तर त्याबद्दल त्या जमातीतील स्त्रियांना आपण कोणत्या तोंडाने दोष देणार? इस्लामी रूढिवाद कालचक्राचे काटे उलटे फिरवू पाहत आहे. त्याच्यापुढे नमते घेतल्यास इतर धर्मांच्या रूढिवादाला केवढे प्रोत्साहन मिळेल याची कल्पना आपण करू शकतो. म्हणून इस्लामी रूढि-वादाला विरोध करणे हे सर्वच धर्मांच्या पुरोगामी लोकांचे कर्तव्य ठरते.

संकटात कोण? इस्लाम की मुसलमान?

या साऱ्या गदारोळात मुख्य प्रश्न तसाच राहून गेला आहे. तो असा की,

'संकटात कोण आहे? इस्लाम की मुसलमान?' काही लोकांना हा प्रश्नच हास्यास्पद वाटेल; इस्लाम धोक्यात आहे असे म्हटले की मुसलमान धोक्यात आहेत हे आपोआपच सिद्ध होते, असे त्यांना वाटते. कारण, इस्लाम व मुसलमान यांचे अस्तित्व वेगवेगळे नसून ते एकच आहे, असे ते मानतात. परंतु ही या प्रश्नाकडे पाहण्याची वरवरची, एकांगी अथवा झापड लावलेली दृष्टी झाली. अधिक खोलात शिरून, व्यापक भूमिकेवरून या प्रश्नाकडे आपण पाहू लागलो तर, हे दोन प्रश्न अगदी वेगवेगळे आहेत असे आपल्याला आढळून येईल.

या संदर्भात प्रथमच आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, प्रत्येक धर्माची काही तत्त्वे, काही मूलभूत सिद्धान्त असतात. एका परीने ते सार्वभौम व सार्वकालिक असतात. त्याचे आचरण करणारे लोक जोपर्यंत जगात राहतील तोपर्यंत तो धर्म टिकून राहील. त्याला कसलाच धोका निर्माण होणार नाही. त्या मूलभूत तत्त्वांचा त्याग केल्यावर धर्माचे जे बाह्य कर्मकांड उरते ते निष्प्राण कलेवराप्रमाणे निरर्थक असते; परंतु आपल्या धर्माच्या तत्त्वांचे पालन करणे तसे अवघड असते. म्हणून सामान्य लोक कर्मकांडालाच धर्म समजून तत्त्वशून्य कर्मकांडाच्या पालनावर जोर देतात. एकेश्वरवाद, मूर्तिपूजेचा निषेध, मानवा-मानवांतील समता व समानता, शांतताप्रियता, व्यसनमुक्ती, धनलोभापासून मुक्ती वगैरे इस्लामची मूलभूत तत्त्वे आहेत; परंतु त्यांचे आचरण कोण करतो? खून, बलात्कार, दरोडेखोरी, जुगार मद्यपान, ऐषआराम यातच गुंतून पडलेले मुसलमान इस्लामच्या नावावरील कलंक आहेत. मात्र 'इस्लाम खतरे में' अशी घोषणा देऊन बिगर इस्लामी लोकांचा नाश करण्यात हेच अग्रेसर असतात. त्यांनाच 'गाजी' किंवा 'धर्मयोद्धे' ठरवून त्यांचे जाहीर गुणगान केले जाते. वस्तुतः त्यांच्यामुळेच इस्लाम धोक्यात आला आहे. परंतु ते समजण्याची पात्रता नसल्याने अथवा समजूनही तिकडे दुर्लक्ष करण्याचे ठरविल्याने इस्लाम धोक्यात आहे व त्याला आपण कारणीभूत आहोत हे त्यांना कळतच नाही आणि मग ते त्याचे खापर इतरांवर फोडण्याचा प्रयत्न करतात.

यावर कोणी असे म्हणेल की, "मुसलमानांना जाऊद्या खड्ड्यात! तुम्ही स्वतःपुरते पहा." संपूर्ण देशाचा विचार करणाऱ्यांना अशी स्वार्थी व संकुचित भूमिका घेणे शोभत नाही. जोपर्यंत मुसलमान दरिद्री व मागसलेले राहतील तोपर्यंत भारताला पुढे जाता येणार नाही. त्यांचे मागसलेपण हा इतरांच्या पायातील खोडा बनून राहील. म्हणून मुसलमानांनी इतरांच्या बरोबरीने प्रगती केली पाहिजे असा आग्रह धरण्याचा व तसा प्रयत्न करण्याचा प्रत्येक भारतीयाला अधिकार आहे.

मुसलमानांची अधोगती ही खरी चिंतेची बाब

परंतु हा थोडा तात्त्विक व सूक्ष्म विचार झाला. अधिक स्थूल व व्यावहारिक

दृष्टीने आपण पाहू लागलो तर आपल्याला काय आढळते ? आधुनिक ज्ञान विज्ञानाची अपेक्षा केल्यामुळे जगातील मुसलमान अत्यंत मागसलेले राहिले आहेत. भारताचा विचार केला तर आधुनिक विद्येऐवजी अरबी, फारशी, उर्दूच्या मोहात गुरफटल्यामुळे येथील मुसलमान प्रगतीच्या सर्वच क्षेत्रात मागे पडला आहे. उद्योग व व्यापार यांसाठीही नवीनतम ज्ञानाची गरज असते. तिकडे दुर्लक्ष झाल्यामुळे ती क्षेत्रेही मुसलमानांना बंद झाली आहेत. त्यामुळे स्मगलिंगसारख्या समाजघातक व देशद्रोही कुकर्मात ते अडकतात.

आधुनिक काळात कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे गमक म्हणून त्या समाजातील स्त्रियांच्या स्थानाचा विचार केला जातो. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' या जुन्या संस्कृत वचनाचा खरा अर्थ आज लोकांना समजला आहे. त्यामुळे स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचा दर्जा मिळावा यांसाठी सर्व प्रगत समाज धडपडत आहेत. याच्या उलट मुस्लिम देशांत आणि समाजांत स्त्रियांना परंपरेने प्राप्त झालेले हक्कही हिरावून घेण्याकडे मुसलमानांची प्रवृत्ती झपाट्याने वाढत आहे असे दिसते. स्त्री हे केवळ उपभोगाचे एक साधन आहे, या दृष्टीने तिच्याकडे पाहिल्यामुळे भरमसाठ मुले होण्याचे प्रमाण मुसलमानांमध्ये वाढत आहे. जितकी मुले जास्त तेवढे दारिद्र्य जास्त, ही गोष्ट मुसलमानांना कोणीच समजावून सांगत नाही. त्यांचे पुढारी केवळ आपली संख्या वाढविण्याचाच विचार करतात. त्यापायी गरिबांना नरकातील जिणे जगावे लागले तरी, त्यांना त्यांची पर्वा नसते. या साऱ्या प्रकरणात स्त्रीला माणुसकीपासूनच वंचित व्हावे लागते. भारतीय मुसलमान ज्याच्याकडे मार्गदर्शनाच्या अपेक्षेने पाहतात त्या पाकिस्तानचेच उदाहरण घेऊ. अयूबखान व भुट्टो यांच्या कारकीर्दीत पाक स्त्रियांना जे स्वातंत्र्य मिळाले होते, ते हिरावून घेऊन त्यांना चार भिंतीच्या आत कोंडून ठेवण्याचे पद्धतशीर प्रयत्न जनरल झिया उल हक यांच्या इस्लामी सरकारने सुरू केले आहेत. याचा दृश्य परिणाम असा की, तेथे स्त्रियांची हत्या ही एक मामुली बाब बनली आहे. आपल्या बायकोचा खून करणारा पती तेथे सहज निसटून जातो.

लाहोरच्या 'नवाए वक्त' या दैनिकात श्रीमती आएशा ओहमी यांनी पाकिस्तानात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांवर प्रकाशझोत टाकणारा एक लेख लिहिला आहे. त्यात त्या म्हणतात, "एखाद्या जनावरावर कोणी सुरी चालवू लागला तर, कदाचित शेकडो लोक जमा होऊन त्यास अटकाव करतील; पण एखादा पुरुष एखाद्या स्त्रीवर अत्याचार करीत असेल तर, समाज त्याविरुद्ध ब्रही काढणार नाही. काहीतरी घरगुती भांडण असेल असे म्हणून जमलेले लोक काढता पाय घेतील." याचा अर्थ असा की, तेथील स्त्रीच्या जिवाला पशूच्या जिवाइतकीही किंमत उरलेली नाही. हे सारे कशासाठी ? तर पहिली बायको मारून टाकून

दुसरी आणायची, यासाठी ! भारतात मुसलमानांना कायद्यानेच चार बायका करण्याची परवानगी दिली आहे; आणि मुसलमान पुरुष मनात येईल तेव्हा आपल्या बायकोला तोंडी तलाक देऊन वाऱ्यावर सोडून देऊ शकतो. त्यामुळे मुस्लिम स्त्रीचे जिणे जुन्या काळच्या गुलामांच्या जिण्याहूनही दयनीय बनले आहे. खोमेनीवादाचे वारे भारतात शिरल्यापासून मुस्लिम स्त्रियांनी बुरखा घेतला पाहिजे, चित्रपट पाहता कामा नये, सहशिक्षण घेऊ नये, पुरुषांबरोबर कचेऱ्यांत काम करू नये, अशांसारखी बंधने बळजबरीने त्यांच्यावर लादण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. म्हणजे एका बाजूने शिक्षणाच्या अभावी मुस्लिम पुरुष गुन्हेगारीच्या मार्गाला लागले आहेत, तर मुस्लिम स्त्रियांना माणुसकीने जगणे अशक्य होऊन बसले आहे. याचाच अर्थ असा की, इस्लाम धोक्यात नसून मुसलमानच संकटात सापडला आहे. त्यातून मुक्त होण्यासाठी नवे विचार, नवे शिक्षण, नवे तंत्रज्ञान यांचा स्वीकार त्याने केला पाहिजे. तसे केल्यावर जेव्हा तो या संकटातून बाहेर पडेल तेव्हा 'इस्लाम खतरेमें'च्या ज्या घोषणाबाजीत आपण गुरफटलो होतो, ती खोटीच हूल होती आणि इस्लामला कसलाही धोका नव्हता व नाही, हे त्याच्या लक्षात येईल.

मध्यंतरी मुंबईतील काही मुसलमानांनी आपल्या एका सहकारी बँकेने व्याज घेऊ नये, व्याजाशिवाय कर्जे द्यावीत (कारण इस्लाममध्ये व्याज निषिद्ध आहे) यासाठी निदर्शने केल्याची बातमी अनेकांनी वाचली असेल. सारी आधुनिक अर्थ-व्यवस्था व्याजावर आधारित असताना चौदाशे वर्षांपूर्वी व्याजाला बंदी होती, म्हणून ती आताही लागू करावी अशी मागणी करणे मागासलेपणाचेच लक्षण नव्हे काय ?

कधी-कधी मोठी गमतीदार परिस्थिती निर्माण होते. अरब किंवा अन्य मुस्लिम राष्ट्रांचे अध्यक्ष, सुलतान, पंतप्रधान भारतात येतात तेव्हा राजघाटावरील गांधीजींच्या समाधीला ते पुष्पगुच्छ अर्पण करतात. वस्तुतः ही समाधिपूजा इस्लामला मंजूर नाही; परंतु वडच्या मंडळींविरुद्ध कोण ब्र काढणार ? सारे नियम, कायदे गरीब लोकांसाठीच असतात; आणि बहुसंख्य भारतीय मुसलमान गरीब असल्यामुळे त्यांनी सगळी बंधने निमूटपणे पाळलीच पाहिजेत, अशी सक्ती असते. श्रीमंतांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांत शिकून मोठमोठ्या हुद्यांवर जातात; तर गरिबांची मुले मशिदीमध्ये कुराणाची घोकंपट्टी करण्यात बालपण वाया घालवितात. मग त्यांची दारिद्र्यातून सुटका कशी होणार ?

सारांश, आज इस्लाम संकटात नसून मुसलमान मात्र अधोगतीच्या गर्तेत खोल-खोल जात असल्याचे दृश्य दिसते. त्या संकटातून बाहेर पडण्याची त्यांची खरोखरी इच्छा तरी आहे काय ?

✦ ✦

'विवेक' : २० जून १९८२

१८. साऱ्या अनार्थांचे मूळ कारण : द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये ज्या जातीय दंगली उसळल्या व आजपर्यंत चालू आहेत, त्यांच्यासंबंधी जेव्हा चर्चा केली जाते तेव्हा सामान्यतः अगदीच वरवरच्या कारणांचा विचार केला जातो; आणि काहीतरी थातुरमातुर उपाय सुचविले जातात. अर्थातच त्यांचा काही उपयोग होत नाही; आणि दंगली चालूच राहतात. प्रारंभी फक्त हिंदू–मुसलमानांच्या दंगली होत. आता त्यात शीख आणि शीखेतर हिंदू यांच्यातील भयानक संघर्षाची भर पडली आहे. या दंगली का होतात, त्यांच्या मागे कोण असतात, वगैरे मूलभूत कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न सहसा केला जात नाही. जोपर्यंत तो केला जाणार नाही, ती कारणे नाहीशी केली जाणार नाहीत, तोपर्यंत या दंगली चालूच राहणार.

द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत

या कारणांपैकी अत्यंत मूलभूत किंवा मूलगामी असणाऱ्या अशा एका कारणाचा विचार या लेखात करावयाचे योजिले आहे. द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत हे ते मूल कारण आहे. तसे पाहिल्यास हा सिद्धांत जेव्हा मांडला गेला नव्हता, तेव्हा म्हणजे देशाचे स्वातंत्र्य अजून खूप दूर होते तेव्हाही जातीय दंगली होतच होत्या. परंतु त्यांचे स्वरूप वेगळे होते. ते नीट समजून घेतले नाहीतर या मूळ कारणाचे वेगळेपण लक्षात येणार नाही. म्हणून प्रथम त्याचा विचार करणे उचित होईल. इतिहासकाळात आजच्या स्वरूपाच्या जातीय दंगली होत असल्याचे पुरावे आढळत नाहीत. याचा अर्थ असा की, देशाच्या बाहेरून आलेला इस्लाम या देशाच्या

राष्ट्रीय धर्माशी मिळते घेण्याचे महत्त्व ओळखून इथल्या समाजाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करीत होता. इस्लाम हा मुळातच आक्रमक धर्म असल्यामुळे भारतीय समाजाशी समरस होण्याची त्याची ती प्रक्रिया अत्यंत संथगतीने चालू होती; आणि इंग्रजांसारख्या चतुर जमातीचे या देशात आगमन झाले नसते तर ही प्रक्रिया कालांतराने पुरी झाली असती. मुसलमानांच्या पूर्वी या देशात आलेल्या इतर जमाती जशा इथल्या समाजात मिसळून एकरूप झाल्या तसे मुसलमानही स्वतःचे धार्मिक वेगळेपण टिकवूनही हिंदूंशी समरस व एकरूप झाले असते. परंतु या दोन प्रमुख जमाती एक झाल्या तर आपली सत्ता फार काळ टिकणार नाही हे ओळखून धूर्त इंग्रजांनी हिंदू–मुसलमानांमध्ये कलागती लावून देण्याचा उपक्रम सुरू केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन हिंदू–मुसलमानांमध्ये गेल्या शतकाच्या अखेरीस मोठ्या प्रमाणावर दंगे सुरू झाले. आपण एकेकाळी या देशाचे सत्ताधीश होतो आणि नव्या लोकशाहीच्या जमान्यात आपल्याला बहुसंख्य समाजाचे गुलाम म्हणून राहवे लागणार, या भीतीतून मुसलमानांसध्ये हिंदूंविषयी अविश्वास निर्माण करण्याचे पद्धतशीर प्रयत्न मुस्लिम पुढाऱ्यांमार्फत इंग्रजांनी चालविले. त्यातून जी अस्वस्थता निर्माण झाली ती त्या काळच्या दंग्यांचे प्रमुख कारण होते. मुसलमानांनी या काल्पनिक भीतीपोटी इंग्रजांच्या पंखाखाली जाऊन स्वातंत्र्य-लढ्याला विरोध करू नये, या हेतूने त्यांच्याशी तडजोड करण्याचे, त्यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न राष्ट्रीय पुढाऱ्यांनी केले. परंतु सरहद्द प्रांतातील पठाणांचा अपवाद वगळता त्यांना त्या कामात फारसे यश आले नाही. मुसलमान लोक बहुसंख्येने स्वातंत्र्यआंदोलनापासून दूरच राहिले. ज्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांना इंग्रजांपेक्षा सवर्ण हिंदू हेच आपले अधिक मोठे शत्रू आहेत असे वाटत राहिले, त्याप्रमाणे मुसलमानांनाही इंग्रज हे आपले मित्र व हिंदू आपले शत्रू आहेत असेच वाटत राहिले. त्या अविश्वासातूनच या शतकाच्या पहिल्या तीन दशकांतले जातीय दंगे होत राहिले.

नव्या सिद्धांताचा परिणाम

या शतकाच्या चौथ्या दशकात मुसलमानांचे नेतृत्व बॅ. मुहमद अली जिना या अत्यंत हुशार गृहस्थांकडे आले. वस्तुतः ते स्वतः देशभक्त, बुद्धिप्रामाण्यवादी, धर्मनिरपेक्ष वृत्तीचे विद्वान होते; परंतु गांधींनी त्यांना दूर सारून सनातनी मुस्लिम पुढाऱ्यांना जवळ केल्याने ते दुखावले गेले होते. म्हणून त्यांनी स्वतःची मते बाजूला ठेवून गांधींवर मात करण्यासाठी अडाणी मुसलमानांच्या धर्मभावनांना कुरवाळण्याचा मार्ग अवलंबिला. त्यासाठी त्यांनी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत जोरदारपणे लोकांसमोर मांडला. राष्ट्र हे धर्माधिष्ठित व धर्माधारित असते, भारतात हिंदू वमुस्लिम हे दोन प्रमुख धर्म आहेत, याचा अर्थ हिंदू राष्ट्र व मुस्लीम राष्ट्र अशी दोन राष्ट्रे परिस्थितीने

एकत्र नांदत आली, परंतु यापुढे ती राहू शकणार नाहीत, म्हणून हिंदू व मुसलमान यांची दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली पाहिजेत, असा या सिद्धांताचा थोडक्यात मथितार्थ सांगता येईल. या राजनैतिक सिद्धांताचे मानसिक परिणाम किती भयंकर होतील याची कल्पनाच कुणाला आलेली दिसत नाही. या सिद्धांताच्या स्वीकारामुळे मुसलमानांत अशी भावना निर्माण झाली की, आपण इतरांहून पूर्ण वेगळे व श्रेष्ठ असून बहुजनसमाजाच्या सुखदुःखाशी आपल्याला काही कर्तव्य नाही, आपण फक्त इस्लामशी संबंधित गोष्टींचाच विचार करावयाचा आहे, त्यामुळे देशाचे स्वातंत्र्य, ऐक्य वगैरे त्यांच्या दृष्टीने अगदीच गौण बनले. स्वातंत्र्योत्तर काळात भाषावार प्रांतरचना, गोवा–हैद्राबादचे मुक्तिसंग्राम, शेतकरी–कामकऱ्यांचे लढे, भ्रष्टाचार, महागाई यांसारख्या ज्वलंत प्रश्नांपेक्षा अलअक्सा मशिदीची जाळपोळ, बाबरी मशिदीचे प्रकरण, मुस्लिम व्यक्तिगत कायदा, उर्दूला राजभाषा बनविण्याचे प्रयत्न, या गोष्टीच त्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरल्या; आणि ते मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून दूर जात राहिले. त्यांच्याच पावलावर टाऊल टाकून शिखांनी खालिस्तानचा लढा चालविला आहे; आणि दलितांनीही दलितस्तानाच्या धमक्या देत बहुजनसमाजाच्या भावनांवर राजरोस आघात करण्यास सुरुवात केली आहे. यावरून या सिद्धांतात दडलेला धोका सहज लक्षात यावा. या मुस्लिम राष्ट्राला त्यांनी पाकिस्तान असे नाव दिले. या नावाने भारतीय मुसलमानांना वेड लावले. त्या वेडात ते इतके वाहून गेले की, या पाकिस्तानच्या निर्मितीने आपले काय हित होईल, पाकिस्तान अस्तित्वात आल्यावर साऱ्या भारतीय मुसलमानांना तेथे स्थान मिळेल की नाही, ज्यांना तिकडे जाता न आल्यामुळे हिंदू-भारतातच राहावे लागेल त्यांची स्थिती काय होईल, याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही; आणि त्यांनी आंधळेपणाने आपली मते पाकिस्तानची मागणी करणाऱ्या मुस्लिम लीगला १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत दिली. जे मुस्लिम पुढारी पश्चात् बुद्धीने आज असे सांगत आहेत की, भारतातील मुसलमानांनी पाकिस्तानच्या बाजूने मतदान केले नव्हते. ते साफ खोटे बोलत आहेत. त्यावेळी मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघ अस्तित्वात होता. त्यामुळे मुस्लिम लीगचे उमेदवार ज्या प्रचंड मताधिक्याने निवडून आले त्यावरूनच हे सिद्ध होते की आज भारतात असलेल्या मुसलमानांच्या जोरदार पाठिंब्यामुळेच पाकिस्तान अस्तित्वात आले आहे.

नाइलाजाने स्वीकारावे लागलेले पाकिस्तान व हिंदुस्तान

याच्या उलट आज पाकिस्तान या नावाने जे राष्ट्र अस्तित्वात आहे तेथील लोकांना पाकिस्तानच्या संकल्पनेचे मुळीच आकर्षण नव्हते. कारण तेथे मुळातच पाकिस्तान म्हणजे मुस्लिम राष्ट्र विद्यमान होते. त्या प्रदेशाला पाकिस्तान हे नाव

मिळाल्याने त्यांना विशेष काही मिळणार नव्हते. म्हणून तेथील जनतेने मुस्लिम लीगला थारा दिला नव्हता. पंजाबात यूनियनिस्ट पक्षाचे व इतर प्रांतांत काँग्रेसचे अशी सरकारे अस्तित्वात होती. तेथील हिंदूंची भीती मुसलमानांना वाटत नव्हती. कारण तेथे हिंदू अल्पसंख्य होते; आणि तेथील अर्थव्यवस्था त्यांनी समर्थपणे हाताळलेली होती. जिनांनी ब्रिटिश सरकारच्या मदतीने अनेक लटपटी करून तेथे लीगची सरकारे अस्तित्वात आणली खरी; परंतु लीगला त्या भागात पाळेमुळे नसल्यामुळे पाकिस्तानच्या निर्मितीनंतर लवकरच ती उद्ध्वस्त झाली; आणि स्थानिक पक्षांची मोडतोड तिने करून ठेवली असल्यामुळे एक प्रकारचे राजकीय अराजक तेथे माजले; आणि लष्करी हुकूमशाहीची वाट मोकळी झाली. पाकिस्तानचा विचार करताना एक गमतीदार साम्य मनात येते. संयुक्त महाराष्ट्रासाठी मराठी जनतेने लढा दिला. त्यापायी अनेकांना प्राणही गमवावे लागले. त्यावेळी स्वतंत्र भाषिक राज्याच्या बावतीत गुजराती जनतेला मुळीच उत्साह किंवा आकर्षण नव्हते (इंदुभाई याज्ञिकांचे महागुजरातचे आंदोलन हे नाममात्र होते !); परंतु महाराष्ट्र वेगळा झाल्याने नको असलेले गुजरात राज्य गुजराती बांधवांना नाइलाजाने स्वीकारावे लागले. तशीच काहीशी स्थिती पाक जनतेची झाली. तिला पाकिस्तानची गरज मुळीच भासत नव्हती; परंतु जिनांना आपले नेतृत्व सिद्ध करून गांधींचे नाक कापावयाचे होते. त्यासाठी त्यांनी पाक जनतेवर पाकिस्तान लादले; आणि भारतीय मुसलमानांनी दंगली करून, रक्त सांडून या कामी त्यांना मदत केली. हिंदू भारत वेगळा झाल्यामुळे आपोआप पाकिस्तान अस्तित्वात आले असे म्हणता येईल; किंवा पाकिस्तानचे वेगळे राष्ट्र निर्माण झाल्यामुळे भारतीय हिंदूंना नाइलाजाने वेगळे हिंदुस्तान स्वीकारावे लागले, असेही म्हणता येईल. द्विराष्ट्र-वादाच्या सिद्धांताचा हा अपरिहार्य परिणाम होता.

'हिंदुराष्ट्र'वाद्यांची गोची

पाकिस्तानच्या घोषणा सुरू होताच हिंदुत्ववाद्यांनी 'हिंदुस्तान हिंदुओंका, नहीं किसीके बापका !' अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. मात्र मुसलमानांप्रमाणे आपले हिंदू राष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करून घेण्याचा काही सुनियोजित कार्यक्रम त्यांच्याजवळ नव्हता. त्यासाठी आवश्यक असणारे लोकांच्या पाठिंब्याचे सामर्थ्य तर, त्यांच्याजवळ मुळीच नव्हते. विकेशा विधवांप्रमाणे गांधींच्या व काँग्रेसच्या नावाने कडाकडा बोटे मोडण्याखेरीज त्यांनी दुसरे काहीच केले नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संस्थेजवळ जी थोडी फार संघटित शक्ती होती, तिलाही आमजनतेचा पाठिंबा नसल्यामुळे आपण काहीच करू शकणार नाही, हे ओळखून तिला असाहाय्यपणे देशाची फाळणी पाहत बसावे लागले. खरी गोष्ट अशी

आहे की, मुस्लिम लीगला ब्रिटिश सत्तेचा व मुख्यतः ब्रिटिश सैन्याचा पाठिंबा नसता तर, तिला देशाची फाळणी करण्याची हिंमतच झाली नसती. यामुळे फाळणीचे श्रेय (!) मुख्यतः ब्रिटिश सत्तेला आहे. गांधी आणि काँग्रेस यांनी फाळणीला कितीही विरोध केला असता तरी, ब्रिटिश सत्तेच्या सामर्थ्यापुढे त्यांचे काहीही चालले नसते. आणि जरी त्या लढचात काँग्रेस यशस्वी झाली असती तरी, अखंड भारतात राहण्यास तयार नसलेल्या मुसलमानांवर राज्य करणे तिला अशक्य झाले असते. मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांबरोबर काम केल्यास आपण कसे गोत्यात येतो, याचा अनुभव हंगामी सरकारच्या वेळी काँग्रेसला आलाच होता. पाशवी सामर्थ्याच्या जोरावर असंतुष्ट मुसलमानांना अखंड भारतात राहण्यास भाग पाडणे तसे सोपे नव्हते. कारण, सैन्यात व पोलिसात इंग्रजांनी फार मोठ्या प्रमाणावर मुसलमानांची भरती केलेली होती. शिवाय अनिच्छुक लोकांवर राज्य करण्यासाठी ज्याप्रकारचे क्रूर मन हवे असते, ते हिंदूंजवळ नसल्यामुळेही त्या मार्गाने जाण्यात काही अर्थ नव्हता. (हिंदू मनाची ओळख नसलेले लोक मात्र याच मार्गाचा पुरस्कार आजही करताना दिसतात !) ही वस्तुस्थिती ओळखून काँग्रेसने फाळणीला मान्यता दिली; आणि ज्यांच्या भरवशावर अखंड भारतासाठी लढा द्यावयाचा त्यांनीच असा अवसानघात केल्यामुळे गांधींनाही यावाबतीत पराभव पत्करावा लागला. हिंदुत्ववादी वीर चिलखते चढवून ' यँ केलं पाहिजे आणि त्यँ केलं पाहिजे ', अशा आरोळ्या ठोकत असले तरी ते आपण काहीही न करता इतरांनी ते केले पाहिजे, अशी त्यांची भूमिका असल्यामुळे त्या आरोळ्यांना काही अर्थ नव्हता. ते लोक इतके भोळसट किंवा बेसावध होते की, आपण काहीही न करता, न मागता ' हिंदुराष्ट्र ' आपल्या शिरावर येऊन पडले आहे, हेदेखील त्यांना समजले नाही. ते हिंदू राष्ट्राच्या जुन्याच घोषणा देत राहिले. ज्याप्रमाणे जिनांनी कुरतडलेले पाकिस्तान स्वीकारून हिंदुस्थानचे कंबरडे मोडण्याच्या योजना आखण्यास सुरुवात केली होती, त्याप्रमाणे खंडित हिंदू राष्ट्राचा स्वीकार करून पाकिस्तान कसे मोडता येईल, याचा विचार आपण केला पाहिजे, हे काही हिंदूराष्ट्रवाद्यांना सुचले नाही. देशाची फाळणी घडवून आणणाऱ्या मुसलमानांपेक्षा तिला नाइलाजाने मान्यता देणारे गांधी व काँग्रेस हेच आपले कट्टर शत्रू आहेत, असे समजून त्यांनी गांधींना दगलबाजीने ठार मारले; व आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला. गांधींविषयी भारतीय जनतेला व साऱ्या जगातल्या लोकांना एवढा आदर व आत्मीयता का वाटते या वस्तुस्थितीचा उलगडा हिंदुत्ववाद्यांना अजूनही झालेला दिसत नाही. त्यामुळे त्यांची नाव भरकटत आहे; व तिच्यावर गुंडापुंडांनी कब्जा मिळविल्याचे विचित्र दृश्य आज पाहवे लागत आहे. गांधीचे मूल्यमापन करण्यात भारतीय विद्वानांची नेहमीच गफलत होत आली आहे. आइनस्टाइन, शॉ, मार्टिन लूथर किंग, लेक वालेसा, फुजिई वगैरे जागतिक

कौतोंच्या पंडितांना व क्रांतिकारकांना गांधीविचार हाच आजच्या युगाचा एकमेव आशाकिरण वाटतो; पण आम्ही मात्र अजून मॅझिनी, डीव्हॅलेरा, नेपोलियन, हिटलर, अब्राहन लिंकन, लेनिन, माओ, हो ची मिन्ह यांचेच गुणगान करण्यात दंग आहोत. आपली जात, भाषा, प्रांत यांच्याबाहेर ज्यांचे नावही कुणाला ठाऊक नाही, असे फुले, आंबेडकर, शाहूमहाराज, रामस्वामी नायकर, अण्णादुराई, भगतसिंग, राजगुरू, सावरकर हे चिमुकले पुढारीच आम्हाला गांधीपेक्षा श्रेष्ठ वाटतात. कदाचित् पाश्चात्त्य बुद्धिवंतांचा पसंतीचा शिक्का पडून गांधी भारतात परत येतील तेव्हा, अथवा जागतिकतेला गवसणी घालण्याइतकी आपली बुद्धी प्रगल्भ होईल तेव्हा गांधींचे महामानवत्व आपल्याला पटेल ! हिंदुत्वाचा किंवा हिंदू राष्ट्राचा डंका न बडवता भारतीय संस्कृतीचे हार्द (मर्म) सर्व जातिधर्मांच्या लोकांपर्यंत नेऊन पोहोचविणाऱ्या पांडुरंगशास्त्री आठवल्यांना लाखो सक्रिय अनुयायी मिळतात; आणि आपण एवढे उत्तम ज्ञान देण्यास समर्थ असताना आपल्या मागे येण्यास मूठभर ब्राह्मणांखेरीज कोणीच तयार का होत नाही, आपल्या वैचारिकेत व कार्यपद्धतीतच काही उणीव नसेल ना, असा विचारही या तथाकथित बुद्धिमंतांच्या मनात येत नाही. ज्या हिंदू समाजाच्या ऐक्यासाठी व उन्नतीसाठी आपण एवढा आक्रोश करीत आहोत, तो आपल्याकडे असा पाठ फिरवून का बसला आहे, याचा शांत मनाने विचार करण्याची जरूरच त्यांना भासत नाही. जनता गाढव असते, असे समजून आपल्या बौद्धिक अहंकाराच्या कोषात गुरफटून बसणे, हस्तिदंती मनोऱ्यात राहणाऱ्या कलावंतांनी जनतेशी फटकून वागणे हे लोकशाहीत आत्मघातक ठरते, एवढी साधी गोष्ट ज्यांना समजली नाही त्यांनी गांधींच्या लोकप्रियतेला कितीही नाके मुरडली तरी, ते सारे निरर्थकच ठरणार, हे देव बोलून चुकला होता. आपले शहाणपण सक्रियपणे सिद्ध करण्याऐवजी इतर लोक कसे मूर्ख आहेत हे दाखवून देण्यातच या मंडळींनी आपली बुद्धी खर्च केली. काही लोक हिटलर-मुसोलिनीचे आदर्श समोर ठेवून हुकूमशाहीचे गुणगान करण्यात मग्न झाले. या हुकूमशाहीने नवोदित स्वतंत्र राष्ट्रांमध्ये धुमाकूळ घालून जनतेला कसे दे माय धरणी ठाय करून सोडले आहे, हेही डोळे उघडे ठेवून पाहण्याची इच्छा त्यांना झाली नाही. जणू ते आपल्या काल्पनिक जगात शेख महंमदाप्रमाणे वावरत राहिले आणि जनतेपासून दूर होत गेले.

धर्मनिरपेक्षतावाद्यांची हास्यास्पद व केविलवाणी आत्मवंचना

ही झाली 'हिंदुराष्ट्र 'वाद्यांची स्थिती ! धर्मनिरपेक्षतेचे बिरुद मिरविणाऱ्या काँग्रेस, समाजवादी, साम्यवादी, वगैरे तथाकथित पुरोगामी मंडळींची आत्मवंचना तर याहूनही हास्यास्पद व केविलवाणी होती. धर्माच्या आधारावर देशाची फाळणी

3997

करण्याला मान्यता दिल्यानंतर व अखंड भारतातून मुस्लिम भारत वेगळा निघाल्यानंतर उर्वरित प्रदेश आपोआपच हिंदू भारत उरतो, हे साधे वजाबाकीचे गणित त्यांना समजले नाही. ज्यांना ते समजले त्यांनी हट्टाने वस्तुस्थिती मान्य करण्यास नकार दिला. आणि जो हिंदू भारत उरला तो पूर्वीचाच संमिश्र हिंदुस्थान आहे असे ते सांगू लागले. हेही एकवेळ क्षम्य समजता आले असते; परंतु तोंडाने धर्मनिरपेक्षतेच्या गोष्टी करीत या लोकांनी प्रत्यक्ष व्यवहारात हा देश केवळ हिंदूंचाच असल्याचे दाखवून दिले. हिंदू कोडबिल, अस्पृश्यता निवारण वगैरे ज्या काही सुधारणा त्यांनी कायद्याच्या द्वारे घडवून आणल्या, त्या केवळ हिंदूंशीच संबंधित होत्या. जो मुस्लिम समाज अज्ञानाच्या अंधारात चाचपडत होता त्याला प्रकाश दाखविण्याऐवजी जास्तच काळोखात ढकलून देण्याचे कार्य स्वतःला मुस्लिमांचे कैवारी म्हणविणाऱ्या या धर्मनिरपेक्षतावाद्यांनी चालू ठेवले. तलाकपीडित मुस्लिम स्त्रीला भिकारी बनविणारा जो कायदा अलीकडे राजीव सरकारने केला आहे, ते या वावतीतले ढळढळीत उदाहरण आहे. उर्दूला आपली मातृभाषा व धर्मभाषा समजून जे मुसलमान आधुनिक ज्ञानविज्ञानापासून स्वतःला वंचित करू इच्छित होते, त्यांना ज्ञानाचा उजेड दाखविण्याऐवजी उर्दू माध्यमाच्या शाळा गावोगावी उघडून मुसलमानांनी कायम अज्ञानाच्या अंधकारात गुरफटून राहवे, अशी तरतूद त्यांनी करून ठेवली. या संदर्भात एक वेगळा विचार सुचतो. मुसलमान लोक उर्दूचा दुराग्रह सोडून आपापल्या प्रादेशिक भाषेचा अभिमान बाळगायला लागले तर, आपोआप त्यांच्यातील 'पॅन इस्लाम'ची भावना कमी होऊन ते अधिक देशभक्त बनतील; आणि स्थानिक जनतेशी एकरूप होऊ शकतील. उर्दूचे प्रभुत्व मान्य केल्याने उत्तर भारतीय उर्दू भाषी पुढाऱ्यांचे व मुल्लामौलवींचे नेतृत्व त्यांना नाइलाजाने स्वीकारावे लागले. हमीद दलवाईंनी या वावतीत योग्य मार्ग दाखविला आहे. त्यांचा आदर्श भारतीय मुसलमानांना खूपच उपयुक्त ठरेल. अर्थात् हे विधान करताना उर्दू भाषेचे सामर्थ्य व महत्त्व मी नजरेआड केलेले नाही. गेली चाळीस वर्षे मी उर्दूत लेखन, वाचन व भाषण करीत आलो आहे. मोठी शानदार भाषा आहे ती. तिचा दिमाख काही औरच आहे. ती जगली पाहिजे, वाढली पाहिजे; पण मुसलमानांची मालमत्ता म्हणून नव्हे. 'हिंदी' चित्रपटांच्या रूपात जशी ती लोकप्रिय बनली आहे, तशीच ती भारतीय राहिली पाहिजे. वस्तुतः स्वतंत्र भारतात उर्दूला काही स्थानच उरले नाही. कारण ती पाकिस्तानची राजभाषा बनल्याने व मुस्लिमांनी तिच्याशी आपले अभिन्नत्व हट्टाने चालू ठेवल्यामुळे बहुसंख्य भारतीयांच्या दृष्टीने ती परकीय भाषा बनली. उर्दूच्या अकादम्या काढून तिला आधार देण्याचा सत्ताधाऱ्यांनी खूप प्रयत्न केला. पण असल्या तकलादू टेकूंनी कोणतीही भाषा उभी राहू शकत नाही. तिला आमजनतेचा आंतरिक प्रतिसाद मिळावा लागतो. तो यापुढे

उर्दूला मिळण्याची शक्यताच नव्हती. अशा उर्दूत शिक्षण घेण्याच्या अट्टहासापायी मुस्लिम समाज निरक्षरतेच्या गर्तेत खोल रुतत गेला. आपला धर्म हीच आपली एकमेव अस्मिता (आयडेंटिटी) आहे, असा खुळा समज मुसलमानांनी करून घेतल्यामुळे ते इतर समाजांपासून दूर फेकले गेले. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत असे घडल्याने ते दलितांहूनही अधिक मागसलेले बनून गेले. स्मगलिंग, चोरी, दरोडेखोरी, खून असल्या दुष्कृत्यांखेरीज त्यांना अन्य व्यवसायच उरला नाही. हे सारे इस्लामच्या नावावर घडून आले; व धर्मनिरपेक्षतावाद्यांनी त्याला भरपूर हातभार लावला. या मंडळींना मुसलमानांविषयी खरेखुरे प्रेम असते तर, त्यांनी सर्व जातिधर्मांच्या लोकांसाठी एकच समान नागरी कायदा करून त्यांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला असता. प्रारंभिक काळात मुसलमान अपराधभावनेने गर्भगळित झाले होते. त्यावेळी सर्व पुरोगामी कायदे केले असते तर त्यांनी मुळीच विरोध न करिता ते सारे आनंदाने मान्य केले असते; व परिणामतः ते भारतीय वनण्याच्या दिशेने वाटचाल करू लागले असते; परंतु असे काही घडावे अशी येथील राज्यकर्त्यांची बहुधा इच्छाच नसावी. मुसलमानांना मागस व दरिद्री ठेवण्यातच आपला स्वार्थ आहे, असे त्यांनी मानले. सत्ताधारी काँग्रेसने व नेहरू घराण्याने गांधींचा नाहक उदोउदो केल्याने जगभर त्यांचा बोलबाला झाला, अशी गोड समजूत काही लोकांनी करून घेतली आहे. आपले पुढारी गांधींपेक्षा श्रेष्ठ असून जगात त्यांचे नावही कुणाला माहीत नाही, याचे स्पष्टीकरण देण्याचा त्यांचा तो एक मार्ग असतो. तसे पाहिल्यास जगातले सर्वच देश आपापल्या पुढाऱ्यांचे देव्हारे माजवीत असतात; परंतु त्यांची नावे त्यांच्या देशाच्या बाहेर कुणाला ठाऊक नसतात. मग एकटे गांधीच त्याला अपवाद का ठरले असतील याचा विचार करण्याची गरज त्यांना भासत नाही. शिवाय ते हे विसरतात की, नेहरू घराणे स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी गांधींच्या झांजा बडवत राहिले आहे. नेहरू, इंदिरा व राजीव यांना मनातून असे वाटत आले आहे की, खरे तर आपण गांधींहून श्रेष्ठ आहोत ! पण तसे उघड म्हटल्यास लोक हसतील म्हणून तसे बोलण्याचे धाडस ते करू शकले नाहीत एवढेच. वस्तुतः गांधींच्या मार्गाचा त्याग करण्यास सुरुवात नेहरूंनीच केली होती. गांधींना मुसलमानांविषयी प्रेम वाटत होते; पण नेहरूंनी मुसलमानांचा केवळ आपल्या राजकारणातले एक प्यादे म्हणूनच वापर केला; आणि त्यांना अज्ञानातून बाहेर काढण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. मुसलमानही आपल्या जुनाट धर्मकल्पना उराशी बाळगून खितपत पडले. अधूनमधून त्यांचे पुढारी त्यांना दंगली करण्यास भडकवीत राहिले; परंतु आता त्यांचे रक्षण करणारी ब्रिटिश सत्ता (सैन्य, पोलीस वगैरे) नसल्यामुळे या दंगलीत त्यांचेच जास्त नुकसान होऊ लागले. फाळणीच्या वेळीही वस्तुतः पंजाबमध्ये मुसलमानांवर जे अत्याचार झाले ते

पाकिस्तानात हिंदूंवर झालेल्या अत्याचारांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नव्हते. त्यावरून धडा घेऊन युरोप–अमेरिकेत जसे ते तिथल्या जनतेशी मिळते घेऊन राहतात तसे येथील बहुजनसमाजाशी त्यांनी जुळवून घेतले असते तर उदार हिंदूंनी त्यांना फार लवकर बरोबरीचे स्थान देऊन आपल्यात सामील करून घेतले असते. परंतु त्यांना हिंदूंवर विजय मिळविण्याच्या खुमखुमीने सरळ मार्गाने जाऊच दिले नाही. त्यांचा हा अडेलतट्टूपणा असह्य झाल्याने हिंदूंनीही त्यांना चांगला धडा शिकविण्याचे ठरविलेले दिसते. इंग्रजांच्या मदतीने जी गोष्ट साध्य होऊ शकली ती यापुढे साध्य करता येणार नाही, हे उघड दिसत असतानाही येथील राजकीय पक्षांतील फाटाफुटीचा वापर करून आपण पुन्हा या देशाचे तुकडे पाडू अशी स्वप्ने मुसलमान पाहत आहेत. त्यांचेच अंधानुकरण शिखांनी चालविले आहे. त्यांनाही धर्माधिष्ठित स्वतंत्र शीख राष्ट्र हवे आहे. परंतु मुसलमानांप्रमाणे शिखांचे हे स्वप्नही दिवास्वप्नच राहील. कारण ब्रिटिश सत्तेसारखी एखादी परकीय सत्ता उघडपणे त्यांच्या पाठीशी उभी नाही; आणि या देशाचे आणखी तुकडे पाडण्यास जो पक्ष संमती देईल त्याला भारतीय जनता कधीच सत्तेवर राहू देणार नाही याची पूर्ण कल्पना देशातल्या सर्व राजकीय पक्षांना आहे.

लोकसंख्येची अदलाबदल ही तार्किक परिणती होती

एकदा धर्माधिष्ठित राष्ट्राची, द्विराष्ट्रवादाची संकल्पना मान्य केल्यानंतर लोकसंख्येची अदलाबदल ही तिची तार्किक परिणती होती. ती झिडकारल्याने येथील जातीय समस्या जास्तच गुंतागुंतीची बनली. लोकसंख्येच्या अदलाबदलीला मान्यता देणे म्हणजे द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताला मान्यता देणे, ही गोष्ट स्पष्ट असल्यामुळे भारतीय पुढाऱ्यांनी व सत्ताधीशांनी तिला मान्यता दिली नाही; परंतु आपण द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत तत्त्वतः मान्य केला नाही तरी, व्यवहारतः तो स्वीकारला आहे, याचा त्यांना विसर पडला; किंवा जगाच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी त्यांनी स्वतःलाच फसविले, असेही म्हणता येईल. कदाचित लोकसंख्येची अदलाबदल झाल्यास हिंदूंची व मुसलमानांची दोन स्वतंत्र राष्ट्रे प्रत्यक्षात येतील आणि कधीकाळी या दोन राष्ट्रांचे एकीकरण होण्याची आशा धुळीला मिळेल, असा विचार करून त्यांनी त्या गोष्टीला विरोध केला असेल. कारण देशाची फाळणी ही तात्पुरती असून मुसलमानांना त्यांची चूक लवकरच कळून येईल व पुन्हा हे दोन्ही देश पूर्ववत् एक होतील, अशी वेडी आशा अनेक हिंदी पुढारी बाळगून होते. येथे असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की आंबेडकर आणि सावरकर यांच्यासारखे प्रकांड पंडित व चतुरस्र राजनितीज्ञ या बाबतीत सल्ला देत असताना त्यांच्याकडे दुर्लक्ष करून गांधी–नेहरूंनी आपलाच अडाणी हेका का

चालू ठेवला ? याचे साधे व सरळ उत्तर असे आहे की, जी व्यक्ती लोकांचे पुढारीपण करावयास पुढे येते ती स्वतःला सर्वज्ञ समजते, म्हणूनच पुढारी बनत असते. ती इतरांकडून मार्गदर्शन घेऊ लागली तर ती पुढारी न उरता अनुयायी बनते. तो धोका कोण पत्करणार ? नाही म्हणायला जगातले आणि विशेषतः भारतीय उपखंडातले साम्यवादी पुढारी या नियमाला अपवाद आहेत. त्यांचे मार्गदर्शन व सूत्रसंचालन मॉस्को किंवा पेकिंगहून होत असते. पण ते जणू रशियाचे किंवा चीनचे सुभेदार किंवा एजंट म्हणूनच काम करीत असतात. अशा प्रकारचे आचरण गांधी–नेहरूंनी सावरकर–आंबेडकरांच्या बाबतीत करायला हवे होते, अशी अपेक्षा बाळगणे म्हणजे पराकोटीचा भाबडेपणा होय.

तेरी भी चूप, मेरी भी चूप

सारांश, द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताच्या बाबतीत तथाकथित विचारवंत व धंदेवाईक राजकारणी लोक यांनी शहामृगी वृत्ती धारण करण्याचे ठरविलेले दिसते. बाटलीत भरून ठेवलेला हा राक्षस बाहेर पडला तर, आपले भलतेच वस्त्रहरण होईल, अशी भीती त्यांना वाटत असल्यामुळे त्या बाटलीचे बूच काढण्यास ते तयार होत नाहीत. 'तेरी भी चूप मेरी भी चूप' अशी सगळ्यांची भूमिका आहे. 'हिंदुराष्ट्र'वादी त्या बुचाला हात लावायला तयार नाहीत. कारण, द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत फेटाळला गेला तर त्यांच्या हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेला काही आधार उरत नाही. त्याच्या उलट भारतीय मुस्लिम जातीयवाद्यांना अशी भीती वाटते की, द्विराष्ट्रवादाचे भूत आपण उठवले तर, भारतातील आपले अस्तित्वच विवादास्पद ठरून आपल्याला दुय्यम नागरिकत्व उघडपणे मान्य करावे लागेल; आणि तो सिद्धांत आपण नाकारला तर, आपणच जन्माला घातलेल्या पाकिस्तानचे अस्तित्व नाकारावे लागेल. म्हणून स्वातंत्र्यापूर्वी त्या सिद्धांताच्या गर्जना करणारे मुस्लिम पुढारी आता त्याचे नाव घ्यायलाही तयार नाहीत. एखादा रोगी मरणोन्मुख असतो, तो लवकरच मरणार असल्याचे त्याच्या नातेवाइकांना, डॉक्टरांना व खुद्द रोग्यालाही कळून चुकलेले असते; परंतु त्यांच्यापैकी कुणीही ती वस्तुस्थिती स्वीकारण्यास तयार नसतात. तो रोगी लवकरच बरा होईल, असे आश्वासन किंवा भरवसा ते एकमेकांना देत असतात. तशीच काहीशी ही स्थिती आहे. द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचे अस्तित्व मान्य करण्यास कोणी तयार नाही. परंतु तो नाकारण्याचे धैर्यही कोणामध्ये नाही. एवंच, एकमेकांस फसविण्यात सर्वजण गुंग आहेत. या फसवाफसवीच्या डावात सगळे गढून गेले असल्याने दिल्लीश्वरांनी आपली घराणेशाही प्रस्थापित करण्याचे कसे डावपेच चालविले आहेत, इकडे कुणाचेच लक्ष नाही. महात्मा गांधींपेक्षा नेहरू घराणे श्रेष्ठ आहे, अशी पक्की खात्री असल्यामुळे इंदिरा गांधींनी गुंडांचा

म्हारक्या म्हणून गाजलेल्या आपल्या मुलाचे–संजयचे–थडगे गांधी–नेहरूंच्या समाधीजवळ बेकायदेशीरपणे, दडपून उभारले; आणि त्याला समाधी हे पवित्र नाव देऊन त्या शब्दाचे जणू विडंबन केले. ज्या परिसरास खुद्द राष्ट्रपतींनाही मरणोत्तर स्थान मिळू शकत नाही तेथे आपल्या दिवटचा चिरंजिवाचे थडगे उभारून व त्याची जयंती–मयंती साजरी करण्याचा रिवाज पाडून त्यांनी साऱ्या देशाचा केवढा घोर अपमान केला आहे ! परंतु एकाही खासदाराला त्याबाबतीत प्रश्न विचारून अथवा जाहीर विरोध व्यक्त करून जनतेची नाराजी जाहीर करण्याचे सुचत नाही. यावरून सारी जनताच कशी मुर्दाड बनली आहे, ते दिसून येते.

आसिफ जीलांनी यांचा परखड सवाल

परंतु सत्तेच्या राजकारणाशी ज्याला काही कर्तव्य नाही असा एखादा बाणेदार माणूस चुकून आपल्याला भेटतो; आणि आपण खुप होऊन जातो. असा एक माणूस बी. बी. सी. च्या उर्दू विभागात आहे. भारत व पाकिस्तान यांच्या निर्मितीला गतवर्षी चाळीस वर्षे पुरी झाली. त्यानिमित्ताने या विभागातील आसिफ जीलानी या विद्वान गृहस्थांनी पाकिस्तान व बांगला देश यांतील काही महत्त्वाच्या पुढाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यावेळी, त्यांनी प्रत्येकाला काही मार्मिक प्रश्न विचारले. ते असे:– " ज्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतावर पाकिस्तानची निर्मिती करण्यात आली होती तो कितपत बरोबर होता ? तो बरोबर असल्यास पाकिस्तान का मोडले ? बांगला देशाची निर्मिती कोणत्या तत्त्वावर झाली ? या सिद्धांतानुसार भारतातील मुसलमानांची स्थिती कोणती ठरते ? तेही एक वेगळे राष्ट्रच आहे काय ? खुद्द जिनांचा या सिद्धांतावर कितपत विश्वास होता ? पाकिस्तानची निर्मिती इस्लामच्या रक्षणासाठी होती की मुसलमानांच्या ? ते उद्दिष्ट कितपत साध्य झाले ?" या प्रश्नांना कुणालाही समाधानकारक व तर्कशुद्ध उत्तरे देता आली नाहीत. मात्र सरहद्द गांधी बादशाहखान यांचे चिरंजीव वलीखान यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, " आम्ही पठाणांनी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत कधीच मान्य केला नाही. आमच्या इच्छेविरुद्ध आम्हाला पाकिस्तानात डांबण्यात आले. आम्ही सदैव अखंड भारताचाच पुरस्कार केला."

याचा अर्थ एवढाच की, धर्माधिष्ठित राष्ट्राचा सिद्धान्त आधुनिक जगातील सुसंस्कृत समाजांमध्ये टिकू शकत नाही. मात्र ज्या देशात, ज्या धर्माच्या लोकांची संख्या अधिक असेल, त्यांच्या धर्माची व संस्कृतीची छाप त्या देशाच्या एकूण जीवनावर व राज्यकारभारावर पडणे अपरिहार्य असते. त्या देशात राहणाऱ्या अन्य धर्मीयांनी ती छाप आनंदाने स्वीकारावयाची असते. त्यासाठी स्वतःचा धर्म व संस्कृती यांचा त्याग करण्याची गरज नसते. परदेशात स्थायिक होणारे आपण

कळत नकळत आपला धर्म व संस्कृती यांचे जतन करीत असताना त्या त्या देशाच्या संस्कृतीशी एकरूप होत असतोच ना ? भारतीय मुसलमानांच्या बाबतीत ही गोष्ट एका दृष्टीने फार सोपी व स्वाभाविक आहे. तर दुसऱ्या दृष्टीने खूपच अवघडही आहे. ते याच देशात जन्मले–वाढले असल्याने त्यांना त्यात काही नवीन नाही; परंतु त्याचबरोबर त्यांनी या देशावर सातआठशे वर्षे राज्य केले असल्यामुळे राज्यकर्त्यांच्या व त्यांच्या आश्रयाने राहणाऱ्या लोकांच्या जुलूम–अत्याचारांचा वारसाही त्यांना पत्करावा लागला आहे. त्या वारशातून स्वत:ला मुक्त करणे त्यांना कष्टदायक होत असणार यात शंका नाही. त्यात पुन्हा हजार-बाराशे वर्षे परकीयांच्या गुलामगिरीत काढल्यानंतर स्वातंत्र्याचा व मुक्तीचा अनुभव घेणाऱ्या हिंदूंना जुन्या गुलामगिरीच्या व अत्याचारांच्या खाणाखुणा पूसून टाकण्याची इच्छा होणे स्वाभाविक आहे. सोमनाथाचा पुनरुद्धार आणि रामजन्मभूमीची मुक्ती यांसारख्या घटनांकडे याच दृष्टीतून पाहिले पाहिजे. राज्यकर्ते व राजकीय पक्ष आपापल्या स्वार्थासाठी – मुस्लिम मते मिळविण्यासाठी–या न्याय्य गोष्टींकडे कानाडोळा करून हिंदूंनाच सहिष्णुतेचा व औदार्याचा उपदेश करू लागतात, तेव्हा राजकारणात मुळीच रस नसलेला सामान्य नागरिकही त्यांच्या या ढोंगबाजीने क्रुद्ध होतो; आणि मग त्याची सहानुभूती रामजन्मभूमीच्या मुक्तीसाठी लढा देणाऱ्यांकडे वळते; आणि प्रलोभने व जुलूम यांच्या साहाय्याने बाटविण्यात आलेल्या आपल्या बांधवांना पुन्हा स्वधर्मात आणले पाहिजे, असे त्याला वाटू लागते. अशा परिस्थितीत भूतकाळातील आपल्या पराक्रमाचे व कौर्याचे कोडकौतुक करीत बसण्याऐवजी मुसलमानांनीच दडपशाहीने उद्ध्वस्त केलेली धर्मस्थाने व इतर वास्तू– त्यावर मशिदी उभारल्या असल्या तरी, आपण होऊन हिंदूंना परत दिल्या पाहिजेत; आणि पेट्रोडॉलरच्या साह्याने येथील दलित–पीडित जनतेला इस्लामची दीक्षा देण्याच्या क्लृप्त्या योजण्याऐवजी ज्या कोणाला आपल्या मूळ धर्मात परत जायचे असेल, त्यांना आनंदाने तशी सोय करून दिली पाहिजे. त्यासाठी प्रथम त्यांनी भल्याबुऱ्या मार्गांनी आपली संख्या वाढवून या देशावर आपल्याला पुन्हा सत्ता गाजविता येईल हा विचार मनातून काढून टाकला पाहिजे. या देशाची फाळणी इंग्रजांच्या कृपेमुळे, इच्छेमुळे झाली हे विसरून, आपण आपल्या सामर्थ्यावर या देशाचे अनेक तुकडे पाडण्याची दिवास्वप्ने पाहण्याचे त्यांनी सोडून दिले पाहिजे. आता आपण या देशाचे समान नागरिक आहोत, ही नवीन जाणीव मुसलमानांनी ख्रिश्चनांनी, शिखांनी आपल्या मनात विकसित केली तरच, देशात सामंजस्याचे वातावरण निर्माण होऊ शकेल. हिंदू माणूस खूपच सोशीक, सहिष्णू व उदारमनस्क आहे. त्याच्या अस्मितेला डिवचून त्याच्याशी शत्रुत्व करण्याऐवजी त्याचे प्रेम प्राप्त करणेच अंततोगत्वा आपल्या हिताचे ठरणार आहे, हे मुसलमान ओळखतील तर

येथील वातावरण खूपच निवळेल.

हिंदू 'बॅकलॅश'चा अन्वयार्थ

अलीकडे काही वर्षांत हिंदू लोक मोठ्या संख्येने एकत्र येऊन मुस्लिम अनुनयाविरुद्ध आवाज उठवू लागल्याचे दृश्य दिसू लागले आहे. त्याचे विश्लेषण कसे करता येईल ? वर उल्लेख केल्याप्रमाणे हिंदू मन जात्याच सोशीक असल्यामुळे आपल्या मनाविरुद्ध चालणाऱ्या गोष्टी ते सहन करीत राहते; परंतु त्याच्या सहनशक्तीलाही मर्यादा आहे, ही गोष्ट अनेकांच्या लक्षात येत नाही. तसे पाहिले तर, मुस्लिम अनुनय ही काही नवी गोष्ट नाही. टिळक–गांधींच्या काळापासून ती चालत आली आहे; परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात तिचे उद्दिष्ट उच्च व पवित्र होते. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात मुसलमानांना सहभागी करून घेण्याच्या प्रयत्नाचा तो एक भाग होता. म्हणून अनेकांना तो मनातून आवडला नाही तरी बाह्यतः त्यांनी त्याला विरोध केला नाही. याच्या उलट स्वातंत्र्योत्तर काळातील मुस्लिम अनुनय केवळ मते मिळवण्याच्या स्वार्थापायी वाढत राहिला. मल्लापुरम्-सारखे मुस्लिम जिल्हे तयार करणे, मशिदींवर लाऊडस्पीकर लावण्याची परवानगी देणे, त्यांनी 'पाकिस्तान झिंदाबाद'च्या घोषणा दिल्या किंवा पाकिस्तानी झेंडे फडकावले तरी, त्याकडे दुर्लक्ष करणे, पोलिसात, सुरक्षादलात मुसलमानांची मुद्दाम भरती करणे, ही या अनुनयाची काही रूपे आहेत. हा अनुनय कोणत्याही उच्च ध्येयाने प्रेरित झालेला नसून, सत्ताप्राप्ती व पुढारीपण मिरविण्याचे एक साधन म्हणून त्याचा वापर केला जात आहे, हे लक्षात येताच हिंदू समाजाची तीव्र उलटी प्रतिक्रिया (बॅकलॅश) उफाळून आली. दुधासाठी, पशुप्रेमाखातर गायीला भरपूर खाऊपिऊ घालणे आणि गोमांसासाठी तिला पोसणे यात जे अंतर असते, तसे काहीसे हे प्रकरण आहे. ज्याप्रमाणे हिंदू राष्ट्र ही पाकिस्तानची प्रतिक्रिया आहे, त्याप्रमाणे आजचा हिंदू उठाव ही मुस्लिम अनुनयाची तीव्र प्रतिक्रिया आहे. स्वातंत्र्यलढा चालू असताना ज्या आमच्या पुढाऱ्यांनी फुले–आंबेडकर –शाहूमहाराजांना ब्रिटिश सत्तेचे पाठीराखे म्हणून धिक्कारले होते, तेच पुढारी आता या नेत्यांना टिळक–गांधींपेक्षा श्रेष्ठ ठरविण्याच्या अहमहमिकेत गुंतल्याचे पाहूनही अशीच प्रतिक्रिया जनमानसात निर्माण झाली आहे. परंतु ती अजून व्यक्त झालेली नाही. फुले–आंबेडकरांचे हे नवे गुणगानही मतपेटीवर नजर ठेवूनच केले जात आहे, याची कल्पना सामान्य जनतेला आली आहे. ते गुणगान जेव्हा आपली मर्यादा ओलांडते, तेव्हा काय घडते याचा दाहक अनुभव मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर प्रकरणाने आणून दिला आहे. तीच गोष्ट मुसलमानांच्या बाबतीतही घडत आहे. स्वतःला जिनांचा अवतार समजणारे सैयद शहाबुद्दीन जनता

पक्षात सन्माननीय समजले जातात; आणि बुखारीसारखा मग्रूर इसम हिंदू धर्म व संस्कृती, भारतीय जनता व भारत-सरकार यांच्याविरुद्ध वाटेल तसे बरळत राहूनही पकडला जात नाही, हे पाहून सामान्य हिंदू माणसाला भयंकर चीड येते. यातूनच हा हिंदू बॅकलॅश निर्माण झाला आहे. तो नीट समजावून घेतला नाही तर, तो असाच वाढत जाईल; आणि भारतातले राजकारण गुंडापुंडांच्या हातात जाऊन सगळाच बट्ट्याबोळ होईल. यावेळी ज्यांना या देशाच्या ऐक्याची खरीखुरी चिंता आहे त्यांनी सर्वसामान्य जनतेपर्यंत जाऊन तिला या संकटाची जाणीव करून दिली पाहिजे. ज्याप्रमाणे भारताचे तुकडे पडू नयेत असे म्हणणारे लोक नुसतेच आक्रोश करीत राहिले, फुटून वेगळे होऊ पाहणाऱ्या लोकांपर्यंत जाऊन पोहोचण्याची कसलीच धडपड त्यांनी केली नाही व म्हणूनच इतक्या सहजासहजी देशाची फाळणी झाली, त्याप्रमाणे या देशाचे आणखी तुकडे पडू नयेत असे ज्यांना वाटते त्यांनी आम जनतेच्या अंतःकरणाला स्पर्श करण्याची पराकाष्ठा केली पाहिजे.

द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताला तिलांजली दिलीच पाहिजे

मात्र या प्रक्रियेचा प्रारंभ भारतीय मुसलमानांकडून झाला पाहिजे. द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत पूर्णपणे चुकीचा होता व त्या सिद्धांतावर झालेली देशाची फाळणी ही घोडचूक होती, ही गोष्ट त्यांनी निर्भयपणे, जाहीररीत्या कबूल केली पाहिजे. भारताच्या एकात्मतेवर दृढ निष्ठा असणारे आणि भारतीय संस्कृतीशी एकरूप झालेले देशभक्त मुसलमान पूर्वीही होते आणि आजही आहेत. आजाद, गफारखान किडवाई, हमीद दलवाई, न्यायमूर्ती छागला, सिकंदर बख्त, यूसुफ मेहेर अली, मुहंमद आरिफखान वगैरे पुढारी हे या विचारधारेचे प्रतिनिधी होत; परंतु अशिक्षित मुस्लिम जनतेवर त्यांचा काही प्रभाव पडत नाही. मुस्लिम लीगची विचारप्रणाली मानणाऱ्या धर्मांध पुढाऱ्यांची मुस्लिम जनतेवरील पकड अजून ढिली झालेली नाही. म्हणून आता त्यांनीच पुढे येऊन द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत नाकारला व धिक्कारला पाहिजे. तसे केल्याने भारत, पाकिस्तान, बांगलादेश हे पुन्हा एक होतील, असा भाबडा आशावाद मी बाळगीत नाही. महर्षी अरविंदांनी भाकीत केल्याप्रमाणे हा त्रिखंडित भारत पुन्हा अखंड बनणार आहे, असे मी अवश्य मानतो; परंतु त्याला फार काळ लागणार आहे. पाकिस्तानी व बंगाली मुसलमानांना धर्माधिष्ठित राजसत्तेचे वैयर्थ्य पटण्यास अनेक वर्षे लागतील. मात्र या सिद्धांताने आपली कशी कुतरओढ झाली आहे, याची जाणीव होण्यास भारतीय मुसलमानांना फार वेळ लागू नये. या सिद्धांताचा स्वीकार केल्यामुळे ते भारतीय जनसमाजाचा विश्वास गमावून बसले आहेत. त्याची थोडीफार किंमत आत्तापर्यंत त्यांनी दिलीच आहे. अजूनही ते जागे झाले नाहीत तर, त्यांना याहूनही फार मोठी किंमत द्यावी लागेल,

अशी चिन्हे दिसत आहेत. केवळ आपल्या एकगट्ठा मतांसाठी जे लोक आपल्या भावना गोंजारण्याचा आव आणून आपले पुढारीपण करीत आहेत, ते आपले हितचिंतक नसून शत्रू आहेत व त्यांच्यामुळे आपण कायम मागसलेले राहून अखेर नष्ट होणार आहोत हे त्यांनी ओळखले पाहिजे. द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचा त्याग हे या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असेल. इस्लाम हा आपला धर्म असला तरी, आपली संस्कृती भारतीय आहे, आपले बापजादे हिंदूच होते व म्हणून आपण हिंदू संस्कृतीचेच वारसदार आहोत, फारसी, तुर्की, अरबी संस्कृतीशी आपला काही संबंध नाही, अरबी ही आपल्या धर्मग्रंथाची भाषा असली तरी उर्दूशी आपला काही संबंध नाही, स्थानिक भाषा याच आपल्या मातृभाषा आहेत, इथले कायदेकानू, रीतिरिवाज, संस्कार हे सारे आपलेच आहेत, याची जाणीव भारतीय मुसलमानांना जेव्हा होईल तेव्हाच द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचा त्याग करण्याचे धैर्य त्यांच्यात निर्माण होईल. ते धैर्य त्यांना होईल एवढीच आशा सारे देशभक्त, भारतीय बाळगू शकतात !

* *

'वाङ्मय शोभा' : मार्च ८८

१९. शस्त्राचाराच्या मोहाची फळे

पंजाबातील अतिरेकी शीख, गोरखालँडचे दहशतवादी गुरखे आणि श्रीलंकेतील रक्तपिपासू तमिळ यांनी चालविलेल्या निर्घृण हत्याकांडामुळे हिंसाचार व शस्त्राचार यांच्या मोहात पडलेल्या भाबड्या लोकांच्या श्रद्धांना भयंकर धक्का बसला आहे. महात्मा गांधींनी सत्य–अहिंसेचे नसते स्तोम माजवून हिंदूसमाजाला भ्याड व भेकड बनविले म्हणूनच या देशाची फाळणी झाली, हिंदूंनी गांधींऐवजी शस्त्राचाराचा पुरस्कार करणाऱ्या सावरकरांचे नेतृत्व स्वीकारले असते तर देश अखंड राहिला असता व जगज्जेता बनला असता, असे अजूनही त्या लोकांना मनापासून वाटते. म्हणून पंजाबातील हिंदूंना शस्त्रे द्या अशी मागणी ते करीत आहेत. अर्थात् शस्त्रे द्यावयाची असतील तर ती हिंदू, मुसलमान, शीख वगैरे सर्वच लोकांना द्यावी लागतील. लोकशाही सरकारला एका खास जाती-जमातीला शस्त्रे देण्याचा कायदा करता येणार नाही, याचा या मंडळींना बहुधा विसर पडलेला असतो; आणि सर्वसामान्य पंजाबी जनतेमध्ये निर्भयता निर्माण झाली नाही तर, तिला दिलेली शस्त्रे अतिरेक्यांच्या हाती पडतील हेही त्यांच्या लक्षात येत नाही. शीख, गुरखे, नागा, तमिळ, नक्षलवादी, दलित पँथर, दलितांची हत्या करणारे सवर्ण आणि ब्राह्मणांची घरे जाळणारे अब्राह्मण हे सारे हिंदूच आहेत. त्यावरून गांधींच्या सत्य–अहिंसेचा उपदेश हा फक्त मूठभर पांढरपेशा लोकांपर्यंतच पोहोचला होता, असाही निष्कर्ष काढून या शस्त्राचारवादी मंडळींना स्वतःचे समाधान करून घेता येईल; परंतु शस्त्राचार आणि हिंसाचार यांनी एखादा तात्कालिक प्रश्न सुटल्यासारखा वाटला तरी कोणताच प्रश्न कायमचा सुटू शकत नाही; आणि राज-

सत्तेच्या शस्त्राचारापुढे सामान्य जनतेचा शस्त्राचार टिकाव धरू शकत नाही, ही गोष्टही या प्रश्नाचा गंभीरपणे विचार करणाऱ्यांच्या लक्षात एव्हाना आली असेल. काश्मीरवरील पाकिस्तानी आक्रमणाचा प्रतिकार करणाऱ्या भारतीय सेनेला गांधींनी पाठिंबा व आशीर्वाद दिला होता. यावरून सैन्याचा शस्त्राचार व जनतेचा शस्त्राचार यात ते भेद करीत होते; आणि जनतेने हिंसेचा मार्ग अवलंबू नये एवढ्यापुरताच त्यांचा उपदेश मर्यादित होता असाही निष्कर्ष काही व्यवहारी मंडळी काढतात. तो अगदीच चुकीचा आहे असे म्हणता येत नाही.

आपले म्हणणे इतरांना निखळ युक्तिवादाने किंवा स्वतःच्या आचरणाने पटवून देऊन त्यांना आपल्या बाजूला वळविणे म्हणजे त्यांची मते मिळविणे, हा लोकशाहीचा आधारभूत सिद्धांत आहे; परंतु आपण आपले म्हणणे इतरांना पटवून देऊ असा आत्मविश्वास ज्यांच्या ठिकाणी नसतो, ते लोक या लोकशाही सिद्धांताची टर उडवितात; आणि ज्यांना आपले म्हणणे पटत नाही ते निर्बुद्ध आहेत, अडाणी आहेत अशी आपली स्वतःची व इतरांची समजूत करून देऊन ते लोकशाहीची भाषा बोलू लागतात. युरोप-अमेरिकेसारख्या पुढारलेल्या व सुधारलेल्या देशांत लोकशाही चालू शकेल; परंतु भारतासारख्या मागासलेल्या देशात हुकूमशाहीच चालली पाहिजे असे त्यांना मनापासून वाटते. अर्थात ठोकशाही किंवा हुकूमशाही चालवायची म्हणजे शस्त्राचार आलाच; आणि एकदा शस्त्रास्त्रे हातात आली की, हिंसाचाराला धरबंद उरत नाही. हेच शिखांच्या अंधाधुंद हिंसाचाराने दाखवून दिले आहे.

शस्त्रांचे आकर्षण भ्याडांना अधिक

शीख, गुरखे व तमिळ अतिरेक्यांच्या उदाहरणांवरून आणखी एक गोष्ट निर्विवादपणे सिद्ध झाली आहे. ती अशी की, माणूस जितका भ्याड तितके त्याला शस्त्रास्त्रांचे आकर्षण अधिक असते. गांधींसारखा निर्भय माणूस उघड्या अंगाने जगात वावरतो; तर राजीव गांधींसारखे जिवाला जपणारे लोक चिलखते चढवून सशस्त्र रक्षकांच्या संरक्षणात फिरत असतात. त्यांचे अनुकरण म्हणून ज्यांच्या जिवाला काडीचाही धोका नाही असे फडतूस लोकही चिलखते वापरतात; आणि सशस्त्र अंगरक्षक (बहुधा सरकारी खर्चाने) पदरी बाळगतात. खरे तर ही सारी भेकडपणाची लक्षणे असतात. माणसाच्या मनात दडलेली भीती हिंसेच्या रूपाने व्यक्त होते; आणि मग भित्रे लोक हिंसाचारालाच शौर्य समजून त्याचा गौरव करू लागतात. एका दृष्टीने पाहिल्यास हे गौरव करणारे लोकही हिंसाचारी व शस्त्राचारी लोकांइतकेच मनोरुग्ण असतात. त्यामुळे महात्मा गांधी, इंदिराजी यांच्यासारखे निःशस्त्र बेसावध, म्हातारे-कोतारे व निरागस मुलेबायका यांची निर्घृणपणे

हत्या करणारेही त्यांना शूरवीर व हुतात्मे वाटू लागतात. आपण मुसलमानांसारखेच कडवे बनले पाहिजे, असे जे लोक सांगतात त्यांचा तो उपदेश शिखांनी तंतोतंत अमलात आणला आहे. किंबहुना आपण मुसलमानांहूनही क्रूर व निर्दय बनू शकतो हे त्यांनी सिद्ध केले आहे. याबद्दल कडवेपणाचा प्रचार करणाऱ्यांनी त्यांचे जाहीरपणे अभिनंदन केले पाहिजे. मात्र या कडवेपणाच्या मुळाशी असलेला भ्याडपणा आपल्याला ओळखता आला पाहिजे.

माणस हा स्वभावतःच हिंसक असतो ?

हिंसा, गुंडगिरी, शस्त्राचार, दहशतवाद या साऱ्या गोष्टी माणसाच्याच नव्हे तर, सर्व प्राणिमात्रांच्या रक्तातच भिनलेल्या असतात. किंबहुना तो त्यांचा उपजत स्वभावच असतो असे म्हणण्यास हरकत नाही. त्यामुळे त्यांच्याविषयी आकर्षण निर्माण करण्यासाठी, त्यांचे गौरवीकरण करण्याची, खास उपदेश देण्याची गरज नसते. माणसाच्या या मूलभूत प्रवृत्तीमुळेच शिवसेना, हिंदू एकता, हिंदू एकजूट, पतित पावन, खालिस्तानवाद्यांच्या विविध संघटना यांचे सभासद आणि सर्वसामान्य अशिक्षित, अडाणी मुसलमान चटकन् एकत्र येऊ शकतात; आणि दमदाटी, गुंडगिरी, भोसकाभोसकी करण्यास ते एका पायावर तयार असतात. या पशुत्वापासून माणसाला दूर ठेवणे, एकमेकांशी सामंजस्याची वागणूक ठेवण्यास त्याला प्रवृत्त करणे, आपसातील मतभेद सामोपचाराने मिटविण्याचे महत्त्व त्याला पटवून देणे, म्हणजेच त्याला सुसंस्कृत बनविणे, हे महाकर्म कठीण असते. ते कार्य करण्यात जे महापुरुष यशस्वी होतात त्यांना सारे जग वंद्य मानते, याचे कारण हेच ! नरमांस – भक्षणापासून शुद्ध शाकाहारापर्यंत मानवी संस्कृतीने केलेली वाटचाल म्हणूनच फार महत्त्वाची ठरते. आपसातील मतभेदांचा निकाल डोकी उडवून लावण्याऐवजी डोकी मोजून लावण्याचा सुसभ्य उपाय म्हणजेच लोकशाही, येथपर्यंत प्रगती केल्यानंतर पुन्हा डोकी उडविण्याच्या मार्गाचा अवलंब करण्याची इच्छा जेव्हा काही लोकांना होते, तेव्हा त्यांच्या मेंदूत काहीतरी बिघाड झाला असावा. असे समजण्यास काहीच हरकत नाही. दहशतवादी शीख आणि त्याना पाठिंबा देणारे लोक यांच्या बाबतीत असेच काहीसे घडले असावे, असे दिसते.

याचा अर्थ असा नव्हे की, शस्त्राचाराची कधीच गरज पडणार नाही. ज्यावेळी सारे शांततापूर्ण संवैधानिक मार्ग बंद होतात, अन्याय पीडितांची सहनशीलता संपुष्टात येते, तेव्हा शस्त्राचाराला पर्याय नाही अशी स्थिती निर्माण होऊ शकते. नगरहवेली व हैद्राबादच्या मुक्तिसंग्रामात अशी स्थिती निर्माण झाली होती, असे दिसते. मात्र जनतेचा शस्त्राचार हा अपवादात्मक राहावा, उठल्या-सुटल्या त्याचा वापर केला जाऊ नये, असेच कोणीही म्हणेल. देशाचे रक्षण आणि कायदा व

सुव्यवस्था यांचे परिपालन यांसाठी सेना, सशस्त्र दले, पोलीस यांची आवश्यकता आज तरी राहणारच. त्यांचा शस्त्राचार हा समाजमान्य, राजमान्य शस्त्राचार असल्याने त्याची चर्चा या संदर्भात करणे अप्रस्तुत ठरेल.

तरीपण या संदर्भात एक-दोन मुद्यांचा ओझरता उल्लेख करणे उचित होईल. शस्त्रास्त्रांबद्दलचे आकर्षण हे बालबुद्धीचे, अपरिपक्व मनाचे लक्षण आहे, हे ओळखून आधुनिक खेळण्यांच्या निर्मात्यांनी शस्त्रांचीच– खेळणी बनविली. ती इतकी लोकप्रिय झाली की, विचारवंतांच्या दृष्टीने तो एक चिंतेचा विषय बनला. कारण, त्यातून वैयक्तिक शस्त्राचाराला व खुनाखुनीला ऊत येऊ लागला. आपल्या पूर्वजांच्या दूरदृष्टीला हे भीषण भवितव्य हजारो वर्षांपूर्वी दिसले होते, म्हणून त्यांनी शस्त्रास्त्रांचा वापर करणारा एक स्वतंत्र वर्गच निर्माण केला. तो म्हणजे क्षत्रियांचा. या क्षत्रियांनी आपल्या शस्त्रास्त्रांचा वापर फक्त अन्यायाविरुद्धच करावा असे बंधन त्यांच्यावर घातले गेले; आणि ते आपल्या मर्यादेत राहून आपल्या सामर्थ्याचा वापर करतात की नाही हे पाहण्याचे काम निःशस्त्र ब्राह्मणांवर सोपविले. मानवजातीच्या विकासाच्या प्रारंभिक काळात ही वर्णव्यवस्था नक्कीच उपयुक्त ठरली असली पाहिजे.

हुकूमशाही व दहशतवादाचे आकर्षण

आपल्या पारतंत्र्याच्या काळात गोऱ्या (प्रसंगी काळ्या) सरकारी अधिकाऱ्यांवर बाँब टाकणाऱ्या किंवा पिस्तुल चालविणाऱ्या क्रांतिकारकांना आपण जसे शूरवीर व पूजनीय मानले, तसेच आज भिंडरानवाले, सतवंतसिंग वगैरे शीख अतिरेकी आणि दहशतवादी गुरखे, नागा, तमिळ हे बहादूर व आदरणीय समजले जातात. त्याबद्दल त्यांच्या जातभाईंना आपण कोणत्या तोंडाने दोष देणार? कारण तेही त्यांच्या समजुतीप्रमाणे आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी व धर्मरक्षणासाठी प्रस्थापित सत्तांशी लढत आहेत गांधीजींनी त्यावेळी दहशतवादाचा निषेध करून अशा क्रांतिकारकांना वाट चुकलेले देशभक्त म्हणून संबोधले होते. त्याचा केवढा राग आम्हाला तेव्हा आला होता! किंबहुना अजूनही अनेकांच्या अंतःकरणात तो राग धुमसत आहे. अर्थात हिंसेचा मार्ग अवलंबिण्याची इच्छा होणे ही एक मानसिक विकृती आहे आणि तिच्यातून माणसाने मुक्त झाले पाहिजे ही गोष्ट जगातल्या विचारवंतांना प्रकर्षाने जाणवू लागली आहे, हेही खरेच; आणि मानवी संस्कृतीच्या दृष्टीने ते एक सुचिन्ह आहे.

तरीपण शस्त्राचार व हिंसाचार यांची नशा एवढी जबरदस्त असते की, ती उतरता उतरत नाही; आणि एकदा ती चढली की आपण कुणाच्या हातचे बाहुले बनत आहोत याचेही भान राहत नाही. त्यामुळे शीख अतिरेकी आज पाकिस्तानच्या

आहारी जाऊन देशाचे तुकडे पाडू पाहत आहेत. उंदरांपासून आपल्या अंडचांचे रक्षण करण्यासाठी बोलावून आणलेला नाग आपल्यालाच पुढेमागे गट्ट करून टाकील, ही साधी गोष्टही त्यांच्या डोक्यात शिरत नाही. ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

ज्याप्रमाणे विषमज्वराने आजारी असलेला रोगी बरा होत असताना, थोड्याशा कुपथ्याने पुन्हा आजाराच्या तावडीत सापडतो; म्हणजे त्याचा ताप उलटतो. त्याप्रमाणे मानसिकदृष्टचा रोगग्रस्त असलेली माणसे व्यक्तिशः व समूहशः शांततेचा, लोकशाहीचा मार्ग सोडून पुनःपुन्हा हिंसेच्या, शस्त्राचाराच्या दहशतवादाच्या, हुकूमशाहीच्या मार्गाने जाऊ लागतात. कधीकधी लोकशाहीचा व शांततेचा मार्ग ताबडतोब फलदायी होत नाही, असे दिसल्याने अधीर माणसे त्या मार्गाचा त्याग करून हिंसाचाराचा अवलंब करतात. तर कधी आपली वैयक्तिक महत्त्वाकांक्षा व स्वार्थ साधण्यासाठी ती हिंसेचा वापर करतात. माणसाच्या रक्ताची चटक लागलेला वाघ जसा नरमांसभक्षक बनतो, त्याप्रमाणे हिंसाचाराची चटक लागलेल्या व्यक्तीला किंवा समाजाला उच्च मानवी मूल्यांचा विसर पडून रक्तपातातच आसुरी आनंद मिळू लागतो. मग तो रक्तपात आपण कुणाचा करतो याचेही भान त्याला राहत नाही. आयरिश रिपब्लिकन आर्मी, पी. एल. ओ. आणि शीख व तमिळ अतिरेकी यांनी केलेल्या तान्हुल्या मुलांच्या हत्या पाहिल्या की, त्यांच्यात माणुसकीचा अंशही उरलेला नाही याची खात्री पटते. आपल्या या अमानुषी कृत्यांना हे लोक तत्त्वनिष्ठेचे अधिष्ठान असल्याचेही आभास निर्माण करतात. त्यामुळे आपण ज्यांची हत्या करतो ते आपले मित्र आहेत की शत्रू याचा विचार करण्याइतका सारासार विवेकही त्यांच्याजवळ उरत नाही. ते निव्वळ हिंस्र पशू बनतात. त्यामुळे माणूस बनण्याचा इतरांनी केलेला उपदेश त्यांना आवडत नाही. म्हणून ते उपदेश करणाऱ्यांनाच मारून टाकतात.

ही तर पिसाळलेली श्वापदे

शीख, गुरखे, श्रीलंकेतील तमिळ, नागा, मिझो, नक्षलवादी हे सारे असे पिसाळलेले पशू बनलेले आहेत. आम्हाला माणूस बनायचे नसून हिंस्र श्वापदेच बनायचे आहे, असा त्यांनी निश्चयच केलेला दिसतो. ही परिस्थिती काही एका रात्रीत उद्भवलेली नाही. तिच्या निर्मितीला इतिहासाचा फार मोठा हातभार लागलेला आहे. त्यांच्यापैकी फक्त शिखांचाच विचार ऐतिहासिक पार्श्वभूमीवरून या लेखात करण्यात आला आहे. येथे हेही लक्षात ठेवले पाहिजे की, ज्याप्रमाणे खून करणाऱ्या इतकाच त्या खुनाला प्रोत्साहन देणाराही कायद्याप्रमाणे गुन्हेगार असतो, त्याप्रमाणे हिंसाचाराचे गोडवे गाणारे लोकही आजच्या हिंसक परिस्थितीला जबाबदार आहेत. कारण चांगल्या गोष्टीप्रमाणेच वाईट

गोष्टींनाही भक्कम पाठिंब्याची गरज असते. खुनी, दहशतवादी लोकांचे कौतुक करणारे भ्याड लोक जगात नसते तर केवळ 'हीरो' बनण्यासाठी हिंसाचार, गुंडगिरी करणाऱ्यांची संख्या कितीतरी कमी झाली असती. शिखांच्या हिंसाचाराला धर्मकृत्य समजून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे त्यांना पाठिंबा व प्रोत्साहन देणारे लोक मोठ्या संख्येने अस्तित्वात नसते तर त्यांचा शस्त्राचार इतका फोफावला नसता, हे उघड आहे.

शिखांची शस्त्राचाराची परंपरा

शस्त्राचाराचे गौरवीकरण करणाऱ्यांसमोर मुगलसत्तेशी झुंज देणाऱ्या शिखांचा आदर्श होता. त्यातून गुरू गोविंदसिंहांचे माहात्म्य खूप वाढले. देशाच्या फाळणीच्या वेळीही शिखांनी क्रौर्याच्या बाबतीत आपण मुसलमानांपेक्षा तसूभरही कमी नसल्याचे सिद्ध केले; आणि हिंसेला हिंसेनेच उत्तर देणे कसे अपरिहार्य असते, हे इतरांना पटवून देण्याची संधी हिंसाभक्तांना मिळाली. अर्थात् 'तुम लडो हम कपडे संभालते हैं' अशीच काहीशी त्यांची भूमिका राहिली. हिंसा इतरांनी करावी आणि त्यापायी आपले प्राण गमवावेत. आम्ही फक्त त्यांचे गुणगान करावे आणि हुतात्मे म्हणून त्यांना गौरवावे. आम्ही किंवा आमच्या मुलाबाळांनी मात्र डॉक्टर, वकील, इंजीनियर होऊन खोऱ्याने पैसा ओढावा आणि चैनीत जगावे, असे दृश्य प्रत्यक्षात दिसत राहिले. आजच्या काळात स्वतः शस्त्राचार करण्याची हिंमत नसल्यामुळे जे कोणी तो करीत असतील त्यांना पाठिंबा देण्यावरच आम्हाला समाधान मानावे लागते. अतिरेक्यांना इतर शिखांचा मिळणारा पाठिंबा आणि शिवसेनेसारख्या संघटनांना अनेक हिंदूंचा असणारा पाठिंबा ही याची उदाहरणे म्हणता येतील. शिखांची ही हिंसाचारी प्रवृत्ती जोपर्यंत मुसलमानांविरुद्ध केंद्रित झाली होती, तोपर्यंत त्यांचे कौतुक करण्यात आघाडीवर असलेली मंडळी शिखांचा शस्त्राचार शिखेतर हिंदूंवर उलटताच स्तब्ध झाली. त्या धक्क्यातून ती अजून सावरलेली नाहीत, त्यामुळे शिखांच्या या शस्त्राचाराच्या परंपरेतच काही दोष होता किंवा काय याचा विचार करण्याच्या मनःस्थितीत ती नाहीत. अशा लोकांनी सुमारे ८० वर्षांपूर्वी गुरू गोविंद-सिंगांच्या कार्याची चिकित्सा करणारा विश्वकवी रवींद्रनाथांचा 'शिवाजी ओ गुरु गोविंदसिंह' ('इतिहास' पृ. ६२-७४) हा लेख काळजीपूर्वक वाचला पाहिजे. महात्मा गांधींचा तथाकथित पुळचट हिंसाचार भारतात अजून यावयाचा होता. किंबहुना गांधी आणि टागोर यांची भेटही त्यावेळेपर्यंत झालेली नव्हती. गांधींप्रमाणे टागोर हे काही अहिंसावादी नव्हते. तरीही गुरू गोविंद सिंहांनी प्रचारित केलेल्या शस्त्राचारातील धोके त्यांनी ओळखले होते. त्यांच्या या लेखावर अनेक शीख पंडितांनी व इतर 'शठं प्रति शाठ्यम्' वाल्या विद्वानांनी कडक टीकाही केली होती;

परंतु आज इतक्या वर्षांनंतर टागोरांचा दृष्टिकोन वरोवर होता, असे पूर्वग्रहदूषित मनाने विचार करणाऱ्यांखेरीज इतरांना अवश्य पटेल. शस्त्राचार किंवा हिंसाचार हा विशिष्ट ध्येय उराशी वाळगून शिस्तबद्ध रीतीने केला गेला तर एकवेळ आपण तो समजू शकतो; पण आजकाल फिलिस्तीनी गनीम, आयरिश बंडखोर, शीख अतिरेकी, गुरखा दहशतवादी व शिया क्रांतिकारक यांच्याकडून रामनराघवाप्रमाणे निष्पाप स्त्रिया व मुले-वाळे यांच्यावर जे अत्याचार होतात ते पाहिले की, आपण कुणाला ठार मारीत आहोत व ते का मारीत आहोत, त्यातून काय साधणार आहोत याचा विचारही ते करीत नसावेत असे दिसते. वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीप्रमाणे हाती आलेली अत्याधुनिक शस्त्रास्त्रे ते पिसाटाप्रमाणे किती बेगुमानपणे चालवितात ते पाहिले की, मन चक्रावून जाते. शस्त्राचाराची परिणती ही अशीच व्हायची असते! शस्त्राचार किंवा हिंसाचार हा खरोखरी एक भस्मासुर असतो. तो जोपर्यंत इतरांचा नाश करीत असतो तोपर्यंत आपल्याला हर्षाच्या उकळ्या फुटतात; परंतु जेव्हा तो आपल्यावर उलटतो तेव्हा मात्र दे माय धरणी ठाय अशी आपली स्थिती होऊन जाते. शीख, गुरखे, तमिळ हा अनुभव आपल्याला आज देत आहेत. शिवसेना, हिंदू सेना यांच्या बाबतीतही आपली स्थिती अशीच तर होणार नाही ना?

गुरुदेवांची भूमिका

गुरुदेवांच्या या लेखाचा परामर्श घेण्यापूर्वी हे लक्षात ठेवले पाहिजे की क्रूर मुगल सत्तेशी संघर्ष करणाऱ्या शूर शिखांविषयी टागोरांना अतिशय आदर वाटत होता. जुलमी सत्ताधाऱ्यासमोर नमण्याऐवजी हौतात्म्य पत्करणाऱ्या शिखांविषयी त्यांना वाटणारा हा आदर 'गुरु गोविंद', 'शेष शिक्षा', 'प्रार्थनातीत दान', 'बंदी वीर' यांसारख्या अत्यंत सुंदर कवितांच्या द्वारे त्यांनी व्यक्त केला होता. त्यांतून शिखांची निर्भयता, तत्त्वनिष्ठा, हौतात्म्यभावना यांविषयी गुरुदेवांना वाटणारा अपरंपार आदर व्यक्त होतो. वंगभंगाच्या काळात गुरुदेवांच्या या कविता बंगालमध्ये घरोघरी जाऊन पोहोचल्या होत्या. त्या कविता तोंडपाठ असलेले वयस्क बंगाली आजही भेटतात. यावरून त्यांच्या प्रभावसामर्थ्याची कल्पना येते. ही पार्श्वभूमी लक्षात घेतल्यास टागोरांविषयी गैरसमज होणार नाही; आणि त्यांच्या विवेचनाचे तटस्थपणे मनन-चिंतन करणे शक्य होईल. या कवितांचा एकूण सूर काय असावा याची कल्पना येण्यासाठी 'प्रार्थनातीत दान' (मागितले त्याहून जास्त दिले!) या कवितेचा थोडक्यात उल्लेख करतो. एका पठाण नबाबासमोर बंदी बनविलेल्या काही शिखांना उभे करण्यात येते. त्यावेळी तरुसिंह नावाच्या तरुणाला नबाब म्हणतो, "हे पहा तरुसिंह, मी तुला क्षमा करू इच्छितो." तरुसिंह विचारतो, "माझा असा अपमान तू करू का इच्छितोस?" नबाब सांगतो, "तू

महा वीर आहेस. तुझा राग मला येत नाही. तू फक्त तुझे (डोकीवरील) केस कापून द्यावेस, एवढीच माझी मागणी आहे." यावर तरुसिंह उद्‌गारतो, "तुझी ही दया माझ्या अंतःकरणात सदैव गुंतून राहील. तू जे काही मागतो आहेस त्याहून कितीतरी अधिक मी तुला देतो. माझ्या केसांबरोबर माझं मस्तकही मी तुला देऊन टाकतो." (तरुसिंह कहे, "करुणा तोमार हृदये रहिल गाँथा। जा चेयेछ तार किछु बेशि दिब, बेणीर संगे माथा॥") शिखांमधील बलिदानाची भावना, आपल्या धर्माविषयीची कट्टर निष्ठा आणि त्यासाठी कोणतीही किंमत देण्याची त्यांची तयारी यांनी टागोर भारावून गेलेले दिसतात. मराठा, राजपूत व शीख या तीन जमातींविषयी त्यांना खास आकर्षण होते, असे त्यांनी या जमातींविषयी लिहिलेल्या कविता व लेख यांवरून सहज लक्षात येते. मध्ययुगात अद्‌भुत पराक्रम गाजविणाऱ्या जमातींमध्ये या तीन जमाती प्रमुख होत्या. त्यामुळे त्यांना त्यांच्याविषयी खास आकर्षण वाटले असावे.

'शिवाजी ओ गुरू गोविंदसिंह' या लेखाच्या प्रारंभी टागोरांनी नानक आणि गोविंदसिंह यांच्यातील फरक दाखवून दिला आहे. ते म्हणतात, "संकुचित पौराणिक धर्माच्या बंधनांपासून नानकांचे हृदय मुक्त झाले होते. हीच मुक्ती सर्वांपर्यंत नेऊन पोहोचविण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते...परंतु मोगलांकडून अत्याचार झाल्यामुळे नानकशिष्यांचा समुदाय एका विशिष्ट संप्रदायात संघटित झाला... गुरू गोविंदसिंहांनी साऱ्या मानवांमध्ये धर्मप्रचार करण्याचे कार्य आवरते घेऊन शिखांना सामर्थ्यवान बनविणे हे आपले जीवनव्रत बनविले. वस्तुतः हे कार्य धर्मप्रचारकाचे नव्हे; ते प्रामुख्याने सेनापतीचे व राजनीतिज्ञांचे काम होते. गुरू गोविंदसिंहांनी असामान्य दीर्घोद्योगाच्या जोरावर आपले सैन्य तयार केले; आणि ते स्वतः शत्रूचा सूड उगविण्यास योग्य असे योद्धे बनले. त्यांनी धर्मसंप्रदायाचे रूपांतर सैन्यात केले; आणि धर्मप्रचारक गुरूचे आसन रिकामे केले... यामुळे इतिहासामध्ये क्षणभर शिखांचा पराक्रम उज्ज्वलपणे चमकला हे खरे... परंतु बाबा नानकांनी जे पाथेय देऊन त्यांना एका विशाल, उदार मार्गावरून चालण्याची प्रेरणा दिली होती, ते पाथेय त्यांनी येथेच खर्च करून टाकले; आणि आपली यात्राही येथेच संपविली. यानंतरचा शिखांचा इतिहास म्हणजे फक्त लढाया आणि मुलुखगिरी यांचाच इतिहास आहे... शिखांना जसजसा विजय मिळत गेला, तसतशी त्यांची आत्मसंरक्षणाची कल्पना नाहीशी होऊन सत्ताविस्ताराची लोलुपता वाढू लागली... आत्मसंरक्षणासाठी जी युद्धशक्ती संचित झालेली असते, त्या शक्तीला इतरांवर आघात करायच्या प्रयत्नांपासून परावृत्त करून स्वतःला घडविण्याच्या कामी तिचा वापर करणे कोणाला शक्य आहे? ज्या शक्तीला ते शक्य होते तिला गुरू गोविंदांनी सत्वर ध्येयप्राप्तीच्या अतिलोभाने क्षुद्ध करून

टाकले. आपल्या गुरुपदाच्या बदल्यात त्यांनी शिखांना तलवारीचे दान दिले. त्यांच्या निर्वाणानंतर नानकांनी प्रचारिलेले महासत्य ग्रंथसाहेबामध्ये बद्ध झाले... ते एके ठिकाणी अडकून पडले. तेव्हा ही शक्ती पाहता पाहता लोभी आणि संयमहीन बनली. देव अंतर्धान पावल्यामुळे भुताखेतांचा प्रादुर्भाव झाला. हिसका-हिसकी आणि गटबाजी यांना जोर चढला. या उच्छृंखल आत्मघातकी प्रयत्नांमधून रणजीतसिंहांचा उदय झाला." सारांश, ज्या कारणासाठी सामान्य लोक शिखांचा उदोउदो करतात (किंवा करीत होते !) त्या शस्त्राचाराच्या स्वीकारापासूनच त्यांच्या अधोगतीला प्रारंभ झाला, हे गुरुदेवांचे विश्लेषण निश्चितच विचार करण्यासारखे आहे.

शीख अतिरेक्यांच्या कृष्णकृत्यांचा निषेध करताना आणखी एक वस्तुस्थिती विचारात घेतली पाहिजे. ती अशी की, आपल्या हिंसाचाराने साऱ्या जगाला भयग्रस्त करून ओलीस ठेवू इच्छिणाऱ्या फिलिस्तीनी मुक्तिआघाडीला (व यासर अराफत या तिच्या नेत्यांना) भारत-सरकार अत्यंत सन्मानाने वागविते. मुक्ति-आघाडीच्या येथील कार्यालयाला परराष्ट्र वकिलातीचा दर्जा मिळाला आहे. यहुदी व अमेरिकन यांच्याविरुद्ध घातपाती कारवाया करण्यासाठी फिलिस्तीनी दहशत-वाद्यांना भारतीय भूमीचा वापर करू दिला जातो. अशा स्थितीत शीख दहशत वाद्यांच्या कृत्यांचा धिक्कार आपण कोणत्या तोंडाने करणार ? अशीच काहीशी स्थिती भारतीय देशभक्तांनी ब्रिटिशांविरुद्ध केलेल्या दहशतवादाची आहे. त्यांचा गौरव आपण तेव्हाही केला आणि आजही करीत आहोत; आणि तसा गौरव करण्यास नकार देणाऱ्या गांधीजींची आपण टिंगल करतो. यातील विसंगती आपल्या लक्षातच येत नाही. आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कारटे अशीच ही हास्यास्पद भूमिका नाही काय ? आपल्या या भूमिकेचा आपण कधी फेरविचार करणार आहोत की नाही ? तत्त्वनिष्ठेला तिलांजली दिली की याहून दुसरे काय घडणार ? असो.

रणजीतसिंहांचा अनिष्ट प्रभाव

रवींद्रनाथांच्या एकूण विवेचनावरून आत्मसंरक्षणासाठी केल्या जाणाऱ्या हिंसेला अथवा शस्त्राचाराला त्यांचा विरोध नव्हता असे दिसते. गांधीजींच्या भूमिकेहून ही भूमिका खूपच वेगळी आहे. परंतु आत्मरक्षणासाठी वापरावयाचे शस्त्र आक्रमणाचे साधन केव्हा बनेल आणि त्यातून कोणता अनर्थ उद्‌भवेल हे सांगणे कठीण असते. रणजीतसिंहांच्या उदाहरणाने टागोरांनी हा मुद्दा स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, " रणजीतसिंहांनी काही काळपर्यंत विस्कळित शिखांना एकत्र आणले, पण ते केवळ बळाच्या द्वारे. ते सर्वांपेक्षा बलवान होते म्हणून त्यांनी सर्वांचे दमन केले. जो बळाच्या जोरावर लोकांना एकत्र करतो तो इतरांना दुर्बळ बनवूनच ते ऐक्य साधीत असतो. इतकेच नव्हे तर, ऐक्याचे चिरंतन मूलतत्त्व जे प्रेम,

त्यांचाच पराभव करून, त्याला पंगू बनवून तो आपले उद्दिष्ट साध्य करतो. रणजीतसिंहांनी स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीच साऱ्या शिखांना साम-दाम-दंड-भेदाने एकत्र बांधून ठेवले होते... रणजीतसिंहांच्या लोभीपणाला सीमा नव्हती; आणि त्यांची भोगलालसा असंयमी होती... मात्र अत्यंत लोभी असूनही त्यांनी भारताच्या नकाशावरील इंग्रजांच्या ताब्यातील लाल सीमारेषेचे उल्लंघन केले नाही. त्यांच्या स्वार्थबुद्धीने त्यांना रोखून धरले... त्यांनी आपल्या मागे शिखांसाठी काय ठेवले ? फाटाफूट, अविश्वास आणि उच्छृंखलता हेच की नाही ?... आज शिखांमध्ये पुढे जाण्याची वृत्ती नाही. ते एका लहानशा संप्रदायात बद्ध होऊन पडले आहेत. त्यांची वाढ खुंटली आहे... नानकांचे शिष्य आज युद्ध करू शकतात यात शंका नाही; परंतु नानकांच्या शिष्यांनी सैन्यात शिरून कधी काबुल, कधी चीन तर कधी आफ्रिका वगैरे ठिकाणी (ब्रिटिश सत्तेसाठी) लढाया करीत फिरावे, ही गोष्ट नानकांच्या धर्मतेजाने उद्दीप्त झालेल्यांच्या वंशजांना शोभणारी आहे, असे आम्हाला वाटत नाही. जेव्हा शीख लोक मुक्त मानव न राहता विशिष्ट उद्दिष्टाला योग्य असे मानव बनले, तेव्हा प्रबळ राजाने त्यांना आपल्या उद्दिष्टासाठी वापरले... शीख इतिहासाचा परिणाम आमच्या देशाच्या बाबतीत अत्यंत शोकावह झालेला आहे. तो प्रतिहिंसेच्या (सूडाच्या) इच्छेने अथवा अन्य एखाद्या संकुचित अभिलाषेच्या आकर्षणाने आपल्या लक्ष्यापासून भ्रष्ट होऊन मानवी साफल्याच्या क्षेत्रातून स्खलित झाला; परंतु त्यापेक्षाही अधिक शोचनीय गोष्ट म्हणजे राष्ट्रीय साफल्याच्या क्षेत्रातही त्याला गौरव प्राप्त करता आला नाही. रणजीतसिंहानी जे राज्य स्थापन केले ते रणजीतसिंहांचेच राज्य होते. गुरू गोविंदसिंहांनी मोगलांशी जो संग्राम केला तो केवळ शीख संप्रदायाचाच संग्राम होता. त्यांनी आपला संकल्प आपल्या शिष्य–समुदायाच्या बाहेर प्रसारित केला नाही."

कविवर्य रवींद्रनाथांचा हा लेख वाचताना त्यांच्या द्रष्टेपणाने वाचक थक्क होऊन जातो. जणू सत्तर वर्षांनंतर काय घडणार आहे, याची कल्पना त्यांना तेव्हाच आली होती. हिंदू धर्माचा खड्गहस्त म्हणून आपण ज्या पंथाचा गौरव केला, तोच अहिंदूंपेक्षाही जास्त कडवेपणाने हिंदूंचा निःपात करायला तयार झाला असल्याचे दृश्य आपल्याला पाहावे लागत आहे. याचे कारण उघड आहे. हिंदूधर्माचा पाया असलेल्या सहिष्णुतेचा आणि अहिंसेचा त्याग करून द्वेष, हिंसा व शस्त्राचार यांनाच शीख पंथाने आपला खरा धर्म समजण्याचे ठरविलेले दिसते. त्याच्या असहिष्णुतेचा व हिंसाचाराचा प्रारंभ गुरू गोविंदसिंहांपासून झाला होता याचा आपल्याला विसर पडला होता.

मराठा इतिहास व शीख इतिहास

या संदर्भात रवींद्रनाथांनी शिवाजी महाराज व गुरू गोविंदसिंह यांच्या

वैशिष्ट्यांची जी तुलना केली आहे, तीही उद्‌बोधक आहे. ते म्हणतात, "याच ठिकाणी मराठा इतिहास आणि शीख इतिहास यांच्यातील फरक दिसून येतो. शिवाजी महाराजांनी जे कार्य अंगावर घेतले होते, ते कोणत्याही एखाद्या लहानशा गटापुरते मर्यादित नव्हते. त्याचे मुख्य कारण असे की, त्यांनी ज्या हिंदू जातीला व हिंदू धर्माला मुस्लिम सत्तेच्या जोखडातून मुक्त करण्याचा संकल्प केला होता, ती जात आणि तो धर्म ही शीख जातिधर्मापेक्षा कितीतरी पटींनी अधिक व्यापक होती. समग्र भारताचाच इतिहास नव्याने घडविण्याचे उद्दिष्ट त्यांनी स्वतःसमोर ठेवले होते...गुरुगोविंदांनी मोगलांशी अनेक लढाया केल्या; पण त्या किती निरर्थक! प्रतिहिंसा आणि आत्मरक्षण हेच त्यांचे मुख्य उद्देश होते; परंतु शिवाजी महाराजांनी ज्या लढाया केल्या त्या एखाद्या सोपान परंपरेसारख्या सूत्रबद्ध होत्या. त्या रागारागाने केलेल्या नुसत्या हाणामाऱ्या नव्हत्या. सबंध भारतवर्षाला आणि दूरपर्यंतच्या काळाला नजरेसमोर ठेवून त्यांनी एक महान् ध्येय निश्चित केले होते. ती काही एखाद्या सांप्रदायिक प्रक्षोभाची अभिव्यक्ती नव्हती, तर एक फार मोठे उद्दिष्ट साध्य करण्याचा तो प्रयत्न होता. परंतु असे असूनही शीख आणि मराठा या दोन्ही जातींचा इतिहास एकाच वेळी, एकाच प्रकारे निष्फळतेत समाप्त झाला... याचे कारण हेच की, जे उद्दिष्ट सबंध देशाला व्यापू इच्छिते, ते केवळ एका अथवा काही थोडक्या विशालहृदयी व्यक्तींच्या आधाराने सफल होऊ शकत नाही... जे सर्वांचे मंगल आहे, ते जर सर्वांच्या चित्तात ठसविले गेले नाही, ते केवळ आमच्यापुरते अथवा आमच्या पक्षातील काही लोकांपुरतेच मर्यादित होऊन राहिले तर, त्याचे मंगल स्वरूप नाहीसे होते; आणि इतरांच्या बाबतीत ते हळूहळू घातक बनते." शस्त्राचाराच्या अवाजवी गौरवीकरणामुळे शिखांमध्ये एका वेगळ्या अस्मितेची भावना वाढीला लागली; आणि गुरू गोविंदसिंहांच्या शिकवणुकीमुळे 'हिंसाचार व शस्त्राचार हाच आपला खरा धर्म आहे' अशी त्यांची दृढ समजूत झाली; व शस्त्र हेच त्यांचे दैवत बनले. माणूसकीला जणू ते पारखे झाले. एवढेच नव्हे तर, शीख जमात हे एक स्वतंत्र राष्ट्र (कौम) आहे असे ते म्हणू लागले. याच सुमारास द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचा आधार घेऊन मुसलमानांनी स्वतःसाठी वेगळे राष्ट्र मिळविले, तेव्हा त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून शस्त्राचार व निर्घृणता (तान्ही मुले व अबला यांच्या सध्या चालू असलेल्या हत्या ही शिखांनी मुसलमानांकडून घेतलेली शिकवण आहे!) यांच्या बळावर खालिस्तान मिळविण्याचा प्रयत्न त्यांनी चालविला आहे. मानवतावादी गुरू नानकांच्या शीख धर्माशी या साऱ्याचा दूरान्वयाने तरी संबंध जोडता येईल काय? ही सारी शस्त्राचाराच्या गौरवाचीच किमया आहे!

+ +

'तरुण भारत' : १७·७·८८

२०. राष्ट्रवादी : नवे अस्पृश्य

स्वातंत्र्यपूर्व काळात देशभक्ती, राष्ट्रवाद वगैरे शब्द आदराने उच्चारले जात. त्यांच्याशी त्यागाची व पावित्र्याची भावना संबद्ध असे. परंतु आता ते कुचाळकी व कुटाळकी व्यक्त करणारे शब्द बनले आहेत. किंबहुना बहुतेकांना त्यांचा विसरच पडला आहे. त्यांच्या ऐवजी लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता या शब्दांची चलती आहे. ज्यांचा या संकल्पनांशी दूरान्वयानेही संबंध नाही, जे लोक प्रत्यक्षात हुकूमशाही, भांडवलशाही व जातीयवाद यांचेच पुरस्कर्ते आहेत, तेच या शब्दांचा वापर स्वतःसाठी मुक्तहस्ताने व मुक्तकंठाने करतात; आणि इतरांना प्रतिगामी, जातीयवादी, भांडवलदारांचे हस्तक यांसारखी शेलकी विशेषणे बहाल करतात.

प्रामाणिकपणाचा मक्ता

अलीकडेच एका थोर समाजवादी नेत्यांची भेट झाली असता ते मला म्हणाले, "काय जोशीबुवा, तुम्ही जनसंघात सामील झालात की काय ?"

माझ्याविषयी त्यांच्या स्वरातील कीव आणि चेहऱ्यावरील तुच्छता पाहून मलाही क्षणभर शरमल्यासारखे झाले. 'काय हा बिचाऱ्याचा अधःपात ! याचा उद्धार आता कसा होणार ?' – अशा अर्थाचे भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटले होते; आणि त्यांच्या स्वरातूनही ते मला जाणवले. मी स्वतःला कसेबसे सावरीत म्हणालो, "जनसंघ ? तो तर सध्या अस्तित्वातही नाही."

"अहो, त्याचा अर्थ तोच ! संघ काय, जनसंघ काय किंवा भारतीय जनता पक्ष काय, सारे एकाच माळेचे मणी ! तुम्ही भाजपचं स्वागत केलंय, असं ऐकतो."

पुढारी महाशय उद्‌गारले. 'हल्ली तुम्ही बाटलीची संगत धरलीय किंवा माडच्या चढू लागलाहात, असं ऐकतो,' – अशा थाटात त्यांनी ते वाक्य उच्चारले.

मला तो विषय वाढवायचा नव्हता. कारण, माझ्या एका जवळच्या नातेवाइकाच्या मतिकाच्या प्रसंगी त्या नेताजींशी माझी ओझरती भेट झाली होती. म्हणून मी थोडक्यात खुलासा केला की, " मी राष्ट्रवादी आहे; आणि भारतात राष्ट्रवादाला जास्तीत जास्त जवळ असणारा पक्ष भाजपच आहे, असं मला वाटतं. म्हणून मी त्याला पाठिंबा देतो, पण मी त्या पक्षाचा साधा सभासदही नाही."

" अहो, राष्ट्रवाद हे त्या मंडळींनी नुसतं पांघरलेलं कातडं आहे. त्यांचा खरा वाद हिंदुत्ववादच आहे ! तुमच्यासारख्या गांधीवादी आणि समाजवादी विचारवंतांच्या सानिध्यात वाढलेल्या लेखकाला एवढी ढोवळ गोष्ट समजू नये, याचं मला आश्चर्य वाटतं." नेताजी उद्‌गारले.

मी नुसताच कसनुसे हसलो. हिंदुत्ववाद ही एखादी भयंकर गोष्ट आहे, तो या देशाला रसातळाला नेईल, म्हणून या देशाबाहेर निष्ठा असणाऱ्या देशद्रोह्यांपेक्षाही हिंदुत्ववादी जास्त धोकादायक आहेत, असे मला कधीच वाटले नाही. कदाचित माझी बुद्धीच तेवढी तोकडी असेल !

परंतु या पुढाऱ्यांची दुसरीच एक गोष्ट मला अधिक खटकली. आपण तेवढे प्रामाणिक व इतर सारे अप्रामाणिक, ढोंगी; आपणच फक्त साधनशुचिता पाळतो व इतर लोक मात्र साध्यसाधनविवेक न बाळगता वाटेल त्या साधनांचा वापर करतात; आपण सोवळे व दुसरे लोक भ्रष्ट, अशा थाटात ते बोलत होते. अशा भ्रमात वावरणाऱ्या लोकांशी चर्चा करणेही अवघड आते. असमचे आंदोलन, गुजरातमधील दंगली किंवा मुरादाबाद-अलीगढचे जातीय दंगे यांच्याशी आपला काहीही संबंध नाही, हरिजन-गिरिजनांसाठी राखीव जागा असल्याच पाहिजेत, या देशात जातीय सलोखा नांदला पाहिजे, असे भाजपवाल्यांनी कितीही कंठशोष करून सांगितले व तसे ठराव केले तरी, इंदिराजी व डाव्या आघाडीचे लोक यांचा त्यावर विश्वास बसत नाही. असममधील आंदोलन हे देशाचे ऐक्य व अखंडत्व टिकविण्यासाठी, परकीय घुसखोरांविरुद्ध चालविले जात असल्यानेच आपण त्याला पाठिंबा दिला आहे, असे भाजपने म्हटले तर त्यांना ते खोटे वाटते. मात्र ही मंडळी स्वतः जे काही बोलतील ते राजा हरिश्चंद्राच्या तोंडचे सत्यवचन आहे, असे इतरांनी समजले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो. साऱ्या हिंदू समाजाला एकतेच्या सूत्रात बांधण्यासाठी कटिबद्ध असलेले हिंदुत्ववादी हे हिंदू समाजाचे अविभाज्य अंग असलेल्या अस्पृश्यांवर अन्याय करण्यास प्रवृत्त होतील, ही गोष्ट साध्या तर्कबुद्धीला तरी पटेल काय ? पण राजकारणी मंडळींकडून तसा आरोप केला जातो. एवढेच नव्हे तर, त्यांच्या प्रचाराने दिशाभूल झालेले काही दलित नेतेही त्यावर

विश्वास ठेवतात. अर्थात आपण कालबाह्य व बुरसटलेले समजले जाऊ या भीतीने राष्ट्रवाद्यांनीही आपण लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता यांचे समर्थक आहोत असे सांगण्यास सुरुवात केल्यामुळे पुरोगामित्वाच्या ठेकेदारांनी त्यांच्याविरुद्ध काहूर उठविण्यास सुरुवात केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याऐवजी ही मंडळी आपल्या राष्ट्रवादाच्या भूमिकेवर भक्कमपणे व छातीठोकपणे पाय रोवून उभी राहतील तर त्यांना या आक्षेपांना उत्तर देणे अधिक सोपे जाईल. रशिया–चीनसारखे साम्यवादी देशही आज राष्ट्रवादाचा निर्भयपणे पुरस्कार करू लागले आहेत. आपापल्या राष्ट्राचे हित प्रमुख समजून आपल्या साम्यवादी मित्रांशीही संघर्ष करण्यास ते मागेपुढे पाहत नाहीत. अशा स्थितीत भारतातील निखळ राष्ट्रवाद्यांनी अशी न्यून मनोगंडाची भूमिका घेण्याचे खरोखरी काहीच कारण नाही.

हिंदुत्ववाद आणि राष्ट्रवाद

दुर्दैवाची गोष्ट अशी की, राष्ट्रवादाचा ध्वज फडकत ठेवण्याची जबाबदारी भारतातील हिंदुत्ववादी लोकांवर येऊन पडली आहे. 'दुर्दैव' अशासाठी की, वस्तुतः साऱ्या जातीजमातींच्या लोकांनी या झेंड्याभोवती गोळा व्हावयास हवे होते; पण ते घडताना दिसत नाही. मुसलमान काय किंवा ख्रिश्चन काय, त्यांना या देशापेक्षा आपला धर्मच अधिक महत्त्वाचा वाटतो; आणि त्या धर्मातील बारीक-सारीक गोष्टींचे रक्षण करण्याची भरमसाठ आश्वासने देणाऱ्या राजकीय पक्षांच्या बाजूनेच ते सामान्यतः उभे असलेले दिसतात. या देशात ऐंशी टक्के इतक्या प्रचंड बहुसंख्येने असणाऱ्या हिंदूंना आपल्या अस्तित्वाला व भवितव्याला धोका असल्याची भीती वाटावी, हीच खरी शोकांतिका आहे. त्यातल्या त्यात आशादायक गोष्ट एवढीच की, या देशातील मूठभर का होईनात, मुसलमान व ख्रिश्चन स्वातंत्र्या-पूर्वीही राष्ट्रवादी शक्तींच्या बरोबर राहिले होते; आणि आज अशा लोकांची संख्या हळूहळू वाढत आहे.

तसे पाहिल्यास हिंदू हा शब्द मला व्यक्तिशः फारसा प्रिय नाही. संकुचित-पणाच्या कुंपणात बंद केलेला तो शब्द असावा, अशी काहीशी माझी भावना–बहुधा गेल्या चाळीस-पन्नास वर्षांच्या संस्कारांमुळे–झाली आहे. त्याऐवजी तोच अर्थ ध्वनित करणारा 'भारतीय' हा शब्द मला अधिक व्यापक, अधिक समावेशक व अधिक सार्थ वाटतो. ज्या हिंदुत्ववादी मंडळींनी 'भारतीय जनता पक्ष', 'भारतीय जनसंघ', 'भारतीय मजदूर संघ', 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषद', 'सहकार भारती', ('भारतीय सहकारी संस्था') यांसारखी अभिधाने पसंत केली, त्यांचीही भूमिका अशीच असावी, असा माझा समज आहे. अर्थात हिंदू या शब्दाला माझा

विरोधही नाही. ज्या देशात हिंदूंची संख्या जवळजवळ ऐंशी टक्के आहे, तेथील लोकांनी स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यात मला तरी काही आक्षेपार्ह वाटत नाही. काही ऐतिहासिक कारणांमुळे त्यांना तसे म्हणवून घेण्यात संकोच वाटत असेल तर, त्यांच्या मनातून तो संकोच दूर करण्यात आला पाहिजे. शिवाय भारताशी जो सर्वांशींनी एकरूप झाला आहे तो हिंदू, अशी व्याख्या जी मंडळी करतात त्यांच्या हिंदुत्वाला विरोध करण्याचे वस्तुतः काही प्रयोजन उरत नाही; आणि मग त्यांच्या दृष्टीने हिंदुत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व हे समीकरणही आक्षेपार्ह ठरत नाही. प्रचंड बहुसंख्येने असलेल्या हिंदूंना आपले भवितव्य याच देशाशी निगडीत आहे, कारण आपल्याला या देशाबाहेर कोठेही स्थान नाही, असे वाटून त्यांनी स्वतःला या देशाच्या भवितव्याशी संबद्ध करून घेतले, ते भवितव्य उज्ज्वल व्हावे यासाठी साऱ्या हिंदूंच्या चारित्र्यनिर्मितीची जबाबदारी स्वतःच्या अंगावर घेतली आणि त्या दिशेने पावले टाकली तर ते योग्यच म्हणावे लागेल. जे लोक केवळ आपल्या धर्माची बांधिलकी स्वीकारून पाहुणे किंवा जेते म्हणून या देशात राहू इच्छितात ते नेहमीच येथे उपरे राहणार. छत्रपती शिवाजी महाराजांचा लढा या उपऱ्यांशीच होता. त्यांना ते मुसलमान न म्हणता 'तुरुक' म्हणत. या मातीशी इमान बाळगणाऱ्यांशी–मग त्यांचा धर्म कोणताही असो – त्यांचे कसलेच भांडण नव्हते. आज जे हिंदुत्वनिष्ठ राष्ट्रवादी भूमिका घेतात ते शिवाजी महाराजांची हीच परंपरा पुढे चालवीत आहेत, असे म्हणावे लागते.

भाजप, अभाविप, भामसं, वनवासी कल्याण, विवेकानंद स्मारक, विश्व हिंदू परिषद, सहकार भारती वगैरे संस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून पूर्णपणे स्वतंत्र असल्या तरी, त्यांच्यांत एक भ्रातृभाव आहे. संघ ही त्या सर्वांची मातृसंस्था, प्रेरणास्रोत आहे. हिंदुत्वाच्या, म्हणजेच भारतीयत्वाच्या भावनेचा एक सूक्ष्म परंतु बळकट धागा त्यांना एकत्र जोडतो व काही अंशी एकत्र बांधूनही ठेवतो, चारित्र्य-निर्मितीचे काम करतो, असा त्यांचा जो दावा आहे, तो चुकीचा किंवा खोटा आहे, असे समजण्याचे कारण मला तरी दिसत नाही. अखेर या चारित्र्याच्या बळावरच हा देश टिकणार आहे, तरणार आहे. म्हणून त्यांच्याविषयी भीती अथवा तिटकारा वाटणे हे अपराधभावनेचेच द्योतक आहे. न्या. छागलांनी भाजपला दिलेला आशीर्वाद व पाठिंबा याच भूमिकेतून दिला होता, असे मी मानतो.

राष्ट्रवादी हिंदुत्व आणि जातीयवादी हिंदुत्व

हिंदुत्वाचे दोन प्रकार आपण समजून घेतले पाहिजेत. एक आहे राष्ट्रवादी हिंदुत्व आणि दुसरे आहे जातीयवादी हिंदुत्व. राष्ट्रवादी हिंदुत्व हे वर उल्लेखिल्या-प्रमाणे सर्वधर्मसमभाव मान्य करते. टिळक, गांधी, विवेकानंद, सुभाषबाबू, लाला

लाजपतराय, पंडित मालवीय, राजर्षी टंडन, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी इत्यादींचा समावेश राष्ट्रवादी हिंदुत्वनिष्ठांमध्ये करता येतो. कारण, त्यांचे हिंदुत्व इतर धर्मीयांचा द्वेष करीत नव्हते. याच्या उलट इतर धर्मीयांविषयी भीती व द्वेष बाळगणारे लोक जातीयवादी हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करतात. केवळ हिंदूंचा विचार करणारी हिंदू महासभा व तिचे पुढारी या दुसऱ्या वर्गात मोडतात. त्यांची भूमिका संघकुलातील संघटनांहून मूलतःच भिन्न आहे. त्यामुळे 'केसरी'सारखी हिंदू महासभेची काही मुखपत्रे एकीकडे वीर सावरकरांचा गौरव व उदोउदो करीत असतानाच दुसरीकडे संघकुलाला आपला शत्रू मानून त्यावर तुटून पडतात, तेव्हा वरवर पाहणाऱ्याला त्यात विसंगती दिसते, आश्चर्य वाटते; परंतु खरोखरी यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. राष्ट्रवादी हिंदुत्व हे जातीयवादी हिंदुत्वाहून मूलतःच भिन्न व अधिक व्यापक आहे. तसे नसते तर रा. स्व. संघापासून भाजपपर्यंत साऱ्या संस्थांत बिगर हिंदूंना, अल्पस्वल्प प्रमाणात का होईना, जे स्थान मिळालेले दिसते ते दिसले नसते. स्वतःला पुरोगामी म्हणविणाऱ्या संस्था–संघटनांमध्ये बिगर हिंदूंचे जेवढे प्रतिनिधित्व असते त्याहून कमी प्रतिनिधित्व संघकुलातील संस्था–संघटनांमध्ये बिगर हिंदूंना मिळालेले आहे, असेही समजण्याचे कारण नाही. याचा अर्थच असा की, या मंडळींनी हिंदुत्वाची आपली व्याख्या जास्त व्यापक व समावेशक बनवून भारतमातेवर मनापासून प्रेम करणाऱ्या सर्व जातीजमातींच्या लोकांना आपली दारे खुली ठेवली आहेत. हितशत्रूंनी केलेल्या स्वार्थी अपप्रचारामुळे या संस्थांमध्ये प्रवेश करण्यास हिंद्वेतरांना संकोच वाटत असल्यास त्याचा दोष या संस्थांकडे नक्कीच जात नाही. (विश्व हिंदू परिषदेचे स्वरूपच धर्माधिष्ठित असल्याने तिच्यात बिगर हिंदूंची संख्या अत्यल्प असण्याची शक्यता आहे; परंतु त्या संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या कल्याणकार्यामध्ये धर्माच्या नावावर भेदभाव केला जात नसावा, अशी माझी समजूत आहे.) अर्थात् व्यक्तिशः माझा संबंध अभाविप व भाजप यांच्याशीच अधूनमधून येतो. या दोन्ही संस्थांमध्ये बिगर हिंदूंचे व हिंदूंमधील मागस जमातींचे प्रमाण पुष्कळच असल्याचे मला आढळून आले आहे. भारताची एकात्मता व राष्ट्रीयत्व यांना त्यांच्याकडून चांगला हातभार लागतो, असे मी निःशंकपणे म्हणू शकतो.

समाजवादाप्रमाणे धर्मनिरपेक्षता हेही आजचे चलनी नाणे आहे. स्वतःला पुरोगामी म्हणविणारे पक्ष व लोक धर्मनिरपेक्षतेचा अर्थ निधार्मिकता किंवा धर्महीनता असा करतात. गांधीजींच्या दृष्टीने त्याचा अर्थ 'सर्वधर्मसमभाव' असा होता. संघकुलातील संघटनांनी गांधीजींचा हाच अर्थ स्वीकारला आहे. त्यामुळे ही मंडळी गांधीमार्गाला अधिक जवळची ठरतात. याच्या उलट निधर्मवादी लोक गांधीजींचे नाव घ्यायलाच लाजतात; आणि त्यांच्याऐवजी ते फुले–आंबेडकर–

शाहूमहाराजांना आदर्श मानतात. बहुजनसमाजाला व हरिजनांना आकर्षित व प्रभावित करण्याचे एक साधन या दृष्टीने त्यांची ही क्लृप्ती यशस्वीही ठरत असेल, परंतु तात्त्विक दृष्टचा ती बनवाबनवीच ठरते. माझ्यासारख्या गांधीमार्ग प्रमाण मानणाऱ्यांना सर्वधर्म-समन्वयवादी राष्ट्रभक्त अधिक जवळचे वाटले आणि त्यांना अस्पृश्य समजणारे तथाकथित पुरोगामी लोक ढोंगी वाटले तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

राष्ट्रवादाची बदनामी

राजकारणामध्ये या राष्ट्रवाद्यांना जातीयवादी असे संबोधून त्यांना बदनाम करण्याचा पद्धतशीर प्रयत्न गेली अनेक वर्षे चालू आहे. संघकुलातील ज्या संस्था–संघटना सामाजिक–सांस्कृतिक कार्यास वाहिलेल्या आहेत त्यांच्यावर राजकीयतेचा शिक्का मारण्यासही हे महाभाग मागेपुढे पाहत नाहीत. कोठेही कसलीही दंगल झाली, किंबहुना असंतोष उसळला तर त्याचे खापर संघ–जनसंघावर (इंदिराजी आजही भाजपला जनसंघ म्हणूनच संबोधतात) फोडून मोकळे होण्याची प्रथा या देशात पडली आहे. एवढेच नव्हे तर, ज्या कुणाला बदनाम करायचे असेल त्याचा संबंध संघ–जनसंघाशी जोडून द्यावयाचा हे एक नवेच तंत्र येथे रूढ करण्यात आले आहे. जनता पक्षाच्या स्थापनेनंतर या कुटिलतेला काही काळ आळा बसला; परंतु 'मूळ स्वभाव जाईना, त्याचा येळकोट राहीना' या तुकोबांच्या उक्तीप्रमाणे राष्ट्रवादाची 'ॲलर्जी' असणाऱ्या शक्तींनी पुन्हा उचल खाल्ली; आणि राष्ट्रवाद्यांना खड्यासारखे अलग करून त्यांनी स्वतःच्या पायावरच धोंडा मारून घेतला असे नव्हे तर, या देशावर पुन्हा एकदा हुकूमशाहीचे सावट लादण्यास हातभार लावला. चरणसिंग, राजनारायण, मधू लिमये, फर्नांडिस यांच्यासारख्या अहंकार-मार्तंड मूर्खशिरोमणींचे मला आश्चर्य वाटत नाही. कारण, त्यांची सारी कारकीर्द उडनापणात व फोडाफोडी (फेडाफेडी ?) किंवा लावालावी करण्यातच गेली आहे. राजसत्तेचा वापर लोकसेवेसाठी करण्याची, सनदशीर मार्गाने जाण्याची त्यांची वृत्तीच नाही. आपली विरोधकाची भूमिका सोडणे त्यांच्या जिवावर आले; आणि ते मोठ्या खुशीने विरोधात जाऊन बसले. परंतु एस्. एम्., गोरे, दंडवते यांसारख्या समजदार समाजवाद्यांनाही आपल्या आत्मघातकी कृतीतील धोका कळला नाही, याचे मला दुःख झाले. त्याहूनही अधिक आश्चर्य डाव्या समाजवाद्यांच्या (सीपीएम्च्या) निर्बुद्धतेचे वाटले. वस्तुतः ही तशी शहाणीसुरती, व्यवहारी मंडळी आहेत. जनता पक्ष कसा का असेना, तो निदान आपल्या केरळ, पश्चिम बंगाल व त्रिपुरा राज्यांतील राजवटींना धक्का लावणार नाही, हे त्यांना पक्के माहीत होते. पण मग इंदिराजी पुन्हा सत्तेवर आल्यास आपल्या राजवटी तर कोसळतीलच,

त्याबरोबर आपलीही नाकेबंदी व नसबंदी होऊन जाईल, एवढी ढोबळ गोष्ट त्यांना कशी समजली नाही ? राष्ट्रवाद्यांवर जातीयवादाचा आरोप करून त्यांनी जनता पक्षाचा पाठिंबा काढून घेतला; परंतु या तथाकथित जातीयवाद्यांपेक्षा इंदिराजींची क्रूर हुकूमशाही अधिक भयंकर असते, याचा अनुभव आला असताही त्यांना तशी दुर्बुद्धी कशी झाली ? आपल्या राजवटी सांभाळताना हल्ली त्यांची जी त्रेधातिरपीट उडत आहे ती पाहिली की, त्यांच्या राजकीय मठ्ठपणाची कीव येते. आपल्या या राजवटी टिकाव्यात म्हणून असममधील अन्वरा तैमूर यांच्या अल्पसंख्य, दलबदलू व असंवैधानिक मंत्रिमंडळाला परोक्ष–अपरोक्षपणे पाठिंबा देणे त्यांना भाग पडत आहे. अर्थात यावर कोणी असे म्हणेल की, साम्यवाद्यांचा राष्ट्रवादाशी दूरान्वयानेही कधी संबंध आला नसल्याने व त्यांना या देशाच्या भवितव्याची मुळीच तमा वाटत नसल्याने असममधील राष्ट्रद्रोही शक्तींना पाठिंबा देण्यास त्यांना मुळीच दिक्कत वाटत नसेल, उलट राष्ट्रवाद्यांनाच ते अस्पृश्यांसारखे दूर ठेवीत असतील तर, त्यात नवल ते काय ? ही गोष्ट खरी आहे. परंतु समाजवाद्यांप्रमाणे साम्यवाद्यांनाही स्वतःचा स्वार्थही कळू नये, याचे आश्चर्य वाटते.

आदेश : नागपूरहून नको, मॉस्कोहून चालेल !

ही झाली विरोधी पक्षांची गोष्ट. सत्ताधारी पक्षाला तर राष्ट्रवाद हा आपला पहिल्या क्रमाकांचा शत्रूच सदैव वाटत आला आहे. यामुळे ज्या राष्ट्रद्रोही ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कारवायांमुळे पूर्वोत्तर भारत देशापासून फुटून निघण्याचा धोका निर्माण झाला आहे, त्यांना जाहीरपणे शाबासकी देण्यात आणि हरिजनांच्या धर्मांतराला अपरोक्षपणे पाठिंबा व्यक्त करण्यात इंदिराजींचे उजवे हात समजले जाणारे केंद्रीय गृहराज्यमंत्री मकवाणा यांना मुळीच दिक्कत वाटत नाही, अथवा त्याबद्दल त्यांना कोणी जाबही विचारीत नाही.

जनतामधील पूर्वाश्रमीच्या जनसंघाची मंडळी नागपूरहून आदेश घेतात, असा आमच्या स्वतःला पुरोगामी समजणाऱ्या मित्रांचा त्यांच्यावर आरोप होता. तो खरा की खोटा, याची शहानिशा कोणी केलीच नाही. मला स्वतःला त्या आरोपात काहीच तथ्य वाटत नाही; परंतु माझा आक्षेप दुसऱ्याच एका गोष्टीला आहे. नागपूरहून आदेश घेणे ज्यांना आक्षेपार्ह वाटते, त्यांना मॉस्को व पेकिंगहून आदेश घेणे मात्र मुळीच खुपत नाही ! येथे पुन्हा राष्ट्रवादाचा प्रश्न येतो. नागपूरहून आदेश देणारे अखेर देशभक्तच आहेत. त्यांची निष्ठा या देशाबाहेर कोठही गुंतलेली नाही; परंतु आमच्या पुरोगामी मित्रांच्या दृष्टीने राष्ट्रवाद हेच मुळी पाप ठरले आहे, यामुळे परदेशांकडून आदेश घेणारे राष्ट्रद्रोही लोक त्यांना या राष्ट्रवाद्यांपेक्षा अधिक जवळचे वाटतात.

मित्रांचाच विरोध

इंदिरा काँग्रेस व डावी आघाडी यांच्याखेरीज स्वतःला राष्ट्रवादी म्हणविणारी बलराज मधोकांसारखी काही मंडळीही भाजपच्या नव्या भूमिकेला विरोध करताना आढळतात. भाजपने जनसंघाची जुनी कट्टर, संकुचित, जातीयवादी भूमिका सोडून देऊन अधिक उदार भूमिका घेतली, याचा त्यांना राग आहे. कालप्रवाह कोणत्या दिशेने वाहत आहे याची त्यांना कल्पना नाही. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहत राहण्यातच त्यांना भूषण वाटते– मग त्यातून काही साध्य होवो अथवा न होवो, त्यांना त्याची पर्वा नाही ! त्यांच्या विचारप्रणालीचा पराभव त्यांच्या या कालविसंगत वर्तनानेच झाला, हेही त्यांना कळत नाही. अर्थात् या लोकांचा विचार करण्याची फारशी जरुरी नाही. बोटे मोडत बसणाऱ्या म्हातारीपेक्षा त्यांच्या या विरोधाला अधिक महत्त्व देण्याचे कारण नाही.

अविवेकः परमापदांपदम्

राष्ट्रवादी व राष्ट्रद्रोही शक्तींमध्ये आपण विवेक केला पाहिजे, एवढी साधी गोष्ट जनता, अरस काँग्रेस, लोकदल वगैरे लोकशाहीवादी पक्षांना व त्यांच्या समाजवादी साथींना समजली नाही. 'सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदांपदम्' या संस्कृत सुभाषिताचा त्यांना विसर पडला; आणि त्यांनी देशभक्त, राष्ट्रवादी भाजपला बहिष्कृत ठरवून साम्यवादी पक्षांसारख्या राष्ट्रद्रोही शक्तींच्या गळ्यात गळा घातला. या शक्तींकडून याचा गैरफायदा घेतला जाऊन जेव्हा या मित्रांचा गळाच दाबला जाईल, तेव्हा त्यांचे डोळे उघडतील; पण त्यावेळी इतका उशीर झालेला असेल की, डोळे तसेच उघडलेले राहतील– निष्प्राण कलेवराच्या डोळ्यांसारखे ! या मंडळींनी जनआंदोलनासाठी उघडलेल्या आघाडीतून भाजपला अस्पृश्यांसारखे वगळण्यात आले आहे. विरोधकांमधील ही फाटाफूट इंदिराजींच्या पथ्यावरच पडणार आहे. (बहुधा यामुळेच जयप्रकाश नारायण स्मारक-समितीतही त्यांनी भाजपला सोयिस्करपणे वगळले आहे ! हुकूमशाहीच्या पुरस्कर्त्यांनी लोकनायकांचे स्मारक उभारावयाचे आणि त्या कामी राष्ट्रवाद्यांना डावलावयाचे हा तसा इरसाल विनोदच असला तरी, स्वतःला लोकशाहीवादी म्हणविणाऱ्यांनी हुकूमशाहीवाद्यांशी संगनमत करणे हे धोक्याचेही ठरू शकेल.) इंदिरा काँग्रेसनंतर भाजप हाच या देशातील सर्वदूर पसरलेला सुसंघटित व शिस्तबद्ध पक्ष असल्याने इंदिराजींना त्याचीच खरी भीती वाटते. (मधुजींना वाटते, इंदिराजी लोकदलाला घाबरतात ! हा आणखी एक विनोद !) त्यांची ही भीती दूर करण्यासाठीच जणू डाव्यांची आघाडी भाजपला अस्पृश्यांप्रमाणे दूर ठेवीत आहे. म्हणजे, जो अविवेक जनता पक्ष

फोडण्यात व त्या पक्षाचे सरकार सत्तेवरून खाली ओढण्यात त्यांनी दाखविला होता तोच त्यांनी पुढे चालविला आहे. ज्यांनी आपल्याला सत्ताभ्रष्ट केले, त्यांच्याच गळ्यात गळा घालण्याचा जनतावाल्यांचा हा उपक्रम खरोखरीच 'ग्रेट' म्हटला पाहिजे. (भ्रष्टाचाराला आपल्याहून सवाई भ्रष्टाचाराची किंवा पाप्याला अधिक मोठ्या पाप्याची भीती वाटत नसते, तर भ्रष्टाचाराला सदाचाराची व पापाला पुण्याची भीती वाटते, हे लक्षात घेतल्यास इंदिराजींना डाव्या आघाडीऐवजी भाजपची भीती जास्त का वाटते याचा उलगडा होऊ शकेल.)

भारतीयीकरण : राष्ट्रवादाचा आधार

अधिक खोलात जाऊन विचार केल्यास असे आढळून येईल की, हिंदुत्ववाद हा काही तात्कालिक अथवा निकडीचा विषय नव्हे. तो तात्त्विक चर्चेचा विषय आहे. ही चर्चा गेली पन्नास वर्षे चालत आली आहे. हुकूमशाही, महागाई, बेकारी, जातीय दंगली, सामाजिक विषमता (दलितांवरील अत्याचार) हे खरे तात्कालिक व निकडीचे प्रश्न आहेत. त्यांच्या बाबतीत भाजपची किंवा हिंदुत्ववादी संघटनांची इतर विरोधी पक्षांच्या मतांहून काही वेगळी मते आहेत काय? मग त्यांना आघाडीतून वगळण्यात कोणते तत्त्व आहे? भाजपसंबंधी जे गैरसमज आजवर पसरविण्यात आले आहेत, त्यामुळे त्या पक्षाशी सहकार्य केल्यास अल्पसंख्य व हरिजन गिरिजन यांची मते आपल्याला गमवावी लागतील, हीच भीती याच्या मुळाशी आहे.

राजकीय पक्षांच्या या बहिष्काराचा भाजपवरही कळत-नकळत परिणाम झाला असावा, असे दिसते. उदाहरणार्थ, ज्या भारतीयीकरणाचा जोरदार पुरस्कार जनसंघवाले करीत होते, त्याचा उच्चारही करण्याचे आता भाजपवाले टाळतात. खरे म्हणजे या देशातील सर्वच जाती-जमातींचे भारतीयीकरण होणे अत्यावश्यक आहे. कारण, तोच तर भारतीय राष्ट्रीयत्वाचा आधार आहे. हिंद्वेतरांचेच नव्हे तर हिंदूंचेही भारतीयीकरण आज ना उद्या आपल्याला करावेच लागेल. कारण, त्याच्या अभावी भारत व भारतीय या शब्दांना काही अर्थच उरणार नाही. हे भारतीयीकरण म्हणजे काय, त्याचे निश्चित स्वरूप काय, आणि ते कसे घडवून आणावयाचे याचा सर्वच देशप्रेमी मंडळींनी विचार केला पाहिजे. त्याकामी गांधी, टिळक, विवेकानंद, टागोर, इकबाल यांसारख्या विविध क्षेत्रांतील प्रज्ञावंतांच्या चिंतनाचा नक्कीच उपयोग होऊ शकेल.

अर्थात हे घडून येईपर्यंत तात्कालिक समस्यांकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. या समस्या गांधीवादी समाजवादाच्या मार्गाने सोडविता येतील, असे भाजपने म्हणताच गांधीवादाच्या ठेकेदारांचे पित्त खवळले; आणि गांधीजींचा द्वेष करणा-

त्यांना गांधीवादाचे नाव घेण्याचा अधिकारच काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जणू आपल्या अनुभवांच्या आधारावर आपले मत व आपला मार्ग बदलण्याचा अधिकारच ते इतरांना देऊ इच्छित नाहीत. याच्या उलट गांधी व गांधीवादी यांचा द्वेष व कुचाळकी करण्यात ज्यांची सारी हयात गेली, त्यांनीही भाजपची हुर्यो उडवायला सुरुवात केली. गांधीमार्गावर निष्ठा असणाऱ्या माझ्यासारख्या ज्या मंडळींनी भाजपच्या या निर्णयाचे स्वागत केले, त्यांनाही हास्यास्पद ठरविण्याचे प्रयत्न झाले. भाजपच्या या निर्णयाला विरोध करणाऱ्या या परस्परविरोधी गोटांचे एका बाबतीत एकमत दिसते. ती अशी की, भाजपने हा निर्णय मनापासून घेतलेला नसून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याची ती एक 'चाल' आहे, याविषयी त्यांना मुळीच शंका वाटत नाही. ज्यांनी गेली चौतीस वर्षे गांधींच्या नावावर लोकांना बनविण्याखेरीज दुसरे काहीच केले नाही आणि गांधीद्वेष हाच ज्यांच्या राजकारणाचा एकमेव आधार राहिला आहे, त्यांच्या कावीळग्रस्त डोळ्यांना भाजपचा गांधीवादी समाजवादाचा स्वीकार करण्याचा निर्णय ही एक 'प्रचंड फसवणूक' वाटली असल्यास नवल नाही. गांधीजींची विश्वस्त कल्पना, वर्गसमन्वय, साधेपणा, हरिजन-गिरिजन सेवा या सर्वांचे मूळ भारतीय संस्कृतीत सापडू शकते. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवतावादाची मुळेही तेथेच जाऊन पोहोचतात. अशा स्थितीत भाजपने गांधीमार्गाचा स्वीकार मनापासून केला नसेलच असे मानण्याचे काय कारण ? समाजवादाचा स्वीकार तर जनता पक्षात सामील झालेल्या जनसंघाने पूर्वीच केला होता. त्यामुळे गांधीमार्गी समाजवादाचा स्वीकार करून भाजपने एखादे अनौरस पोर दत्तक घेतले, असे समजणे अगदीच बालिशपणाचे होय. आपल्या व देशाच्या इतिहासाचे डोळस अध्ययन करणाऱ्यांना गांधीमार्ग व समाजवाद या दोन्ही संकल्पना जनतेच्या हृदयांना स्पर्श करणाऱ्या जादूच्या कांड्या आहेत, असा साक्षात्कार झाला असेल व त्याप्रमाणे त्यांनी त्या मार्गाने जाण्याचे ठरविले असेल, तर त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय घेत बसण्याऐवजी त्यांच्या वाटचालीस यथा-शक्ती हातभार लावण्याचे माझ्यासारख्यांनी ठरविले तर, त्यात काय चूक आहे ? खरी गोष्ट अशी आहे की, ज्यांनी लोककल्याणाच्या तळमळीतून हिंदुत्ववादाची कास धरली होती, त्यांची दृष्टी प्रत्यक्ष अनुभवांनी खूपच विशाल व व्यापक बनली असल्याचे दिसून येते. चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी संघातील लोक ज्या पद्धतीने विचार करीत होते, तिची मला स्वानुभवाने माहिती आहे. त्या पद्धतीत आज पुष्कळच बदल घडून आला आहे. प्रत्यक्ष कृतीच्या ओढीमुळे माझ्यासारख्यांना त्यावेळी संघ सोडावा लागला होता. आज ती स्थिती उरलेली नाही. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात तुम्हाला कार्य करावयाचे असेल, तर त्यासाठी संघप्रणीत 'मंच' तयार आहे. हीच ती व्यापकता. ही व्यापक बनण्याची प्रक्रिया येथेच थांबेल असे समजण्याचे

कारण नाही. परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार अधिकाधिक क्षेत्रे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न संघकुलाकडून होत राहीलच. अशा स्थितीत राष्ट्रवादी किंवा हिंदुत्ववादी विचारधारेच्या उगमाजवळचे छोटे रूप मनात ठेवून तिला प्रतिगामी ठरविणे आणि त्या आधारे राष्ट्रवाद्यांना अस्पृश्यांसारखे दूर ठेवणे मूर्खपणाचे ठरेल. याच्या उलट स्वतःला पुरोगामी समजणारी मंडळी या धारेत सामील होतील तर भारतीयीकरणाची प्रक्रिया अपेक्षेपेक्षाही लवकर यशस्वी झाल्याचे आपल्याला आढळून येईल. कुणी सांगावे, कालांतराने अशी परिस्थिती निर्माण होईल की, आज स्वतःला सोवळी व पुरोगामी समजणारी मंडळीच अस्पृश्य व प्रतिगामी समजली जाऊ लागतील !

+ +

'तरुण भारत' : ७·६·८१

२१. हे सॅडिस्ट समाजवादी सत्यशोधक !

महाराष्ट्र हा सत्यशोधकांचा देश आहे, असे आम्ही म्हटले तर कुणाला आश्चर्य वाटणार नाही. उलट आपल्या मनातली गोष्ट ओळखली गेल्यामुळे सर्वांना गुदगुल्याच होतील. त्यात खुषीची बेहोशीही असेल आणि अहंकाराचा दर्पही असेल. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीचा महाराष्ट्र कसा होता, याची आम्हांला नीटशी कल्पना नाही; परंतु ज्याअर्थी परप्रांतांतून आलेल्या महानुभावी चक्रधरांमध्येही या सत्यशोधकत्वाचे आकर्षण निर्माण झाले त्याअर्थी इथल्या मातीचाच तो गुण असला पाहिजे, असे समजण्यास हरकत नसावी ! अर्थात विद्वज्जनांची हरकत असेलही; परंतु आमच्यासारख्या अविद्वानांची हरकत असण्याचे कारण नाही. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास वगैरे संतांनी स्वतःला 'सत्यशोधक' हे नामाभिधान लावून घेतले नसले तरी, त्यांच्या परींनी त्यांनी सत्यशोधनच केले होते. आजकाल तुम्हाआम्हाला त्या टाळकुट्यांचे वारसदार म्हणवून घेण्यास लाज वाटते; परंतु त्यांच्या काळात आपण असतो तर, आपण आज इंदिरा गांधीचा ज्या भक्तिभावाने जयजयकार करतो, त्याच भक्तिभावाने त्या संतांचाही 'झिंदाबाद' नक्कीच केला असता.

एकोणिसाव्या शतकातील सत्यशोधक

मध्यंतरीच्या काळात सत्यशोधकांची ही परंपरा खंडित झाली; परंतु ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या कृपाप्रसादाने एकोणिसाव्या शतकात ती पुनः सुरू झाली. महात्मा ज्योतिबा फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली; आणि तेव्हापासून 'सत्यशोधक' या शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला. हिंदू समाजातील सडलेला

भाग जो कोणी उघडा करून दाखवील आणि त्या समाजावर जो कोणी निर्ममपणे हल्ले करील, त्याला झोडपून काढील तो खरा-खुरा सत्यशोधक असा अर्थ रूढ झाला.

योगायोगाची गोष्ट अशी की, ब्राह्मण जातीत जन्मलेल्या व्यक्तीला स्वत:साठी तो शब्द वापरण्याची जणू मनाई करण्यात आली होती. त्यामुळे न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, आगरकर, कर्वे वगैरेंना केवळ 'सुधारक' या शब्दावर समाधान मानावे लागले. सत्यशोधन करूनही त्यांना कुणी सत्यशोधक हा किताब बहाल केला नाही. माटे, सावरकर, साने गुरुजी, सेनापती बापट, अप्पासाहेब पटवर्धन वगैरे विसाव्या शतकातील सत्यशोधकांनाही त्या बिरुदापासून वंचित ठेवण्यात आले. किंबहुना त्यांच्या कामगिरीचा लोकांना विसर पडावा अशी खटपट करणे, हेच सत्यशोधकांचे कर्तव्य बनले.

समाजवादी सत्यशोधक

स्वातंत्र्योत्तर काळात सत्यशोधकांची एक नवीन पिढी पुढे आली. ती आहे समाजवादी सत्यशोधकांची. सर्व डॉक्टर बाबा आढाव, अनिल अवचट, अरुण लिमये वगैरे मंडळींची यामध्ये प्रामुख्याने गणना करावी लागेल. हिंदू समाजावर व हिंदू धर्मावर प्रखर हल्ले करून त्यांनी आपले सत्यशोधकत्व प्रस्थापित करण्याचा चंग बांधला. (हमीद दलवाई प्रभृती मुस्लिम समाजवाद्यांनी त्यांचेच अनुकरण करून मुस्लिम समाज आणि इस्लामवर हल्ले चढवून सत्यशोधक बनवण्याचा प्रयत्न केला. परंतु इस्लाम व मुस्लिम समाज हिंदूंप्रमाणे सहिष्णू ऊर्फ शेळपट नसल्यामुळे त्यांना तोंडघशी पडावे लागले, परंतु तो वेगळा विषय आहे. प्रस्तुत चर्चेच्या संदर्भात त्याचा विचार करण्याची जरूर नाही.)

उर्दूत एक म्हण आहे, 'लहू लगाकर शहीदोंमें शामिल होना', (म्हणजे अंगाला रक्त फासून हुतात्म्यांमध्ये सामील होणे) त्याप्रमाणे हिंदू समाजाप्रमाणेच, किंबहुना काकणभर अधिक, ब्राह्मण समाजावर टीकेचे व टवाळीचे आसूड चालवून काही ब्राह्मण समाजवाद्यांनी स्वत:ला सत्यशोधक म्हणवून घेण्याचा प्रयत्न चालविला आहे; परंतु या बाबतीत त्यांना विशेष यश येण्याची फारशी शक्यता दिसत नाही. ते खऱ्याखुऱ्या सत्यशोधकांच्या पंक्तीतून बहिष्कृतच राहतील. कॉम्रेड शरद पाटील या साम्यवादी विचारवंताला अखेर या निर्णयावर यावे लागले की, खरा साम्यवाद या देशात यावयाचा असेल तर तो आणू पाहणाऱ्या पक्षात ब्राह्मणाला स्थान असता कामा नये. डांगे, नंबुद्रीपाद वगैरे सारे साम्यवादी पुढारी ब्राह्मण असल्यामुळेच या देशातील साम्यवादी चळवळ यशस्वी होत नाही; म्हणून त्यांनी आपला स्वत:चा नवा सत्यशोधकी साम्यवादी पक्षदेखील स्थापन करून टाकला आहे. यावरून

ब्राह्मण समाजवाद्यांनी काय तो बोध घ्यावा !

सॅडिस्ट की मॅसोचिस्ट ?

ज्यावेळी दुसऱ्या व्यक्तीवर, समाजावर किंवा संकल्पनेवर निर्मम हल्ला चढविण्यात एखाद्या व्यक्तीला क्रूरपणाचा आनंद मिळतो, त्यावेळी ती पीडित व्यक्ती, समाज अथवा संकल्पना परकीय असेल तर, त्या क्रूरपणाला एक वेगळे परिमाण असते. असा क्रोध दाखविणाऱ्या व्यक्तीला अमानुष, जंगली, हैवान वगैरे विशेषणे लावता येतात. विभिन्न व्यक्ती, समाज, धर्म, देश, संकल्पना यांच्यातील संघर्षांमध्ये अशा प्रकारचे जंगली क्रौर्य जगाने अनेक वेळा पाहिले, अनुभवले आहे. शैव–वैष्णव, हिंदू–मुसलमान सवर्ण–हरिजन, मुस्लिम–ख्रिश्चन, साम्यवाद–पुंजीवाद, साम्राज्यवाद–स्वातंत्र्यवाद वगैरे अनेक रूपांतून हे संघर्ष जगासमोर येत राहिले आहेत; परंतु स्वतःचा समाज, स्वतःचा देश, स्वतःचा धर्म, स्वतःची जात यांनाच शत्रू मानून किंवा तुच्छ लेखून आत्मनिषेध, आत्मनिंदा, आत्मानादर आत्मावहेलना व आत्मावमूल्यन करण्यात आनंद मानणारे लोकही या देशात जुन्या काळापासून राहत आले असावेत. इस्लाम व ख्रिस्ती धर्म आणि ब्रिटिश राजवट यांच्या आघातांनी पराभूत झाल्यामुळे ज्यांच्यामध्ये आत्महीनता निर्माण झाली, अशा लोकांची संख्या वाढत राहिल्यामुळे त्यांची जणू एक मोठी जमातच बनली.

पारतंत्र्याच्या प्रारंभिक दिवसांत अशी मनःस्थिती निर्माण होणे काही अंशी व काही मर्यादेपर्यंत स्वाभाविक समजले जाऊ शकते. आपल्या समाजातील दोषांमुळे आपला पराभव झाला, म्हणून आपला समाज दोषांनी भरलेला आहे, असे समजून त्याचा तेजोभंग, धिःकार, अपमानच नव्हे तर, त्याचा त्याग करण्यापर्यंतही त्या काळी ज्यांची मजल गेली त्यांच्या त्या कृतीतील अपरिपक्वता क्षम्य समजता येईल. त्यामुळे अव्वल इंग्रजीत ज्यांनी हिंदू धर्माला व समाजाला शिव्याशाप दिले त्यांना आपण क्षमा करू शकतो. (अर्थात आपली जात, समाज, देश, धर्म यांवर हल्ले चढविण्याचे स्वातंत्र्य फक्त हिंदू समाजातच उपलब्ध होऊ शकत असल्यामुळे हे सारे विवेचन हिंदूंना व त्यातही प्रतिकार–अक्षम ब्राह्मण जमातीलाच लागू पडते हे उघड आहे !) परंतु स्वातंत्र्योत्तर काळातही ती परिस्थिती तशीच चालू राहावी, किंबहुना ती अधिकच खराब व्हावी, ही चिंतेची बाब म्हटली पाहिजे.

पारतंत्र्याच्या काळात अशा हल्ल्यांना निधडेपणाने तोंड देऊन प्रतिहल्ले करणारे चिपळूणकर–टिळक तरी विद्यमान होते; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात सारा समाजच जणू अपराधभावनेने पीडित एक मनोरुग्ण बनून गेल्यासारखा दिसत आहे. त्यामुळे आत्मपीडनात रममाण झालेल्या या खऱ्याखुऱ्या मनोरुग्णांना चेव आला आहे. इंग्रजीत ज्याला सॅडिस्ट किंवा मॅसोचिस्ट म्हणतात अशा पीडनानंद

मनोरुग्णांमध्ये खरोखरी या सत्यशोधकांचा समावेश केला पाहिजे. याचे कारण असे की, आपल्या समाजाविषयी या मंडळींना खरोखरीच तिटकारा वाटत असता तर, त्यांनी धर्मांतर करून ख्रिस्ती किंवा इस्लामी समाजात प्रवेश करून आपला मनोरोग बरा करून घेतला असता; परंतु आत्महीनतेतून आत्मघाताकडे जाण्याची त्यांना अशी काही ओढ लागली आहे की, आपल्या समाजाचा पुरा नाश केल्याखेरीज त्यांना चैनच पडणार नाही. (सॅडिझम व मॅसोचिझम हे शब्द जरी सामान्यतः लैंगिक जीवनाच्या संदर्भातच वापरले जात असले तरी, आत्मपीडन व परपीडन यांच्या संदर्भातही त्यांचा वापर केला जातो, हे सुज्ञांस सांगणे नलगे !)

विवेकानंद–गांधी–आंबेडकरांचा मार्ग

आमचे समाजवादी सत्यशोधक विवेकानंद–गांधींचे नाव जाणीवपूर्वक टाळून डॉ. आंबेडकरांचा जयजयकार करीत असले तरी, त्यांचा मार्ग मात्र आंबेडकरांच्या मार्गाहून सर्वस्वी भिन्न आहे. मीनाक्षीपुरम्‌च्या धर्मांतरामुळे बाबासाहेबांना किती दुःख झाले असते, याची कल्पना केली तरी या प्रश्नाचे उत्तर मिळते. हिंदूसमाजावर इस्लामकडून झालेला हा हल्ला पाहून आमच्या या मित्रांना जणू हर्षाच्या उकळ्या फुटत असाव्यात, असा भास होतो. त्याने काय साधणार ?

ख्रिस्ती किंवा इस्लामी धर्मप्रचारकांच्या काव्यांना बळी पडून, जेव्हा हरिजन धर्मांतर करतात तेव्हा ख्रिस्ती किंवा इस्लामी नसलेले जे लोक खुशीने टाळ्या पिटतात त्यांच्या विकृत मनोवृत्तीची सहज कल्पना येऊ शकते. पहिल्या-दुसऱ्या महायुद्धात प्रारंभी जेव्हा जर्मनीकडून मित्रराष्ट्रांचे भराभर पराभव केले जात, तेव्हा आम्ही देशभक्त भारतीय मनातल्या मनात खुष होत असू. तो एक प्रकारचा नपुंसक आनंद असे. धर्मांतराचे स्वागत करणाऱ्यांचा आनंद असाच असला पाहिजे, हे उघड आहे.

ज्या हिंदू समाजाच्या उद्धारासाठी आपण कमरा कसल्या आहेत असा आव ही मंडळी आणतात, तो समाज त्यांच्या असल्या या हल्ल्यांनी प्रगतिपथावर चालू लागेल, की आपली अंगे आक्रसून घेणाऱ्या कासवाप्रमाणे अधिकच स्थितिशील व अकर्मण्य बनेल याचा विचार त्यांनी केला नाही तरी इतरांनी अवश्य केला पाहिजे. हिंदू समाजातील सामाजिक विषमता, अस्पृश्यता, जातिभेद आणि उच्चनीचता नष्ट झाली पाहिजे, आदिवासींना नागर जीवनात बरोबरीचे स्थान मिळाले पाहिजे, यांविषयी दुमत होण्याचे काहीच कारण नाही. पण हे कसे घडवून आणावयाचे हा खरा प्रश्न आहे. विभिन्न जाती-जमातींत वैमनस्य पसरवून ते कधीतरी साध्य होईल काय ? एकसंध समाज बनविण्याचे हे कार्य अत्यंत हळुवारपणे, मातेच्या मायेने करण्यात आले पाहिजे. जी मंडळी त्या मार्गाने जाऊन

हे कार्य करीत आहेत, त्यांना जातीयवादी, पुराणपंथी वगैरे विशेषणे लावून व त्यांच्यावर हल्ले करून त्यांच्या मार्गात काटे पसरविण्याने ते उद्दिष्ट गाठण्यात अडथळा मात्र निर्माण होईल. ज्या इंदिरा गांधी राजकीय हेतूने सामाजिक संघटनांच्या या कार्यास विरोध करीत आहेत, त्यांचे हात बळकट करण्याचे कामच आमचे समाजवादी सत्यशोधक करीत आहेत. कारण, त्यांना नसतीच मोडतोड करता येते. समाजाची बांधणी करण्यासाठी लागणारा धीर, सहिष्णुता, चिकाटी, जिद्द, निश्चय वगैरे गुणांचा त्यांच्यामध्ये सर्वथैव अभावच आहे. यावर उपाय एकच आहे. तो म्हणजे या सॅडिस्टांकडे दुर्लक्ष करून समाजबांधणीचे काम आपण स्थिर चित्ताने करीत राहणे. त्या उपायाचा अवलंब काही मंडळी करीत आहेत हीच समाधानाची गोष्ट आहे.

आपल्या स्वत:च्या अंगावर आसूड मारून घेऊन किंवा त्रिशूळ खुपसून त्यात आनंद मानणारे कडक लक्ष्मीवाले किंवा वैरागी हे मॅसोचिस्ट आणि बेवारशी कुत्र्याला दगड मारण्यात आनंद मानणारी कुटाळखोर पोरे ही सॅडिस्ट असतात असे मानले तर आमचे हे समाजवादी सत्यशोधक म्हणजे या दोन्ही प्रकारांचा निकृष्ट संमिश्र अर्क आहे, असे म्हणता येईल.

+ +

'सोबत' : ७·२·८२

२२. सुसंस्कृती ही नेहमीच साडेतीन टक्क्यांची असते आणि ती तशीच राहणार

अलीकडे स्वतःला पुरोगामी व जनतेचे प्रतिनिधी म्हणविणाऱ्या मंडळींनी संस्कृतीविरुद्धच बंड पुकारले आहे. त्यामध्य मुख्यतः आमचे दलित लेखक मित्र आणि त्यांची मर्जी सांभाळून दलितांमध्ये लोकप्रियता मिळविण्याची धडपड करणारे दलितेतर सत्यशोधक यांचा प्रामुख्याने समावेश होतो. त्यांचे म्हणणे असे की, आजवर साडेतीन टक्के लोकांनी आपली संस्कृती हीच संबंध समाजाची संस्कृती असल्याचा आभास निर्माण केला; आणि उरलेल्या साडे शहाण्णव टक्के लोकांना असंस्कृत ठरवून पददलित ठेवले. त्यांचा हा समज इतिहासाच्या अज्ञानातून निर्माण झाला आहे, हे उघड आहे. समाजातील काही वर्ग इतर वर्गांना योजनापूर्वक पद-दलित ठेवतात, या आधुनिक संकल्पनेतून ही समजूत दृढ झाली आहे. समाजातील सर्वांत उच्च समजल्या गेलेल्या ब्राह्मण वर्गावर संस्कृतीला कडी-कुलपात बंदिस्त ठेवल्याचा आरोप केला जातो. खरी गोष्ट अशी आहे की, भारताच्या संस्कृतीला अब्राह्मणांचा फार मोठा हातभार लागला आहे. वेद–उपनिषदांतील प्रतिभावान् ऋषी बहुसंख्येने अब्राह्मण होते. काही तर संकरज होते. खुद्द मनू हा क्षत्रिय होता. राम, कृष्ण; व्यास, वाल्मीकी यांपैकी कोणीच ब्राह्मण नव्हते, ही गोष्ट आम्ही लक्षात घेत नाही. त्यानंतरच्या काळात नामदेव, तुकाराम, चोखामेळा, सेना न्हावी, कबीर, मीराबाई वगैरे साधुसंत आणि या संस्कृतीच्या रक्षणासाठी जिवावर उदार होऊन लढलेले राणा प्रताप, शिवाजी महाराज, संभाजी राजे यांसारखे रणगाजी आणि आधुनिक काळात महात्मा फुले, शाहू छत्रपती, संभाजीराजे, सयाजीराव गायकवाड, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

या सर्वच अब्राह्मण महापुरुषांनी या संस्कृतीच्या विकासाला हातभार लावला आहे, हे लक्षात घेतल्यास आजच्या संस्कृतीला साडेतीन टक्क्यांची संस्कृती असे संबोधणे कसे अतिशयोक्तिपणाचे आहे, हे लक्षात येते. ब्राह्मणांविषयी कोणाला चीड किंवा द्वेष वाटत असल्यास त्यांनी तो अवश्य व्यक्त करावा. त्याची कारणे शोधून ती दूर करवी; परंतु संस्कृती ही ब्राह्मणांची मक्तेदारी आहे, असे समजून तिच्यावर हल्ला करणे अगदीच अडाणीपणाचे ठरेल. म्हणून संस्कृतीचे स्वरूप समजून घेतले पाहिजे.

व्यापक दृष्टिकोनातून पाहिल्यास साऱ्या जगाची एकच संस्कृती आहे आणि ती म्हणजे मानवी संस्कृती, असे आपल्याला दिसून येईल. माणुसकी हेच त्या संस्कृतीचे मूलभूत किंवा आधारभूत अंग असते. तरीपण प्रत्येक मानवसमाजाने स्वतः पुरता जो संस्कृतीचा विकास घडवून आणलेला असतो, त्यामुळे वेगवेगळ्या समाजाच्या संस्कृतींमध्ये थोडाफार फरक पडलेला आपल्याला दिसतो. तरीपण त्या त्या समाजात विद्या, ज्ञान, वैराग्य, सेवा, त्याग, कला, साहित्य यांना ज्या कमी-अधिक प्रमाणात महत्त्व दिले जाते त्यावरून त्या संस्कृतीचे स्वरूप ठरत असते. इंग्लंड, अमेरिका, जपान यांसारख्या देशांनी उद्योगव्यापाराला विशेष महत्त्व दिले; तर फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, इटली या देशांनी कलेला प्राधान्य दिले. रशिया, चीन सारख्या साम्यवादी देशांनी समतेला सर्वोच्च स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला; परंतु तसे करताना आपल्या संस्कृतीची पाळेमुळे साहित्य, कलेच्या प्रांतांत किती खोलवर जाऊन पोहोचली आहेत, इकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. या समाजात त्या त्या काळी तात्कलिक परिस्थितीमुळे काही गोष्टींना विशेष महत्त्व प्राप्त झाले खरे; परंतु त्या गोष्टींत गुरफटून जाऊन त्यांनी आपल्या खऱ्याखुऱ्या सांस्कृतिक वारशाचा विसर पडू दिला नाही. युद्धकाळात शौर्याला आणि शस्त्रास्त्रांना महत्त्व प्राप्त होणे स्वाभाविक असते; परंतु त्यावेळी इंग्लंडच्या लोकांना शेक्सपियरचा, बायरनचा, शेलेचा आणि रशियन लोकांना टॉलस्टॉय, चेकॉव्ह, डोस्टोव्हॉस्की यांचा कधी विसर पडत नाही. आमचे आजचे समाजसुधारक मात्र व्यास, वाल्मीकी, कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर, शंकराचार्य या सर्वांना विस्मृतीच्या डोहात बुडवून सारा वारसाच नाकारण्याचा प्रयत्न करीत आहेत. तो इतका हास्यास्पद आहे की, त्याची दखलही घेण्याची गरज भासू नये. परंतु जेव्हा उथळपणालाच शौर्य व पुरोगामीपणा असे समजले जाते, तेव्हा ही गोष्टही लक्षात आणून द्यावी लागते.

या संदर्भात मला पाकिस्तान रेडिओवरून ऐकलेल्या एका चर्चेचे स्मरण होते. तेथे असा प्रश्न उपस्थित झाला होता की, पाकिस्तानची संस्कृती कोणती ? काही अतिउत्साही विद्वान म्हणू लागले की, पाकिस्तानची संस्कृती ही १९४७ नंतरच सुरू झाली. त्यांच्याकडील थोडे अधिक शहाणे सांगू लागले की, मुहमद बिन कासिम

जेव्हा सिंधवर चाल करून आला, तेव्हापासून, म्हणजे भारतात इस्लामचे राज्य सुरू झाले, तेव्हापासून पाकिस्तानी संस्कृतीचा उदय झाला. परंतु जे खरेखुरे विद्वान् होते (आणि त्यामध्ये झुलफिकार अली भुट्टो यांचाही समावेश होता.) त्यांचे म्हणणे असे की, ज्या प्रदेशात, ज्या भूमीवर आपण राहतो, त्या भूमीवर संस्कृतीचे फूल जेव्हा प्रथम उमलले, तेव्हापासून पाकिस्तानची संस्कृती सुरू झाली म्हणून मोहन जो दडो (मोहनजोदारो) ची संस्कृती हीही पाकिस्तानी संस्कृतीच समजली गेली पाहिजे. संस्कृतीची निर्मिती चार-दोन वर्षांत किंवा दोन-चार शतकात होत नसते. ती प्रक्रिया हजारो वर्षे चालू असते, ही गोष्ट ज्यांना समजते ते टक्क्यांच्या भाषेत संस्कृतीचा विचार करीत नसतात.

या संदर्भात आपण ही गोष्ट सतत लक्षात ठेवली पाहिजे की, संस्कृतीचा कोणत्याही जातीशी किंवा धर्माशी अविभाज्य संबंध नसतो. अमेरिकन संस्कृतीच्या विकासाला गोरे, काळे, पिवळे, ख्रिस्ती, ज्यू या सर्वांचाच हातभार लागला आहे. खलील जिब्रानच्या लेबॅननची संस्कृती मॅरॉनाइट ख्रिश्चन आणि सुन्नी मुसलमान यांच्या संयुक्त प्रयत्नांतून विकसित झाली आहे. भारतीय संस्कृतीलाही सर्व जाती जमातींनी हातभार लागला आहे. वैदिक–अवैदिक, जैन, बौद्ध, शीख, मुसलमान, ख्रिश्चन या सर्वांचाच तिच्या निर्मितीत सहभाग राहिला आहे. या अर्थाने विचार केल्यास ही संस्कृती अमुक इतक्या टक्क्यांची नसून सर्वच लोकांची आहे, असे म्हणावे लागते. साहित्य क्षेत्राचाच आढावा घेतला तर, इकबाल, गालिब, काजी नजरूल इस्लाम, रेव्हरंड टिळक, मायकेल मधुसूदन दत्त यांच्यासारख्या भिन्न धर्मीय कवींनी, गायकांनी, कलाकारांनी, तत्त्वज्ञानी या संस्कृतीला समृद्ध करण्याचे फार मोठे काम केले आहे. वस्तुतः आजचे दलित लेखकही या संस्कृतीला अधिक व्यापक, सर्वसमावेशक बनविण्याचेच काम करीत आहेत. ज्याप्रमाणे असंख्य मुस्लिम गायक-वादकांनी या भारतीय संस्कृतीत मोलाची भर घातली आहे, त्याप्रमाणे हिंदूंमधील विविध जाती जमातींनी किंवहुना आदीवासींनीही तिला संपन्न बनविले आहे. अशा स्थितीत एखाद्या जमातीने अथवा मूठभर लेखकांनी ती संस्कृती नाकारली, म्हणून काही तिचे महत्त्व कमी होत नाही; अथवा तिचे काही नुकसानही होत नाही. तिला नाकारणाऱ्यांचेच नुकसान होते; परंतु अनेकदा काही लोक इतरांच्या द्वेषाने इतके आंधळे व वेडे बनतात की, त्यांना स्वतःचे हित समजत नाही; अथवा आपल्या सामर्थ्याचा तोकडेपणाही त्यांच्या लक्षात येत नाही.

भारतीय संस्कृतीच्या संदर्भात हेही लक्षात ठेवले पाहिजे की, माणसाला माणूस म्हणून जगू न देणारी, इतरांना तुच्छ लेखणारी, त्यांचा विटाळ मानणारी, त्यांच्यावर अत्याचार करणारी संस्कृती ही भारतीय संस्कृती नसून ती एक विकृती आहे. जे लोक त्या विकृतीला संस्कृती मानतात त्यांना काहीच कळत

नाही. त्यांच्यावर राग धरून या संस्कृतीलाच शिव्या-शाप देणे आणि एकूण भारतीयत्वाला नाकारणे, भारतीय राष्ट्रध्वज, व राष्ट्रगीत यांचा अपमान करणे, म्हणजे आपल्या मार्गातील अडथळा बनणाऱ्या शिळेवर डोके आपटून घेणे आहे.

बहुजन समाजाच्या लोकसंस्कृतीचे गोडवे गाणारे लोक जनतेमधील निरक्षरता, अज्ञान, असभ्यपणा, गलिच्छता वगैरे गोष्टींचे गुणगान करीत नसतात; अथवा त्यांचे अनुकरणही करीत नसतात. आचारविचारांचेच अनुकरण – अगदी साम्यवादी देश जरी आपण घेतले, तरी तेथेही सुक्षिशित, सुसभ्य, प्रतिष्ठित, सुरुचिसंपन्न लोकांच्या आचार-विचारांचेच अनुकरण – सर्व जनता करीत असते. कारण, ते आचार-विचार म्हणजेच त्या देशाची संस्कृती असते. त्यांच्यासारखे आपण बनावे, अशीच साडे शहाण्णव टक्के लोकांची धडपड असते. याचे कारण उघड आहे, ते असे की, साहित्य, संगीत, कला, विज्ञान या सर्वांबरोबरच त्याग, सेवा यांसारख्या गुणांचा समावेश संस्कृतीत होतो. आता हे गुण असणारे लोक कोणत्याही समाजात मूठभरच असतात; परंतु बाकीचे सारे लोक त्या गुणांची कदर करतात, त्यांनी घालून दिलेले नियम पाळण्याची धडपड करतात. उदाहरणार्थ, समाजातले बहुसंख्य लोक अस्वच्छ राहतात. ते गरीब असतात किंवा दलित असतात म्हणून नव्हे. अनेक पैसेवाले, ब्राह्मणही अत्यंत गलिच्छ जीवन जगतात. ब्राह्मण आहेत किंवा श्रीमंत आहेत, म्हणून त्यांना कोणी सुसंस्कृत समजत नाहीत. ते असंस्कृतच समजले जातात. समाजाने घालून दिलेले नीतीचे नियम मोडणारा माणूस कोणत्याही जातीचा असला तरी, त्याला कोणी माफ करीत नाही. आमच्या गावच्या एका भटाने दुसऱ्या एका भटाची बायको पळविली. सर्वांनी त्यांची छी: थू केली. आमच्या लहानपणी एका भटाने एक ख्रिश्चन औरत आणून ठेवली होती. त्याबद्दल त्याला सर्वांकडून तिटकाराच मिळाला. आता या सगळ्या गोष्टींचा विचार न करिता, समाजाने आम्हाला सभ्य, सुसंस्कृत समजावे, असा जर या मित्रांचा आग्रह असेल तर, समाज तो कधीही मान्य करणार नाही, एवढेच म्हणता येईल. भाषेच्या बाबतीत आमचे हे मित्र म्हणतात की, "बहुसंख्य जनता जी भाषा बोलते, तीच आम्ही वापरू व तिलाच इतरांनी मान्यता दिली पाहिजे." याचा अर्थ फुले–आंबेडकरांनी वापरलेली भाषा पुस्तकी व पंडिती असल्यामुळे तिला आमचे मित्र मान्यता देणार नाहीत. जगात कुठलीही बोली भाषा ज्ञानविज्ञानाचे व साहित्याचे माध्यम म्हणून वापरली जात नाही. शेकडो, हजारो वर्षांच्या परिश्रमाने तयार झालेली व अडीच टक्के लोक वापरत असलेली प्रमाण भाषा साम्यवादी देशांतही वापरली जाते, त्याशिवाय गत्यंतर नसते, हे या मित्रांना कुणीतरी समजावून सांगितले पाहिजे. गंमत अशी आहे की, बोली भाषेचे समर्थन करताना हे लोक स्वत: मात्र प्रमाण भाषाच वापरतात ! मात्र आपल्या कथा-कादंबरीत किंवा नाटक – कवितेत ते अधूनमधून

शिवराळ भाषा वापरतात. अर्थात् जसजसे ते जबाबदार बनत जातील तसतसा खुद्द त्यांनाच त्या भाषेचा तिटकारा येऊ लागेल. कारण, समाजातील सुसभ्य सुसंस्कृत लोकांनी आपल्याला जवळ करावे, मान्यता द्यावी, अशी सर्वांचीच इच्छा असते. काळाबाजार व भ्रष्टाचार करणाऱ्या बापालाही आपल्या मुलाने सच्छील बनावे असेच वाटते. याच न्यायाने समाजातील जे लोक सुसंस्कृत जीवन जगू शकत नाहीत, त्यांनाही त्या जीवनाविषयी आकर्षण असतेच. आपल्या मुलांनी खूप शिकावे, ज्ञान-संपन्न बनावे, स्वच्छ, निर्मळ जीवन जगावे, तोंडातून अपशब्द काढू नयेत, असे गुंड-मवाल्यांनाही वाटतेच ना ! संस्कृतीचे मूल्य व महत्त्व ते हे की संस्कृतीची जडणघडण करण्याचे काम समाजातले साडेतीन टक्के लोकच करीत असतात. त्या साडेतीन टक्क्यांत सर्व जातींचे, धर्मांचे व वर्गांचे लोक असतात हे आपण ओळखले तर त्यांचा राग येण्याऐवजी आपल्या मनात त्यांच्याविषयी आदरच निर्माण होईल.

+ +

'पुढारी' : २५·५·८२

२३. राजकारणग्रस्त मराठी मन

'मराठी माणूस इतर भारतीयांच्या तुलनेने मागे का ?' या प्रश्नाची जी अनेक उत्तरे आहेत, त्यांपैकी एक असे आहे की, सर्वसामान्य मराठी माणूस हा इतर प्रांतांतील लोकांपेक्षा खूपच अधिक राजकारणग्रस्त असतो. राजकारणाची कला अथवा सत्ता हस्तगत करण्याचे तंत्र त्याला अवगत झालेले असते, असा त्याचा अर्थ नाही. सत्तेच्या राजकारणात तो इतरांकडून बहुधा नेहमी मारच खात आलेला आहे; परंतु आपल्याला राजकारण कळते, आवडते अशा प्रकारचा एक सुप्त अहंकार मराठी माणसामध्ये असतो. राजकारणाचा हा ज्वर सदा चढलेला असतो. त्यामुळे जीवनाच्या इतर क्षेत्रांकडे लक्ष देण्याला त्याला सवडच मिळत नाही. इतर प्रांतांत किंवा देशांत राजकारण करणारा एक खास वर्ग असतो. तो वगळल्यास बाकी सारे लोक आपापल्या क्षेत्रात मन लावून काम करतात. महाराष्ट्रात मात्र वेगळे दृश्य दिसते. माणूस कोणत्याही क्षेत्रात काम करीत असो, त्याचे निम्मेशिम्मे लक्ष प्रचलित राजकारणाकडेच असते; आणि सवड मिळाली किंवा मोका सापडला की, तो राजकारणाविषयी तावातावाने बोलू लागतो.

खुनशीपणा त्यातूनच आला असेल काय ?

कुण्या चिनी प्रवाशाने अनेक शतकांपूर्वी असे लिहून ठेवले आहे (असे म्हणतात) की, मराठी माणूस जुने काहीच विसरू शकत नाही. याचा अर्थ असा की, तो भूतकाळात रमणारा, भूतपूजक आहे. शिवाजी, संभाजी, बाजीराव, माधवराव यांच्या आठवणींत नशापाणी केल्याप्रमाणे तो इतका रंगून जातो की, आज आपण रामा गडी,

साधा कारकून किंवा शाळामास्तर याहून अधिक प्रगती करू शकत नाही, याची बोचच त्याला स्पर्श करीत नाही. याचा आणखी एक अर्थ असा की, कधी काळी झालेल्या जखमांचा विसर त्याला पडत नाही; आणि त्यांनाच तो कुरवाळीत बसतो. यातूनच बहुधा खुनशीपणा आला असावा. महाराष्ट्रात विविध राजकीय पक्षांतील वैर– वैमनस्य कधीकधी इतके पराकोटीला जाते की, चांगली सुशिक्षित माणसे विरोधी पक्षातील लोकांशी संपर्कच टाळतात; आणि तेवढे सुसंस्कृत नसलेले लोक एकमेकांची डोकी फोडतात. इतिहासाविषयीचे मराठी माणसाचे प्रेम हे या प्रवृत्तीचे आणखी एक रूप म्हणता येईल. शिवाजी महाराजांपासून राजकारणाचे जे बाळकडू आम्हाला मिळाले ते थेट फुले, आगरकर, टिळक, आंबेडकर, सावरकरांपर्यंत पुरले. शिवाजीच्या पूर्वी ही संतांची भूमी होती. त्यानंतर ती राजकारण्यांचा आखाडा बनली असेही म्हणता येईल. आपल्या कोणत्याही भल्या-बुऱ्या कृत्याला तत्त्वनिष्ठेचा आधार असल्याची समजूत आम्ही करून घेतलेली असते. त्यामुळे गांधीहत्येसारख्या साऱ्या जगाने निंद्य ठरविलेल्या कृत्याचा गौरव करणारी माणसे फक्त महाराष्ट्रातच आढळू शकतात !

झपाटलेली झाडे

नरसोबाच्या वाडीत कृष्णेच्या काठी असलेल्या दत्ताच्या देवळाच्या मंडपात एक विचित्र दृश्य पूर्वी पाहायला मिळे. (अजूनही ते दिसत असेल.) एकेका खांबाला मिठी मारून अंगात आलेली एकेक व्यक्ती घुमत असे. ते झपाटलेले झाड असे. त्या व्यक्तीच्या अंगातील भूत निघून गेले की, ती व्यक्ती त्या खांबापासून दूर होई. तिला मुक्ती मिळे. मराठी माणसाला एकेका पक्षाचे असे खांब धरून बसण्याची जन्मजात सवय असावी. अलीकडे इंदिरा गांधींनी आयाराम-गयाराम संस्कृती सुरू केल्यापासून सत्तेच्या राजकारणात अशी झपाटलेली झाडे फारशी दिसत नाहीत. जो आपल्याला खुर्ची मिळवून देईल तो आपला पक्ष, अशी भूमिका घेणारे राजकारणी आता मोठ्या संख्येने आढळतात; परंतु काही अस्सल किंवा इरसाल राजकारणी चिवटपणाने आपला पक्ष व मते यांना घट्ट धरून आहेत. त्यांनी राजकारणात भाग घ्यायला किंवा त्याचा विचार करायला सुरुवात केल्यापासून आत्तापर्यंत दोन-तीन पिढ्यांचा काळ लोटला आहे; परंतु त्यांची मते मात्र पन्नास-साठ वर्षांपूर्वी जी होती तीच आजही आहेत. बदललेल्या परिस्थितीचा त्यांच्या मनावर व मतांवर काहीही परिणाम झालेला नाही.

या संदर्भात अगदी अलीकडची घटना सांगण्यासारखी आहे. असममधील परवाच्या रक्तरंजित निवडणुकीनंतर तेथील परिस्थिती प्रत्यक्ष पाहून आलेले अभाविपचे श्री देवी त्यासंबंधी माहिती सांगत होते. त्या सभेला श्री मामाराव दाते

हजर होते. त्यांनी असा प्रश्न विचारला की, "आसू, गणसंग्राम वगैरे मंडळींनी निवडणुकींवर बहिष्कार टाकण्याऐवजी त्यात भाग घेऊन त्या जिंकायला हव्या होत्या. तसे न करण्यात त्यांचे चुकलेच." म्हणजे अजून ते जुन्या फेर-नाफेरच्याच जमान्यात वावरत होते. मिळेल ते पदरात पाडून घ्या आणि जास्तीसाठी भांडत रहा, हा संदेश त्यांना अजून उपयुक्त वाटत होता. तसे न करता असमीया आंदोलनकारांनी गांधींचा बहिष्काराचा मार्ग अवलंबिला ही चूक झाली, असे त्यांना वाटले. मग मी त्यांना सांगितले, "मामासाहेब, मतदारयाद्यांत परकीय घुसखोरांची नावे आहेत, म्हणून त्या निवडणुकाच बेकायदेशीर आहेत, अशी भूमिका घेणाऱ्यांना त्या निवडणुकांत कसा भाग घेता आला असता ? शिवाय खोट्या मतदारांच्या पाठिंब्यावर निवडणुका जिंकणे इंदिरा काँग्रेसला जेवढे सुलभ होते तेवढे असमीया देशभक्तांना शक्य नव्हते. त्यांनी निवडणुकीत भाग घेतला असता तर थोड्याफार जागा त्यांना मिळाल्याही असत्या; परंतु त्यामुळे आपोआपच त्या बेकायदा निवडणुकींना प्रतिष्ठा प्राप्त झाली असती." मामांना हा युक्तिवाद बहुधा पटला नसावा, असे त्यांच्या चेहऱ्यावरून मला वाटले. त्यांच्या समजुतीप्रमाणे टिळकवादाचे जे झाड त्यांनी घट्ट पकडून धरले आहे, ते सोडण्याची त्यांची तयारी नसावी. त्यामुळे टिळकांचेच कार्य गांधींनी पुढे चालविले. ही साधी गोष्ट त्यांना कधीच आकलन झाली नाही.

गांधीद्वेषाची कारणे

मुसलमान आणि साम्यवादी यांच्यानंतर गांधी आणि गांधीमार्ग यांच्या द्वेषाच्या बाबतीत बहुधा मध्यमवर्गीय मराठी माणसाचाच क्रम लागेल. मुसलमानांचा विरोध सहज समजू शकतो. इस्लाम हा संपूर्ण धर्म असून तो सर्वश्रेष्ठही आहे, अशी त्यांची प्रामाणिक समजूत असल्यामुळे गांधींचा सर्वधर्मसमभाव हा इस्लामचा अपमान करणारा, त्याला इतर धर्मांच्या रांगेत बसविणारा आहे, असे त्यांना वाटले व त्यांनी त्या सिद्धांतालाच विरोध केला. इस्लामचे श्रेष्ठत्व नाकारणारा कोणताही विचार मुसलमानांना पटण्याची शक्यता नाही. अर्थात् ज्यांनी या कवचातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला असे डॉ. झाकिर हुसैन, डॉ आबिद हुसैन, डॉ. मुजीब, न्या. छागला यांसारखे काही अपवादही आढळतात; परंतु त्यांचा प्रभाव एकूण मुस्लिम समाजावर नगण्यच म्हटला पाहिजे. 'गांधी' चित्रपटाचा जगभर एवढा उदोउदो झाला; परंतु मुस्लिम व साम्यवादी राष्ट्रांत त्या चित्रपटाला शिरकाव करता आला नाही, हे या बाबतीतील अगदी अलीकडचे उदाहरण पुराव्यादाखल सांगता येईल. कै. हमीद दलवाई यांना या मंडळीत सामील करता येणार नाही. ते गांधींचे भक्त नव्हते. उलट गांधीवाद्यांची टिंगल त्यांनी केली. खरोखरी ते फुले, आंबेडकर,

टिळक, सावरकर यांचेच अनुयायी होते. तोच आक्रमक पवित्रा त्यांनी कायम ठेवला. साम्यवाद हाही इस्लामसारखाच कट्टर व हेकट धर्म आहे. तो इतरांवर सत्ता तरी गाजवील किंवा इतरांच्या गुलामीत तरी राहील. इतरांशी बरोबरीच्या नात्याने जगणे त्यालाही शक्य होत नाही. फ्रान्स, इटली, वगैरे देशांत त्याला माणसाळवून इतरांशी सहकार्य करण्याची शिकवण देण्याचे प्रयत्न चालू आहेत, ते कितपत यशस्वी होतात हे पाहणे मनोरंजक ठरेल. कदाचित् त्या प्रक्रियेत तो समाजवादाचेच रूप धारण करील.

मध्यम वर्गीय मराठी माणसाच्या गांधीद्वेषाची कारणे मात्र थोडी वेगळी आहेत. इस्लाम व साम्यवाद यांचा पराभव करायचा तर आपण त्यांच्या इतकेच किंबहुना त्यांच्याहून अधिक असहिष्णू व कट्टर बनले पाहिजे, अशी समजूत या वर्गाने करून घेतली आहे. त्यामुळे सहिष्णुता सांगणाऱ्या गांधींचा द्वेष हा त्यांच्या बाबतीत स्वाभाविक ठरतो. परंतु दुसरी काही तात्कालिक कारणेही आहेत. टिळकांनी देशाचे नेतृत्व महाराष्ट्राकडे खेचून आणले होते. ते नेतृत्व गांधींकडे गेल्यावर जणू तो महाराष्ट्राचा अपमानच झाला, अशी समजूत काही टिळक-भक्तांनी व टिळक-सावरकरांच्या अनुयायांनी करून घेतली. त्यामुळे गांधींच्या नेतृत्वाला विरोध करणे आपले परमपवित्र कर्तव्यच आहे, अशी त्यांची भावना झाली. कदाचित् महाराष्ट्राच्या आर्थिक नाड्या आपल्या हातांत ठेवणाऱ्या गुजराती समाजाविषयी वाटणारा भीतियुक्त तिटकाराही त्याच्या मुळाशी असेल. गुजराती त्यांनी व्यापार करावा, आमची मक्तेदारी असलेल्या राजकारणात त्यांनी कशाला पडावे, अशीही भूमिका त्यामागे असल्यास नवल नाही.

आणखी एक कारण संभवते. मराठी माणसाला आपल्या बौद्धिक श्रेष्ठत्वाचा व पांडित्याचा (बहुधा खोटाच !) अभिमान किंवा अहंकार असतो. बुद्धिमत्ता आणि पांडित्य यांच्या जोरावर त्याला कोणी पराभूत केले तर तो पराभव मराठी माणूस, कुरकुरत का होईना, स्वीकारतो. पाश्चात्यांकडून झालेला पराभव अशा प्रकारे त्याने स्वीकारलाही मार्क्सवादाचा विजयही त्याने याच भूमिकेतून मान्य केला. गांधींच्या बाबतीत या दोन्ही गोष्टींचा, निदान बाह्यतः तरी, अभावच असल्याचे दिसून येते. त्यांचे वाचन फार तुटपुंजे होते. बौद्धिक वादविवाद त्यांना कधी जमला नाही. याच्या उलट त्यांचा सारा भार अंतःप्रेरणा व माणसातील सूक्ष्म व कोमल भावना यांवरच राहिला. त्यामुळे मराठी बुद्धिवंतांची तार त्यांच्याशी कधी जुळली नाही. सामान्य माणसाला मात्र गांधी चटकन कळला; कारण त्या दोघांमध्ये माणुसकीची महत्ता कळण्याचा समान गुण होता. अर्थात् या बाबतीतही एक मजेदार विरोधाभास आहे. गांधीमार्गाला विरोध करणारे तथाकथित बुद्धिवंत जसे महाराष्ट्रात निपजले, तसेच त्या मार्गाचे समर्थन करणारे दिग्गज पंडितही महाराष्ट्रातूनच पुढे

आले. सर्व आचार्य विनोबा, कालेलकर, दादा धर्माधिकारी, भागवत ही नावे अखिल भारतीय पातळीवर सर्वमान्य झालेली आहेत. परंतु त्यांच्यापैकी कोणीही पंडिती पद्धतीने गांधीमार्गाची पद्धतशीर मांडणी केली नाही. म्हणजे विद्वानांना मान्य होतील असे ग्रंथ लिहिले नाहीत. त्यांनी बहुधा वाणीचाच वापर अधिक केला. आचार्य शं. द. जावडकर हे अपवाद समजावेत. त्यांच्या 'आधुनिक भारता'ला विद्वानांनी अवश्य मान्यता दिली. परंतु ते गांधीवादाचे आचार्य नव्हते. गांधीमार्ग आणि समाजवाद यांच्यात समेट घडवून आणण्याचाच जणू त्यांनी प्रयोग केला. समाजवाद्यांच्या रूपाने त्यांना अनुयायीही मिळाले.

छोटी छोटी घरकुले बनविण्याची वृत्ती

माणसे राजकारणग्रस्त झाली की, त्यांच्या दृष्टीची विशालता नष्ट होते; आणि आपल्या छोट्या छोट्या घरकुलांना संपूर्ण जग मानून त्यातच गुंग होऊन राहण्याची वृत्ती वाढीस लागते. याबाबतीत साम्यवादी (कम्युनिस्ट) आणि मुसलमान यांच्याशी मराठी माणसाचे पुष्कळच साम्य आहे. हे दोन्ही पंथ इतके कडवे आहेत की, आपल्यातील उपपंथांचा नायनाट केल्याखेरीज त्यांना चैन पडत नाही. शिया, सुनी, वहाबी, दरूज, अहमदिया, बहाई वगैरे पंथ एकमेकांचा नाश करण्यास टपून बसलेले असतात. यूरोपीय देशांतील साम्यवादी पक्ष हे जणू स्वतंत्र पक्षच बनले आहेत. भारतात भाकप, माकप, नक्षलवादी वगैरेंचे शत्रुत्व तर सर्वज्ञातच आहे.

महाराष्ट्रात नुसते हिंदुत्ववादी घेतले तरी त्यांच्यांत किती जाती, जमाती आढळतात ! सावरकरभक्तांना संघवाले दूरचे वाटतात, (केसरीकरांची या बाबतीतील भूमिका लक्षणीय आहे !) तर सनातनी लोकांना सगळ्याच हिंदुत्ववाद्यांची निष्ठा हिणकस वाटते. अर्थात् गांधी आणि गांधीवाद यांच्या बाबतीत यांपैकी अनेकांचे एकमत आहे. ते असे की गांधीने देशाचे वाटोळे केले ! त्यामुळे भाजपने गांधीवादी समाजवादाचा स्वीकार करताच सर्वांनी एकमुखाने त्याचा धिक्कार केला. अर्थात् भाजपला कुठला गांधीवाद अभिप्रेत आहे हे त्यानेही गुलदस्तातच ठेवले आहे.

विनोबा कसले संत ?

या संदर्भात 'सोबत'कारांच्या बाबतीतलीच एक घटना नमूद करण्यासारखी आहे. 'परकीय शक्तींच्या हस्तक्षेपाचा बागुलबोवा' या 'सोबत' (१० जुलै १९८३) मधील आपल्या लेखात श्री बेहेरे यांनी सहज जाता-जाता असा उल्लेख केला की, " येथे म. गांधी, विनोबा भावे, जयप्रकाशजी यांच्यासारखे हृदयपरिवर्तनवादी संतही मान्यता पावू शकतात." त्याबरोबर अनेक हिंदुत्वनिष्ठांचे पित्त खवळले

आणि त्यांनी संपादकांना खडसावले की, "कै. विनोबा भावेंना संत पंगतीत, तेही आपण, बसविण्याचे प्रयोजन काय?" किंवा "विनोबा भाव्यांना आपण संतमालिकेत नेऊन बसविले, हे मात्र खटकले. आपले हे विधान आपल्या पूर्वीच्या लेखांशी विसंगत आहे," वगैरे. आणि मग संपादकांना खुलासा करावा लागला की, "विनोबांशी मतभेद असणे निराळे आणि त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचे व जीवनभाष्याचे मर्म जाणणे निराळे. तुम्ही गीताई एकदा वाचून पाहावी. विनोबांनी राजकारणी पुरुषांशी संगत करून अधःपात करून घेतला, एवढंच." (२८।३।८३)

त्यांच्या या भूमिकेशी आम्हीही सहमत आहोत. विनोबा हे अत्यंत कुशाग्र बुद्धीचे, त्यागी, तपस्वी, प्रतिभावान् बुद्धिवंत होते; परंतु आणीबाणीतील त्यांच्या भूमिकेमुळे त्यांच्यावर टीकास्त्र सोडणे आम्हालाही भाग पडले होते. परंतु त्यावरून त्यांचा मोठेपणा आम्ही नाकारला होता, असे समजणे चूक आहे. या संदर्भात आमचाही एक अनुभव नमूद करण्यासारखा आहे. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या 'उलगा-उलग' या आमच्या आत्मचरित्रासंबंधी लिहिताना अनेक हिंदुत्वनिष्ठांनी आम्ही अजूनही गांधीभक्त कसे राहिलो याविषयी आश्चर्य व्यक्त केले. काही वाचकांनी त्याबद्दल आमची कीवही केली. सांगलीच्या एका डॉक्टर वाचकानी त्या सर्वांवर कडी केली. त्यांचे म्हणणे असे की, "तुमच्या सामान्य जीवनाशी आम्हाला काही कर्तव्य नाही. गांधींच्या आश्रमातील भानगडींचे चमचमीत किस्से तुम्ही द्यायला हवे होते. त्यासाठी तर आम्ही तुमचे आत्मचरित्र वाचायला घेतले!" आता याला आम्ही काय उत्तर देणार? खरी गोष्ट अशी आहे की, कुणाच्याच 'स्कँडल्स'मध्ये आम्हाला कधीच स्वारस्य वाटले नाही, त्यामुळे आश्रमातील भानगडी आम्हाला फारच उशीरा व इतरांकडून समजल्या. त्यांच्यासंबंधी लिहिण्याइतका पुरावा आमच्या जवळ नव्हता. आमच्या स्वतःशी ज्यांचा संबंध आला त्यांच्या विषयीच आम्ही लिहिले. तेही सबळ पुरावा असेल तेव्हाच लिहिले.

थोडी उदारता, थोडी सहिष्णुता हवी

या साऱ्या विवेचनाचा असा अर्थ मुळीच नाही की, आम्ही स्वतः या दोषांपासून अलिप्त आहोत. अखेर आम्हीही याच मराठी मातीत जन्मलो आणि वाढलो आहोत. त्यामुळे इतरांप्रमाणे आम्हीही राजकारणग्रस्त राहिलो आहोत. परंतु आता मागे वळून पाहिल्यानंतर आम्हाला असे वाटते की, एवढा पराकोटीचा अभिनिवेश आम्ही बाळगला नसता तर बरे झाले असते. महाराष्ट्रात रानडे, गोखले यांसारख्या नेमस्त पुढाऱ्यांची टिंगलटवाळीच जास्त झाली. त्यामुळे जहाल भाषा न वापरणाऱ्या गांधींच्या वाट्यालाही महाराष्ट्रात टिंगलटवाळी येणे क्रमप्राप्तच होते. तसे पाहिले तर आपल्यापैकी बहुतेकांचा जहालपणा हा केवळ वाणीत आणि लेखणीतच राहिला.

प्रत्यक्ष कृतीत तो फारच कमी उतरला. आजकाल फुले–आंबेडकरांच्या जहालपणाचा वारसा मोठ्या उत्साहाने चालविला जात आहे; परंतु त्यातून त्यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक समतेची प्रस्थापना होण्याऐवजी विभिन्न जातीजमातींत द्वेषभावनाच अधिक पेटवली जात आहे. इंदिरा गांधींनी सगळ्या राजकारणाचेच खच्चीकरण केल्यामुळे आमच्यातील राजकारणज्वर संघर्षपूर्ण समाजकारणाच्या रूपाने बाहेर पडत असावा असे दिसते. व्यक्तीप्रमाणे समाजाचा स्वभावही सहजासहजी बदलत नाही, हे खरे; परंतु जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास त्यात थोडाफार बदल घडवून आणता येतो. मराठी माणसाच्या मनातील राजकारणग्रस्ततादेखील अशा प्रकारे थोडीफार कमी करता येईल, व ती करावी असे आम्हाला वाटते.

+ +

'सोबत' : ९·१०·८३

२४. चारित्र्यहीनांचा जय हा मानवतेचा पराजय !

माणसाचे वैयक्तिक चारित्र्य आणि समाजकारण, राजकारण व कलाजीवन यांतील त्याचे यशापयश यांचा परस्परांशी काही संबंध असतो काय ? म्हणजे असे की, ज्या व्यक्तीला सामाजिक, राजकीय व साहित्यिक क्षेत्रात काही भरीव कामगिरी करावयाची असेल, तिने आपले वैयक्तिक चारित्र्य धुतल्या तांदळासारखे स्वच्छ, निर्मळ ठेवलेच पाहिजे असा अटळ नियम आहे काय ?

स्वातंत्र्यपूर्वकाळात वैयक्तिक चारित्र्याला सर्वांत अधिक महत्त्व दिले जात होते. त्यामुळे ज्यांच्याजवळ चारित्र्याचे धन नसे, त्या व्यक्ती ज्ञानाने, पराक्रमाने, संपत्तीने कितीही मोठ्या असल्या तरी, त्या निर्धनच समजल्या जात. त्यांच्या शब्दाला फारशी किंमत दिली जात नसे. त्यामुळे अनेकदा अशा बाह्यतः पराक्रमी, बुद्धिमान, पुढाऱ्यांची कदर का केली जात नाही, अशी वैषम्ययुक्त तक्रार त्यांच्या काही अनुयायांकडून तेव्हाही केली जात असे; आणि बहुधा आजही केली जाते. आपल्या पुढाऱ्याला पुरेशी लोकप्रियता लाभली नाही, याच्या अनेक कारणांपैकी त्याच्याजवळ असलेला वैयक्तिक चारित्र्याचा अभाव हेही एक कारण असू शकेल, असा साधा विचारही अशा पुढाऱ्यांच्या अनुयायांच्या मनात येत नसावा, असे दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात

ही झाली स्वातंत्र्यपूर्व काळातील स्थिती. स्वातंत्र्योत्तर काळात परिस्थिती आमूलाग्र बदलली. चारित्र्यसंपन्नता हेच ज्यांचे एकमेव सामर्थ्य होते, अशा गांधींच्या नावाने राज्यकारभार करणाऱ्या राज्यकर्त्यांनीच चारित्र्यशीलतेला

वासनात गुंडाळून ठेवले. त्यामुळे सत्ताधारी बनण्यासाठी अथवा जीवनात यशस्वी होण्यासाठी चारित्र्याची काहीच गरज नाही, अशी भावना सर्वत्र पसरली. किंबहुना माणूस जितका अधिक चारित्र्यहीन, भ्रष्टाचारी असेल, तितका तो जीवनात अधिक यशस्वी होतो, अशीच सर्वांची समजूत झाली. म्हणूनच भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला. परंतु कधीकधी या प्रचलित समजुतीला धक्का देणाऱ्या घटनाही घडतात; आणि वैयक्तिक जीवनाप्रमाणेच सार्वजनिक जीवनातही चारित्र्याला महत्त्व असले पाहिजे, असावे, असा विचार सदसद्विवेकबुद्धी शाबूत असणाऱ्यांच्या मनात डोकावून जातो.

तसे पाहिल्यास आजचे यशस्वी व ख्यातनाम समाजसुधारक, राजकारणी व साहित्यिक – कलावंत यांपैकी कोणालाच चारित्र्याचे सोयरसुतक राहिलेले नाही. अशा स्थितीत त्या जुनाट जीवनमूल्यांचे तुणतुणे वाजविण्यात काहीच अर्थ उरला नाही. तरीपण कधीकधी अचानक एखादी घटना आपल्या नजरेसमोर येते, आणि चारित्र्याची महती आपल्याला नकळत पटून जाते.

मल्लिका अमरशेखचे आत्मवृत्त

नुकतीच घडलेली गोष्ट. तसा मी काही खूप वाचन करणारा, बहुश्रुत लेखक नव्हे. कमीत कमी वाचन करून जास्तीत जास्त लेखन करणे हा माझा स्वभाव. त्यामुळे पुष्कळच गोष्टी माझ्या वाचनातून सुटून जातात; परंतु कधी कधी बहुश्रुत मित्रांमुळे एखादा महत्त्वाचा लेख अथवा ग्रंथ माझ्या वाचनात येतो; आणि माझे विचारचक्र सुरू होते. मित्रवर्य मो. ज्ञा. शहाणे यांनी 'शब्दश्री' (जुलै ८३) चा अंक मला वाचायला दिला; आणि त्यातील मल्लिका अमरशेख यांचे आत्मवृत्त वाचण्याची शिफारस केली. त्याप्रमाणे मी ते वाचले; आणि चक्रावून गेलो. मल्लिकाबाई या प्रख्यात लोकशाहीर अमरशेख यांच्या कन्या व दलित पँथरचे संस्थापक थोर दलित लेखक नामदेव ढसाळ यांच्या पत्नी. त्यांनी ज्या मोकळेपणाने आपल्या वैवाहिक जीवनाविषयी लिहिले आहे, त्याने मी थक्क झालो. त्यांच्या मोकळेपणाचे दोन नमुने देण्यासारखे आहेत.

त्यांच्या आत्मकथेतील एक प्रसंग असा आहे–

आपल्या विवाहाच्या आधीची हकीगत सांगताना त्या लिहितात. "आधी तो बऱ्याच वेळा वेश्यांकडे जाऊन आलेला. रोगावर औषधोपचार घेतलेला. पण यामुळे व्यवस्थित असूनही मला हात लावायला भीत होता. एकदा लग्नाचं ठरलं आणि...त्यानं मला विचारलं, 'लग्नाच्या आधी करण्यात मजा असते. नंतर काय रुटीनच सुरू होतं.' मी गप्पच. त्यानं मला समजावलं... 'देशील ?' 'काय ?' 'तुझं स्त्रीत्व.' न् मी माझा होकार-नकार सांगण्या आधीच त्यानं माझं तोंड बंद केलं.

बापरे ! तो पहिला अनुभव त्रासदायकच होता. किती तो शरीराला त्रास..." वगैरे

दुसरा एक प्रसंग :

" एकदा त्याचा एक नातलग घरी आला...बऱ्याच वेळा तसा यायचा... रात्री जेवणं झाली. घरात नामदेव, मी आणि तो...त्यानं काय करावं ? चक्क माझी मागणी केली ! ' आपण मजा करू...चल खोलीत...नामदेवला जळवूया.' मी स्तंभित...मी नकार दिला. तर ' तू सांग ना रे तिला ' करत त्यानं नामदेवला गळ घातली ! नामदेवनं माझ्या चेहऱ्याकडे क्षणभर पाह्यलं न् म्हणाला, ' मी तिला सांगणार नाही. तिला तुझ्या बरोबर झोपायचं असेल तर ती आपणहून येईल. मी तिला सांगणार नाही.' मी नामदेववर वैतागले. पुन्हा तो माणूस घरी फिरकला नाही."

हे नमुने चारित्र्यविषयक संकल्पनेचे आधुनिकतम स्वरूप लक्षात यावे या हेतूने निवडले आहेत; परंतु मल्लिकाबाईंच्या आत्मचरित्रात इतरही काही महत्त्वाचे गुण आहेत. सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांचा प्रांजलपणा आणि निवेदनाची पारदर्शकता. सामान्यतः माणूस आपल्या जीवनातल्या ज्या गोष्टी लपविण्याचा प्रयत्न करतो त्या न लपविता त्यांनी निःसंकोचपणे सांगितल्या आहेत. स्वतःची दुर्बलताही लपविलेली नाही. त्यामुळे दलित समाजातील स्त्री-जीवनाचे खरेखुरे चित्र वाचकांसमोर उभे राहाते. मुसलमान आणि दलित यांचे विचित्र मिश्रण त्यांच्या जीवनात झालेले दिसते.

या मुक्तीतून काय साधणार ?

ही खरी चारित्र्यमुक्ती ! स्त्रीची आणि पुरुषाचीही ! आमची मराठी आत्मकथा किती बंधमुक्त झाली आहे त्याचाही हा एक नमुना समजता येईल. (बहुधा त्यामुळेच मी माझ्या ' उलगा उलग 'मध्ये लैंगिक जीवनाचा उल्लेख न करण्याचे बंधन स्वतःवर घालून घेतले, तेव्हा पुरोगामी साहित्यसमीक्षकांच्या नजरेतून मी पार उतरलो ! अगदीच बुरसटलेला ठरलो ! परंतु या लेखाचा विषय तो नाही.)

चारित्र्यशीलतेचा किंवा चारित्र्यहीनतेचा माणसाच्या जीवनावर व कार्यावर काय परिणाम होतो, याचा मागोवा या आत्मवृत्ताच्या आधारे मला घ्यावयाचा आहे. बाई, बाटली, सत्ता, व संपत्ती या चार व्यसनांच्या चक्रात गुरफटून जाणारी आणि त्या योगे स्वतःचे व इतरांचे अपरिमित नुकसान करणारी व्यक्ती चारित्र्य-हीन असते आणि या मोहापासून अलिप्त राहणारी व्यक्ती चारित्र्यशील असते, अशी ढोबळ व्याख्या मी या लेखापुरती केली आहे. ती पूर्णपणे निर्दोष नाही, याची मला जाणीव आहे. बाई-बाटलीच्या नादाला लागलेला एखादा पुरुष इतरांपेक्षा

अधिक माणुसकीसंपन्न असू शकतो, हे मी नाकारीत नाही; आणि वाममार्गाचा वापर न करता सत्ता व संपत्ती मिळविता येते एवढेच नव्हे तर, त्यांचा सदुपयोगही होऊ शकतो, याचा अनुभव मी घेतलेला आहे. तरीपण या गोष्टी जेव्हा भयंकर व्यसनाचे रूप धारण करतात तेव्हा त्या विनाशकारकच ठरतात, असे मी मानतो.

श्रीमती मल्लिका अमरशेख यांच्या आत्मवृत्तावरून श्री नामदेव ढसाळ हे बाईच्या व बाटलीच्या किती आहारी गेले होते, याचे सुस्पष्ट दर्शन घडते. वस्तुतः दलितांच्या उद्धाराचा वसा घेऊन बांधण्यात आलेल्या दलित पँथर या क्रांतिकारक संघटनेचे ढसाळ हे संस्थापक. त्यांच्याच पराक्रमाने ती संघटना नावारूपास आली; परंतु त्यांच्याच व्यसनापायी ती धुळीलाही मिळाली. बाई व बाटलीचे व्यसन तसे अत्यंत महागडे. ते पुरविण्यास पैसा पाहिजे. तो मिळविण्यासाठी तडजोड व लाचारी करणे भागच पडले. 'नामदेवचे विकले जाणे आपल्याला मुळीत पसंत नव्हते' असे मल्लिकाबाई सांगतात; परंतु ढसाळांच्या व्यसनांचे स्वरूप पाहता त्यांना विकले जाणे भागच होते. त्याबद्दलही माझी तक्रार नाही. आज सगळेच राजकारणी स्त्री-पुरुष विकाऊ आहेत. दलितांना व अल्पसंख्यकांना जादा भाव मिळत असल्यामुळे त्यांची खरेदी-विक्री जास्त मोठ्या प्रमाणावर होत असते, एवढेच ! परंतु आपले पुढारी असे विकले जातात हे पाहून त्यांच्या अनुयायांना काय वाटत असेल ? त्यांनीही स्वतःचा विक्रा मांडला व त्यामुळे संघटनाच मोडीत निघाली, तर त्याला जबाबदार कोण ? आणि या साऱ्यांच्या मुळाशी आहे चारित्र्याविषयीचा बेफिकीरपणा, किंवहुना, तुच्छता वृत्ती ! 'आमची कला बघा, आमचे साहित्य वाचा, आमच्या चारित्र्याशी तुम्हाला काय करायचंय ?' असे कलावंत किंवा लेखक म्हणू शकतो अनेकदा त्याची किंमतही त्याला द्यावी लागते; पण त्याने फारसे विघडत नाही. मात्र ही चैन समाजकारण किंवा राजकारण करणाऱ्याला परवडत नाही. कारण, त्याच्यावर असंख्य अनुयायांचे भवितव्य अवलंबून असते. श्री ढसाळ यांच्यासारख्या दलितांनी आपली जबाबदारी ओळखून आपले चारित्र्य सांभाळले असते तर, त्यांच्या अनुयायांवर निराश व दुःखी होण्याची पाळी नक्कीच आली नसती.

या आत्मकथनातून आणखी एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते. ढसाळ आणि त्यांचे दलित सहकारी यांची स्त्रियांच्या बाबतीतील अत्यंत अनुदार वर्तणूक. बायकोच्या उरावर सवती आणणे आणि बायकोला अत्यंत क्रूरपणे मारझोड करणे, या बाबतीत दलितांचे एकमत झाले असावे, असे दिसते. पांढरपेशा समाजात, मध्यम वर्गात पत्नीला मारझोड करणारे पुरुष आहेत, असे मी ऐकले आहे. प्रत्यक्ष अनुभव मात्र नाही. परंतु मल्लिकाबाईंनी ढसाळांकडून होणाऱ्या मारपिटीचे व एकूण दलित स्त्रियांच्या त्यांच्या पतीकडून होणाऱ्या छळाचे जे वर्णन केले आहे, ते

खरे असेल तर, दलित स्त्रियांना दलित पुरुषांकडून मिळणारी वागणूक अमानुषच म्हटली पाहिजे. गेली त्रेसष्ट वर्षे मी ज्या पांढऱ्यापेशा समाजात वावरलो, त्यात मला अशा प्रकारच्या मारझोडीचे एकही दृश्य पाहायला मिळाले नाही. यावरून मनात असा विचार येतो की, पांढरपेशा समाजाला शिव्याशाप देण्याऐवजी त्या समाजाने माणूसकीचा, सभ्यपणाचा, शिष्टाचाराचा जो थोडाफार विकास स्वतःच्या आचरणात घडवून आणला आहे, तो आत्मसात् करण्याचा प्रयत्न दलित पुढारी करतील तर त्यांचाच फायदा होईल. सध्या तरी त्यांच्या दलितमुक्तीच्या कार्यक्रमात स्त्री-मुक्तीला मुळीच स्थान नसावे असे दिसते.

हे कसले बाबासाहेबांचे अनुयायी ?

प्रत्येक दलित पुढारी व साहित्यिक आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी आहोत असे कंठशोष करून सांगत असतो; परंतु बाबासाहेबांचा सुसंस्कृतपणा त्यांच्यापैकी किती जणांजवळ आढळतो ? बाबासाहेबांची ज्ञानसाधना ही तर अत्युच्च कोटीचीच होती. तिची बरोबरी करणे हे येरागबाळ्याचे काम नव्हे. त्यासाठी मुळातही बुद्धीचे, प्रतिभेचे थोडेफार भांडवल हवे, म्हणून तिच्या अभावाबद्दल तक्रार करण्यात अर्थ नाही. पण बाबासाहेबांच्या जीवनात जो संयम, निर्व्यसनीपणा, सौजन्य, निखालसपणा होता, त्याचे तरी अनुकरण करता येईल की नाही ? बाबासाहेबांनी स्वतःचा विक्रय मांडला असता तर, वाटेल तेवढी किंमत ते वसूल करू शकले असते. भारताचे राष्ट्रपतीही होऊ शकले असते. (आम्ही सांगतो आहोत ती गोष्ट जुन्या काळची, जेव्हा त्या पदाला खूप प्रतिष्ठा होती ! इंदिराजींनी फखरुद्दीन व झैलसिंग यांच्यासारख्या लाचारांना राष्ट्रपतीपदावर बसविल्या पासून त्या पदाची रयाच गेली. आता कुणा सज्जन व स्वाभिमानी, बुद्धिमान् व्यक्तिला राष्ट्रपदीपदावर आपली स्थापना होणे हा आपला अपमानच वाटेल, अशी स्थिती आहे.)परंतु ते आपल्या तत्त्वांशी निष्ठावान राहिले. ही तत्त्वनिष्ठा आजच्या दलित पुढाऱ्यांपैकी किती जणांजवळ आहे ? बाबासाहेबांची कार्यक्षमताही अद्‌भुत होती. हाती घेतलेले काम ते किती कळकळीने करीत असत ते आम्ही स्वतः घटना परिषदेच्या काळात दिल्लीच्या मुक्कामात पाहिले आहे. आता बाबासाहेबांचे नाव घेऊन राखीव जागांवर येणाऱ्यांविरुद्ध मुख्यतः हीच तक्रार ऐकू येते की, त्यांच्यात कार्यक्षमता कमी व भ्रष्टाचार अधिक आहे. अशा लोकांनी बाबासाहेबांचे नाव सांगणे म्हणजे त्यांची थट्टाच होय.

चारित्र्याचा प्रभाव कसा मापायचा ?

यातूनच एक प्रश्न असा उत्पन्न होतो की, चारित्र्याचा प्रभाव कसा मापाव-

याचा ? तसे ते थोडे अवघडच काम आहे. तरीपण त्या बाबतीत थोडाफार प्रयत्न करून बघता येईल. ज्यांच्या चारित्र्याबद्दल लोकांमध्ये नितात आदर होता, अशा काही महापुरुषांची उदाहरणे घेऊन याचा विचार करता येईल. दयानंद, विवेकानंद, टिळक गांधी, फुले, आंबेडकर, हेडगेवार आणि गोळवलकर ही नावे आपण उदाहरणादाखल घेऊ. यांपैकी प्रत्येकाचे प्रभावक्षेत्र वेगळे आहे. तरीही त्यांनी आपापल्या क्षेत्रात आपला प्रभाव, ठसा उमटविला असे म्हणता येते. दयानंदांनी शुद्ध चारित्र्याच्या बळावर आर्यसमाजासारखी जगभर पसरलेली, सुधारकांची व देशभक्तांची संघटना निर्माण केली. विवेकानंदांनी मानवताधिष्ठित अध्यात्माचे एक आगळेच दर्शन जगाला घडविले. त्यामुळे सुसंस्कृत जगात त्यांचा प्रभाव अजूनही टिकून आहे. लोकसेवेला वाहून घेतलेल्या स्वामींची एक सेनाच त्यांच्या प्रभावातून निर्माण झाली. लोकमान्यांकडून देशभक्तीची प्रेरणा घेतलेले असंख्य कार्यकर्ते भारतात व विशेषतः महाराष्ट्रात तयार झाले. पुढे त्यांच्यापैकी अनेकांनी गांधींचे अनुयायित्व स्वीकारून लोकमान्यांचेच अर्धवट राहिलेले कार्य पुरे केले. गांधींचा प्रभाव जागतिक स्वरूपाचा ठरला. भारतीय राजकारणात त्यांचा जो पराभव झाला, त्यामुळे भारतीय जनतेवरील त्यांचा प्रभाव थोडासा पुसट झाला; परंतु त्याला जागतिक परिमाण असल्यामुळे जगातली त्यांची लोकप्रियता वाढतच राहिली. त्यांचा संदेशच मुळी अखिल मानवजातीसाठी होता. त्यामुळे त्यांचे नाव जगाच्या कोनाकोपऱ्यात जाऊन पोहोचले. 'आमार जीवनइ आमार बानी' (माझे जीवन हा माझा संदेश) हे त्यांचे जीवनसूत्र असल्यामुळे त्यांचा हा सारा प्रभाव त्यांच्या निर्मळ चारित्र्याचा होता असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. फुल्यांचा संदेश वस्तुतः साऱ्या कष्टकरी समाजासाठी होता; आणि त्याला अनुरूप असेच, त्यांचे जीवन होते; परंतु त्यांच्या अनुयायांनी त्याला ब्राह्मणद्वेषाचे विकृत रूप दिल्याने तो चांगला संदेशही निष्प्रभ बनला. हीच गोष्ट काही अंशी आंबेडकरांच्या बाबतीत घडली. त्यांची दृष्टी व्यापक व विशाल आणि भावना राष्ट्रप्रेमाने भारलेली होती. त्यामुळे त्यांचा संदेश जगातील सगळ्या दलित–पीडित जनतेपर्यंत पोहोचावयास हवा होता; परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही. तो भारतातील अस्पृश्यांपुरता, किंबहुना महाराष्ट्रातील महार जातीपुरताच मर्यादित राहिला. त्यांच्या पश्चात् त्यांच्या अनुयायांनी सवर्णद्वेषाचा जणू विडाच उचलला; आणि आंबेडकरांच्या संदेशाची अवस्था फुल्यांच्या संदेशासारखीच झाली. म्हणजे असे की, तो सार्वत्रिक, सार्वकालिक बनण्याऐवजी संकुचित व तात्कालिक बनला.

संघाचे कार्य कसे वाढले ?

विवेकानंद, टिळक, गांधी, फुले, आंबेडकर यांच्या जीवनांची चर्चा करताना

सामान्यतः हेगडेवार व गोळवलकर यांची नावे घेतली जात नाहीत. परंतु चारित्र्याच्या प्रभावासंबंधी विचार करताना यापुढील काळात ही दोन नावे अपरिहार्य ठरणार आहेत. त्याचे कारणही अगदी उघड आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या नावाची जी संस्था आज भारतीय समाजजीवनात प्रतिष्ठित होऊन बसली आहे, तिचा उल्लेख टाळणे यापुढे कोणालाही शक्य होणार नाही. ज्यांना त्या संघटनेचे अस्तित्व आपल्या स्वार्थाच्या आड येते असे वाटेल ते तिला 'कॅन्सरची' उपमा देतील. जसे केरळचे मुख्यमंत्री करुणाकरन व आसामचे मुख्य मंत्री सैकिया देत असतात. संघामुळे आपले राष्ट्रद्रोही स्वरूप उघडकीस येण्याची भीती ज्यांना वाटते ते साम्यवादी, वगैरे लोक संघाला शिव्याशाप देतच राहतील; परंतु सर्वसामान्य भारतीय माणसाला – मग तो कोणत्याही जातीचा वा पंथाचा असो – संघ ही चारित्र्यसंवर्धनाचे कार्य करणारी सांस्कृतिक संस्था आहे, ही गोष्ट समजली असल्यामुळे संघाबद्दल मनातून आत्मीयता वाटत राहील.

अशी परिस्थिती कशी निर्माण झाली ? डॉ. हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांच्या चारित्र्यसंपन्न नेतृत्वातून चारित्र्याचे मोल समजणारी व स्वतःला चारित्र्यवान् बनविण्याची धडपड करणारी असंख्य माणसे संघातून निर्माण झाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत एकेक पाऊल पुढे टाकीत संघाने साठी गाठली तरी, अजून तो कोवळा तरुण आहे. पण त्याची पाळेमुळे देशाच्या कोन्याकोपऱ्यापर्यंत आणि परदेशातही जाऊन पोहोचली असल्याने त्याचा विस्तार यापुढेही झपाट्याने होत राहणार आहे. हे सारे कशाचे फळ आहे ? चारित्र्यसंपन्न नेतृत्व व सच्चारित्र्याची आकांक्षा बाळगणारे अनुयायी, यांमुळेच ही संस्था अशी भक्कमपणे पाय रोवून उभी राहिलेली दिसते. जगाच्या दृष्टीने आपल्या उज्ज्वल असणाऱ्या भवितव्याकडे (करिअरकडे) पाठ फिरवून, किंबहुना सांसारिक जीवनाचाही मोह टाळून हजारो तरुण ज्या संस्थेसाठी आपले जीवन समर्पित करतात व जगाच्या पाठीवर कुठेही आनंदाने जातात, जंगलांत व डोंगरदऱ्यांत काम करतात, ती संस्था चारित्र्याच्या भक्कम पायावर उभी आहे, असेच म्हटले पाहिजे. मूठभर धनासाठी आणि कणभर सत्तेसाठी आपले ज्ञान, इमान विकणाऱ्यांनी या संस्थेचा नाश करण्याची स्वप्ने पाहणे तसे हास्यास्पदच म्हटले पाहिजे. परंतु जगात हास्यास्पद गोष्टीही घडत असतातच.

अर्थात् या संदर्भात एक सावधगिरीचा इषाराही दिल्यास कोणी राग मानू नये. सर्वोच्च नेतृत्व चारित्र्यशील असले की, खालील कार्यकर्तेही चारित्र्यसंपन्न बनतात, असा नियम नाही. त्यासाठी विशेष परिश्रम करावे लागतात. तसे प्रयत्न संघामध्ये घेतले जात असावेत असे दिसते. त्यामुळे संघाशी संबंधित व्यक्ती भ्रष्टाचारापासून अलिप्त असते, असावी, अशी समजूत व अपेक्षा सर्वत्र पसरलेली आहे.

आपल्या आचरणाने त्या समजुतीला तडा जाणार नाही, याची खबरदारी सर्वच संबंधितांनी घेतली पाहिजे. तशी ती घेतली गेली नाही तर, सारा डोलारा हां हां म्हणता कोसळून पडेल.

अनीतिमान् लोकांची भरभराट

हे सारे विवेचन एका मर्यादेपर्यंत बरोबर आहे; परंतु त्यातून काही मूलभूत प्रश्नही उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, चारित्र्यसंपन्न लोकांचा प्रभाव लोकांवर पडतो हे खरे असले तरी, चारित्र्यहीन, अनीतिमान् लोकही जगात यशस्वी होतात, त्यांची भरभराट झालेली दिसते. या विरोधाभासाला काय उत्तर ? उदाहरणार्थ, चारित्र्य, नीती, सत्यनिष्ठा वगैरे गुणांना काडीचीही किंमत न देणाऱ्या, किंबहुना ते अवगुणच आहेत असे समजणाऱ्या श्रीमती इंदिरा गांधी यांना एवढे प्रचंड यश कसे मिळाले ? संजय, अंतुले, गुंडूराव, जगन्नाथ मिश्र यांसारख्या गुंडपुंड लोकांना हाताशी धरून या सत्तर कोटी लोकांच्या देशावर त्या आपले एकाधिपत्य कसे स्थापन करू शकल्या ? त्यांच्यातील दोष व दुर्गुण उघड झाले असताही त्यांच्याकडे दुर्लक्ष करून लोक पुन्हा त्यांच्या मागे कसे जातात ? त्यांनी या देशाचे सामूहिक चारित्र्यच जणू नष्ट केले आहे. ज्या संघटनेच्या आधारावर सामान्यतः सत्ता प्राप्त केली जाते, त्या आपल्याच संघटनेचा त्यांनी नाश करून टाकला. आपल्या हाती सारी सत्ता एकवटावी व ती आपल्या मुलाच्या हाती सोपविता यावी, एवढा एकच उद्देश त्यांनी मनाशी बाळगलेला दिसतो. त्या उद्दिष्टाच्या प्राप्तीत त्या यशस्वी होतील असाही रागरंग दिसत आहे. याचा अर्थ चारित्र्याला काहीच किंमत नाही, असा होऊ शकेल काय ?

भारतात काय किंवा जगात काय चारित्र्यहीन व्यक्तीकडे तुच्छतेने पाहिले जाते; परंतु अशी व्यक्ती सत्तेवर येऊ नये यासाठी मात्र फार थोडे लोक धडपड करतात. त्यामुळे चारित्र्यहीन, अनीतिमान् लोक तात्कालिक दृष्ट्या का होईना, यशस्वी होतात. परंतु त्यांचे ते यश म्हणजे समाजाचे, किंबहुना मानव जातीचे अपयश असते. ही गोष्ट एकदा लक्षात आली की, त्या यशाचा बुडबुडा फुटून जातो. हिटलर, मुसोलिनी, फ्रँको, सालाझार, स्टॅलिन, माओ हे सारे कमी-अधिक कालखंडापुरते यशस्वी झालेच होते; पण त्यांच्या मृत्यूनंतर सर्वांनी त्यांना शिव्याशाप दिले. याचे कारण उघड आहे. ज्या जनतेच्या हितासाठी त्यांनी सत्ता मिळवली, त्या जनतेचाच त्यांना विसर पडला; आणि भ्रष्टाचाराच्या आहारी जाऊन ते जनतेचे दुष्मन बनले. इंदिराजींच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. देशाचे भले करण्यासाठी आपण सत्ताधारी बनत असल्याचा आव त्यांनी आणला आणि गरिबी हटाव व वीस कलमी कार्यक्रम यांचा डांगोरा पिटला; पण

सामान्यतः हेगडेवार व गोळवलकर यांची नावे घेतली जात नाहीत. परंतु चारित्र्याच्या प्रभावासंबंधी विचार करताना यापुढील काळात ही दोन नावे अपरिहार्य ठरणार आहेत. त्याचे कारणही अगदी उघड आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या नावाची जी संस्था आज भारतीय समाजजीवनात प्रतिष्ठित होऊन बसली आहे, तिचा उल्लेख टाळणे यापुढे कोणालाही शक्य होणार नाही. ज्यांना त्या संघटनेचे अस्तित्व आपल्या स्वार्थाच्या आड येते असे वाटेल ते तिला 'कॅन्सरची' उपमा देतील. जसे केरळचे मुख्यमंत्री करुणाकरन व असमचे मुख्य मंत्री सैकिया देत असतात. संघामुळे आपले राष्ट्रद्रोही स्वरूप उघडकीस येण्याची भीती ज्यांना वाटते ते साम्यवादी, वगैरे लोक संघाला शिव्याशाप देतच राहतील; परंतु सर्व-सामान्य भारतीय माणसाला – मग तो कोणत्याही जातीचा वा पंथाचा असो – संघ ही चारित्र्यसंवर्धनाचे कार्य करणारी सांस्कृतिक संस्था आहे, ही गोष्ट समजली असल्यामुळे संघाबद्दल मनातून आत्मीयता वाटत राहील.

अशी परिस्थिती कशी निर्माण झाली ? डॉ. हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांच्या चारित्र्यसंपन्न नेतृत्वातून चारित्र्याचे मोल समजणारी व स्वतःला चारित्र्यवान् बनविण्याची धडपड करणारी असंख्य माणसे संघातून निर्माण झाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत एकेक पाऊल पुढे टाकीत संघाने साठी गाठली तरी, अजून तो कोवळा तरुण आहे. पण त्याची पाळेमुळे देशाच्या कोन्याकोपऱ्यापर्यंत आणि परदेशातही जाऊन पोहोचली असल्याने त्याचा विस्तार यापुढेही झपाटयाने होत राहणार आहे. हे सारे कशाचे फळ आहे? चारित्र्यसंपन्न नेतृत्व व सच्चारित्र्याची आकांक्षा बाळगणारे अनुयायी, यांमुळेच ही संस्था अशी भक्कमपणे पाय रोवून उभी राहिलेली दिसते. जगाच्या दृष्टीने आपल्या उज्ज्वल असणाऱ्या भवितव्याकडे (करिअरकडे) पाठ फिरवून, किंबहुना सांसारिक जीवनाचाही मोह टाळून हजारो तरुण ज्या संस्थेसाठी आपले जीवन समर्पित करतात व जगाच्या पाठीवर कुठेही आनंदाने जातात, जंगलांत व डोंगरदऱ्यांत काम करतात, ती संस्था चारित्र्याच्या भक्कम पायावर उभी आहे, असेच म्हटले पाहिजे. मूठभर धनासाठी आणि कणभर सत्तेसाठी आपले ज्ञान, इमान विकणाऱ्यांनी या संस्थेचा नाश करण्याची स्वप्ने पाहणे तसे हास्यास्पदच म्हटले पाहिजे. परंतु जगात हास्यास्पद गोष्टीही घडत असतातच.

अर्थात् या संदर्भात एक सावधगिरीचा इशाराही दिल्यास कोणी राग मानू नये. सर्वोच्च नेतृत्व चारित्र्यशील असले की, खालील कार्यकर्तेही चारित्र्यसंपन्न बनतात, असा नियम नाही. त्यासाठी विशेष परिश्रम करावे लागतात. तसे प्रयत्न संघामध्ये घेतले जात असावेत असे दिसते. त्यामुळे संघाशी संबंधित व्यक्ती भ्रष्टाचारापासून अलिप्त असते, असावी, अशी समजूत व अपेक्षा सर्वत्र पसरलेली आहे.

आपल्या आचरणाने त्या समजुतीला तडा जाणार नाही, याची खबरदारी सर्वच संबंधितांनी घेतली पाहिजे. तशी ती घेतली गेली नाही तर, सारा डोलारा हां हां म्हणता कोसळून पडेल.

अनीतिमान् लोकांची भरभराट

हे सारे विवेचन एका मर्यादेपर्यंत बरोबर आहे; परंतु त्यातून काही मूलभूत प्रश्नही उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, चारित्र्यसंपन्न लोकांचा प्रभाव लोकांवर पडतो हे खरे असले तरी, चारित्र्यहीन, अनीतिमान् लोकही जगात यशस्वी होतात, त्यांची भरभराट झालेली दिसते. या विरोधाभासाला काय उत्तर? उदाहरणार्थ, चारित्र्य, नीती, सत्यनिष्ठा वगैरे गुणांना काडीचीही किंमत न देणाऱ्या, किंबहुना ते अवगुणच आहेत असे समजणाऱ्या श्रीमती इंदिरा गांधी यांना एवढे प्रचंड यश कसे मिळाले? संजय, अंतुले, गुंडूराव, जगन्नाथ मिश्र यांसारख्या गुंडपुंड लोकांना हाताशी धरून या सत्तर कोटी लोकांच्या देशावर त्या आपले एकाधिपत्य कसे स्थापन करू शकल्या? त्यांच्यातील दोष व दुर्गुण उघड झाले असताही त्यांच्याकडे दुर्लक्ष करून लोक पुन्हा त्यांच्या मागे कसे जातात? त्यांनी या देशाचे सामूहिक चारित्र्यच जणू नष्ट केले आहे. ज्या संघटनेच्या आधारावर सामान्यतः सत्ता प्राप्त केली जाते, त्या आपल्याच संघटनेचा त्यांनी नाश करून टाकला. आपल्या हाती सारी सत्ता एकवटावी व ती आपल्या मुलाच्या हाती सोपविता यावी, एवढा एकच उद्देश त्यांनी मनाशी बाळगलेला दिसतो. त्या उद्दिष्टाच्या प्राप्तीत त्या यशस्वी होतील असाही रागरंग दिसत आहे. याचा अर्थ चारित्र्याला काहीच किंमत नाही, असा होऊ शकेल काय?

भारतात काय किंवा जगात काय चारित्र्यहीन व्यक्तीकडे तुच्छतेने पाहिले जाते; परंतु अशी व्यक्ती सत्तेवर येऊ नये यासाठी मात्र फार थोडे लोक धडपड करतात. त्यामुळे चारित्र्यहीन, अनीतिमान् लोक तात्कालिक दृष्ट्या का होईना, यशस्वी होतात. परंतु त्यांचे ते यश म्हणजे समाजाचे, किंबहुना मानव जातीचे अपयश असते. ही गोष्ट एकदा लक्षात आली की, त्या यशाचा बुडबुडा फुटून जातो. हिटलर, मुसोलिनी, फ्रँको, सालाझार, स्टॅलिन, माओ हे सारे कमी-अधिक कालखंडापुरते यशस्वी झालेच होते; पण त्यांच्या मृत्यूनंतर सर्वांनी त्यांना शिव्याशाप दिले. याचे कारण उघड आहे. ज्या जनतेच्या हितासाठी त्यांनी सत्ता मिळवली, त्या जनतेचाच त्यांना विसर पडला; आणि भ्रष्टाचाराच्या आहारी जाऊन ते जनतेचे दुष्मन बनले. इंदिराजींच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. देशाचे भले करण्यासाठी आपण सत्ताधारी बनत असल्याचा आव त्यांनी आणला आणि गरिबी हटाव व वीस कलमी कार्यक्रम यांचा डांगोरा पिटला; पण

अखेर ते एक नाटकच ठरले. एक कपटनाट्य ! जनतेशीच नव्हे तर, स्वत:शीही केलेली प्रतारणा ! कारण लोकहित राहिले बाजूला; आणि आपल्या हातातील सत्ता कशी टिकवून ठेवावयाची यावरच त्यांना सारे लक्ष केंद्रित करावे लागले, असे भावी इतिहासकारांना नमूद करावे लागेल. आज त्यांचे गुणगान करणारे विचारवंत हे स्वार्थी व लोभी भाटच होते, असे इतिहासात नोंदविले जाईल. आणीबाणीच्या काळात प्रख्यात चित्रकार श्री. एफ. एम. हुसैन यांनी इंदिराजींना दुर्गा व सीता बनवून त्यांची चित्रे काढली; आणि कायमची बदनामी त्यांच्या कपाळी बसली. सारी तपश्चर्या वाया गेली. इंदिराजींच्या दुष्कृत्यांकडे दुर्लक्ष करून जे बुद्धिवंत आज त्यांचा पाठपुरावा करीत आहेत त्यांची स्थितीही कालांतराने अशीच होणार आहे.

या संदर्भात दोन उदाहरणे सहज लक्षात येतात. मध्यप्रदेशाचे माजी मुख्यमंत्री श्री सकलेचा व राजस्थानचे शेखावत यांच्या भ्रष्टाचाराबद्दल फार गवगवा झाला होता. तेवढ्यावरून 'संघात हेच चारित्र्यसंवर्धन होते काय ?' असे कुत्सितपणे विचारले गेले. त्याचप्रमाणे कै. बाबाराव भिडे हे खुनी, बलात्कारी आरोपींची वकीलपत्रे घेत असत, म्हणून त्यांच्याविरुद्धही खूप काहूर उठले होते; परंतु त्याबाबतीत आक्षेपकांचे समाधान होईल असे स्पष्टीकरण कोणी देऊ शकले नव्हते. त्यामुळे संघाच्या लोकांविषयी एक प्रकारचा अविश्वास जनतेत पसरला होता.

तात्कालिक आणि चिरंतन यश

बलाढ्य मुगल बादशहांशी तुलना करता शिवाजी म्हणजे खरोखरीच 'पहाडका चुव्वा' ! पण आपल्या चारित्र्याच्या सामर्थ्यावर हाच 'चुव्वा' शिवछत्रपती बनून इतिहासात अजरामर झाला. त्याचे जीवन असंख्य देशभक्तांना प्रेरणादायक बनले. ज्यांनी त्याला कैदेतच टाकले, पराभूत केले ते औरंगाजेबासारखे बादशहा व त्यांचे सरदार इतिहासाच्या पानातच हरवले. शिवाजी मात्र घरोघरी जाऊन लोकांच्या अंत:करणात विराजमान झाला. आज इंदिराजी किंवा राजीवजी यांच्यासमोर कमरेत वाकून कुर्निसात करणारे, त्यांची थुंकी झेलणारे अथवा जोडे उचलणारेही मनातून त्यांची योग्य ती किंमत जाणतच असतात. बहुधा त्यांच्या अंत:पटलावर दयानंद, विवेकानंद, टिळक, गांधी, फुले, आंबेडकर, हेडगेवार, गोळवलकर यांच्यापैकी कुणाची तरी मूर्तीच कोरलेली असते. ती मूर्ती तिच्या चारित्र्यसंपन्नतेच्या बळावर तेथे स्थानापन्न झालेली असते. आपण ज्यांच्यासमोर लांगूल चालन करतो त्यांना व आपल्याला हातचलाखी, लांडीलबाडी, धूळफेक वगैरे करून तात्कालिक यश मिळू शकते; परंतु चिरंतन गौरवाची देणगी चारित्र्यसंपन्न व्यक्तीलाच मिळू शकते, अशी निदान भारतीय संस्कृतीची

तरी साक्ष व परंपरा आहे. भ्रष्टाचारी किंवा स्वैराचारी व्यक्ती इतरांना सदा सर्वकाळ फसवू शकत नाही. तिचे सत्य स्वरूप कधी ना कधी उघडे होतेच. त्यामुळे कर्नाटकातील भाजपचे पुढारी श्री ए. के. सुब्बय्या, श्री बलराज मधोक किंवा खासदार सुब्रह्मण्य स्वामी यांनी संघाच्या पुढाऱ्यांवर कितीही शितोडे उडविले आणि इतर सामान्य लोकांप्रमाणे संघाचे स्वयंसेवकही लाचलुचपत, काळाबाजार नफेबाजी वगैरे दुर्गुणांनी बरबटलेले असतात, असा कोणी कितीही प्रचार केला तरी त्यावर सर्वसामान्य लोकांचा विश्वास बसत नाही. याचे कारण असे की, भ्रष्टाचाराने बुजबुजलेल्या समाजात मूठभर का होईनात, सदाचारी असतात; आणि त्यांच्या जिवावरच जग चालते, अशी भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. असे सदाचारी संघात आहेत, अशी लोकांची भावना आहे.

जी गोष्ट समाजकारणी व राजकारणी माणसांना लागू पडते, तीच कलावंतांना व साहित्यिकांनाही लागू पडली पाहिजे. तशी ती लागू पडत नसेल तर एकूण मूल्यमापनातच काहीतरी गफलत होत असली पाहिजे, असे समजण्यास हरकत नाही. परंतु ज्याप्रमाणे आजकाल समाजकारण–राजकारण करणाऱ्यांना सच्चारित्र्याची गरज भासत नाही, त्याप्रमाणे कलावंतांनाही चारित्र्य ही कालबाह्य व म्हणूनच निरुपयोगी गोष्ट वाटत असल्यास नवल काय ?

+ +

'तरुण भारत' : १६·१०·८३

२५. नैतिकतेचा आधार

अलीकडे वर्तमानपत्रात आलेली एक बातमी वाचली आणि मला माझ्या लहानपणाची एक गोष्ट आठवली.

बातमीचे शीर्षक होते:–'दंगली टाळण्यास ईश्वरी कल्पनेचा लोप आवश्यक !' एका व्याख्यानाची ती बातमी होती. प्रा. गो. श्री. बनहट्टी यांनी खारदांडा येथे दिलेल्या व्याख्यानात असे प्रतिपादन केले होते की, "जातीय व धार्मिक दंगली थांबवायच्या असतील तर, सार्वजनिक जीवनातून ईश्वरी संकल्पनेचा पूर्णपणे लोप घडवून आणला पाहिजे. युरोपच्या इतिहासावरून धडा घेऊन 'ईश्वर' ही कल्पनाच सार्वजनिक जीवनातून हद्दपार केली पाहिजे." ती बातमी वाचताना लहानपणीची एक घटना माझ्या डोळ्यांसमोर तरळून गेली.

तळेगावच्या समर्थ विद्यालयाचे प्राचार्य न. ल. ऊर्फ नाना आठवले यांच्या घरी पुण्यास मी राहत होतो. १९३४ सालची गोष्ट. माझ्याबरोबर नगरचा सदाशिव (पोपट) भणगे हा तरुण राहत होता. मी नू. म. वि. मध्ये इंग्रजी चौथीत होतो व सदाशिव फर्ग्युसन कॉलेजात पहिल्या वर्षाला होता. तो विज्ञानाचा विद्यार्थी, पक्का नास्तिक व बुद्धिप्रामाण्यवादी. त्याही काळात निरीश्वरवादी, नास्तिक व बुद्धि-प्राणाण्यवादी असण्याची आजच्याप्रमाणेच फॅशन होती. मी नुकताच खेड्यातून शहरात आलेला व शहरी, सुसंस्कृत बनण्याचा प्रयत्न करणारा किशोर होतो. सदाशिवच्या गोष्टी ऐकून मी खूप प्रभावित होई; आणि आपणही त्याच्यासारखे नास्तिक बनले पाहिजे, असे मला वाटे. पण भिक्षुक कुटुंबात व जुन्या संस्कारांत वाढल्यामुळे नास्तिक बनण्याची कल्पना कितीही रोमँटिक वाटली तरी, ती अमलात

आणण्याची हिंमत मला होत नसे; आणि मला सदाशिवचा हेवा वाटे. पुढे नाना आठवल्यांचे आध्यात्मिक संस्कार आणि वर्ध्याचे आश्रमी वातावरण यांमुळे नास्तिक बनण्याची 'हसरत' तशीच राहून गेली. म्हणजे मी आस्तिक बनलो, असे नव्हे. मी काहीच बनलो नाही! आपण आस्तिक आहोत की नास्तिक याचा शोध घेण्यात च वयाची सत्तरी गाठली. आता तो मुद्दाच निरर्थक बनला आहे.

मी या निष्कर्षावर आलो की ज्याला एखादे काम करावयाचे असते, त्याने आस्तिक, नास्तिक, बुद्धिप्रामाण्यवादी वगैरे बनलेच पाहिजे, असा काही नियम नाही. त्याच्या स्वतःच्या जीवनातील नैतिकता व तळमळ यांचाच त्याला उपयोग होतो. वनवासी कल्याण आश्रमाच्या मंडळींनी आदिवासींना देवाधर्माचा आधार घेऊन दारूच्या व्यसनातून सुटण्याची प्रेरणा दिली; आणि त्यांच्या मुलांना संस्कृत स्तोत्रे शिकवून त्यांच्यातील न्यूनगंड काढून टाकला. याच्या उलट, जे लोक भौतिक फायद्यांचे आमिष असणारे कार्यक्रम घेऊन त्यांच्याकडे गेले त्यांनी त्यांना थोडेफार फायदे अवश्य मिळवून दिले; पण त्यांच्याजवळ नैतिकतेची शिदोरी नसल्यामुळे मिळालेले फायदे दारूत बुडून गेले. नैतिकतेच्या आधारावर घडवून आणलेल्या सुधारणा थोड्या असल्या तरी, त्या दीर्घ काळ टिकल्या.

या मध्यंतरीच्या पन्नास-साठ वर्षांच्या काळात माझ्या मनासमोर जे अनेक प्रश्न उभे राहिले आणि जे बहुतांशी निरुत्तरित राहिले, त्यांपैकी हा एक होता, की नैतिकतेचा आधार काय असतो? माणसाच्या आस्तिक किंवा नास्तिक असण्याचा त्याच्या नैतिक किंवा अनैतिक असण्याशी काही संबंध असतो काय? माणूस निरीश्वरवादी किंवा बुद्धिप्रामाण्यवादी बनला तर, तो अधिक नीतिमान बनेल काय? त्याग, सेवा, सत्य, करुणा यांचे आचरण म्हणजे नैतिकता आणि त्यांचा अभाव म्हणजे अनैतिकता असे स्थूलमानाने मी स्वतःपुरते ठरविले होते. नास्तिकता किंवा बुद्धिप्रामाण्य हे एखादे स्वयंभू जीवनमूल्य आहे, असे मला कधी वाटले नाही. त्यामुळे सारा समाज आजही नास्तिक बनला तर तो संघर्षमुक्त होईल, सुखी होईल, असे ठामपणे सांगण्यास माझे मन तयार होत नाही. रशिया, चीन वगैरे साम्यवादी राष्ट्रे आणि इंग्लंड-अमेरिकेसारखी भांडवलशाही राष्ट्रे यांचा अनुभव काय सांगतो? नास्तिकता व बुद्धिप्रामाण्य यांच्या कडक शिस्तीत सत्तर वर्षे काढलेल्या आर्मेनियन ख्रिश्चन साम्यवाद्यांना आपल्या अझरबैजानी मुस्लिम देश-बांधवांचा सहवासही अचानक असह्य वाटू लागला, याचा अर्थ काय? गोऱ्या ख्रिश्चन रशियनांना अश्वेत मुस्लिम रशियनांची आजही भीती वाटते. त्यांची संख्या भरमसाट वाढून ते आपल्याला गिळंकृत करतील, अशी धास्ती त्यांना वाटते; आणि हे सारे सार्वजनिक जीवनातून ईश्वरी संकल्पनेचा संपूर्ण लोप घडून आलेल्या समाजात पाहायला मिळत आहे!

हुकूमशाहीला सार्वजनिक जीवनातून देव, धर्म यांचे उच्चाटन सक्तीने करता येते. लोकशाहीत ते लोकांच्या कलानेच करावे लागते. त्यासाठी प्रथम त्यांची मनोभूमी तयार करावी लागते. त्या बाबतीत फार घिसाडघाई केल्यास उलटाच परिणाम होतो. लोकशिक्षण करावयाचे म्हणजे सातत्याला फार महत्त्व असते. गांधींचे अनुयायी एकच काम घेऊन वर्षानुवर्षे एकाच जागी स्वतःला गाडून घेत. त्यातून थोडाफार परिणाम दिसून येई. समाजपरिवर्तन असे झटपट होत नसते, ही गोष्ट लक्षात न घेतल्यामुळे आपण अनेकदा लोकांना निष्कारण आपले शत्रू मात्र बनवून टाकतो.

कधी कधी माझ्या मनात विचार येतो, एखाद्या रोगाचे काहीच निदान होत नाही, असे दिसले की, आजकालचे डॉक्टर सांगतात, 'ती ॲलर्जी आहे!' कसली ॲलर्जी? ती का झाली? तिच्यावर इलाज काय? याची उत्तरे त्यांच्याजवळ नसतात. मग ते सुचतील ते प्रयोग करू लागतात. तसेच काहीसे आमच्या विचारवंतांचे झाले आहे. बत्तीस रोगांवर एकच रामबाण उपाय म्हणजे देव व धर्म यांचे उच्चाटन. त्यातही पुन्हा गमतीची गोष्ट अशी की, हा उपाय सुचविणारे विद्वान स्वतःला फुले–आंबेडकर यांचे अनुयायी म्हणवतात! त्यांना याही गोष्टीचा विसर पडतो की, खुद्द फुले–आंबेडकर हे नास्तिक नव्हते. देव आणि धर्म या संकल्पनांचा त्याग त्यांनी केलेला नव्हता. त्या संकल्पनांवरील जळमटे काढून टाकून त्या परिशुद्ध करून घ्याव्यात एवढेच त्यांचे म्हणणे होते. भक्त आणि परमेश्वर यांमध्ये भटजीसारख्या दलालांची जरूर नाही, यावर त्यांचा भर होता. त्यातून काही विनोद निर्माण झाले. भटांची गुलामगिरी नको, म्हणून शाहू महाराजांनी आपले स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू निर्माण केले. याचा अर्थ एवढाच की, ब्राह्मण दलाल काढून त्यांच्या जागी त्यांनी अब्राह्मण दलाल आणले!

पुन्हा आम्ही मूळ मुद्यावर येतो. सामाजिक जीवनातून देव, धर्म यांची संकल्पना नाहीशी करावयाची तर, तिचा प्रारंभ वैयक्तिक जीवनापासूनच करावा लागेल. वैयक्तिक जीवनात ती कायम राहिली तर, तिचा प्रभाव या ना त्या स्वरूपात सार्वजनिक जीवनावर पडल्याखेरीज राहणार नाही. बरे, वैयक्तिक जीवनातून तिचे उच्चाटन केल्यास माणूस अधिक त्यागी, सेवाभावी, सत्यनिष्ठ, करुणामय बनेल याची काही खात्री देता येते काय? माझा मित्र सदाशिव याची माझी पुन्हा कधी भेट झाली नाही. त्याचे नावही माझ्या ऐकण्यात आले नाही. त्यावरून मी असा निष्कर्ष काढला की, बुद्धिप्रामाण्याची कास धरल्यामुळे त्याचा वैयक्तिक विकास जो काही झाला असेल तो असो. पण समाजावर त्याचा काही परिणाम झाला नसावा. तसे काही झाले असते; तर त्याची कुणकुण मला नक्कीच लागली असती.

याच्या उलट विवेकानंद, टिळक, गांधी, अरविंद, दयानंद, श्रद्धानंद वगैरे ज्या युगपुरुषांनी फार मोठे समाजकार्य केले, त्यांना नास्तिक किंवा धर्महीन बनण्याची गरज भासली नाही, किंबहुना ते ईश्वरनिष्ठ व धर्माचरणी असल्यामुळे जनसामान्यांना ते विश्वासार्ह वाटले, आपले वाटले असे म्हणता येते. ज्यांना आपल्या बुद्धिप्रामाण्य-वादाचा अभिमान असतो, त्यांच्यापासून सामान्य जनता कशी दूर राहते, याचे उत्तम उदाहरण सावरकरांचे आहे. खरे म्हणजे बुद्धिप्रामाण्य हा एक प्रकारचा बौद्धिक विलास असतो. त्याचा एक खास नशा असतो. त्या नशेत गुंग होऊन राहण्यास काहीच हरकत नाही. मात्र आपण एवढे थोर विचारवंत असून अज्ञ जनता आपल्याकडे अशी पाठ का फिरवते याचे कोडे त्यांना उलगडले पाहिजे; व त्याबद्दल तक्रारीचा सूर काढण्याची इच्छा त्यांना होऊ नये. परंतु तसे घडत नाही. सावरकरांना काय वाटत होते याची मला कल्पना नाही; परंतु त्यांच्या भक्तांना व अनुयायांना मात्र आपल्या नेत्यांची व गुरूची उचित कदर केली गेली नाही, याचे अत्यंत दुःख होत असल्याचे त्यांच्या बोलण्या-लिहिण्यातून दिसून येते. आपल्या पुढाऱ्याचे असे अवमूल्यन होण्यास तो ढोंगी गांधी कारणीभूत होता व अजूनही त्याचीच पकड जनमानसावर असल्यामुळे सावरकरांची थोरवी जगाला कळत नाही, या विषयी त्यांची खात्री असल्यामुळे गांधींना शिव्याशाप देण्यात त्यांची सारी शक्ती खर्च होत असते. फुले–आंबेडकर व मार्क्स–लेनिन–माओ यांच्या भक्तांची भूमिकाही काहीशी अशीच असते; परंतु ते अधिक व्यवहारचतुर असल्याने 'गांधी'ला प्रत्यक्ष शिव्याशाप देण्याऐवजी त्याचे नाव टाळून त्याला अनुल्लेखाने मारण्याचा मार्ग त्यांनी अवलंबिलेला दिसतो.

परंतु याने मूळ प्रश्न सुटत नाही. विवेकानंदांपासून गांधींपर्यंत देव–धर्म मानणाऱ्या किंवा अध्यात्मवादी पुढाऱ्यांच्या संपर्कात आलेल्या लोकांवर नैतिकतेचा थोडाफार का होईना प्रभाव पडला. त्यातून अप्पासाहेब पटवर्धन, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, साने गुरुजी, लोहिया, जयप्रकाश, नरेंद्र देव, नानाजी देशमुख, ठक्कर बाप्पा, वियोगी हरी, शिवाजीराव पटवर्धन, बाबा आमटे, काकासाहेब कारखानीस, आचार्य भिसे वगैरे असंख्य कार्यकर्ते तयार झाले. त्या बाबतीत या महापुरुषांची आस्तिकता व आध्यात्मिकता यांचा अडथळा आल्याचे दिसत नाही. याच्या उलट, आज ज्या नास्तिकतेचा व बुद्धिप्रामाण्यवादाचा एवढा उदो उदो केला जातो, त्याच्या प्रेरणेतून असे त्यागी, सेवाभावी कार्यकर्ते का पुढे येत नाहीत ? आजचा तरुण 'आमच्यापुढे उच्च आदर्शच नाहीत' अशी तक्रार करताना का दिसतो ?

मला वाटते, जुन्या काळचे पुढारी व आजचे नेते यांमध्ये एक महत्त्वाचा फरक आहे. विवेकानंद, टिळक, गांधी यांनी लोकांना जे करायला सांगितले ते आधी स्वतः आचरणात आणले. त्याचा परिणाम त्यांच्या अनुयायांवर झाला. त्यांची

नैतिकता त्यांच्या अनुयायांमध्ये उतरली. याच्या उलट जे पुढारी–मग ते आस्तिक असोत की नास्तिक, धर्मवादी असोत की निधार्मिक– सत्ता, संपत्ती, सवलती व सूड यांचीच भाषा सतत बोलत राहिले. त्यांच्या अनुयायांना सेवा, समर्पण, साधेपणा यांचे आकर्षण कसे वाटणार ? तेच आता नेते बनले आहेत. त्यांच्या लेखी नैतिकता हा केवळ एक निरर्थक व निरुपयोगी शब्द बनला आहे. अशा लोकांना सत्ता व संपत्तीच्या धूर्त दलालांनी सवलतीची आमिषे दाखवून विकत घेतले तर, त्याबद्दल तक्रार करण्यात काय अर्थ ? ज्यांनी गांधींच्या साध्यसाधनविवेकाची खिल्ली उडविली व नैतिकतेचा मूळ आधारच नष्ट केला. त्याचा परिणाम म्हणून आज सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळलेला दिसत असेल तर, खरे म्हणजे त्या लोकांनी त्याबद्दल ओरड करण्याऐवजी हर्षोल्लासच साजरा केला पाहिजे !

* *

'साधना' : २५·६·८८

२६. चोरपावलांनी येत असलेली क्रांती !

हिंदू धर्म, समाज आणि भारतीय संस्कृती यांच्या विरुद्ध विद्रोहाची भाषा बोलणारे आणि स्त्रियांच्या गुलामगिरीबद्दल ऊर बडवून आक्रोश करणारे मुक्तीवाले स्त्री-पुरुष यांची भाषणे जेव्हा मी ऐकतो, आणि त्यांचे लिखाण जेव्हा मी वाचतो, तेव्हा मी अक्षरशः चक्रावून जातो. हे लोक कोणत्या देशातल्या व कोणत्या समाजातल्या वस्तुस्थितीविषयी बोलतात तेच मला कळत नाही. कधी कधी वाटते की, पवनचक्कीला राक्षस समजून तिच्यावर हल्ला चढविणारे हे डॉन क्विक्झोट बहुधा काल्पनिक जगातच वावरत असावेत. परंतु नंतर असे लक्षात येते की, ते ज्या समाजाची व समस्यांची चर्चा करतात त्यांच्याशी आपला कधी संबंधच न आल्यामुळे आपल्याला त्यांची भाषा कळत नसावी; आणि त्यांची उक्ती व कृती(?) आपल्याला कृत्रिम, परकी, नाटकी व खोटी वाटत असावी. समाजातील रुढि-ग्रस्तता, अंधश्रद्धा, मागसलेपणा वगैरे गोष्टींचा अनुभव एकेकाळी मीही घेतला होता; पण आता त्यांचा मागमूसही मला माझ्या परिसरात आढळत नाही. जुन्या काळातील सोवळे–ओवळे, विटाळ-चांडाळ, व्रतेवैकल्ये उपास-तापास वगैरे गोष्टी आता नमुन्यादाखलही शिल्लक राहिलेल्या नाहीत. त्यामुळे या शब्दांचे अर्थ जेव्हा माझी नातवंडे विचारतात, तेव्हा त्यांना ते कसे समजावून सांगावेत तेच अनेकदा कळत नाही. आमच्या लहानपणी जातपात, उच्चनीचता वगैरे गोष्टी ही प्रत्यक्ष जीवनाची अभिन्न अंगे होती. त्यामुळे त्या सहजासहजी अंगवळणी पडत आणि आमच्यासारख्या काही समताप्रेमी मुलांना त्यांच्याविरुद्ध बंड करण्याचीही प्रेरणा मिळे; परंतु आमच्या नातवंडांना त्या संकल्पना कळतच नाहीत. ब्राह्मण–अब्राह्मण,

हिंदू–मुसलमान–ख्रिश्चन, देशस्थ–कोकणस्थ–कऱ्हाडे–प्रभू–सारस्वत, त्यांच्यांतील फरक, आपपरभाव व श्रेष्ठ–कनिष्ठता हे काय गौडबंगाल आहे याचा उलगडाच त्यांना होत नाही. पोशाखाच्या बाबतीत तर जणू आता धरबंदच उरलेला नाही. कोणी कसलेही कपडे वापरले तरी कोणाला त्याने धक्का बसत नाही. त्यामुळे आमच्या लहानपणी चमनगोटा करण्याऐवजी इंग्रजी फॅशनचे केस कापून बोडक्याने फिरणे अथवा तरुणींनी नऊवारी साडीऐवजी पाचवारी बिनकासोटचाची साडी नेसणे ही केवढी मोठी क्रांती समजली जात असे, ते जेव्हा मी माझ्या नातवंडांना सांगतो तेव्हा आपले आजी-आजोबा किती मागसलेले होते याचे त्यांना हसू येते आणि ती उद्‌गारतात, 'ओह ! हाऊ फँटॅस्टिक !'

देवाकडे वैधव्याची मागणी ! सती सावित्रीला नकार !

परंतु कधी कधी चोरपावलांनी आपल्या घरात शिरलेली मानसिक क्रांती खुद्द मलाच असा काही धक्का देऊन जाते की, क्षणभर मीही थक्क होऊन जातो. गडबडून जातो. नुकतीच घडलेली एक घटना सांगतो, म्हणजे मला काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होईल. तसे पाहिले तर ही काही अगदीच अद्‌भुत किंवा अनोखी घटना म्हणता येणार नाही. तुमच्या-आमच्या मनात तसे विचार नक्कीच येत असतील. पण आपण ते सहसा बोलून दाखवत नाही. ते बोलून दाखवले गेले, हीच ती मी म्हणत असलेली क्रांती होय.

त्याचे असे झाले. माझ्या पत्नीला हृदयविकाराचा झटका आला होता. डॉक्टरीणबाईंनी तपासून तिला ताबडतोब हॉस्पिटलच्या इंटेन्सिव्ह केअर विभागात हलविण्याची सूचना केली. त्याप्रमाणे चिरंजीवांनी गाडी काढली. सौभाग्यवतीने तिच्या देवघरात (म्हणजे कोपऱ्यातल्या सिमेंटच्या देव्हाऱ्यासमोर) जाऊन भरल्या डोळ्यांनी क्षणभर देवाची प्रार्थना केली; आणि ती शांत चित्ताने तिला उचलून नेणाऱ्या खुर्चीत बसली. चार दिवस अतिदक्षता विभागात काढून धोका टळल्याची खात्री झाल्यावर जेव्हा ती इस्पितळाच्या मोकळ्या खोलीत आली, तेव्हा तिच्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या सर्वांचा जीव भांड्यात पडला. पुढे जेव्हा ती मोकळेपणाने बोलण्याइतकी बरी झाली, तेव्हा मी तिला विचारले, "इस्पितळात जाताना तू तुझ्या देवाजवळ काय मागितलस ?" वस्तुतः हा प्रश्नच वेडपटपणाचा होता. आजारी माणूस देवाजवळ दुसरे काय मागणार ? "देवा, मला लवकर बरे कर !" एवढेच म्हणणार की नाही ? पण माझ्या प्रश्नात थोडासा मिस्किलपणाही होता. आमच्या १०–१२ माणसांच्या कुटुंबात देव, देव्हारा, पूजा वगैरे गोष्टी फक्त सौभाग्यवतीपुरत्याच मर्यादित आहेत. इतर कोणीही तिकडे लक्ष देत नाही. काहीजण शुद्ध नास्तिक आहेत, तर काहींना त्यासंबंधी विचारच करावासा वाटत नाही.

म्हणून आजीबाईंची देवपूजा ही काहीशी गमतीची व कधी कधी चेष्टेची गोष्ट बनते. त्या पार्श्वभूमीवर मी तो प्रश्न विचारला होता. सौभाग्यवतीला देवाच्या प्रश्नावरून केल्या जाणाऱ्या थट्टेची सवय असल्याने ती तिकडे नेहमीच दुर्लक्ष करते. त्याप्रमाणे माझ्या प्रश्नातील खोच लक्षात न आल्यासारखे दाखवून ती म्हणाली, "आपण काही बरी होऊन पुनः घरी परत येणार नाही, असं मला वाटत होतं. म्हणून स्वतःसंबंधी देवाजवळ मला काही मागायचंच नव्हतं. मी तुमच्यासाठी देवाची प्रार्थना केली."

"माझ्यासाठी ? ती काय बुवा ?" मी आश्चर्याने विचारले.

"मी देवाला सांगितलं, मी गेल्यानंतर यांना ताबडतोब वर पाठवून दे." तिने गंभीरपणे सांगितले.

मी तर एकदम उडालोच ! सतीचा व सावित्रीचा आदर्श समोर ठेवून आपण अहेवपणी, मुला-नातवंडांनी भरलेल्या घरातून आनंदाने जगाचा निरोप घेत आहोत याबद्दल परमेश्वराचे आभार मानून शांत चित्ताने त्याचा निरोप घेत, मागे उरलेल्यांना तू भरपूर आरोग्य व आयुष्य दे, असे काहीतरी तिने मागितले असावे अशी माझी कल्पना होती. त्याऐवजी तिने भलतीच मागणी केली होती. ती ऐकून मी म्हणालो, "असली कसली जगावेगळी मागणी केलीस तू ? नवऱ्याचा मृत्यू इच्छिणारी विचित्रच बाई आहेस की."

आता तिलाही थट्टा करण्याची लहर आली. ती हसून म्हणाली, "अहो, साधी गोष्ट आहे. गेली पंचेचाळीस वर्षं मी तुमच्याबरोबर सुखदुःखात घालविली. त्यामुळं तुमच्या सहवासाची मला इतकी सवय झाली आहे की, तुमच्याशिवाय मला क्षणभरही करमणार नाही. म्हणून तुम्हाला लवकरात लवकर माझ्याकडे पाठवून द्यायची मी देवाला प्रार्थना केली. निव्वळ माझा स्वार्थ मी पाहिला."

"छे ! काहीतरीच काय बोलतेस ?" मी म्हणालो.

यावर ती गंभीरपणे उत्तरली, "अहो, तुम्ही स्वतःला जेवढे ओळखत असाल त्याहून अधिक मी तुम्हाला ओळखते. तुम्ही माझ्याशिवाय सुखानं जगू शकणार नाही. तुमचे फार हाल होतील. ते होऊ नयेत म्हणून मी देवाकडे ते मागणं मागितलं. एरव्ही मी देवाला अशीच प्रार्थना करीत असे की, "माझ्या डोळ्यांदेखत यांना तू घेऊन जा. मग मला केव्हाही नेलंस तरी माझी हरकत नाही." तुमच्याशिवाय जगण्याचं सामर्थ्य माझ्यात आहे. त्याबाबतीत तुम्ही माझ्यापेक्षा फार दुबळे आहात. तुम्ही सारं आयुष्य माझ्या आधारानंच जगलात, याचा मी अनुभव घेतलाय; म्हणून माझ्यामागे तुमचं कसं होईल याची मला नेहमीच काळजी वाटत आली आहे."

"अग पण तुझ्या सेवातत्पर प्रेमळ सुना आहेत, माझी लाडकी मुलगी आहे, कर्तव्यनिष्ठ मुलगे आहेत. ते मला काहीही कमी पडू देणार नाहीत. तू विनाकारण

माझी काळजी करू नकोस." मी तिला सांत्वन देत म्हणालो.

"तुमची मुलं, नातवंडं, सुना सगळीच तुमच्यावर प्रेम करतात हे काय तुम्ही मला सांगायला हवं ? ती सारी तुम्हाला अगदी फुलासारखं, मुलासारखं जपतील याविषयी मला मुळीच शंका नाही; पण तरीही तुमचं मन संसारात रमणार नाही. तुम्ही बाहेरच्या कामात स्वतःला गुंतवून घेतलं असतं तर काळजीचं काही कारण नव्हतं. तरीही तुमचा स्वभाव लक्षात घेता तुम्हाला माझी उणीव पदोपदी जाणवली असती; पण तुम्ही तर बाह्य जगाशी असलेले सारे संबंध तोडून टाकून स्वतःला घरात कोंडून घेतलं आहे. त्यातून बाहेर पडून पुन्हा समाजकार्यात स्वतःला गुंतवून घेणं आता तुम्हाला जमणार नाही. माझं तसं नाही. मी जरी संसारातून मन काढून घेतलं असलं तरी, घरातल्या लहानथोर व्यक्तींशी माझे स्नेहसंबंध अतूट आहेत. तुमच्यासारखी मी घरच्या माणसांपासून अलिप्त झालेली नाही. म्हणून तुमच्याशिवाय जगणं मला तुमच्याइतकं अवघड जाणार नाही. येणाऱ्या परिस्थितीशी कसं जमवून घ्यायचं याचं तर मला बाळकडूच मिळालंय. त्यामुळंच तर सनातनी वातावरणातून बाहेर पडून, सुधारक वातावरणात आले; आणि तुमच्यासारख्या रुक्ष, राकट माणसाशी आणि गोव्याहून अगदी भिन्न असलेल्या मराठी परिस्थितीशी मी आनंदानं जुळवून घेतलं. शिवाय माझा देव माझ्या मदतीला कायम राहणारच आहे. देवाधर्माशी तुम्ही सदा भांडतच राहिलात; त्यामुळं तशी काही सोय तुम्हाला नाही. म्हणून सर्व काही असूनही आपण निराधार आहोत असं तुम्हाला वाटत राहील. यासाठीच देवाकडे वैधव्याचं विचित्र मागणं मी मागत असते !"

चोरपावलांनी आलेली क्रांती

तिचे ते विश्लेषणात्मक विवेचन ऐकून मी खरोखरीच थक्क झालो. गोव्यासारख्या बंदिस्त समाजातून आलेली ती एक अल्पशिक्षित (जेमतेम चार इयत्ता शिकलेली) मुलगी होती. येथे आल्यानंतर तिच्यामध्ये एवढी आमूलाग्र क्रांती झाली असेल याची मलाही कल्पना आली नव्हती वस्तुतः तिने जी गोष्ट बोलून दाखविली ती अनेक वर्षांपासून माझ्या मनातही घोळत होती. लग्न झाल्यानंतर हळूहळू तिने सारा संसार आपल्या ताब्यात घेतला; आणि मी परावलंबी होत गेलो. म्हणजे ती मुक्त होत गेली आणि मी बद्ध होत गेलो. त्यामुळे तिच्याशिवाय जगण्याची कल्पनाच मला असह्य होऊ लागली. तिच्याशी बोलताना कधी कधी सूचकपणे मी तिला तसे सांगतही असे; परंतु 'तुझ्या आधी मरावे अशी माझी इच्छा आहे' इतक्या स्पष्ट शब्दांत फारच क्वचित मी सांगे. अर्थात् तिला ते कळत होते; आणि त्याच्याशी ती सहमतही होती. तिनेच सारा संसार उभा केला असल्यामुळे त्यातून तिने अध्यात्माच्या ओढीने मन काढून घेतले असले तरी, तो संसार तिला सोडायला तयार नाही. मुले, सुना व नातवंडे तिच्यावर जिवापाड

प्रेम करीत असल्याने तिच्या जीवनात माझ्या अभावी पोकळी निर्माण होण्याची शक्यता फार कमी आहे. उलट माझ्या सरबराईत गुंतून पडावे लागल्याने तिच्या पायात ज्या मानसिक, शारीरिक बेडच्या पडल्या आहेत त्या तुटून पडल्यानंतर तिला मनाप्रमाणे अधिक मुक्त जीवन जगता येईल, ज्या इच्छा–आकांक्षा माझ्या आवडी-नावडीचा विचार करून तिला दाबून टाकाव्या लागल्या होत्या, त्या पुऱ्या करता येतील, अशा प्रकारचे, माझ्यातील तिच्यासंबंधीची अपराधभावना व्यक्त करणारे विचार माझ्या मनात घोळत असत. ते स्पटपणे सांगणे म्हणजे 'वैधव्य हा शाप नसून वर आहे असे समज' असे सांगण्यासारखे होते. तेवढे धैर्य, बहुधा माझ्या मनावरील जुन्या संस्कारांमुळे, मला होत नव्हते. पण ती तर माझ्यापुढे निघून गेली होती. वैधव्यासंबंधी परंपरागत भयानक कल्पना तिने कधीच मनातून काढून टाकली होती; आणि शुद्ध व्यावहारिक भूमिका घेतली होती. किंबहुना इतर अनेक बाबतीत ती कल्पनातीत व्यवहारवादी बनली असल्याचे आढळून येते. एखाद्या स्त्रीचा तिच्या नवऱ्याकडून छळ होत असल्याचे कळताच, तिने सरळ घटस्फोट घ्यावा, असा सल्ला ती उघडपणे देऊ शकते. एका बाजूने ती अशी इहवादी बनली आहे. सोवळे-ओवळे, शिवाशिव, जात व धर्म यांचे अडथळे, व्रतेवैकल्ये यांच्या काटेरी कुंपणांतून ती कधीच बाहेर पडली आहे; तर दूसऱ्या बाजूने ध्यानयोग, नामजप, आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन–मनन–चिंतन यांविषयीचे तिचे आकर्षण वाढत आहे. म्हणजे एकीकडून ती बुद्धिप्रामाण्यवादी बनली आहे, तर दुसरीकडून भाविक श्रद्धाळू बनली आहे. मला तर ते एक कोडेच वाटते. ज्यांनी तिला गोव्यातून बाहेर येण्यापूर्वी किंवा इकडे आल्याबरोबर पाहिले होते, त्यांना तिच्यात झालेले हे परिवर्तन म्हणजे आमूलाग्र क्रांतीच आहे असे वाटते; आणि ते तसे बोलूनही दाखवितात. माझ्याशी लग्न केल्याबद्दल तिच्या (सारस्वत) जातवाल्यांनी व विशेषतः खानदानवाल्यांनी केवढे काहूर माजविले होते ! तिच्या वडिलांना त्यांनी असा उघडउघड ठपका दिला होता की " एका भिकारड्या भटाला आपली मुलगी देण्यापेक्षा तुम्ही तिला आडात का ढकलून दिलं नाही ? आम्हाला सांगितलं असतं तर, आम्ही तिला जातीतला मुलगा सहज मिळवून दिला असता." असल्या वातावरणातून आलेली स्त्री स्वतःच्या मुलीचे लग्न दूरच्या कुर्गी तरुणाशी आनंदाने लावून देते, ही खरोखरीच एक मोठी क्रांती होती यात शंका नाही. हे एक प्रातिनिधिक उदाहरण समजता येईल. अशा प्रकारची क्रांती अनेक व्यक्तींच्या जीवनात नक्कीच घडून आलेली असणार यात शंका नाही. मात्र ती क्रांती चोरपावलांनी आलेली असल्याने तिची चाहूल इतरांना फारशी लागत नसणार आणि ते परंपरागत स्थूल क्रांतीलाच आवाहन करीत राहणार ! ✦ ✦

'सोबत' : १६·४·८९

२७. इस्लाम आणि जिझिया

औरंगजेबासारख्या धर्मवेडचा बादशाहांनी हिंदूंवर जिझिया कर लादल्यामुळे भारतात जिझिया करासंबंधी थोडीफार माहिती आपल्याला असते; परंतु या कराचे मूळ स्वरूप काय आहे, इस्लामशी त्याचा काय संबंध आहे, आधुनिक काळात या कराचे काय स्थान असू शकते, यासंबंधी आपल्याला फारच थोडी माहिती असते. सामान्यतः या विषयाकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीनेच पाहिले जाते. ज्यांच्यावर हा कर पूर्वी लादला होता त्यांना त्यातील फक्त दोषच दिसतात; तर ज्यांनी हा कर लादला होता त्यांना त्यातील गुणच दिसतात आणि ते त्याचे समर्थन करतात. यामुळे वस्तुस्थिती कळणे अवघड जाते.

परंतु साठ वर्षांपूर्वी एका ग्रीक तरुणाने अत्यंत परिश्रम घेऊन लिहिलेल्या एका अभ्यासपूर्ण व तटस्थ ग्रंथातून या विषयाची संपूर्ण कल्पना येते. या तरुणाचे नाव निकोलस पी. अघ्निदेस (Aghnides) असे असून 'वित्तव्यवस्थेचे इस्लामी सिद्धांत' (Mohammedan Theories of Finance) हा त्याचा ग्रंथ १९१६ साली प्रसिद्ध झाला होता. या ग्रंथात त्याने मुख्यतः अर्थशास्त्रीय दृष्टिकोणातूनच इस्लामी धर्मशास्त्राचे विश्लेषण केले आहे. त्याच्या विवेचनात कोठेही अनुकूल अथवा प्रतिकूल जातीयवादी दृष्टी प्रभावी झाल्याचे आढळून येत नाही. प्रस्तुत लेखात मुख्यतः ह्या ग्रंथाचा उपयोग केला आहे.

मुस्लिम धर्मशास्त्राप्रमाणे कोणाही मुस्लिम राज्याच्या महसुलाची दोन भागांत विभागणी होते. पहिला भाग धार्मिक महसुलाचा असून, दुसरा धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) महसुलाचा असतो. धार्मिक महसूल मुसलमानांकडून वसूल केला जातो,

आणि त्यात मुख्यतः ' जकात 'विषयक करांचा समावेश होतो. (प्रत्येक मुसलमानाने दरसाल आपल्या संपत्तीचा एकचाळिसांश भाग (अथवा अडीच टक्के) गोरगरिबांना दानधर्म म्हणून द्यावयाचा असतो. त्याला जकात असे म्हणतात.) याच्या उलट धर्मनिरपेक्ष महसूल हा मुख्यतः बिगर मुस्लिम प्रजेकडून वसूल केला जातो आणि त्यात जिझिया, खराज (किंवा खिराज) व लढाईतील लुटीचा (लढाईमध्ये काफिरांकडून बळजबरीने घेतलेल्या संपत्तीचा) पाचवा भाग (याला गनीमत असे म्हणतात), खाणी व डबोले (निखात-निधी– treasure-trove) यांचा समावेश होतो.

मुस्लिम राज्यात राहणाऱ्या बिगर मुस्लिमांना त्या देशाच्या संरक्षणव्यवस्थेत काही स्थान नसते. त्यामुळे त्यांच्या प्राणांच्या व संपत्तीच्या संरक्षणाची जबाबदारी मुस्लिम शासकांवर पडते. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी लागणारा खर्च बिगर मुस्लिमांकडूनच वसूल केला जातो. तो ज्या कराच्या रूपात असतो त्यालाच जिझिया असे म्हणतात. ' जझा ' म्हणजे भरपाई अथवा परतफेड, मोबदला, बऱ्या-वाईट कर्माचे फळ, या शब्दापासून जझिया किंवा जिझिया हा शब्द बनला आहे. वस्तुतः हा अर्थ मान्य केल्यास निदान भारतात तरी हा कर बसविणे समर्थनीय ठरत नव्हते. कारण, येथील मुस्लिम राज्यकर्त्यांच्या सैन्यात हिंदू सैनिकच नव्हे, तर सेनापतीही फार मोठ्या संख्येने असत. म्हणजे लष्करभरतीपासून मुक्त राहण्याचा फायदा हिंदूंना मिळत नव्हता. शिवाय ज्या हिंदूंच्या संरक्षणाची जबाबदारी हे मुस्लिम राज्यकर्ते पार पाडीत नसत, त्यांच्याकडूनही ते जिझिया कर वसूल करीत. परंतु या सोज्ज्वळ हेतूखेरीज दुसराही एक घृणित उद्देश या करामागे होता; आणि भारतात तरी त्याचेच प्राबल्य होते. तो म्हणजे बिगर मुस्लिमांना अपमानित करण्याचा, त्यांनी इस्लामचा स्वीकार न केल्याबद्दल त्यांना शिक्षा करण्याचा. इस्लामी राज्यात राहणाऱ्या बिगर मुस्लिम प्रजेला जिम्मी असे म्हणतात व हे जिम्मी दुय्यम प्रतीचे नागरिक समजले जातात. त्यांच्यावर शिक्षा म्हणून जी डोई-पट्टी बसविली जाते तिलाच जिझिया कर असे म्हणतात.

यासंबंधी प्रत्यक्ष कुराणाचा आदेश काय आहे ? कुराणाच्या सूराए तौबा या नवव्या अध्यायातील एकोणतिसावी आयत (श्लोक) अशी आहे : " ज्या लोकांना (परमेश्वराकडून) धर्मग्रंथ देण्यात आला आहे ते जर देव मानत नसतील, अंतिम निवाड्याच्या दिवसावर (कयामतवर) त्यांची श्रद्धा नसेल, अल्लाच्या पैगंबराने ज्या गोष्टी निषिद्ध ठरविल्या आहेत, त्या ते निषिद्ध मानत नसतील आणि खऱ्या धर्माचे पालन करीत नसतील, तर तुम्ही त्यांच्याशी युद्ध करा. त्यांनी अपमानित होऊन स्वतःच्या हातांनी जिझिया देईपर्यंत ते युद्ध चालू ठेवा." हा जिझिया देण्याने जिम्मींना दोन हक्क प्राप्त होतात. ते असे की, त्यांना संरक्षण मिळते आणि कोणा कडूनही त्यांचा छळ होणार नाही, अशी हमी मिळते. पहिल्या हक्काने ते पाल्य

(महरूस– protege) आणि दुसऱ्या हक्काने ते सुरक्षित (अमीन) बनतात.

वर उल्लेखिलेली कुराणातील आयत इतकी अस्पष्ट व संदिग्ध आहे, की तिचा अर्थ लावण्याच्या बाबतीत मुस्लिम विद्वानांमध्ये मतभेद झाले नसते तरच आश्चर्य. हनफी पंथाच्या विद्वानांचे मत असे आहे की, जिम्मींना मुसलमानांनी ठार न मारता जीवदान दिल्याबद्दल त्यांनी मुसलमानांना दिलेला मोबदला म्हणजे जिझिया होय. या संदर्भात अल् सरख्सी याचे म्हणणे असे की, "जो काफिर (बिगर मुस्लिम) मुस्लिम राज्यात राहतो तो जोपर्यंत इस्लामचा स्वीकार करीत नाही तोपर्यंत त्याचा पाणउतारा करण्यासाठी व त्याला अद्दल घडविण्यासाठी त्याच्याकडून जिझिया कर वसूल केला जातो." काफिरपणा हा किती लज्जास्पद आहे आणि इस्लाम हा किती सामर्थ्यवान आहे हे त्याच्या मनावर बिंबविण्याचे काम जिझिया कर करतो.

इस्लामी राज्यात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्या राज्याच्या संरक्षणासाठी सदैव तयार असावे लागते. तथापि त्यांनी इस्लामचा स्वीकार न केल्यामुळे त्यांना अशा प्रकारे सहकार्य देता येत नाही; कारण युद्धाच्या प्रसंगी ते शत्रूला जाऊन मिळतील अशी शक्यता असते. परिणामतः वैयक्तिक सेवेऐवजी त्यांनी आपल्या संपत्तीचा काही भाग देशाच्या रक्षणासाठी लढणाऱ्या मुस्लिम सैनिकांवर खर्च करण्याकरता द्यावयाचा असतो.

बिगर मुस्लिम (काफिर) हे मुस्लिम राज्यात उपरे समजले जातात. त्यामुळे काही मुस्लिम विद्वानांच्या मते त्यांच्यावर लादण्यात येणारा जिझिया हे त्या राज्यात राहण्याचे भाडे असते. यावर निकोलसचे म्हणणे असे की, "यांपैकी अल् सररख्सीचे मत अधिक ग्राह्य वाटते. कारण जिझिया हे केवळ भाडेच असते तर ते मुस्लिम राज्यात राहणाऱ्या स्त्रिया व मुले यांच्यावरही ते लागू झाले असते. परंतु स्त्रिया व मुले यांच्यावर देशरक्षणाची जबाबदारी येत नसल्यामुळे त्यांच्याकडून जिझिया कर वसूल केला जात नाही."

कुराणाची जी आयत प्रारंभी दिली आहे, तिच्यात असे म्हटले आहे की, 'ज्या लोकांना (परमेश्वराकडून) धर्मग्रंथ देण्यात आला आहे' त्यांच्याकडूनच हा कर घेण्यात यावा. इस्लामच्या मते मुसलमानांखेरीज फक्त ज्यू व ख्रिस्ती यांना 'अहले किताब' (धर्मग्रंथवाले लोक) असे संबोधण्यात येते. त्यांत हिंदूंचा समावेश होत नाही. कारण ते अहले किताब नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडून जिझिया वसूल करण्यास कुराणाची परवानगी नाही. मलिकी पंथाचे विद्वान याबाबतीत असे असे सांगतात की,

"ज्यांना जिम्मीचा दर्जा प्राप्त होऊ शकतो असे अहले किताब (ज्यू व ख्रिस्ती) आणि मूर्तिपूजक व अग्निपूजक यांच्यावरच जिझिया कर लादावा, . .

असे समजले जाते, " (इस्लामचा) धर्मत्याग करणारे धर्मभ्रष्ट लोक वगळता, ज्यांना ज्यांना गुलाम बनविण्याची परवानगी इस्लामने दिली आहे त्या सर्वांकडून जिझिया कर घेतला पाहिजे. याचा अर्थ असा, की सर्वच काफिरांकडून जिझिया घेतला पाहिजे. त्यामध्ये हजरत मुहम्मद पैगंबर यांचा जन्म ज्या कुरैश घराण्यात झाला होता त्या घराण्यातील बिगर मुस्लिमांचाही समावेश होतो."

याच्या उलट अल शाफिई या विद्वानांच्या मते, " फक्त ख्रिस्ती, ज्यू व अग्निपूजक यांच्याकडूनच जिझिया घेणे योग्य ठरते; कारण, वर उल्लेखिलेल्या आयतीत फक्त ख्रिश्चन व ज्यू लोकांचाच उल्लेख आहे आणि पैगंबरांनीच त्यात अग्निपूजकांचा समावेश केला आहे. म्हणून मूर्तिपूजकांचा समावेश जिम्मींमध्ये करता येणार नाही."

यावर हनफी विद्वानांचे म्हणणे असे की, " मूर्तिपूजकांना गुलाम बनविण्याची परवानगी कुराणाने दिलेली आहे. म्हणून त्यांच्याकडूनही जिझिया कर वसूल करण्यास हरकत नाही." अर्थात् जे मूर्तिपूजक अरब नाहीत त्यांनाच हा नियम लागू होतो, हे ते मान्य करतात. अरब मूर्तिपूजकांना जिझिया कर देऊन स्वतःची सुटका करून घेता येणार नाही. कारण परमेश्वराने त्यांच्यातूनच पैगंबर पाठविला होता; आणि त्यांच्या डोळ्यांसमोरच इस्लामचे सारे चमत्कार करून दाखविण्यात आले होते. त्यामुळे इस्लामविषयी त्यांची नास्तिकता ही अत्यंत निकृष्ट प्रकारची नास्तिकता समजली पाहिजे. या ठिकाणी अरब म्हणजे मूळचे मूर्तिपूजक टोळीवाले अरब होत. अरबांसमवेत येऊन स्थायिक झालेले ज्यू किंवा ख्रिस्ती नव्हेत; अथवा ज्या अरबांनी ज्यू अथवा ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली आहे, तेही नव्हेत. ज्या लोकांनी एकदा इस्लामचा स्वीकार करून नंतर त्याचा त्याग केला आहे, त्यांनाही जिझियाची सवलत मिळू शकणार नाही. कारण, " एकदा इस्लामचे श्रेष्ठत्व अनुभवून ते पुन्हा नास्तिक बनले आहेत." सारांश, अरब मूर्तिपूजक व इस्लामचा स्वीकार करून पुन्हा त्याचा त्याग केलेले लोक यांनी एकतर इस्लामचा तरी स्वीकार केला पाहिजे किंवा मरण तरी पत्करले पाहिजे. मात्र त्यांच्या बायकामुलांना ठार न मारता त्यांना गुलाम बनविण्याची सूट इस्लामने दिली आहे. बहुधा हाच नियम भारतातील हिंदूना लावला गेला असावा.

जिझिया किती घ्यावयाचा ते आपसात करार व तह करून ठरवावयाचे असते. करारातील अटींप्रमाणे जी रक्कम ठरेल तिच्यात नंतर बदल करावयाचा नसतो. ज्यावेळी अशा प्रकारच्या करारान्वये काफिरांचे शहरावरील अथवा खेड्यांवरील स्वामित्व मान्य केले जाते तेव्हा त्या शहरांत अथवा खेड्यांत येणाऱ्या मुस्लिम मुशाफिरांचे आतिथ्य करण्याची जबाबदारी तेथील काफिरांवर टाकण्यात

यावी, आणि त्या अर्थाचे कलम करारामध्ये अंतर्भूत करण्यात यावे, असे शाफिई विद्वान् सांगतात.

बाहेरून येणाऱ्या मुस्लिम प्रवाशांना कोणत्या अतिरिक्त घरांमध्ये व गिरिजा-घरांमध्ये (चर्चमध्ये) उतरवावयाचे तेही करात नमूद केलेले असते. याबाबतीत गरीब काफिरांना मुळीच सूट मिळत नाही. त्यांनाही गरीब प्रवाशाला उतरून घ्यावे लागते. प्रवाशाच्या सोईसाठी कोणाही काफिराला त्याच्या घरातून बाहेर काढू नये, अशी तरतूद केली जाते.

शस्त्रबळाने जिंकलेल्या प्रदेशातील लोकांवर इमामाकडून जो जिझिया कर लादला जातो, त्याचे दर थोडे वेगळे असतात. तेथील श्रीमंतांना दरमहा ४ दिरहम म्हणजे दरसाल ४८ दिर हम द्यावे लागतात. मध्यम वर्गीयांना याच्या निम्मे म्हणजे २४ दिरहम आणि जे गरीब स्वतःचे पोट भरू शकतात त्यांना १२ दिर-हम द्यावे लागतात.

'मिनहाज' या ग्रंथानुसार इमामाने श्रीमंतांकडून ४ दिनार व मध्यवर्गीयां-कडून २ दिनार या दराने जिझिया कर मान्य होईपर्यंत घासाघीस (मुमाकसत) करावी. (म्हणजे नेहमीपेक्षा चौपट कर कबूल करवून घ्यावा.)

शाफिई व मलिकी पंथांच्या विद्वानांचे एका बाबतीत एकमत आहे. ती बाब अशी की, जर काफिर लोक किमान १ दिनारापेक्षा जास्त जिझिया देण्यास तयार नसतील, तर त्यांच्याकडून जादा रक्कम मिळविण्यासाठी इमामाने त्यांच्याशी तंटा करू नये. १ दिनार कबूल करणे त्यांच्यावर बंधनकारक आहे.

हा जिझिया कर कोणाला लागू होत नाही, याचेही नियम धर्मग्रंथात दिले आहेत. मुले, वेडे व मनाने दुबळे, वृद्ध यांच्यावर हा कर बसविता येत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने कुचकामी असल्यामुळे ज्यांच्यावर त्याची कायदेशीर जबाबदारी येत नाही, अशा लोकांना जिझिया द्यावा लागत नाही. तसेच शरीराने वृद्ध, आंधळे व अपंग हेही या करातून मुक्त असतात. अबू यूसुफच्या मते ज्या आंधळ्या व अपंग लोकांजवळ संपत्ती असेल त्यांच्याकडून जिझिया वसूल केला पाहिजे; कारण, देशाच्या संरक्षणामध्ये ते प्रत्यक्ष शरीराने भाग घेऊ शकत नसले तरी, आपल्या संपत्तीच्या रूपाने मदत करू शकतात. शिवाय अशा लोकांचे म्हणणे सरकारात ऐकले जात असल्यामुळे युद्धाच्या वेळी त्यांना मृत्युदंड होऊ शकतो. म्हणून त्यांच्याकडून पैशाच्या रूपाने कर वसूल करणे योग्यच ठरते. ज्या गरिबांना रोजगार–धंदा नसेल त्यांनाही जिझिया करातून वगळण्यात येते. जे साधु-संन्यासी जगापासून विरक्त झालेले असतात, ते काम करू शकत असले, तरी त्यांच्यावर जिझिया लादता येत नाही. कारण युद्धामध्ये त्यांना ठार मारण्याची मुभा नसते; परंतु अबू हनीफा व अबू यूसुफ यांच्या मते साधु-

संन्यासी काम करण्यासारखे धडधाकट असल्यास त्यांच्यावर जिझिया बसविता येतो. सर्व प्रकारचे गुलाम (किन्न, मुदब्बर, उम्मए वलद, उम्मत किंवा मुकातब)* जिझियापासून मुक्त असतात. एवढेच नव्हे तर, त्यांचा जिझिया त्यांच्या मालकांकडून वसूल केला जात नाही. कारण, त्यांच्या मालकाकडून गुलाम बाळगल्याबद्दल आधीच नेहमीपेक्षा जास्त कर वसूल केलेला असतो. आजारी काफिरांना जिझिया द्यावा लागत नाही. अल शाफिईच्या मते प्रत्येक प्रौढ, स्वतंत्र व सुबुद्ध जिम्मीवर जिझिया कर लादावयाचा असतो. धर्मगुरू, अपंग, म्हातारे व अर्धांगपीडित या सर्वांचा त्यात समावेश होतो. धट्टया-कट्टया पण गरीब काफिरांचे काय करावयाचे, यासंबंधी तीन वेगवेगळी मते विद्यमान आहेत. काहीजण असे म्हणतात की, त्यांना मुस्लिम देशातून हाकलून द्यावे, काही विद्वानांच्या मते त्यांना जिझियातून मुक्त समजावे, तर काहीजण असे सांगतात की, त्यांच्यावर इतरांसारखाच जिझिया बसवावा.

ज्या लोकांना जिझियातून सूट मिळाली आहे त्यांच्या सुटीचे कारण नाहीसे झाल्यास काय करावे ? यावावतीत ' इख्तियार 'चे म्हणणे असे की, गरीब लोक वगळता इतरांच्या बाबतीत माफीचे (किंवा सुटीचे) कारण त्यांच्यावर जिझिया लादला जाण्यापूर्वीच नाहीसे झाले असेल, तर त्यांना तो कर भरावा लागतो; परंतु कर लादला गेल्यावर ते कारण नाहीसे झाले असेल तर त्या वर्षापुरता त्यांचा कर माफ होतो. कारण माफीच्या कारणाचा विचार कर लादण्याच्या काळाच्या संदर्भात केला जातो.

इस्लामचा स्वीकार केल्यावर अथवा काफिराच्या मृत्यूनंतर जिझिया कर रद्द होतो; परंतु अबू हनीफाच्या मते तो वसूल करण्यात आला नाही (तदाखुल) तरी तो रद्द होतो. (काफिर मुसलमान झाला की, तो देशाच्या संरक्षणात सहभागी होऊ शकतो. म्हणून तो आपोआप जिझियातून मुक्त होतो.) परंतु अबू यूसुफ व मुहम्मद इब्न अल हसन यांच्या मते इतर कर्जांप्रमाणे जिझिया करही अनेक वर्षे

---

* किन्न = गुलाम आईबापांच्या पोटी जन्मलेला गुलाम.

मुदब्बर = आपल्या मालकाच्या मृत्यूनंतर स्वतंत्र होणारा गुलाम.

उम्मए वलद = जिला आपल्या मालकापासून अपत्य झाले आहे अशी दासी. अशा दासीला तिचा मालक विकू शकत नाही व त्याच्या मृत्यूनंतर तिच्यावर कोणाचा वारसाहक्क न राहता ती दास्यमुक्त होते.

मुकातब = अमुक इतकी रक्कम दिल्यावर तू दास्यमुक्त होशील असे मालक ज्याला लिहून देतो असा गुलाम. हा गुलाम मेहनत-मजुरी करून आपली किंमत फेडतो व गुलामीतून मुक्त होतो.

वसूल केला गेला नाही, तरी तो रद्द होत नाही. याच्या उलट अबू हनीफाचे म्हणणे असे, की जिझिया कर शिक्षा म्हणून लादलेला असतो आणि देवाच्या नावाने करण्यात येणाऱ्या इतर शिक्षांप्रमाणे त्याची अंमलबजावणी न झाल्यास तो आपोआपच रद्द होतो.

काफिराने इस्लामचा स्वीकार न करणे हा इस्लामचा अपमान समजला गेल्यामुळे काफिराचा अपमान करून त्याचा सूड उगविणे हा जिझियाचा मुख्य हेतू असल्याबद्दल सर्व धर्मपंडितांचे एकमत आहे. हा अपमान कसा करावा, याचे पद्धतशीर शास्त्र बनविण्यात आले आहे. केवळ जिझिया कर लादून हा अपमान पूर्ण होत नाही. त्या कराच्या वसुलीतही अपमान प्रतीत झाला पाहिजे, अशी खबरदारी घेतली जाते. ज्या वेळी हा कर वसूल केला जातो, तेव्हा वसूल करणारा अधिकारी बसलेला असतो आणि जिम्मीने उभे राहावयाचे असते. यावेळी जिम्मींसाठी खास ठरविण्यात आलेला पोशाख त्याला घालावा लागतो. जिझिया देण्याच्या वेळी जिम्मीचे मानगूट धरून त्याला धक्के व हिसडे दिले जातात. या कृतीच्या द्वारे त्याला त्याच्या अपमानास्पद स्थितीची जाणीव करून दिली जाते. त्याला असे सांगण्यात येते, की "अरे जिम्मी, किंवा अरे परमेश्वराच्या वैऱ्या, जिझिया दे." त्याला नुसते 'नास्तिक' किंवा 'काफिर' असे म्हणून संबोधू नये, त्याला जिम्मीच म्हणावे अशी खास आज्ञा देण्यात आलेली आहे. ज्या काफिरांना इस्लामी राज्यात आसरा दिला जातो व त्याबद्दल ज्यांना जिझिया भरावा लागतो ते जिम्मी होत. ते इतर काफिरांहून निकृष्ट प्रतीचे समजले जातात. म्हणून त्यांच्यासाठी 'जिम्मी' (झिम्मी) हे संबोधन वापरावे अशी धर्माज्ञा आहे. जिम्मीचा अपमान केला जाणे अपरिहार्य असल्यामुळे त्याला आपल्याबदली दुसऱ्या माणसाकरवी जिझिया भरता येत नाही.

अनेक विद्वानांच्या मतांचा विचार केल्यानंतर अल शाफिई हा इमाम या निष्कर्षावर पोहोचला होता, की कुराणामध्ये ज्या अपमानाचा उल्लेख करण्यात आला आहे, त्याचा अर्थ काफिरांनी मुस्लिम सत्तेपुढे मान तुकवावी; (हुक्म अल इस्लाम) आणि परिणामतः जे मुस्लिम कायदा मान्य करतील त्यांनाच जिम्मी समजण्यात यावे, असा आहे. परंतु नंतरच्या काही शाफिई * विद्वानांचे मत असे

---

* शाफिई– सुन्नी संप्रदायाच्या चार इमामांपैकी तिसरे इमाम शाफिई यांचे अनुयायी.
हनफी– पहिले इमाम अबू हनीफा यांचे अनुयायी.
मालिकी– दुसरे इमान मालिक यांचे अनुयायी.
हन्वली– चौथे इमाम अहमद हन्बल यांचे अनुयायी.
मुस्लिम धर्मपंडितांचे हे चार पंथ महत्त्वाचे समजले जातात.

आहे की, कुराणामध्ये ज्या अपमानाचा आदेश देण्यात आला आहे तो केवळ प्रतीकात्मक नसून, खरोखरीच काफिराची बेइज्जती करणे हे खऱ्या मुसलमानाचे कर्तव्यच आहे. त्यासाठी ते असा मार्ग सुचवितात, की जिम्मीने जिझिया देताना मान खाली धालून, खांदे पाडून उभे राहावे; आणि कर वसूल करणाऱ्या मुस्लिम अधिकाऱ्याने उच्चासनावर बसून जिम्मीची दाढी पकडावी व त्याच्या दोन्ही गालांवर थपडा माराव्यात. हे पवित्र कर्तव्य पार पाडताना त्याने असे म्हणावे, की, " हे परमेश्वराच्या वैऱ्या, देवाचं देणं देऊन टाक." परंतु सध्याचे शाफिई विद्वान् कुराणाचा असा अर्थ लावणाऱ्यांचा तीव्र धिक्कार करतात.

मालिकी विद्वानांच्या मते जिम्मींचा अपमान करणे हे मुसलमानांवर बंधनकारक आहे (वुजूब). म्हणून जिम्मीना दुसऱ्याच्या मार्फत जिझिया भरण्याची सवलत देता येत नाही. असा सतत अपमान होत राहिला म्हणजेच कदाचित ते मुसलमान बनण्यास तयार होतील. अल अदवी या विद्वानाचे म्हणणे असे की, जिम्मी किंवा काफिर यांच्या रक्तातच मुस्लिमांचा द्वेष भरलेला आहे. ते पैगंबराचे प्रेषितत्व नाकारतील, आणि त्यांच्या हातात सत्ता आली तर ते मुसलमानांचा नायनाट करून टाकतील, अशी शक्यता असल्यामुळेच त्यांचा असा जाहीर अपमान करणे आवश्यक आहे.

जिझिया कराचे येथवर जे विवेचन केले आहे, त्यावरून हा कर सुचविताना पैगंबरांच्या डोळ्यांसरोर मुख्यतः ज्यू व ख्रिस्ती लोकच असावेत हे स्पष्ट होते. अशा स्थितीत हिंदुस्थानातील हिंदू जनतेवर हा कर लादण्याचे प्रयोजन दिसत नाही. मुस्लिम राजसत्तेने जेथे बिगर मुस्लिमांना संरक्षणदलात प्रवेश नाकारला होता, तेथील काफिरांकडून देशाच्या संरक्षणाची खंडणी म्हणून हा कर घेणे एकवेळ क्षम्य समजता आले असते; परंतु भारतात तशी परिस्थिती नव्हती. येथील मुस्लिम बादशहा व सुलतान यांच्या सैन्यांत हिंदूंचीच संख्या जास्त होती. त्यांच्याकडून जिझिया कर वसूल करणे म्हणजे कुराणाच्या आज्ञेचा विपरीत अर्थ लावण्यासारखे होते. अर्थात येथे संरक्षणाची बाब गौण मानून काफिरांचा अपमान करणे हीच बाब प्रमुख मानली गेली, हे उघड आहे. त्यामुळे येथील मुस्लिम राज्यकर्त्यांनी येथील हिंदूंना इस्लामचा स्वीकार करण्यास भाग पाडण्यासाठी व तसे न केल्यास त्यांना अपमानित करण्यासाठी जिझियाचा वापर करण्यात आला. इ. स. ७१२ मध्ये सिंध जिंकणाऱ्या मुहम्मद बिन कासिमने भारतात जिझिया कर पहिल्या प्रथम लादला. हिंदूंच्या आर्थिक परिस्थितीनुसार हा कर बसविण्यात येई. पुढे भारतात जेथे जेथे मुसलमानांचे राज्य प्रस्थापित झाले, तेथे तेथे जिझिया कर बसविण्यात आला, असे 'ए डिक्शनरी ऑफ इंडियन हिस्ट्री' (लेखक : सच्चिदानंद भट्टाचार्य) या ग्रंथात सांगितले आहे; परंतु विजापूर, गोवळकोंडा, मैसूर येथील

मुस्लिम राज्यकर्त्यांनी जिझिया कर लादला नसावा असे वाटते. जिझियाबद्दलचा आग्रह मुख्यतः दिल्लीश्वरांचाच असे. या करातून प्रारंभी ब्राह्मणांना वगळण्यात आले होते; परंतु फिरोजशाह तुघलक (इ. स. १३५१–८८) याने पहिल्याप्रथम ब्राह्मणांवरही हा कर लादला. सम्राट अकबराने हिंदूंची सहानुभूती व सहकार्य मिळविण्यासाठी १५६४ साली हा कर उठविला. (त्यानंतर मुस्लिम राष्ट्रांची सहानुभूती मिळविण्यासाठी पुन्हा त्याने हा कर बसविला, असे अलीकडील संशोधनावरून आढळून आले आहे.) पुढे १६७९ साली औरंगजेबाने हा कर पुन्हा बसविला. त्यामुळे हिंदूंची मने दुखावली आणि त्याला मुख्यतः राजपूत व मराठे यांच्या प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागले. राजपूतांचा विरोध त्याला विशेष जाणवला आणि त्याने मेवाडपुरता हा कर रद्द केला. औरंगजेबानंतर १७१३ साली गादीवर आलेल्या फर्रुखसियर बादशाहाने जिझिया कर रद्द केला; परंतु पुन्हा १७१७ साली त्याने तो बसविला. त्यानंतर हा कर तत्त्वतः कायदेशीर होता; परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र त्याची अंमलबजावणी होत नव्हती. मुहम्मद शाह (१७१९-१७४८) च्या कारकीर्दीत हा कर वसूल केला गेला नाही.

या संदर्भात डॉ. इरफान हबीब यांनी दिलेली माहिती मनोरंजक व उद्‌बोधक आहे. 'दि ॲग्रेरियन सिस्टिम ऑफ मुगल इंडिया (१५५६–१७०७),' या आपल्या १९६३ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात ते म्हणतात :–

"औरंगजेबाने १६७९ साली बिगरमुसलमानांवर जिझिया कर (डोईपट्टी) बसविला. त्यामुळे ग्रामीण जनतेवरील कराच्या ओझ्यात खूपच वाढ झाली. हा कर वसूल करण्यासाठी उमना नावाची एक स्वतंत्र संघटना तयार करण्यात आली होती. हा कर शहरांमध्ये सरळ-सरळ प्रत्येक व्यक्तीकडून प्रत्यक्षपणे वसूल केला जाई. खेड्यांसाठी वेगळी पद्धत होती. १ लाख दाम (किंवा २५००० रुपये) महसुलावर १०० रुपये जिझियाकर, म्हणजे एकूण महसुलाच्या चार टक्के, असे जिझियाचे प्रमाण ठरवून देण्यात आले होते. हा जिझिया जहागीरदार, सरकारी अधिकारी वगैरेंनी आधी सरकारात भरावयाचा आणि मग तो जनतेकडून ठरलेल्या दराने वसूल करावयाचा, अशी प्रथा होती. औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात तयार करण्यात आलेल्या एका नियम-पुस्तिकेवरून असे दिसते की, हा कर भरण्यास पात्र असलेल्या शहरी व ग्रामीण लोकांची तपशीलवार माहिती तयार करण्यात आली होती, त्या पुस्तिकेत नमुन्यादाखल जे हिशेब उद्‌धृत केले आहेत, त्यावरून हा कर चांगलाच भारी होता, असे दिसून येते. एका गावातील २८० पुरुषांपैकी १८५ जणांना करपात्र ठरविण्यात आले होते. त्यांपैकी ३७ लोक दरसाल रु ३ आणे २ या किमान दराने जिझिया भरत. याचा अर्थ असा, की त्याकाळी बिनकसबी शहरी कामगाराला दरमहा जेवढी मजुरी मिळत असे, तेवढी रक्कम जिझिया कर म्हणून दरसाल

भरावी लागे. या दृष्टीने जिझिया हा अत्यंत परागामी (regressive) होता. गरिबांना त्याचा जाच सर्वांत जास्त होई; आणि श्रीमंत लोक फार थोडक्यात सुटत. एका सनदेवरून असे दिसते की, जेथे एखादी भयंकर आपत्ती कोसळली असेल, त्या भागातील शेतकऱ्यांना जिझिया करापासून सुटका मिळत असे. इ. स. १७०४ साली दुष्काळ व मराठा युद्ध यांमुळे जी आपत्ती कोसळली होती, ती लक्षात घेऊन औरंगजेबाने संपूर्ण दख्खन भागात युद्ध चालू असेपर्यंतच्या काळात जिझिया कर माफ केला होता. मात्र औरंगजेबाचे सर्वसामान्य धोरण अशा प्रकारे जिझियाची माफी न देण्याकडेच होते. ऐतिहासिक पुराव्यांवरून असे दिसते की, जिझिया वसूल करताना लोकांवर फार जुलूम केला जाई; आणि वसूल झालेल्या रकमेतील फार मोठ्या भागाचा अपहार सरकारी अधिकारी करीत. यामुळे प्रत्यक्ष सरकारी खजिन्यापर्यंत फारच थोडा जिझिया जाऊन पोहोचे.

बूलचंद या बंगाली जहागीरदाराचा एजंट व हुगळी आणि कासमबाजारचा राज्यपाल परमेसरदास याने १६८३ साली हुगळीला आपल्या आधिपत्याखालील सर्व लोकांना जमा करून मागील तीन वर्षांचा जिझिया कर अत्यंत क्रूरपणे त्यांच्याकडून वसूल केला. यावर श्री इरफान हबीब असे भाष्य करतात की, "ईश्वर-भक्त मुसलमानांनी काफिरांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत हे सिद्ध करण्यासाठी जो जिझिया शोधून काढला होता, त्याचा वापर एका हिंदू जहागीरदाराच्या हिंदू एजंटाने आपल्या प्रजेकडून डोईपट्टी वसूल करण्यासाठी करावा हे किती विचित्र होते!"

जिझिया करामुळे गरिबांवर जास्त ओझे कसे पडते ते सांगताना श्री हबीब म्हणतात, "ज्या श्रीमंताजवळ १० हजार दिरहम किंवा त्याहून अधिक संपती असेल, त्याला फक्त ४८ दिरहम कर द्यावा लागे; पण ज्या गरिबाजवळ २०० दिरहमहून जास्त संपत्ती नसेल त्याला १२ दिरहम द्यावे लागत."

एका दिवाणाला उद्देशून औरंगजेबाने लिहिलेल्या सनदेचा उल्लेख श्री हबीब यांनी केला आहे. त्या सनदेत असे म्हटले आहे की, "अगदी दरिद्री लोकांवर जिझिया कर बसवू नये. गरीब शेतकऱ्यांना बीबियाणे व गुरेढोरे यांसाठीच कर्ज-बाजारी व्हावे लागते. म्हणून त्यांना जिझियातून मुक्त करावे." मात्र हा कर तालुकेदार, चौधरी (पाटील), तरफदार आणि ग्रामीण व शहरी भागातील इतर हिंदू यांच्याकडून कोणत्याही परिस्थितीत वसूल केलाच जाई.

पंजाबमधील एका खेड्यावर १६९७–९८ साली बसविलेल्या जिझिया कराची कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. त्यावरून करदात्यांचे कसे वर्गीकरण केले जाई याची कल्पना येते. त्या खेड्यातील २८० हिंदू पुरुषांपैकी ७३ जणांना अल्पवय, अपंगत्व, अनुपस्थिती वगैरे कारणांमुळे करमाफी देण्यात आली होती.

शिवाय २२ जणांना अत्यंत दारिद्र्यामुळे जिझिया माफ करण्यात आला होता. उरलेल्या १८५ पुरुषांपैकी १३७ हे तिसऱ्या वर्गाचे करदाते होते. याचा अर्थ त्यांची दरडोई संपत्ती ५२ रुपयांपेक्षा कमी होती. दुसऱ्या वर्गात ३५ लोक होते. त्यांची संपत्ती ५२ रुपयांपेक्षा जास्त होती. पहिल्या वर्गात १३ लोक होते. त्यांची संपत्ती २५०० रुपयांपेक्षा जास्त होती. औरंगजेबाच्या फरमानात या जिझियापात्र तीन वर्गांच्या संपत्तीचे मूल्य दिरहमध्ये दिलेले आहे. वर्ग पहिला : १०,००० दिरहम. वर्ग दुसरा : २०० दिरमहून अधिक. वर्ग तिसरा : २०० दिरहमहून कमी. तिसऱ्या वर्गाला १२ दिरहम किंवा रु. ३, आणे २ एवढा जिझिया द्यावा लागे. त्यावरून प्रा. हबीब यांनी या संपत्तीचे आकडे रुपयांत रूपांतरित केले आहेत.

अकबराने जिझिया कर काही काळ रद्द केला असला तरी, त्याने जमीन-महसुलात जवळजवळ दुपटीने वाढ केली होती; आणि त्यामुळे त्याला जिझिया कर रद्द करण्याने आर्थिक झळ सोसावी लागली नाही, अशा अर्थाचाही एक उल्लेख श्री इरफान हबीब यांच्या या पुस्तकात आढळतो.

श्री शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी समारोहाच्या निमित्ताने झालेल्या एका परिसंवादात पुणे विद्यापीठीतील इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी 'जिझिया इन दि मराठा कंट्री' या शीर्षकाचा एक निबंध वाचला होता. त्यामध्ये शिवाजी महाराजांच्या काळातील महाराष्ट्रात जिझिया कराची काय परिस्थिती होती, याचे विवेचन त्यांनी केले आहे. आपल्या या विषयाच्या संदर्भात त्या निबंधातील काही आकडेवारी उद्‌बोधक ठरण्यासारखी आहे.

औरंगजेबाने २ एप्रिल १६७९ रोजी जिझिया कर लागू केला. शिवाजी राजांनी १६७९ च्या मध्यास औरंगजेबाच्या नावे एक फारसी पत्र लिहून त्याच्या त्या कृत्याचा तीव्र निषेध केला होता. अर्थात् शिवाजी महाराजांचे निधन पुढच्याच वर्षी झाल्यामुळे त्यांच्या निषेधाचा काही उपयोग झाला नाही.

नेवासा (जि. अहमदनगर) येथील १६८४–८५ ची जी कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत, त्यावरून औरंगजेबाने त्या विभागातून वसूल केलेल्या जिझिया कराची कल्पना येते. नेवासा परगण्यात १४४ गावे होती. त्यांपैकी फक्त ७० गावे जिझिया कर देणारी होती. या ७० गावांमधून ५६४ घरे जिझियासाठा निवडण्यात आली होती. या ५६४ घरांत ९५७ माणसे होती. त्यांपैकी फक्त ५६३ माणसांवर हा कर बसविण्यात आला होता. ही ५६३ माणसे दरसाल दर डोई ३ रुपये ५ आणे या हिशेबाने १८६४ रुपये १५ आणे जिझिया कर भरत होती. या कागदपत्रांत 'इजाफा' (वाढ) या सदराखाली मागील वर्षापेक्षा पुढील वर्षात जिझिया कर भरणाऱ्यांच्या संख्येत किती वाढ झाली, ते दाखविण्यात आले आले आहे. त्यावरून स्थानिक अधिकाऱ्यांच्या मदतीने दरवर्षी जिझिया भरणाऱ्यांची फेरतपासणी

करण्याचे काम अमीन करीत होता, असे दिसते. अशा प्रकारची कागदपत्रे आटपाडी (जि. सातारा), कर्यात मावळ (पुणे परगणा) व इंदापूर या भागांसंबंधीही उपलब्ध झाली आहेत.

इंदापूर परगण्यात ८५ खेडी होती. त्यांपैकी फक्त ३४ खेड्यांतील सुमारे १५० ते १७५ माणसांकडूनच सुमारे ५५० ते ६०० रुपये (एकूण) जिझिया कराच्या रूपाने इ. स. १६९९,१७०२ व १७०६ या सालांत वसूल करण्यात आले होते. या करदात्यांचे पहिला, दुसरा व तिसरा असे तीन वर्ग असत. त्यांपैकी पहिल्या वर्गाचे करदाते या भागात नव्हते असे दिसते. दुसऱ्या वर्गाच्या करदात्यांची संख्या या तिन्ही वर्षी फक्त ६ च होती. त्यांच्यावरील कराचा दर ६ रु. १० आणे (दरसाल दरडोई) असा होता; तर तिसऱ्या वर्गातील करदात्यांवरील कराचा दर त्याच्या निम्मा म्हणजे ३ रु. ५ आणे होता. दुसऱ्या वर्गात २ देशमुख व ४ देशपांडे हे वतनदार होते. तिसऱ्या वर्गात चौगुला, कोष्टी, चांभार, सुतार, कासार, तेली, सराफ, सोनार, रंगारी, शिंपी, धनगर वगैरे व्यावसायिकांचा समावेश होता. पाटील, कुलकर्णी, गुरव यांच्यावरही हा कर लागू असे. परंतु भटाभिक्षुकांवर तो लागू नसावा, असे दिसते.

डॉ. कुलकर्णी यांच्या निबंधातील माहितीवरून महाराष्ट्रातील जिझिया हा प्रामुख्याने व्यवसाय-कर होता असे दिसते. कारण शेतकऱ्यांकडून तो घेतला जात नसे. शिवाय दुष्काळ, अवर्षण, लढाई इत्यादि आपत्ती कोसळल्या असताही हा कर माफ केला जात असे. यावरून जिझियाचे मूळ स्वरूप महाराष्ट्रात येतायेता पुष्कळच बदलून गेले होते असे म्हणता येते. देशातील इतर भागांत हा कर कोणत्या प्रमाणात व पद्धतीसे वसूल केला जात होता व त्यात कसाकसा बदल होत गेला, तेही पाहावे लागेल.

+ +

'समाज प्रबोधन पत्रिका' : मार्च–एप्रिल, ७६

२८. राष्ट्रीय एकात्मता : आजच्या संदर्भात

राष्ट्रीय एकात्मतेविषयी आजकाल खूपच बोलले आणि लिहिले जात आहे. परंतु राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय, याविषयी प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या किंबहुना परस्परविरोधी असाव्यात असे अनेकदा लक्षात येते. म्हणून या संकल्पनेचा नक्की अर्थ समजून घेण्याची आवश्यकता आहे. परंतु तसा प्रयत्न होताना दिसत नाही. उलट प्रत्येकजण त्या संकल्पनेच्या मुळाशी न जाता मोघम बोलणेच पसंत करतो. याचे कारण असे की, ती संकल्पना अस्पष्ट मोघम ठेवल्याने ज्याला त्याला स्वतःला अभिप्रेत असलेला अर्थ तिच्यावर लादणे सोपे जाते, आणि संकल्पना स्पष्ट केल्याने इतरांची नाराजी ओढवून घेण्याचा प्रसंग येण्याची शक्यता टळते. हे असे का होते ?

स्वातंत्र्योत्तर काळाची गरज

तसे पाहिले तर राष्ट्रीय एकात्मता ही काही समजायला फार अवघड गोष्ट नाही. ज्या संकल्पनेच्या आधारावर आपण जगत आहोत, राष्ट्रनिर्मितीची आकांक्षा बाळगून धडपड करीत आहोत ती तशी फार सोपी आहे. परंतु परिस्थितीने तिला अवघड बनविले आहे. ती परिस्थिती कोणती याचा खुलासा झाला तर तिच्यातला अवघडपणा पुष्कळच कमी होईल. म्हणून प्रथम आपण ती परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रथमच ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना स्वातंत्र्योत्तर काळाच्या गरजेतून निर्माण झाली आहे. स्वातंत्र्य-पूर्व काळात आपण राष्ट्रीय ऐक्याच्या, हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या मुद्यावर खूप भर देत

होतो. हे ऐक्य प्रस्थापित व्हावे यासाठी बहुसंख्य असलेल्या हिंदूंनी अनेक बाबतींत फार मोठा स्वार्थत्यागही केला. अखेर राष्ट्रपिता महात्मा गांधींना तर त्यापायी आत्मबलिदान करावे लागले. त्या काळात भारत राष्ट्र हे एक व अखंड असून ते तसेच अखंडित राहणार आहे, असे आपण गृहीत धरून चाललो होतो. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची गरज सर्वांनीच मान्य केली आहे असे समजले गेले होते. परंतु विभिन्न जाती–जमातींत होणारे भांडणतंटे थांबावेत, त्यांनी समजूतदारपणाने, भावाभावासारखे एकत्र राहवे, यासाठी जातीय ऐक्याची आवश्यकता प्रकर्षाने जाणवत होती. भारताची फाळणी झाली नसती, देश अखंड राहिला असता तर, तीच राष्ट्रीय ऐक्याची कल्पना पुढे चालत राहिली असती. महात्मा गांधींनी आणि स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसने राष्ट्रीय ऐक्याच्या प्रतिस्थापनेसाठी जे मार्ग व उपाय सांगितले होते, तेच आपण अमलात आणीत राहिलो असतो, तर त्यातून एक अखंड एकसंध भारतीय समाज कालांतराने निर्माण झाला असता. परंतु या देशाच्या सामर्थ्याची कल्पना असल्यामुळे त्याला कायमचा कमजोर बनविण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या ब्रिटिशांनी व त्यांच्या हातचे खेळणे बनलेल्या मुस्लिम लीगी पुढाऱ्यांनी ते घडू दिले नाही. त्यांनी धर्माच्या आधारावर या देशाचे तुकडे पाडले; आणि दोन शत्रुराष्ट्रे निर्माण करून, ती आपसात भांडत राहून सदैव दुर्बळ राहतील अशी कायमची तरतूद करून टाकली.

भारत हे हिंदू राज्य बनले

महात्माजींनी व अन्य देशभक्तांनी या फाळणीला नाइलाजाने मान्यता दिली. तरीपण धर्माच्या तत्त्वावर देशाचे तुकडे पडले आहेत, ही गोष्ट त्यांनी मान्य केली नाही. त्यामुळे ही फाळणी तात्पुरती असून कालांतराने भारत देश एक व अखंड बनेल असा आशावाद त्यांनी बाळगला. इस्लाम व मुस्लिम मानस यांची नीट कल्पना नसल्यामुळे किंवा त्यांची माहिती असूनही तिकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्याचे त्यांनी ठरविल्यामुळे तसे घडले होते. परंतु आपण डोळे झाकून घेतले तरी, त्यामुळे वस्तुस्थिती काही बदलत नाही, हे लवकरच जाणकारांच्या लक्षात आले. धर्मांच्या तत्त्वावर देशाची फाळणी झाली होती, देशातील मुसलमानांनी स्वतःसाठी वेगळा तुकडा पाडून घेतला होता, आणि उर्वरित भारत हिंदूंचे राज्य आहे, या गोष्टीला मान्यता दिली होती. हिंदू समाज प्रारंभापासून सहिष्णू व उदार राहिला आहे. त्याचे पुढारी नेहमीच पुरोगामी विचाराचे राहिले आहेत. त्यामुळे देशाची फाळणी धर्माच्या तत्त्वावर झालेली असूनही, अन्य धर्मीयांना विशेषतः उर्वरित भारतात राहिलेल्या मुसलमानांना येथे परके वाटू नये यासाठी त्यांनी हा देश धर्मनिरपेक्ष राहील, सर्व धर्मांच्या लोकांना नागरिकत्वाचे समान अधिकार

प्राप्त होतील, अशी उदारवादी भूमिका घेतली. त्याचवेळी सर्व धर्मांना व जाती-जमातींना एका पातळीवर आणणारे समान नागरी कायद्यासारखे कायदे करून समान नागरिकत्वाचा भक्कम पाया त्यांनी घातला असता, तर त्यावेळी राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला असता; आणि आज जी समस्या निर्माण झाली आहे ती उद्‌भवलीच नसती; परंतु त्यांनी तसे केले नाही. त्याची फळे आपल्याला आज भोगावी लागत आहेत. अर्थात त्यांच्या अती चांगुलपणामुळे तसे घडून आले, हे आपण ओळखले तर त्यांच्याविषयीचा आपला राग पुष्कळच कमी होईल. ते असे गृहीत धरून चालले की, धर्माधिष्ठित राज्यांचे दुष्परिणाम लक्षात आल्यामुळे ज्यांनी धर्माच्या आधारावर देशाचे तुकडे पाडले, त्यांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होईल, त्यांना अक्कल सुचेल व ते देशाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊन पापाचे प्रायश्चित्त करतील. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, देशाची फाळणी आज पाकिस्तानात गेलेल्या प्रदेशातील मुसलमानांच्या मागणीवरून झालेली नसून, आज भारतात असलेल्या मुसलमानांनी मुस्लिम लीगची तळी जोरदारपणे उचलून धरून तुफान दंगली केल्यामुळे ती झाली आहे. मुस्लिम प्रांतात मुस्लिम लीगचा फारसा प्रभाव कधी नव्हताच. आता विश्वामित्री पवित्रा घेऊन 'ते पाप आमचे नव्हे.' असे भारतीय मुसलमानांना म्हणता येणार नाही. शिवाय त्यांनी फुटीरपणाचे पाकिस्तानी विष नव्या पिढीतही उतरविले आहे, ही गोष्ट मुस्लिम मोहल्ल्यांतून उठणाऱ्या पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा व तेथे फडफडणारे पाकी झेंडे यांवरून दिसून येते. अर्थात् हिंदू मानस मुळातच क्षमाशील असल्यामुळे झालेल्या चुकीबद्दल पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्याला ते माफ करून प्रेमाने जवळ घेते. या स्वभावगत औदार्यामुळेच गांधी, नेहरू, पटेल वगैरे पुढाऱ्यांना तशी आशा वाटली असावी. परंतु त्यांचा अंदाज साफ चुकला. इस्लाम व मुसलमान यांच्याविषयी नीट कल्पना नसल्यामुळे तो चुकणारच होता. इस्लामला भूमिनिष्ठा मान्य नाही. त्यामुळे मुसलमानांना राष्ट्रवाद पचविणे अवघड जाते. इस्लामच्या कचाट्यातून जे स्वतःला सोडवून घेतात अशा मूठभर सुशिक्षित विचारवंत मुसलमानांनाच राष्ट्रवाद समजू शकतो. दुर्दैवाने भारतीय मुसलमानांमध्ये अशा पुरोगामी लोकांची संख्या अगदीच नगण्य आहे. याच्या उलट इस्लामच्या स्थापनेच्या कालखंडाकडे घेऊन जाऊ इच्छिणाऱ्या धर्मांध मुल्ला-मौलवींचाच पगडा बहुजन समाजावर आहे. त्यामुळे त्यांना या भूमीशी एकरूप होणे जड जाते. भारतीय नेत्यांच्या सहिष्णुतेचा व उदारतेचा गैरफायदा घेऊन येथील मुस्लिम पुढाऱ्यांनी आपले जुनेच फुटीरतावादी धोरण पुढे चालविले. त्यांच्यापैकी कुणीही फाळणीविषयी कधीही पश्चाताप व्यक्त केला नाही. त्यामुळे स्वाभाविकपणेच भारताशी कायम शत्रुत्वाची भावना बाळगणाऱ्या पाकिस्तानविषयी भारतीय मुसलमानांमध्ये एक प्रकारची आत्मीयता

वाढत राहिली व ती प्रसंगानुरोधाने व्यक्तही होत राहिली. भारताच्या राज्यघटनेने विभक्त मतदार संघ रद्द केल्यामुळे जातीयवादी मुस्लिम पुढाऱ्यांना निवडणुका जिंकणे जड जाऊ लागले. म्हणून त्यांनी धर्मनिरपेक्षतेचे कातडे पांघरून वेगवेगळ्या राजकीय पक्षांत प्रवेश केला. तलाकपीडित मुस्लिम स्त्रियांसंबंधीचा कायदा संसदेत संमत झाला, त्यावेळी राष्ट्रवादाचा बुरखा घेतलेले जातीयवादी मुसलमान कसे वेगवेगळ्या राजकीय पक्षात दबा धरून बसले आहेत, हे उघड झाले. हीच गोष्ट पूर्वांचलातील ख्रिश्चन आणि पंजाबातील शीख यांच्याही बाबतीत लागू होते. किंबहुना जातीयवादी मुसलमानांकडूनच त्यांनी राष्ट्रद्रोहाची दीक्षा घेतली असल्याचे स्पष्ट दिसून येते. मुसलमानांनी जे डावपेच लढविले तेच हे लोकही लढवीत आहेत. याचा परिणाम होऊन जातीयवादी जहाल हिंदुत्ववाद्यांनी डोके वर काढले. या साऱ्या प्रकरणात खऱ्या राष्ट्रवादी देशभक्तांची मात्र कुचंबणा होऊ लागली.

गुरुचरणसिंह तोहरा यांच्यासारखे शिखांचे प्रभावशाली पुढारी जाहीरपणे असे सांगतात की, "आम्हा शिखांना राष्ट्रापेक्षा धर्म श्रेष्ठ वाटतो." आणि सगळ्या दलितांचे प्रतिनिधित्व करण्याचा आव आणणारे लक्ष्मण माने अशी उघड-उघड धमकी देतात की, "उपेक्षितांकडे दुर्लक्ष झाले तर, ते चीन अमेरिका, रशिया, पाकिस्तान अशा कोणत्याही परकीय देशाला येथे बोलावतील." या अल्पसंख्यकांची मते मिळविण्यासाठी सगळे राजकीय पक्ष त्यांच्या या धमक्या निमूटपणे ऐकून घेतात. नव्हे, त्यांचे कौतुकही करणारे भेटतात. जणू प्रत्येकजण आपल्या क्षुद्र स्वार्थासाठी मातृभूमीची विक्री करायला एका पायावर तयार आहे !

माता भूमिः पुत्रोऽहम् पृथिव्याः

या साऱ्या विवेचनाचा मथितार्थ असा की, राष्ट्रीय एकात्मतेचा मूलाधार राष्ट्र हा असून, तिची कसोटी देशभक्ती किंवा मातृभूमीविषयी निष्ठा ही आहे. हा आधार जोपर्यंत दृढ बनविला जाणार नाही, तोपर्यंत एकात्मतेविषयीचे सगळे बोलणे फोल आहे. भूमी ही माझी माता आहे, ती मातृभूमी आहे आणि मी तिचा पुत्र, भूमिपुत्र आहे, ही भारतीय राष्ट्रवादाची बैठक आहे. ती ज्यांना मान्य नसेल त्यांना या देशावर कसलाही हक्क सांगता येणार नाही. 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीतामध्ये हीच भूमिका स्पष्टपणे मांडलेली आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाला या गीतातून सदैव प्रेरणा मिळाली. मूठभर मुसलमानांना खुष करण्यासाठी या गीताला प्रमुख राष्ट्रगीताचे स्थान न देण्यात भारतीय नेत्यांनी मोठीच चूक केली, असे आता म्हणावे लागते. देशभक्तांची नाराजी कमी करण्यासाठी 'वंदे मातरम्'ला सह-राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला; परंतु त्याचा वापर मात्र सरकारी कार्यक्रमात क्वचितच केला जातो. त्यामुळे या खऱ्या राष्ट्रगीताला दुय्यम दर्जा प्राप्त झाला

आहे. राष्ट्रभक्तांच्या मनातले हे शल्य राष्ट्रीय एकात्मतेच्या गप्पा मारणाऱ्यांना जेव्हा कळेल, तो सुदिन म्हणावयाचा. अल्पसंख्यकांचा अनुनय करण्यासाठी राज्यकर्ते कोणत्या पातळीपर्यंत खाली उतरतात ते पाहिले की, मनाला क्लेश होतात. याचे एक उदाहरण नमूद करण्यासारखे आहे. आपल्यापैकी अनेकांना माहीत असेल की, आकाशवाणीचे कोणतेही केंद्र सकाळी प्रथम सुरू होते तेव्हा 'वंदे मातरम्' या शब्दांनी श्रोत्यांना अभिवादन केले जाते. आणि लगेच 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत ऐकविले जाते. परंतु मुसलमानांसाठी चालविण्यात येणाऱ्या 'ऑल इंडिया रेडियो की उर्दू सर्व्हिस' या केंद्रावर मात्र या राष्ट्रगीताला मनाई आहे. (पाहा : पृ. १३०) ज्या लोकांना 'वंदे मातरम्'चे इतके वावडे आहे, ज्यांना या भूमीविषयी प्रेम नाही, आदर नाही, तिला वंदन करण्यास जे तयार नाहीत त्यांना या भूमीवर राहण्याचा काही नैतिक, वैधानिक आधार आहे काय ? इथल्या मातीत पिकणारे धान्य खाऊन आणि आईच्या दुधासारखे असणारे पाणी पिऊन आम्ही जगणार, वाढणार, पण तिला आई मात्र म्हणणार नाही आणि तिला पूज्यही मानणार नाही, अशी भूमिका बाळगणाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मता शिकवावयाची तर, आधी राष्ट्र म्हणजे काय, ते कसे निर्माण होते, त्याच्याविषयी आपली कर्तव्ये काय, हे शिकविले पाहिजे. मी मुसलमानांचा उल्लेख केवळ एक ढोबळ उदाहरण म्हणून केला आहे. इतर जाती–जमातींतही या देशाला मातृभूमी न मानणारे, या राष्ट्राविषयी निष्ठा न बाळगणारे लोक आहेतच. खुद्द हिंदूंमधील स्वतःला दलित समजणारे पुढारी या भूमीविषयी किती तुच्छतेने बोलतात, आमच्या राष्ट्रध्वजाचा कसा अपमान करतात, हे आपण वेळोवेळी पाहिलेच आहे. आपण द्राविड असून आपला आर्यांशी काही संबंध नाही, अशी गैरसमजूत करून घेतलेल्या काही तमिळ आंदोलकांनी हिंदीविरोधी आंदोलनात राष्ट्रध्वज जाळल्याच्या घटना घडल्या आहेत. काही माथेफिरू शिखांनी तर भारतभूमीशी जणू वैरच मांडले आहे. ते राज्यघटनाही जाळण्यास कचरत नाहीत. भारतात राहणारे परंतु वाट चुकलेले नेपाळी, नागा, मिझो, भारताविषयी परकेपणाची भावना बाळगून, या देशातून फुटून निघण्याची भाषा बोलतात. या सगळ्याचा अर्थ असा की, या देशात राहणाऱ्या लोकांना अजून राष्ट्र म्हणजे काय, याचीच कल्पना नाही. त्या राष्ट्राविषयी साऱ्या प्रजेत आत्मीयतेची भावना निर्माण करण्यात या देशातल्या देशभक्तांना व विशेषतः शासनकर्त्यांना भयंकर अपयश आले आहे. किंबहुना त्या गोष्टीचे महत्त्वच त्यांच्या लक्षात आलेले नाही; आणि म्हणून त्या दिशेने आजवर पुरेसे प्रयत्नही झालेले नाहीत. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार या देशात रुजावयाचा असेल तर, हा देश माझा आहे, त्याच्याशी एकनिष्ठ राहणे हे माझे कर्तव्य आहे, ही भावना सर्व लोकांमधे निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी भारतमातेची

भारतीय संकल्पना या देशात रुजली पाहिजे. प्राथमिक शाळेपासूनच तिची सुरुवात केली पाहिजे. त्या दृष्टीने प्रत्येक भारतीय मुलाला वंदेमातरम् हे गीत तोंडपाठ होईल व नित्यनेमाने ते त्यांच्याकडून गायिले जाईल, अशी व्यवस्था झाली पाहिजे. जरूर भासल्यास कायद्यातच तशी तरतूद केली गेली पाहिजे. त्यातूनच मातृभूमीची भक्ती विकसित होईल.

धर्म, संस्कृती व परंपरा

राष्ट्राच्या बांधणीमध्ये निदान प्रारंभिक काळात तरी, त्यातील जनतेचा धर्म, तिची संस्कृती व परंपरा यांचा फार मोठा वाटा असतो. भारत अखंड राहिला असता तर इथल्या सर्व धर्मांना, त्यांच्या समाईक संस्कृतींना व परंपरांना राष्ट्र-निर्मितीमध्ये महत्त्वाचे स्थान आपोआपच प्राप्त झाले असते. किंवहुना इंग्रजांच्या आगमनापर्यंत आणि काही अंशी देशाची धर्माच्या आधारावर फाळणी होईपर्यंत या देशात एक समाईक संस्कृती विकसित होऊ लागली होती. इथले धर्मही एकमेकांशी जुळवून घेण्यास शिकले होते. एकमेकांच्या परंपरांचा मान राखण्याची वृत्ती भारतातील लोकांमध्ये जोपासली जात होती. परंतु इंग्रजांच्या आगमनानंतर हे चित्र बदलले. त्यांनी हिंदू व मुसलमान, हिंदू व शीख, हिंदू व ख्रिश्चन, सवर्ण व अस्पृश्य, ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यांत पद्धतशीरपणे विद्वेषाची बीजे पेरली; आणि राष्ट्रीय एकात्मतेचे जे मंदिर रचले जात होते त्याला तडे जाऊ लागले. देशाच्या विभाजनाने तर सारे मंदिरच ढासळून पडले. आता ते पूर्वीच्या स्वरूपात पुन्हा उभारता येणे अशक्य आहे. जोपर्यंत पाकिस्तान व बांगलादेश हे आपल्याच मातृभूमीचे तुकडे भारतीयांच्या नजरेसमोर राहतील तोपर्यंत अखंड भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या देशभक्तांच्या मनातले शल्य नाहीसे होणार नाही; आणि म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व काळातल्या राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना साकार होऊ शकणार नाही. पाकिस्तान व बांगला देश यांत ज्या घटना घडतात, त्यांची प्रतिक्रिया या देशातल्या लोकांच्या मनावर, आपली इच्छा असो किंवा नसो, उमटल्याशिवाय राहणार नाही. तिच्याकडे दुर्लक्ष करून काही लोक जुन्या राष्ट्रीय एकात्मतेच्या गोष्टी बोलत राहतीलही; पण त्यांचे ते दिवास्वप्न कधीच प्रत्याक्षात उतरणार नाही.

तर मग आता काय करावयाचे ? याचे उत्तर स्पष्ट आहे. उर्वरित भारत हा प्राधान्याने हिंदू भारत आहे, ही वस्तुस्थिती मान्यकरून या देशात हिंदू धर्म, संस्कृती व परंपरा यांचेच वर्चस्व राहील हे ओळखले तरच, पुढची वाटचाल करणे शक्य होईल. तसे पाहिले तर ही प्रक्रिया कधीच सुरू झाली आहे. भारतीय प्रशासनावर हिंदू धर्माची व संस्कृतीची छाप स्पष्ट दिसून येते. हिंदूंचे सण, उत्सव,

कलाप्रकार साऱ्या भारतीय जीवनातून प्रतिबिंबित होत आहेत. आमची विमाने, आगबोटी, रणगाडे, आगगाडचा, संशोधनसंस्था यांना शुद्ध संस्कृत व हिंदू नावे दिली जातात. युरोप, अमेरिकेत गतवर्षी जो भारत महोत्सव (फेस्टिव्हल ऑफ इंडिया) साजरा झाला, त्यातील नव्वद टक्के भाग हिंदू धर्म, संस्कार व परंपरा यांवरच आधारलेला होता. येथील परमपवित्र गंगाजल फ्रान्सच्या सीन नदीत ओतण्यात आले. देवादिकांच्या मूर्तींचे दर्शन परदेशी लोकांना घडविण्यात आले. हे सारे स्वभाविकच होते. कारण, त्यात जनमानसाचे प्रतिबिंब पडलेले होते. मात्र हे सारे चालू असताना आपण हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करीत नाही, आम्ही पूर्णपणे धर्मनिरपेक्ष आहोत हे अट्टहासाने सांगण्याचा प्रयत्न आम्ही करीत होतो. तो तर निव्वळ ढोंगीपणा होता. इंग्लंड अमेरिकेतील राज्यकर्त्यांना व विचारवंतांना आपण ख्रिश्चन आहोत असे म्हणण्यास संकोच वाटत नाही. इस्लामी देश तर जिथे तिथे आपल्या इस्लामीपणाचे घोडे दामटत असतात. मग हिंदूंनाच आपण हिंदू आहोत असे म्हणण्याची लाज का वाटावी ? हजारो वर्षांच्या गुलामगिरीतून आलेला तो एक प्रकारचा न्यूनगंडच आहे. तो न्यूनगंड काढून टाकून आम्ही हिंदू आहोत आणि आमच्या राष्ट्रीयत्वाचा दुसरा प्रमुख आधार हिंदू धर्म व संस्कृती हा आहे, ही गोष्ट आपण मोकळ्या मनाने जोपर्यंत कबूल करणार नाही, तोपर्यंत या देशाची राष्ट्रीय एकात्मता डळमळीतच राहील. नुसत्या काल्पनिक धर्मनिरपेक्षतेच्या आधारे राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचे प्रयत्न मुळीच यशस्वी होणार नाहीत. कारण, त्या आधाराला लोकमानसात मुळीच स्थान नाही. बाहेरून दिलेला कृत्रिम टेकू असल्या बाबतीत मुळीच उपयुक्त ठरत नाही.

आमचे काही अति उत्साही धर्मनिरपेक्षतावादी मित्र राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीसाठी धार्मिक मिरवणुकींवर बंदी घालावी, शासकीय प्रतिनिधींनी विठोबाची पूजा करू नये, किंवा धार्मिक स्थानांत जाऊ नये, पायाभरणी, उद्घाटन यांसारख्या प्रसंगी धार्मिक कृत्ये करू नयेत, असल्या हास्यास्पद सूचना करीत असतात. कारण, त्यांना भारतीय लोकमानसच समजलेले नसते. त्या लोकमानसाला न दुखावता, लोकांना समजावून सांगून या सुधारणा घडवून आणण्याइतका धीर त्यांच्यात नसतो. त्यामुळे लोक जास्तच कट्टर बनतात. शिवाय या सुधारकांचा सगळा मारा हिंदू लोकांवरच असतो. अहिंदूंना काही सांगण्याची हिंमत त्यांच्यात नसते, ते जणू घरच्या म्हातारीचे काळ असतात. त्यांच्या या वृत्तीमुळे त्यांच्या प्रयत्नांचा उलटाच परिणाच जनतेवर होतो; आणि एकात्मतेची वांगी पुराणातच राहून जातात.

भारतीय लोकमानस काय आहे

भारतीय हा शब्द तसा समूहवाचक, सर्वसमावेशक आहे. सर्व जातींच्या व

धर्मांच्या लोकांचा त्यात समावेश होतो. अर्थात् उर्वरित भारतामध्ये ८० टक्के लोक हिंदू धर्माचे अनुयायी असल्यामुळे त्यांना भारतीयांमध्ये आपोआपच प्राधान्य मिळते. या भारतीयांचे लोकमानस आपण नीट ओळखले नाही. तर राष्ट्रीय एकात्मतेच्या वलगना निरर्थक ठरतील. भारतीय मानसावर धार्मिक विचारांचा अत्यंत प्रबल असा पगडा आहे. त्याच्या धार्मिक भावना दुखवून कोणालाही त्याच्या अंत:करण्यात प्रवेश मिळविता येणार नाही, ही गोष्ट महात्मा गांधींनी जेवढी ओळखली होती, तेवढी इतर कुणालाच ओळखता आली नाही. त्यामुळेच गांधींना भारतीयांच्या अंत:करणात अढळ स्थान प्राप्त झाले. गांधींना शिव्याशाप देणारे, त्यांच्या नावाने बोटे मोडणारे, स्वत:ला हिंदुत्वनिष्ठ किंवा सत्यशोधक, पुरोगामी म्हणविणारे लोक याच कारणामुळे लोकमानसात प्रवेश करू शकले नाहीत. येथे ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, हिंदू धर्म हा हजारो वर्षांची परंपरा असलेला, कुठल्याही धर्मग्रंथात बांधला न गेलेला, कोणत्याही एका देव-देवतेशी किंवा प्रेषिताशी एकनिष्ठ नसणारा असा निर्गुण, निराकार, सर्वसमावेशक धर्म आहे. त्या-त्या काळात उपयुक्त ठरलेल्या अनेक गोष्टी आता कालबाह्य ठरल्या असूनही त्या धर्माने अजून त्यांचा त्याग केलेला नाही. त्यांच्यावर जमलेली ती जळमटे काढून टाकण्याची नितांत आवश्यकता आहे. ती काळाची गरज आहे, ही गोष्टही गांधीजींनी ओळखली होती; परंतु ती जळमटे काढून टाकण्याच्या प्रयत्नात मूळ हिंदू धर्माच्या अंगावर चरे, ओरखडे पडणार नाहीत, तो रक्तबंबाळ होणार नाही, याचीही काळजी घेण्याची जरूर गांधीजींना समजली होती. म्हणून जातिभेद, सामाजिक–आर्थिक उच्चनीचता, अस्पृश्यता वगैरे दोष काढून टाकण्यासाठी त्यांनी जंगजंग पछाडले. त्यासाठी जुनाट मनोवृत्तीच्या लोकांकडून होणारे हल्लेही त्यांनी शांतपणे, सोशिकतेने सहन केले. पुण्यासारख्या सनातनी लोकांच्या अड्डयात त्यांच्यावर बाँबही फेकण्यात आला; आणि शेवटी पुण्याच्याच हिंदुत्वनिष्ठांच्या देशद्रोही व विश्वासघातकी गोळ्यांना ते गळी पडले. ज्या अस्पृश्यांसाठी व दलितांसाठी त्यांनी सनातन्यांचे व प्रतिगाम्यांचे हल्ले आनंदाने सहन केले, त्यांनीही त्यांना कृतघ्नपणे शिव्याशापच दिले. परंतु त्यांनी त्या शिव्या ओव्या समजून फुलाप्रमाणे स्वीकारल्या. याला म्हणतात हिंदू धर्माचा आत्मा ! दुसरा कोणता धर्म अशाप्रकारे कालानुरूप सुधारणा घडवून आणण्यास तयार आहे ? इस्लाम तर एका अक्षरानेही इकडे-तिकडे सरकण्यास तयार नसतो. शाहबानू खटल्याचा निकाल आणि तलाकशुदा स्त्रियांसाठी पास करण्यात आलेला कायदा यांच्या संदर्भात मुस्लिमांचे जे वर्तन झाले आणि समान नागरी कायद्याला त्यांनी जो विरोध चालविला आहे, त्यावरून इस्लाम किती संकुचित वृत्तीचा, जुनाट कल्पनांना चिकटून राहणारा धर्म आहे याची सहज कल्पना येते. अक्साची मशीद कुणी वेडयाने जाळली तर येथील

मुसलमानांचा राग अनावर होतो; आणि मिरवणुका काढून ते जाळपोळ करू लागतात. परंतु येथे संयुक्त महाराष्ट्राचे एवढे महाभारत झाले, हैदराबाद व गोवा यांच्या मुक्तीसाठी लढे झाले, शेतकरी व कामकरी यांची प्रचंड आंदोलने झाली, त्यांचा मुसलमानांवर काहीही परिणाम झाला नाही. जणू इस्लामखेरीज दुसऱ्या कोणत्याच गोष्टीत त्यांना स्वारस्य नसते. अशा या असहिष्णू व हिंसक धर्माला राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात कोणतीही महत्त्वाची जबाबदारी कशी बजावता येणार ? म्हणून ती जबाबदारी हिंदू धर्मालाच उचलावी लागणार आहे. हिंदू धर्म व भारतीय संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात मुसलमान सामील झाले तरच राष्ट्रीय एकात्मतेला त्यांचा थोडाफार हातभार लागू शकेल; आणि तिच्यात ते मोलाची भर टाकू शकतील. इंग्रजांच्या आगमनापूर्वी त्यांनी तशी भर टाकलेलीही आहे. त्यावेळी राज्यकर्ते या नात्याने त्यांची भूमिका विशेष प्रभावशाली होती. आता भारताचे नागरिक म्हणून समान पातळीवरून राष्ट्रीय एकात्मतेत सहभागी व्हावयाचे की नुसतेच काठावर राहून हिंदूंच्या नावाने बोटे मोडीत पाकिस्तानकडे डोळे लावून वसावयाचे, याचा निर्णय त्यांनीच घ्यावयाचा आहे.

अल्पसंख्यांकांचा अनुनय : केव्हा क्षम्य ? केव्हा अक्षम्य ?

अल्पसंख्य, दलित वगैरे लोकांचा अनुनय जगातल्या बहुतेक सर्वच सुसंस्कृत देशांत कमी अधिक प्रमाणात केला जातो. कारण, अल्पसंख्य हे सामान्यतः दुर्बल असतात, आणि दीन-दुर्बलांविषयी करुणा, दया वाटणं हे माणुसकीचे एक प्रमुख लक्षण आहे. भारत हा तर या बाबतीत सदैव अग्रेसर राहिला आहे. त्याची एकदोन उदाहरणे उद्धृत करण्यासारखी आहेत. पारशी, यहुदी यांसारख्या ज्या अल्पसंख्य, दुर्बळ लोकांना त्यांच्या देशात मानाने जगणे अशक्य झाले, त्यांनी भारतात आश्रय घेतला आणि भारतानेही तो उदार अंतःकरणाने दिला. अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे चीनने कब्जा केल्यानंतर दलाईलामा व त्यांचे अनुयायी जीव वाचवण्यासाठी भारतात आले आणि चीनच्या रोषाची पर्वा न करता भारताने त्यांना आसरा दिला. दुसरे उदाहरण हिंदूंमधील अस्पृश्य जमातीचे आहे. स्वतःला अत्यंत सुसंस्कृत, उदार व सुधारलेले समजणारे गोरे लोक आफ्रिका किंवा अमेरिका यांसारख्या नव्या संस्कृतीच्या प्रकाशापासून दूर असणाऱ्या खंडांत गेले, तेव्हा त्यांनी तेथील मूळच्या लोकांना गुलाम तरी बनविले किंवा त्यांचे शिरकाण करून त्यांचा संपूर्ण नाश तरी करून टाकला. मुसलमानांनीही असेच क्रौर्याचे प्रदर्शन केले; आणि आपल्या धर्माचा प्रसार केला. गुलामांच्या व्यापाऱ्याला त्यांच्याच काळात चलती आली. याच्या उलट हिंदूंनी जिंकलेल्या लोकांना आपल्या धर्मव्यवस्थेत स्थान देऊन तथाकथित उच्च समाजाच्या बरोबरीने येण्याची संधी उपलब्ध करून दिली.

सारांश, अल्पसंख्यांकांशी कसे वर्तन ठेवावे, याचे धडे हिंदूंना इतरांनी द्यावेत अशी स्थिती कधीच नव्हती. आजही नाही.

यहोवा विटनेस या पंथाच्या मुलांना राष्ट्रगीत न म्हणण्याची जी मुभा सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच दिली, त्याच्या मुळाशी हिंदूंची उदारता व सहिष्णुताच आहे. अर्थात् आपल्या निकालाचे एकूण समाजमानसावर काय परिणाम होतील, याचा अधिक गंभीर विचार न्यायमूर्तींनी करायला हवा होता. कारण, एकदा राष्ट्रगीत न म्हणण्याची मुभा मिळाली की, त्यातून राष्ट्रगीत चालू असताना उभे न राहण्याची, त्यावेळी टिवल्याबावल्या करण्याची, राष्ट्रध्वजाचा अपमान करण्याची, किंबहुना वाटेल तसे वागण्याची सवलत आपल्याला मिळाली आहे, असा गैरसमज अल्पसंख्यांकांच्या मनात निर्माण होईल. यातून सावळा गोंधळ माजेल आणि राष्ट्रीय एकात्मतेऐवजी जास्तीच फाटाफूट पसरेल, ही गोष्ट त्यांनी लक्षात घ्यायला हवी होती. ही सवलत मिळालेली अल्पसंख्य मुले जास्तीच वेगळी पडतील, ती अस्पृश्य समजली जातील आणि त्यांना इतर मुलांमध्ये मिसळणे अवघड होईल, याची कल्पना न्यायमूर्तींना यायला हवी होती.

परंतु आजकाल अल्पसंख्यकांचा जो अनुनय चालला आहे, तो अत्यंत राष्ट्र-विघातक असून राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील तो सर्वात मोठा अडसर आहे. काही लोक असे म्हणतात की, पूर्वी गांधी– नेहरूंनी केले तेच आम्ही आता करीत आहोत. याचा अर्थ असा की, त्यांना दोन परिस्थितींतील फरक कळत नाही किंवा जाणून बुजून ते तिकडे काणाडोळा करीत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात देशभक्त भारतीयांनी जेव्हा स्वातंत्र्यासाठी संग्राम सुरू केला, तेव्हा सारी जनता एकवटली तर आपला निभाव लागणार नाही, हे ओळखून ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी वेगवेगळ्या जाती-जमातींत फूट पाडून त्यांचे सामर्थ्य खच्ची करण्याचा प्रयत्न केला आणि त्यात ते यशस्वीही झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यास येथे बहुसंख्य हिंदूंच्या आधिपत्याखाली अल्पसंख्य मुस्लिम–ख्रिश्चनांना गुलामांचे जिणे जगावे लागेल अशी भीती इंग्रजांनी अल्पसंख्यकांच्या मनात त्यांच्या पुढाऱ्यांच्या साह्याने निर्माण केली; आणि त्यांना स्वातंत्र्यलढ्यापासून दूर ठेवले. अशावेळी त्यांच्या मनातील भय दूर करण्याचा व त्यांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला. तसे करणे योग्य व अपरिहार्यच होते.

या संदर्भात आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे उचित होईल, ती म्हणजे भारतात सातत्याने होत राहिलेली घुसखोरी. पाकिस्तानातून व बांगला देशातून लक्षावधी मुसलमान भारतात दरसाल घुसत आहेत. या बेकायदेशीर घुसखोरांना मुंबई, भिवंडी, मालेगाव यांसारख्या शहरांत मुस्लिम वस्त्यांमध्ये आसरा मिळतो. तेथे राहून ते स्मगलिंग, गुंडगिरी व दंगली करून या देशात अस्वस्थता व अस्थिरता

माजवितात. आसाममध्ये तर या घुसखोरांनी साऱ्या राज्याचाच कबजा घेऊन ते भारतापासून तोडण्याचा डाव रचला होता; आणि त्याला माजी राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांचा पाठिंबा होता, असे उघडपणे बोलले जाते. या बाबतीत भारत सरकारचा बेफिकीरपणा देशाचे तुकडे पडण्यास साहाय्यभूत होत आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात सरकारकडूनच कसा अडथळा निर्माण होत आहे, त्याचे हे एक उदाहरण आहे.

जातीयवादी हिंदूंनी अदूरदर्शीपणाने गांधीजींच्या या प्रयत्नाला विरोध केला आणि त्यांना मुस्लिमधार्जिणे ठरवून, त्यांची यथेष्ट बदनामी केली. गांधीजींनी मुसलमानांमधील जिनांसारख्या पुरोगामी पुढाऱ्यांना जवळ करण्याऐवजी अली बंधू-सारख्या जातीयवाद्यांना जवळ केले. त्यामुळे त्यांचा प्रयत्न निष्फळ ठरला ही गोष्ट अलाहिदा; परंतु त्या प्रयत्नातील त्यांचा हेतू शुद्ध होता, त्यात कसलाही वैयक्तिक स्वार्थ नव्हता, हे कुणीच नाकारू शकणार नाही. याच्या उलट आजकाल केवळ मुसलमानांची मते मिळून आपला पक्ष अधिकारावर यावा, यासाठी त्यांचा अनुनय केला जात आहे. त्यापायी आरिफ मोहम्मद खानांसारख्या राष्ट्रवादी मुसलमानांना दूर सारून अन्सारी व शहाबुद्दीन यांच्यासारख्या कट्टर जातीयवाद्यांना जवळ केले जात आहे. याने राष्ट्रीय एकात्मता साध्य होण्याऐवजी जास्तच फाटाफूट होत आहे. एवढेच नव्हे तर, त्यामुळे मुसलमानांमधील पुरोगामी शक्ती पराभूत होऊन प्रतिगामी शक्तींचा वर्चस्वा वाढत आहे आणि मुस्लिम समाज अधिकाधिक मागस बनत आहे. मुस्लिम स्त्रियांची हलाखी तर कमालीची वाढली आहे. म्हणून आज-कालचा मुस्लिम अनुनय हा अक्षम्य आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील तो फार मोठा अडथळा आहे.

अनुसूचित जाती-जमातींच्या बाबतीत याच्या उलट स्थिती आहे. या लोकांना मागस ठेवण्यात थोड्याफार प्रमाणात का होईना, वरिष्ठ जाती-जमाती जबाबदार आहेत. म्हणून त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवून त्यांना पुढारलेल्या जातींच्या बरोबर आणण्याचा प्रयत्न करणे हे सर्वच देशभक्तांचे कर्तव्य आहे. तसे करिताना वरिष्ठ जमातींना थोडाफार त्रास सहन करावा लागला तरी तो सोसणे आवश्यक आहे. तळागाळाच्या लोकांनी वर येऊन इतरांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करेपर्यंत वरिष्ठ वर्गातल्या लोकांनी देशहितासाठी एवढा त्याग करणे जरूर आहे. ते तो आनंदाने करतील, तर पुष्कळच कटुता नाहीशी होईल. अर्थात् या बाबतीत दलित पुढाऱ्यांवरही खूप मोठी जबाबदारी आहे. जुनी मढी उकरून काढून सवर्ण समाजाला शिव्याशाप देण्याचे आणि गांधींजीसारख्या जगन्मान्य राष्ट्रपित्याचा अपमान करण्याचे उद्योग त्यांनी थांबविले पाहिजेत. अस्पृश्य काय किंवा मुलसमान काय गांधींचे मोठेपण मान्य करण्यास जोपर्यंत तयार होणार नाहीत, तोपर्यंत

इथल्या बहुजन समाजाला त्यांच्याविषयी विश्वास व आत्मीयता वाटणार नाही. कारण, या देशातल्या बहुसंख्य जनतेने गांधींना महात्मा व राष्ट्रपिता म्हणून स्वीकारलेले आहे. तिचा तो मानबिंदू आहे. त्याला धक्का लावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना– मग ते जातीयवादी सवर्ण असोत, दलित असोत की मुस्लिम, ख्रिश्चन असोत, तेथील जनता मुळीच क्षमा करणार नाही. गांधीजींनी अस्पृश्यता– निवारणाला आपल्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले होते. त्यांचे ते कार्य पूर्ण करणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली होय. त्यादृष्टीनेच राखीव जागांच्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. या साऱ्या पार्श्वभूमीवरून विचार केल्यास अल्पसंख्यकांचा व दलितांचा अनुनय केव्हा क्षम्य व केव्हा अक्षम्य ठरतो, याची कल्पना आपणास येऊ शकेल; आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भातील त्याचे स्थान आपल्याला कळू शकेल.

राष्ट्रीय एकात्मतेतील भाषेचे स्थान

राष्ट्रीय एकात्मतेमध्ये भाषेला किती महत्त्वाचे स्थान आहे, याची कल्पना फार थोड्या लोकांना असते. सामान्यतः या बाबतीत धर्माचाच प्रामुख्याने विचार केला जातो. परंतु धर्माइतकेच, किंबहुना धर्माहूनही अधिक महत्त्व भाषेला आहे, याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे युरोपातील बहुतेक राष्ट्रे भाषेच्या आधारावरच बनलेली आहेत. त्या सर्वांचा धर्म (ख्रिस्ती) एकच असूनही भाषांनुसार त्यांनी आपापली वेगवेगळी राष्ट्रे बनविली आहेत. आपापल्या भाषेविषयी तेथील लोकांना अत्यंत अभिमान व आत्मीयता वाटते. भारतीयांनाही धर्माइतकेच भाषेविषयी प्रेम वाटते. मात्र आपली मातृभाषा व राष्ट्रभाषा या दोन भाषांचा भारतीयांना विचार करावा लागतो. कारण येथे तेरा-चौदा विकसित व समान पातळीवरच्या भाषा शेकडो वर्षांपासून नांदत आहेत. म्हणून राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना प्रदेशभाषा व राष्ट्रभाषा यांचा एकत्र विचार करावा लागतो. तमिळ, बंगाली, पंजाबी, नेपाळी वगैरे भाषा बोलणारे लोक अधून-मधून एकांतिक भूमिका घेऊन केवळ प्रदेशभाषेलाच महत्त्व देतात; आणि राष्ट्रभाषा हिंदीला विरोध करतात. तेवढ्या प्रमाणात त्यांची राष्ट्रीय भावना कमजोर बनते, हे नाकारण्यात अर्थ नाही. तमिळनाडूचे लोक तर हिंदीच्या प्रश्नावरून देशापासून फुटून निघण्याचीही भाषा कधीकधी बोलतात. तो तर देशद्रोहच समजला पाहिजे. तरीपण हिंदू धर्माने त्यांना उर्वरित भारताशी असे काही जखडून टाकले आहे की, त्यांच्यातील फुटीरतावादी लोक कधीही यशस्वी होऊ शकणार नाहीत. ही गोष्ट ख्रिस्ती व मुसलमान यांच्या बाबतीत इतक्या ठामपणाने सांगता येत नाही. पूर्वांचलातील नागाभूमी, मिझोराम, मेघालय वगैरे ख्रिस्ती राज्यांनी राजभाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार करून आपल्या फुटीरपणाचे प्रदर्शन घडविले आहे. याचप्रमाणे काश्मीरमध्ये

कुणाचीही मातृभाषा उर्दू नसताना त्या राज्याने उर्दूला राजभाषा बनवून इस्लामी फुटीरवृत्तीला खतपाणी घातले आहे. ज्यांची मातृभाषा खरोखरीच उर्दू असेल त्यांनी तिचा पुरस्कार करणे व आग्रह धरणे उचितच म्हटले पाहिजे. परंतु ज्यांना उर्दूचा एक शब्दही येत नाही, त्यांनी केवळ आपण मुसलमान आहोत, म्हणून आपली मातृभाषा उर्दू आहे, असे सांगणे, हा शुद्ध जातीयवाद व देशद्रोह आहे. दुर्दैवाने येथील राजकीय पक्षांनी व शासकांनी मुसलमानांच्या या गैरसमजाला खतपाणी घालून त्यांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून दूर राहण्यास मदत केली आहे. महाराष्ट्रापुरता विचार केल्यास असे दिसून येते की, येथील मुसलमानांची मातृभाषा मराठीच आहे. परंतु ते हट्टाने आपली मातृभाषा उर्दू असल्याचे सांगतात; आणि उर्दूच्या शाळांसाठी आग्रह धरून व सरकारवर दडपण आणून उर्दूसाठी वेगळ्या शाळा चालवायला सरकारला भाग पाडतात. प्रदेशभाषा व राष्ट्रभाषा यांपासून दूर राहिल्यामुळे त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील होणे शक्य होत नाही. एवढेच नव्हे तर, उर्दूतून उच्च शिक्षण घेण्याची सोय शहरांपुरतीच मर्यादित असल्यामुळे मुस्लिम मुले उच्च शिक्षणापासून वंचित राहतात; व त्यांना बेकारीत दिवस काढावे लागतात. मुसलमानांचा उर्दूविषयीचा हट्टाग्रह हा राष्ट्रीय एकात्मतेतील एक मोठा अडसर आहे. पण त्याविषयी कोणीच स्पष्ट बोलत नाही.

सारांश, राष्ट्रीय एकात्मता ही एखादी हवेतली कल्पना नसून राष्ट्राच्या प्रत्यक्ष जीवनाशी तिचा सजीव संबंध आहे, ही वस्तुस्थिती लक्षात न घेता नुसताच एकात्मतेचा जप करीत राहिल्याने काहीच साध्य होणार नाही. या देशात आता मातृभूमी, हिंदू धर्म, संस्कृती, परंपरा व भाषा यांना एक वेगळा संदर्भ प्राप्त झाला आहे. तो नाकारून कसल्यातरी परकीय संकल्पनांच्या आधारे राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्यास तो कधीच यशस्वी होणार नाही. सुदैवाने अनेक समजदार, सुधारणावादी मुसलमान व ख्रिस्ती लोकांना हा संदर्भ समजला व पटला आहे. कै. छागला, हमीद दलवाई, श्री मुजफ्फर हुसैन, आरिफ मोहम्मद खान वगैरेंची नावे या संदर्भात सहज आठवतात. इंडोनेशियाच्या लोकांप्रमाणे 'आमचा धर्म इस्लाम असला तरी, आमची संस्कृती हिंदू आहे' असे छातीठोकपणे सांगणारे मुसलमानच राष्ट्रीय एकात्मतेचे उद्दिष्ट साध्य करण्यात साहाय्यभूत होणार आहेत. इस्लामला मंजूर नसलेल्या गायनवादन, चित्रकला, शिल्पकला वगैरे कलांमध्ये रंगून जाणारे मुसलमानही याच श्रेणीत येतात; आणि इस्लामच्या अन्यायपूर्ण जुलमी बंधनातून मुक्त होण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या मुस्लिम स्त्रियाही या बाबतीत पुष्कळ काही करू शकतात. अर्थात् यासाठी हिंदूंनीही आपली जबाबदारी ओळखण्याची जरूर आहे. सुदैवाने स्वतःला हिंदू धर्माचे रक्षक समजणारे मूठभर माथेफिरू जहाल हिंदुत्ववादी वगळल्यास सर्वसामान्य हिंदू जनता आणि उदारमतवादी हिंदू

विचारवंत या बाबतीत सहकार्य करण्यास आनंदाने तयार असल्याचे दृश्य आज दिसत आहे. त्यांच्यासमोर स्वामी विवेकानंदांचा आदर्श आहे. तेही हिंदुत्वनिष्ठच आहेत; परंतु त्यांची जातकुळी निराळी आहे. हिंसा, सूड, भडकपणा, आततायीपणा यांपासून ते दूर राहून माणूस घडविण्याचे, हरिजन-गिरिजनांच्या उत्थानाला हातभार लावण्याचे कार्य गेली साठ वर्षे त्यांनी सातत्याने धीमेपणाने व चिकाटीने चालविले आहे. ते बडबड करीत नाहीत. प्रत्यक्ष काम करतात. त्यांची संख्या फार मोठी नसली तरी, त्यांच्या कार्याच्या गुणवत्तेचा प्रभाव पडल्यावाचून राहत नाही. स्वत:ला पुरोगामी व धर्मनिरपेक्ष म्हणविणारे लोक त्यांच्याकडे संशयाने पाहतात व त्यांना चार हात दूर ठेवतात; परंतु या देशात राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्याच्या कामी त्यांचाच खरा हातभार लागणार आहे, ही गोष्ट इतरांनी ओळखली तर हे काम अधिक सुलभतेने व कमी वेळात तडीस जाईल यात मुळीच शंका नाही.

+ +

'आशादीप' : दिवाळी, ८६

ता. क. : राष्ट्राचे ऐक्य व अखंडता यांचा विचार करिता देशातील बहुजन समाज हा सदैव निर्भय व एकसंध राहिला पाहिजे, या गोष्टीचे महत्त्व लक्षात येते. कारण त्याच्यावर देशाचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून हिंदूंचे संघटन उचितच ठरते. मात्र ते संघटन द्वेषावर व सूडभावनेवर आधारलेले असता कामा नये. आज हिंदू संघटनाचा प्रयत्न करणारे मुख्यत: अहिंदूंच्या द्वेषावर भर देतात. द्वेष व सूड ही हिंदू मनाला मानवत नाहीत. म्हणून बहुसंख्य हिंदू समाज अशा संघटनांपासून दूर राहातो. प्रेम, विश्वास व निर्भयता यांवर आधारलेले जे व्यापक सामाजिक संघटन गांधींनी उभारले ते प्रत्यक्षात हिंदू संघटनच झाले. कारण त्यांची कितीही इच्छा असली तरी इतर धर्मीयांनी त्यांच्या संदेशाकडे पूर्ण दुर्लक्षच केले.

(१२·१२·९०)

२९. शिखांमधील खुनाखुनी हा कशाचा परिणाम आहे ?

भारताचा खड्गहस्त समजल्या जाणाऱ्या शीख जमातीत एकमेकांचे खून पाडण्याचे जे सत्र अलीकडेच सुरू झाले आहे, त्याने सर्वच देशभक्तांना अत्यंत व्यथित केले आहे. तत्पूर्वी खालिस्तानचे जे भूत मूठभर शिखांच्या मानगुटीवर देशाच्या फाळणीच्या काळापासून गेली पस्तीस-चाळीस वर्षे बसले आहे आणि वेगवेगळ्या रूपात जे पुनःपुन्हा थैमान घालीत आहे, त्यानेही अनेकांना चक्रावून टाकले आहे. वस्तुतः शीख ही एक देशभक्त, तेजस्वी, बाणेदार जमात आहे. अखंड भारताच्या स्वातंत्र्यआंदोलनात या जमातीने फार मोठ्या प्रमाणावर बलिदान करून सबंध देशाकडून आदरांजली मिळविली होती. अशा या जमातीला हे देशद्रोहाचे व यादवीचे डोहाळे कसे काय लागले ? हे सारे अचानक घडून आले काय ? की याची बीजे शीख पंथाच्या शिकवणुकीतच कुठेतरी पेरली गेली होती ? हे प्रश्न माझ्या मनात वारंवार उठत राहिले. याच सुमारास आकाशवाणीकडून गुरू गोविंदसिंगांच्या जयंतीच्या निमित्ताने एक भाषण देण्याचे निमंत्रण मिळाले. त्या भाषणासंबंधी चिंतन चालू असता गुरुदेव रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या 'शिवाजी ओ गुरु गोविंदसिंह' या लेखाचे स्मरण झाले. 'रवीन्द्रनाथ आणि महाराष्ट्र' या माझ्याच पुस्तकात तो लेख समाविष्ट असल्यामुळे त्याच्यासाठी फार शोधाशोध करावी लागली नाही. गुरुदेवांचा तो लेख वाचीत असता अनेक गोष्टींचा उलगडा होत गेला; आणि आपल्या या प्रश्नांची उत्तरे त्यातून मिळतात, असे आढळून आले. गुरुदेवांनी शीख आणि मराठे या दोन लढाऊ जमातींमधील महत्त्वाचा फरकही लेखाच्या प्रारंभी नमूद केला आहे. त्यावरून शिखांप्रमाणे मराठे हे यादवीपासून

कसे बचावले याचाही उलगडा होतो.

शीख इतिहास व मराठा इतिहास

गुरुदेव लिहितात, "शीख इतिहास आणि मराठा इतिहास यांतील मुख्य भेद असा की, मराठा इतिहासाचे पहिले आणि प्रमुख नायक जे शिवाजी महाराज त्यांनी हिंदू राज्य स्थापन करण्याचे ध्येय मनामध्ये निश्चित करून इतिहासाच्या रंगभूमीवर मराठी समाजाला आणले होते. त्यांनी देशजय, शत्रुविनाश, राज्यविस्तार वगैरे जे काही केले, ती सारी एका भारतव्यापी महान् संकल्पाचीच अंगे होती.

"याच्या उलट शीख इतिहासाचा आरंभ मूलतः धार्मिक इतिहासाच्या रूपाने झाला होता. बाबा नानकांनी जे स्वातंत्र्य अंतरामध्ये मिळविले होते ते काही राष्ट्रीय स्वातंत्र्य नव्हते. जी केवळ एखाद्या विशिष्ट देशाच्या व जातीच्या कल्पनेने आणि अभ्यासाने मर्यादित आहे, जगातील समस्त मानवांच्या चित्ताला जिच्यात अधिकार नाही, उलट आडकाठीच आहे, अशा देवपूजेमध्ये नानकांची धर्मबुद्धी स्वतःला सीमित करू शकली नाही. या साऱ्या संकुचित पौराणिक धर्माच्या बंधनापासून त्यांचे हृदय मुक्त झाले होते; आणि हीच मुक्ती सर्वांपर्यंत नेऊन पोहोचविण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते. नानकांच्या उपदेशाने आकृष्ट होऊन ज्यांनी त्यांच्याकडून धर्मदीक्षा घेतली, त्यांना 'शीख' म्हणजे 'शिष्य' अशी संज्ञा मिळाली. माणूस कोणत्याही जातीचा असला तरी त्याला नानकांचे शिष्यत्व ग्रहण करता येत असे. त्यामुळे नानकांच्या अनुयायांमुळे एखादा राष्ट्रीय अथवा जातिगत इतिहास निर्माण होईल, अशा प्रकारचे चिन्ह प्रारंभी दिसून आलेले नाही.

"परंतु मुगलांकडून अत्याचार झाल्यामुळे हा नानक शिष्यांचा समुदाय एका विशिष्ट संप्रदायात संघटित झाला, आणि त्याचमुळे सर्वसामान्य लोकांमध्ये धर्मप्रचार करण्याऐवजी आपल्या स्वतःला विनाश आणि उपद्रव यांपासून वाचविण्यासाठी तो प्रामुख्याने बद्ध-परिकर झाला. अशा प्रकारे बाहेरच्या दडपणामुळेच शीख ही एक संघटित जात बनली. शिखांच्या शेवटच्या गुरूंनी– गुरू गोविंदसिंगांनी– याच कामी स्वतःला विशेषतः वाहून घेतले. साऱ्या मानवांमध्ये धर्मप्रचार करण्याचे कार्य आवरते घेऊन त्यांनी शिखांना सामर्थ्यवान बनविणे, हेच आपले जीवनव्रत बनविले.

"वस्तुतः हे काम धर्मप्रचारकाचे नव्हे; ते प्रामुख्याने सेनापतीचे आणि राजनीतिज्ञांचे काम. गुरू गोविंदसिंगांमध्ये तोच गुण होता. असामान्य दीर्घोद्योगाच्या जोरावर त्यांनी आपले सैन्य तयार केले; आणि ते स्वतः शत्रूचा सूड उगविण्यास पात्र असे योद्धे बनले. त्यांनी धर्मसंप्रदायाचे रूपांतर सैन्यात केले; आणि धर्म-

प्रचारक गुरूचे आसन रिकामे केले.

" गुरू नानकांनी ज्या मोक्षप्राप्तीला सर्वांत श्रेष्ठ ठरविले होते, तिच्यावर गुरू गोविंदांना आपले लक्ष स्थिर करता आले नाही. शत्रूच्या हातून मुक्ती मिळविणे, हीच एक गोष्ट त्यांनी आपल्या शिष्यांच्या मनावर ठसविली होती. त्यामुळे इतिहासामध्ये क्षणभर शिखांचा पराक्रम उज्ज्वलपणे चमकला यात शंका नाही. त्यायोगे शिखांना रणनैपुण्य प्राप्त झाले हेही खरे; परंतु बाबा नानकांनी जे पाथेय देऊन त्यांना एका विशाल, उदार मार्गावरून चालण्याची प्रेरणा दिली होती, ते पाथेय त्यांनी येथेच खर्च करून टाकले; आणि आपली यात्राही त्यांनी याच ठिकाणी संपविली.

" याच्या नंतरचा शिखांचा इतिहास म्हणजे फक्त लढाया आणि मुलुखगिरी यांचाच इतिहास होय. इकडे मुगल सत्ताही क्षीण होऊ लागली होती; आणि तिच्याविरुद्ध शिखांना जसजसा विजय मिळत गेला तसतशी त्यांची आत्मरक्षणाची कल्पना नाहीशी होऊन सत्ताविस्ताराची लोलुपता वाढू लागली. जोपर्यंत प्रतिपक्ष प्रबळ असल्यामुळे आत्मरक्षणाचा प्रयत्न हाच सर्वांत महत्त्वाचा असतो, तोपर्यंत आपत्तीच्या तडाख्यात सापडलेल्या लोकांमधील ऐक्यबंधन दृढ राहते. बाहेरचे ते दडपण एकदा दूर झाले की, मग येणारा विजयोन्माद सांभाळणे कुणाला शक्य असते ? आत्मरक्षणासाठी जी युद्धशक्ती संचित झालेली असते त्या शक्तीला इतरांवर आघात करायच्या प्रयत्नापासून परावृत्त करून स्वतःला घडविण्याच्या कामी तिचा वापर करणे कोणाला शक्य आहे ?

" ज्या शक्तीला ते शक्य होते, तिला गुरू गोविंदसिंगांनी ध्येयप्राप्तीच्या अतिलोभाने क्षुद्र करून टाकले. आपल्या गुरुपदाच्या बदल्यात त्यांनी शिखांना तलवारीचे दान दिले. त्यांच्या निर्याणानंतर नानकांनी प्रचारिलेले महासत्य ग्रंथसाहेबामध्ये बद्ध झाले. गुरुपरंपरेने जीवनप्रवाहाबरोबर वाहत राहून मानवसमाजाला सफल बनविण्यासाठी अप्रतिहतपणे पुढे जाणे त्याला जमले नाही. ते एके ठिकाणी अडकून पडले. तेव्हा ही शक्ती बघता बघता लोभी आणि संयमहीन बनली. देव अंतर्धान पावल्यामुळे भुताखेतांचा प्रादुर्भाव झाला. हिसकाहिसकी आणि गटबाजी यांना जोर चढला.

" या उच्छृंखल आत्मघातकी प्रयत्नांमधून रणजीतसिंहांचा उदय झाला. त्यांनी काही काळपर्यंत विस्कळीत शिखांना एकत्र आणले, पण ते केवळ बळाच्या द्वारे. ते सर्वांपेक्षा बलवान होते, म्हणून त्यांनी सर्वांचे दमन केले. जो बळाच्या जोरावर लोकांना एकत्र आणतो, तो इतरांना दुर्बळ बनवूनच ते ऐक्य साधीत असतो. इतकेच नव्हे तर, ऐक्याचे चिरंतन मूलतत्त्व जे प्रेम त्याचाच पराभव करून, त्याला पंगू बनवून तो आपले उद्दिष्ट साध्य करतो. रणजीतसिंहांनी स्वतःचा स्वार्थ

साधण्यासाठीच साऱ्या शिखांना साम–दाम–दंड–भेदाने एकत्र बांधून ठेवले होते. रणजीतसिंहांनी शीख संप्रदायाच्या मनात अशी कोणतीच महान भावना निर्माण केली नाही की, जी त्यांच्या पश्चातही त्यांना एकत्र ठेवू शकली असती. केवळ अप्रतिहत चातुर्यप्रभाव आणि स्वार्थसिद्धीसाठी सावधपणे केलेला दीर्घोद्योग यांचेच उदाहरण त्यांनी स्वतःच्या आचरणाने घालून दिले. रणजीतसिंहांच्या लोभीपणाला सीमा नव्हती; आणि त्यांची भोगस्पृहा असंयमी होती. त्यांच्या बाबतीत प्रशंसा करता येण्यासारखी गोष्ट एकच होती, ती म्हणजे त्यांनी जे इच्छिले ते मिळविले. त्यांना कोणी अडवू शकले नाही. फक्त एकाच बाबतीत त्यांनी आपल्या दुर्दम्य इच्छेला ताब्यात ठेवले होते– अत्यंत लोभी असूनही त्यांनी भारताच्या नकाशावरील इंग्रजांच्या ताब्यातील लाल सीमारेषेचे उल्लंघन केले नाही. त्यांच्या स्वार्थबुद्धीने त्यांना तेथे रोखून धरले.

" काही असो, रणजीतसिंह यशस्वी (कृतकार्य) झाले. यशस्वितेचे उदाहरण माणसाला संकटात लोटण्याचे कार्य जितके करते, तितके दुसरे कोणी करीत नाही. ते (उदाहरण) माणसाच्या मंगलबुद्धीला पराभूत आणि त्याच्या लोभी वृत्तीला बेचैन करून सोडते. तो तर अपघाती मृत्यूचाच मार्ग.

" ज्यांच्यापासून शीखसंप्रदाय सुरू झाला, ते गुरुनानक म्हणजे अपेशीपणाचे, अकृतकार्यतेचे उज्ज्वल उदाहरणच होय... याच्या उलट जे रणजीतसिंह महाराज यशस्वितेचे आदर्शस्थान होते... त्यांनी आपल्यामागे शिखांसाठी काय ठेवले ?– फाटाफूट, अविश्वास आणि उच्छृंखलता ! यानंतर जे कोणी शिखांचे पुढारी झाले त्यांनी या यशस्वी राजाच्या उदाहरणावरून हाच धडा घेतला की, ज्याचा जोर त्याचा मुलुख, बळी तो कान पिळी ! ते त्याग शिकले नाहीत, आत्मसमर्पण शिकले नाहीत. ' यतोधर्मस्ततो जयः ' या मंत्राचा त्यांना विसर पडला. याचा अर्थ असा की, दीनहीन नानकाने ज्या शक्तीच्या द्वारे शिखांना एकत्र आणले होते, तिला महाप्रतापी रणजीतसिंहांनी आग लावून दिली; आणि इतिहासाच्या आकाशात शिखांचे तेजोमंडळ क्षणभर पेटत राहून दुसऱ्याच क्षणी विझून गेले.

" आज शिखांमध्ये पुढे जाण्याची वृत्ती नाही. ते एका लहानशा संप्रदायात बद्ध होऊन पडले आहेत. त्यांची वाढ खुंटली आहे. त्यांच्यामध्ये गेल्या अनेक शतकांत आणखी एखादा मानवगुरू निर्माण होऊ शकलेला नाही. ज्ञान, धर्म, कर्म यांच्या बाबतीत मानवाच्या भांडारात त्यांनी कसलीच नवीन भर घातली नाही.

" नानकांनी आपल्या शिष्यांना स्वार्थापासून, धार्मिक संकुचितपणापासून, आध्यात्मिक अनुभूतिशून्यतेपासून मुक्त होण्यासाठी आवाहन केले होते. त्यांच्यातील माणुसकी प्रामुख्याने सार्थकी लागावी अशी, त्यांची इच्छा होती. गुरू गोविंदांनी याच शिखांना एका विशिष्ट उद्देशाला उपयुक्त बनवून संघटित केले. तसेच त्यांना

त्या उद्दिष्टाचा विसर पडू नये म्हणून त्यांच्या नावांत, वेशभूषेत, आचारांत, त्यांच्या चित्तात नाना प्रकारांनी ते उद्दिष्ट विशेषपणे ठसविले. अशा प्रकारे गुरू गोविंदांनी शिखांतील मानवतेच्या उत्साहरूपी प्रवाहाला इतर सर्व दिशांनी अडवून एका विशिष्ट दिशेने वाहावयास लावले. त्यायोगे शीख जमात एका उद्दिष्टाच्या साच्यात बांधली जाऊन दृढ व मजबूत बनली. जेव्हा शीख लोक मुक्त मानव न राहता विशिष्ट उद्दिष्टाला योग्य असे मानव बनले, तेव्हा प्रबळ राजाने त्यांना आपल्या उद्दिष्टांसाठी वापरले; आणि अशा प्रकारे ते प्रबळाने ठरविलेल्या उद्दिष्टांसाठी वापरले गेले आहेत. स्पार्टा नगरामध्ये ग्रीस देशाने जेव्हा आपल्या मानवतेला एका उद्दिष्टानुसार संकुचित बनवले तेव्हा त्याला युद्ध करता आले हे खरे; पण त्याने स्वतःला क्षुद्र बनविले. कारण, युद्ध करण्याची क्षमता हे काही माणसाचे अंतिम ध्येय नव्हे. अशा प्रकारे माणसाने तात्कालिक उद्दिष्टासाठी स्वतःचे श्रेय (हित) नष्ट केल्याची उदाहरणे अनेक आहेत; आणि आजपर्यंत या अदूरदर्शी लोभीपणाच्या प्रहारामुळे साऱ्या समाजातच मनुष्यबळी चालू आहेत. जी नररक्त-पिपासू क्षुद्र देवता हा बळी ग्रहण करीत असते, ती कधी समाजाचे, कधी राष्ट्राचे, कधी धर्माचे तर कधी त्याकाळी प्रचलित असलेल्या एखाद्या सर्वजनमोहक गोष्टीचे नाव धारण करून मानवाचा नाश करीत असते.

" शीख-इतिहासाचा परिणाम आमच्या देशाच्या बाबतीत अत्यंत शोकावह झालेला आहे. समुद्राला मिळण्याची अभिलाषा बाळगून अभ्रभेदी पर्वताच्या पवित्र शुभ्र शिखरावरून निघालेली नदी जेव्हा, वाटेतील वाळूच्या ढिगात लुप्त होऊन स्वतःची गती हरवून बसते, आपले गाणे विसरते, तेव्हा ती व्यर्थता जशी शोचनीय बनते, त्याचप्रमाणे विश्वाला पवित्र आणि सुपीक बनविण्यासाठी बाहेर पडलेली, भक्ताच्या हृदयातून निघालेली शुभ्र, निर्मल शक्तिधारा जेव्हा सैन्याच्या बराकीत, लाल रंगाच्या चिखलामध्ये पोषली गेली, तेव्हा त्याबद्दल माणसाला कसलाही गौरव किंवा आनंद वाटणे कसे शक्य आहे ?

" हा शीख इतिहास कालांतराने प्रतिहिंसेच्या इच्छेने अथवा अन्य एखाद्या संकुचित अभिलाषेच्या आकर्षणाने आपल्या लक्ष्यापासून भ्रष्ट होऊन मानवी साफल्याच्या क्षेत्रातून स्खलित झाला. परंतु त्यापेक्षा अधिक शोचनीय गोष्ट म्हणजे, राष्ट्रीय साफल्याच्या क्षेत्रातही त्याला गौरव प्राप्त करता आला नाही. रणजीत-सिंहानी जे राज्य प्रस्थापित केले, ते रणजीतसिंहांचेच राज्य होते. गुरू गोविंदसिंगांनी मुगलांशी जो संग्राम केला तो केवळ शीखसंप्रदायाचाच संग्राम होता. त्यांनी आपला संकल्प आपल्या शिष्यसमुदायाच्या बाहेर प्रसारित केला नाही.

" याच ठिकाणी मराठा इतिहास आणि शीख इतिहास यांच्यांतील फरक दिसून येतो. शिवाजी महाराजांनी जे कार्य अंगावर घेतले होते, ते कोणत्याही

एखाद्या लहानशा गटापुरते मर्यादित नव्हते. याचे मुख्य कारण असे की, त्यांनी ज्या हिंदू जातीला व हिंदू धर्माला मुस्लिम सत्तेच्या जोखडातून मुक्त करण्याचा संकल्प केला होता, ती जाती आणि तो धर्म ही शीख जातिधर्मापेक्षा कितीतरी पटींनी अधिक व्यापक होती. यामुळे समग्र भारताचा इतिहासच नव्याने घडविण्याचे उद्दिष्ट त्यांनी आपल्यासमोर ठेवले होते, यात मुळीच संशय नाही."

सदर लेखाचा उत्तरार्ध आपण सध्या बाजूस ठेवू. गुरुदेवांनी शिवाजी महाराजांचे मोठेपण अत्यंत मार्मिकपणे विशद केले आहे; परंतु तसे करताना ते वाहवून गेलेले नाहीत. शिवाजी महाराजांच्या मर्यादाही त्यांनी अगदी स्पष्टपणे सांगितल्या आहेत. ते म्हणतात, "परंतु असे असूनही शीख आणि मराठा या दोन्ही जमातींचा इतिहास एकाच वेळी, एकाच प्रकारे निष्फळतेत समाप्त झाला. याचे कारण काय ? याचे कारण हेच की, जे उद्दिष्ट सबंध देशाला व्यापू इच्छिते ते केवळ एका अथवा काही थोड्या विशालहृदयी व्यक्तींच्या आधाराने सफल होऊ शकत नाही...शिवाजी महाराजांचे हृदय संपूर्ण देशातील लोकांशी स्वतःला जोडू शकले नाही. त्यामुळे त्यांचा उद्देश काहीही असला तरी, त्यांचा प्रयत्न हा साऱ्या देशाचा प्रयत्न होऊ शकला नाही; आणि मराठ्यांनी सुरू केलेला हा उपक्रम परिणामी भारतातील इतर जमातींच्या बाबतीत लुटारूंचा भयंकर उपद्रव बनला. जे सर्वांचे मंगल आहे ते जर सर्वांच्या चित्तात ठसविले गेले नाहीं, ते केवळ आमच्यापुरते अथवा आमच्या पक्षातील काही लोकांपुरतेच मर्यादित होऊन राहिले, तर त्याचे मंगल स्वरूप नाहीसे होते, आणि इतरांच्या बाबतीत ते हळूहळू घातक बनते. जी भावना शिवाजी महाराजांच्या मनात विशुद्ध स्वरूपात होती, ती पेशव्यांमध्ये हळूहळू वैयक्तिक स्वार्थाने कलंकित होत गेली....याला कारण म्हणजे आमच्यातील विछिन्नता...आमच्या समाजातील विस्कळीतपणाला काही अंत नाही...त्यामुळे भावनेला पूर अवश्य येतो; परंतु तो वाळूत मुरून, सुकून जातो... फुटक्या भांड्यात पाणी भरणे शक्य असते; परंतु त्यात पाणी टिकत नाही... शिवाजी महाराजांनी आपल्या समकालीन महाराष्ट्रीय हिंदू समाजासध्ये एक प्रबळ भावना अशी काही प्रवर्तित केली की, ते नसतानासुद्धा काही काळपर्यंत तिचा वेग मंदावला नाही; परंतु त्या भावनेचा आधार दृढ करणे शिवाजी महाराजांना शक्य झाले नाही. इतकेच नव्हे तर त्यांनी तसा प्रयत्नही केला नाही. समाजातील मोठमोठ्या छिद्रांकडे लक्ष न देता त्यांच्यासह त्यांनी खवळलेला समुद्र पार करण्याचा प्रयत्न केला...त्या छिद्रांना पैलतीराला घेऊन जाणे हेच त्यांचे ध्येय होते. शिवाजी महाराजांनी ज्या हिंदू समाजाला मुगल आक्रमणाविरुद्ध विजयी बनविण्याचा प्रयत्न केला, त्या समाजाच्या मुळामध्येच आचार-विचारातील भेदभाव घर करून राहिलेला होता. त्या भेदमूलक धर्म-समाजालाच त्यांनी साऱ्या

भारतवर्षात विजयी बनविण्याचा प्रयत्न केला. यालाच म्हणतात वाळूचा धबा बांधणे ! ही तर असाध्य गोष्ट होती. भेदबुद्धीला धर्मबुद्धी समजून त्या शतधा विदीर्ण धर्मसमाजाचे स्वराज्य या विशाल भारतवर्षात स्थापन करणे कोणाही मानवाला शक्य नाही."

गुरुदेवांनी केलेले हे सारे विवेचन शिखांपुरतेच मर्यादित नसून हिंसेवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वच समाजांना ते समानपणे लागू होते. मग ते मुसलमान असोत, यहुदी असोत, ख्रिस्ती असोत की दहशतवादावर श्रद्धा ठेवणारे हिंदू, निग्रो, चिनी, जपानी अथवा नक्षलवादी, दलित पँथर यांपैकी कोणीही असोत. ज्या वेळी हिंसेचा हिंसेशी मुकाबला होतो, तेव्हा प्रबळ हिंसा दुर्बळ हिंसेवर मात अवश्य करते; परंतु ज्यासाठी ती हिंसा केली जाते, त्या उद्दिष्टाचाच विसर पडतो. मुसलमानांच्या अत्याचारांपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी गुरू गोविंदसिंगांनी शांततेचा मार्ग सोडून तलवारीचा मार्ग स्वीकारला. त्यांनी त्या मार्गाचा अवलंब केला नसता तर, शीख पंथच नष्ट झाला असता, म्हणून त्यांना तसे करणे अपरिहार्य होते, असे म्हणता येईल. मुहम्मद पैगंबरांच्या बाबतीतही हाच युक्तिवाद करता येतो. पण मग शांततेचा संदेश देण्यासाठी उदयास आलेला इस्लाम इतका क्रूर व आक्रमक का बनला, याचे उत्तर देण्याची जबाबदारी इस्लामच्या पुरस्कर्त्यांवर येते. गांधीजींनी पुरस्कारिलेला अहिंसेचा मार्ग अनेकांना एकांतिक वाटतो. बहुधा जयप्रकाशजींनाही तसे वाटत असावे; म्हणून त्यांनी अहिंसा हा शब्द न वापरता त्याच्याऐवजी शांतता हा शब्द वापरला. प्रत्येक जनआंदोलन हे शांततेनेच चालले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. परंतु त्यांनाही त्यांच्या मार्गाने जाणारे सच्चे अनुयायी फारच थोडे मिळाले. हिंसेचा, दहशतवादाचा मार्ग तत्काल फळ देणारा, डोळे दिपविणारा असल्याने सर्वांनाच त्याचे आकर्षण वाटते. मग तो सत्ताधारी पक्ष असो की विरोधी पक्ष असो ! अनेकदा सत्ताधारी लोक विरोधी पक्षांना हिंसेच्या मार्गाने जाण्याखेरीज दुसरा पर्यायच ठेवीत नाहीत. त्यामुळे विरोधी लोक त्या मार्गाने जाऊन सत्ता संपादन करतात आणि मग हिंसेला गौरवाचे स्थान मिळते. त्या साऱ्या प्रयत्नांत ज्या उद्दिष्टासाठी सत्ता मिळवली त्या उद्दिष्टाचाच विसर पडतो. साम्यवादी देशांत हेच घडले आहे; आणि सशस्त्र उठाव करून सत्ता काबीज करण्यात आलेल्या बिगरसाम्यवादी, हुकुमशाहीवादी देशांतही हेच घडले आहे. शिखांमधील हिंसाचाराला आळा बसावा असे त्यांच्यातील विचारवंतांना वाटत असेल तर, त्यांनी पुन्हा एकदा गुरू नानकांच्या उपदेशाकडे शिखांना परत नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गुरू गोविंदसिंगांचा मार्ग आपण आपद्धर्म म्हणून स्वीकारला होता, त्याची आता गरज उरलेली नाही, हे स्पष्टपणे सांगण्याचे धैर्य त्यांनी दाखविले पाहिजे. तसे झाले तरच शीख धर्माला त्याचे मूळचे उज्ज्वल

स्वरूप पुन्हा प्राप्त होईल; आज त्याचे जे डबक्यात रूपांतर झाले आहे, ते नाहीसे होऊन स्वच्छ सरितेचे रूप त्याला प्राप्त होईल; आणि मानवतावादाचा पुरस्कर्ता म्हणून त्याला जगाच्या इतिहासात व्यापक प्रतिष्ठा लाभेल.

हिंदू धर्मातील विषमतेच्या ज्या दोषांवर गुरुदेवांनी बोट ठेवले आहे, त्याकडे आजच्या हिंदू संघटनवाद्यांनीही लक्ष दिले पाहिजे. नाहीतर शिवाजी महाराजांप्रमाणे आपणही वाळूचा बांध बांधण्याचाच प्रयत्न केला, असे त्यांना कालांतराने आढळून येईल. "केवळ आघात झाल्याने क्रुद्ध होऊन, गर्वाने कोणताही समाज मोठा किंवा विजयी होऊ शकत नाही", हे गुरुदेवांचे वचन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.

+ +

'समाज प्रबोधन पत्रिका' : मार्च–एप्रिल ८२

३०. कै. काँग्रेसला श्रद्धांजली

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या जन्माला यंदा शंभर वर्षे पूर्ण होत असल्याने तिची जन्मशताब्दी धूमधडाक्याने साजरी करण्याचे डांगोरे जोरजोरात पिटले जात आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारी संघटना या नात्याने काँग्रेसचे जेवढे कौतुक केले जाईल, तेवढे थोडेच होईल. परंतु ज्या काँग्रेसने देशाला स्वातंत्र मिळवून दिले ती सध्या हयात असून आपण तिची शंभरावी जयंती साजरी करीत आहोत असे जे लोक म्हणत आहे ते साफ खोटे बोलत असून जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचाच तो एक प्रकार आहे. ज्या काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य दिले, ती तर कधीच संपली. ज्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी तिचा जन्म झाला होता, ते ध्येय प्राप्त झाल्यानंतर म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ नंतर तिच्या अस्तित्वाचे काही प्रयोजनच उरले नाही. किंबहुना देशाच्या स्वातंत्र्यासाठी देशाच्या फाळणीचे मोल देण्यास जेव्हा काँग्रेस तयार झाली तेव्हाच, म्हणजे १९४५ सालीच ती मृतप्राय झाली असे म्हटले तरी वावगे होणार नाही. आता जर कोणी असे म्हणत असतील, की अखंड भारताचे स्वातंत्र्य हे काँग्रेसचे ध्येय जोपर्यंत साध्य होत नाही, तोपर्यंत तिचे जीवन-उद्दिष्ट सफल झाले असे आम्ही समजत नाही, म्हणून ते उद्दिष्ट साध्य होईपर्यंत आम्ही काँग्रेसला मरू देणार नाही, तर त्यात पुष्कळच तथ्य आहे; परंतु खंडित भारताला पुन्हा अखंड बनवण्याची भाषा तर कोणीच काढीत नाही. किंबहुना असे कोणी म्हणाला तर त्याच्यावर देशद्रोहाचा शिक्काच मारला जाण्याची शक्यता अधिक आहे. अशा स्थितीत देशाच्या फाळणीनंतर काँग्रेसच्या अस्तित्वाला काही अर्थच राहिला नाही, ही वस्तुस्थिती लपवून ठेवण्यात केवळ लबाडीच आहे.

'गुडविल 'च्या बाबतीतील लबाडी

वस्तुतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसचे विसर्जन करून तिचे लोकसेवक संघात रूपांतर करावे, आणि ज्यांना सत्तेचे राजकारण करावयाचे असेल त्यांनी वेगळी संघटना स्थापन करावी, असे गांधीजींनी आपल्या हत्त्येच्या आदल्या दिवशीच सुचविले होते; व त्या लोकसेवक संघाचा कच्चा आराखडाही त्यांनी तयार केला होता. परंतु काँग्रेसच्या मागे पन्नास वर्षांच्या तपश्चर्येची जी पुण्याई होती, तिचा फायदा घेण्याचा मोह काँग्रेसच्या पुढाऱ्यांना आवरता आला नाही; आणि त्यांनी गांधीजींची सूचना धुडकावून लावली. ही एक प्रकारची लबाडीच होती. गुंडविलचा फायदा घेण्यासाठी केलेली लबाडी. जनतेच्या आरोग्यरक्षणासाठी वर्षानुवर्षे चालविण्यात आलेले औषधाचे दुकान बंद पडल्यावर त्याचे गुडविल घेऊन त्याच जागेत, त्याच नावाने दारूचा गुत्ता सुरू करावा, तसे हे झाले. दारूच्या गुत्त्याची उपमा आणखी एका दृष्टीने चपखल बसणारी आहे. काँग्रेसने आपल्या वीस कलमी कार्यक्रमात दारूबंदीला फार महत्त्वाचे स्थान दिले होते. कारण, दारू ही गोरगरिबांचे संसार उद्ध्वस्त करणारी राक्षसीण असल्यामुळे तिचा नाश झाल्याखेरीज गरिबांचे खरेखुरे कल्याण होणार नाही, हे काँग्रेसने ओळखले होते. परंतु हळूहळू काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीच दारूला प्रतिष्ठा मिळवून दिली; आणि दारूच्या गुत्त्यांचे परवाने मिळविण्याच्या बाबतीत त्यांच्यात अहमहमिका सुरू झाली. किंबहुना ज्याला असा परवाना मिळतो तोच काँग्रेसचा खरा पुढारी, अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली. खऱ्या काँग्रेसच्या निधनाचा याहून दुसरा कोणता पुरावा हवा ?

गांधींची काँग्रेस गांधींबरोबर गेली

१८८५ ते १९४५ हा काँग्रेसच्या जीवनाचा एकूण कालखंड समजण्यास हरकत नाही. यापैकी १९२० पर्यंतचा कालखंड हा सामान्यतः पायाभरणीचा काळ होता. प्रारंभी नेमस्तांचे अर्जविनंत्यांचे राजकारण चालले. त्यानंतर लालबाल-पालांचे जहाल राजकारण आले; परंतु तेही पांढरपेशा वर्गापुरतेच मर्यादित राहिले. त्यात बहुजन समाजाचा सहभाग जवळ जवळ नव्हताच. १९२० साली गांधीजींनी स्वातंत्र्यआंदोलनाची सूत्रे आपल्या हाती घेतली; आणि स्वातंत्र्याचा लढा तळागाळापर्यंत जाऊन पोहोचला. त्या दृष्टीने पाहिल्यास १९२० ते १९४५ हा कालखंडच प्रत्यक्ष लढ्याचा कालखंड म्हणता येतो. त्या लढ्यासाठी अगदी ग्रामपातळीपासून वरपर्यंत पोचणारी एक शिस्तबद्ध संघटना काँग्रेसच्या रुपाने गांधीजींनी निर्माण केली. देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोहोचलेली एवढी

प्रचंड व लोकशाही पद्धतीची संघटना तत्पूर्वी अस्तित्वातच नव्हती. बरे, ही संघटना एखाद्या व्यक्तीच्या, घराण्याच्या हितासाठी राबविण्याची कल्पना त्यावेळी कुणाच्या मनातही येणे शक्य नव्हते. त्या संघटनेत सामील होणे, किंबहुना तिच्याशी संबंध ठेवणे म्हणजे सरकारचा रोष ओढवून घेणे आहे हे सर्वांनाच माहीत होते. आज काँग्रेसशी संबंध ठेवणे म्हणजे काळाबाजार, लाचलुचपत, स्मगलिंग, बलात्कार, अत्याचार वगैरे दुष्कृत्यांना संरक्षण मिळविणे आहे, असे समजले जाते. ज्यांना वाममार्गाने सत्ता किंवा संपत्ती मिळवावयाची असेल, तेच लोक काँग्रेसकडे वळताना आज दिसतात. याच्या उलट गांधींच्या काँग्रेसमध्ये प्रवेश करणाऱ्यांना घरादारावर पाणी सोडूनच बाहेर पडावे लागे. देशाच्या स्वातंत्र्याखातर ते दिव्य करण्यास गांधींनी सर्वसामान्य लोकांना प्रेरणा दिली, हे त्यांचे मोठेपण. गांधीजींच्या पूर्वीची काँग्रेस ही निव्वळ राजकीय स्वरूपाची संघटना होती. गांधीजींनी तिला राजकीय, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे साधन बनविले. सामाजिक समतेच्या संदर्भात गांधींच्या काँग्रेसने जे प्रचंड कार्य केले, त्यातील फक्त दोन मुद्यांचा उल्लेख करणे पुरेसे होईल. समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाचे देशव्यापी काम हाती घेतले; व काँग्रेसच्या घटनेत त्या कामाला महत्त्वाचे स्थान दिले. स्वतःला दलितांचे पुढारी व दलितमुक्तीचे समर्थक म्हणविणाऱ्या आजच्या चळवळ्यांना हा इतिहास माहीत नसल्यामुळे त्यांना गांधींचे नाव आठवत नाही किंवा ते घेण्यास लाज वाटते; परंतु ज्यांनी तो इतिहास घडत असता स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला, नव्हे त्यात भागही घेतला, त्यांना गांधींचे हे मोठेपण विसरता येणे कसे शक्य आहे ? फुले–आंबेडकर–शाहू महाराजांची नावेही ज्यावेळी लोकांना माहीत नव्हती, त्यावेळी अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक असल्याची जाणीव पेशावरपासून इंफाळ–चित्तगावपर्यंत आणि श्रीनगरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या विशाल भूखंडातील जनमानसात निर्माण करण्याचे कार्य गांधीजींनी आणि त्यांच्या काँग्रेसने केले. त्यामुळे असंख्य अस्पृश्य लोक काँग्रेसच्या झेंड्याखाली गोळा झाले. इतरांप्रमाणेच तेही देशासाठी त्याग करण्याच्या बुद्धीनेच काँग्रेसमध्ये आले होते. आज दलितांचा उपयोग सत्तेच्या पटावरील प्यादी म्हणून केला जातो. त्यांची दुःस्थिती दूर करण्याची गरज इतरांनाच नव्हे तर, खुद्द त्यांच्या पुढाऱ्यांनाही वाटत नाही. या दृष्टीने गांधीजींनी व त्यांच्या अनुयायांनी केलेला भंगीमुक्तीचा प्रयोग आजही अभ्यास करण्यासारखा आहे. आजच्या दलित किंवा काँग्रेस पुढाऱ्यांपैकी कुणाला तरी भंग्यांच्या दुःखाची आठवण असते काय ?

हीच गोष्ट स्त्रीमुक्तींच्या बाबतीतही घडली. शेकडो वर्षांपासून घराच्या चार भिंतीत स्वतःला कोंडून घेऊन चूल आणि मूल यातच गुंग झालेल्या भारतीय स्त्रीला पहिल्या प्रथम गांधीजींनी अखिल भारतीय पातळीवर,

घराच्या कोंदट वातावरणातून बाहेर काढले आणि निर्भय व मुक्त होऊन पुरुषांच्या बरोबरीने लाठ्या-गोळ्या खाण्यास उद्युक्त केले. हरिजन-गिरिजन व अशिक्षित ग्रामीण स्त्रियाही या मुक्तिसंग्रामात, ओढल्या गेल्या. भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात ती एक अपूर्व आणि क्रांतिकारक अशी घटना होती. आजच्या बोलघेवड्या स्त्रीमुक्तीवाल्यांनी गांधीजींच्या या अद्‌भुत कर्तबगारीचा इतिहास नजरेखालून घातल्यास आपल्या पोरकटपणाचे त्यांनाच हसू येईल. गांधी आणि त्यांची काँग्रेस यांच्यापासून प्रेरणा घेऊन जीवनाच्या विविध क्षेत्रांत प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहून काम करणाऱ्या असंख्य वीरबाला आम्हीच स्वतः पंजाबपासून आसामपर्यंत व काश्मीरपासून केरळपर्यंत पाहिल्या आहेत. त्यांचे कर्तृत्व, त्यांचा आत्मविश्वास, त्यांची धडाडी ही सारी पाहून आम्ही तर थक्क होऊन गेलो. त्यांच्याशी तुलना करता आजच्या स्त्रीमुक्तीवाल्या या मेणाच्या बाहुल्या वाटतात. गांधींच्या काँग्रेसने हा जो चमत्कार घडवून दाखविला त्याचा थोडातरी अंश आजच्या काँग्रेसमध्ये पाहावयास मिळतो काय ? अशा स्थितीत गांधींच्या काँग्रेसचा वारसा आजच्या काँग्रेसवाल्यांनी सांगणे म्हणजे ग्रामसिंहांनी केवळ नामसादृश्याचा आधार घेऊन स्वतःला सिंहाचे वारसदार म्हणवून घेण्यासारखेच आहे.

काँग्रेसचा आधार : चारित्र्य

या सर्व विवेचनाचा मथितार्थ हा की, खऱ्या काँग्रेसचा आधार 'चारित्र्य' हा होता. त्याग व सेवा यांची आंतरिक प्रेरणा असणारे लोकच काँग्रेसमध्ये जात. सत्तेची चटक लागल्यावर त्यांच्यात भ्रष्टाचार शिरला हे खरे, परंतु तोपर्यंत काँग्रेसच नामशेष झाली होती. आज त्यागाची व सेवेची भावना बाळगणारी एक तरी व्यक्ती कांग्रेसमध्ये दिसते काय ? सुखवस्तू जीवन, आपले करीयर, सत्ता-संपत्ती यांची पर्वा न करता खेड्यापाड्यांत, रानावनांत, झोपडपट्ट्यांत, जंगलांत, डोंगरांत जाऊन लोकांची सेवा करणारे असंख्य तरुण स्त्रीपुरुष आज या देशात आहेत. ते कदाचित गांधींचे नावही घेत नसतील; परंतु ते करीत असलेले काम मात्र गांधींचे व त्यांच्या काँग्रेचेच आहे. स्वतःला काँग्रेसवाला म्हणविणारा एक तरी हरीचा लाल त्या लोकांत आहे काय ? आम्हाला तरी कोणी आढळला नाही.

काँग्रेसचे नाव घेण्याची खरोखरी जरुरीच होती काय ?

येथे एक प्रश्न असा उपस्थित केला जाऊ शकतो की, गांधीजींचा सल्ला न जुमानता नेहरू-पटेल-आझादांनी काँग्रेसचेच नाव पुढे चालू ठेवण्याचा जो आग्रह धरला तो कितपत उचित होता ? काँग्रेस हे देशसेवेचे साधन न राहता सत्ता मिळविण्याचे व ती टिकवून ठेवण्याचे एक माध्यम, किंबहुना यंत्र बनले. अगदी

नेहरूंच्याच अमदानीत ते घडले. किंबहुना काँग्रेस ही नेहरू घराण्याची दृष्टीक बनली. तेव्हा कुठे गांधींच्या सूचनेला विरोध करणाऱ्यांचे डोळे उघडले असणार. परंतु आता काहीच करता येण्यासारखे नव्हते. काँग्रेस ही नेहरू या व्यक्तीवर अवलंबून असणारी, एकखांबी तंबूसारखी संघटना बनली. नेहरू हे तसे सुसंस्कृत होते, स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेले होते, गांधीजींनी उपदेशिलेल्या उच्च जीवनमूल्यांचा थोडाफार स्पर्श त्यांना झालेला होता, त्यामुळे त्यांनी काँग्रेसचे बाह्य रूप (facade) कायम ठेवले. स्वत: सत्ताधारी बनले असले तरी, संघटनात्मक लोकशाही परंपरा त्यांनी पूर्णपणे मोडून काढल्या नाहीत; परंतु भ्रष्टाचाराच्या दिशेने त्याची वाटचाल फार लवकर सुरू झाली. केरळचे पट्टम थाणू पिल्ले व आंध्रचे टी. प्रकाशम् या समाजवाद्यांना सत्तेचे आमिष दाखवून त्यांनी काँग्रेसमध्ये आणले; आणि आयाराम-गयाराम प्रक्रियेचा पाया घातला. त्यांच्या कन्येने तर सभ्यतेचे सारेच संकेत गुंडाळून फेकून दिले; आणि आपली व आपल्या घराण्याची सत्ता कायम ठेवणे, हे एकमेव ध्येय आपल्यासमोर ठेवून त्या दृष्टीने सारे डावपेच लढविले. निरक्षर व भाविक जनता आणि सत्तालोभी पुढारी यांच्यामुळे इंदिराजींचे डावपेच यशस्वी होत गेले; इतके की काँग्रेसच्या शताब्दी-समारंभाला नेहरू घराण्याच्या शताब्दी समारंभाचे रूप प्राप्त झाले. महात्मा गांधींऐवजी संजय गांधीच राष्ट्रपिता बनले. देशभक्तीशी किंवा देशसेवेशी त्यांचा काडीमात्रही संबंध नसताना– किंबहुना गुंडगिरीबद्दलच ते प्रख्यात असूनही त्यांची आलीशान संगमरवरी समाधी (?) गांधी–नेहरू–शास्त्रींच्या समाधीबरोबर त्यांच्या मांडीला मांडी लावून दिमाखात स्थानापन्न झाली. किंबहुना शास्त्रींच्या समाधीकडे कोणी ढुंकूनही पाहत नाही. कारण, त्यांच्यामध्ये थोडीफार काँग्रेस संस्कृती विद्यमान होती ! परंतु ते नेहरू घराण्याशी संबंधित नसल्यामुळे त्यांचे नाव उच्चारणे निषिद्ध ठरले आहे. इंदिराजींनी स्वत:ची खुर्ची टिकविण्यासाठी भारतीय राज्यघटनेचीही मोडतोड केली; आणि देशावर आणीबाणी लादून ज्या लोकशाहीसाठी काँग्रेसने लढा दिला होता, तिचाच मुडदा पाडला. एक प्रकारे हा मुडदा लोकशाहीचा नसून काँग्रेसचाच होता. अशा स्थितीत काँग्रेसच्या नावाचा एवढा अट्टाहास का केला जातो ते समजणे कठीण आहे. काँग्रेसची शिस्तबद्ध संघटना नेहरूंच्या काळातच मोडकळीस आली होती; आणि मुगलांच्या जमान्यात जशा दिल्लीहून सुभेदारांच्या नेमणुका होत असत, तशा जिल्हाध्यक्ष, प्रांताध्यक्ष, मंत्री, मुख्यमंत्री यांच्या नेमणुका दिल्लीहून होऊ लागल्या होत्या. इंदिराजींनी काँग्रेसचा उरला-सुरला सांगाडाही मोडून टाकला; आणि आपल्या मनाला येईल तशा नेमणुका करण्यास सुरुवात केली. काँग्रेस सरकारच्या मुख्यमंत्र्यांची केव्हा उचलबांगडी होईल ते कोणीच सांगू शकत नाही. पट्टेवाल्यापेक्षाही त्यांच्या स्थानाचे अवमूल्यन झाले. काँग्रेस नावाची संघटनाच कोठे उरली

नाही. ठगपेंढाऱ्यांनी एकत्र येऊन हल्ला करावा आणि लुटालूट करावी, त्याप्रमाणे निवडणुकीच्या मोसमात स्वतःला काँग्रेसवाले म्हणविणारे ठगपेंढारी गोळा होतात; आणि मतांची लुटालूट करून निवडून येतात. मग सत्तेच्या खुर्च्यांसाठी त्यांच्यांत मारामाऱ्या सुरू होतात. हा सारा इंदिराजींच्या कार्यशैलीचा प्रताप आहे. या सगळ्या प्रक्रियेत खरोखरी काँग्रेसचे नाव घेण्याची काहीच गरज नव्हती. इंदिराजींनी आपल्याच नावाची काँग्रेस काढली. त्याऐवजी त्यांनी त्या संस्थेला 'इंदिरा दल' किंवा 'इंदिरा पक्ष' असे नाव दिले असते तरी त्यांना मते मिळालीच असती. कारण लोकांनी मते दिली ती काँग्रेसला नसून इंदिराजींच्या 'पंजा'ला होती. त्यांच्यानंतर राजीवजींनी 'राजीव दल' असे नामाभिधान धारण करून मते मागितली असती तरी काही बिघडले नसते. ते आपल्या मातुश्रीचा व घराण्याचा वारसाच पुढे चालविणार आहेत, ही गोष्ट निवडणुकीमध्ये विरोधी पक्षांना बदनाम करण्यासाठी त्यांनी जे बेधडक खोटे आरोप केले त्यावरून सिद्ध झालीच होती. लोकांनी इंदिराजी व राजीवजी यांच्या खोटारडेपणाला भुलून मते दिली होती. त्यांनी काँग्रेसचा टिळा लावला नसता तरीही त्यांना ती मिळालीच असती. त्यांच्या पक्षाला मिळालेली मते ही काँग्रेसवरील लोकांच्या प्रेमाची द्योतक नव्हती तर, नेहरू घराणे आणि इंदिरा व राजीव यांनी जनतेला पाडलेल्या भुरळीची ती द्योतक होती. सत्तेचा व पैशाचा गैरवापर, खोटी आश्वासने, विरोधकांमधील मठ्ठ लठ्ठालठ्ठी वगैरे इतर अनेक गोष्टी इंदिरा–राजीवच्या यशाला कारणीभूत असल्या तरी, त्या फारशा महत्त्वाच्या नव्हत्या. खऱ्या काँग्रेस संस्कृतीपासून जनतेला दूर नेण्यात पंडित नेहरूंनी व इंदिराजींनी जे अद्‌भुत यश मिळविले होते, त्याचा तो परिणाम होता. शरद पवार आणि त्यांचे सहकारी जेव्हा काँग्रेस संस्कृतीसंबंधी बोलतात तेव्हा त्यांची मजलही नेहरू संस्कृतीहून पलीकडे जात नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेसच्या संस्कृतीकडे जाण्याची हिंमत ते करू शकतील असे वाटत नाही.

आपण काँग्रेसचे श्राद्ध करावे हेच बरे !

खरे तर आता त्या जुन्या काळात जाण्याची काही गरजही उरलेली नाही. ती जीवनमूल्ये कुणाला पटणार आणि ती कोण अमलात आणणार? गांधींच्या दरिद्र नारायणाऐवजी आता नगदनारायणच पूजनीय ठरला आहे. सत्ता व संपत्ती कशी मिळेल याचाच आपण विचार केलेला बरा ! तो त्याग, ती सेवा, सारे काही भूतकाळात गाडले गेले तर, निदान आपल्या सदसद्‌विवेक बुद्धीला टोचणी तरी लागणार नाही. म्हणून त्या जुन्या कैलासवासी काँग्रेसचे श्राद्ध करून आपण मोकळे झालेले बरे. गंगाच जिथे प्रदूषित झाली आहे, तिथे तिच्या पाण्याने केलेले तर्पण तरी कसे शुद्ध असणार? त्यामुळे आपले हे श्राद्धही तसे प्रदूषितच राहील. तरीपण

आपल्या मनाला तेवढेच समाधान. कधीकाळी गंगा शुद्ध होती, हे आपण आपल्या मुलाबाळांना सांगतोच की नाही ? त्याप्रमाणे आज काँग्रेसच्या नावाने जी गटार-गंगा सर्वत्र दुर्गंधी पसरवून राहिली आहे, ती चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी खरोखरच निर्मळ गंगा होती, हेही आपण त्यांना सांगूया. अर्थात हे सारे ऐकून ती मिस्किल-पणे हसतील. कारण आजचे राजकारण इतके प्रदूषणग्रस्त झालेले आहे की, लोक घरच्या भाकऱ्या खाऊन जनतेच्या सेवेसाठी, देशाच्या स्वातंत्र्यासाठी, कसलेही आमिष समोर नसताना लाठ्या खाण्यास आणि तुरुंगातले कष्ट झेलण्यास तयार होत असतील यावर त्यांचा विश्वासच बसणार नाही. राज्यातली मंत्रिमंडळे दिल्ली-तून नेमली जाण्याऐवजी प्रत्यक्ष कार्यकर्त्यांकडूनच निवडली जात होती, हे त्यांना खरेच वाटणार नाही. समाजसेवा, त्याग वगैरे गोष्टी दुर्मिळ होण्याला आजची काँग्रेसच जबाबदार आहे. 'आजची काँग्रेस' असे जेव्हा आम्ही म्हणतो तेव्हा केवळ इंदिरा काँग्रेसच आम्हाला अभिप्रेत नसून स्वातंत्र्योत्तर काळात मूळ काँग्रेसच्या झालेल्या सगळ्याच चिरफळ्या आम्हाला अभिप्रेत आहेत. 'काँग्रेस' (ओ), 'काँग्रेस' (ज), 'काँग्रेस' (स) वगैरे सगळ्या शाखा एकमेकांच्या बहिणीच आहेत. इंदिरा काँग्रेस केंद्रात व काही राज्यांत वर्षानुवर्षे सत्तेवर आहे, म्हणून वातावरण दूषित करण्याचा मुख्य दोष तिच्याकडे जातो एवढेच. आज परिस्थिती इतकी विघडली आहे की, इंदिरा काँग्रेसमध्ये असणारी एखादी व्यक्ती खरोखरीच प्रामाणिक आहे, निर्मळ चारित्र्याची आहे, तिने गैरमार्गाने माया जमविलेली नाही, असे कुणी सांगितले तर, ते आपल्याला खरेच वाटत नाही. इतके असूनही आम्ही निराशावादी बनलेलो नाही. कारण, आम्ही सेवाभावी, त्यागी कार्यकर्त्यांची काँग्रेस पाहिली आहे. त्यांच्याबरोबर यथाशक्ती कामही केले आहे. शिवाय माणुसकीवर आमची श्रद्धा आहे. त्यामुळे या राखेतूनही सुगंधी गुलाबाचे रोपटे वर येईल आणि आपला सुगंध दरवळून टाकील असा विश्वास आम्हाला वाटतो. त्यामुळेच आम्ही गांधींच्या काँग्रेसला श्रद्धांजली अर्पण करतो.

+ +

'शब्दांगण' : दिवाळी ८५

३१. काँग्रेसची शताब्दी ? नव्हे दशाब्दी !

ज्या अखिल भारतीय काँग्रेसची शताब्दी धूमधडाक्याने साजरी केली जात आहे, ती तर सध्या अस्तित्वातच नाही ! जे लोक ती साजरी करीत आहेत त्यांचा त्या काँग्रेसशी काहीच संबंध नाही. ते सारे इंदिरा काँग्रेसचे सभासद, भक्त, अनुयायी किंवा चमचे आहेत. ते लोक सत्ताधारी नसते, केंद्रामध्ये त्यांचे सरकार नसते तर ही सारी धूमधाम त्यांना परवडली नसती. कारण, त्यासाठी लागणारा काळा पैसा त्यांना जमविता आला नसता. याचा अर्थ असा की, दहा-बारा वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या सरकारी इंदिरा काँग्रेसचाच हा उत्सव आहे. एखाद्या अनौरस संततीने कुण्या घरंदाज पुरुषाच्या घराण्यावर सत्ता व संपत्तीच्या जोरावर आपला हक्क प्रस्थापित करण्यासारखेच हे आहे. जेव्हा लेकावळ्यांचा बोलबाला जोरावर असतो, तेव्हा खानदानी घराण्यांना मान खाली घालून सारे खोटे असणारे निमूटपणे खरे म्हणून ऐकावे, बघावे लागते. हा तर जगाचा न्यायच आहे.

खरी काँग्रेस कधीच संपली !

खरे म्हणजे ही वस्तुस्थिती इतकी स्पष्ट आहे, इतिहासाने इतक्या स्पष्ट शब्दात, ठामपणे तिची नोंद केलेली आहे की, तिचे विवरण किंवा विवेचन करण्याची जरूरच भासता कामा नये; परंतु पितळ जेव्हा कृत्रिम चकाकी लेवून आपण सोने असल्याचा आव आणू पाहते तेव्हा कोणीतरी त्याला सांगावे लागते की, "बाबारे ! तू कितीही आव आणलास तरी तू खरोखरी पितळच आहेस ! जोपर्यंत गैरमार्गाने

मिळविलेली राजसत्ता आणि वाममार्गाने मिळविलेली संपत्ती तुझ्या पाठीशी असेल, तोपर्यंत तुझ्या तोंडावर हे सत्य सांगण्याची हिंमत कोणाला होणार नाही, हे खरे; पण म्हणून काही तू सोने ठरत नाहीस."

तसे पाहिल्यास समजायला कठीण असे या विधानात काहीच नाही. ज्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी काँग्रेसची स्थापना झाली होती, ते स्वातंत्र्य देशाला मिळाल्यानंतर त्या काँग्रेसचे कार्यच संपले; आणि त्याबरोबर तिचे अस्तित्वही संपुष्टात आले. ज्या महात्मा गांधींनी काँग्रेसच्या शेवटच्या कालखंडात तिचे पालन-पोषण केले, तिला जनतेमध्ये पोहोचवून प्राणवान् बनविले, त्यांनी आपल्या हयातीतच त्या काँग्रेसचे धिंडवडे निघत असल्याचे, सत्तापिपासा आणि भ्रष्टाचार यांनी तिला पोखरून टाकल्याचे पाहिले. तेव्हा एका चांगल्या संस्थेचा अधिक अधःपात होऊ नये, गुंडपुंडांच्या हातात जाऊन तिने जनहितभक्षिणी राक्षसिणीचे रूप घेऊ नये, या हेतूने ती विसर्जित करण्याचा सल्ला त्यांनी दिला. गांधीजींना आणखी दोन-चार वर्षांचे आयुष्य लाभले असते तर अ. भा. काँग्रेसचे लोकसेवक संघात रूपांतर करण्यामध्ये त्यांना अवश्य यश आले असते. त्या बाबतीत त्यांना विरोध करून त्यांच्यावर मात करण्याचे सामर्थ्य नेहरू–पटेलांमध्ये निश्चितच नव्हते; पण सत्ताकांक्षी मंडळींचे सुदैव आणि देशाचे दुर्दैव आड आले. ज्या दिवशी रात्री गांधीजींनी लोकसेवक संघाची घटना लिहून हातावेगळी केली, त्याच्या दुसऱ्याच दिवशी एका माथेफिरू पिसाटाने त्यांची निर्घृण हत्या केली; आणि सत्तापिपासू राजकारण्यांचा मार्ग मोकळा झाला. लोकरक्षक काँग्रेस लोकभक्षक बनली. नेहरू–पटेलांनी मनोमन गोडशाचे आभारच मानले असतील !

गांधींची काँग्रेस आणि नेहरूंची काँग्रेस

ज्या तथाकथित काँग्रेसची शताब्दी साजरी केली जात आहे, ती गांधी–नेहरूंची काँग्रेस असून तिची खास अशी एक काँग्रेस संस्कृती आहे, असा भ्रम पसरविण्यात आला आहे. एका दृष्टीने पाहिल्यास ते बरोबरही आहे. फरक एवढाच की, त्यातील गांधी हे महात्मा गांधी नसून इंदिरा गांधी आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेस ही टिळक–गांधींची काँग्रेस होती. गांधीजींनी ज्या काँग्रेसचा इमला उभारला, तिची पायाभरणी टिळकांनी केली होती. त्यामुळे काँग्रेसच्या जडणघडणीशी या दोन महापुरुषांचाच संबंध जोडला जाऊ शकतो. त्यांच्या काळातील इतर स्वातंत्र्य सेनानींचा या दोघांमध्ये समावेश होतो. टिळकांच्या आधी काँग्रेस ही नेमस्तांची, सनदशीर, मवाळ चळवळ होती. टिळकांनी तिला जहाल, क्रांतिकारक बनविले. लखनौ करार करून मुसलमानांना राष्ट्रीय आंदोलनात सामील करून

घेण्याचा जो प्रयत्न टिळकांनी केला, त्याचाच पाठपुरावा गांधींनी केला. मात्र टिळकांप्रमाणे त्यांनी मुसलमानांशी कसलाही लेखी करार केला नाही. तरीपण मुसलमानांमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करण्यासाठी जेवढे काही करता येणे शक्य होते, तेवढे त्यांनी केले. त्यावद्दल त्यांच्यावर मुस्लिम धार्जिणेपणाचा आरोपही आरामखुर्चीत बसून राजकारण करणाऱ्या पुढाऱ्यांनी केला. वस्तुतः गांधींनी मुसलमानांचा जो अनुनय केला, तो माणुसकीच्या नात्याने, त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात व पर्यायाने भारतीय संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावे म्हणून ! मुस्लिम स्त्रियांना बुरख्यातून बाहेर पडण्याची त्यांनी प्रेरणा दिली. (उदा. अम्तुस्सलाम व रैहाना तैयबजी) याच्या उलट नेहरूंनी व इंदिराजींनी मुसलमानांकडे केवळ 'व्होटबँक' म्हणून पाहिले. त्यांची एकगठ्ठा मते मिळून आपण कायम सत्तेवर राहावे यासाठी त्यांनी समान नागरिकता कायदा करण्याचे नाकारले. उर्दूच्या मोहात त्यांना अडकवून त्यांना कायमचे अज्ञानात ठेवले. मुस्लिम स्त्रीचे नरकतुल्य जीवन स्पष्ट दिसत असतानाही तिच्या मदतीला येण्याचे नाकारले. हा एक प्रकारचा मुस्लिमद्वेषच होता. गांधीवादी किंवा काँग्रेसवादी विचारवंतामध्ये इस्लामच्या भयानक स्वरूपाचे आकलन ज्यांना झाले होते, असे बहुधा आचार्य दादा धर्माधिकारी हे एकटेच होते.

गांधींची काँग्रेस देशहितासाठी नेहमीच आघाडीवर राहिली. गांधीजींनी त्या संघटनेला सेनेचे रूप दिले होते. सैनिकांना जसा गणवेश आवश्यक असतो, तसा काँग्रेसवाल्यांनाही आवश्यक असे. त्यांना खादीचा गणवेश देऊन गांधींनी ग्रामाधारित अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन केले. काँग्रेसचा सेवक हा लोकसेवक असावा, स्वतःच्या स्वार्थाचा विचार करण्याऐवजी त्याने देशातील गरीब जनतेचा विचार सतत मनात बाळगावा अशी अपेक्षा असे. काँग्रेसशी संबंध जोडणे म्हणजे सरकारची इतराजी ओढवून घेणे, घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजणे, सुखंच मे शयनंच मे असे आपले आयुष्य सोडून त्यागाचे, दगदगीचे, तुरुंगवासाचे जीवन स्वीकारणे, सरकारी अवकृपेला बळी पडून कफल्लक बनण्याचा धोका पत्करणे, जनतेच्या सेवेसाठी स्वतःला वाहून घेणे असा अर्थ होता. आजच्या पिढीला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, गांधींसारख्या अबुद्धिमान, तर्कशून्य, वीरताबहादुरीचे नाटक न करणाऱ्या पुढाऱ्याकडे लक्षावधी सामान्य जनताच नव्हे तर, अत्यंत बुद्धिमान्, तर्कनिष्ठ विद्वानही कसे काय आकर्षित झाले ? या प्रश्नाचे एक उत्तर असे की, गांधींना जी गोष्ट पटली, योग्य वाटली ती स्वतः अमलात आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला, स्वतः निर्भय बनण्याची त्यांनी प्रेरणा दिली, त्याचा तो परिणाम होता. इतर पुढारी अंगात चिलखते घालून समाजात वावरत असत. फक्त व्यासपीठांवरच लोकांना त्यांचे दर्शन घडे. ते जे काही सांगत त्याचा त्यांच्या आचरणाशी काही संबंध नसे.

पण गांधी उघड्या अंगाने समाजात मिसळत असत. आपल्या मुलाबाळांना, इतर नातेवाइकांना आपल्या स्थानाचाच नव्हे तर, नावाचाही स्वार्थासाठी दुरुपयोग करण्याची संधी त्यांनी कधी दिली नाही. स्विस बँकेत स्वत:च्या मुलांच्या नावांची खाती उघडली नाहीत. निर्मळ चारित्र्य हेच त्यांचे खरे भांडवल होते. आता या गोष्टी राजकारणात पाहायला मिळत नाहीत. म्हणून कधी काळी त्या राजकारणात विद्यमान होत्या, यावर कुणाचा विश्वासच बसत नाही. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या हाती देशाची सत्तासूत्रे येताच काँग्रेसचे हे स्वरूप झपाट्याने बदलू लागले. त्यागाची जागा भोगाने घेतली आणि जनसेवेऐवजी आत्मसेवा प्रमुख बनली. सत्तेसमवेत येणाऱ्या भ्रष्टाचाराची दुश्चिन्हे दृष्टिगोचर होऊ लागली. काँग्रेसने अध:पतनाकडे वाटचाल सुरू केल्याचे गांधीजींच्या लक्षात आले. म्हणून देशाला व काँग्रेस संस्थेच्या भव्योदात्त परंपरेला नष्ट होण्यापासून वाचविण्यासाठी त्यांनी लोकसेवक संघाची कल्पना पुढे मांडली; पण विनाशाच्या दिशेने मुसंडी मारण्यास सज्ज झालेल्यांना मागे वळविणे खुद्द परमेश्वरालाही शक्य होत नाही. मग बिचारा गांधी तर पामर मानवच होता. त्याला त्या प्रयत्नात यश येण्याची शक्यताच नव्हती.

नेहरूंनी काँग्रेसमधील भ्रष्टाचाराला, सत्तापिपासेला, आळा घालण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. योगायोगाने मिळालेल्या राजसिंहासनाचा उपभोग घेण्यात ते इतके मशगूल होऊन गेले की, काँग्रेसचा होत असलेला ऱ्हास त्यांना दिसला नाही. जेव्हा जुन्या जाणकारांनी तिकडे त्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला तेव्हा नेहरूंनी तिकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे राजाजी, कृपलानी यांसारख्यांना काँग्रेसचा त्याग करावा लागला. काँग्रेस संस्कृतीचे गुणगान करणारे शरद पवारांसारखे अनभिज्ञ तरुण जेव्हा काँग्रेसच्या संदर्भात 'गांधी-नेहरूंची काँग्रेस' असे म्हणून जातात तेव्हा एकतर नेहरूंनी गांधींच्या काँग्रेसला किती दयनीय अवस्थेला नेऊन पोहोचविले याची त्यांना कल्पना नसते, अथवा असलीच तर सत्तेची व संपत्तीची भिकारीण काँग्रेस त्यांना अभिप्रेत असते. ते निष्कारणच गांधींचे नाव त्या काँग्रेसशी जोडत असतात.

इंदिरा गांधी अधिक प्रामाणिक!

नेहरूंच्या या फसव्या समाजवादी मुखवटाचा विचार केल्यास इंदिरा गांधी या अधिक प्रामाणिक होत्या, असे दिसून येईल. त्यांनी त्याग, सेवा, शिस्त, संघटना वगैरे गांधीयुगातली मूल्ये उघडपणे पार झुगारून दिली. आपले घराणेच या देशावर राज्य करण्यास सर्वप्रकारे लायक आहे, याविषयी त्यांच्या मनात तिळमात्रही शंका नव्हती. म्हणून राजसत्ता मिळविणे व ती वंशपरंपरेने टिकवून ठेवणे

हे एकमात्र ध्येय समोर ठेवून त्यांनी जन्मभर राजकारण केले. त्यांच्या डावपेचांपुढे भलेभले हतप्रभ झाले. साध्य-साधन-विवेकाचा स्पर्शही इंदिरा गांधीनी आपल्या मनाला होऊ दिला नाही. सत्तेसाठी जी काही नाटके करणे त्यांना आवश्यक वाटले, ती त्यांनी कसलेल्या नटीप्रमाणे वठविली. एका नाटकाचा उल्लेख करण्यासारखा आहे. देशात कुठेही दलितांवर अन्याय–अत्याचार झाल्याचे समजताच गांधीजी स्वत: तेथे धावून जात किंवा त्यांच्या वतीने त्यांचे अनुयायी तेथे जाऊन दलित-पीडितांच्या बाजूने उभे राहत. नोआखालीतील त्यांची पदयात्रा हे त्यांपैकी एक उदाहरण ! सत्ताच्युत झाल्यावर इंदिरा गांधीनी तसे नाटक करण्याची हुक्की आली; आणि बेलचीच्या हरिजनांवर अत्याचार झाल्याची संधी साधून त्या हत्तीवर बसून त्यांचे सात्वन करण्यास गेल्या. सत्तेवर असताना मात्र त्यांना कधी हरिजनांची अथवा गिरिजनांची आठवण झाली नाही ! त्यांनी काँग्रेसचे सारे रूपच बदलून टाकले. त्यांनी सेवाभावी कार्यकर्त्याऐवजी सत्ता व काळा पैसा मिळवून देऊ शकतील असे मिश्रा, अंतुले, गुंडूराव, भजनलाल यांच्यासारखे गुंडपुंड, पाळेगार पदरी बाळगले. एवढ्यानेही त्यांचे समाधान झाले नाही. काँग्रेसची लोकशाही पद्धतीची संघटना निकालात काढून मुगल सल्तनतीप्रमाणे दिल्लीतून नेमणुका करण्याची प्रथा त्यांनी सुरू केली. सत्तेचे व संपत्तीचे विकेंद्रीकरण गांधीजींना अभिप्रेत होते. त्याएवजी इंदिरा गांधींनी केंद्रीकरणावर सारे लक्ष केंद्रित केले; आणि सारी सूत्रे आपल्या व आपल्या मुलाच्या–आधी संजयच्या व नंतर राजीवच्या–हाती राहतील अशी तरतूद करून टाकली. जुनी काँग्रेस आपल्या या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या आड येत आहे असे दिसताच, त्यांनी तिला तिलांजली देऊन 'इंदिरा काँग्रेस' नावाची एक वेगळीच संस्था काढली. एका दृष्टीने पाहिल्यास इंदिरा गांधींचा राजकारणातील विजय कोणत्याही संस्थेचा किंवा संघटनेचा विजय नसून तो त्यांचा वैयक्तिक विजय होता. एका अत्यंत चलाख, कुटिल, जहांबाज, सत्ताकांक्षी स्त्रीने आपल्या डावपेचांनी हिसकावून घेतलेला तो विजय होता. त्यांची काँग्रेस ही नाममात्र होती. ती इंदिरा गांधींच्या मागे त्यांच्या इच्छेप्रमाणे फरफटत जात होती. ती नसती तर त्यांचे काहीच अडले नसते. त्यांचे हे कुटिल सामर्थ्य इतके प्रचंड होते की, त्यांच्या निधनानंतरही ते भांडवल म्हणून त्यांच्या मुलाच्या उपयोगी पडले. राजीव गांधींच्या जागी दुसरी कोणी व्यक्ती (नेहरू घराण्याबाहेरची) पुढारी झाली असती, तर इंदिरा काँग्रेसचा सहज धुव्वा उडाला असता. याचा अर्थ असा की, काँग्रेसची म्हणून जी काही शक्ती समजली जाते ती त्या संस्थेची नसून इंदिरा गांधी या व्यक्तीची आहे. इंदिरा गांधींनी जमवून ठेवलेली शिदोरी त्यांच्या वारसदारांना किती काळ पुरेल हे काळच सांगू शकेल.

अशा प्रकारे टिळक–गांधींच्या काँग्रेसमधील आत्मा स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर

स्वर्गलोकी निघून गेला होता. जे निष्प्राण कलेवर काँग्रेसच्या नावावर टिकून होते, तेही भ्रष्टाचाराची गंगोत्री असणाऱ्या इंदिरा गांधींनी काळाच्या मातीत गाडून टाकले. अशा स्थितीत ज्या काँग्रेसची जन्मशताब्दी आज साजरी केली जात आहे ती टिळक–गांधींची काँग्रेस नव्हे. तिचे निष्प्राण कलेवरही नव्हे. ती तर इंदिरा काँग्रेस आहे; पण तिच्या शताब्दीला अजून फार अवकाश आहे. जेमतेम एक किंवा सव्वा दशाब्दी एवढाच काळ तिच्या जन्माला झाला आहे. त्यामुळे काँग्रेसची शताब्दी हा एक पोरखेळ म्हणून या समारंभाकडे पाहावे हे बरे !

+ +

'तरुण भारत' : २२·१२·८५

३२. सच्चे गांधी, लुच्चे गांधी

सत्ताधारी किंवा सत्ताकांक्षी पुढारी जेव्हा महात्मा गांधींच्या नावाचा एक साधन म्हणून उपयोग करतात, तेव्हा आपण धडधडीत खोटे बोलत आहोत याचे खुद्द त्यांनाही भान असते; आणि ऐकणारे लोकही गालातल्या गालात हसत असतात. अशा वेळी माझ्या मनात विचार येतो, हे लोक निष्कारण कशाला स्वतःची प्रतारणा करतात आणि लोकांना फसवतात ? परंतु हा प्रश्न तसा निरर्थक आहे. कारण, हा फसवणुकीचा खेळ खेळण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नसते. ते स्वतः भ्रष्टाचाराच्या चिखलात बरबटलेले असल्यामुळे आपल्या कपड्यांवरचे व अंगावरचे डाग लोकांना दिसू नयेत म्हणून त्यांना गांधींच्या नावाचे झिरझिरीत वस्त्र अंगावर घेणे भाग पडते. 'राम' 'राम' असे छापलेले एक कापड तीर्थक्षेत्री मिळते. ते उपरण्यासारखे वापरणारा इसम साधुपुरुष समजला जातो. त्या कापडाला रामनामी असे म्हणतात. त्याच प्रकारची, ही अदृश्य गांधीनामी म्हणता येईल.

इंदिरा–संजय–राजीवची गांधीनामी

इतर सामान्य पुढाऱ्यांची गोष्ट सोडून देऊ. दिल्लीच्या सिंहासनावर वर्षानुवर्षे कब्जा करून बसलेल्या नेहरू–गांधी घराण्याचाच आपण विचार करू.

तसे पाहिले तर या फसवाफसवीच्या नाटकाची नांदी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीच सुरू केली होती. उठल्याबसल्या गहिवरल्या कंठाने

'बापूं'च्या नांवाचा जाहीरपणे जप करणे हा त्यांचा छंदच होता. वस्तुतः गांधीजींनी दाखवून दिलेल्या मार्गाचा त्याग त्यांनी सिंहासनाधिष्ठित होताच करून टाकला होता. गांधीजींनी आयुष्यभर ज्या गोष्टींचा प्रचार व प्रसार केला त्यांपैकी एकही गोष्ट नेहरूंनी कधी अमलात आणली नाही. ज्या साधेपणावर गांधीजींचा सारा भर होता, ज्या त्याग भावनेवर गांधी तत्त्वज्ञान आधारलेले होते, ज्या सेवावृत्तीने गांधींना महात्मा बनविले होते, त्या सर्वांनाच नेहरूंनी तिलांजली दिली; आणि एखाद्या मोगल बादशहाप्रमाणे ते विलासी जीवन जगू लागले. भारतात मिळणारी लोकप्रियता अगदीच सामान्य व तुच्छ वाटू लागल्यामुळे ते आंतर राष्ट्रीय कीर्तीच्या मागे जणू हात धुऊन लागले; आणि अखेर हास्यास्पद ठरले. याच्या उलट गांधीजींनी भारतीय जनतेच्या सेवेतच स्वतःला गाडून घेतले होते. जगभरचे त्यांचे भक्त त्यांना आपल्या देशात बोलावीत होते; पण येथील दुःख–दारिद्र्य नष्ट करण्याचे काम त्यांना इतके महत्त्वाचे वाटत होते की, परदेशी जाण्याचा विचारही त्यांच्या मनाला कधी शिवला नाही. विकेंद्रित अर्थ व राज्य व्यवस्था आणि खादी-ग्रामोद्योगांना उत्तेजन हे गांधीजींचे उद्दिष्ट होते; तर नेहरूंनी सत्तेबरोबरच अर्थ-व्यवस्थेचेही केंद्रीकरण केले; आणि रशियाच्या अनुकरणाने औद्योगिकीकरणावर लक्ष केंद्रित करून शेती व ग्रामोद्योग यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. परिणामतः सत्ताधारी अधिकाधिक श्रीमंत बनत गेले; आणि गरिबांची दुःस्थिती वाढत जाऊन बेकारी भयंकर वाढली. यातूनच भ्रष्टाचाराला खतपाणी मिळाले; आणि भारतीय जनजीवन सडू लागले.

कोणत्याही देशाच्या प्रगतीचा किंवा परागतीचा विचार करताना त्याने किती कारखाने चालू केले, धरणे बांधली, उत्पादन वाढविले, शाळा व दवाखाने उघडले याचीच गणती करून भागत नाही. या गोष्टी कोणत्याही सरकारला कराव्याच लागतात. त्या त्याने केल्या नाहीत तर, ते शासन करण्यास नालायक आहे असे समजले जाते. भारताबरोबर व नंतर स्वतंत्र झालेल्या अनेक देशांनी या गोष्टी केल्या आहेत; परंतु जे सरकार आपल्या जनतेला बेकार न ठेवता काम करण्याचा हक्क बहाल करते, तिला परिश्रमी व चारित्र्यवान बनविते; परस्पर सहकार्याची व सौहार्दपूर्ण वर्तनाची प्रेरणा देते, परचक्राची भीती उरणार नाही एवढे संरक्षणक्षम बनविते, त्यानेच खरी प्रगती केली आहे असे म्हणता येते. आमचे राजकर्ते स्वतःच भ्रष्ट बनल्याने भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनला. वारांगनांची चलती झाली आणि सती–साध्वींना तोंड लपवून जगणे भाग पडले. विविध जाती-जमाती, भिन्न भाषिक गट यांच्यांत भांडणे लावून देऊन सत्ताधारी मजा बघत बसले. त्यामुळे समाजाचे स्वास्थ्यच नाहीसे झाले. नेहरू, इंदिरा, राजीव यांनी फक्त आपल्या खुर्च्या टिकविण्यावरच सारे लक्ष केंद्रित केले. त्यामुळे 'यथा राजा तथा

प्रजा' या न्यायाने जनताही स्वार्थांध बनली. जाती, धर्म, पक्ष, भाषा यांच्यातील भेदभाव उफाळून वर आले आणि सर्वत्र अशांतता माजली. पंजाब, असम, गोरखा-भूमी ही या असंतोषाची केवळ वानगी आहे. सारे समाजजीवनच उद्ध्वस्त होण्याच्या बेतात आले आहे. याची जबाबदारी जनतेवर नसून सत्ताधाऱ्यांवर आहे.

अशा प्रकारे सत्ताग्रहणानंतर नेहरूंचा अंधःपात झपाटचाने होत गेला. भ्रष्टाचाराला त्यांचे संरक्षण मिळून तो 'दिन दूना रात चौगुना' वाढू लागला. एवढे सारे होऊनही नेहरूंची लोकप्रियता फारशी कमी झाली नाही. याचे कारण असे की, भारतीय स्वातंत्र्यलढचात ते अग्रभागी होते; आणि त्या संग्रामात त्यांनी पुष्कळच हालअपेष्टा भोगल्या होत्या. त्यामुळे कृतज्ञ भारतीय जनतेने त्यांचे हजार अपराध पोटात घातले; आणि त्यांना व त्यांच्या पक्षाला प्रचंड बहुमताने निवडून देण्याचा क्रम तिने अनेक वर्षे चालू ठेवला. एका दृष्टीने पाहिल्यास ही सारी गांधीजींची पुण्याई होती. त्यांनी नेहरूंना आपला राजकीय वारस म्हणून जाहीर आशीर्वाद दिला होता. त्याचा पुरेपूर फायदा नेहरूंनी करून घेतला.

भारतीय जनमानसावर महात्मा गांधींनी केवढा प्रभाव पाडला होता याची किंचित्ही कल्पना गांधी विरोधकांना पूर्वीही आली नव्हती व आजही आलेली दिसत नाही. म्हणून ते "गांधी फाळणीला कारणीभूत झाले. त्यांनी अनेकांचे बळी घेतले व हिंदुस्थान सरकारला वाहेर व आत असे दोन्हीकडून मुसलमान शत्रू उत्पन्न करून ठेवले, अशा तिहेरी अपराधाबद्दल त्यांना मरणोत्तर तरी दोषी ठरवायला हवे...भारत तेव्हाच खऱ्या दृष्टीने स्वतंत्र होईल, ज्या दिवशी भारताची लोकसभा वरील देशद्रोहाबद्दल गांधी व नेहरू या जोडीविरुद्ध मरणोत्तर खटला भरील..." (पु. ना. ओक, 'सोबत' १२–७–८७) अशा प्रकारच्या शेखमहंमदीत गुंग आहेत. या पर्यंकपंडितांच्या सुदैवाने त्याचे हे घाणेरडे विचार गांधीभक्त जनतेपर्यंत जाऊन पोहोचणार नसल्याने ते सुरक्षित राहातील; परंतु लोकमानसा-पासून आमचे अहमन्य विद्वान् किती दूर आहेत, याची यावरून कल्पना येईल; आणि रामनामाने जसे दगड तरले, तसे गांधींच्या नावाने अजूनही कसे बदमाश लोक सत्तास्थानावर जाऊन पोहोचतात याचा उलगडा होऊ शकेल.

नेहरूंनी इंदिराजींना काँग्रेसचे अध्यक्ष बनविले तेव्हाच भारताची राजसत्ता वारसा हक्काने नेहरू–गांधी घराण्यात चालत राहावी याची तरतूद त्यांनी करून ठेवल्याचे उघड झाले. नेहरूंवर गांधींचे थोडेफार संस्कार झाले असल्यामुळे आपले हे लोकशाहीविरोधी कृत्य करताना त्यांना थोडा संकोच वाटला असावा. म्हणून त्यांनी खुल्लमखुल्ला घराणेशाहीचा पुरस्कार न करता, काहीशा आडवळणाने ती अमलात आणली. याच्या उलट इंदिराजींवर गांधींचा काहीच प्रभाव पडलेला नव्हता; आणि त्यांनी स्वातंत्र्यलढचात भाग घेतला नसल्याने त्यांच्यावर देशभक्तीचे

संस्कारही झाले नव्हते. त्या शुद्ध व्यवहारवादी होत्या; आणि शिक्षण, साहित्य, कला, संस्कृती यांचा गंध त्यांना फारसा नसल्यामुळे त्यांचा व्यवहारवाद हा अगदी रांगडा व उघडानागडा होता. पंचायत समित्यांत किंवा जिल्हा परिषदांत लबाड पुढारी ज्या प्रकारचे कावेबाज राजकारण करतात, तशाच प्रकारचे सिद्धांतविहीन राजकारण त्यांनी राष्ट्रीय पातळीवर केले; आणि आपला वारसदार म्हणून संजय गांधींना तयार केले. इंदिराजींची सांस्कृतिक-वैचारिक पातळी इतकी सामान्य होती की, असे करण्यात आपण काही वावगे करीत आहोत, असा विचारही त्यांच्या मनात आला नाही. आपला मुलगा निव्वळ गुंड, दुराचारी व भ्रष्ट आहे हे पक्के ठाऊक असतानाही त्याच्या थोरल्या सज्जन भावाला दूर ठेवून त्यांनी संजयला युवराज बनविले. यावरूनही इंदिराजींची सांस्कृतिक पातळी स्पष्ट दिसून येते. गांधी–पटेल–नेहरूंच्या काँग्रेसचे त्यांनी पुरे भजे बनवून टाकल्याने याबाबतीत त्यांना योग्य सल्ला देऊ शकेल, असा सज्जन माणूसच काँग्रेसमध्ये उरला नाही, जे थोडे शहाणे सुर्ते लोक काँग्रेसला डोंगळ्याप्रमाणे चिकटून राहिले होते. तेही इतके लाचार बनले होते की, त्यांची किंमत सामान्य चपराशांएवढीही उरली नव्हती. त्यामुळे संजयच्या अकाली निधनानंतर इंदिराजींनी जेव्हा त्याचे थडगे राजघाटाच्या पवित्र भूमीवर उभारले आणि त्याला 'समाधी' असे सोज्वळ नाव देऊन संजयची 'पुण्यतिथी' साजरी करण्याचा प्रघात सुरू केला, तेव्हा 'संजयला या जागेत जाळण्याचा आणि तिथे त्याचे थडगे उभारण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे?' असे विचारणारा एकही हरीचा लाल काँग्रेसमधून पुढे आला नाही. मराठी बाण्याचे साठे, गाडगीळ, टिळकही भारतीय जनतेचा तो धडधडीत अपमान मुकाटच्याने पाहात राहिले. याहूनही आश्चर्याची व दुःखाची गोष्ट अशी की, विरोधी पक्षातल्या लोकांनीही संसदेमध्ये या गोष्टीवद्दल नुसती नापसंतीही दर्शविली नाही. यावरून इंदिरा गांधीनी संपूर्ण भारताला कसे निस्तेज, निष्प्रभ करून टाकले होते याची कल्पना येते.

संजय गांधी हे या देशावर येऊ घातलेले एक महान अरिष्ट होते. नियतीला भारतीयांची दया आली आणि तिने त्या अरिष्टापासून देशाला वाचविले. नाहीतर या देशात नुसतीच झुंडशाही नंगा नाच घालीत असलेली आपल्याला पाहावी लागली असती.

सत्य–अहिंसेचे धिंडवडे

सत्य आणि अहिंसा हा गांधीतत्त्वज्ञानाचा मुलाधार समजला जातो. त्यांपैकी अहिंसेला तिलांजली देण्याचे पवित्र कार्य जनता व राज्यकर्ते यांनी एकदिलाने केले. त्यामुळे त्याबद्दल कोणालाच तक्रार करता येण्यासारखी स्थिती राहिली नाही.

सत्याच्या बाबतीतली स्थिती थोडी वेगळी असते. माणूस स्वतः कितीही खोटारडा असला तरी, इतरांनी सत्य बोलावे व सत्याचरण करावे, अशी त्याची अपेक्षा असते. त्यामुळे असत्याच्या चिखलात रुतलेल्या प्रजेला मात्र असेच वाटत असते की, आपल्या राजाने किंवा राणीने खरे बोलावे. नेहरूंच्या काळात सत्याचा राजरोस खून फारसा झाला नाही; पण इंदिरा राजवट सुरू झाल्यापासून सत्याने जणू जंगलात जाऊन आपले तोंड लपविले. धडधडीत खोटे कसे बोलावे, शब्द कसा फिरवावा, दिलेल्या आश्वासनांना हरताळ कसा फासावा याचे धडेच जणू त्यांनी आपल्या इरसाल असत्याचरणाने समाजाला घालून दिले. इतके की, इंदिराजी बोलतील त्याच्या अगदी उलट वागणार हे लोकांनी गृहीत धरले. राजीवजींनीही बोफोर्स वगैरे प्रकरणात खोटेपणाचे जागतिक विक्रम करून दाखविण्याचा चंग बांधलेला दिसतो. सत्यवचनी गांधींची जणू ते टरच उडवीत असावेत. सत्य-अहिंसेची टिंगल करून 'शठं प्रति शाठ्यम्'चे तत्त्वज्ञान प्रतिपादणाऱ्यांचेच अनुयायित्व त्यांनी स्वीकारल्याचे उघड दिसते. त्याबद्दल खरोखरी आमच्या गांधीद्वेष्टचा व्यवहारवादी पर्यकपंडितांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांचे अनुयायित्व स्वीकारले पाहिजे.

खरे तर राजीव गांधी हाडाचे सज्जन व सरळमार्गी असल्यामुळे त्यांच्याकडून भारतीय जनतेने खूप मोठ्या अपेक्षा बाळगल्या होत्या; परंतु त्यांना या देशाची संस्कृती, परंपरा, इतिहास यांची काहीच माहिती नव्हती. आणि आधुनिकतेच्या बेफाट कल्पना मनाशी बाळगून, देशभक्तीचा गंधही नसलेल्या उडाणटप्पूंना त्यांनी सल्लागार म्हणून जवळ केले. त्यामुळे देशाचे तारू भलतीकडेच भरकटत चाललयाचे दृश्य आज दिसत आहे. राजीवजी हे पाश्चात्त्य देशात वाढलेले व ख्रिस्ती संस्कृतीचा पगडा असलेले, जनमानसाशी अपरिचित, अननुभवी तरुण आहेत. गांधी आणि गांधी विचार यांची त्यांना काहीच माहिती नाही. परंतु जनतेला भुलविण्यात गांधींचे नाव फार उपयोगी पडते हे आपल्या मातुश्रींच्या उदाहरणावरून त्यांना ठाऊक झाले असल्याने ते अधून-मधून आई, आजोबा यांच्या नावांबरोबर गांधींचेही नाव घेतात. परंतु ते अगदीच औपचारिक असते, ही गोष्ट सहज लक्षात येते. गांधींची राजनीती व अर्थनीती कोणती होती याची थोडी जरी कल्पना त्यांना असती, तर आपल्या राजनीतीशी व अर्थनीतीशी तिचे जवळचेही नाते नाही हे ओळखून त्यांनी गांधींचे नाव घेण्याचे धारिष्ट केले नसते.

या पार्श्वभूमीवर गांधीजींचे आचरण विशेष उठून दिसते. त्यांनी नुसती अनुमती दर्शविली असती, तर त्यांच्या मुलांना सहज मंत्रीपद, खासदारकी किमान आमदारकी मिळू शकली असती. काँग्रेसचे अध्यक्षपद तर नुसत्या इशाऱ्यावर मिळाले असते. कारण त्यांचे चिरंजीव देवदास गांधी हे इंदिरा गांधींहून लाखपटींनी लायक होते. पण गांधीजींनी आपल्या कुटुंबियांना या सगळ्या मोहांपासून दूर ठेवले. एवढेच

नव्हे तर आपला थोरला मुलगा हरिलाल हा आपल्या नावाचा गैरफायदा घेत असल्याचे लक्षात येताच, त्याच्याशी आपला काहीही संबंध नसल्याचे त्यांनी जाहीर केले; आणि त्याच्या दुर्व्यसनांना कोणीही मदत करू नये अशी लोकांना विनंती केली. त्यांचे सगळे नातेवाईक सत्ता–मत्ता–स्थानांपासून दूर राहून सामान्य लोकांप्रमाणे जीवन जगत राहिले. याच्या उलट नेहरूंनी आपले जातभाई व नातेवाईक यांना जवळ केल्यामुळे सारी काँग्रेस संघटना पार नासून गेली; आणि मंत्री खासदार, आमदार यांनी नेहरूंचे अनुकरण करून आपापल्या नातेवाइकांना सत्तेच्या व मत्तेच्या जागा मिळवून देण्याचा धूमधडाका चालविला. यातून भ्रष्टाचाराला भरपूर खतपाणी मिळाले. 'पुरावा द्या म्हणजे कारवाई करतो' असे इंदिराजींप्रमाणे राजीवजीही सांगत असतात. पण सगळ्या जगाला दिसणारा पुरावा त्यांना दिसत नाही. आमदार–खासदार होण्यापूर्वी जी व्यक्ती कसेबसे हातावर पोट भरत होती, ती आमदार–खासदार–मंत्री बनल्यानंतर बघताबघता कशी कोटचधीश बनते याचा शोध राजीव गांधींनी घेतला तर सारा भ्रष्टाचार उघडकीस येईल. पण ते तसे करणार नाहीत. कारण त्यात खुद्द नेहरू–गांधी घराणेच बरबटलेले आहे, याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. गांधीजी जोपर्यंत काँग्रेसचे मार्गदर्शन करीत होते, तोपर्यंत असा भ्रष्टाचार करण्याची हिंमत कुणाला झाली नाही. कारण स्वत: ते याबाबतीत अत्यंत निर्मळ व कडक होते भोळीभाबडी भारतीय प्रजा आणि अज्ञानी परकीय लोक यांची अशीच समजूत होती व आजही आहे की, इंदिरा गांधी ही महात्मा गांधींची मुलगी व राजीव गांधी हे नातू असावेत. (लोकांच्या श्रद्धेचे भांडवल करण्यासाठी इंदिराजी काही काळ नेहरू–गांधी हे जोड आडनाव वापरीत. ही खास त्यांची चलाखी !) लोकांच्या या अज्ञानाचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी अधूनमधून गांधींच्या नावाचा जप करण्याचा आपल्या पिताजींचा उपक्रम इंदिराजींनी चालू ठेवला. राजीव गांधींनी त्यांचेच अनुकरण पुढे चालविले. बिचारे गांधीजी ! आपल्या नावाचा हा दुरुपयोग पाहून त्यांच्या आत्म्याला किती क्लेश होत असतील ! पण राजकारणात सर्व काही क्षम्य असते, असे सांगणाऱ्या विद्वानांनी मात्र इंदिरा-राजीवची मोठीच पंचाईत करून टाकली. कारण जे पाप स्वत:च्या बाबतीत क्षम्य असते ते इतरांच्या बाबतीत अक्षम्य असते, ही गोष्ट आमचे विद्वान उघडपणे मान्य करीत नसले तरी, ज्या चाणक्यनीतीचा पुरस्कार आपण करतो, तिचाच अवलंब नेहरू–गांधी घराण्याने आपल्याविरुद्ध चालविला असल्याचे पाहून त्यांना निश्चितच सुख होत नसेल !

या परिस्थितीला गांधींवादीही जबाबदार

मी स्वत: गांधीभक्त आणि गांधीविचारांवर श्रद्धा असणारा एक सामान्य

लेखक आहे. गांधींनी सेवेचा, त्यागाचा जो आदर्श घालून दिला, देशातल्या माणूस-बळाचा योग्य वापर व्हावा यासाठी ज्या ग्रामाधारित, कृषि-ग्रामोद्योगप्रधान अर्थ-व्यवस्थेचा व मूलोद्योग शिक्षणपद्धतीचा त्यांनी पुरस्कार केला त्याचा अवलंब केल्याखेरीज या देशाचा नैतिक अधःपात थांबणार नाही अथवा बेकारीजनित आर्थिक दुरवस्था नाहीशी होणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. परंतु पाश्चात्त्य संस्कृती, सभ्यता व तंत्रज्ञान याच्या मोहाने आपल्याला इतके आंधळे बनवून टाकले आहे, गोऱ्यांविषयीचे आपले मानसिक दास्य इतके खोलवर जाऊन पोहोचले आहे की, गुन्नार मिर्दालसारखा एखादा गोरा जेव्हा गांधीवादी अर्थव्यवस्थाच भारताला वाचवू शकेल असे सांगतो, तेव्हा आपण क्षणभर विचारात पडतो. पण आपली मानसिक गुलामगिरी इतकी प्रबळ आहे की, इंग्रजी भाषेशिवाय आपला उद्धार होणार नाही आणि अल्प मानवशक्ती असणाऱ्या पाश्चात्त्य देशांना उपयुक्त ठरणारे यंत्राधारित तंत्रज्ञान अतिरिक्त मनुष्यबळ वागवावे लागणाऱ्या भारतातही लागू करण्याचा मोह आपल्याला सोडवत नाही.

या दुरवस्थेला राज्यकर्ते, सत्ताधारी व सत्ताकांक्षी राजकीय पक्ष आणि पाश्चात्त्य संस्कृतीने दिपून गेलेले भारतीय विद्वान जेवढे जबाबदार आहेत तेवढेच स्वतःला गांधीवादी म्हणविणारेही जबाबदार आहेत. राजसत्तेच्या, भ्रष्टाचाराच्या सांसर्गिक रोगाने त्यांनाही पछाडले आहे. त्यामुळे गांधी आणि गांधीवाद तर बदनाम झालेच; परंतु जनतेने ज्यांच्याकडे आशेने पाहावे असे लोकही उरले नाहीत. तत्त्वा-साठी निर्भयपणे संघर्ष करणे हा गांधीमार्गाचा आत्मा आहे. त्याचाच आमच्या गांधीवाद्यांना विसर पडला. अमेरिकेतील निग्रो, पोलंडमधील कामगार, फिलि-पाइन्स व दक्षिण कोरिया येथील सामान्य जनता, जर्मनीचे ग्रीनपीसवाले यांना गांधीमार्ग हाच सर्वनाशातून सुटका करून घेण्याचा एकमेव मार्ग वाटतो; परंतु शांततामय संघर्षाच्या या मार्गावर जणू गांधीवाद्यांचाच विश्वास उरलेला नसावा असे दिसते. नोआखालीतील निराधार, निराश्रित, अत्याचारपीडित हिंदूंचे अश्रू पुसण्यासाठी जे गांधी निधडचा छातीने एकाकी धावून गेले, त्यांच्या अनुयायांना पंजाबातील दहशत-वाद्यांच्या अत्याचाराचा शांततापूर्ण मार्गाने मुकाबला आपणच केला पाहिजे, त्यासाठी पंजाबात जाऊन स्वतःला तेथे गाडून घेतले पाहिजे, अशी प्रेरणा काही झाली नाही. बाबा आमटे किंवा सुनील दत्त यांच्या पदयात्रा केवळ देखाव्यासाठी असल्यामुळे त्यांचा काहीच परिणाम झाला नाही. तसा तो होणार नाही, हे आधीपासूनच स्पष्ट दिसत होते. जोपर्यंत सर्वसामान्य शीख समाज अतिरेक्यांच्या गोळ्या स्वतःच्या छातीवर झेलण्यास व त्यांना आश्रय देण्याचे नाकारण्यास निर्भयपणे तयार होणार नाही, तोपर्यंत पंजाबची समस्या सुटणार नाही. त्यासाठी पंजाबात राहून शीख समाजाला गदगदा हलवून जागे करण्याचे काम गांधीवादीच करू शकले असते.

खरे तर या साऱ्या अरिष्टाचे मूळ इंदिराजींच्या कुटिल राजनीतीत आहे. कोणत्याही प्रश्नाचा विचार करताना तो कसा काय सुटेल यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी आपली खुर्ची टिकवून ठेवण्यासाठी त्याचा कसा वापर करता येईल, यालाच नेहरूंप्रमाणे इंदिरा– राजीवजींनीही प्राधान्य दिले. त्यामुळे कोणताच प्रश्न समाधानकारकपणे सुटला नाही. कारण तो सुटावा अशी त्यांना तळमळ नव्हती. तशी ती असती तर त्यांनी एकेक प्रश्न हातात घेऊन त्याचा शेवटपर्यंत पाठपुरावा केला असता. आणि त्यातून त्यांची कळकळ दिसून आल्यामुळे सामान्य जनतेचा भरघोस पाठिंबा मिळून संघर्षरत पक्षांना तडजोड करणे भाग पडले असते. बारा वर्षांपूर्वी जेव्हा त्यांनी चंडीगढ व पाणीवाटप यांसंबंधी निवाडा दिला व तो दोन्ही पक्षांनी मान्य केला, तेव्हाच त्याची अमलबजावणी त्यानी केली असती तर तो प्रश्न तेव्हाच मिटला असता; परंतु प्रत्येक प्रश्न कुजवायचा आणि आपली खुर्ची टिकविण्यासाठी आपण स्वत: दिलेल्या आश्वासनांना हरताळ फासायचा, ही त्यांची कार्यपद्धती असल्यामुळे पंजाबचा प्रश्न सडत गेला. असमचा प्रश्नही त्यांच्यामुळेच इतका भीषण बनला, आणि कर्नाटक– महाराष्ट्राचा सीमाप्रश्नही त्यांच्यामुळेच गुंतागुंतीचा बनला. वस्तुत: खऱ्या गांधीवाद्यांनी हे प्रश्न समजून घेऊन त्यांच्या निराकरणासाठी अहिंसक मार्गाचा अवलंब करावयास हवा होता. त्यांनी तसे केले असते तर, आम जनतेचा त्यांना पाठिंबा मिळाला असता आणि तो प्रश्न सोडविणे इंदिराजींना भाग पडले असते; परंतु जणू या सगळ्या घटनांशी आपला काहीच संबंध नाही, अशा प्रकारे गांधीवादी वागले; आणि इंदिराजींना मोकळे रान मिळाले.

सत्ताधाऱ्यांविषयी गांधीवाद्यांना वाटणारी आत्मीयता

याचे एक कारण उघड आहे. काही गांधीवाद्यांना सत्ता व मत्ता यांच्या मोहाने भ्रष्ट बनविले. आचार्य काकासाहेब कालेलकर, रंगराव दिवाकर, गुलजारीलाल नंदा, प्रभुदास पटवारी, श्रीमन्नारायण अग्रवाल ही यांपैकी काही सहज आठवणारी नावे. महाराष्ट्रात देवकीनंदन, देवगिरीकर, पागे, भारदे यांची नावे या संदर्भात आठवतात. यांपैकी कुणाला राज्यसभा, विधानपरिषद याचे सभासदत्व मिळाले, कोणी राज्यपाल बनले, तर कोणी कोणत्या तरी आयोगाचे अथवा महामंडळाचे अध्यक्ष, सदस्य वगैरे झाले. आपल्याला विरोध करण्याची शक्यता असलेल्या सज्जनांना मोहात पाडून त्यांची तपस्या भंग करण्याचा हा देवेंद्रमार्ग तसा फार जुना आहे. त्याचा अवलंब जगातले सगळेच सत्ताधारी करीत असतात. तसा तो नेहरूंनी व इंदिराजींनीही केला; आणि त्यात त्यांना यश येऊन त्यांच्या

भल्या-बुऱ्या कृत्यांचा पाठपुरावा करणारे भाट त्यांना फार कमी किमतीत मिळाले. गांधीवाद्यांनी सत्ताधाऱ्यांशी संगनमत केल्याने ते स्वतः निस्तेज बनले; आणि गांधीवाद बदनाम झाला. खादी ग्रामोद्योग आयोगातील गांधीवादी कार्यकर्त्यांच्या भ्रष्टाचारामुळे तर खादी ग्रामोद्योगातील पावित्र्यच जणू नष्ट झाले.

आचार्य विनोबा भावे यांचे प्रकरण थोडे वेगळे आहे. ते स्वतः कधी भ्रष्टाचारात गुरफटले नाहीत. त्यांच्या शिष्या निर्मला देशपांडे यांनी इंदिरा गांधींचे अनुयायित्व स्वीकारून काही सोयी-सवलती मिळविल्याची कुजबूज त्याकाळी कानावर आली होती; आणि गांधीवादी संस्थांच्या मागे केवळ जयप्रकाश–द्वेषामुळे सत्ताधाऱ्यांच्या मदतीने कुदाल आयोगाचे शुक्लकाष्ठ लावून देण्याच्या मागेही त्यांचाच हात होता, असे ऐकिवात होते; परंतु तो आयोगच हास्यास्पद ठरल्यामुळे निर्मलाताईंचा तो वार फुकट गेला. ही घटना एवढ्याच दृष्टीने महत्त्वाची की, सत्ताधाऱ्यांच्या गोटात गेल्यामुळे विनोबांचे शिष्य राजकारणी मंडळींसारखे कसे गलिच्छ डावपेच करू लागले होते याची कल्पना यावी.

परंतु विनोबांवर अशा प्रकारचा आक्षेप घेण्यास फारसा वाव नाही. 'फारसा' हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे. कारण लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या बाबतीत त्यांची जी वागणूक झाली, तिच्यात इंदिरा गांधींना पाठीशी घालण्याच्या त्यांच्या राजकारणाचा भाग महत्त्वपूर्ण असावा अशी माझी समजूत झाली आहे. इंदिराजींनी आपले आसन डळमळीत होत असल्याचे लक्षात येताच, देशाची राज्यघटना गुंडाळून ठेवून आणीबाणी लादली व सारा देश हा एक मोठा तुरुंग बनवून टाकला. एक प्रकारे भारतीय जनतेच्या स्वातंत्र्यावरच त्यांनी घाला घातला होता. अशा वेळी अत्याचारपीडित जनतेच्या बाजूने उभे राहून जुलमी राजसत्तेशी दोन हात करणे हे गांधीजींचे आध्यात्मिक उत्तराधिकारी व सर्वश्रेष्ठ गांधीवादी या नात्याने त्यांचे कर्तव्य होते. त्या कर्तव्याचे पालन त्यांनी केले नाही. एवढेच नव्हे तर, त्या आंतकपर्वाला अनुशासन पर्व असे संबोधून पर्यायाने त्यांनी आणीबाणीलाच पाठिंबा दिला. त्यांच्या या वर्तनाने गांधी आणि गांधीमार्ग यांना काळोखी फासली गेली. आपल्या या वागणुकीचा खुलासा त्यांनी कधीच केला नाही. त्यांचे हे सारेच वर्तन खऱ्या गांधीवाद्याला न शोभणारे होते. भूदानात मिळालेली जमीन वाटण्याचा प्रश्न असो की, त्यांना प्राणाहून प्रिय असणारा गोवध बंदीचा प्रश्न असो, त्यांनी नेहमीच संघर्ष टाळला. ही रणछोड वृत्ती गांधीमार्गाशी मेळ खाणारी निश्चितच नव्हती. गांधीजींना जगाने महात्मा म्हणून जी मान्यता दिली तिचे कारण ब्रह्मचर्याविषयीचे त्यांचे अशास्त्रीय विचार किंवा आहारासंबंधी त्यांनी केलेले प्रयोग हे नव्हते; तर सामर्थ्यशाली अत्याचाऱ्याकडून होणाऱ्या अन्यायाला अहिंसक मार्गाने तोंड देणे व त्यात विजयी होणे, निःशस्त्र व शारीरिक दृष्ट्या दुर्बल

व्यक्तीलाही शक्य असते, ही गोष्ट त्यांनी आपल्या आचरणाने व आपल्या नेतृत्वाखाली चालविलेल्या आंदोलनांनी जगाला दाखवून दिल्यामुळेच जगात त्यांना सन्मानाचे स्थान प्राप्त झाले. ही संघर्षाची भूमिकाच जेव्हा गांधीवाद्यांनी सोडून दिली, तेव्हा त्यांचा गांधीवाद हा केवळ एक देखणा बुडबुडा ठरला.

वाट चुकलेले देशभक्त

हिंसाचार व दहशतवाद यांना गांधीजींनी नेहमीच कसून विरोध केला– मग तो ब्रिटिशांच्या विरुद्ध असो, हिंदू किंवा मुसलमान यांच्याविरुद्ध असो अथवा सवर्ण किंवा अस्पृश्य यांच्यातला असो. ज्यांनी या मार्गाचा अवलंब केला, ते भगतसिंग, सावरकर, मानवेंद्रनाथ राय व सुभाषचंद्र बोस यांच्यासारखे क्रांतिकारक त्यांच्या दृष्टीने वाट चुकलेले देशभक्त होते. तसे त्यांनी स्पष्टपणे बोलूनही दाखविले. त्याबद्दल त्यावेळी त्यांच्यावर खूप टीका झाली; आणि आपल्या सुरक्षित घरटचात बसून इतरांना हिंसाचारास प्रवृत्त करणारे कागदी क्रांतिकारक वाघ–सिंह आजही त्या उद्‌गारांबद्दल गांधींची टिंगलटवाळी करताना आढळतात. हिंसाचाराच्या मोहाने ते आंधळे झाले असल्याने आज खालिस्तानवादी शीख अतिरेकी व गोरखाभूमीवाले दहशतवादी गुरखे यांच्याकडून होणारे अत्याचार त्याच हिंसाचाराच्या परंपरेत बसतात, कारण तेही त्यांच्या समजुतीप्रमाणे आपल्या मातृभूमीच्या मुक्तीसाठी ते सारे तितक्याच कळकळीने करीत आहेत, ही गोष्ट गांधींच्या नावाने बोटे मोडणाऱ्या शहाण्यांना कळली तरी वळणार नाही. साध्य– साधन-विवेकाला गांधींनी एवढे महत्त्व का दिले, हे आज आपण समजू शकतो. गांधींचा द्वेष हाच ज्यांचा मनोधर्म आहे, ते ही गोष्ट मान्य करणार नाहीत; परंतु गांधींचा जयजयकार करणाऱ्या इंदिरा–राजीव गांधीनाही ती कळू नये व सत्ता टिकविण्यासाठी त्यांनी वाटेल त्या साधनांचा वापर करावा, ही खरी दुर्दैवाची गोष्ट आहे. हीच गोष्ट हुकूमशाहीच्या बाबतीत खरी आहे. हजारो वर्षे हुकूमशाहीच्या वरवंटचाखाली पिसल्या गेलेल्या समाजातल्या तथाकथित बुद्धिवंतांनी 'या देशाला हुकूमशहाच हवा, येथील लोकशाही म्हणजे बाजारबुणग्यांचे राज्य आहे,' असे आग्रहाने प्रतिपादन करावे, हे आमच्या बुद्धीचे दिवाळे निघाल्याचेच लक्षण म्हटले पाहिजे. या बाबतीत गमतीची गोष्ट अशी की, हुकूमशाहीचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येक पक्षाला, पंथाला, संघटनेला आपल्याच पक्षाची, पंथाची व संघटनेची हुकूमशाही हवी असते. तसे नसते तर इंदिराजींच्या हुकूमशाहीस काँग्रेसखेरीज इतर पक्षांनी का विरोध केला असता ? गांधीजींनी व्यक्तीचे स्वातंत्र्य मान्य केले होते आणि तिला स्वत:चा विकास करून घेण्याची पुरेपूर संधी लाभेल अशा समतापूर्ण समाज-

व्यवस्थेचाच सतत पुरस्कार केला होता. गांधींच्या नावावर राज्य करणाऱ्यांनी मात्र भारतीय जनतेला इतके असहाय्य व लाचार बनवून टाकले आहे की, ती एक प्रकारच्या गुलामीतच जगत आहे. आणीबाणीच्या काळात 'इंदिरा इज इंडिया' म्हणणाऱ्या बारुआंना आम्ही हसलो होतो. बॅ. विठ्ठल गाडगीळ 'भारत म्हणजे काँग्रेस व काँग्रेस म्हणजे राजीव' असे म्हणून मंत्रीपदाच्या चतकोर तुकड्यासाठी तशीच लाचारी दाखवीत आहेत. गांधीजींजवळ असल्या लाचारांना मुळीच स्थान नव्हते. म्हणून तर जीवनाच्या विविध क्षेत्रांत पराक्रम करून दाखविलेले पटेल, नेहरू, राजाजी, आझाद, राजेंद्रबाबू, कृपलानी, कुमारप्पा यांसारखे त्यांची जागा घेऊ शकणारे दिग्गज सहकारी व अनुयायी त्यांना मिळाले. त्यांच्या समकालीन पुढाऱ्यांपैकी कुणालाही ही किमया करून दाखविता आली नाही. म्हणून त्याचे नेतृत्व त्यांच्याबरोबरच संपले. इंदिराजींनी तर आपल्या सहकाऱ्यांचे उच्चाटन करून अंतुले, गुंडूराव, भजनलालसारखे आपल्या हुकमतीखाली राहणारे गुंडपुंड जवळ केले; आणि फकरूद्दीन अली अहमदांसारखे देशद्रोही व झैलसिंगांसारखे हुजरे राष्ट्रपतीपदावर बसवून या देशाची शान घालविली. असल्या लोकांना गांधींच्या समोर जाण्याचीही हिंमत झाली नसती. राजीवजींनी स्वतःभोवती गोळा केलेल्या झकास बाबुरावांविषयी तर बोलायलाच नको. गांधीजींच्या राजकारणात अशा लोकांना कधीतरी स्थान मिळाले असते काय ? गांधींचा विश्वास संपादून त्यांचे अनुयायित्व मिळविणे हे एक सतीचे वाणच होते. येरागबाळ्याचे ते काम नव्हते.

समाजवाद्यांची स्थिती याहून वेगळी नाही

हिंदुत्ववादी आणि साम्यवादी (कम्युनिस्ट) यांचा या संदर्भात विचार करण्याचे कारण नाही. त्यांनी गांधींना कधीच महात्मा मानले नाही. किंबहुना हिंदुत्ववाद्यांना जिनांपेक्षा जास्त राग–द्वेष गांधींचा होता; आणि आजही ते गांधींना राष्ट्रपिता न मानता राष्ट्रद्रोही समजतात. त्यांच्यापैकी जे शहाणे आहेत, ते तसे उघड बोलत नाहीत; कारण त्याचे काय परिणाम होतील याची त्यांना कल्पना असते. या संदर्भात एक दंतकथा आठवते. एका षंढाची बायको एका गुंडाने पळविली. त्या गुंडाचा पाठलाग करून बायकोची सुटका करण्याऐवजी तो षंढ रागारागाने घरात गेला आणि आपल्या म्हाताऱ्या बापाला त्याने दरडावून विचारले, "माझी बायको त्या गुंडानं कशी पळवली ?" म्हातारा शांतपणे उद्‌गारला, "तुझ्यात पौरुष नव्हतं म्हणून !" त्यासरशी तिरीमिरीत येऊन त्या षंढाने म्हाताऱ्याच्या टाळकीत सोटा हाणला. म्हातारा तत्काळ गतप्राण झाला. ते पाहून आपण त्या गुंडावर कसा सूड उगवला या कल्पनेने तो तरुण आनंदाने बेहोष होऊन

नाचू लागला. साम्यवाद्यांच्या दृष्टीने गांधी हा साम्राज्यवाद्यांच्या व भांडवलदारांचा हस्तकच होता; आणि ते हिंदुत्ववाद्यांपेक्षा जास्त निडर व संघटित असल्यामुळे आपला हा आरोप जाहीरपणे करण्यास ते कधी कचरले नाहीत. मात्र त्यांचा बोलविता धनी जो रशिया त्यानेच राजकीय सोयीसाठी या मतात बदल केल्यामुळे भारतीय साम्यवाद्यांनीही गांधींना शिव्याशाप देणे आता बंद केले आहे.

समाजवाद्यांची स्थिती मात्र अत्यंत केविलवाणी आहे – विशेषत: महाराष्ट्रातील ! त्यांना मनातून गांधी, जयप्रकाश, लोहिया यांचे मोठेपण पटते; परंतु मते मिळविण्याच्या दृष्टीने त्यांचा काही फारसा उपयोग होणार नाही, असे वाटल्यामुळे त्यांनी या तिघांची नावे घेण्याचे सोडून दिले आहे. त्याऐवजी स्वातंत्र्यपूर्व काळात ज्यांना त्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीचे आधारस्तंभ व इंग्रजांचे हस्तक म्हणून हिणविले व प्रसंगी विरोधही केला, त्या फुले–आंबेडकर–शाहूमहाराजांना सध्या भाव असल्याचे ओळखून त्यांचा जोरजोरात जयकार चालविला आहे. आता असल्या ठिसूळ निष्ठा बाळगणाऱ्यांकडून सत्ताधाऱ्यांना कसली भीती ? (कर्नाटकात जनतापक्षाचे राज्य आहे. पण ते जनतावाले पूर्वाश्रमीचे संघटना काँग्रेसचे अनुयायी असून तेथील बहुसंख्य समाजवादी (लोहियावादी) इंदिरा काँग्रेसमध्ये सामील झाले आहेत !) समाजवाद्यांपैकी जे लोक स्वत:ला बुद्धिप्रामाण्यवादी म्हणवितात त्यांचे प्रत्यक्ष जीवन त्यांच्या या दाव्याशी अगदीच विसंगत असते. मूर्तिपूजेचा धिक्कार करणारे लोक जेव्हा आपल्या पुढाऱ्यांच्या तसबिरींची पूजा करतात आणि त्यांचे पुतळे उभारतात तेव्हा आपण मूर्तिपूजेचाच पुरस्कार करीत आहोत, हे त्यांच्या लक्षात येत नाही. त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल काय बोलावे ? गांधीजी कधी देवळात गेले नाहीत, कुणाची तसबीर त्यांनी लावली नाही, किंवा कुणाचा पुतळा उभारला नाही. तरीही ते मात्र मूर्तिपूजक समजले गेले; कारण त्यांची ईश्वरावर खरी श्रद्धा होती. इंदिराजींनी एक देऊळ, दर्गा, मशीद, गुरुद्वारा, चर्च, वस्ती (जैनमंदिर) सोडले नाही. एकाही बुवाचा चरणस्पर्श त्याज्य मानला नाही; पण त्यांना काही सद्‌बुद्धी झाली नाही. कारण, त्यांना देवाविषयी भक्ती नव्हती, तर केवळ भीती वाटत होती. पण हिंदुत्ववाद्यांची निर्बुद्धता एवढी प्रचंड की, ते इंदिराजींना हिंदूंची रक्षणकर्त्री समजू लागले. जो गांधी हिंदू धर्म व संस्कृती यांचा कट्टर पुरस्कर्ता होता, भारतीय संस्कृतीची मूल्ये स्वत: आचरणात आणून इतरांना त्यांचा उपदेश करीत होता, त्याला हिंदूंचा दुष्मन समजून हिंदुत्ववाद्यांनी ठार मारले, तेव्हाच त्यांच्या निर्बुद्धतेची खात्री जगाला पटली होती. परंतु त्यातूनही त्यांनी काही बोध घेतला नाही; आणि भूतकाळाची भुते मानगुटीवर वागवीत ते स्वातंत्र्यपूर्व काळात जसा विचार करीत होते, ज्या मार्गाने चालले होते, तसाच विचार करीत त्याच मार्गाने चालत राहिले. अर्थात् इथल्या बहुजन समाजाच्या

खिजगणतीत ते पूर्वीही नव्हते आणि आजही नाहीत. त्यामुळे त्यांचे अस्तित्व हे नाममात्रच राहिले आहे. (रा. स्व संघ व भारतीय जनता पक्ष यांची भूमिका या कट्टर हिंदुत्ववाद्यांहून नेहमीच वेगळी राहिली आहे. त्यांनी गांधींचे मोठेपण कधीच नाकारले नाही, अथवा तळागाळाच्या जनतेच्या सुखःदुखांकडे दुर्लक्ष केले नाही. त्यामुळे भारतीय समाजातील त्यांचे स्थान नेहमीच महत्त्वाचे राहिले. त्यांना मी राष्ट्रवादी हिंदूत्वनिष्ठ म्हणतो. संकुचित जातीयवादी हिंदुत्वनिष्ठांहून ते किती वेगळे आहेत हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजप यावर ते (जातीयवादी) किती कडवटपणे तुटून पडतात हे पाहिले की लक्षात येते. ओक, बेहेरे, जीवन कुलकर्णी यांनी रा. स्व. संघ व भाजप यांच्याविरुद्ध चालविलेला जहरी प्रचार पाहण्यासारखा असतो.)

द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत गाडला गेला आहे काय ?

भारतातील जातीय दंगल ही शांतता प्रेमी नागरिकांच्या दृष्टीने एक कायमची डोकेदुखी झाली आहे. ती ज्या कारणाने निर्माण झाली ते कारण नाहीसे करण्याऐवजी ॲस्प्रीनची गोळी घेऊन तिच्यापासून तात्पुरती सुटका करून घेण्याच्या मार्गाचाच अवलंब केला जातो. त्या गोळीचा प्रभाव ओसरला की डोकेदुखी पुन्हा उद्‌भवते. खरे म्हणजे या कारणाचा शोध घेण्याचेच टाळले जाते. वावटळीची चाहूल लागताच शहामृग आपले मुंडके वाळूत खुपसून तिच्यापासून संरक्षण करण्याची धडपड करते, तशातला हा प्रकार आहे. जातीय दंग्यांसंबंधी विचार करताना आपण हे लक्षात घेत नाही की, स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळातल्या दंगलींमध्ये मूलभूत फरक पडला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सत्तेविरुद्ध हिंदूंनी चालविलेल्या लढ्यात मुसलमानांनी ब्रिटिशांच्या बाजूने उभे न राहता आपल्याबरोबर यावे असे देशभक्तांना वाटत होते. म्हणून त्यांनी मुस्लिम अनुनयाचा मार्ग स्वीकारला होता. त्या परिस्थितीत तसे करणे अपरिहार्य व अनिवार्यच होते, ही गोष्ट अजूनही काही लोकांना कळलेली नाही. इंग्रजांना हिंदू–मुसलमानांचे ऐक्य घडून यायला नको होते, म्हणून त्यांनी या दंग्यांना उत्तेजन दिले; आणि ब्रिटिश सेना व पोलीस यांनी मुसलमानांच्या बाजूने राहून हिंदूंना चोपून काढण्याचा उपक्रम केला. स्वातंत्र्योत्तर काळात सेना व पोलीस काहीसे तटस्थ बनले. अनेकदा त्यांची स्वाभाविक सहानुभूती हिंदूंना मिळाली. त्यामुळे आगळीक काढणाऱ्या मुसलमानांवर मार खाण्याची पाळी आली. अर्थात कोणत्या जमातीचे किती लोक मारले गेले व कोणाचे किती आर्थिक नुकसान झाले हे कायद्यानेच गुलदस्तात ठेवले गेल्याने, प्रत्येक जमातीला असे वाटत राहते की आपल्यावर

अन्याय झाला आहे.

आजकालच्या जातीय दंगलींचे मूळ जिनांनी प्रतिपादिलेल्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतात आहे. या गोष्टीकडे कोणाचेच लक्ष गेलेले दिसत नाही. मुसलमान हे वेगळे राष्ट्र आहे हा सिद्धांत जिनांनी मांडला; आणि 'हिंदुस्थान हिंदुओंका नही किसीके बापका' असा आक्रोश करणाऱ्या हिंदूराष्ट्रवाद्यांनी कळत-नकळत त्या सिद्धांताला पुष्टी दिली. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना तेच हवे असल्याने, त्यांनी जिनांच्या पाठीशी आपले सामर्थ्य उभे केले. त्यामुळे देशाची फाळणी घडून आली. जिनांचा हा सिद्धांत ठामपणे नाकारणारे एकमेव पुढारी होते खान अब्दुल गफार-खान आणि त्यांच्या पठाण अनुयायांयाचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता. आजही त्यांची एकराष्ट्रीयत्वावरील श्रद्धा विचलित झालेली नाही. त्यांनी फाळणीला मान्यता दिलेली नाही. त्यांचा लढा चालूच आहे. भारतात हमीद दलवाई व त्यांच्या-सारखे राष्ट्रवादी मुसलमान हा द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत नाकारीत राहिले. परंतु त्यांचा काही प्रभाव पडू शकला नाही. गांधी–नेहरूंनीही तत्त्वतः तो सिद्धांत अमान्य केला; परंतु व्यवहारतः त्यांना हिंदू राष्ट्र स्वीकारावे लागले. हिंदू कोडबिल, अस्पृश्यता-निवारण, एकपत्नीत्वाचा कायदा वगैरे केवळ हिंदूंचाच विचार करणारे उपक्रम सुरू करून भारत हे हिंदू राष्ट्रच असल्याचे त्यांनी परोक्षपणे कबूल केले. त्यामुळे भारत महोत्सव हा प्रत्यक्षात हिंदू महोत्सव असल्याबद्दल कुणी तक्रार केली नाही. नेहरूंच्या या हिंदू राष्ट्राने मुस्लिम समाजाच्या उन्नतीकडे पूर्ण दुर्लक्ष केले. तो समाज अज्ञान व दारिद्र्य यांच्या गर्तेत खोलखोल चालल्याचे दिसत असूनही त्याला वर काढण्याचा काही प्रयत्न केला नाही. उलट मुल्लामौलवींसारख्या लांड्यांच्या व शहाबुद्दीनांसारख्या कोल्ह्यांच्या तावडीत मुस्लिम समाज कसा कायमचा राहील याचीच तरतूद राजीव गांधीनींही करून ठेवली.

इतके सारे रामायण घडल्यावरही भारतीय मुसलमानांचे डोळे उघडले नाहीत. ते अजूनही आपण वेगळे राष्ट्र आहोत आणि नाइलाजाने काफिराच्या देशात राहात आहोत, जिना हेच आपले खरे पुढारी होते व शहाबुद्धीन हे जिनांचाच अवतार आहेत अशा समजुतीत ते आहेत. त्यामुळे या देशाशी ते मनाने एकरूप होऊ शकत नाहीत. एवढेच नव्हे तर 'हँसके लिया पाकिस्तान लडके लेंगे हिंदुस्तान' ही त्यांची भूमिकाही बदलली नाही. भारतातील हिंदू हे काफिर म्हणजे इस्लामचे दुष्मन आहेत, ही त्यांची भूमिका आजही कायम आहे. काफिरांशी सहकार्य करण्यास त्यांच्या धर्मानेच त्यांना प्रतिबंध केला आहे. त्यांच्याशी शत्रुत्व करणे हे प्रत्येक मुसलमानाचे कर्तव्य समजले जाते. आपली ही भूमिका सोडून देऊन हिंदू हे काफिर नसून आपण एका हिंदू राष्ट्रात राहत आहोत आणि भारतीय संस्कृती हीच आपली संस्कृती आहे, हे मान्य करून ते जोपर्यंत राष्ट्रीय प्रवाहात

सामील होणार नाहीत, इंग्लंड, अमेरिका, चीन, रशिया या देशांच्या राष्ट्रीय प्रवाहांशी जितपत तेथील मुसलमान एकरूप झाले आहेत, तितपत तरी ते प्रगती करणार नाहीत, तोपर्यंत या दंगली होतच राहतील. त्यांच्या या वृत्तीमुळे आजवर कधीही आक्रमक न बनलेला हिंदू समाज आक्रमक बनू लागल्याची चिन्हे दिसत आहेत. यावेळी सत्ताधाऱ्यांकडून अल्पसंख्यांकांना परिस्थितीची जाणीव करून दिली गेली पाहिजे. त्याऐवजी ते मतपेटीचा विचार मनात बाळगून अल्पसंख्यांकांचा अनुचित अनुनय करीत राहतील तर हिंदूंची आक्रमकता भयंकरच वाढेल; आणि हिंदू संस्कृतीचा नाश होऊन हिंदू हे सांस्कृतिक दृष्टया मुसलमानांहून काहीच वेगळे नाहीत, ते तसेच क्रूर, कृतघ्न, विध्वंसक बनले आहेत, असे दृश्य पुढील पिढ्यांना पाहावे लागेल. हा सांस्कृतिक अनर्थ टाळावयाचा असेल तर, लुच्च्या गांधींपासून सावध होऊन सच्च्या गांधींच्या मार्गाने जाण्याचा निश्चय भारतीयांनी केला पाहिजे. नान्य : पंथा :।

+ +

'शब्दांगण' : दिवाळी ८७

३३. सत्याचा शोध, सत्याचे प्रयोग आणि सत्याचा आग्रह !

सत्याची ओढ माणसाला अनादि कालापासून लागून राहिलेली दिसते. जे ज्ञानी व नम्र असतात त्यांना याची जाणीव असते की, आपल्याला अंतिम सत्य सापडलेले नाही. म्हणून ते त्या सत्याचा शोध करण्यात गढून जातात. त्यांचा तो शोध कधीच संपत नाही. कारण, निखळ सत्य कोणालाच गवसत नाही. तरीपण आपल्याला सत्याचा शोध लागला आहे, असे बहुतेक सर्वांनाच वाटते. जे उर्मट, अहंकारी व अल्पज्ञ असतात त्यांची तर, याबाबतीत खात्रीच झालेली असते, आणि म्हणूनच आपल्याला गवसलेले सत्य इतरांच्या गळी उतरविण्याचा आटोकाट प्रयत्न ते करीत असतात. त्यासाठी ते आपल्या वेगळ्या धर्माची स्थापना करतात. आधुनिक काळात धर्माची जागा पक्षांनी घेतलेली आहे. त्यामुळे जुन्या काळी धर्मांनी व त्यांच्या अनुयायांनी केलेल्या चुका व अन्याय–अत्याचार आजचे पक्ष तितक्याच उत्साहाने करीत असलेले दिसतात. आपल्याला सापडलेले सत्य इतरांनी स्वीकारले नाहीतर अपमान झाला असे त्यांना वाटते. किंबहुना इतरांनी ते स्वीकारले तरच त्याचा खरेपणा सिद्ध झाला असे ते समजतात. दीर्घकालीन चिंतनाने परिणतप्रज्ञ झालेल्या हिंदू किंवा सनातन धर्माची भूमिका मात्र तशी नाही. आपल्याला समजलेले सत्य इतरांवर जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न त्याने केला नाही. बहुधा तसे केल्यास आपल्या सत्यामध्ये स्वतःच्या सामर्थ्यावर उभे राहण्याची ताकद नाही, ते खरे सत्यच नसून बनावटी सत्य आहे, अशी कबुली दिल्यासारखे होईल हे त्याने फार पूर्वी ओळखले आहे. म्हणून आपल्याला जे सत्य सापडले आहे, ते सांगून टाकावे, सर्वांसमोर मांडावे आणि त्यासंबंधीचा निर्णय त्यांच्यावरच सोपवून मोकळे व्हावे

अशी हिंदू धर्माची भूमिका राहिली आहे. बहुधा त्यामुळेच हिंदुधर्मात धर्मप्रचाराला फारसे महत्त्व दिले गेले नसावे. आपण आपल्या धर्माचे पालन प्रामाणिकपणे करावे व त्यातून जेवढा काही धर्मप्रचार होईल, त्यावरच समाधान मानावे असे त्याने ठरविलेले दिसते, हे त्याच्या प्रौढपणाचे लक्षण आहे, असेही म्हणता येईल. याच्या उलट त्याच्यानंतर आलेल्या धर्मांनी व पंथांनी आपल्या मताच्या प्रसारासाठी विशेष प्रयत्न केलेले दिसतात. त्यासाठी त्यांनी भल्या-बुऱ्या उपायांचाही वापर केला. सनातन (वैदिक) धर्माला समकालीन असणाऱ्या पारसी, ताओ (चीन), शिंतो (जपान) वगैरे धर्मांनी आणि हिंदू (वैदिक) धर्मातून उगम पावलेल्या जैन, बौद्ध वगैरे धर्मांनी आपल्या अनुयायांची संख्या वाढविण्यासाठी जुलूम–जबरदस्तीचा व अत्याचारांचा वापर केला नाही; पण आपापल्या मार्गाचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी विचार-प्रचार अवश्य केला. त्यामुळेच बौद्ध धर्म आशिया खंडात सर्वत्र जाऊन पोहोचला; पण त्याचा प्रचार पूर्णपणे शांततेच्या व समजावण्याच्या मार्गाने करण्यात आला. त्याच्या नंतर उदयास आलेल्या ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांनी मात्र जुलूम, जबरदस्ती, फसवाफसवी वगैरे अधर्म्य मार्गांचा अवलंब केला. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रचाराबरोबर रुग्णसेवा, शिक्षणप्रचार यांसारखी काही चांगली कामे तरी केली; परंतु मुसलमानांनी एका हातात कुराण व दुसऱ्या हातात तलवार घेऊन आपला धर्म पसरविला. त्यांनी केलेल्या रक्तपातांची, अत्याचारांची व विध्वंसाची वर्णने वाचली की आजही अंगावर काटा उभा राहतो. हे सारे आपण लोकांना सत्याचा साक्षात्कार घडविण्यासाठी केले असे ते सांगत राहिले. ही तर सत्याची उघड उघड बदनामीच होती. आजचे खालिस्तानवादी शीख मुसलमानांची सहीसही नक्कल करीत आहेत. हे सारे चालू असताना साधुसंतांनी, सूफींनी, सेवाभावी मिशनऱ्यांनी व गुरूंनी आपापल्या धर्मातील सत्य लोकांना विश्वासात घेऊन प्रेमाने समजावून सांगण्याचे प्रयत्न केले होते. त्यामुळे त्यांच्या धर्माची अब्रू थोडीफार टिकून राहिली.

आधुनिक काळातील सत्यशोधक

पाश्चात्त्य ज्ञानाच्या प्रकाशात इंग्रजांच्या आगमनानंतर या देशात पुन्हा नव्याने सत्याचा शोध घेण्यास सुरुवात झाली. राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी दयानंद सरस्वती, देवेंद्रनाथ ठाकुर, विवेकानंद, न्यायमूर्ती रानडे, रमण महर्षी, अरविंद, कृष्णमूर्ती वगैरे महापुरुषांनी त्या दिशेने प्रयत्न केले व त्यासाठी ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज यांसारख्या संस्थाही स्थापन केल्या. त्याचवेळी जोतीराव फुल्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाजही सत्याचा शोध घेत होता; आणि दक्षिणेत ई. के. रामस्वामी नायकर यांनीही आपल्या परीने सत्याचा शोध करण्यास सुरुवात केली होती. या सर्वांवर ख्रिस्ती धर्म व पाश्चात्त्य

विचार यांचा खूपच पगडा होता. मात्र ते दोन प्रवाह त्यांच्या बाह्य स्वरूपांमुळे एकमेकांहून भिन्न असल्याचे स्पष्ट दिसून आले. ब्राह्मसमाज व प्रार्थनासमाज हे मुख्यत: सुशिक्षित, सुसंस्कृत, सुखवस्तू लोकांना आकर्षित करू शकले; आणि काळाच्या ओघाबरोबर त्यांना हवे असलेले परिवर्तन घडून आल्यामुळे त्यांचे कार्य संपले आणि ते नामशेष झाले. महर्षी दयानंद सरस्वती यांनी आर्यसमाजाची स्थापना करून वेदाधारित, समतापूर्ण समाजव्यवस्थेच्या निर्मितीला हातभार लावला. त्यांच्या मुख्य मार्गदर्शक ग्रंथाचे नावच 'सत्यार्थ प्रकाश' असे आहे. आर्य समाज हा समाजाच्या तळागाळापर्यंत जाऊन पोहोचला; आणि त्याच्या शाखा जगभर पसरल्या. फुले आणि नायकर यांच्या कार्याचे स्वरूप त्याहून वेगळे होते. हिंदू धर्मातील जातिभेद, सामाजिक विषमता, उच्चनीचता वगैरे अनिष्ट गोष्टींना ब्राह्मणवर्ग जबाबदार आहे, अशी (पुरेशा ऐतिहासिक घटनांच्या ज्ञानाच्या अभावामुळे) त्यांची समजूत झाली असल्यामुळे त्यांनी आपला सारा प्रचार ब्राह्मणद्वेषावर आधारला. परिणामत: सुशिक्षित, सुसंस्कृत व जाणकार लोक त्यांच्यापासून दूर राहिले; आणि तळागाळाच्या लोकांवर परंपरेचा जबरदस्त प्रभाव असल्याने तेही फार मोठ्या संख्येने त्यांचे अनुयायी बनले नाहीत. मात्र ज्यांना सामाजिक विषमतेची मुळीच झळ पोहोचलेली नव्हती, किंबहुना ती विषमता बळकट करण्यात ज्यांचा भरपूर हातभार लागला होता, अशा मध्यम व उच्चवर्गीय अब्राह्मणांनी इंग्रजी शिक्षणाच्या बळावर सरकारी नोकऱ्यांत वर्चस्व गाजवून बसलेल्या ब्राह्मणांचे उच्चाटन करण्यासाठी या चळवळींचा भरपूर वापर करून घेतला. त्यांनी फुल्यांना 'महात्मा' व नायकरांना त्याच अर्थाची 'पेरियार' ही पदवी बहाल करून आपल्या स्वार्थासाठी त्यांचा खूप उपयोग करून घेतला; परंतु त्यांच्या समतेच्या तत्त्वज्ञानाकडे पूर्ण दुर्लक्ष केले. एवढेच नव्हे तर, एक नव्या प्रकारची विषमताच त्यांनी निर्माण केली. अगदी अलीकडच्या काळात बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेतलेल्या दलित पुढाऱ्यांनीही या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचेच अनुकरण करून आपापल्या पोळीवर तूप ओढून घेण्यातच कृतार्थता मानली. त्यामुळे दलित-पीडित जनता जेथे होती तेथेच राहिली.

स्वामी विवेकानंदांनी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनने मुख्यत: दलित-पीडित जनतेच्या सेवेचे व उत्थानाचे काम हाती घेतले. ते आजही जोरात चालू आहे. मात्र त्याचा राजकारणाशी काही संबंध नाही.

गांधींचे सत्याचे प्रयोग

फुले व नायकर यांच्यानंतर सत्याचा व विशेषत: सामाजिक समतेचा शोध घेणारे महत्त्वाचे भारतीय महापुरुष म्हणून जगाच्या क्षितिजावर गांधींचा उदय

झाला. या तीन सत्यशोधकांमध्ये एक महत्त्वाचे साम्य होते. ते असे की, ते तिघेही दृढ अर्थाने विद्वान नव्हते. समतेविषयी त्यांना वाटणारी ओढ, बौद्धिकतेतून निर्माण झालेली नसून दलित-पीडित जनतेविषयी वाटणाऱ्या आत्मीयतेतून व कणवेतून तिचा उगम झालेला होता. त्यामुळे त्यांच्या बोलण्या-लिहिण्यात विद्वत्ताप्रचुर ग्रंथांचा आधार पुरावा म्हणून घेतलेला फारसा आढळत नाही. अंतःप्रेरणेने त्यांनी आपापल्या कुवती-प्रमाणे सत्याचा शोध घेतला आणि ते त्यांना जसे भावले तसे ते त्यांनी लोकांपुढे मांडले. तसे तिघेही अब्राह्मण सुधारकच होते; परंतु त्यांच्या देवाधर्माच्या बाबतीतील भूमिका अगदी वेगवेगळ्या होत्या. पेरियार हे कट्टर नास्तिक होते. आपल्या मताची उग्रता लोकांना कळावी यासाठी त्यांनी रामकृष्णादि देवतांच्या तसबिरींना जोड्यांच्या माळा घालून गावोगावी मिरवणुका काढल्या; आणि हिंदुधर्मातील परंपरागत गोष्टींचे वाभाडे काढले. ब्राह्मण हे आर्य असून त्यांचा सनातन धर्म हा अनार्य द्रविडांवर अन्याय करणारा आहे, अशी त्यांची भूमिका होती. म्हणून द्रविडांचे स्वतंत्र राष्ट्र (तमिळनाडू) निर्माण करण्यावर त्यांचा सारा भर होता. त्यांच्या धूर्त अनुयायांनी आर्य विरुद्ध द्रविड, उत्तर विरुद्ध दक्षिण, हिंदी विरुद्ध तमिळ या त्यांच्या भडक प्रचाराचा भरपूर उपयोग करून घेतला; आणि द्रविड कळघम, द्रविड मुन्नेत्र कळघम व अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम् यांसारखे राजकीय पक्ष निर्माण करून राजकीय सत्ता हस्तगत केली. फुल्यांच्या अनुयायांनी ब्राह्मणेतर पक्ष स्थापन करून व नंतर सत्ता-धारी काँग्रेस पक्षात सामील होऊन सत्ता मिळविली. या धडपडीत त्या दोघांनाही आपापल्या प्रेरणादात्याचा पूर्ण विसर पडला. ज्या ब्राह्मणी संस्कारांविरुद्ध फुले व पेरियार यांनी बंड केले होते, ते संस्कार, रूढी, परंपरा यांचा त्याग त्यांच्या या सत्ताधारी अनुयायांनी मुळीच केला नाही. त्यामुळे त्या महापुरुषांचा सत्याचा शोध तसा फुकटच गेला. या पार्श्वभूमीवर गांधींचा सत्याचा शोध त्याच्या वेगळेपणाने उठून दिसतो. गांधी जरी मूलतः व मुख्यतः हिंदू धर्म व समाज यांमध्ये सुधारणा घडवून आणू इच्छित असले तरी त्यांनी संपूर्ण मानव जात आपल्यासमोर ठेवली होती. कोणत्याही एका विशिष्ट जातीविरुद्ध किंवा वर्गाविरुद्ध त्यांच्या मनात द्वेषभावना नसल्यामुळे त्यांच्या सत्याचा संघर्ष असत्याशी, न्यायाचा अन्यायाशी होता. याबाबतीत केवळ तात्त्विक विवेचन करून न थांबता त्यांनी आपले विचार प्रत्यक्ष अमलात आणण्याच्या दृष्टीने प्रयोगही केले. त्यामुळे त्यांचे जीवन व कार्य साऱ्या जगाला उपयुक्त वाटले. हे प्रयोग करताना त्यांनी स्वतःच्या बदनामीची पर्वा न करता आपल्या चुकाही मोकळ्या मनाने सांगून टाकल्या. त्यामुळे ते जगातील सत्य-शोधकांना जास्तच विश्वासार्ह वाटू लागले.

सत्याचा आग्रह

फुले, पेरियार व गांधी या तिघांनीही त्यांना भावलेल्या सत्याचा आग्रह धरला;

परंतु फुले व पेरियार यांच्या ब्राह्मणद्वेषामुळे त्याला संकुचित जातीयतेचे रूप प्राप्त झाले. वस्तुतः फुले काही पेरियार यांच्याप्रमाणे नास्तिक नव्हते. त्यांनी मानलेला निर्मिक हा परमेश्वरच होता. परंतु त्याने कट्टर नास्तिकांचेही समाधान झाले नाही व आस्तिकांनाही त्यांच्याविषयी आपलेपणा वाटला नाही. त्यामुळे ते दोघेही त्यांच्यापासून दूर राहिले. गांधी हे कट्टर आस्तिक होते आणि स्वतः मूर्तिपूजक नसले तरी, मूर्तिपूजेला त्यांचा प्रखर विरोधही नव्हता. त्यामुळे बहुसंख्य हिंदू जनता आणि जगभरातील ख्रिस्ती विचारवंत यांना ते आपले वाटले. एवढेच नव्हे तर, गांधींची आस्तिकता विशाल मानवतावादावर आधारलेली असल्यामुळे नेहरू, जयप्रकाश, लोहिया, कृपलानी यांच्यासारख्या रूढार्थाने नास्तिक असणाऱ्या समाजवादी नेत्यांना व जगातील धर्मनिरपेक्ष विचारवंतांना त्यांचे विचार कालोचित व सार्वकालीन वाटले. आता तर गोर्बाचेवसारख्या कट्टर साम्यवाद्यालाही गांधीविचार जागतिक शांततेला साहय्य करणारा वाटू लागला आहे. त्याचे एक महत्त्वाचे कारण असे की, गांधींनी आपला विचार केवळ वैचारिक पातळीवर न ठेवता तो अमलात आणता येतो हे दाखवून दिले. त्यासाठी त्यांनी जो आग्रह वाळगला तो सत्याग्रहाच्या रूपाने जगासमोर आला; आणि त्याने असंख्य दलितपीडित लोकांना शांततेच्या मार्गाने आपली मुक्ती करून घेण्याची दिशा दाखविली. वस्तुतः फुले आणि पेरियार यांचे सत्यशोधन समतेच्या प्रस्थापनेसाठीच होते; परंतु त्यांच्या ब्राह्मणद्वेषाने व आर्यविरोधाने त्यांची भूमिका फार संकुचित व म्हणून इतरांच्या दृष्टीने निरुपयोगी ठरली. तसे पाहिल्यास प्रत्येक विचारवंत आपापल्या कुवतीनुसार सत्याचा शोधच करीत असतो, किंबहुना तुमच्या-आमच्यासारखी सामान्य माणसेही सत्याचा शोध करीत असतात. परंतु सापडलेल्या सत्याचा आग्रह बाळगून प्रत्यक्ष जीवनात त्याचा प्रयोग करण्याचे सामर्थ्य आपल्यात नसते. म्हणजे आपण स्वतःही आपले अनुयायी बनण्यास तयार नसतो. मग इतर कोणी आपल्या मागे कसे येणार?

सक्रिय व निष्क्रिय सत्यशोधक

यातूनच एक जागतिक सत्य आपल्याला कळून येते. ते असे की, सत्य हे स्वतः क्रियाशील नसते. जोपर्यंत इतर कोणी आपले शारीरिक, मानसिक, बौद्धिक वा आध्यात्मिक सामर्थ्य त्याच्या पाठीशी उभे करीत नाही, तोपर्यंत ते लुळे पांगळेच असते. मार्क्सच्या सत्यामागे रशियाचे कामगार व चीनचे शेतकरी सर्वस्व पणाला लावून उभे राहिले, म्हणून त्या त्या देशांतील क्रांती यशस्वी झाली. वेगवेगळ्या देशांतील स्वातंत्र्य सेनानींनी आपल्या मागे आम जनतेचे बळ उभे केले म्हणून ते देश स्वतंत्र झाले. ज्या समाजसुधारकांनी आपल्या सत्याचे समर्थन करणारी पुरेशी जनशक्ती निर्माण करण्यात यश मिळविले त्यांच्या सुधारणा

लोकांनी मान्य केल्या. त्या रुजल्या आणि फोफावल्या. याच्या उलट ज्यांना असे बळ निर्माण करता आले नाही, त्यांना सापडलेले सत्य कितीही निखळ, बावनकशी असले तरी, ते अडगळीत पडून राहिले. आपल्या देशात मानवेंद्रनाथ राय यांना झालेला मानवतावादाचा, सावरकारांना झालेला बुद्धिप्रामाण्यवादी हिंदुत्वाचा आणि आंबेडकरांना झालेला समतावादी दलितशक्तीचा साक्षात्कार मुळीच खोटा नव्हता. फुले व पेरियार यांनी लावलेला सत्याचा शोधही खराच होता. परंतु या सर्वांची सत्ये आपापल्या मर्यादित वर्तुळातच बंदिस्त होऊन राहिली. कारण, त्यांना सार्वत्रिक बनविण्यासाठी आवश्यक असणारी लोकशक्ती त्यांना उभी करता आली नाही. ज्या गांधींना अशी लोकशक्ती उभी करण्यात यश मिळाले, त्यांचे सत्यही त्यांच्या डोळ्यादेखत पराभूत होत असल्याचे पाहणे त्यांच्या नशिबी आले. याचा अर्थ एवढाच की सत्याच्या शोधाची प्रक्रिया ही अखंड चालूच ठेवावी लागते !

अप्रकाशित : २७·३·८९

REFBK-0026308

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	११	तळमळ	मळमळ
१०	२५	घटल्याचे	घडल्याचे
१४	५	तळमळून	तळतळून
२४	२४	प्रज्ञेचा, त्यांच्या	त्यांच्या प्रज्ञेचा,
३५	२३	त्रस्त	ग्रस्त
४४	१९	तात्पुरता	तात्पुरत्या
१०२	१८	वगाचे	गावचे
१०८	१२	चांगशील	सांगशील
११२	४	सर्वांनी	सर्वांना
११९	१६	वगैरे	वगैरे राज्यांनी
१६२	१३	लोकशाहीची	ठोकशाहीची
१७७	२३	उडनापणात	उनाडपणात
१९०	१९	नजरूम	नजरुल
२२३	१३	त्यांनी	काफिरांनी
२५२	१	धबां	बांध
२५४	७	आहे	आहेत.
२५६	२१	लोकांना	सामान्य लोकांना

'श्री मानस'

श्रीपाद जोशी-

(जन्म : २३ जानेवारी १९२०)

श्रीपाद जोशी हे गांधीवादी विचारवंत म्हणून महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील सुबुद्ध वाचकांना परिचित आहेत. ते मराठी खेरीज हिंदी, उर्दू, गुजराती, बंगाली वगैरे इतरही अनेक भाषा जाणतात. त्यामुळे बहुभाषा कोविद म्हणूनही ते प्रख्यात आहेत. गांधीवादी आणि राष्ट्रवादी लेखक व विचारवंत या नात्याने त्यांनी गेली पन्नास वर्षे विपुल लेखन केले आहे. त्यांची आजवर सुमारे १८० लहान मोठी पुस्तके प्रसिद्ध झाली असून त्यांनी वृत्तपत्रे व नियतकालिके यांतून लिहिलेल्या लेखांची संख्या सुमारे १८०० आहे. या लेखांचे विषय विविध आहेत. त्यावरून श्री. जोशी यांची जीवनविषयक बांधिलकी आणि चौफेर जिज्ञासा यांची कल्पना येते. या लेखांपैकी काही निवडक लेख 'श्री-मानस' या सदर संग्रहातून वाचकांसमोर येत आहेत. वाचकांकडून या संग्रहाचे चांगले स्वागत होईल याविषयी आम्हांस विश्वास वाटतो.

राजहंस प्रकाशन